श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ४४

**प.पू.सद्‌गुरु श्रीमामामहाराज केळकर यांचे चरित्र**

**प्रकाशक** : **श्री.रघुनाथ रामचंद्र पोतदार**
मु.पो.चिकुर्डे, ता.वाळवा, जि.सांगली.

**प्रथम आवृत्ति :** इ.स. २०१२

**प्रकाशन दिन :** बुधवार दि. १-२-२०१२
माघ शुद्ध ९, शके १९३३
(प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांची ५० वी
पुण्यतिथी)

© **श्री. दीपक चंद्रशेखर केळकर**

**मुद्रक** : श्री. अनिल लोखंडे
श्रीदासराम ऑफसेट, सांगली.
दूरध्वनी-(०२३३) २३२२७२९

**प्रसाद मूल्य** : रु. १००/-

---

**प्रत मिळणेचे ठिकाण :** श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं. ८२७, श्रीराम निकेतन, गांवभाग, सांगली-४१६ ४१६
दूरध्वनी-(०२३३) २३३२४६३, भ्रमणध्वनी - ०९८२२००७५२८

श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ४४

# प.पू.सद्‌गुरु श्रीमामामहाराज केळकर

## यांचे

# चरित्र

ॐ

◆ लेखक ◆

**प्रा.डॉ.के.वा.आपटे**

◆ प्रकाशक ◆

**श्री. रघुनाथ रामचंद्र पोतदार**

आवृत्ति पहिली सांगली इ.स. २०१२

ज्यासी गुरुत्वाची नाही चाड । ज्यासी ज्ञानगर्व नाही वाड ।
ज्यासी लौकीकाचे नाही कोड । सद्‌गुरु दृढ तो एकू ।।

या उक्तिप्रमाणे असणारे माझे पणजोबा ती.प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांनी संपूर्ण आयुष्यात अत्यंत गुप्तपणाने परमार्थ केला व परमार्थातील परमोच्च स्थिती प्राप्त करून घेतली. प.पू.श्रीमामांनी त्यांच्या पूर्ण आयुष्यात जास्तीत जास्त ४०-५० व्यक्तींना अनुग्रह दिला. श्रीतात्यासाहेब कोटणीस महाराज यांच्या आज्ञेने सन १९२४ ते १९६२ पर्यंत अखंड कीर्तन केले. लौकीकाकरीता कीर्तन न करता केवळ श्रीतात्यासाहेबमहाराजांची सेवा म्हणून कीर्तन केले. श्रीमामांना सन १९०६ साली प.पू.सद्‌गुरु श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचा नामानुग्रह मिळाला. श्रीनारायणमहाराजांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना साधन करून साधनसिद्धता प्राप्त करून घेतली. साधनाबरोबर कीर्तन व कीर्तनाबरोबर साधन साधत परमार्थ केला. नामसंकीर्तन साधन पै सोपे । जळनीळ पाये जन्मांतरे ही उक्ती याचे द्योतक आहे.

अशा या मामामहाराजांचे यापूर्वी प्रा.डॉ.रा.वि.कुलकर्णी प प्र.स.भावे यांनी लिहिलेले गद्य चरित्र व श्री.न.दा.दिनेकर यांनी लिहिलेले पद्य चरित्र प्रसिद्ध झाले आहे. श्रीमामांच्या जीवनकाळक्रमानुसार चरित्र लिहिले नावे या उद्देशाने मी ती.प.पू.श्री.के.वा.आपटे तथा आमचे केशवकाका यांना चरित्र लिहिणेबाबत विनंती केली. या विनंतीस अनुसरून श्रीकेशवकाकांनी कालानुक्रमानुसार चरित्र लिहिले आहे. चरित्र अत्यंत रसाळ झाले आहे यात शंका नाही. या चरित्रात श्रीमामांच्यावर केलेली काव्यसंपदा ही समाविष्ट केली आहे. तसेच आणखी काही माहिती वजा रेकॉर्ड उपलब्ध झालेने परिशिष्टे समाविष्ट केली आहेत. हे सर्व काव्य व माहिती वाचली असता श्रीमामांचा अधिकार आपणास कळून आकाशिवाय राहणार नाही. हा संपूर्ण ग्रंथ पाहिला असता प.पू.मामांचा जीवनकोशच तयार झाला आहे. असे म्हणण्यास वावगे ठरणार नाही.

यावरील उक्तीप्रमाणे प.पू.मामा देहरूपाने जरी नसले तरी ते निर्गुणरूपाने जगदाकार होऊन व्यापून राहिले आहेत. व केवळ त्यांच्या सत्तेवरच हे सगळे चालले आहे. श्रीमामा श्रीरामनिकेतन सोडून कोठेही गेलेले नाहीत आत्तासुद्‌धा ते अखंड वास्तव्य करून आहेत. आपण जरी मामांना पाहिलेले नसले तरी प.पू.श्रीदादांना पाहिलेले आहे. प.पू.श्रीदादांनी त्यांच्या दासरामगाथा अभंग क्र.८१४मधे म्हटले आहे की आजवरी होता आपुलिये घरी । आता या शरीरी वास केला ।। आत्मा वै पुत्रनामासि या उक्तीप्रमाणे प.पू.श्रीमामांनी प.पू.श्रीदादांच्या हृदयात वास केला होता. त्यामुळे प.पू.श्रीदादांचे दर्शन घेतले असता प.पू.मामांचे दर्शन घेतल्यासारखेच

## लेखकाचे मनोगत

सांगली क्षेत्रात नित्य हरिकीर्तन करण्याची मुहूर्तमेढ सुप्रसिद्ध संत ह. पां. ऊर्फ तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांनी रोवली. त्यांनी इ. स. १९०१ ते १९२४ पर्यंत दररोज रात्री २४ वर्षे हरिकीर्तन करून मुहूर्तमेढ घट्ट केली. आपली नित्य कीर्तनाची परंपरा पुढे चालू रहावी अशी त्यांची इच्छा होती. म्हणून त्यांनी आपले निर्याणानंतर साक्षात् प्रगट होऊन गोविंद अनंत ऊर्फ बापूरावजी केळकर या भक्तास नित्य कीर्तन करण्याची आज्ञा दिली. त्या आज्ञेप्रमाणे बापूरावजी केळकरमहाराजांनी निर्वाणाच्या घटकेपर्यंत ३८ वर्षे अखंड कीर्तन केले. हा एक उच्चांकच होता.

आपले सद्‌गुरु नारायणमहाराज यरगट्टीकर व गुरुतुल्य असे तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांच्या कृपेने आणि स्वत:च्या साधननिष्ठेने बापूरावजी ऊर्फ मामामहाराज केळकर हे परमार्थातील अंतिम कोटीला पोचलेले सत्पुरुष झाले. मामामहाराजांच्या निर्याणानंतर लगेच त्यांचे 'गोविंदचरितमानस' हे श्री. न. दा. दिवेकर यांनी स्वयंस्फूर्तीने लिहिलेले चरित्र प्रसिद्ध झाले. त्यानंतर काही काळाने प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी यांनी लिहिलेले मामामहाराजांचे चरित्र पुण्याच्या संतकृपा प्रतिष्ठानने प्रकाशित केले. ही दोन चरित्रे उपलब्ध असतानाही, मामामहाराजांचे पणतू श्री. दीपकराव यांना तिसरे एक मामामहाराजांचे चरित्र असावे अशी स्फूर्ति झाली. आणि त्यांनी मला हे चरित्र लिहिण्याची विनंति केली. आणि ती मी आनंदाने मान्य केली. आत्तापर्यंत चिमड संप्रदायातील अनेक संतांची चरित्रे मजकडून लिहिली गेली आहेत. त्यात या नूतन चरित्राची भर पडत आहे.

मामामहाराजांच्या पहिल्या दोन चरित्रांत काही घटनांचा अनुक्रम नीट साधला गेला नसावा असे दीपकरावांना वाटले असावे. म्हणून प्रस्तुतच्या चरित्रात शक्य तितका कालानुक्रम पाळण्याचा प्रयत्न मी केला आहे.

पूर्वीच्या चरित्रात मामामहाराजांच्या लेखनाची फारशी ओळख नव्हती. ती



येथे तपशीलवार देण्याचा प्रयत्न केला आहे. श्रीमामामहाराजांचे हे चरित्र प्रकाशित करणाऱ्या प्रकाशकांची अशी इच्छा होती की मामामहाराजांचे संबंधात जे जे लेखन उपलब्ध आहे, ते ते या चरित्रग्रंथात यावे. तेव्हा ते ते लेखन या चरित्रात अंतर्भूत करण्याच्या दृष्टीने या चरित्राला अनेक परिशिष्टे जोडली आहेत. अशाप्रकारे प्रस्तुतचे चरित्र हे पहिल्या दोन चरित्रांपेक्षा थोडे वेगळ्या धाटणीचे झाले आहे, यात शंका नाही.

प्रस्तुतच्या चरित्रावरून मामामहाराजांची जास्तीत जास्त ओळख वाचकांना होईल अशी आशा व्यक्त करून मी येथेच थांबतो.

**- के. वा. आपटे**

# अनुक्रमणिका

## चरित्र विभाग


१. केळकर कुळाची कथा आणि मातापिता १

२. श्रीमामांचे जनन, बालपण आणि शिक्षण

३. प्लेगमधून सुटका आणि ज्ञानेश्वरमहाराजांचे दर्शन

४. श्रीमामांची नोकरी, गुरूचा अनुग्रह, श्रीदादांचा जन्म

५. रामनाम पुरश्चरण, रामसीतांचे आगमन
व हनुमत् साक्षात्कार

६. श्रीमामांच्या कीर्तनाविषयी

७. नोकरीचा राजीनामा आणि उपदेश देण्यास प्रारंभ

८. श्रीदादांचा विवाह/रामेश्वर यात्रा, रौप्य महोत्सव

९. निंबरगी यात्रा, त्रितप महोत्सव

१०. श्रीमामांच्या जीवनातील कांही घटना, प्रसंग

११. मामांच्या अंगी मुरलेले गुण

१२. श्रीमामांची ग्रंथसंपदा

१३. श्रीमामांचे महानिर्वाण

१४. श्रीमामांच्या महानिर्वाणानंतर

१५. श्रीमामांच्या संदर्भात भक्तजनांची मनोगते

१६. श्रीमामांच्या संदर्भात इतरांची वचने

१७. असे होते मामा (कांही आठवणी)


## काव्यसंपदा विभाग


१. श्रीमामांच्यावरील काव्यसंपदा

## परिशिष्ट विभाग


१. श्रीमामांचा जन्म शक आणि इसवी सन
२. श्रीमामांनी केलेली पुरश्चरणे, पारायणे आणि कीर्तने
३. श्रीमामांच्या हस्ते झालेले कार्यक्रम
४. श्रीमामांच्याकडे आलेले मान्यवर स्त्री–पुरुष
५. मामांनी काढलेले ज्ञानेश्वरमहाराजांचे रेखाचित्र
६. श्रीमामांच्या जन्मशताब्दीचा सोहळा
७. प. पू. श्रीमामांचे अनुगृहीत शिष्य
८. श्रीतारक रामनाम आधार मंडळ
९. श्रीमंत राजेसाहेब, सांगली यांना पाठविलेले पत्र
१०. प.पू.श्रीमामा व श्री.न.दा.दिवेकर यांचेतील प्रश्नोत्तरे
११. श्रीमामांचा ३६ वा पुण्यतिथी महोत्सव
१२. श्रीमामांच्या नांवे दिली जाणारी शालेय पारितोषिके
१३. गणितीय प्रक्रियेने सिद्ध होणारे ‘राम’नामाचे महत्त्व
१४. शाळा नं. २ आणि रस्ता याचे नवीन नामकरण
१५. प.पू.श्रीपांडुरंगमहाराज यांनी श्रीमामांना केलेली प्रार्थना
१६५. श्रीहनुमद्गुरुचरित्रबोधसार या पुस्तकास प.पू. श्रीनागाप्पाण्णामहाराज यांनी दिलेला आशीर्वाद
१७. श्रीमामांच्या एका कीर्तनाचा सारांश
१८. प. पू. श्रीमाममहाराज केळकर यांचे कीर्तनाचा अमृतमहोत्सव
१९. श्रीगजाननमहाराज संस्थान शेगांव (विदर्भ) येथील भक्तधाममधील खोलीस श्रीमामांचे नामकरण
२०. हनुमद्गुरुचरित्रबोधसार ग्रंथाची निमंत्रण पत्रिका
२१. प.पू.श्रीमामांची वर्तनक्रमपत्रिका
२२. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे प्रमाणभूत चित्र

## प्रकरण–१

## केळकर कुळाची कथा आणि मातापिता

पूर्वजन्मीच्या पुष्कळ पुण्याईने श्रीमामांचा जन्म केळकर आडनावाच्या कुळात झाला. हे कुळ मूलतः कोकण प्रदेशातील होते. केळकर या नावाची व्युत्पत्ति कदल (=केळे) + कर अशी देता येते. या कुळाच्या पंचवीस शाखा होत्या. आणि त्यातील लोक गोवा, महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि गुजरात येथपर्यंत पसरलेले आहेत. केळकर घराण्याचे मूळ गाव ''नेवरे/वाडा ढोकमळे'' हे होते. येथूनच काही ना काही कारणांनी या कुटुंबातील लोक बाहेर पडले आणि इतरत्र गावोगावी वसतीस गेले.

केळकर कुळाचे गोत्र शांडिल्य, वेद ऋग्वेद, शाखा शाकल, सूत्र आश्वलायन असे आहे. या घराण्याला शांडिल, असित आणि देवल असे तीन प्रवर आहेत. सोमेश्वर आणि बंदिजाई या मुख्य कुलदेवता या कुळाच्या होत्या. परंतु केळकर कुटुंबांची जसजशी ग्रामांतरे आणि स्थलांतरे होत गेली, तसतशी त्या गावच्या/स्थानाच्या देवता या केळकरांच्या कुलदेवता बनत गेल्या. देवदिवाळी दिवशी कुलदेवतांना विशिष्ट नैवेद्य दाखविणे, बोडण भरणे, नवरात्र पाळून देवीपुढे नंदादीप सतत तेवत ठेवणे आणि फुलांच्या माळा बांधणे इतके कुलाचार होते.

स्थानांतर करता करता केळकर कुळातील एक कुटुंब कोकणातीलच आचरे नावाच्या गावी वास्तव्यास आले. येथे आल्यावर या कुटुंबात रामेश्वर, रवळनाथ, पावणाई, ब्राह्मणदेव, गांगो, नवलाई आणि सातेरी व बांदेश्वरी यांचा कुलदेवतांमध्ये समावेश झाला. आणि आचारांत पुढील भर पडली :-देवदिवाळीचे दिवशी

रामेश्वर आणि बांदेश्वरी या देवतांना विशिष्ट नैवेद्य दाखविण्याची प्रथा पडली. आचरे येथील केळकरांपैकी गंगाधर नावाचा पुरुष सांगली नावाच्या गावी रहावयास आला. मग त्याच्या कुटुंबात अनंतव्रत, हनुमंतव्रत असे काही नवीन आचार शिरले.

या गंगाधराचे पूर्वज आणि श्रीमामामहाराजांचे पर्यंतचे वंशज यांची नावे अशी :-

केशव (मूळ पुरुष)

महादेव

गोपाळ

श्रीधर गोविंद आबा

रामचंद्र विठ्ठल गंगाधर

अनंत

गोविंद (मामामहाराज)

केळकरांच्या पाचव्या पिढीतील आचरे गावचा गंगाधर गोविंद हा पुरुष सांगली नावाच्या गावी रहावयास आला. देशावरील सांगली हेच गाव गंगाधराने का निवडले याची कारणे ज्ञात नाहीत. तथापि अनुमानाने ही कारणे पुढीलप्रमाणे असावीत असा तर्क करता येतो. :- १) मिरज संस्थानच्या पातीतून थोरले



चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन हे वेगळे झाले आणि त्यांनी इ. स. १८०० ते इ. स. १८०५ या सुमारास सांगली हे गाव आपल्या संस्थानची राजधानी म्हणून निश्चित केले आणि सांगलीच्या विकासाला सुरवात केली. त्यांनी बाहेरगावच्या लोकांना सांगलीत आणले. त्यामुळे बाहेरगावच्या लोकांची वस्ती सांगलीत आली. या नवीन लोकांना धनार्जन आणि उपजीविका यांना भरपूर वाव होता. ही गोष्ट गंगाधरने लक्षात घेतली. २) सांगली हे गाव त्यावेळी धार्मिक क्षेत्र म्हणून प्रसिद्ध होते. कृष्णा आणि वारणा या दोन नद्यांच्या संगमावर वसलेले हरिपूर गाव; तेथील संगमेश्वर हे शंकराचे तीर्थक्षेत्र; हे सर्व सांगलीच्या हद्दीत येत असे. कृष्णा नदीच्या पूर्व तटावर वसलेल्या सांगलीच्या गावभागात विष्णुघाट आहे. या घाटाच्या मागे तपोवन होते (हल्ली हे तपोवन नाही). या तपोवनात माध्व संप्रदायातील उत्तरादि मठाचे स्वामी सत्यव्रततीर्थ यांचे वृंदावन (=समाधि) आहे. साहजिकच माध्व संप्रदायांच्या अनुयायांच्या दृष्टीने सांगली हे पुण्यक्षेत्र होते. रामदास स्वामींच्या प्रसिद्ध पंचायतनातील सुप्रसिद्ध आनंदमूर्ति हे काही काळ सांगलीत रहात होते. त्यांना भेटण्यास आलेल्या समर्थ रामदास स्वामींनी तपोवनास भेट दिली, हे म्हणणे सयुक्तिकच ठरते. तसेच वैष्णव धर्माचे प्रसारक रामानंद स्वामी हेही सांगलीस येऊन गेले होते. अशा प्रकारे सांगली हे गाव धार्मिक दृष्ट्या प्रसिद्ध होते. अशा सांगली या तीर्थक्षेत्री वसतीस जावे, असे गंगाधर या धार्मिक गृहस्थास वाटले असल्यास नवल वाटण्याचे कारण नाही.

गंगाधर गोविंद हे जुन्या काळातल्याप्रमाणे धार्मिक स्वभावाचे होते हे मानण्यात अडचण नाही. ते दररोज स्नानसंध्या, गायत्रीमंत्राचा जप, स्तोत्रांचे पठण आणि अन्य काही जपजाप्य करीत असावेत, असे समजण्यास हरकत नाही. परमार्थाला उपयोगी पडणारा गुरु त्यांनी केला होता काय, हे मात्र ज्ञात नाही. त्यांचे थोडेफार लौकिक शिक्षण झाले होते. त्यांचा विवाह झाला असून त्यांच्या पत्नीचे नाव पार्वती असे होते.

सांगलीत वसतीस आल्यावर गंगाधररावांनी कवड्यांचा व्यापार सुरू केला. त्या जुन्या काळात कवडी ही मौल्यवान होती. कवडी ही देवीचे प्रतीक मानली जाते आणि देवीचे भक्त कवड्यांच्या माळा गळ्यात घालतात. अशा कवडीच्या व्यापारात गंगाधररावांचा जम बसला आणि ते सुखवस्तु म्हणून गणले जाऊ लागले.

गंगाधर आणि पार्वती या दांपत्याला इ. स. १८६० साली एक पुत्र झाला. त्याचे नाव अनंत असे ठेवण्यात आले. हा अनंत एकुलता एक असल्याने तो लाडाकोडात वाढवला गेला. त्याचे लाडके घरगुती नाव ''नाना'' असे होते. नानांचे शिक्षण मराठी व्हर्नाक्युलर फायनलपर्यंत झाले होते. शिक्षणानंतर ते सांगली संस्थानातील एज्युकेशनल इन्स्पेक्टरच्या कार्यालयात नोकरीस लागले आणि स्वत:च्या कर्तबगारीने ते लौकरच हेडक्लार्क झाले. त्यांनी एकंदर तीस वर्षे नोकरी केली आणि नंतर ते निवृत्त झाले. या काळात नाना थोडीफार सावकारीही करीत.

नाना सत्त्वशील आणि धार्मिक प्रवृत्तीचे होते. पण ते शिस्तीचे भोक्ते असल्याने त्यांच्या वागण्यात थोडाफार कडकपणा आलेला होता. नानांना अध्यात्माचीही आवड होती. सांगलीतच रहाणाऱ्या श्री. लक्ष्मण दीक्षित या सात्त्विक ब्राह्मणाकडून त्यांनी पार्थिव पूजेचे व्रत घेतले. साहजिकच स्नान संध्या झाल्यावर ते पार्थिव पूजा करीत आणि नंतर 'ॐ नम: शिवाय' या शंकराच्या षडक्षरी मंत्राचा बारा हजार जप दररोज करीत. सोमवारी त्यांचा उपवास असे. काही दिवस त्यांनी घरी वैश्वदेवही केला. महत्त्वाचे म्हणजे नानांची ज्ञानेश्वरमहाराजांच्यावर निष्ठा होती. कालांतराने लक्ष्मण दीक्षित यांनी देह ठेवला. तेव्हा त्यांची समाधि नानांनी विष्णुघाटावर बांधवून घेतली. त्या समाधीची पूजाही ते रोज करीत. तसेच लक्ष्मण दीक्षित यांची पुण्यतिथीही अनंतरावजी लक्ष्मण दीक्षितांच्या घरी जाऊन साजरी करीत. त्या प्रसंगी ते ब्राह्मण भोजन घालीत, आणि भोजनाचे वेळी ते स्वत:चे रचलेले लक्ष्मण दीक्षितांचे पद्यमय



चरित्र म्हणून दाखवीत. हे चरित्रात्मक पद्य चाळीस कडव्यांचे आहे.

अनंतरावजींची आईवर फार भक्ति होती. त्यांच्या आईला भात फार आवडे. भात खाण्याची तिची इच्छा पूर्ण करण्यास त्यांनी शहापूर-बेळगावजवळील कलखांब नावाच्या गावाजवळ भाताचे शेत विकत घेतले.

त्यानंतर वडिलांनी साठविलेली पुंजी आणि स्वत:ची पुंजी यांचा वापर करून अनंतरावांनी सांगलीच्या गावभागात स्वत:चे घर बांधले. या घराच्या जवळच एक पूर्वीची विहिर होती. त्या विहिरीचा जीर्णोद्धार अनंतरावांनी आपल्या मातोश्रींच्या स्मरणार्थ केला. ही विहीर आजही पाणी देत आहे. याच सुमारास त्यांनी सांगलीतील सरकारी गणपतीच्या देवस्थानास चार बिघे जमीन दिली.

अनंतरावांचे दोन विवाह झाले. त्यांची द्वितीय पत्नी ही गोंदवलेकरमहाराजांची अनुगृहीत होती. ती गोंदवल्यास जात असे. तिच्याबरोबर अनंतरावही गोंदवले येथे जाऊ लागले. पुढे त्यांच्यावर गोंदवलेकरमहाराजांची मर्जी बसली, इतकी की गोंदवलेकरमहाराज आग्रह करून अनंतरावांना आपल्याजवळ ठेवून घेऊ लागले. अनंतरावांना गोंदवलेकरमहाराजांचे विषयी अत्यंत आदर होता. त्याचा परिणाम म्हणून गोंदवलेकरमहाराजांचे माहात्म्य वर्णन करणारे एक एकवीस कडव्यांचे पदही त्यांना स्फुरले.

आध्यात्मिक प्रवृत्ति असणारे अनंतराव हे जेव्हा वासुदेवानंदसरस्वती ऊर्फ टेंबेस्वामी नरसोबाचे वाडीस येत, तेव्हा त्यांचे दर्शनास जात. त्यावेळी ते टेंबेस्वामींचे अधिकारसंपन्न शिष्य दीक्षितस्वामी यांचेही दर्शन घेत. या दोघा स्वामींनी एकेक रुपया प्रसाद म्हणून अनंतरावजींना दिला होता. हे दोन्हीही रुपये आजही अनंतरावांचे वंशजांनी जपून ठेवले आहेत.

या सुमारास सांगलीत एक आध्यात्मिक दृष्ट्या महत्त्वाची घटना घडत होती ती अशी :- चिमड या नावाच्या पारमार्थिक संप्रदायाचे प्रवर्तक चिमडमहाराज ऊर्फ रामचंद्रावजी यरगट्टीकर होते. त्यांचे पट्टशिष्य हणमंत पांडुरंग कोटणीस

ऊर्फ तात्यासाहेबमहाराज कोटणीस हे होत. हे तात्यासाहेबमहाराज मुधोळहून बेळगाव, तेरदळ अशी स्थलांतरे करीत शेवटी सांगली गावी कायमचे वास्तव्य करण्यास आले. ते सद्‌गुरूंच्या आज्ञेने दररोज आपल्या घरी हरिकीर्तन करीत. इ. स. १९०१ सालापासून ही कीर्तने सुरू झाली. अनंतरावांना आनंद झाला. ते कोटणीसमहाराजांच्या कीर्तनास जाऊ लागले आणि हळुहळु त्यांच्या साथीदार मंडळीत सामील झाले. अनंतराव पदे चांगली म्हणत. हे लक्षात घेऊन कोटणीसमहाराज अधूनमधून कीर्तनातील विश्रांतीचे वेळी अनंतरावांना 'मौज दिसती रे' हे पद म्हणावयास सांगत. पुढे अनंतरावांनी कोटणीसमहाराजांचेकडून उपदेशानुग्रह घेतला आणि त्याप्रमाणे ते साधनाचा आचार करू लागले. कोटणीसमहाराजांविषयीचा आपला आदर आणि भक्ति व्यक्त करणारे एक पद अनंतरावांना स्फुरले. ते पद आर्यावृत्तात आहे :-

अज्ञ जना ताराया संतां येणे असे हरी वदले ।
सद्य स्थिती ही पहाता सांप्रत तैसे महंत मज गमले ।।१।।
गुरू अंजनीच दृष्टि स्थिर करताना घडे हा अवतार ।
हनुमंत नाम साजे जन उद्‌धरण्या आलेचि साचार ।।२।।
विद्‌वत्ता बहु असूनी वर्तन साधे कितीतरी वानू ।।
भूतदया अतितर ती ज्ञानी शोभती जसा नभी भानू ।।३।।
गुरू-सेवा-रूपाने हीना दीना प्रमोद हा करती ।
छत्तीस वर्षे ऐसे कीर्तन चाले गुरुकृपेवरती ।।४।।
शके अठराशे सत्तिशी विभूती मासीच कृष्ण षष्ठीसी ।
सोमवार शुभ पाहुनी गुरुनाथे घातलेची पाठीशी ।।५।।
हीन दीन मी असता गुरूराये मज कृपेची करि धरले ।
भव-व्याधि ही निरसुनि *अनंताला* अनंतची केले ।।६।।

पुढे इ. स. १९२४ साली कोटणीसमहाराज निर्वाणास गेले. त्यानंतर कोटणीसमहाराजांच्या आज्ञेनेच अनंतरावांचे चिरंजीव गोविंद ऊर्फ बापूराव



केळकर हे नित्य कीर्तन करू लागले. तेव्हा आपल्या चिरंजीवांच्या कीर्तनात अनंतरावजी झांज वाजवून साथ करू लागले ही गोष्ट संस्मरणीय आहे. इ. स. १९३४ मध्ये आपल्या देहपातापर्यंत अनंतरावांनी दहा वर्षे आपल्या मुलाच्या कीर्तनात साथ केली. या सर्व काळात अनंतरावजींचे वय वाढतच होते. वयोमानानुसार त्यांची प्रकृति खालावत गेली. पुढे तर त्यांना घशाचा कॅन्सर झाला.देह ठेवण्यापूर्वी त्यांनी एक हजार रुपये दान म्हणून ब्राह्मणांना दिले. इ. स. १९३४ साली आषाढ शुक्ल एकादशी ही दोन दिवस हेती. एकादशीच्या पहिल्या दिवशी अनंतरावजींनी आपल्या पुत्राच्या कीर्तनात ''शंकरा अंत करावा बरा'' हे स्वरचित पद म्हटले, हे संपूर्ण पद असे आहे-

शंकरा अंत करावा बरवा । निशीदिनी पाही ।
हेची मागणे । पूर्ण कृपेने घडवा ।।धु.।।
सुकृत काही गाठी नसे मम । संसारामध्ये केले बहु श्रम ।
खंती वाटे या कृत वा वा ।।१।।
साठावरी ही वयसा गेली । अंतकाळीची दृष्टी प्रगटली ।
यास्तव नमितो श्रीमहादेवा ।।२।।
अंतकाळी ज्या कठिण यातना । भीती उपजलि बघुनी मन्मना ।
भोळ्या शंकरा करि बा कणवा ।।३।।
अंतकाळ हा पाठी लागला । गडबडले मन धीर सुटला ।
हात देऊनी भवभय हरवा ।।४।।
इंद्रियलोलुप आजवरी जाहलो । स्वहित बुडाले सहजचि फसलो ।
कृतापराध हा क्षमा करावा ।।५।।
जप तप साधन काहीच नेणे । वयसा गेली काही न होणे ।
म्हणुनि दास्य पंथ धरिला बरवा ।।६।।
सर्व इंद्रिया स्वास्थ्य ठेवुनी । कोणावरीही भार न पडुनी ।
नेई दासा तव पदी देवा ।।७।।

सर्व भार हा आपणचि घ्यावा । गर्भी रक्षिता तूचि देवा ।
अनन्य दासा पूर्ण विसावा ।।८।।
मागाया हे लाज वाटते । कोणा सांगू हृद्गत मम ते ।
पश्चातापलो जिवीच्या जीवा ।।९।।
जागृती येऊनी सोहं भाव । लिंगपूजनासी नामा तव ।
प्राणांतावरी घ्यावी सेवा ।।१०।।
अंतरीचा प्रभू हेतू जाणुनी । ज्ञानदृष्टीने स्वरूप बाणुनी ।
मन मारूनी मज उगमी मिळवा ।।११।।
एकादश पद्यांची ही माला । कंठी राहो गुरुदयाळा ।
दास *अनंत* आपला म्हणावा ।।१२।।
पुत्रपौत्र धन सुख ही दिधले । रक्षुनि त्याते सुख द्या वहिले ।
संकटी स्मरता धावा धावा ।।१३।।

कीर्तनोत्तर अनंतराव बिछान्यावर पडून राहिले. त्यावेळी अनंतराव म्हसकरांनी त्यांना विचारले, ''नाना स्मरण आहे ना?'' त्यावेळी अनंतरावांनी ''ॐ नमः शिवाय'' हा मंत्र उच्चारला. अशाच स्थितीत एकादशीचा दुसरा दिवस उजाडला. या दिवशी वार सोमवार- शंकराचा-वार होता. या दिवशी अनंतरावांना घोर लागला. तरी त्यांचे हातात जपाची माळ फिरतच होती. सकाळी ६ वाजता त्यांचे हातातून माळ गळून पडली. सकाळचे ८ वाजले. अनंतरावांनी आपली दृष्टि आपल्या भ्रूमध्यावर लावली आणि शंकराचे स्मरण करीत देह ठेवला. त्यांच्या प्रार्थनेप्रमाणे भगवान शंकरांनी त्यांचा अंत बरवा केला. त्यांच्या अंतिम आजारपणात त्यांचे सुपुत्र गोविंद ऊर्फ बापूराव आणि सून सौ. इंदिरा यांनी अनंतरावांची सेवाशुश्रूषा मनोभावे व्यवस्थितपणे केली.

***

## प्रकरण-२

## श्रीमामांचे जनन, बालपण आणि शिक्षण

**(इ.स. १८९० ते १९०६)**

परमार्थाचा पंथ हा आक्रमण्यास कठिण आहे. प्रपंचातील त्रिविध तापांनी पोळलेला एखादा पुरुषच परमार्थाकडे वळतो. प्रथम उत्साहाने तो परमार्थातील प्रक्रिया करू लागतो. पुढे असे काही घडते की त्याचे मन परमार्थावरून ढळते. मग त्याची अवस्था बिकट होते. अशा स्थितीत समजा त्याचे जीवन संपले. तरी पण पूर्वी केलेल्या पारमार्थिक आचाराचे संस्कार त्याला सोडीत नाहीत. पुढील जन्मी हे संस्कार प्रबळ होतात आणि ते त्याला पुनः परमार्थाकडे वळवितात. अशाप्रकारे कर्मयोग, ज्ञानयोग अथवा भक्तियोग पूर्वी सोडणारा हा 'योगभ्रष्ट' असे भगवद्गीता सांगते. या योगभ्रष्टाच्या नवीन जन्माच्या संदर्भात भगवद्गीता पुढीलप्रमाणे सांगते :-

शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ।।६.४१
अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।
एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ।।६.४२
तत्र तं बुद्धि-संयोगं लभते पौर्वदेहिकम् ।
यतते ततो भूयः संसिद्धौ कुरुनंदन ।।६.४३
पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः ।।६.४४
प्रयत्नाद् यतमानस्तु योगी संशुद्ध-किल्बिषः ।
अनेक-जन्म-संसिद्धस्ततो याति परां गतिम् ।।६.४५

या श्लोकांचा भावार्थ असा :- पूर्व जन्मी काही कारणाने ज्याचा परमार्थ अपूर्ण राहिला होता, त्याला शुचि, श्रीमंत अथवा योगी जनांच्या कुळात जन्म

प्राप्त होतो. या नवीन जन्मी त्याला पूर्वजन्मातील संस्कार प्राप्त होऊन तो पुन: परमार्थ साधण्याचा प्रयत्न सुरू करतो. आणि त्याच्या प्रयत्नाला यश येऊन तो श्रेष्ठ गति प्राप्त करून घेतो.

श्रीमामांच्या बाबतीत असेच घडले असावे असे अनुमान करता येते. पूर्व जन्मी त्यांनी काही पारमार्थिक आचार केला होता. त्यांनी ज्ञानेश्वरमहाराजांची भक्ति केली होती. पण ते सर्व अपूर्ण राहिल्याने त्यांना पुन: जन्म प्राप्त झाला. तो 'शुचि' माणसाच्या घरामध्ये. अनंतराव हे शंकराचे भक्त, कोटणीसमहाराजांचे अनुगृहीत आणि साधनाचार करणारे असल्याने, ते 'शुचि' होते. त्यांच्या घरात श्रीमामांना पूर्व पुण्याईने जन्म प्राप्त झाला आणि मग या नवीन जन्मी त्यांनी आपल्या जीवनाचे सार्थक करून घेतले.

श्रीमामांचे पिताजी अनंतराव. या अनंतरावांचे दोन विवाह झाले होते. त्यांच्या पहिल्या पत्नीचे सासरचे नाव राधा असे होते. राधाचे माहेरचे नाव यमू असे होते. सांगलीच्या नजीक असणाऱ्या हरिपूर या गावी श्री. परशुरामपंत फडके या नावाचे एक सात्त्विक सद्गृहस्थ रहात होते. यमू ही त्यांची कन्या. या यमूचा अनंतरावाशी विवाह झाला. हा विवाह सांगलीत मोठ्या धूमधडाक्याने साजरा झाला. माप ओलांडून यमू सासरच्या घरात शिरली. सासरी तिचे नांव राधा असे ठेवण्यात आले. हरिपूर हे गाव कृष्णा आणि वारणा या दोन नद्यांच्या संगमावर वसलेले आहे. तेथे भगवान् शंकर हे 'संगमेश्वर' या रूपात आहेत. संगमेश्वर ही हरिपूरची ग्रामदेवता आहे. या संगमेश्वराची भक्ति राधाच्या-यमूच्या अंगात मुरली होती. आणि विवाहात तिला प्राप्त झालेला अनंत हा पतिही शंकराचा भक्तच होता.

सौ. राधाच्या सासरच्या घरात पार्वती ही सासू वयोवृद्ध होती. तीही धार्मिकच असल्याने लौकरच सासू-सुनेचे सूत जमले. घरातील सर्व प्रकारची कामे करून राधा सासूला संतुष्ट ठेवी. घराला अंगण होते आणि अंगणात तुळशी वृंदावन होते. लौकर उठून सौ. राधा सडासमार्जन करी, रांगोळी काढे



आणि तुळशीला वंदन करी. नंतर पतीच्या देवपूजेसाठी तयारी करून देऊन, मग ती इतर कामे व स्वयंपाकपाणी याकडे लक्ष देई.

सौ. राधाच्या गर्भाधान सोहळ्यानंतर काही दिवसांनी सौ. राधा गर्भवती झाली. यथावकाश प्रसूत होऊन सौ. राधाने एका कन्येला जन्म दिला. या कन्येचे 'गंगा' असे नांव ठेवण्यात आले. प्रचारात मात्र तिला गंगू असे म्हणण्यात येई.

यानंतर दोन तीन वर्षांनी सौ. राधा पुन: गरोदर झाली. यावेळी तिला पुत्र झाला. हाच तो पूर्व जन्मातील परमार्थी पुरुष आता गोविंद नावाने प्रख्यात झाला. म्हणून गोविंदाचे बाबतीत पांडुरंगमहाराज ताम्हनकर आपल्या पदात म्हणतात :-

कुलसंशोधन करता करता । केळकरांचे आले चित्ता ।
अनंत तनूची घेऊनी सत्ता । राधाकुशी अवतरला ।।

या पुत्रजन्माची कथाही लक्षणीय आहे ती अशी :-

आपल्या मातोश्रींना भात फार आवडतो म्हणून अनंतरावांनी शहापूर-बेळगावजवळील कलखांब नावाच्या गावी एक भाताचे शेतच विकत घेतले. अधूनमधून अनंतराव शेताकडे लक्ष देण्यास कलखांबला जात. एकदा ते असेच सौ. राधाला घेऊन गेले होते. त्यावेळी राधा गर्भवती असून ती सातव्या महिन्यात होती. येथे असताना सौ. राधा सातव्या महिन्यातच प्रसूत झाली. दिवस होता फाल्गुन शुद्ध दशमी शके १८१२. कलखांब हे खेडेगांव असल्याने एका जुन्या गोस्थानाला पडदा वगैरे लावून तिची प्रसूति झाली. तिला पुत्र झाला. हाच तो पूर्वजन्मीचा पारमार्थिक साधक. हा पुत्र म्हणजेच गोविंद. पुढे तेथेच या पुत्राचे बारसे शक्य तितक्या थाटामाटाने करण्यात आले. रंगीत पाळणा फुले इत्यादींनी सजविला गेला. बारश्याला गावातल्या सुवासिनी जमल्या होत्या. मातापित्यांच्या इच्छेनुसार पुत्राचे नांव गोविंद असे ठेवण्यात आले. त्यावेळी म्हटला गेलेला पाळणा असा :-

जो जो जो जो रे, गोविंदा, सच्चित् सुखकंदा ।।१।।
पाळणा सजविला, पुष्पहारांनी, झोपी तू जाई ।।२।।
निद्रा करी बाळा, सुंदरा, स्वजना नंदना ।।३।।
स्मित वदना, संतसज्जना, निद्राधीन तू होई ।।४।।

पुढे यथावकाश अनंतराव आणि सौ. राधा पुत्राला घेऊन सांगलीला परत आले. जरी या मुलाचे नाव गोविंद असे ठेवण्यात आले होते, तरी घरची माणसे लाडाने त्याला 'बापू' म्हणत. पुढे गोविंदाच्या गंगू नावाच्या बहिणीची मुले गोविंदाला ''मामा'' म्हणू लागली. परिणामी मामा हे नावच लोकप्रिय झाले. जरी लोक गोविंदराव, बापूराव ही नावे वापरीत, तरी भक्त भाविक 'मामा' हेच नाव उच्चारीत. तेव्हा गोविंदाचे मामा हेच नाव जास्त प्रचलित असल्याने, प्रस्तुत चरित्र-ग्रंथात त्यांचा उल्लेख 'श्रीमामा' असा केलेला आहे. पुढे श्रीमामांचा परमार्थ पूर्ण झाल्यावर लोक त्यांना 'मामामहाराज' म्हणू लागले.

गोविंद ३-४ वर्षांचा असतानाच सौ. राधा निर्वाणास गेली. म्हणून तिची फारशी आठवण श्रीमामांना राहिली नाही. ती काळीसावळी होती इतकंच श्रीमामांना आठवे. तसेच ती वापरत असलेली एक चांदीची वाटी श्रीमामांच्या लक्षात राहिली होती. आईची आठवण म्हणून श्रीमामांनी ती चांदीची वाटी जपून ठेवली होती (गो.स्मृ.पृ.१). सौ. राधानंतर घरात कर्ती सवरती स्त्री नसल्याने, अनंतरावांनी दुसरे लग्न केले. त्यांची दुसरी पत्नी ही तासगाव येथील जनार्दन कृष्ण आगरकर यांची कृष्णा नावाची कन्या होती. विवाहानंतर तिचे नाव 'लक्ष्मी' असे ठेवण्यात आले. तथापि सासरी ती 'माई' या नावानेच ओळखली जाई.

गोविंदाला सहावे वर्ष लागले. या काळात त्याचे खेळ इतर मुलांसारखे नव्हते. देवाची पूजा, देवाचे भजन, देवाची पालखी काढणे इत्यादि तो करी. अनंतरावांनी त्याला काही स्तोत्रे इत्यादीही शिकविली होती. पूर्वजन्मी तो ज्ञानेश्वर भक्त असल्याने, 'बाप्पा ज्ञानिया रे । येई येई जीव जीवना रे।' हे भजन



सतत त्याचे तोंडी असे.


यथाक्रम श्रीमामांना सातवे वर्ष लागले. अनंतरावांनी बापूचे उपनयन अगदी थाटामाटात केले. आता श्रीमामांवर गायत्री मंत्राचा संस्कार झाला आणि त्यांनी संध्यावंदन सुरू केले.

श्रीमामांचे पिताजी अनंतराव हे स्वभावाने कडक होते. त्यांना वावगे खपत नसे. माईचे हातून जरी काही वावगे घडले तरी ते कठोर बोलत. वडिलांची ही सवय लक्षात आल्यावर गोविंद असे वागे की चूक माईची नसून आपली आहे असे सांगून ते वडिलांची बोलणी खात. बापूच्या या वागण्याने माईला मामांविषयी आपुलकी वाटू लागली आणि ती सावत्रपणा विसरून बापूवर सख्ख्या मुलाप्रमाणे प्रेम करू लागली.

वयाच्या सातव्या वर्षीच बापूचे नाव शाळेत घालण्यात आले आणि त्याचे लौकिक शिक्षण सुरू झाले. शाळेमध्ये उद्धवरावजी यरगट्टीकर हे मामांचे सहाध्यायी होते (गोचमा. पृ.१५). शाळेत लिहिणे-वाचणे सुरू झाल्यानंतर शिक्षकांच्या सूचनेनुसार श्रीमामांनी हळुहळु धार्मिक ग्रंथांचे वाचन सुरू केले. यथाक्रम दासबोध, रामायण, महाभारत, भगवद्‌गीता आणि ज्ञानेश्वरी इत्यादि ग्रंथ त्यांच्या वाचनात येऊ लागले. ज्ञानेश्वरीतील काही ओव्या रोज वाचण्याचा उपक्रम त्यांनी सुरू केला. श्रीमामांचा हा कल पाहून अनंतरावही त्यांना गावात होणाऱ्या कीर्तन, प्रवचन इत्यादि ऐकण्यास घेऊन जाऊ लागले. त्यामुळे कीर्तन कसे असते आणि भजन कसे असते हे श्रीमामांच्या नीट लक्षात आले.


शालेय शिक्षण चालू असतानाच त्यांनी मारुतीची उपासनाही सुरू केली. पुढे त्यांनी विटेवर ११ मारुति कोरले. मारुतीची उपासना या दृष्टीने त्यांनी तालीम करून शरीर कमावण्याचा उपक्रमही सुरू केला. सूर्यनमस्कार, जोरबैठका, उंच उड्या इत्यादि व्यायामाचे प्रकार त्यांनी सुरू केले. याचे जोडीने श्रीमामांनी आणखी काही उपक्रम केले. ते म्हणजे :- सकाळी लौकर उठून कृष्णा नदीवर स्नानास जावयाचे. आणि गुडघ्या इतक्या पाण्यात उभे राहून त्यांनी काही गायत्री

## ती.अनंत गंगाधर केळकर यांचे मराठी हस्ताक्षर



॥ श्री विठ्ठल ॥

श्री ज्ञानदेव तेहतीसनी ॥ श्री ॥
पैल सूर्याचे मेरे ॥ नयना
सूनि नयन हेरे ॥ सर्वसाक्षी
समरे ॥ परब्रह्म ॥१॥ पैल सूर्या
चे पाणारी ॥ औठ पिठाचे सेनारी
अर्धमात्रेचे महाद्वारी ॥ निज
रूप उभे दीसे ॥२॥ परां सूर्याचे
बसले ॥ भ्रमर गुंफेचे खालेले ॥
समसमान सरले उरले ॥ चढ
कडे ॥३॥ पंचवटीचे सेवटी ॥
उभे सूर्याचे पाठी ॥ लखलखनीत
पाठी पोठी ॥ बरसुउभी ॥ ४ ॥

## ती.अनंत गंगाधर केळकर यांचे मोडी हस्ताक्षर



## ती.अनंत गंगाधर केळकर यांचे मोडी स्वाक्षरी



पुरश्चरणेही केली.

कोणत्याही गोष्टीत श्रीमामांचे मन एकाग्र होत असे. हे पुढील उदाहरणावरून स्पष्ट होते. मामा शिकत असताना एकदा असे घडले :- श्रीमामा ज्या वर्गात होते त्या वर्गातील मुले गडबड-गोंधळ करीत होती. वर्गात शिक्षक आले. मुले गप्प झाली. ''गडबड करणारे कोण?'' असा शिक्षकांनी प्रश्न केला. शिक्षकांच्या भीतीने कोणीही कबूल होईना. तेव्हा शिक्षकांनी मामांना विचारले. श्रीमामा म्हणाले, ''गुरूजी, मी अभ्यासाचे पुस्तक वाचनात गुंग होतो. माझे इकडे तिकडे लक्ष नव्हते. तेव्हा मी सांगू शकणार नाही.'' प्रत्येक मुलाला एकेक छडी मारून शिक्षकांनी तो विषय संपवला. हा प्रसंग श्रीमामांचे सहाध्यायी श्री. बाबूराव करमरकर हे सांगत (गोचमा, पृ.१६).

श्रीमामा सोळाव्या वर्षाचे असताना पुढील घटना घडली :- मामांची मावशी दिगवडे नावाच्या गावी रहात होती. तिच्याकडे श्रीमामा गेले होते. ती श्रीमामांना म्हणाली, ''बापू, तू मला आळंदीला ज्ञानेश्वरमहाराजांच्या दर्शनास ने.'' श्रीमामांनी ते मान्य केले. मातापित्यांची परवानगी घेऊन श्रीमामा मावशीसह आळंदीला गेले. दोघांनी ज्ञानेश्वरमाऊलीच्या पादुकांचे दर्शन घेतले. पण श्रीमामांचा भोग पुढे आला. तेथे त्यांना जीवघेणे जुलाब सुरू झाले. श्रीमामांची प्राणांतिक अवस्था झाली. आपण आता वाचत नाही, म्हणून श्रीमामा घाबरले. त्यांनी ज्ञानेश्वरमहाराजांचा धावा सुरू केला. ज्ञानेश्वरमहाराजांनी श्रीमामांचा धावा ऐकला आणि श्रीमामांचे जुलाब थांबले. मामांना हायसे झाले. त्यांनी ज्ञानेश्वरमहाराजांची स्तुति करून धन्यवाद दिले. मग यथावकाश श्रीमामा मावशी बरोबर दिगवडे गावी परत आले.

दिगवड्याला परत आल्यावर मावशी श्रीमामांना म्हणाली, ''बापू, मला गुरुचरित्र ऐकावयचे आहे. तू माझ्यासाठी गुरुचरित्राचा सप्ता करशील काय?'' श्रीमामा बोलले, ''मावशी, सप्त्याला लागणारे सात आठ दिवस मी काही येथे राहू शकणार नाही.'' ''मग कसे करायचे?'' मावशीने पृच्छा केली. तेव्हा श्रीमामा म्हणाले, ''मावशी, काळजी करू नको. उद्या एक दिवसात गुरुचरित्र वाचून मी तुझी इच्छा पूर्ण करीन.'' मावशीला ते मान्य झाले. त्याप्रमाणे श्रीमामांनी एक दिवसात गुरूचरित्राचे एक पारायण केले.




श्रीमामा अधून मधून दिगवडे गावी जात. एकदा ते गेले असता असे घडले :- दिगवडेकर वकिलांचे घरी गणपति उत्सव चालू होता. त्यांनी एका हरिदासाचे कीर्तन ठरविले होते. दिगवडेकरांचा गणपति डाव्या सोंडेचा होता. हरिदास म्हणाले, ''मी उजव्या सोंडेच्या गणपतीचा उपासक आहे. मी या गणपतीपुढे कीर्तन करणार नाही.'' तेव्हा पंचाईत आली. दिगवडेकरांनी श्रीमामांना विचारले, ''बापू, तू कीर्तन करशील काय?'' कीर्तन कसे असते हे श्रीमामांना ज्ञात असल्याने ते 'हो' म्हणाले आणि त्यांनी कीर्तन केले. आध्यात्मिक ग्रंथ वाचनाचा श्रीमामांना कीर्तनात उपयोग झाला.

याच गणपति उत्सवात श्रीमामांचे ज्ञानेश्वरीवर प्रवचन ठरले होते. प्रवचन सुरू होण्यापूर्वीच काही पंडित निघून गेले. प्रवचन झाल्यावर श्रीमामांनी त्या पंडितांना विचारले, ''प्रवचन न ऐकता आपण का निघून गेलात?'' तेव्हा ते पंडित म्हणाले, ''आम्हाला ज्ञानेश्वरी आवडत नाही.'' तेव्हा श्रीमामांनी ज्ञानेश्वरीतील काही भाग त्यांना वाचून दाखविला. तो भाग ऐकताच त्या पंडितांचे मन पालटले आणि त्यांनी ज्ञानेश्वरी वाचण्याचे ठरविले.

याच गणपति उत्सवात एका पंडिताचे प्रवचन झाले. प्रवचनामध्ये ते असे बोलून गेले, ''वाणी असणाऱ्या तुकारामाने वेदाचे हृद्‍गत मराठीत सांगितले हे योग्य केले नाही.'' ते ऐकून श्रीमामांना फार वाईट वाटले. दुसरे दिवशी मामांचे कीर्तन होते. त्या कीर्तनात श्रीमामांनी सविस्तर विवेचन करून त्या पंडिताचे म्हणणे अयोग्य आहे असे दाखवून दिले. श्रीमामांच्या बोलण्याने त्या पंडिताचे मत बदलले (वही ९०).

हे सर्व चालू असतानाच श्रीमामा इंग्रजी सातव्या (म्हणजे मॅट्रिक) इयत्तेपर्यंत पोचले होते. हे शिक्षण घेता घेताच त्यांनी ड्रॉइंगच्या परीक्षा दिल्या होत्या व ते


**प.पू.श्रीमामांचे मराठी हस्ताक्षर**



(१)

अध्याय १ ला


ॐ नमोजी श्री गुरु गणेशा । आधार चक्री स्थित सर्वेशा ।
जगदाधारा जगदीशा । जगताच्या विघ्नहरा ॥१॥
आधार चक्रींच्या श्री गणेशा । काय वर्णु त्याचे यशा ।
योगी भक्त पावती परमोल्हास । वैभव तेथील देखोनी ॥२॥
परि जाता चर्मदृष्टी । न दिसे वैभव शतकष्टी ।
म्हणोनी उघडा ज्ञान दृष्टी । संतमार्गीचा ठेवे ॥३॥
संत कृपा जाहल्याविण । संत मार्ग अनुसरल्यावीण ।
नव्हे निर्गुण गणेश दर्शन । सत्य सत्य त्रिवाचा ॥४॥
भगवद्भक्तांच्या व्यवसाय । हरी कीर्तनाचा महोत्सव ।
भक्तजनांचा समुदाव । टाळ मृदंग युक्त पै ॥५॥
दशविध वाद्यांचिया ध्वनी । चौघडे वाजती अनुदिनी ।
हरीनाम नौबतींचा ध्वनी । नाना प्रकारे ॥६॥
तंत वितंत घन सुस्वर । नाद भंवरा बीगल घोर ।
उफडी डफगाणी नाग सुस्वर । अपार वाद्ये वाजती ॥७॥
सप्त स्वर युक्त गायने । राग उपराग तान माने ।
नाचडे भक्त हरी कीर्तनी । नाचती प्रेम स्वानंदे ॥८॥

**प.पू.श्रीमामांची इंग्रजी स्वाक्षरी**




**प.पू.श्रीमामांची मोडी स्वाक्षरी**



थर्ड यिअर ट्रेंड झाले होते. आणि ते चित्रे काढण्यात प्रवीण झाले होते. या सुमारास श्रीमामांनी काढलेली गणपति आणि विष्णु यांची चित्रे आजही रामनिकेतनमध्ये पहावयास मिळतात. याच सुमारास श्रीमामांनी विटेवर अकरा मारुति कोरले.

अनंतरावांना गोंदवलेकरमहाराजांविषयी आदर होता. एकदा सांगलीत बातमी आली की गोंदवलेकरमहाराज मिरजेहून आपल्या गावी जाणार आहेत. वाटेत लागणाऱ्या बुधगाव स्टेशनवर जाऊन गोंदवलेकरमहाराजांचे दर्शन घेण्याचे त्यांनी ठरविले. बापूलाही महाराजांचे दर्शन घडवावे या इच्छेने त्यांनी बापूलाही बरोबर घेतले. अनंतराव आणि श्रीमामा गाडीच्या वेळेला बुधगाव स्टेशनवर पोचले. स्टेशनवर महाराजांच्या दर्शनासाठी बरेच लोक जमले होते. गर्दीतून वाट काढीत अनंतरावांनी दर्शन घेतले व श्रीमामांकडे बोट दाखवून म्हणाले, ''हा माझा मुलगा आपल्या दर्शनास आला आहे.'' मामांनी गोंदवलेकरमहाराजांच्या पायांवर डोके ठेवले.महाराजांनी त्यांना उठवले आणि त्यांच्या पाठीवरून हात फिरवून महाराज म्हणाले, ''बाळ, आईबाबांचे ऐकावे आणि जमेल तेव्हा श्रीराम जयराम जय जय राम या मंत्राचा जप करावा.'' मामांनी ते मान्य केले. श्रीमामा परत गेल्यावर गोंदवलेकरमहाराज आपल्या जवळ असणाऱ्या पाठक मास्तरांना म्हणाले, ''अहो मास्तर, हा मुलगा पुढे मोठा साधु होणार आहे.'' नंतर ही गोष्ट पाठकमास्तरांनी श्रीमामांच्या राम या चिरंजीवाला सांगितली. गोंदवलेकरमहाराजांचे शब्द खरे ठरले आणि काही काळातच श्रीमामा महान् साधु झाले.

***

## प्रकरण–३

## प्लेगमधून सुटका आणि ज्ञानेश्वरमहाराजांचे दर्शन

**(इ.स. १९०७ ते १९१५)**

विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत महाराष्ट्रात प्लेग या रोगाच्या साथीने थैमान घातले होते. गावोगावी प्लेगची लागण पसरत होती. आणि त्याकाळी प्लेगवर योग्य असा उपाय ज्ञात नसल्याने, अनेक लोक या प्लेगच्या साथीला बळी पडत होते. हळुहळु सांगलीतही प्लेगची साथ सुरू झाली. तेव्हा गाव बदलणे भाग पडले. अनंतराव कुटुंबाला घेऊन मिरज गावी रहाण्यास गेले. पण प्लेगने श्रीमामांना सोडले नाही. मिरजेत असतानाही प्लेगने श्रीमामांना गाठले आणि त्यांच्या खाकेत प्लेगच्या दोनतीन गाठी उठल्या. या प्लेगच्या प्रभावाने श्रीमामा मरणोन्मुख झाले.

तथापि श्रीमामा या प्लेगच्या दुखण्यातून बचावले. ते कसे याविषयी दोन आख्यायिका सांगितल्या जातात. मामांची सावत्र आई माई ही श्रीमामांच्या मदतीला धावून आली. तिने देवांना पाण्यात घातले आणि ती बोलली, ''देवा, माझा एकुलता एक पुत्र बापू या प्लेगमधून वाचू दे. त्यासाठी माझ्या आयुष्यातील काही वर्षे मी त्याला देण्यास तयार आहे.'' माईचे गाऱ्हाणे देवाने ऐकले आणि बापू प्लेगमधून बरा झाला. दुसरी आख्यायिका अशी आहे. श्रीमामांची ज्ञानेश्वरमहाराजांचेवर दृढ निष्ठा होती. त्यांनी ज्ञानेश्वरमहाराजांचा फोटो आपल्या उशाशी ठेवला आणि ज्ञानेश्वरमहाराजांना साकडे घातले. ज्ञानेश्वरमहाराज प्रसन्न झाले आणि त्यांनी बापूला प्लेगच्या तडाक्यातून वाचविले. कोणतीही आख्यायिका

खरी असो एक गोष्ट निश्चित की श्रीमामा प्लेगमधून बचावले.

प्लेगच्या दुखण्यात मरणोन्मुख अवस्थेत असताना श्रीमामांना जो अनुभव आला, तो त्यांनी नंतर असा सांगितला :- माझा जीव धरती सोडून वर वर चालला होता. असे बरेच अंतर गेल्यावर मला सूर्यासारखा तेजस्वी असा एक पुरुष दिसला. तो माझ्याजवळ आला आणि मला म्हणाला, 'अरे बाळा, तू इकडे कसा येत आहेस? तुझे इकडे काही काम नाही. तुझे पृथ्वीवरील कार्य अद्यापि संपन्न झाले नाही. ते पूर्ण झाल्याशिवाय तुला इकडे येता येणार नाही. तेव्हा तू आलास तसा परत जा.' या वचनानंतर वर जाण्याची मामांच्या जीवाची गति थांबली आणि तो खाली खाली भूतली आला आणि जमिनीवर पडलेल्या आपल्या शरीरात शिरला. त्याचे शरीर जिवंत झाले आणि प्लेगचा त्रास संपला. श्रीमामांना पुनर्जीवन मिळाले. अशाप्रकारे श्रीमामा प्लेगच्या जीवघेण्या दुखण्यातून वाचले.

श्रीमामा प्लेगमधून जिवंत राहिले हे खरे पण प्लेगच्या दुखण्याचा एक वाईट परिणाम त्यांच्या वाचेवर झाला. त्यांचे बोलणे बंद झाले. हे नवीनच संकट मामांच्यावर कोसळले. बोलणे बंद झाले तर करणार तरी काय? तेव्हा श्रीमामांनी ठरविले, ''ज्या ज्ञानेश्वरमहाराजांनी मला प्लेगमधून बरे केले त्यांनाच पुनः आपण साकडे घालावयाचे.'' असे ठरवून श्रीमामांनी ज्ञानेश्वरीची पारायणे सुरू केली. ही पारायणे जेव्हा १०८ झाली तेव्हा श्रीमामांची वाचा परत आली. त्यांना पूर्वीप्रमाणे स्पष्ट आणि खडखडीत बोलता येऊ लागले. नाना आणि माई यांना आनंद झाला.

सांगलीचा प्लेग संपल्यावर अनंतरावांचे कुटुंब सांगलीला परतले. आता श्रीमामांचे शिक्षण संपले असल्याने, आता त्यांना नोकरी शोधणे आवश्यक होते. नोकरीच्या प्रयत्नांना यश आले आणि श्रीमामांना सांगलीच्या मुन्सफ कोर्टात नोकरी मिळाली. श्रीमामा इमाने इतबारे नोकरी बजावू लागले. नोकरी



चालू असता मामांच्यावर ठपका येण्याचा एक प्रसंग आला. परंतु श्रीमामा त्यातूनही निभावून गेले. म्हणजे त्याचे असे झाले :- मुन्सफसाहेबांना एक जरुरीचा कागद ताबडतोब हवा होता. तो तत्काळ आणून देण्यास त्यांनी श्रीमामांना आज्ञा केली. श्रीमामा आपल्या टेबलाजवळ आले आणि त्यांनी त्या कागदासाठी शोधाशोध सुरू केली. पण त्यांना तो कागद काही सापडेना. श्रीमामांच्यापुढे धर्मसंकट आले. 'कागद सापडत नाही' ही आपणास फार नामुष्कीची गोष्ट आहे असे श्रीमामांना वाटले. आता करावे तरी काय? तितक्यात श्रीमामांना पुनः ज्ञानेश्वरमहाराजांची आठवण झाली. त्यांनी ज्ञानेश्वरमहाराजांची प्रार्थना केली आणि मग श्रीमामांच्या मनात प्रेरणा आली :- ''अरे, निरुपयोगी, बिनकामाचे म्हणून जे कागद तू बाजूला ठेवले आहेस, त्यांमध्ये हुडकून बघ. तुला इष्ट तो कागद सापडेल.'' निरुपयोगी म्हणून ठेवलेल्या कागदांचा ढीग श्रीमामांनी काळजीपूर्वक तपासला आणि त्यांना त्या ढिगाऱ्यातच मुन्सफसाहेबांना हवा असणारा कागद सापडला आणि त्यांनी तो मुन्सफ साहेबांच्या हातात दिला.

यावेळी इ. स. १९०७-१९०८ चा सुमार झाला होता. अनंतरावांची पहिली कन्या आणि श्रीमामांची थोरली बहिण गंगू ही आता विवाहयोग्य वयाची झाली होती. तिचा विवाह उरकून टाकण्याचे नानांनी ठरविले आणि त्याप्रमाणे त्यांनी सांगलीतच गंगूसाठी स्थळे शोधण्याचा प्रयत्न सुरू केला. नानांच्या घराजवळच एका वाड्यात केशवराव पटवर्धन यांचे घरंदाज कुळ नांदत होते. त्यांचा मुलगा लक्ष्मण हा कर्तासवरता आणि विवाहयोग्य वयाचा होता. त्या मंडळींना मुलगी दाखविण्याचा कार्यक्रम झाला. सर्व पटवर्धन मंडळीना गंगू पसंत पडली. मग काय? नानानी मोठ्या धूमधडाक्याने आणि उत्साहाने आपल्या पहिल्या मुलीचा विवाह उरकून घेतला. त्यांची मुलगी सासरी सुखात नांदू लागली. या सौ. गंगूलाच पुढे नारायण आणि हरि असे दोन सालस व सुसंस्कृत

पुत्र झाले. ते अधूनमधून आपल्या आजोळी म्हणजे नानांच्या घरी येत. ते आले की ते ''मामा मामा'' म्हणून श्रीमामांच्या मागे लागत आणि त्यांच्यामुळेच श्रीमामांची गोविंद आणि बापू ही नावे बरीच मागे पडली आणि बापूचे ''मामा'' हे घरगुती नावच प्रचारात आले.

मुलीला चांगले स्थळ मिळणे ही एक चिंता मुलीच्या पित्याला असते. त्या चिंतेतून अनंतराव आता मुक्त झाले होते. त्यांच्या डोक्यावरचे ओझे कमी झाले होते. आता नानांच्या मनात आपल्या बापू या मुलाच्या विवाहाचा विचार घोळू लागला. आता श्रीमामांचे शिक्षण संपून ते नोकरीला लागून मिळवते झाले होते. तेव्हा एक दिवस अनंतरावांनी मामांच्या पुढे त्यांच्या लग्नाचा विषय काढला. ते बापूला म्हणाले, ''बापू, तू आता मिळविता झाला आहेस. तेव्हा आता विवाह करून प्रपंचात पडावेस असे मला वाटते.''

पित्याचे हे वचन ऐकताच श्रीमामांच्या वर आघात झाला. कारण आत्तापर्यंत त्यांचे धार्मिक ग्रंथांचे जे वाचन झाले होते, त्यावरून त्यांची अशी समजूत झाली होती. विवाह करून माणूस प्रपंचात पडला की संसारातील नाना प्रकारच्या उपद्रवांनी तो बेजार होतो आणि मग त्याचे परमार्थाकडे लक्ष लागत नाही. श्रीमामांचा तर निश्चय होता की आपण परमार्थ करावयाचा. लग्न करून प्रपंचाच्या चक्रात पडावयाचे नाही. आपला हा विचार श्रीमामांनी आपल्या पित्याला सांगितला. तेव्हा अनंतराव म्हणाले, ''बापू, तू म्हणतोस तसेच घडते असे नाही. तुला माहीत आहे की एकनाथमहाराज वगैरे अनेकांनी प्रपंचात राहूनच परमार्थ केला आणि तो तडीला नेला. प्रपंचात राहून परमार्थ साधता येतो याचे ढळढळीत उदाहरण आपल्या डोळ्यांपुढे आहेच की. सांगलीतच तात्यासाहेबमहाराज कोटणीस आहेत, ते प्रपंचात राहूनच परमार्थ करीत आहेत. त्यांचा वकिलीचा धंदासुद्‌धा त्यांच्या परमार्थाच्या आड आलेला नाही. तेव्हा तू आपला विचार सोड. तात्यासाहेबमहाराजांचे उदाहरण डोळ्यापुढे ठेव आणि विवाह करून प्रपंच करता करताच परमार्थ करण्याचा प्रयत्न कर. ते तुला अवघड जाणार नाही.''



नानांचे हे म्हणणे पटण्यासारखे होते. पण मामांच्या मनाचा कल विवाह न करता फक्त परमार्थ करण्याकडे होता. पण अनंतरावांनी विवाहाचा फारच आग्रह धरला. श्रीमामांची मोठी पंचाईत झाली. काय करावे, नानांना काय उत्तर द्यावे हे त्यांना सुचेना. तितक्यात त्यांच्या मनात एक विचार आला आणि तो त्यांनी वडिलांना सांगितला. श्रीमामा नानांना म्हणाले, ''नाना, तुम्ही म्हणता ते योग्यच आहे. पण ते करण्यास माझ्या मनाची तयारी होत नाही आहे. तेव्हा मी असे करतो :- तुमची व माझी ज्ञानेश्वरमहाराजांच्यावर निष्ठा आहे. आत्तापर्यंत ज्ञानेश्वरमहाराजांनी मला दोनदा वाचविले आहे. त्या ज्ञानेश्वरमहाराजांचा कौल माझ्या विवाहाच्या बाबतीत घ्यावा. मी आळंदीस जातो. तेथे पुरश्चरण करतो. त्यामुळे प्रसन्न झालेले ज्ञानेश्वरमहाराज जशी प्रेरणा देतील तसे करावे. बघा, हे तुम्हाला पटते का!'' श्रीमामांचे हे म्हणणे अनंतरावांना कितपत पटले हे आज तरी सांगता येणार नाही. तथापि श्रीमामांची मनोभूमिका ही अनंतरावांना ज्ञात असल्याने आणि त्यानेच एक मार्ग सुचविल्याने श्रीअनंतरावांना नाही म्हणणे अवघड झाले. तेव्हा इलाज नाही असे म्हणून अनंतरावांनी श्रीमामांना आळंदीस जाण्याची अनुज्ञा दिली.

मग पित्याची परवानगी घेऊन आणि आवश्यक वाटले तेवढे पैसे बरोबर घेऊन श्रीमामा आळंदीस निघाले. आळंदीस पोचल्यावर एके ठिकाणी श्रीमामांनी आपल्या रहाण्या-जेवणाची सोय करून घेतली. मग ते ज्ञानेश्वरमहाराजांचे समाधीकडे गेले. ज्ञानेश्वरमहाराजांना मनोभावे साष्टांग नमस्कार घालून, त्यांचे पुढे आपला प्रश्न उघड केला. ''महाराज, पित्याच्या वचनाप्रमाणे मी प्रपंच करून परमार्थ करावा काय? मी आता आपल्या ज्ञानेश्वरीचे पुरश्चरण करणार आहे. आपणच मला योग्य ते मार्गदर्शन करावे, अशी माझी आपणांस नम्र प्रार्थना आहे.''

दुसरे दिवशी सकाळी लौकर उठून, प्रातर्विधी उरकून आणि स्नानसंध्या करून, शुचिर्भूत होऊन, इंद्रायणी नदीजवळील एक वडाच्या पारावर, श्रीमामा ज्ञानेश्वरीच्या पारायणास बसले. सकाळी चार तास आणि संध्याकाळी चार तास असे त्यांनी पारायण सुरू केले. पारायणाचे एकवीस दिवस निघून गेले. बावीसाव्या दिवशी पारायण संपल्यावर, ''बाप्पा ज्ञानिया रे । येई येई जीवजीवना रे'' हे भजन म्हणून श्रीमामा डोळे मिटून ज्ञानेश्वरमहाराजांचे ध्यान करण्यात मग्न झाले. तोच श्रीमामांना डोळ्यांपुढे प्रकाश दिसला. श्रीमामांनी डोळे उघडले आणि त्यांना दिसले की ज्ञानेश्वरमहाराज हे साक्षात् देहधारी रूपात आपल्या पुढे प्रगट झाले आहेत. श्रीमामा चट्‌दिशी उठले आणि त्यांनी ज्ञानेश्वरमहाराजांचे पुढे साष्टांग दंडवत घातले. मग श्रीमामा हात जोडून ज्ञानेश्वरमहाराजांचे पुढे उभे राहिले.

तेव्हा ज्ञानेश्वरमहाराजांनीच बोलण्यास प्रारंभ केला. ते म्हणाले, ''अरे गोविंदा, मला तुझ्या मनातला हेतु ज्ञात आहे. तसेच तुझ्यापुढे कोणती समस्या आहे हेही मला ठाऊक आहे. आता माझी तुला आज्ञा आहे :- तू आता घरी परत जा. तू तुझ्या वडिलांच्या इच्छेप्रमाणे वाग; वडिलांची सूचना मोडू नको. त्यांच्या इच्छेप्रमाणे तू विवाह कर. विवाह करून प्रपंच करीत राहिल्याने तुझ्या परमार्थाला बाधा येणार नाही. तुझ्या परमार्थाला अनुकूल अशी पत्नी तुला प्राप्त होईल. तुझा प्रपंच सुखाचा होईल. प्रपंचात राहूनच तुझा परमार्थ सिद्ध होईल. तुझा प्रपंच परमार्थरूपी होईल. तुला परमार्थात योग्य सद्‌गुरु भेटतील आणि त्यांनी सांगितलेले साधन तुझ्या हातून घडेल आणि तू परमार्थात पूर्ण होशील. काळजी करू नको. माझा तुला आशीर्वाद आहे.'' ज्ञानेश्वरमहाराजांचे हे वचन ऐकताच मान हलवून मामांनी त्याला संमती दिली आणि मामांनी पुन: ज्ञानेश्वरमहाराजांचे पुढे लोटांगण घातले आणि वर तोंड करून श्रीमामा पुन: पहातात तो त्यांना दिसले की ज्ञानेश्वरमहाराज अदृश्य झाले होते. आता श्रीमामांच्या



मनातील मळभ दूर झाले होते.

मग श्रीमामा आपल्या पुरश्चरणाची सांगता करून आपल्या मुक्कामाच्या ठिकाणी पोचले. तेथे गेल्यावर त्यांच्या मनाला प्रेरणा झाली की आपणास ज्ञानेश्वरमहाराज जसे दिसले तसे त्यांचे चित्र आपण रेखाटावे. तेव्हा त्यांनी लगेच चित्रासाठी योग्य असा कागद आणला आणि त्यावर श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे रेखाचित्र काढले आणि ते आपल्या ज्ञानेश्वरीच्या पारायण पोथीत घालून ठेवले (एका आख्यायिकेप्रमाणे सांगलीस परतल्यावर श्रीमामांनी ज्ञानेश्वरमहाराजांचे रेखाचित्र काढले). या रेखाचित्राच्या संदर्भात पुढे काय घडले हे येथेच सांगणे अप्रस्तुत होणार नाही.सांगलीस परतल्यावर श्रीमामांनी या रेखाचित्राचा उल्लेख न केल्याने ते अनेक वर्षे ज्ञानेश्वरीतच राहिले. पुढे श्रीमामांचा विवाह झाला व त्यांना ''राम'' नावाचा मुलगा झाला. एकदा या रामाच्या म्हणजे श्रीदादांच्या दृष्टोत्पत्तीस हे चित्र आले. तेव्हा श्रीदादांनी श्रीमामांना विचारले. खोदून खोदून विचारल्यावर मामांनी आळंदीत घडलेला प्रसंग श्रीदादांना सांगितला. ही घटना ऐकून आणि ज्ञानेश्वरमहाराजांचे चित्र पाहून श्रीदादा इतके भारावून गेले की त्यांचे मुखातून ''आळंदीसी दर्शन जाहले जे सत्य ज्ञानराजांचे । गोविंद भक्तराजे काढियले चित्र हे स्वये त्यांचे ।।'' अशा काव्यपंक्ती बाहेर पडल्या. आणि पुढील अभंग स्फुरला :-

''तो हा पिंपळाचा पार । जेथे उभे ज्ञानेश्वर ।।१।।
इंद्रायणी काठी । आळंदीसी जगजेठी ।।२।।
श्रांत जीवासी विसावा । साक्ष देतसे मानवा ।।३।।
झाले गोविंदा दर्शन । *दासराम* धरी चरण ।।४।।''

त्यानंतर श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी नाथपंथी यतीच्या/बैराग्याच्या वेषात श्रीमामांना का दर्शन दिले अशी शंका त्यांना आली व शंकेचे समाधानही लगेच झाले. ते त्यांनी एका श्लोकात संगृहीत केले :-

यतिवेषाने आले हे त्वेषाने म्हणू नये कोणी ।
बंधन काय तयांना अघटित ज्यांची असे सदा करणी ।
कळस नाथपंथाचे नाथरूपाने आले स्वये पुढती ।
प्रचीत हे संतांची संतचि येथे विनम्र ते होती ।।

श्रीमामांनी रेखाटलेले ज्ञानेश्वरमहाराजांचे ते चित्र पाहिल्यावर श्रीदादांना अतिशय आनंद झाला आणि त्या चित्राचे वर्णन करण्यास त्यांना आर्ष संस्कृत आणि मराठी या भाषांत काव्य स्फुरले. ते श्रीदादांच्या वही क्र. १२९ मध्ये सापडते. त्यातील एक आर्ष संस्कृत श्लोक आणि मराठी श्लोक येथे उद्‌धृत करीत आहे :-

## आर्ष संस्कृत श्लोक

मंदील शिरसि दिव्यं विभूषितं कमंडलुं दंड करेण शोभितम् ।
सुवर्णचरणं च कषाय-वस्त्रं श्रीज्ञानराजं शरणं प्रपद्ये

## मराठी श्लोक

काषायांबर पादुकाही चरणी मंदील श्रीमस्तकी ।
कर्णी कुंडल ती गळ्यात झळके रुद्राक्षमाळा निकी ।
हातामाजी कमंडलु नि बरवा शोभे भला दंड तो ।
गोविंदा पुढती प्रकाशरूप जे त्या ज्ञानिया वंदितो ।।

हे चित्र सांगलीत घरी आले असल्याने, यानंतर स्फुरलेल्या एका अभंगात श्रीदादा लिहितात :-

माझ्या वडिलांचा ऐसा दृढ भाव । आळंदीचा राव घरी आला ।।१।।
चित्र काढियेले श्रीआळंदी क्षेत्री । दर्शनाचे परी काय सांगो ।।२।।
घरी ते ठेविले ज्ञानेश्वरीवरी । नुरले अंतरी देह भान ।।३।।
नाथपंथी ऐसे आगळे दर्शन । देव्हारी स्थापन केले असे ।।४।।



शहात्तर वर्षे झाली या चित्रासी । पाहोनी चित्तासी हर्ष होय ।।५।।
भाग्य ते आमुचे होतसे दर्शन । माऊली प्रसन्न भक्तालागी ।।६।।
नाथपंथियाचे थोरचि महत्त्व । ऐसा नवलाव *दासरामी* ।।७।।

या अभंगात म्हटल्याप्रमाणे या चित्राला फ्रेम करून हे चित्र देव्हाऱ्याचे वरील भागात लावण्यात आले. पुढे याच चित्राला योग्य अशी पार्श्वभूमी इत्यादि देऊन, पुण्याचे सुप्रसिद्ध चित्रकार मा. जि. भि. दीक्षित यांनी एक सुंदर तैलचित्र तयार केले. नंतर या चित्राच्या अनेक फोटो प्रति काढण्यात आल्या. हे चित्र आणि श्रीमामांचे मूळ चित्र ही दोन्हीही चित्रे आजसुद्‌धा श्रीदादांच्या रामनिकेतनमध्ये दिमाखाने दिसून येतात.

या चित्राचा विषय पुढे अप्पाची वाडी या हालसिद्धनाथांच्या क्षेत्री निघाला होता. त्यावेळी देवाचे एकनिष्ठ भक्त मा. शंकरराव शिपुरकर हे वैशाख अमावस्या, शके १९०२, दि. १४-५-१९८० रोजी जे काही म्हणाले, त्याचा भावानुवाद श्रीदादांनी एका अभंगात गोवला आहे, तो अभंग असा :-

ज्ञानियाचा झाला जो का साक्षात्कार । आळंदीसी थोर गोविंदाते ।।१।।
खरे पहाता आपुले वैभव । झाला नवलाव नाथपंथी ।।२।।
ऐसी हे प्रतिमा मागितल्याविना । देऊ नये कोणा हुकूम हा ।।३।।
दर्शन इतुके नसावेची स्वस्त । परमार्थी दस्तऐवज हा ।।४।।
आप्पाचे वाडीसी देवाने कथिले । महत्त्व जाणिले *दासरामे* ।।५।।

ज्यासाठी श्रीमामा आळंदीस आले होते ते काम झाल्याने, सर्व आवराआवर करून श्रीमामा आळंदीत बससाठी चालत निघाले. त्यावेळी पुढील प्रकार घडला :-

ते साल इ. स. १९१५ होते. युरोपात पहिले महायुद्ध चालू होते. इंग्रज व जर्मन यांची लढाई सुरू होती. त्यावेळी भारतावर राज्य करणाऱ्या इंग्रजांनी भारतात मिलिटरीमध्ये सैनिक भरती सुरू केली होती. त्यासाठी त्यांनी काही

ठिकाणी रिक्रूटिंग ऑफिसर नेमले होते. त्यातील एक अधिकारी त्याच वेळी आळंदीत आला होता. दणकट प्रकृतीचे मामांना रस्त्यावरून जाताना पाहून त्याला वाटले या तरुण पुरुषाला मिलिटरीत भरती करून घ्यावे. तेव्हा तो श्रीमामांच्या जवळ आला आणि त्यांना थांबवून तो म्हणाला, ''अरे तरुण गृहस्था, तू येथे काय करीत आहेस? तुझा व्यवसाय काय?'' श्रीमामा बोलले, ''मी येथे ज्ञानेश्वरमहाराजांच्या दर्शनास आलो होतो. सध्या तरी मला व्यवसाय नाही.'' तेव्हा तो अधिकारी म्हणाला, ''हे बघ, मी तुला व्यवसाय देतो. तू मिलिटरीत भरती हो. तुला चांगला पगार मिळेल. आणि तू चांगली कामगिरी केलीस तर तुला बढतीही मिळेल. मिळकतही वाढेल. घरच्यांचे कल्याण होईल.'' त्या अधिकाऱ्याचे हे भाषण ऐकताच मामा मनात हडबडले. 'आपण आलो कशासाठी आणि आता हे काय घडत आहे. आणि आत्ता जर काही केले नाही तर हा माणूस मला आपल्या जाळ्यात अडकवील. आता करावे तरी काय?' असा विचार मामांच्या मनात येतो तोच तिकडून एक टांगेवाला टांग्यासह श्रीमामांच्या जवळ आला आणि तो आपणहून श्रीमामांना म्हणाला, ''अरे तरुणा, तुला पुण्यास जायचे आहे ना? चल माझ्या बरोबर. मी पुण्यासच निघालो आहे.'' या संधीचा फायदा घेऊन श्रीमामा टांगेवाल्याला बोलले, ''होय, मी तुझ्याबरोबर येतो.'' असे म्हणून श्रीमामा चट्‌दिशी टांग्यात चढले. टांगेवाल्याने पुण्याच्या दिशेने टांगा जोरात हाकला. वाटेत टांगेवाल्याने श्रीमामांना विचारले, ''साहेब, तुम्हाला पुण्यात कोठे सोडू?'' श्रीमामांना चट्‌दिशी उत्तर सुचेना. मग त्यांच्या लक्षात आले की लोकमान्य टिळक हे पुण्यात असतात. आपण त्यांचेकडे जावे असे वाटून त्यांनी ''लोकमान्य टिळकांच्या वाड्यावर सोड'' असे टांगेवाल्याला सांगितले. यथाकाळ टांगा लो. टिळकांच्या वाड्यापुढे येऊन उभा राहिला. टिळक पुण्यात आहेत काय याची चौकशी करण्यास श्रीमामा वाड्याच्या दरवाज्याजवळ गेले. टिळक वाड्यात आहेत असे कळताच,



टांगेवाल्यास पैसे देण्यास श्रीमामा मागे वळून आले. तेथे टांगाही नव्हता आणि टांगेवालाही नव्हता. श्रीमामा मनात उमगले की टांगेवाल्याच्या रूपात येऊन श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीच आपणास पुनः साहाय्य केले आहे.

श्रीमामा टिळकांच्या वाड्यात शिरले. त्यांची लोकमान्यांशी गाठ घालून देण्यात आली. लोकमान्यांनी मामांची चौकशी केली व त्यांचे कौतुकही केले. लो. टिळक म्हणाले, ''अरे तरुणा, तू प्रपंचात राहून परमार्थ करणार ही चांगली गोष्ट आहे. पण माझी एक सूचना आहे ती लक्षात घे. प्रपंच-परमार्थ करताना काही वेळ मोकळा मिळतो. त्यावेळी आपल्या परतंत्र देशासाठी काही प्रयत्न तू करावास.'' लो. टिळकांचे हे शब्द लक्षात ठेवून मामांनी पुढे काही काळ काँग्रेस पक्षात स्वयंसेवक म्हणून काम केले.

नंतर लोकमान्य टिळकांचा निरोप घेऊन व त्यांना वंदन करून श्रीमामा सांगलीस निघाले. वाटेत आणखी काही संकट/अडचण न येता ते सांगलीस सुखरूप पोचले.

***

# प्रकरण ३

# पुरवणी

आळंदीत पुरश्चरणानंतर श्रीमामांना श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे साक्षात् दर्शन झाले आणि त्यांना ज्ञानेश्वरमहाराज जसे दिसले तसे त्यांचे रेखाचित्र श्रीमामांनी काढून ठेवले. या संदर्भात काही मासिकातून नंतरच्या काळात काही टीका-टिपणी आली होती. ती येथे दिली आहे.

१) मी सांगली येथे सिटी हायस्कूलमध्ये शिकत असताना, आम्हांला ड्रॉइंग व इतर विषय शिकविणारे परमपूज्य बापूरावजी केळकर हे 'साधु पुरुष' म्हणून विख्यात होते. 'लग्न करू का नको?' ह्या प्रश्नाचा निकाल करण्याकरता त्यांनी साक्षात् ज्ञानेश्वरांनाच साकडे घातले. प्रेमळ ज्ञानेश्वरांनी त्यांना दर्शन दिले व 'लग्न न करण्याचा आग्रह सोडून दे व लग्न करून प्रपंच व परमार्थ साध' असा आदेश ज्ञानेश्वरांनी त्यांना दिला. बापूरावजींना जे ज्ञानेश्वरांचे दर्शन झाले त्याप्रमाणे त्यांनी त्याचे चित्र तयार केले. हे चित्र सांगलीला त्यांचे घरात आजही आपणास पहाण्यास मिळते. या चित्रात ज्ञानेश्वर उभे आहेत (गीतादर्शन मासिक).

२) अखंड कीर्तनात मग्न असलेले सांगलीचे परम माऊलीचे भक्त श्रीमामा केळकर हे माऊलीच्या प्रगट साक्षात्काराचे मानकरी ठरले. यांना माऊलीच्या चिंतनात आळंदीस इ.स. १९०४ साली दर्शनाची आस धरून उपोषण करून बसले असता माऊलीने प्रगट दर्शन दिले. त्यांना झालेले दर्शन कफनी, डोक्याला मंदील, हातात कमंडलु, पायी खडावा अशा नाथपंथीय वेषातील होते. हे दर्शन फार दुर्मिळ आहे. ते स्वत: चित्रकार असल्याने (त्यांनी ते छाया) चित्र काढले. ते सांगलीस त्यांच्या नित्य पूजेत आहे (श्री. म. ना. देवकर, 'साक्षात्काराचे मानकरी' - श्रीज्ञानेश्वरमाऊली विशेषांक, डिसेंबर १९८४, पृ.८९).

३) 'श्रीज्ञानेश्वरमहाराज होते तरी कसे?' या शीर्षकाखाली श्री. शांताराम आठवले यांनी एक लेख लिहिला. तो वाङमयशोभा, श्रावणमास विशेषांक मध्ये प्रकाशित झाला. हा लेख पुढील प्रमाणे आहे :-



**श्रीज्ञानेश्वरमहाराज होते तरी कसे?**

सांगली येथे (वै.) गोविंद अनंत ऊर्फ बापूरावजी केळकर हे एक साधु पुरुष परवापरवा होऊन गेले (निर्वाण १२-२-६२) (जन्म अदमासे १८८८-१८९०). श्री.केळकर संसारी होते. त्यांचा व्यवसाय शिक्षकाचा होता. चित्रकलेत ते प्रवीण होते. आपला बहुतेक काळ ते उपासनेत घालवीत. ते उत्तम कीर्तन करीत. ज्ञानेश्वरांवर त्यांची नितांत निष्ठा. विवाह करावा की नाही असा त्यांच्यापुढे पेच निर्माण झाला. त्या प्रश्नाचा निर्णय लावणेसाठी त्यांनी ज्ञानेश्वरांना साकडे घातले. त्यांचा कौल मागितला. त्यांच्या अनन्य भक्तीने संतुष्ट झालेल्या श्रीज्ञानेश्वरानी त्यांना दर्शन दिले, ''प्रपंच करून परमार्थ कर'' असा त्यांनी केळकरांना आदेश दिला. ज्ञानेश्वरांचे त्यांना जे दिव्य दर्शन झाले तेच त्यांनी आळंदीस रेखांकित केले (प्रतिमा क्र.४). श्री.केळकर यांनी काढलेले हे चित्र उपलब्ध आहे पण त्याला अद्याप हवी तशी प्रसिद्धी मिळालेली नाही. त्यांनी रेखाटलेल्या चित्रातील ज्ञानेश्वरांचे रूप-ध्यान अवश्य विचारात घ्यावे असे आहे.

श्रीमामा केळकर यांची ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी यावर केवढी निष्ठा होती व त्या निष्ठेचे प्रत्यक्ष प्रसाद फळ त्यांना कसे मिळाले हे श्रवणीय आहे. गेल्या पिढीत भारतात थैमान घालणाऱ्या प्लेगोबांनी एकदा मामांवर झडप घातली. मरणोन्मुख मामा एका सिद्ध पुरुषाच्या दृष्टांत लाभाने मृत्यूवर मात करू शकले. पण त्या दुखण्यात त्यांच्या वाणीत दोष राहिला. मामांनी ज्ञानेश्वरीची १०८ पारायणे पार पाडली. परिणामत: त्यांची वाणी पूर्ववत् सुधारली.

ज्ञानेश्वरांच्या उपलब्ध रूढ व प्रसिद्ध चित्रात मामांचे चित्र पुष्कळांना ज्ञानेश्वरांच्या मूळ स्वरूपाची कल्पना देणारे वाटते. आणि म्हणून त्या चित्राचा वापर व प्रसार अधिक व्हावा असे त्यांना स्वाभाविकपणेच वाटते.

श्रीमामा केळकर व धुरंधर यांनी केलेल्या ज्ञानेश्वरांच्या रूप व वेष वर्णनात पुष्कळच साम्य आढळून येते. ज्ञानेश्वरांचा साक्षात्कार झालेल्या काही थोर भक्त

साधकांनी आपल्या साक्षात्काराचे वर्णन करून ठेवले आहे. काहींनी ज्ञानेश्वरांचा साक्षात्कार झाला येवढाच निर्देश केला आहे. तर काहींनी ते आपल्याला कसे दिसले हेही सांगितले आहे.

श्रीगुलाबरावमहाराज, वैकुंठवासी मामा केळकर, वै. वा. बाळाराम धुरंधर, निरंजन रघुनाथ, अच्युतमहाराज व वै. वा. विष्णुबुवा जोग या सर्व ज्ञानेश्वर भक्तांना ज्ञानेश्वरांच्या दर्शनाचा लाभ झाला होता. त्यापैकी निरंजन रघुनाथ, अच्युतमहाराज यांना झालेले दर्शन हा स्वप्नदृष्टांत होता. बाळाराम धुरंधर यांना त्यांनी कीर्तनात तल्लीनपणे डोळे मिटलेले असताना ज्ञानेश्वरांच्या सान्निध्याचे व स्पर्शाचेही सौभाग्य लाभले. म्हणजेच त्यांना झालेले दर्शन जागेपणी पण ध्यानावस्थेत असताना झालेले आहे. ''मिया मूर्ती देखिली जैसी । आणखी न देखिली तैसीयां'' अशी ग्वाही देणारे गुलाबरावमहाराज यांना माऊलीने मांडीवर घेऊन कृपाकटाक्षाने न्याहाळिले ते ध्यानावस्थेतच असे स्पष्ट दिसते. मामा केळकर यांना घडलेले दर्शन साक्षात् घडले असे त्यांनी नमूद करून ठेवले आहे. ज्ञानेश्वरांच्या ज्या प्रतिमा प्रमाण मानावयास प्रत्यवाय वाटू नये अशा गुलाबमहाराज व श्रीमामा केळकरप्रणीत प्रतिमांची गणना होऊ शकेल.

***

## प्रकरण–४

## श्रीमामांची नोकरी, गुरूचा अनुग्रह, श्रीदादांचा जन्म

**(इ. स. १९१६-१९२१)**

सांगलीत पोचताच श्रीमामा तडक आपल्या घरी गेले. बापू सुखरूपपणे घरी आलेला पाहून अनंतरावांना संतोष झाला. घरात येऊन बापूने हातपाय तोंड धुतले आणि तो ताजातवाना झाला. तेव्हा उत्सुकतेने अनंतरावांनी श्रीमामांना प्रश्न केला, ''बापू, आळंदीला काय झाले? ज्ञानेश्वरमहाराजांनी तुला काय कौल दिला?'' श्रीमामांनी सरळ उत्तर दिले ''नाना, तुमच्या इच्छेप्रमाणे मी विवाह करावा आणि प्रपंचात राहून मी परमार्थ करावा, अशी आज्ञा मला ज्ञानेश्वरमहाराजांनी दिली आहे.'' हे श्रीमामांचे शब्द ऐकताच अनंतरावांनी मनोमनी ज्ञानेश्वरमहाराजांना वंदन केले आणि त्यांना धन्यवाद दिले. आपल्या मुलाला ज्ञानेश्वरमहाराजांनी योग्य ते मार्गदर्शन केले याबद्दल त्यांनी ज्ञानेश्वरमहाराजांचे उपकार मानले. आणि बापूचा लौकरच विवाह उरकून घ्यावयाचा असा त्यांनी निश्चय केला.

या सुमारास जुन्या सांगलीत एक महत्त्वाची घटना घडली होती. सांगलीतीलच श्री. तोरो, सखदेव इत्यादि काही मंडळींनी एकत्र येऊन, आणि विचार करून, सांगलीतच एक शिक्षण संस्था स्थापन केली होती. त्यांनी ''सिटी हायस्कूल'' या शाळेचा प्रारंभ केला होता. या शाळेत ड्रॉईंग हा विषयही शिकवला जाई. ड्रॉईंग या विषयासाठीच्या शिक्षक पदासाठी श्रीमामांनी या शाळेकडे अर्ज केला. त्या जागेसाठी श्रीमामा पात्र असल्याने, त्यांचा अर्ज मंजूर होऊन, त्यांची ड्रॉईंगचे शिक्षक म्हणून नेमणूक झाली. पुढे त्यांचेकडे मराठी, सायन्स आणि नीतिशास्त्र (मॉरल) हे विषयसुद्धा सोपवण्यात आले. मुलांच्या वक्तृत्व कलेला

उत्तेजन मिळावे म्हणूनही शाळा साहाय्य करी. हे साहाय्य करण्याचे कामही श्रीमामांचेकडे आले. शिक्षक या दृष्टीने श्रीमामांचे काम संस्थाचालकांच्या नजरेत भरले आणि त्यांना संस्थेचे आजीव सदस्य करण्यात आले. काही काळ श्रीमामा हे आजीव सदस्य मंडळाचे अध्यक्षपदी सुद्‌धा होते.

श्री. तोरो, श्रीमामा इत्यादि काही जण पारमार्थिक प्रवृत्तीचे असल्याने, विद्यार्थी या शाळेला 'पारमार्थिक शाळा' असे म्हणत, अशी नोंद न्यायमूर्ति राम केशव रानडे यांनी केली आहे. त्याकाळी ते सिटी हायस्कूलमध्ये विद्यार्थी म्हणून शिकत होते.

ज्या काळी मामा शिक्षक होते त्याकाळी विद्यार्थ्यांनी डोकीस टोपी घालून शाळेत येण्याची पद्‌धत होती. एकदा एका वर्गातील मुले टोप्या हातात घेऊन गडबड करीत होती. श्रीमामा त्या वर्गात शिरले. आणि त्यांनी काही म्हणावयाचे आतच मुलांनी आपापल्या डोक्यावर आपल्या टोप्या ठेवल्या आणि त्यांनी गडबड गोंधळ बंद केला (गोचमा. पृ. ९३).

एकदा एका विद्यार्थ्याने श्रीमामांना विचारले, ''सर, मी सिनेमाला जाऊ का?'' श्रीमामा म्हणाले ''बाळा, सिनेमात घेण्यासारखे फारसे काही नसते. तेव्हा तू जाऊ नको.'' तेव्हा विद्यार्थी म्हणाला, ''सर, ठीक आहे. मी आज तर सिनेमाला जाणार नाहीच तर यापुढेही कधी सिनेमाला जाणार नाही.'' (अकी. पृ. ६०).

गोपाळदास शेठ या नावाचा एक विद्यार्थी होता. ''बाळ, आपले कपडे आपणच धूत जावे.'' त्या विद्यार्थ्याने तसे करणे सुरू केले. पुढे हा विद्यार्थी चांगलाच श्रीमंत झाला. तरी श्रीमामांचे बोलणे लक्षात ठेऊन, तो स्वत:चे कपडे स्वत:च धूत राहिला (अकी पृ. ६०).

वक्तृत्व कलेत भाग घेणारे जे विद्यार्थी असत, त्या विद्यार्थ्यांना श्रीमामा एक आठवडा अगोदर विषय देत आणि त्यावर थोडी चर्चा झाल्यावर मग जरुर पडल्यास मार्गदर्शन करीत. पुढल्या आठवड्यात त्या विषयावर विद्यार्थ्यांनी बोलावे अशी अपेक्षा असे. एकदा असे झाले की विद्यार्थ्यांना भाषणाचा विषय देण्याचे श्रीमामांचेकडून राहून गेले. विद्यार्थी गप्पच राहिले. पुढील आठवड्यात वक्तृत्वाच्या वेळी विद्यार्थ्यांनी फळ्यावर लिहून ठेवले :- ''आजच्या भाषणाचा विषय काही नाही.'' श्रीमामा वर्गात शिरले आणि मुलांनी फळ्यावर लिहून ठेवलेले त्यांनी वाचले. झाला प्रकार त्यांच्या लक्षात आला. पण तसे न दर्शवता श्रीमामा म्हणाले, ''मुलांनो, आजच्या भाषणाचा विषय 'काही नाही' असा आहे.'' तेव्हा मुले खजील झाली. मग श्रीमामांनी मुलांना विचारले, ''आजच्या 'काही नाही' या विषयावर कोण कोण बोलणार आहे?'' काही नाही या विषयावर विद्यार्थी काय बोलणार? ते सर्व गप्पच बसले. तेव्हा श्रीमामा म्हणाले, ''तुमच्यापैकी जर कुणीच बोलणार नसेल, तर मीच आज या विषयावर बोलतो. तुम्ही ऐका.'' असे म्हणून तास संपेपर्यंत मामा 'काही नाही' या विषयांवर बोलत राहिले. ते म्हणाले, ''आजही आपली शाळा येथे उभी आहे. ती बांधून होण्यापूर्वी येथे शाळा म्हणून काहीच नव्हते म्हणजे काही नाही. रात्रीच्या वेळी चंद्र, तारे, ग्रह आकाशात दिसतात. सूर्य उगवताच ते दिसेनासे होतात म्हणजे काही नाही. मुलांनो, तुमचा जन्म होण्यापूर्वी तुमचे काय होते? काही नाही. माणूस मरतो. तो शरीराने दिसेनासा होतो. त्याचे मग 'काही नाही.' घरातील लोणी खाऊन कृष्ण पळाला. त्याला पकडण्यास यशोदा त्याच्या मागे धावली. तिला काही कृष्ण सापडेना. ती म्हणाली, 'कृष्ण पकडण्यास माझी शक्ति काही नाही.' मुलांनो, तुम्हाला स्वप्ने पडतात. स्वप्न संपल्यावर स्वप्नातले काय रहाते? काही नाही.'' अशाप्रकारे 'काही नाही' हा विषय मानून, मुलांना समजेल अशा सोप्या भाषेत मामांनी 'काही नाही'चे विवरण केले.

एके दिवशी घंटा झाल्यावर श्रीमामा इष्ट त्या वर्गात शिरले आणि त्यांनी शिकवण्यास प्रारंभ केला. इतक्यात एक मुलगा धावत पळत वर्गाच्या दाराशी आला आणि ''मी आत येऊ का?'' (May I come in) असे म्हणण्याचे ऐवजी तो ''ॐ भवति भिक्षां देहि'' असे म्हणाला. त्याचे बोलणे ऐकल्यावर

वर्गातील मुले हसू लागली. मुलांचे हसणे श्रीमामांना मुळीच आवडले नाही. त्यांनी मुलांना दटावले. त्या विद्यार्थ्याला वर्गात येण्याची परवानगी दिली आणि मग ते विद्यार्थ्यांना म्हणाले ''मुलांनो, हा मुलगा गरीब आहे. गरिबीला कधीही हसू नये. गरिबी असल्याने, तो रोज मधुकरी मागून शिकत आहे. हेच त्याचे मोठेपण आहे. त्याच्या शिकण्याच्या जिद्दीचे कौतुक करा''. तेव्हा मुले अगदी गप्प झाली. आणि मामांनी तास पुढे सुरू केला.

आता श्रीमामा नोकरीत स्थिरस्थावर झाले हे पहाताच अनंतरावांनी त्यांच्या लग्नासाठी उचल घेतली आणि जोरात वधूसंशोधन सुरू केले. शेवटी त्यांचा शोध संपला. कागवाड या गावी फाटक या नावाचे घराणे रहात होते. त्यावेळी नागेशराव फाटक हे वकिल घरातील कर्ते पुरुष होते. त्यांना रंगू नावाची कन्या होती. ही रंगू श्रीमामांची वधू म्हणून अनंतरावांनी नेमस्त केली. श्रीमामांची संमति घेतली. मग योग्य तो मुहूर्त पाहून, अनंतरावांनी बापू आणि रंगू यांचा विवाह धूमधडाक्यात सांगली येथे साजरा केला. सासरी रंगूचे 'इंदिरा' असे नामकरण करण्यात आले. उंबरठ्यावरील माप ओलांडून इंदिरा सासरच्या घरात शिरली आणि इंदिरा व गोविंद या दांपत्याचा प्रपंच सुरू झाला.

श्रीमामांचा प्रपंच सुरू झाला आणि प्रपंचात राहूनच परमार्थ करावयाचा होता. पण परमार्थाचा अद्यापि काहीच पत्ता नव्हता. श्रीमामा अधून मधून कीर्तन वा प्रवचन करीत पण कीर्तन प्रवचने करणे म्हणजे परमार्थ नव्हे हे मामांना माहीत होते. परमार्थाचा प्रारंभ होण्यास योग्य गुरूची गाठ पडून, त्याचा उपदेशानुग्रह झाल्यावर, त्या गुरूच्या सांगण्याप्रमाणे साधना सुरू झाली तर परमार्थाचा प्रारंभ होतो. हे श्रीमामांना ग्रंथ वाचनाने माहीत झाले होते. श्रीमामांच्या दृष्टीने असा योग्य गुरू सांगलीत उपलब्धही होता. तो म्हणजे तात्यासाहेबकोटणीसमहाराज होत.

श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस हे इ. स. १९०१ सालापासून सांगलीत नित्य कीर्तन करीत होते. श्रीमामांचे वडिल नाना हे त्यांच्या कीर्तनास जात



असत. श्रीमामाही अधून मधून त्यांच्या कीर्तनास जात असत. या कीर्तनांत त्यांनी परमार्थातील गुरूंचे महत्त्व ऐकले होते. कोटणीसमहाराज उपदेशानुग्रह देतात हेही श्रीमामांना ज्ञात होते. कारण त्यांच्या वडिलांनी म्हणजे अनंतरावांनी कोटणीसमहाराजांचा अनुग्रह घेतला आहे हेही श्रीमामांना माहीत होते. हळुहळु श्रीमामांचीही कोटणीसमहाराजांचे वर निष्ठा बसली आणि त्यांनी कोटणीसमहाराजांचा अनुग्रह घेण्याचे निश्चित केले. त्यानंतर एके दिवशी श्रीमामा कोटणीसमहाराजांना जाऊन भेटले आणि म्हणाले, ''महाराज, मला परमार्थाची आवड आहे आणि तो मला करावयाचा आहे. तेव्हा आपण मला उपदेशानुग्रह देऊन, माझ्या परमार्थाचा प्रारंभ करून द्यावा अशी माझी आपणास नम्र प्रार्थना आहे.'' आपल्याकडे येणाऱ्या आपल्या अनंतराव शिष्याचे श्रीमामा हे चिरंजीव हे कोटणीसमहाराजांना विदित होतेच. तेव्हा कोटणीसमहाराज श्रीमामांना म्हणाले, ''बापूराव, तुमची इच्छा मला कळली. पण सर्व गोष्टी परमेश्वराने केलेल्या इच्छेप्रमाणे होतात, हेही तुम्हास माहीत आहे. आणि कुणाचा कोण गुरु हेही अगोदरच ठरलेले असते. आणि मला असे दिसते की मी तुमचा गुरु होऊ शकणार नाही. तुम्हास माहीत असेल की मी चिमड संप्रदायाचा अनुगृहीत आहे. माझ्या गुरूंचे चिरंजीव नारायणमहाराज हे सध्या चिमडच्या मठाचे अधीश आहेत. आणि तेच तुमचे पूर्वनियोजित गुरु आहेत. तेव्हा तुम्ही त्यांचेकडून उपदेशानुग्रह घ्यावा अशी माझी सूचना आहे. तसे झाल्यानंतर तुम्हाला काही शंका, अडचणी आल्या तर मी त्या निवारण करीन.'' कोटणीसमहाराजांचे हे वचन ऐकल्यावर श्रीमामांची थोडी निराशा झाली. तथापि महाराजांच्या सूचनेप्रमाणे गुरूची प्राप्ति आणि गुरूचा अनुग्रह प्राप्त होईल ही आशाही बळावली. मग घरी परत आल्यावर कोटणीसमहाराजांच्या सूचनेप्रमाणे चिमड गावी जाऊन नारायणमहाराज यरगट्टीकर यांचा अनुग्रह घ्यावयाचा असे श्रीमामांनी ठरविले.

चिमड हे कर्नाटकातले एक आडगाव होते. तथापि देवनिंबरगी गावातील निंबरगीकरमहाराज यांचे पट्टशिष्य श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांनी या चिमड

गावी देह ठेवला. देह ठेवण्यापूर्वी त्यांनी आपल्या शिष्यांना सांगितले होते की विटे गावी माझे पट्टशिष्य रामभाऊ यरगट्टीकर आहेत, त्यांना चिमडास घेऊन या. त्याप्रमाणे निंबरगीकरमहाराजांच्या आज्ञेनुसार रामभाऊ यरगट्टीकर हे चिमड गावी आले. पूर्वीच्या स्मशानात त्यांनी झोपडी बांधली व तेथे ते राहू लागले. साधुमहाराजांची समाधि त्यांनी आपल्या शेजारी बांधली. साधुमहाराजांच्या मंदिरात त्यांनी काडसिद्ध, निंबरगीकरमहाराज व साधुमहाराज या त्रैमूर्तींची स्थापना केली आणि त्यांनी चिमड संप्रदायाचे नेतृत्व केले. त्यांच्या निर्वाणानंतर काही काळ महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का यांनी चिमड मठाचा प्रपंच व परमार्थ सांभाळला. त्यांचे नंतर चिमडमहाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव श्रीदाजीसाहेबमहाराज हे मठाधीश झाले. पण ते अल्पायुषी होते. त्यांचे नंतर त्यांचे धाकटे बंधु नारायणमहाराज यरगट्टीकर हे चिमड मठाचे अधिपति झाले होते. आणि तेच श्रीमामांचे पूर्वनियोजित गुरु होते.

चिमडला जाण्यास त्याकाळी सदर्न मराठा रेल्वेच्या कुडची स्टेशनवर उतरावे लागे. तेथून तेरदळ, रबकवी या गावावरून बैलगाडीने अथवा भाड्याच्या मोटारीने चिमडला जाता येई. हा प्रवास करून श्रीमामा चिमडला पोचले. त्यांनी प्रथम मंदिरातील त्रैमूर्तींचे दर्शन घेऊन त्यांना वंदन केले आणि मग ते जवळच्या मठात शिरले. मठात श्रीमामांना नारायणमहाराजांचे दर्शन झाले. त्यांना नमस्कार करून श्रीमामांनी आपली अनुग्रह घेण्याची इच्छा प्रगट केली. नारायणमहाराज हे सोमवारी अथवा गुरुवारी अनुग्रह देत. श्रीमामा ज्या दिवशी मठात पोचले तो दिवस सोमवार होता. योग्य त्या प्राथमिक गोष्टी झाल्यावर नारायणमहाराजांनी प्रसन्न वदनाने श्रीमामांना परंपरागत चालत आलेले सिद्ध साधन सांगितले आणि म्हटले, ''बापूराव, हे साधन जर सिद्ध झाले तर तुम्ही जीवन्मुक्त व्हाल. तुमचा परमार्थ सिद्ध होईल.'' श्रीमामा आनंदित झाले आणि नारायणमहाराजांना नमस्कार करून ते परत निघाले.

परतीच्या वाटेवर त्यांना कळले की वाटेत तेरदळ गावी उमदीचे सुप्रसिद्ध



संत भाऊसाहेबमहाराज उमदीकर मुक्कामास आहेत. श्रीमामांचे जवळ सांप्रदायिक दुरभिमान नसल्याने त्यांनी ठरविले की वाटेत तेरदळला थांबून उमदीकरमहाराजांचे दर्शन घ्यावयाचे. त्याप्रमाणे तेरदळ गावी श्रीमामा उमदीकरमहाराजांच्या दर्शनास गेले. त्यांनी उमदीकरमहाराजांना नमस्कार केला. तेव्हा उमदीकरमहाराजांनी त्यांना केळ्याचा प्रसाद दिला आणि आशीर्वाद उच्चारला ''तुमच्या भक्तीचा थाट होईल.'' या आशीर्वादात्मक शब्दांत श्रीमामांचा परमार्थ पूर्ण होईल असा अध्याहृत अर्थ होता. तो श्रीमामांना कळला. श्रीमामांना आनंद झाला. ते आनंदाने तेरदाळहून निघून सांगलीस परत आले.

सांगलीस परत आल्यावर श्रीमामांनी परमार्थाकडे जास्त लक्ष देण्यास प्रारंभ केला. आता ते नारायणमहाराजकथित साधन दिवसातून तीन वेळा करू लागले. इतकेच नव्हे तर त्यांनी साधन करण्याचा सपाटाच लावला. वेळ आणि सवड मिळेल तेव्हा ते साधनच करू लागले. अनेकदा तर ते रात्री अंगणातील दगडावर बसून बराच वेळ साधानत घालवीत. या साधनाचा परिणाम म्हणून हळुहळु त्यांना अनाहत नाद, प्रकाशाचा बिंदु, कला आणि ज्योति यांचे अनुभव येऊ लागले.

इकडे श्रीमामांचा प्रपंचही व्यवस्थित चालूच होता. योग्यवेळी सौ. इंदिराबाईंचा गर्भाधान विधी झाला होता. आणि पुढे इ. स. १९१८ च्या सुमारास गर्भवती इंदिराबाई प्रसूत झाल्या आणि त्यांनी एका कन्येला जन्म दिला. अनंतरावांनी केलेल्या तिच्या पत्रिकेप्रमाणे ती साक्षात लक्ष्मी होती. पण केळकर घराण्यात लक्ष्मीला महत्त्व नसून 'नारायणाला' महत्त्व होते. ते लक्षात घेऊन ही लक्ष्मीरूपी कन्या केळकरांच्या घरात फार काळ राहिली नाही. ती लौकरच इहलोक सोडून गेली.

आपले पहिलेच अपत्य आपणास सोडून गेले या कारणाने इंदिराबाई अतिशय दु:खी झाल्या. इंदिरेची पहिली कन्या गेली हे इंदिरेच्या महादेव मामांना कळाले. ते कुरुंदवाडात रहात होते. ते इंदिरेला भेटण्यास आले आणि त्यांनी

तिचे सांत्वन केले. पण इंदिरेची स्थिती दयनीय झाली होती. तेव्हा तिची स्थिती बदलण्याचा उपाय आपण आपल्या गुरूंना विचारावा असे महादेव मामांनी ठरविले. त्यांचे गुरू अवलिया वजीरबाबा नावाचे होते आणि ते औरवाड गावी रहात होते. त्यांचेकडे जाऊन महादेवमामांनी इंदिरेची स्थिति त्यांना सांगितली. तेव्हा वजीरबाबा म्हणाले, ''महादेवा, तुझ्या भाचीला जाऊन सांग की चिंता करू नको. जे होते ते आपल्या भल्यासाठीच होते हे समजून घे. यानंतर लौकरच तुला एक पुत्र होईल. तो विष्णुभक्त असणार. तो तुझे पांग फेडील. काळजी करू नको. चिंता सोड.'' असे सांगून वजीरबाबा यांनी प्रसाद म्हणून इंदिरेला देण्यास एक खारीक दिली. ती खारीक घेऊन महादेवमामा तडक सांगलीस आले आणि त्यांनी वजीबाबांचा निरोप इंदिराबाईंना सांगितला आणि प्रसादाची खारीक तिला दिली. इंदिरेने खारीक खाल्ली आणि वजीरबाबांच्या सामर्थ्याने तिचे समाधान झाले आणि ती शांत झाली.

सौ. इंदिराबाईंना माहीत होते की आपले सासरे हे तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे अनुगृहीत आहेत आणि आपले पति हे नारायणमहाराजांचे अनुगृहीत आहेत. तेव्हा इंदिरेला वाटले की आपणही गुरूंचा अनुग्रह घेऊन परमार्थाचा प्रारंभ करावा. आपला बेत त्यांनी आपले सासरे व पति यांना सांगितला. त्यांच्या संमतीने त्या इ. स. १९२० च्या वैशाख महिन्यात कोटणीसमहाराजांच्याकडे गेल्या आणि त्यांनी त्यांचा उपदेशानुग्रह घेतला. यावेळी सौ. इंदिराबाई या श्रीदासराममहाराजांच्या वेळी गर्भवती होत्या. सहावा महिना असतानाच सौ. इंदिराबाई बाळंतपणासाठी माहेरी कुरुंदवाडास गेल्या आणि तेथे असतानाच सातव्या महिन्यातच त्या प्रसूत झाल्या आणि इ. स. १९२० च्या श्रावण महिन्यात त्यांनी एका पुत्राला जन्म दिला. श्रावण वद्य षष्ठी शके १८४२, गुरूवार दि. ६-८-१९२० या दिवशी रात्री दोन वाजून दहा मिनिटांनी सौ. इंदिराबाईंनी पुत्रास जन्म दिला होता. हे पुत्ररत्न म्हणजेच राम ऊर्फ श्रीदासराम ऊर्फ श्रीदादा. पहिल्या वहिल्या नातवाचे मुख पहाण्यास अनंतराव हे कुरुंदवाडास



आले. त्याच वेळी सांगलीचे कोटणीसमहाराज हे कुरुंदवाड संस्थानच्या अधिपतींच्या गणेशोत्सवात कीर्तन करण्यास कुरुंदवाडला आले होते. त्यांना अनंतराव भेटले आणि म्हणाले ''महाराज, मला पहिला नातू झाला आहे. त्याला आशीर्वाद देण्यास आपण आमच्या घरी यावे''. त्यांची विनंति मान्य करून कोटणीसमहाराज सौ. इंदिराबाईंच्या मामांच्या घरी गेले. ते स्थानापन्न होताच मुलाला त्यांच्या मांडीवर ठेवण्यात आले. ''आहेच मुळी हा बाळ आमचा'' असे उद्‌गार काढून कोटणीसमहाराजांनी आपला कृपाहस्त बाळाच्या मस्तकावरून फिरविला, आणि बाळाच्या दृष्टीला दृष्टि भिडवून त्यांनी दृष्टिद्वारा बाळावर कृपानुग्रह केला. यावेळी हा बाळ फक्त चौदा दिवसांचा होता. मग कोटणीसमहाराजांनी अनंतरावांना विचारले, ''या मुलाचे नाव काय ठेवले आहे?'' ''बाळाचे बारसे करून अद्यापि त्याचे नामकरण केलेले नाही,'' असे अनंतरावांनी सांगितले. तेव्हा कोटणीसमहाराज बोलले ''अनंतराव, या मुलाचे नाव 'राम' असे ठेवा.'' नंतर कोटणीसमहाराज पुढे म्हणाले ''हा राम अगदी बालपणापासूनच हरिकीर्तन करू लागेल.'' असा आशीर्वाद देऊन आणि बाळाला आपले म्हणून कोटणीसमहाराज निघून गेले.

वरील घटना घडून गेल्यावर योग्य मुहूर्त पाहून बाळाचे बारसे थाटामाटाने करण्यात आले आणि कोटणीसमहाराजांच्या आदेशाप्रमाणे त्याचे 'राम' असे नामकरण करण्यात आले आणि त्याची जन्मपत्रिका करून घेण्यात आली. नामकरणाचेवेळी सौ. इंदिराबाईनी पुढील पाळणागीत म्हटले :-

आनंदी आनंद झाला । बालयोगी हा उदरी अवतरला ।।१।।
पालखी या जोजवुनी । ठेवू श्रीराम नामाला ।।२।।
कुलदेव तो प्रसन्न झाला । मम भक्तीला भुलला ।।३।।
प्रसन्न होऊनी हा प्रसाद । मम पदरी ओपीला ।।४।।

सातव्या महिन्यात जन्माला आलेला राम अशक्त होता. तेव्हा त्याचा तीन महिने नीट सांभाळ करून झाल्यावर सौ. इंदिराबाई कुरुंदवाडमधून सांगलीस

परत आल्या. राम बाळ हळुहळु वाढू लागा. सौ. इंदिराबाई रोज रामाची दृष्ट काढीत आणि त्याचे कोडकौतुक करीत. श्रीमामाही त्याच्या कोडकौतुकात सामील होत. असेच काही दिवस गेले. मग एकदा श्रीमामा आपल्या पत्नीला म्हणाले, ''इंदिरे, आपल्याला पुत्र झाला आहे. धर्मशास्त्रे सांगतात की पुत्राचा जन्म झाला की पति हा पत्नीच्या ऋणातून मुक्त होतो. त्याप्रमाणे मी आता तुझ्या ऋणातून मुक्त झालो आहे. आता यापुढे मी संपूर्णपणे ब्रह्मचर्य पाळणार आहे. त्याच्या आड तू येऊ नको.'' हे पतीचे शब्द ऐकताच तरुण इंदिरेला धक्काच बसला. आपला पति करारी आहे हे तिला माहीत होते. आपण काय करू शकणार असा विचार करून ती गप्प बसली. तेव्हा श्रीमामा तिला म्हणाले, ''बाईगं, तुला कोटणीसमहाराजांचा अनुग्रह आहे. त्याप्रमाणे तूही साधन करीत रहा.ते जर जमले नाही तर तुकाराममहाराजांचे बारा अभंग रोज तेरा वेळा म्हणत जा. अशाप्रकारे आपण दोघेही परमार्थ करू. तुझेही परमार्थाने कल्याणच होईल.'' आपल्या पतीचे हे शब्द सौ. इंदिराबाईंनी चांगलेच लक्षात ठेवले आणि त्या आमरण हे बारा अभंग रोज तेरा वेळा म्हणत राहिल्या.

***

## प्रकरण–५

# रामनाम पुरश्चरण, रामसीतांचे आगमन व हनुमत् साक्षात्कार

**(इ. स. १९२३-१९२४)**

श्रीमामांची सिटी हायस्कूलमधील नोकरी चालू होती. आणि त्याच काळात राम या पुत्राचा जन्म होण्यापूर्वी श्रीमामांनी रामनामाचे एक पुरश्चरण केले होते. समर्थ रामदास स्वामींनी आपल्या दासबोध या ग्रंथराजात तेरा कोटि रामनामाच्या पुरश्चरणाचा उल्लेख केला आहे. आपल्या दैनंदिन व्यवहारात जितके जमेल तितके पुरश्चरण करावे, असा विचार करून श्रीमामांनी प्रथम साडेतीन कोटि रामनामाचे पुरश्चरण सुरू केले होते आणि ते यथावकाश तडीस गेले होते. या पुरश्चरणाने श्रीमामांना परमार्थातला कोणता अनुभव आला याची नोंद नाही. तथापि श्रीमामांना रामाचा सगुण साक्षात्कार झाला असावा असे अनुमान पुढील घटनेवरून करता येते :-

अनंतराव म्हसकर हे श्रीमामांचे बालपणापासूनचे स्नेही. ते एकदा काही कारणास्तव जमखिंडी या कर्नाटकातील गावी गेले होते. तेथे असताना त्यांना एका उपेक्षित जागी राम आणि सीता यांच्या सुंदर मूर्ति सापडल्या. आपले मित्र बापूराव केळकर हे श्रीरामाचे भक्त आहेत, हे त्यांना माहीत होते. त्यांना या मूर्ति द्याव्यात असे त्यांच्या मनात आले. त्याप्रमाणे त्यांनी श्रीमामांना सविस्तर पत्र घालून 'या मूर्ति आपण स्वीकाराल काय?' अशी पृच्छा केली. श्रीमामांनी नुकतेच ३।। कोटि रामनामाचे पुरश्चरण संपविले होते. त्याचे सगुण दृश्य फळ म्हणजे रामसीतेच्या या मूर्तींची मित्राने देऊ केलेली देणगी, असे श्रीमामांना वाटले. श्रीमामांनी तत्काळ अनंतरावांना पत्राने होकार कळविला. इकडे

अनंतरावांनी मूर्तींना स्नान वगैरे घालून त्या स्वच्छ करून ठेवल्या होत्या. आता या मूर्ति सांगलीस कशा न्यावयाच्या हा प्रश्न होता. तो प्रश्न असा सुटला:- सांगलीत श्रीमामांचे खाडिलकर नावाचे एक स्नेही होती. त्यांना मामांची समस्या कळली. तेव्हा ते श्रीमामांना म्हणाले, ''बापू, तू अजिबात काळजी करू नकोस. तुला रामसीतेच्या मूर्ति प्राप्त होत आहेत ही फारच चांगली गोष्ट आहे. कारण तुझ्या घरी रामसीतेच्या मूर्ति नाहीतच. आता मी असे करतो. मी स्वत:च जमखिंडीला जातो. आणि सोवळे नेसून, या मूर्ति डोक्यावर घेऊन, चालत चालत मी सांगलीस घेऊन येतो आणि तुझ्या घरी पोचवितो. तू अजिबात चिंता करू नको.'' श्रीमामांनी त्याचे म्हणणे मान्य केले. नंतर म्हटल्याप्रमाणे खाडिलकरांनी त्या मूर्ति मामांच्या घरी आणल्या. श्रीमामांनी त्या मूर्तींचे यथोचित स्वागत केले आणि त्यांना साष्टांग नमस्कार केला. मग त्यांनी खाडिलकरांचे आभार मानले. नंतर त्या मूर्तींची स्थापना करण्यास त्यांनी एक मोठा देव्हारा तयार करून घेतला. तो देव्हारा आपल्या घराच्या सोप्याच्या जवळ जवळ मध्यभागी ठेवला आणि त्या देव्हाऱ्यात शास्त्रोक्त पद्धतीने त्या मूर्तींची प्रतिष्ठापना करवून घेतली. मग ते रोज या मूर्तींची यथासांग पूजा करू लागले आणि नंतर त्यांनी 'रामनवमी' साजरी करण्यास प्रारंभ केला. (गोस्मृ. पृ. १०)

अशाप्रकारे पारमार्थिक साधन आणि सगुण उपासना यात श्रीमामांचा काळ जात होता. राम बाळही इकडे मोठा होत होता. त्या स्थितीत इ. स. १९२३ हे वर्ष उजाडले. श्रीमामांचे प्रत्यक्ष उपदेशगुरू जरी नारायणमहाराज यरगट्टीकर होते, तरी मामा मनोमनी तात्यासाहेब कोटणीसमहाराजांनाच गुरू मानीत होते. तेव्हा आपल्या कोटणीस गुरूंना आपल्या घरी भोजनास बोलवावे असे श्रीमामांना वाटले. मग वडिलांची अनुमति घेऊन ते कोटणीसमहाराजांच्या घरी गेले. तात्यासाहेबमहाराज माडीवर आहेत असे त्यांना सांगण्यात आले. श्रीमामा माडीवर गेले. त्यांनी कोटणीसमहाराजांना नमस्कार केला. आणि ते हात जोडून म्हणाले, ''महाराज, येत्या रविवारी आपण आमच्या घरी भोजनास यावे, अशी



विनंति करण्यास मी आलो आहे. आपण येण्याची कृपा करावी.'' कोटणीसमहाराजांची श्रीमामांचेवर मर्जी होतीच. ते वेळ न दवडता श्रीमामांना बोलले, ''मी जरुर येतो. आता तुम्ही इतर कुणाला स्वतंत्रपणे बोलवू नका. ज्या एक दोघांना आणावयाचे आहे त्यांना घेऊनच मी येईन. तुम्ही काळजी करू नका.'' महाराजांनी आपले आमंत्रण स्वीकारले याचा श्रीमामांना अतिशय आनंद झाला. आनंदाच्या तंद्रीतच ते घरी परतले आणि ''महाराज येत्या रविवारी आपल्याकडे भोजनास येणार'' असे त्यांनी नाना व सौ. इंदिरा यांना सांगितले. त्यांनाही आनंद झाला. इंदिराबाई रविवारी करावयाच्या तयारीला लागल्या.

भोजनाला ठरविलेला रविवार आला. सकाळीच सौ. इंदिरा मातेने तीन वर्षाच्या रामला सांगितले, ''रामजी, आज कोटणीसमहाराज आपल्या घरी जेवावयास येणार आहेत. त्यावेळी तू काही गडबड करू नको.'' रामजीने हो म्हटले. सौ. इंदिराबाईंनी भोजनाची सर्व तयारी सिद्ध केली. आपले मेहुणे शामराव कुलकर्णी, बंधु पुंडुकाका कोटणीस आणि नानबा फडणीस यांच्या सह दुपारी ११-३० च्या सुमारास कोटणीसमहाराज श्रीमामांच्या घरी आले. त्यांना नमस्कार वगैरे झाल्यावर घरच्या सोप्यात सर्वांची पाने मांडली गेली. ताटाखाली पाट, बसावयास पाट, आणि मागे टेकावयास पाट अशी व्यवस्था केलेली होती. भोजनाचा थाट मस्त होता.

वाढिले पुरणपोळीला । श्रीखंडाचा गडवा ठेविला ।
बासुंदीचा भरला पेला । सर्वासाठी ।।
शिरा लाडू बेसन बुंदी वाढले । कोशिंबिरी भाज्या आले ।
सांडगे पापड वडे भले । ताटामाजी घातले ।

मुख्य म्हणजे साईसकट दह्याची वाटी सर्वांपुढे ठेवली होती. नंतर
'वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे । सहज हवन होते नाम घेता फुकाचे ।
जीवन करी जीवित्वा अन्न हे पूर्ण ब्रह्म । उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ।'
हा श्लोक आणि सीताकांत स्मरण, जय जय राम हे शब्द उच्चारल्यानंतर

कोटणीसमहाराज व त्यांचे सहकारी यांचे भोजन सुरू झाले.

भोजन चालू असताना हात जोडून कोटणीसमहाराजांना उद्देशून अनंतरावांनी पुढील श्लोक म्हटला :-

जनी रामसेवा मनी रामसेवा । तया रामनामी जयाला विसावा ।
हनूमंत हे नाम साजे जयाला । नमस्कार साष्टांग माझा तयाला ।

नानांचा श्लोक झाल्यावर, हात जोडून, श्रीमामांनी कोटणीसमहाराजांना उद्देशून पुढील श्लोक उच्चारला :-

सदा सर्वदा योग तुझा घडवा । तुझे कारणी देह माझा पडावा ।
उपेक्षू नको गुणवंता अनंता । रघूनायका मागणे हेचि आता ।

श्रीमामांचा हा श्लोक ऐकल्यावर अखंड रामनाम स्मरणाचा आदेश देणारा पुढील श्लोक श्रीमामांना उद्देशून कोटणीसमहाराजांनी उच्चारला :-

बुडो ही धरा की लया विश्व जावो । पडो काळ हस्ते शिरी वज्र घावो ।
विसंबू नको सर्वथा नाममाळा । मुखी रामचंद्र स्मरा वेळोवेळा ।

या श्लोकाद्वारे कोटणीसमहाराजांनी आपणांस यथोचित उपदेश केला आहे हे श्रीमामांनी मनात ओळखले आणि त्यानंतरच्या काळात श्रीमामांनी त्या उपदेशाचे पालनही केले. पुढील आयुष्यात जेव्हा जेव्हा संकटे आली तेव्हा तेव्हा त्यांनी ''राम'' नाम सोडले नाही. इतकेच नव्हे तर शेवटच्या दुखण्यात सर्व नाड्या सुटलेल्या असताना सुद्धा ''श्रीराम जयराम जय जय राम'' या तेरा अक्षरी मंत्राचा तार स्वरात उच्चार केला.

यथेच्छ भोजन झाल्यावर त्या सर्वांना बैठकीवर बसविण्यात आले आणि त्या सर्वांना विडे देण्यात आले. विडे असे होते :-

मघई पाने घेतली करी । गुलाबी चुना लावला वरी ।
चूर्ण केलेली सुपारी । कापूरात घोळलेली ।।
काताची पूड घातली । जायफळ जाय पत्री भली ।
कस्तुरी मध्ये ठेविली । आणि केशर ।।



विडा चघळत असताना कोटणीसमहाराज श्रीमामांना म्हणाले, ''अहो बापूराव, तुमच्या मुलाला मी कुरुंदवाडला पाहिले होते. तो कुठे दिसत नाही.'' तेव्हा श्रीमामांनी 'राम'ला पुढे बोलावले आणि कोटणीसमहाराजांना नमस्कार करण्यास सांगितले. रामने महाराजांच्या पायावर मस्तक ठेवले आणि तो उभा राहून महाराजांचेकडे पाहू लागला. तेव्हा त्याला जवळ घेऊन, ''किती मोठा झालास रे, राम'' असे म्हणून त्यांनी त्याला कुरवाळले. यावेळी कोटणीसमहाराजांची जी मूर्ति रामाला दिसली ती त्याने कायम आपल्या मनात साठवून ठेवली.

कोटणीसमहाराजांची निघण्याची वेळ झाली. जाण्यापूर्वी महाराजांनी बापूरावांना एक सूचक प्रश्न केला, ''बापूराव, आता ज्या शाळेत तुम्ही शिक्षक आहात, ती शाळा केव्हा सुटते?'' ''माझी शाळा संध्याकाळी पाच वाजता सुटते.'' श्रीमामांनी उत्तर दिले. तेव्हा कोटणीसमहाराज म्हणाले, ''बापूराव, संध्याकाळची पाच ही वेळ तुम्हाला चांगली आहे''. महाराजांच्या या वाक्यातला गर्भित अर्थ तेव्हा कळला नाही. पण पुढे तो कळला. श्रीमामांनी पुढे आपले नित्य कीर्तन सुरू केले आणि ते बरोबर संध्याकाळी ५ वाजताच. आणि अशाप्रकारे कोटणीसमहाराजांचे शब्द खरे ठरले.

यानंतर कोटणीसमहाराज फार काळ या भूतलावर राहिले नाहीत. इ. स. १९२४ च्या जानेवारी महिन्याच्या २७ तारखेला, पौष वद्य षष्ठी शके १८४५ या दिवशी रविवार होता. याच दिवशी संध्याकाळी पाचला तात्यासाहेब कोटणीसमहाराजांनी महानिर्वाण केले. सर्व भक्त शोकसागरात बुडाले. तितक्यात सांगलीत एक वार्ता अशी पसरली की काशी क्षेत्रात तात्यासाहेब कोटणीसमहाराजांनी कीर्तन केले. ही वार्ता कोटणीसांचे भक्त अनंतराव म्हसकर यांचे कानी आली. ते श्रीमामा या आपल्या बालमित्राकडे आले आणि विचारू लागले, ''बापू, कोटणीसमहाराजांनी देह ठेवल्यावर काशी क्षेत्री कीर्तन केले असे लोक म्हणत आहेत. ते खरे असेल काय?'' ''ब्रह्मरूप झालेल्या महात्म्यांना काय अशक्य आहे'' असा प्रतिप्रश्न श्रीमामांनी अनंतरावांना केला. तेव्हा अनंतराव गप्प बसले. अनंतराव गप्प

बसले खरे पण श्रीमामांच्या मनात नाही म्हटले तरी शंकेची पाल चुकचुकत राहिली की खरेच कोटणीसमहाराजांनी निर्वाणानंतर काशीत कीर्तन केले असेल काय?

वरील प्रश्नोत्तरे झाली तेव्हा इ. स. १९२४ सालचा माघ महिना चालू झालेला होता. माघ महिन्याच्या वद्य पक्षात रात्री दासबोधपारायणाचा कार्यक्रम श्रीमामा करीत असत. हा त्यांचा कार्यक्रम घरातल्या सोप्यावर चाले. हा कार्यक्रम करण्याचे कारण असे दिसते :- माघ वद्य प्रतिपदेला श्रीमामांच्या सख्ख्या आईची पुण्यतिथी असे तर माघ वद्य दशमीला श्रीमामांच्या सावत्र आईची पुण्यतिथी असे. बहुधा या दोघी आयांच्या स्मरणार्थ श्रीमामा रात्री माघ वद्य प्रतिपदा ते माघ वद्य दशमी या काळात दासबोधाचे वाचन करीत (अकी,पृ.३३).

इ. स. १९२४ सालच्या माघ वद्य प्रतिपदेचे दासबोधाचे वाचन श्रीमामांनी केले होते. माघ वद्य द्वितीयेचे दासबोधाचे वाचनही श्रीमामांनी पूर्ण केले होते. आता माघ वद्य तृतीया उजाडली होती. वार शुक्रवार होता. याच दिवशी श्रीमामांची अनंतरावांशी प्रश्नोत्तरे झाली होती. माघ वद्य तृतीया शुक्रवार या रात्री श्रीमामांनी आपले दासबोध वाचन सुरू केले होते. आणि त्यांचेपुढे साक्षात् तात्यासाहेब कोटणीसमहाराज प्रगट झाले.

प्रकाशाच्या झगझगाटात तात्यासाहेब कोटणीसमहाराजांची देहधारी मूर्ति श्रीमामांच्या पुढे आविर्भूत झाली. श्रीमामांचे त्यांच्याकडे लक्ष गेले पण त्यांना वाटले की आज आपण अनंतराव म्हसकरांबरोबर तात्यासाहेबमहाराजांविषयी बोलत होतो. त्यामुळेच कदाचित् आपल्या डोळ्यांपुढे तात्यासाहेबांची मूर्ति दिसली असेल. अशी मनाची समजूत घालून, श्रीमामा पुनः मान खाली घालून दासबोध वाचू लागले. थोड्या वेळाने श्रीमामांची दृष्टि पुनः वर गेली तो कोटणीसमहाराज तसेच ताटकळत उभे आहेत असे त्यांना दिसले. मग मात्र श्रीमामांच्या लक्षात आले की तात्यासाहेबमहाराजांचा हा आविष्कार हा भास



नसून, कोटणीसमहाराज खरोखरच आपल्यापुढे देहधारी रूपात साक्षात् प्रगट झाले आहेत. ही खात्री पटताच श्रीमामा चट्दिशी उठले आणि त्यांनी शेजारच्या भिंतीतील खुंटीवर असणारी शालजोडी कोटणीसमहाराजांना बसण्यास आसन म्हणून दिली व त्या आसनावर बसण्यास कोटणीसमहाराजांना सांगितले.महाराज शालजोडीवर आसनस्थ झाले. मग श्रीमामांनी विचारले, ''मी दासबोध पुढे वाचू का?''महाराजांनी मानेनेच होय म्हणून खूण केली. तेव्हा श्रीमामांनी दासबोध वाचन पुढे सुरू केले. तीन तास झाले. श्रीमामांचे त्या दिवसाचे दासबोधवाचन पूर्ण झाले. ते सर्व महाराज शांतपणे ऐकत बसले होते. मग दासबोध गुंडाळून, श्रीमामांनी कोटणीसमहाराजांचे चरण घट्ट पकडले, त्यांवर मस्तक ठेवले आणि म्हणाले, ''महाराज, मी माघ वद्य प्रतिपदेपासून कीर्तन करण्यास प्रारंभ केला आहे. आपल्या नित्य कीर्तनाप्रमाणे माझे हातून नित्य कीर्तन घडावे अशी इच्छा आहे. आपण तसा आशीर्वाद दिलात तर ते कार्य माझे हातून तडीस जाईल.'' कोटणीसमहाराजांनी कृपादृष्टीने श्रीमामांकडे पाहिले आणि म्हटले, ''बापूराव, तुमचे कीर्तन शेवटपर्यंत अखंड चालेल असा माझा तुम्हाला आशीर्वाद आहे.'' असा आशीर्वाद देऊन कोटणीसमहाराज अदृश्य झाले.

कोटणीसमहाराजांच्या या साक्षात्काराचा गाजावाजा श्रीमामांनी केला नाही. पण त्यांनी आपले जीवश्च कंठश्च मित्र अनंतराव म्हसकर यांना मात्र ही गोष्ट सांगितली. त्यांचेकडून बहुधा ही गोष्ट दुसऱ्या एका गृहस्थाला कळली. या गृहस्थाने कोटणीसमहाराजांच्या चरित्राला उपयोगी पडतील अशी काही टाचणे लिहून ठेवली होती. त्यांत त्याने श्रीमामांना झालेल्या साक्षात्काराची नोंद करून ठेवली होती. इ. स. १९३७ साली राजकवि साधुदास यांनी जेव्हा कोटणीसमहाराजांचे चरित्र लिहिण्यास सुरवात केली तेव्हा त्यांच्या लेखन सामग्रीत ही टाचणे होती. त्याचा उपयोग साधुदासांनी केला आणि हा प्रसंग त्यांनी पुढीलप्रमाणे कोटणीसमहाराजांच्या चरित्रात दिला :-

''रा. गोविंद अनंत केळकर या नावाचे हणमंतरावजींचे एक प्रेमळ शिष्य सांगली येथे राहतात. एका रात्री ते दासबोध वाचीत बसले असता, आपल्यापुढे हणमंतरावजी एकदम प्रगट झाल्याचा त्यांना भास झाला. त्यांना आसन देण्याकरता केळकर यांनी इकडे तिकडे नजर टाकली. तो खुंटीवर शाल जोडी त्यांना दिसली. तीच त्यांनी हणमंतरावजींना बसावयास दिली. हणमंतरावजी त्या आसनावर बसले आणि केळकर पोथी वाचू लागले. वाचन पुरे झाल्यावर केळकरांनी हणमंतरावांना विचारले ''आपले गुणानुवाद गाण्यास कीर्तन करण्याची इच्छा आहे. करीत जाऊ का?'' हा प्रश्न विचारून केळकरांनी हणमंतरावजींच्या पायांवर मस्तक ठेवताच हणमंतरावांनी केळकरांच्या डोक्यावर दोन्ही हात ठेवले केळकर उठून उभे राहिले. हणमंतरावांनी त्यांना नेत्रसंकेताने कीर्तन करण्याची अनुज्ञा दिली आणि ते तत्काळ अदृश्य झाले.''

श्री. साधुदासांच्या या लेखनात 'भास' असा शब्द आहे. तो बरोबर नाही. कारण हा भास नसून प्रत्यक्ष साक्षात्कार होता. आणखी असे :- इ. स. १९२४ पासून श्रीमामांनी नित्य कीर्तन सुरू केले आणि ते इ. स. १९३७ पर्यंत चालू होते याचा निर्देश साधुदासांनी करावयास हवा होता. काही का असेना या साक्षात्कारावरून दोन गोष्टी सिद्ध होतात. एक म्हणजे तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे अद्‌भुत सामर्थ्य आणि दुसरी गोष्ट म्हणजे ज्यांच्यासाठी कोटणीसमहाराज साक्षात् प्रगट झाले ते श्रीमामा परमार्थात अत्यंत अधिकारसंपन्न होते.

साधुदासांनी लिहिलेल्या कोटणीसमहाराजांच्या चरित्राची सुवाच्य प्रत श्री.गणपतराव कानिटकर करत होते. ते त्यावेळी श्रीमामांच्या घरी रहात होते. त्यांनी वरील प्रसंग श्रीदादांना सांगितला. इ. स. १९२४ साली श्रीदादा फक्त चारच वर्षाचे असल्याने मामा त्यांना काही बोलले नव्हते. गणपतरावांचेकडून माहिती कळताच, त्यांनी श्रीमामांचेकडून सर्व प्रसंगाची हकिकत जाणून घेतली. तेव्हा श्रीमामांच्या नित्य कीर्तनाचे मागे कोटणीसमहाराजांचा आशीर्वाद आहे,



हे इतरांना कळावयास हवे असे श्रीदादांना वाटू लागले. आणि त्यासाठी माघ वद्य १ ते माघ वद्य ३ या काळात समारंभ करून हा साक्षात्कार श्रोत्यांना सांगावा अशी प्रेरणा श्रीदादांना झाली. आणि मग त्याच १९३७ सालापासून हा तीन दिवसाचा कार्यक्रम श्रीदादांनी सुरू केला. त्यामध्ये माघ वद्य तृतीये दिवशी रात्री कीर्तन करून कोटणीसमहाराज श्रीमामांचे पुढे प्रगट झाले हे सांगण्याचे श्रीदादांनी निश्चित केले.

कोटणीसमहाराजांच्या प्रगट काळाचा हा सोहळा साजरा करण्यास घरच्या सोप्यावर बरीच आरास करण्यात आली., ती करण्यात गणपतराव कानिटकर, वासुदेराव अभ्यंकर, नेमगोंडा पाटील इत्यादि भक्त मंडळींनी पुढाकार घेतला. या पहिल्या प्रगट सोहळ्यात तीन दिवस पुढीलप्रमाणे कार्यक्रम झाले :-

माघ वद्य प्रतिपदा (गुरुप्रतिपदा) :- सकाळी पूजा, आरती, पोथी वाचन, दुपारी चारचे सुमारास ज्ञानेश्वरी पठण, मग श्रीमामांचे नित्याचे कीर्तन, कीर्तनोत्तर पालखी, नंतर पंचपदी. रात्री दहानंतर निंबरगीकरमहाराज, चिमडमहाराज, कोटणीसमहाराज, बाबूरावजी कोटणीस यांची पदे म्हणण्यात आली. दोन पदांच्या दरम्यान् थोडे थोडे भजन केले जाई.

माघ वद्य द्वितीया (गुरुद्वितीया) :- सकाळी पूजा, आरती, पोथीवाचन; दुपारी ज्ञानेश्वरीचे पठणानंतर श्रीमामांचे नित्याचे कीर्तन, रात्री गोपाळकाका, कोटणीस यांचे कीर्तन. हे कीर्तन गोपाळकाकांनी आपणहून स्वेच्छेने केले.

माघ वद्य तृतीया (गुरुतृतीया) :- सकाळी पूजा, आरती, पोथी वाचन; दुपारी बारा वाजता महाप्रसाद करण्यात आला. या महाप्रसादास बाबूरावजी कोटणीस, गोपाळकाका कोटणीस आणि नानबा फडणीस हे उपस्थित होते. दुपारी ३-३।। वाजता ज्ञानेश्वरीचे वाचनानंतर श्रीमामांचे नित्याचे कीर्तन झाले. कीर्तनोत्तर गोपाळकाका कोटणीसांचे ज्ञानेश्वरीवर प्रवचन झाले. प्रवचनानंतर लगेच रथ काढण्यात आला, तसेच पालखीही काढण्यात आली. हा सोहळा रात्री ८।। पर्यंत चालला. या सोहळ्यात गंगाधरराव सिंग, पुंडुकाकांचे चिरंजीव

वामनराव कोटणीस, सोनोपंत लागू, अनंतराव म्हसकर इत्यादि मंडळी उपस्थित होती. रात्री ९ ।। ते १२ पर्यत श्रीदादांचे प्रगट काळाचे कीर्तन झाले. या कीर्तनात श्रीदादांनी श्रीमामांच्या पुढे कोटणीसमहाराज प्रत्यक्ष प्रगट होण्याचे सविस्तर वर्णन केले. या कीर्तनास गणपतराव कानिटकर, श्री. भिरंगी, श्री.दाणेकरी इत्यादि लोक उपस्थित होते. कीर्तनानंतर पंचपदी होऊन हा सोहळा समाप्त झाला.

गुरुतृतीयेच्या पहिल्या कीर्तनास श्रीदादांनी तुकाराममहाराजांचा 'रत्नजडित सिंहासन । वरी बैसले आपण ।।१ ।। कुंचे ढाळिती दोही बाही । जवळी राही रखुमाई ।।२ ।। तेथे नाना उपचारी । रिद्‌धि सिद्‌धि ते कामारी ।।३ ।। हाती घेवोनि पादुका । उभा बंदीजन तुका ।।४।।'' हा अभंग विवरणास घेतला. तोच अभंग या कार्यक्रमात घेण्याची प्रथा आजतागायत चालू आहे.

हळुहळु गुरुतृतीयेच्या सोहळ्याच्या कार्यक्रमात बदल होत गेले. उदा. गुरु तृतीयेच्या दिवशी संध्याकाळी बाबूरावजी कोटणीसांचे कीर्तन काही वर्षी झाले. रात्रीचे श्रीदादांचे कीर्तनात प्रगटकाळी देवाला व इतरांना गुलाबपाणी शिंपडणे आणि अत्तर लावणे हे कार्यक्रम होऊ लागले. इ. स. १९४० साली श्री. बाबू भोपळे या श्रीदादांच्या मित्रांचे काही स्नेही श्रीदादांचे मुख्य कीर्तनानंतर १-३ या काळात दिमडीवरचे एकतारीचे भजन करू लागले. इ.स. १९४३-४४ च्या गुरुतृतीयेदिवशी श्रीदादांच्या कीर्तनानंतर मौजच झाली. बाबू भोपळे याची मित्र मंडळी आणि पांडुरंगमहाराज ताम्हनकर यांची शिष्यमंडळी एकाच वेळी भजनास आली. तेव्हा सोप्यावर एकाचे भजन आणि अंगणात दुसऱ्याचे भजन असा थाट झाला. पुढे बाबू भोपळे यांचे भजन करणारे स्नेही इतस्ततः पांगले, मग त्यांचे भजन बंद पडले. तथापि पांडुरंगमहाराजांचे शिष्य येतच राहिले. रात्री १ ते ३ या काळात त्यांचे दिमडीवरचे भजन होई.

गुरुतृतीयेच्या श्रीदादांच्या कीर्तनात बरोबर रात्री बारा वाजता कोटणीस महाजांच्या प्रगट होण्याची वेळ लक्षात घेऊन, गुलालाने माखलेली फुले उधळली



जाऊ लागली. नंतर ''हनुमंता घ्या मज पदरी । आता आलो शरण तुला ।।'' हे भजन चालू असताना देव व श्रोते यांना अत्तर लावून गुलाबपाणी शिंपडले जाऊ लागले. नंतर श्रीदादांचे पुढील पद म्हटले जाते :-

गुरू तृतीया ही गोड किती होय सुखाची ।
जरी गाई कुणी गुणकीर्ती तृप्ति मनाची ।।१ ।।
हनुमत् प्रभुमहाराज मंदिरी उभा ।
नवल प्रभा दिपवी नभा प्रगटली आभा।
शोभा ही काय वर्णू आज येथीची ।।

याचवेळी अंगणात सनई व चौघडा वाजत असतो. हा कार्यक्रम सुमारे १२ ।। वाजता संपतो. त्यानंतर उपस्थितांना शेंगदाण्याची उसळ अथवा साबुदाण्याची खिचडी तसेच कॉफी-चहा दिला जातो. त्यानंतर रात्री १-३ पर्यंत एकतारी भजन होते.

गुरुतृतीयेचा वरीलप्रमाणे कार्यक्रम इ. स. १९४८ पर्यंत चालू होता. पण या वर्षी एक महत्त्वाचा बदल झाला. इ. स. १९४८ मध्ये म. गांधीवधानंतर सांगलीत जाळपोळ झाली. त्यामुळे रात्रीची संचारबंदी लागू होती. त्यामुळे रात्री ३ नंतर श्रोतेमंडळींना घरी परत जाणे शक्य नव्हते. तेव्हा श्रीदादांनी ठरविले की गुरुतृतीयेचा हा कार्यक्रम सकाळी ६ पर्यंत चालू ठेवावयाचा. त्यासाठी ३-३ ।। नंतर भजन संपताच श्रीमामांच्या हनुमद्‌गुरूचरित्रबोधसार या ग्रंथाचे पठण करावयाचे. हे पहिले पठण श्री. विनायकराव कानिटकर यांनी केले. त्यानंतर रथ, पंचपदी होऊन हा कार्यक्रम ६ वाजता संपला. इ. स. १९४८ नंतर आजतागायत गुरुतृतीयेच्या कार्यक्रमाची हीच पद्धत चालू आहे. पुढे विनायकराव कानिटकरानंतर नारायणराव वाटवे, नंतर प्रकाश भावे, त्यांचे नंतर सध्या मोहन भावे हे चरित्र पठण करू लागले.

गुरुतृतीयेला कोटणीसमहाराजांनी जी नित्य कीर्तनाची आज्ञा दिली, ती आपल्या पुरती मर्यादित नसून, ती आपल्या घराण्यातील पुरुषांचे साठी आहे

अशी श्रीमामांची धारणा होती. म्हणून श्रीमामा श्रीदादांना सांगत ''रामजी, तुझी प्रकृति अशक्त आहे. तरी माझ्यानंतर तू ही नित्य कीर्तनाची परंपरा चालूच ठेव. तुला समजा २-२।। तास कीर्तन करणे जमले नाही, तरी तू पाच मिनिटे का होईना हा नित्य कीर्तनाचा नेम चालू ठेव.'' श्रीमामांच्या या धारणे सारखीच श्रीदादांचीही धारणा होती. म्हणून ते आपल्या अभंगातून सांगतात :-

दासरामा ऐसे लाभले वतन । हरिकीर्तन हे आमुची मिरासी ।।
हरिकीर्तन हे आम्हासी सनद । दिलेसे ते वतन भोगवटा ।।
हनुमंत भगवान आज्ञापिती आपण । ते हे हरिकीर्तन आमुचे वंशी ।।
कीर्तनाची परंपरा । आली माझिया घरा ।।

अशी धारणा असल्याने श्रीमामांचे निर्वाणानंतर श्रीदादांनी ही नित्य कीर्तनाची परंपरा आपल्या निर्वाणापर्यंत चालू ठेवली. ते कीर्तनात सांगत ''माझ्यानंतर चंद्रशेखर हा नित्य कीर्तन करीत राहील.'' त्याप्रमाणे श्रीदादांच्या निर्वाणानंतर त्यांचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ चिरंजीव श्री. चंद्रशेखर अण्णा गेली दहा वर्षे नित्य कीर्तन करीत आहेत.

***

## प्रकरण–६

## श्रीमामांच्या कीर्तनाविषयी

**(इ. स. १९२४-१९२५)**

माघ वद्य तृतीयेला (इ. स. १९२४) श्रीमामांना नित्य कीर्तन करण्याची कोटणीसमहाराजांची आज्ञा झाली होती. तत्पूर्वी माघ वद्य प्रतिपदेला श्रीमामांनी कीर्तन केले होते. या कीर्तनापूर्वी श्रीमामांनी आपल्या गोपाळ रानडे या विद्यार्थ्याला म्हटले, ''गोपाळा, मी आज कीर्तन करणार आहे. तू येशील का ऐकायला?'' ''आनंदाने येईन'' असे गोपाळ म्हणाला. श्रीमामांच्या घराच्या अंगणात हे कीर्तन झाले. श्रीमामांच्या गळ्यात वीणा आणि हातात चिपळ्या होत्या. निरुपणाचा अभंग होता ''रामकथारस पी पी प्राण्या ।।'' कीर्तन चांगलेच रंगले. पुढे श्रीमामा रोज कीर्तन करीत आहेत हे कळल्यावर अनेक श्रोते जमू लागले.

पुढे श्रीमामांच्या लक्षात आले. राममंदिरात रामसीतेच्या मूर्ति आपण स्थापन केल्या आहेत. अंगणात आपणापुढे देव नाही. तेव्हा आता आपण राममंदिरात रामसीतेच्या देव्हाऱ्यापुढेच कीर्तन करावे. तसे त्यांनी सुरू केले. देव्हाऱ्याच्या बाजूला काचेच्या झुंबरात रॉकेलचे दिवे लावण्याची व्यवस्था केली. सोप्यावर उजेड हवा म्हणून देव्हाऱ्या शेजारच्या उत्तरेकडील खांबावर रॉकेलचा काचेचा दिवा लावून घेतला. आणि वेळप्रसंगी उपयोगी पडावी म्हणून देव्हाऱ्याच्या पुढे एक अग्निही बसवून घेतली. रॉकेलचे दिवे वापरण्याचे कारण त्यावेळी श्रीमामांच्या घरात वीज नव्हती. विशेष दिवशी रथ आणि पालखी काढता यावी म्हणून श्रीमामांनी एक पालखी करवून घेतली आणि महादेव भटजीकडून तीन टप्प्यांचा रथ बनवून घेतला. साहजिकच रथ व पालखी यांचे वेळी आवश्यक म्हणून दोन

चवऱ्या आणि एक अबदागीरही श्रीमामांनी तयार करवून घेतली.

श्रीमामा स्वत:च कीर्तनापूर्वी सोपा झाडून घेत, बैठकीची व्यवस्था करीत आणि आरतीत वाती भरीत. कीर्तनोत्तर प्रसादासाठी चुरमुरे व लाह्या यांचीही श्रीमामांनी सोय केली.

देवापुढे उभे राहून, श्रीमामा उभे राहून गळ्यात वीणा व हातात चिपळ्या धरून प्रथम कीर्तन करीत होते. काही काळाने त्यांना रक्तदाबाचा विकार जडला. उभे राहून कीर्तन करणे त्यांना अशक्य झाले. तेव्हा त्यांनी बसण्यासाठी एक खुर्ची तयार करवून घेतली आणि मग खुर्चीवर बसून ते कीर्तन करू लागले. या स्थितीत ते हातांत फक्त चिपळ्या वा झांज घेत. पुढे तबलजी मिळाल्यावर त्यांनी तबला तयार करून घेतला आणि पेटी वाजविणारा मिळाल्यावर बाजाची पेटी विकत घेतली. कीर्तनात काही श्रोते टाळ्या वाजवून ठेका धरीत. हे पाहून त्यांच्यासाठी श्रीमामांनी झांजा आणवून घेतल्या.

दिवाबत्ती, प्रसाद, आरती इत्यादीचा स्वत:च खर्च करून कीर्तन करणारे श्रीमामा हे कोटणीसमहाराजांच्या नंतरचे दुसरे कीर्तनकार होते. या कीर्तनासाठी बिदागी नव्हती हे सांगण्याची जरुरी नाहीच.

श्रीमामांच्या कीर्तनात नेहमी साथीदार असतच असे नाही. क्वचित श्रोतेही आलेले नसत. त्यामुळे तबला व पेटी आणि झांजेची साथ आणि श्रोते नसतानाही श्रीमामांचे कीर्तन सुरू होई. घड्याळात पाचाचे ठोके पडले की श्रीमामा कीर्तनास प्रारंभ करीत.

श्रीमामांच्या घरात वीज नसल्याने विजेचा पंखा नव्हता. मामांच्या सोप्यावर उन्हाळ्यात अतिशय उकाडा होई. श्रीमामा अगदी घामाघूम होत. हे पाहून मुकुंद रानडे यांनी असे केले :- सोप्याच्या तक्तपोशीला चाक बसवून, त्यावरून दोरी ओढून, दोरीच्या दुसऱ्या टोकाला लावलेला पंखा हलवून ते श्रीमामांना वारा घालीत. या सेवेचे फळ म्हणून रानडे यांचा दमा बरा झाला. त्यांना सांगलीच्या वॉटर वर्क्स मध्ये नोकरी मिळाली. पुढे वारा घालण्याची ही पद्धत बंदच झाली.



(अकी. पृ. ६०)

श्रीमामांनी कीर्तन करण्यास प्रारंभ केला आहे हे गंगाधर सिंग यांना कळले. ते कोटणीसमहाराजांचे भक्त. त्यांनी आपल्या जागेतील कोटणीसमहाराजांच्या दहनभूमीवरच हनुमान समाधि मंदिर उभे केले होते. ते पौष वद्य प्रतिपदा ते पौष वद्य षष्ठी या काळात कोटणीसमहाराजांच्या पुण्यतिथीचा उत्सव करीत. ते श्रीमामांच्या कडे आले आणि म्हणाले, ''बापूराव, माझ्या हनुमान समाधि मंदिरात तुम्ही सहाही दिवस कीर्तन करावे.'' त्यांची ही सूचना मामांना फारच आवडली. ''ज्यांनी आपणांस नित्य कीर्तनाची आज्ञा दिली त्यांच्या साक्षात् समाधीपुढे आपणास कीर्तन करावयास मिळणार'' या गोष्टीचा श्रीमामांना हर्ष झाला आणि त्यांनी तशी कीर्तने करण्यास प्रारंभ केला.

याच सुमारास सांगली जवळच्या बुधगाव या गावी गुंडुबुवा नावाचे विदेही संत रहात होते. श्रीमामांच्या समाधिमंदिरातील कीर्तनास ते कधी कधी येत आणि कीर्तनात रंगून जाऊन नाचू लागत. तेव्हा काही लोक म्हणाले, ''एक वेडा कीर्तनात नाचतो हे श्रीमामांना कसे चालते?'' हे बोलणे कानावर येताच श्रीमामांनी कीर्तनातच सांगितले, ''माझ्या कीर्तनात नाचणारा वेडा नसून ते गुंडुबुवा आहेत आणि ते विदेही साधु आहेत. साहजिकच माझ्या कीर्तनात ते नाचले तर त्यात वावगे काही नाही.'' श्रीमामांच्या विषयी गुंडुबुवा म्हणत, ''गोंदा पुरा आहे.''

प्रारंभीच्या कीर्तनात इतर संतांचे अभंग श्रीमामा निरुपणास घेत. पुढे त्यांनी ही पद्धत बदलली. श्रावण महिन्यात ते ज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ स्पष्टीकरणास घेऊ लागले. पुढे त्यांचा रामपाठ तयार झाल्यावर ते चैत्र महिन्यात रामपाठातील अभंग निरुपणास घेऊ लागले. पुढे श्रीमामांच्या असे लक्षात आले की आपल्या धर्मात अनेक सण आहेत आणि ते आध्यात्मिक दृष्ट्या महत्त्वाचे आहेत. ते महत्त्व विशद करण्यास श्रीमामांनी स्वत:चे अभंग रचले. त्यांना त्यांनी नित्यपाठ असे नाव दिले. आणि त्यातील पदावर श्रीमामा बोलू लागले. अशाप्रकारे

रामपाठ, हरिपाठ आणि नित्यपाठ यावर कीर्तने करण्याची प्रथा श्रीमामांनी सुरू केली.

कीर्तनात स्पष्टीकरण करावयाच्या अभंगांची निश्चिती करण्याच्या जोडीने श्रीमामांनी आपल्या कीर्तनाचा एक ढाचाही ठरवून टाकला. त्याचे सामान्य स्वरूप असे होते (हा संपूर्ण ढाचा परिशिष्टात दिला आहे) :-

देव्हाऱ्यातील देवांना आणि श्रोत्यांना वंदन करून खुर्चीवर बसून श्रीमामा नमनाचे ''रघुनाथप्रिय गुरूवरा'' हे पद म्हणत. यानंतर रामाची स्तुति असणारे संस्कृत पद- ''शुद्धं ब्रह्म परं''- म्हटले जाई. त्यानंतर मामा स्वत:च रचलेले ज्ञानेश्वरांचे ''ज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम'' हे भजन म्हणीत. हे भजन झाल्यावर त्या दिवशीचा निरुपणाचा अभंग म्हटला जाई. उदा. ''देवाचे दर्शन व्हाया थोर पुण्य। झालिया दर्शन मुक्ती लाहे ।।'' यानंतर ''पावना रामा पतित पावना रामा'' हे भजन म्हणून झाल्यावर कुलदेव आणि चिमड संप्रदायाची गुरुपरंपरा यांचेकडे मागणे असणारे ''नमो रामेश्वरा नमोजी सोमेशा'' हे स्वकृतपद श्रीमामा म्हणत. त्यानंतर ''राजाधिराज सद्गुरूनाथमहाराज की जय'' इत्यादि जयजयकार होई.

कीर्तनातील मुख्य पदाचे निरुपण संपल्यावर, ''हे सर्व नामाने होते आणि तसे साधुमहाराज, भाऊसाहेबमहाराज, ब्रह्मचैतन्यमहाराज यांनी सांगितले आहे. ते नाम हे आहे. असे म्हणून, श्रीराम जयराम जय जय राम या तेरा अक्षरी मंत्राची तेरा आवर्तने होत. त्यानंतर ''श्रीराम जयराम जय जय राम । ऐसा काही धरोनिया नेम । जो नित्य वदे सप्रेम । तो स्वयेची श्रीराम होतसे ।।'' ही ओवी म्हणून कीर्तनाचा मध्य साधला जाई. नंतर बुक्का लावला जाई. त्यावेळी ''सद्गुरूराज पहा प्राण्या'' हे पद म्हणून जयजयकार होई. श्रीमामा मग श्रोत्यांपैकी कुणाला तरी पद म्हणावयास सांगत. त्यानंतर संक्षिप्तपणे एकाद्या संतांची गोष्ट श्रीमामा सांगत. गोष्ट संपल्यावर गोष्टीतील संताला शरणागति दाखवण्यास ''सद्गुरूनाथ माझे आई । मला ठाव द्यावा पायी'' हे भजन आणि त्या संतांनी



नाम घेण्यास सांगितले आहे असे सांगून ''विठ्ठल जय जय विठ्ठल'', ''जय जय गणेश'', ''रघुपति राघव राजाराम'' इत्यादीपैकी एकादे भजन म्हटले जाई. त्यानंतर ''संतकृपा झाली आजी संतकृपा झाली'' असा उच्चार करून, ''मना रामपाया कदा तू न सोडी'' हा श्लोक झाल्यावर जयजयकार होई. मग ''बोलिली लेकुरे वेडीवाकडी उत्तरे'' हा तुकाराममहाराजांचा अभंग म्हणून ''सद्गुरूनाथ सद्गुरूनाथ । मी अपराधी घ्या पदरात'' इत्यादि मागणी झाल्यावर, ''मग असे जे सद्गुरूराज त्यांचे चरणी जितकं नमन करावं तितकं थोडंच आहे.'' हे गद्य वाक्य उच्चारून, ''साष्टांग भावे प्रणिपात केला । विसरु कसा मी गुरूपादुकाला. त्या गुरुपादुकांना वंदन असो. त्या गुरुपदांचे विस्मरण होणं कदापि शक्य नाही. त्या गुरूपदांना अनंत नमस्कार असोत'' असा उच्चार झाल्यावर ''मनामाजी होता मनातील हेतु'' असे रामचंद्राचे स्मरण करून, ''हेचि दान देगा देवा'' हा तुकाराममहाराजांचा अभंग म्हणत श्रीमामा खुर्चीवरून उठून उभे रहात. मग आरत्या म्हणण्यास प्रारंभ होई. ''सत्राणे उड्डाणे'' ही हनुमंताची आरती प्रथम, त्यानंतर ''नाना देही देव एक विराजे'' ही आत्मारामाची आरती, त्यानंतर ''सुख सहिता दु:ख राहिता'' ही सद्गुरूंची आरती झाल्यावर आरत्या समाप्त होत. मग ''कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा'' इत्यादि श्लोक म्हटला जाई. त्यानंतर चिमड संप्रदायाच्या गुरुपरंपरेचे ''चिमडक्षेत्री सद्गुरू माई। जगदुद्धारा तिष्ठत राही'' हे पद झाल्यावर जयजयकार होऊन कीर्तन समाप्त होई. त्यानंतर कीर्तनाचा प्रसाद वाटला जाई.

कालानुरूप पदे, आरत्या, जयजयकार, भजने इत्यादीत काही अधिक फेरफार झाले पण ढाचा हाच राहिला. त्या बदलात दोन महत्त्वाचे बदल असे होते :- ''सद्गुरूभक्तीचा डंका गाजवुनी'' इत्यादि कोटणीसमहाराजांची आरती श्रीदादांना स्वप्नात स्फुरली होती. तिचा समावेश श्रीमामांनी नेहमीच्या आरत्यामध्ये केला. इ. स. १९४० मध्ये दुसरे महायुद्ध चालू असताना, कोटणीसमहाराजांचे चिरंजीव गोविंदराव हे डॉक्टर म्हणून रणभूमीवर गेले. त्यांच्या कल्याणासाठी

श्रीमामांनी ''श्रीराम जय राम, जय जय राम'' हा जप १०८ वेळा करण्यास प्रारंभ केला.

श्रीमामांचे पिताजी अनंतराव हे आपल्या चिरंजीवाच्या कीर्तनात झांजेची साथ करीत. अशी साथ त्यांनी दहा वर्षे १९३४ सालापर्यंत केली. इ. स. १९३४ साली ते निर्वाणास गेले. नाही म्हटले तरी श्रीमामांचे वर हा दुःखाचा प्रसंग होता. अनंतराव सकाळी परलोकवासी झाले. त्यांचे और्ध्वदेहिक पार पाडून श्रीमामा घरी आले. त्यानंतर पित्याच्या निर्णयाचे दुःख बाजूला सारून संध्याकाळी श्रीमामांनी आपले नित्याचे कीर्तन केले, हे येथे नमूद करावयास हवे.

श्रीमामांची कीर्तने अगदी सोप्या व सुलभ भाषेत होत. इतकी की ती लहान मुलांनाही समजू शकत. परमार्थातील 'घटपटादि खटपट' अथवा 'माया ब्रह्माचा घोटाळा' असले अवघड विषय बहुधा त्यांच्या कीर्तनात येत नसत. ''हरिदासाची कथा मूळ पदावर या नात्याने सर्व काही नामाने होते. म्हणून नामस्मरण हे महत्त्वाचे आहे.'' हे सांगण्यावर त्यांचा भर असे. देवाच्या दर्शनाठी, सांसारिक दुःखातून सुटण्यासाठी, मोक्षाच्या प्राप्तीसाठी, सांसारिक दुःखातून सुटण्यासाठी, मोक्षाच्या प्राप्तीसाठी नाम हा एकच उपाय आहे. यावर त्यांचा भर असे.

कीर्तनात कांही शब्दाचे अर्थ श्रीमामा वेगळे सांगत. उदा. सेवा :- से म्हणजे उत्तम आणि वा म्हणजे नामस्मरण. तेव्हा सेवा म्हणजे उत्तम नामस्मरण. शिमगा म्हणजे शिवाचे मनीचे गान म्हणजे शिवाच्या मनात जे रामनाम आहे, त्या नामाचे गान. कृपा :- कृ म्हणजे करणे आणि पा म्हणजे रक्षण करणे. जो नामाचे स्मरण करतो त्याचे देव रक्षण करतो. सावध :- सा म्हणजे सहा काम, क्रोध, लोभ, इत्यादि सहा विकार, ते शत्रु आहेत. त्या सहा रिपूंचा वध करणे म्हणजे सावध होणे. सहा रिपूंना बाजूला सारून नामस्मरण होणे आवश्यक आहे. ते पुढे सांगत :-

आपला अहंकार आपणास परमार्थात नाडतो. जर अहंकार गेला तरच



परमार्थ साधतो. अहंकाराचा अभाव झाला की माणूस देवच होतो.

परमार्थ साधण्यास नाम हा आपला 'स्व-भाव' होणे आवश्यक आहे.

बाह्य विषयांतून लक्ष काढून माणसाने अंतर्मुख होणे हे परमार्थाला आवश्यक आहे हे पटविण्यासाठी श्रीमामा पुढील गोष्ट सांगत :- एक राजा होता. त्याने एका ऋषीला विचारले ''महाराज, मला देव कसा भेटेल?'' तेव्हा ऋषि म्हणाला ''हे राजन् तू गंगातीरी जा. तेथे गंगेतील एक मासा तुला सांगेल.'' ऋषीवर विश्वास ठेवून राजा गंगातीरी गेला. तो गंगेच्या पात्राजवळ उभा असताना, पाण्यातून वर येऊन एक मासा त्याला म्हणाला, ''हे राजा, मला तहान लागली आहे, मी काय करू?'' राजा जाणता होता. त्याने माश्याला सांगितले, ''अरे, तू उलटा हो, म्हणजे तुला पाणी पिता येईल.'' तेव्हा मासा राजाला म्हणाला, ''राजा, तूही उलटा हो. म्हणजे प्रपंचातील लक्ष काढून अंतर्मुख हो.म्हणजे देव तुला भेटेल'' (गोचमा, पृ. ६०).

नामाचे महत्त्व सांगणारा तुकाराममहाराजांचा एक अभंग श्रीमामा नेहमी म्हणून दाखवीत. हा अभंग असा :-

न कळे ते कळो येईल उगले । नामे या विठ्ठले एकाचिया ।।१।।
न दिसे ते दिसो येईल उगले । नामे या विठ्ठले एकाचिया ।।२।।
न बोले ते बोलो येईल उगले । नामे या विठ्ठले एकाचिया ।।३।।
न भेटे ते भेटो येईल उगले । नामे या विठ्ठले एकाचिया ।।४।।
अलभ्य तो लाभ होईल अपार । नाम निरंतर म्हणता वाचे ।।५।।
तुका म्हणे आसक्त जीव सर्वभावे । तरतील नावे विठोबाच्या ।।६।।

श्रीमामा कीर्तनात वरचेवर असे सांगत :- शिक्षित माणसांनी परमार्थाकडे वळावयास हवे.

आणखी श्रीमामा म्हणत :- समजा एक घर आहे आणि त्या घरातील मंडळी एकदिलाने संध्याकाळी एकत्र येऊन देवाच्या आरतीस उपस्थित रहात आहेत. असे जर घर असेल तर ते जगाला भारी होईल.

अशा प्रकारचे कीर्तन दररोज करण्याचे असिधाराव्रत श्रीमामांनी घेतले होते. रोजचे कीर्तन कोणत्याही परिस्थितीत चुकवावयाचे नाही असा श्रीमामांचा ठाम निर्धार होता. त्याची उदाहरणे येथे नमुना म्हणून सांगता येतील. एकदा श्रीमंत माईसाहेब दांडेकरांच्या फार आग्रहावरून श्रीमामा पालघर गावी जाण्यास निघाले होते. रेल्वेने प्रवास चालू होता. संध्याकाळचे पाच वाजले. बरोबरच्या एक दोघांना सांगून श्रीमामांनी रेल्वेच्या डब्यातच कीर्तन केले. असेच एकदा मिरजेच्या मिशन हॉस्पिटलमध्ये श्रीमामांच्या सावत्र मावशीचे ऑपरेशन होते. श्रीमामा तेथे थांबले होते. संध्याकाळचे पाच वाजले. हॉस्पिटलच्या एका बाजूस जाऊन श्रीमामांनी कीर्तन सुरू केले.

कधी कधी श्रीमामा कीर्तनात सांगत :- समजा कीर्तनाच्या वेळे अगोदर ब्रह्मदेव माझेकडे आला आणि म्हणाला, ''बापू, चल तुला मी आत्ता ब्रह्मलोकी नेतो.'' त्यावेळी मी त्याला सांगेन, ''महाराज, जरा थांबा. माझ्या कीर्तनाची वेळ झाली आहे. प्रथम मी कीर्तन पूर्ण करतो आणि मग मी तुमच्या बरोबर येतो.''

***

## प्रकरण ६

## पुरवणी

## कीर्तनाचा ढाचा, कीर्तनातील नमन

(१)

रघुनाथप्रिय गुरुवरा। करी मम वसती हृदय मंदिरा।।धृ.।।
भवाब्धिमग्ना पाहुनी माते । उद्‌धरी आपुल्या करा ।।१।।
पतितोद्‌धारक जाणूनी तूते । शरण मी तुज गुरुवरा ।।२।।
दीन *दास* हा निश्चय करितो । तारक तूचि खरा ।।३।।

(२)

शुद्‌धं ब्रह्म परम् । वंदे सीतारामम् ।।ध्रु.।।
हैमवती हर- चित्त- विरामम् । दिनकर- वंश- ललामम् ।।१।।
पद-रज-उदधृत- गौतम- वामम् । सजल-पयोधर-श्यामम् ।।२।।
विग्रह-विभव-विडंबित कामम् । *विठ्ठल* कुतुकारामम् ।।३।।

(३)

ज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम ।।१।।
नमन तियेचे पाऊली । ज्ञानराज माऊली तुकाराम ।।२।।
भक्तजनास्तव धावली । ज्ञानराज माऊली तुकाराम ।।३।।
गोविंदासी पावली । ज्ञानराज माऊली तुकाराम ।।४।।

नमनानंतर कीर्तनाच्या निरूपणाचा अभंग.

उदा.:-

देवाचे दर्शन व्हाया थोर पुण्य । झालिया दर्शन मुक्ति लाहे ।।१।।

इत्यादि यानंतर :-

**भजन**

पावना रामा पतितपावना रामा । पावना रामा दयाळा पावना रामा ।।

त्यानंतर रामेश्वर, सोमेश्वर गुरुपरंपरा इत्यादींना नमस्कार असणारे पद :-

नमो रामेश्वरा नमोजी सोमेशा । रेवणसिद्धेशा मरूळसिद्ध ।।१।।
नमो काडसिद्धा गुरूलिंगजंगमा । रघुनाथप्रिया रामराया ।।२।।
नमो हनुमंता गुरू नारायणा । मति द्या कीर्तना गोविंदा या ।।३।।

**जयजयकार**

राजाधिराज सद्गुरूनाथमहाराज की जय। जय जय रघुवीर समर्थ ।।

कीर्तनातील निरूपण संपल्यावर हे सर्व नामाने होते, ते नाम असे :-

श्रीराम जयराम जय जय राम, असे म्हणून हा मंत्र तेरा वेळा जपला जाई.

त्यानंतर

श्रीराम जयराम जय जय राम । ऐसा काही धरोनिया नेम ।
जो नित्य वदे सप्रेम । तो स्वयेची श्रीराम होतसे ।।

ही ओवी म्हटली जाई.

येथे मध्यंतरात बुक्का लावला जाई. त्यावेळी पुढील पद म्हटले जाई :-

सद्गुरुराज पहा प्राण्या । मग तू मुक्त होसी शहाण्या ।।ध्रु.।।
त्रिकूटशिखरावरती पाहे वसती ज्यांची आहे ।
इडा पिंगला सुषुम्नेच्या संगमी वसताहे ।।१।।
पहाता मन हे तल्लीन झाले दिसते मौक्तिक माळा ।।
गगनाहोनि कोसळताती नक्षत्रांच्या माळा ।।२।।
रघुनाथप्रिय गुरुवरस्वामी यांचा प्रसाद घ्यावा ।
आत्माराम सर्वा ठायी नेत्रांतरी पहावा ।।३।।

मग 'राजाधिराज सद्गुरूनाथमहाराज की जय'
इत्यादि जयजयकार.



यानंतर श्रोत्यांपैकी कुणाला तरी पद/अभंग म्हणण्यास सांगितले जाई. त्यानंतर संक्षिप्तपणे एकाद्या संताची गोष्ट सांगितली जाई. गोष्ट संपल्यावर गोष्टीतील संतांना शरणागति दाखविण्यास - ''सद्गुरूनाथ माझे आई, मला ठाव द्यावा पायी' हे भजन होई. नंतर त्या संतांनी नाम घेण्यास सांगितले असे सांगून

'रघुपति राघव राजाराम । पतितपावन सीताराम ।।'
'जय जय विठ्ठल जय जय विठ्ठल,'
'जय जय गणेश जय जय गणेश,'

इत्यादिपैकी एकादे भजन म्हटले जाई.

नंतर 'संतकृपा झाली आजी संतकृपा झाली ।
वित्तवध होऊनी चित्त निघाले ज्ञान कळा कळली'

हा उच्चार होऊन

मना रामराया कदा तू न सोडी । मना रामनामी धरी नित्य गोडी ।
मना सद्गुरु राम प्रेमे भजावा । मना राम तो अंतरी साठवावा ।।

या श्लोकाचे पठणानंतर जयजयकार होई. नंतर

''बोलिली लेकुरे । वेडी वाकुडी उत्तरे ।
क्षमा करा अपराध । महाराज तुम्ही सिद्ध ।
नाही विचारीला । अधिकार म्या आपुला ।
तुका म्हणे ज्ञानेश्वरा । राखा पायाचे किंकरा ।। ''

हा अभंग झाल्यावर

'सद्गुरूनाथ सद्गुरूनाथ । मी अपराधी घ्या पदरात ।।१।।
बहुत पापी उद्धरिले । ऐसे ब्रीद रक्षियले ।।२।।
एवढा पापी धरा हाती। दास येतो काकुळती ।।३।।

हे मागणे झाल्यावर '' मग असे जे सद्गुरुराव त्यांचे चरणी जितकं नमन करावं तितकं थोडंच आहे'' हे गद्य वाक्य झाल्यावर

''साष्टांग भावे प्रणिपात केला । विसरु कसा मी गुरुपादुकाला ।।

त्या गुरूपादुकांना वंदन असो. त्या गुरूपदांचे विस्मरण होणे कदापि शक्य नाही, त्या गुरूपदांना अनंत नमस्कार असोत.'' असा उच्चार करून

''मनामाजी होता मनातील हेतु । पुढे देखिला रामचंद्रु समर्थु ।
सती आदरे मुक्तिपंथासी नेली । कथा राहिली पाहिजे चालविली ।''

या श्लोकाने रामाचे स्मरण झाल्यावर :-

''हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।१।। गुण गाईन आवडी ।। हेचि माझी सर्व जोडी ।।२।। न लगे मुक्ति धनसंपदा । संतसंग देई सदा ।।३।। तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ।।४।।'' हा अभंग म्हणून झाल्यावर आरत्या होत :-

**आरत्या**

(१)

सत्राणे उड्डाणे हुंकार वदनी । करी डळमळ भूमंडळ सिंधुजळ गगनी ।
कडाडिले ब्रह्मांड धोका त्रिभुवनी । सुरवर नर निशाचर त्या झाली पळणी ।।१।।
जयदेव जयदेव जय हनुमंता । तुमचेनि प्रसादे न भी कृतांता ।।ध्रु.।।
दुमदुमले पाताळ उठला प्रतिशब्द । थरथरला घननीळ मानिला खेद ।
कडाडिले पर्वत उडुगण उच्छेद । रामी रामदासा शक्तीचा शोध ।।२।।

(२)

नानादेही देव एक विराजे । नाना नाटक लीला सुंदर रूप साजे ।
नाना तीर्थक्षेत्री अभिनव गति गाजे । अगाध महिमा पिंड ब्रह्मांडी गाजे ।।१।।
जयदेव जयदेव आत्मया रामा । निगमागम शोधिता न कळे गुणसीमा ।।ध्रु.।।
बहुरूपी बहुगुणी बहुता काळाचा । हरिहर ब्रह्मादिक देव सकळांचा ।
युगानुयुगी अवतार आत्मारामाचा । दास म्हणे महिमा न वर्णवे वाचा ।।२।।



(३)

सद्गुरु भक्तीचा डंका गाजवुनी । कीर्तनी डोलविला गुरू राम ज्यांनी ।
संसारी दाविला सदाचार करूनी । गुरुरूपी तन्मय झाले काया संहरूनी ।।१।।
जयदेव जयदेव जय गुरु हनुमंता । तारी जड जीवा या श्रीलक्ष्मीकांता ।।ध्रु.।।
राम लीन झाला धन्य तुझे चरणी । ओवाळी आरती तन मन वाहुनी ।
मायबाप तुम्ही असता कैची दीनवाणी । उरेल माझे पाशी सांगा देव धणी ।।१।।

(४)

सुखसहिता दुःखरहिता निर्मल एकांता । कलिमल दहना गहना स्वामी समर्था ।
न कळे ब्रह्मादिका अंत अनंता । तो आम्हा सुलभ तू जय कृपावंता ।।१।।
जयदेव जयदेव जय करुणाकरा । आरती ओवाळू सद्गुरूमाहेरा ।।२।।
मायेवीण माहेर विश्रांति ठाव । शब्दी अर्थी लाभ बोलणे वाव ।
सद्गुरूप्रसाद सुलभ उपाव । रामी रामदासा फळला सद्भाव ।।३।।

(प्रसंग विशेषी 'आरती ज्ञानराजा', 'आरती तुकारामा', 'निंबरगीकरमहाराजांची आरती' या आरत्या म्हटल्या जात.) आरती संपल्यावर 'चिमड क्षेत्री सद्गुरुमाई। जगदुद्धारा तिष्ठत राही ।' हे पद म्हणून झाल्यावर कीर्तन समाप्त होई. नंतर कीर्तनाच्या प्रसादाचे वाटप होई.

***

## प्रकरण–७

# नोकरीचा राजीनामा आणि उपदेश देण्यास प्रारंभ

### (इ. स. १९२५-१९३९)

कोटणीसमहाराजांच्या निर्याणानंतर एक महिन्याचे आतच श्रीमामांचे रोजचे नित्य कीर्तन सुरू झाले होते. कोटणीसमहाराज जेव्हा इ. स. १९२४ मध्ये ब्रह्मीभूत झाले तेव्हा श्रीमामांचे चिरंजीव 'राम' हे केवळ चार वर्षांचे होते. परंतु शंकरमहाराज मिरीकर यांनी म्हटल्याप्रमाणे ते श्रीदादा (राम) पूर्वजन्मीचे योगी होते. आणि उपजत ज्ञानी होते. त्यांना हरिकीर्तनाची आवड होती. म्हणूनच श्रीमामांच्या कीर्तनात श्रीदादा कधी स्वस्थ बसून कीर्तन ऐकत तर कधी हातात झांज घेऊन श्रीमामांना साथ करीत. तर कधी टाळ्या वाजवीत उभे असणाऱ्या श्रीमामांच्या भोवती प्रदक्षिणा घालत.

श्रीदादा हे वयाच्या पांचव्या वर्षापासूनच साधनास बसू लागले. आणि कोटणीसमहाराजांच्या वचनाप्रमाणे ते वयाचे पाचवे वर्षापासूनच म्हणजे १९२५ पासूनच कीर्तन करू लागले. त्यावेळी श्रीदादा 'नमो गुरूनाथा नमो हनुमंता' हे पद नमनास घेत. त्यांचे वय लहान असले तरी त्यांच्या कीर्तनात ब्रह्म, माया, साधन, आणि साक्षात्कार असले विषय येत. ते ऐकून श्रीमामांना 'रामजी'चे कौतुक वाटे. श्रीदादांना कीर्तनात उपयोगी पडावे म्हणून श्रीमामांनी बाल रामाला एक लहान वीणा आणि चिपळ्या आणून दिल्या.

श्रीदादांना सातवे वर्ष लागताच, इ. स. १९२७ मध्ये श्रीमामांनी श्रीदादांचा उपनयन विधीचा समारंभ मोठ्या उत्साहाने आणि धूमधाम उडवून साजरा केला. याच वर्षी श्रीमामांना 'रामजी'चे कौतुक वाटेल अशी एक घटना घडली.



पूर्व जन्मीचा अभ्यास आणि विद्यमान जन्मातील कोटणीसमहाराजांचा अनुग्रह यांच्या मिश्रणाचा दृश्य परिणाम म्हणजे श्रीदादांना सातवे वर्षीच ''आत्मयाची काव्यस्फूर्ति'' झाली. आणि गुरूचे महत्त्व सांगणारा पुढील अभंग त्यांना स्फुरला:-

गुरूचा पंखा असावा वरती । डंका गाजे त्रिजगती ।।१।।
गुरूकृपेचे असावे छत्र । श्रीराम हालवितो सूत्र ।।२।।
रामनामी रंगलिये वाणी । हेची लावण्याची खाणी ।।३।।
*राम* म्हणे नका धरू शंका । एक हलवा गुरुपंखा ।।४।।

हा अभंग श्रीदादांनी श्रीमामांना दाखविला. श्रीमामांनी 'राम'च्या स्फूर्तीचे कौतुक केले.

'राम' ची प्रकृती अशक्त असल्याने, उपनयनानंतर लगेच 'राम' ला शाळेत घातले नाही. त्याला आठवे वर्ष लागल्यावर श्रीमामांनी आपल्या घराजवळच्या मराठी शाळा नं. २ मध्ये 'राम'चे नांव घातले आणि मग 'राम'च्या लौकिक शिक्षणाचा प्रारंभ करून दिला.

याच सुमारास पुढील एक घटना घडली. काही कामासाठी श्रीमामा चार पाच दिवस परगावी गेले होते. घरातील कुलदेवतांची पूजा त्यांनी बाल रामावर सोपविली होती. एकदा अनवधानाने रामने रामेश्वराची पूजा ओवळ्याने केली. तेव्हा रामेश्वरांनी रामाच्या स्वप्नात येऊन त्याला म्हटले, 'रामा, मला ओवळ्याने केलेली पूजा चालत नाही. तू भक्त आहेस म्हणून मी तुला काही करीत नाही. पण यापुढे ओवळ्याने पूजा करू नकोस.' सकाळी श्रीदादा (=राम) झोपेतून जागे झाले. तितक्यात श्रीमामा परगावाहून परत आले. त्यांना श्रीदादांनी आपले स्वप्न सांगितले. तेव्हा श्रीमामा श्रीदादांना बोलले, 'रामजी, घाबरू नको. आपले रामेश्वर दयाळु आहेत. ते तुला काही अपाय करणार नाहीत.'

याच सुमारास श्रीदादांच्या मनात आले, 'वयाचे चौदावे दिवशी मला कोटणीसमहाराजांनी दृष्टिद्वारा अनुग्रह केला. त्याप्रमाणे मी साधन करीत आहे. पण ते बरोबर होते की नाही हे श्रीमामांच्या कडून जाणून घ्यावे.' म्हणून त्यांनी

साधनाचे बाबतीत श्रीमामांना प्रश्न केला. तेव्हा श्रीमामांनी उत्तर केले, 'रामजी, साधनाविषयी बोलणे म्हणजे अनुग्रह देण्यासारखे आहे. आणि मी कुणालाही अनुग्रह देत नाही हे तुला माहीत आहे. म्हणून मी साधनाचे बाबतीत तुला काही सांगणार नाही. पण तुझी शंका दूर व्हावी म्हणून आपण असे करू. कोटणीसमहाराजांचे चिरंजीव श्रीबाबूरावजी कोटणीस हे अनुग्रह देतात आणि ते सांगलीतच असतात. आपण दोघे त्यांच्याकडे जाऊ आणि तुझ्या शंकेचे निरसन करून घेऊ.' श्रीदादांना हे म्हणणे पटले. मग श्रीमामा व श्रीदादा हे दोघेही बाबूरावजी कोटणीसमहाराजांकडे गेले. श्रीदादांचे साधन बरोबर चालले आहे असे बाबूरावजी कोटणीस यांनी त्यांना आश्वासन दिले. मग श्रीमामा व श्रीदादा दोघेही घरी परतले.

याच काळात श्रीदादा एकदा श्रीमामांना म्हणाले, 'मामा, तुम्ही रोज कीर्तन करता. तुम्हाला राम या देवाचे दर्शन झाले आहे. तुम्ही मला रामाचे दर्शन घडवून द्या.' या म्हणण्याकडे श्रीमामांनी प्रथम फारसे लक्ष दिले नाही. तेव्हा अन्न ग्रहण न करण्याचा सत्याग्रह श्रीदादांनी केला. ते पाहून श्रीमामा म्हणाले, 'रामजी, पुढल्या शनिवारी तुला रामाचे दर्शन होईल.' ते ऐकताच श्रीदादांना आनंद झाला. त्या शनिवारी त्यांनी आपल्या भजनातील सवंगड्यांना बोलावले. त्या सर्वांनी 'रामा'च्या स्वागतासाठी कमानी उभ्या करून त्यावर फुलांच्या माळा घातल्या. कुंड्या ठेऊन पणत्या पेटविल्या. प्रसादाची व्यवस्था केली. इकडे श्रीमामांनी रामाची प्रार्थना केली की 'रामा' ने 'रामजीला' दर्शन द्यावे. संध्याकाळच्या सुमारास घराच्या छपरावर वानर आले. तेव्हा श्रीमामा म्हणाले, 'रामाचे वानर सैन्य प्रथम पुढे आले आहे. आता लौकरच राम येईल.' तितक्यात पश्चिम दिशेला नौकेत बसलेले आणि हातात धनुष्यबाण घेतलेले राम आणि लक्ष्मण दिसू लागले. मुलांना आनंद वाटला. सर्वांनी रामाची आरती केली आणि प्रसादाचे वाटप करून या कार्यक्रमाची सांगता केली.

वरील प्रसंगानंतर काही दिवसांनी श्रीदादांनी श्रीमामांना प्रश्न केला, 'मामा,



आपल्या देव्हाऱ्यात रामसीतेच्या मूर्ति आहेत. ते खरे आहेत काय?' श्रीमामांनी होकारात्मक उत्तर दिले. याची प्रचीति श्रीदादांना अशी आली. एके दिवशी मामा व दादा हे सोफ्यावर देवाच्या पुढे झोपले असता, श्रीदादांना मध्येच जाग आली. त्यांना कुणाच्या तरी बोलण्याची कुजबुज ऐकू येऊ लागली. त्यांनी श्रीमामांना जागे केले आणि विचारले, 'मामा, कोण बरे बोलत आहे आत्ता?' श्रीमामांनी उत्तर दिले, 'रामजी, आत्ता देव्हाऱ्यातील राम आणि सीता एकमेकाशी बोलत आहेत.'

याच सुमारास श्रीदादा श्वास रोखून धरून कुंभक करण्याचा अभ्यास करीत होते. एकदा जेवत असताना त्यांचा कुंभक आला. श्वास वरच राहिला. घास घेतलेला हात तसाच ताठ राहिला. 'अरे रामजी, काय झाले तुला?' सौ. इंदिरा मातेने प्रश्न केला. श्रीदादांना बोलताही येईना. तेव्हा ते ताटावरून उठून अंथरुणावर जाऊन पडले आणि त्यांचे अंग गार पडू लागले. तेव्हा चिंताग्रस्त झालेल्या श्रीमामांनी पटवर्धन डॉक्टरांना बोलावून घेतले. त्यांनी एक इंजेक्शन दिले. असाच काही वेळ गेला. मग श्रीदादांचा श्वास हळूहळू खाली आला. नियमित श्वासोच्छ्‌वास सुरू झला. श्रीदादांना बोलताही येऊ लागले. मग श्रीमामांनी श्रीदादांना प्रश्न केला, 'रामजी, आत्ता काय झाले होते?' तेव्हा श्रीदादांनी उत्तर दिले, 'मी कुंभकाचा अभ्यास करीत होतो. आत्ता अचानक कुंभक होऊन माझा श्वास वरचेवर राहिला.' हे ऐकताच श्रीमामांनी श्रीदादांना बजावून सांगितले, 'रामजी, यापुढे रोखून कुंभक करण्याचा अभ्यास ताबडतोब बंद कर. निष्णात गुरुच्या हाताखाली प्राणायाम शिकावा लागतो. स्वतंत्रपणे कुंभकाचा अभ्यास करू नये.'

श्रीमामांच्या घराच्या पुढील बाजूला बाबाण्णा सोनार नावाचे गृहस्थ रहात होते. त्यांचे घरी खटाव गावचे सुप्रसिद्ध संत रामानंदमहाराज खटावकर हे येत असत. त्यांनी एकदा बाल रामाचे कीर्तन ऐकले. ते त्यांना फार आवडले. 'हा राम बालपणीच कीर्तन करतो,' हे पाहून ते रामला प्रल्हाद म्हणू लागले. एकदा

त्यांनी प्रल्हादाला विचारले, 'प्रल्हादा, तू संतवचनांचे हृद्‍गत ग्रंथरूपात सांगशील काय?' तेव्हा 'महाराज, माझ्या वडिलांच्या आशीर्वादाने आणि कोटणीसमहाराजांच्या कृपेने हे कार्य मजकडून होईल', असे महाराजांना सांगून श्रीदादा घरी आले. व त्यांनी एका बैठकीत १३ अध्याय व १३९ ओव्या असणारा 'रामदासबोध' हा ग्रंथ लिहिला. या वेळी श्रीदादांचे वय फक्त ९ वर्षाचे होते. हे ग्रंथ लेखन श्रीदादांनी श्रीमामांना दाखविले. ते वाचल्यावर श्रीमामांनी श्रीदादांना शाबासकी देऊन, त्यांचे कौतुक केले. तो ग्रंथ वाचून श्रीरामानंदमहाराज खटावकरही संतुष्ट झाले. मग त्यांनी श्रीदादांना म्हटले, 'प्रल्हादा, तू साधनाचे अभंग रचशील काय?' पूर्वीप्रमाणेच उत्तर देऊन श्रीदादा घरी आले आणि त्यांनी साधनाचे अभंग रचले आणि ते श्रीमामांना दाखविले. ते वाचून श्रीमामा चकितच झाले. त्यांनी श्रीदादांचे कौतुक केले.

इकडे श्रीदादांचे लौकिक शिक्षण चालू होतेच. ते मराठी चौथी पास झाले. तेव्हा त्यांच्या इंग्रजी शिक्षणासाठी श्रीमामांची त्यांचे नाव आपल्या सिटी हायस्कूलमध्ये घातले.

पूर्वी एकदा श्रीमामांनी रामनामाचे साडेतीन कोटीचे पुरश्चरण केले होते. सिटी हायस्कूलमध्ये नोकरी करीत असताना श्रीमामांना वाटले की आता आपण आणखी एक साडेतीन कोटीचे रामनामाचे पुरश्चरण करावे. त्याप्रमाणे त्यांनी संकल्प सोडून हे पुरश्चरण सुरू केले. हे पुरश्चरण चालू असताना, सांगली शिक्षण संस्थेच्या संचालकांनी श्रीमामांची परगावी बदली केली. तेव्हा श्रीमामांचे पुढे पेच पडला. कारण पुरश्चरण पूर्ण होण्यापूर्वी रहात्या गावाची वेस ओलांडून कोठेही जावयाचे नाही, अशी अट होती. बदलीचे गावी गेले तर पुरश्चरणात बाधा येते. आणि पुरश्चरण पूर्ण करायचे तर बदलीचे काय करायचे? आपली अडचण सांगून श्रीमामांनी बदली रद्द करून घेण्याचा प्रयत्न केला पण त्यात त्यांना यश आले नाही. आता काय करायचे? या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी श्रीमामांनी नानांचा-आपल्या पिताजींचा-सल्ला विचारला. तेव्हा नाना म्हणाले,



'बापू, हाती घेतलेले पुरश्चरण पूर्ण करणे हे महत्त्वाचे आहे.' 'मग नोकरीतील बदलीचे काय करायचे?' श्रीमामांनी प्रश्न केला. नानांनी उत्तर दिले, 'बापू, जर बदली रद्द होत नसेल तर तू नोकरीचा राजीनामा देण्यास हरकत नाही.' यावर श्रीमामा म्हणाले, 'अहो नाना, तुम्ही म्हणता तसे केले तर या नोकरीमुळे येणाऱ्या पैशाची आवक बंद होईल. मग घरच्या खर्चाचे काय आणि कसे करायचे?' त्यावर नाना म्हणाले, 'बापू आपल्या घरात तू, मी, तुझी बायको व तुझा मुलगा राम इतकी चारच माणसे आहेत. आपल्या घरचा खर्च हा काही श्रीमंती थाटाचा नाही. तेव्हा घरखर्चाची चिंता तू करू नको. मी थोडी फार सावकारी करतो हे तुला माहीत आहेच. मला माझी पेन्शन मिळत आहे. आणि आपल्या वाड्यात जी चार पाच बिऱ्हाडे आहेत त्यांचे भाडे आपणांस दरमहा मिळत असतेच. या सर्व मिळकतीतून घरखर्च भागून थोडेफार पैसे उरतात. तेव्हा तू खुशाल नोकरीचा राजीनामा दे. त्यानंतर पुरश्चरण पुरे झाल्यावर दुसरी नोकरी मिळते का ते तुला पहाता येईल. मिळाली तर वाहवा, नाही मिळाली तरी चिंता करण्याचे कारण नाहीच.' नानांचे हे सविस्तर बोलणे ऐकल्यानंतर मामांचा जीव भांड्यात पडला आणि मग त्यांनी नानांच्या संमतीने राजीनामा देण्याचे ठरविले आणि त्याप्रमाणे त्यांनी सिटी हायस्कूलमधील आपल्या आजीव सदस्यत्वाचा आणि नोकरीचा राजीनामा देऊन टाकला आणि मग त्यांनी आपले पुरश्चरण पूर्ण केले.

आपल्या पतीने चांगल्या नोकरीचा राजीनामा दिला हे सौ. इंदिराबाईंना कितपत पसंत पडले, हे कळण्यास मार्ग नाही. पण आपले श्वशुर नाना आणि आपले पति हे विचारपूर्वक करतील ते योग्यच असणार, अशी त्यांनी आपल्या मनात खूणगाठ बांधली असावी.

श्रीमामांचे पहिले साडे तीनकोटि रामनामाचे पुरश्चरण झाल्यावर त्यांना रामाचा सगुण साक्षात्कार झाला आणि त्याचे बाह्य प्रतीक म्हणून त्यांचे घरी रामसीतेच्या मूर्ति आल्या. आता हे दुसरे पुरश्चरण झाल्यावर श्रीमामांना निर्गुण

साक्षात्कार आला असावा. आणि त्या पुरश्चरणानंतर पुढील घटना घडून आली:- सांगलीजवळ मिरज हे गाव आहे. तेथे समर्थ रामदासस्वामींच्या श्रेष्ठ शिष्या ज्या वेणाबाई त्यांचा मठ आहे. मिरजेत मठ स्थापून, तेथे राहण्याची आज्ञा वेणाबाईंना समर्थ रामदासांनी दिली होती. त्यावेळी मिरजेत आणि आजूबाजूला सर्वत्र मुसलमानांचा अंमल होता. तेव्हा वेणाबाईंचे रक्षण करण्यास रामदास स्वामींनी त्यांना एक मारुतीची मूर्ति दिली होती. ही मारुतीची मूर्ति सांगलीतील बापूराव केळकर यांना नेऊन द्यावी,असा दृष्टांत तत्कालीन मठपति रामचंद्रबुवा यांना झाला. त्यांनी ही गोष्ट तात्यासाहेबमहाराज कोटणीसांचे चिरंजीव श्रीबाबूरावजी यांना कळविली. आणि मग बाबूराव कोटणीसांच्या मध्यस्थीने रामचंद्र बुवानी ही प्रसाद मारुतीची मूर्ति श्रीमामांचे स्वाधीन केली. श्रीमामांच्या घरी 'रामसीता' अगोदरच आलेले होते. तेथे मारुति हवाच होता. आता हा मारुति आयताच श्रीमामांच्या घरी आला. हे पाहून श्रीमामा यांना आनंद झाला. मग त्यांनी देव्हाऱ्यात रामसीतेच्या मूर्तीपुढे खालच्या बाजूला मारुतीची शास्त्रोक्त स्थापना केली. श्रीमामांनी वेणाबाईंच्या मठाच्या अधिपतीचे आभार मानले.

श्रीमामांचे नित्य कीर्तन चालू होते. इ. स. १९२७ साली (अकी, पृ. ५४१) पुढील प्रकार घडला :- गुरुपौर्णिमेचा दिवस होता. देव्हाऱ्यापुढे तांदूळ वगैरे ठेवण्यासाठी जे तबक होते, त्या तबकात कोणीतरी पादुकांचा एक जोड आणून ठेवला. तो कोणी ठेवला, आणि त्या पादुका कुणाच्या याविषयी मामांनी भरपूर चौकशी केली. पण काहीच थांगपत्ता लागला नाही. तेव्हा या पादुका कोटणीसमहाराजांच्या आहेत, असे श्रीमामांनी मानले आणि त्या पादुकांची स्थापनाही त्यांनी देव्हाऱ्यात केली.

श्रीमामा कोटणीसमहाराजांचेकडे पूर्वी जेव्हा जात असत, तेव्हा एकदा कोटणीसमहाराजांनी रघुनाथप्रिय साधुमहाराजांचा प्रसाद म्हणून एक जोड-रुद्राक्ष श्रीमामांना दिला होता. त्याचीही स्थापना श्रीमामांनी देव्हाऱ्यात केली.

मराठी शाळा नं. २ मधून श्रीदादा मराठी चौथी इयत्ता उत्तीर्ण झाल्यावर



श्रीमामांनी त्यांचे नाव जवळच असणाऱ्या सिटी हायस्कूलमध्ये घातले. आणि श्रीमामांचे इंग्रजी शाळेतील शिक्षण सुरू झाले. या शाळेत असताना १९३७ साली श्रीदादा फार आजारी पडले. तेव्हा श्रीमामांनी सांगलीतील सुप्रसिद्ध डॉक्टर देसाई यांचे औषध श्रीदादांना सुरू केले. हळुहळु श्रीदादांचे दुखणे बरे झाले. नंतर डॉक्टरांनी श्रीमामांना सांगितले, 'बापूराव, आता तुमच्या मुलाला हवा पालटायला पाठवा म्हणजे तो पूर्ववत् होईल.' आता हवापालटास श्रीदादांना कुठे पाठवायचे असा प्रश्न श्रीमामांना पडला. तो प्रश्न श्रीमामांच्या बहिणीने सोडविला. ती श्रीमामांना म्हणाली, 'बापू, माझे एक नातेवाईक सातारा गावी रहातात. हवापालट करण्यास 'राम'ला त्यांच्याकडे पाठविता येईल. ही योजना श्रीमामांना पसंत पडली. त्याप्रमाणे बहिणीचे दोन पुत्र नारायण आणि हरि यांच्यासह रामची रवानगी श्रीमामांनी साताऱ्यास केली. तेथे काही दिवस राहिल्यावर श्रीदादांची प्रकृति चांगलीच सुधारली. मग ते सांगलीस परत आले. रामजीची प्रकृति सुधारली हे पाहून श्रीमामांना बरे वाटले.

राजकवि साधुदास यांनी लिहिलेले तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे चरित्र इ. स. १९३७ साली प्रसिद्ध झाले. परंतु तत्पूर्वी कोटणीसमहाराजांनी दिलेल्या दृष्टांतानुसार श्रीमामांनी 'हनुमद्गुरुचरित्रबोधसार' नावाचे कोटणीसमहाराजांचे चरित्र लिहिण्यास प्रारंभ केला होता. हे चरित्र लौकर छापले जाऊन प्रसिद्ध व्हावे अशी मामांचे पिताजी अनंतराव यांची इच्छा होती. परंतु काही अपरिहार्य कारणाने ते प्रकाशित झालेले नव्हते. तेव्हा पौष, शुद्ध ४, इ. स. १९३७ या दिवशी हे चरित्र पूर्ण करावे या बेताने श्रीमामांनी रोज एक अध्याय याप्रमाणे लेखन करून ते पूर्ण केले. या चरित्रात कोटणीसमहाराजांच्या पारमार्थिक जीवनाची बाजू प्रकर्षाने कळावी या दृष्टीने श्रीमामांनी ते लिहिले होते. म्हणून हे चरित्र प्रकाशित करण्याचे श्रीमामांचे चिरंजीव श्रीदादा यांनी ठरविले आणि ते इ. स. १९३७ च्या गणेश चतुर्थीस प्रकाशित केले. कोटणीसमहाराजांच्या या चरित्रात श्रीमामांचे छायाचित्र घालावे अशी गणपतराव कानिटकर आणि श्रीदादा यांची

फार इच्छा होती. पण या गुरूच्या चरित्रात आपला फोटो यावा हे श्रीमामांना मान्य नव्हते. त्यामुळे ते आपला फोटो काढून देण्यास नकार देत होते. गणपतराव आणि श्रीदादा यांनी खूप विनवणी केली; पण श्रीमामा आपल्या निश्चयापासून जरा सुद्धा ढळले नाहीत. त्यामुळे श्रीमामांच्या फोटोशिवायच हनुमद्‌गुरूचरित्रबोधसार हे पुस्तक प्रकाशित झाले.

यानंतर श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपेने श्रीमामांना काही अभंग स्फुरू लागले. त्यांमध्ये रामनामाचे महत्त्व सांगितलेले होते. म्हणून या अभंगाच्या समूहास 'श्रीरामपाठ' असे नाव देण्यात आले. हे अभंग परमार्थदृष्ट्या अतिशय महत्त्वाचे होते. परंतु प्रसिद्धिपराङ्‌मुख असणारे श्रीमा हा रामपाठ प्रकाशित करण्याचा विचारही मनात आणीनात. ते श्रीमामांचे चिरंजीव श्रीदादा यांना पसंत पडले नाही. काही झाले तरी हा रामपाठ प्रकाशित करावयाचा असे श्रीदादांनी निश्चित केले. श्रीदादांच्या आग्रहामुळे श्रीमामांनी त्या गोष्टीस संमति दिली. आता या रामपाठ ग्रंथात श्रीमामांचा फोटो घालावयाचाच असा निश्चय श्रीदादा व गणपतराव यांनी केला. पुन: त्या गोष्टीस श्रीमामा तयार होईनात. त्यांचा फारच आग्रह झाल्यावर श्रीमामा म्हणाले, 'रामजी, असे कर. कोटणीसमहाराजांच्या पुढे चिठ्ठ्या टाक. त्यात फोटो काढावा अशी चिठ्ठी आली तर मी फोटो घेऊ देईन.' सुदैवाने फोटो घ्यावा अशी चिठ्ठी आली आणि मग नाईलाजाने श्रीमामा फोटोस बसले आणि मग त्यांचा फोटो रामपाठ या ग्रंथात घालण्यात आला आणि श्रीमामांच्या फोटोसह श्रीरामपाठ हा ग्रंथ दि. १७-३-१९३८ या रामनवमीच्या दिवशी प्रकाशित झाला.

श्रीमामांच्या नित्य कीर्तनाला इ. स. १९३८ साली चौदा वर्षे झाली होती. या वर्षी दोन महत्त्वाचे प्रसंग घडले. पहिला प्रसंग असा :- कोटणीसमहाराजांचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ चिरंजीव श्री. बाबूरावजी यांना श्रीमामांच्या नित्य कीर्तनाचे कौतुक होते. त्यांनी एका सोमवारी तात्यासाहेबमहाराजांच्या चर्मी पादुका श्रीमामांना प्रसाद म्हणून दिल्या (अकी, पृ. ५६).त्यांचीही स्थापना श्रीमामांनी देव्हाऱ्यात



केली आणि या पादुका प्राप्तीची खूण म्हणून प्रत्येक सोमवारी मौन पाळण्याचा क्रम सुरु केला (अकी, पृ. ५६). दुसरा प्रसंग असा घडला :- प. पू. मातोश्री माईसाहेब यरगट्टीकर या चिमडमहाराजांच्या अधिकारसंपन्न पत्नी. कोटणीसमहाराज विद्यमान असताना त्या सांगलीस आल्या होत्या. त्या कोटणीसमहाराजांच्या कीर्तनातही उपस्थित राहिल्या होत्या. त्यांनी कोटणीसमहाराजांना चिमडमहाराजांच्या चर्मी पादुका प्रसाद म्हणून दिल्या होत्या. याच माईसाहेब १९३८ साली पुन: सांगलीत आल्या होत्या. त्यांना कळले की कोटणीसमहाराजांच्या आज्ञेने, आपल्या नारायण या चिरंजीवाचे शिष्य बापूराव केळकर हे रोज कीर्तन करतात. तेव्हा त्या श्रीमामांच्या कीर्तनास जाऊ लागल्या. श्रीमामा हे परमार्थदृष्ट्या पूर्ण अधिकारी आहेत. हे त्यांच्या लक्षात आले. पण श्रीमामा उपदेशानुग्रह देत नाहीत हे त्यांना कळल्यावर, त्या एके दिवशी श्रीमामांना म्हणाल्या, 'बापूराव, मुमुक्षूंना उपदेश देण्यास तुम्ही अधिकारी आहात. मी तुम्हांला सांगते की यापुढे तुम्ही साधक मुमुक्षूंना उपदेशानुग्रह देण्यास प्रारंभ करावा.'

वस्तुस्थिती अशी होती :- श्रीमामांच्याकडे पुष्कळ लोक उपदेश मागीत. तसा उपदेश देऊन श्रीमामांना शिष्यांमध्ये आपला बडेजाव माजविता आला असता; पण शिष्यांचा पसारा करणे ही गोष्ट श्रीमामांना मनापासून नको होती. म्हणून माईसाहेबांचे पूर्वी जरी नागाप्पाण्णामहाराजांनी त्यांना उपदेश करण्याची आज्ञा दिली होती तरी त्यांनी उपदेशानुग्रह देण्यास प्रारंभ केला नव्हता. ते साधक मुमुक्षूंना बाबूरावजी कोटणीस यांच्याकडे अथवा चिमडला पाठवीत. पण आता माईसाहेबांचा आग्रह पाहून श्रीमामांनी उपदेश देण्याचे ठरविले. तरी श्रीमामांनी उपदेशाचा भंडारा मांडला नाही. कारण गुरु झाल्यावर येणारा अहंकार त्यांना नको होता. माईसाहेबांच्या आज्ञेनंतर मोठ्या मिनतवारीने त्यांनी पहिला अनुग्रह दिला. तो असा :- माधवनगर येथील महादेवराव देशपांडे हे गु. रानडे यांचेकडे उपदेश मागण्यास गेले होते. गुरुदेवांनी त्यांना श्रीमामांचा अनुग्रह घेण्यास सांगितले. त्यामुळे ते श्रीमामांचेकडे आले. त्यांची हकिकत कळल्यावर श्रीमामांनी

त्यांना उपदेशानुग्रह दिला. ते श्रीमामांचे पहिले अनुगृहीत ठरले (अकी, पृ. १२७)

पूर्वी श्रीमामा प्लेगच्या दुखण्यातून बरे झाले होते. त्यावेळी 'बापू बरा झाला तर तो एकदा पंढरपुरास विठ्ठलाचे दर्शनास जाईल.' असा नवस कोणीतरी बोलले होते असे श्रीमामांच्या कानांवर आले होते. हा नवस फेडण्याचा राहिला होता. तसेच ज्या विठ्ठलाच्या दर्शनास लाखो वारकरी अपार कष्ट घेऊन जातात, त्या विठ्ठलाच्या दर्शनास आपणही जावे असे श्रीमामांच्या मनात आले. त्याप्रमाणे ठरवून श्रीमामा पंढरपुरास निघाले.

श्रावण शुद्ध १०, शके १८६१ (इ.स. १९३८) रोजी श्रीमामा निघाले. वारकरी असणारे पांडुरंगराव पतंगे, महादेवराव दाणेकरी, बंडोपंत गोडबोले, वासुदेवराव अभ्यंकर आणि गणपतराव कानिटकर या सहकाऱ्यांना बरोबर घेऊन श्रीमामांनी प्रस्थान ठेवले. पंढरपुरात ते एका मठात उतरले. सर्व मंडळी पांडुरंगाचे दर्शन घेऊन आली. या संदर्भात श्रीमामा कीर्तनात सांगत :- 'आम्ही वाटेल त्यावेळी पांडुरंगाचे मंदिरात गेलो तरी आम्हाला बिनबारीचे दर्शन विनासायास मिळत असे.' उतरलेल्या दिवशी नित्य कीर्तनाची वेळ जवळ आली. 'मी या मठात कीर्तन करू का?' असा प्रश्न श्रीमामांनी मठपतींना विचारला. तेव्हा मठपति उत्तरले, 'अहो बापूराव, तुमच्या गळ्यात तुळशीची वारकरी माळ नाही. ज्याच्या गळ्यात वारकरी माळ आहे त्यालाच आम्ही या मठात कीर्तनास परवानगी देतो. तेव्हा मी तुम्हाला या मठात कीर्तन करण्याची परवानगी देऊ शकत नाही.' मग श्रीमामा त्यांना म्हणाले, 'अहो बुवा, कीर्तन नाही तर नाही, पण मी प्रवचन तरी करू शकतो?' यावर मठपति बोलले, 'तुम्ही प्रवचन करण्यास हरकत नाही.' मग श्रीमामांनी तेथे प्रवचन केले. प्रवचनात श्रीमामा म्हणाले 'नाम घेण्यासाठी माळ वापरली जाते. त्यासाठी लोक बाह्य तुळशी माळा वा अन्य माळा वापरतात. माळ महत्त्वाची नसून जप महत्त्वाचा आहे. हा जप काही लोक अंतरात करतात. ते मनोमाळा वापरतात. आणि ज्याच्या



अंतरात मनोमाळा आहे त्याला बाह्य माळेची जरुरी तरी काय?' प्रवचनानंतर अन्य स्थळी जाऊन श्रीमामांनी आपले नित्याचे कीर्तन केले.

श्रीमामांच्या गळ्यात वारकरी तुळशी माळ नाही, हे मठपतीचे शब्द पांडुरंगाला रुचले नाहीत असे दिसते. त्याने श्रीमामांच्या गळ्यात तुळशीची माळ घालण्याचे ठरविले. दुसरे दिवशी सकाळी पांडुरंगाचे दर्शन घेऊन आपल्या सहकाऱ्यांसह श्रीमामा परत येत होते. तेव्हा एका सावळ्या रंगाच्या पुरुषाने श्रीमामांना थोडे थांबण्यास सांगितले. मग तो कृष्णवर्णी माणूस श्रीमामांच्या जवळ आला आणि त्याने आपल्या हातातील पुष्पहार झट्‌दिशी श्रीमामांच्या गळ्यात घातला आणि तो पट्‌कन निघून गेला. मठात आल्यावर श्रीमामांनी तो हार एका खुंटीवर टांगून ठेवला. त्या हारात एक तुळशीची माळ सर्वांना आढळून आली की जी मामांच्या गळ्यात पडली होती म्हणजे त्या माणसाने - पांडुरंगाने- पर्यायाने श्रीमामांच्या गळ्यात तुळशीची माळ घातली होती. विठ्ठलाचा प्रसाद म्हणून ही माळ श्रीमामा सांगलीस घेऊन आले. ही माळ अद्यापिही जतन करून ठेवलेली आहे. या प्रसंगाची स्मृति म्हणून श्रीमामांनी आपल्या घरी प्रत्येक द्वादशीस नित्याचे कीर्तन संपल्यावर वारकरी पद्‌धतीचे निरूपण करण्यास प्रारंभ केला.

वरील प्रसंगानंतर श्रीमामांचे चिरंजीव श्रीदादा हे साधुमहाराजांच्या रथोत्सवात उपस्थित रहाण्यासाठी, इ. स. १९३९ च्या दिवाळीत चिमडला गेले. तेथे त्यावेळी श्रीनिंबरगीकरमहाराजांचे परमाधिकारसंपन्न नातू श्रीगाप्पाण्णामहाराज आलेले होते. त्यांनी श्रीदादांच्या काही शंकांचे निवारण केले. नंतर ते म्हणाले, 'रामभाऊ, निंबरगीकर महाराजच तुम्हाला उपदेश करतील.' त्यांचे शब्द खरे ठरले. श्रीदादा सांगलीत परतले. आणि त्याच वर्षीच्या पौष शुद्ध नवमीच्या दिवशी निंबरगीकरमहाराज श्रीदादांचे पुढे साक्षात् प्रगट झाले आणि 'येनू इह्लदानू' इत्यादि कानडी पद उच्चारून त्यांनी श्रीदादांना बोध करण्यास प्रारंभ केला.

निर्वाणानंतर ब्रह्मीभूत झालेल्या कोटणीसमहाराजांनी श्रीमामांच्या पुढे साक्षात् प्रगट होऊन त्यांना कीर्तन करण्याची आज्ञा दिली, तर निर्याणानंतर ब्रह्मीभूत

झालेल्या निंबरगीकरमहाराजांनी श्रीदादांचे पुढे साक्षात् प्रगट होऊन त्यांना कानडी पदाद्वारे बोध केला. या दोन प्रसंगातील साम्य श्रीमामांच्या लक्षात आले आणि त्यांनी श्रीदादांचे विषयी धन्योद्गार काढून त्यांचे कौतुक केले.

येथेच एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट सांगायास हवी. श्रीमामा व श्रीदादा यांचे परस्पराकडे पहाण्याचे दृष्टिकोन हे केवळ पिता व पुत्र असे नव्हते. श्रीमामा श्रीदादांना राम हा ईश्वर समजत आणि श्रीदादा श्रीमामांना गोविंद/कृष्ण/राम समजत. म्हणून श्रीमामा म्हणत असत, 'विश्वात राम हा ईश्वर आहे. तर माझ्या घरी ईश्वर राम वावरत आहे.' आणि श्रीदादा हेही श्रीमामांना प्रत्यक्ष रामच मानत. म्हणून राम या स्वरूपातील श्रीमामांच्या विषयी श्रीदादांनी अनेक अभंग, श्लोक आणि आरती रचली आहे.

याच १९३९ साली श्रीमामा, श्रीदादा व श्री. गंगाधर सिंग हे तिघे कोल्हापुरजवळच्या सिद्धगिरीवरील काडसिद्धांचे स्थानी गेले होते. काडसिद्धांच्या अमृतपिंडीसमोर उभे रहातच श्रीदादा व श्रीमामा या दोघांनाही अमृतपिंडीतून साक्षात् प्रगट झालेली काडसिद्धांची मूर्ति दिसली. दोघांनी त्यांना नमस्कार केला व मग काडसिद्ध अदृश्य झाले.

याच १९३९ साली असे झाले :- श्रीदादांचा मनोहर मंगळवेढेकर नावाचा मित्र होता. तो परमार्थात प्रगत होता. एकदा तो श्रीमामांचे कीर्तनाला बसला असताना 'स्वरूप दर्शन सत्वरी/झाले त्या', असा श्रीमामांच्या कीर्तनाचा प्रभाव होता.

***

## प्रकरण–८

# श्रीदादांचा विवाह/रामेश्वर यात्रा, रौप्य महोत्सव

**(इ.स. १९३८-१९५६)**

इ. स. १९३८ चे सुमारास श्रीमामांना रक्तदाबाचा विकार जडला. घेरी येऊ लागल्यामुळे त्यांना उभे राहून कीर्तन करणे अशक्यच होऊ लागले. तेव्हा त्यांनी खुर्चीवर बसून कीर्तन करण्याचे ठरविले. त्यांनी एक लाकडी खुर्ची तयार करवून घेतली आणि त्यानंतर खुर्चीवर बसूनच कीर्तन करण्यास त्यांनी प्रारंभ केला.

श्रीमामांचे चिरंजीव श्रीदादा हे इ. स. १९३९ मध्ये मॅट्रिकचे वर्गात होते. त्यांचे लक्ष अभ्यासापेक्षा परमार्थाकडे अधिक असल्याने, मॅट्रिक परीक्षेस ते जरी दोन-तीनदा बसले तरी ते ती परीक्षा उत्तीर्ण होऊ शकले नाहीत. साहजिकच इ. स. १९४२ या वर्षी सुद्धा ते मॅट्रिकच्याच वर्गात राहिले होते. ते मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण होऊ शकणार नहीत आणि ते आता विवाहास योग्य झाले आहेत, असा विचार करून श्रीमामांनी श्रीदादांचा विवाह उरकून घेण्याचे ठरविले. अशा स्थितीत इचलकरंजीच्या बळवंतराव मराठे यांच्या मध्यस्थीने एक मुलगी श्रीदादांना सांगून आली.

इचलकरंजी गावी श्री. बळवंतराव मराठे हे उद्योजक होते. त्यांनी इचलकरंजी गावात 'मराठे मिल्' स्थापन केली होती. त्यांचे मार्फत इचलकरंजी गावातीलच गोवंडे आडनावाच्या कुटुंबातील मालती नावाची कन्या श्रीदादांचे साठी सांगून आली. श्री दत्तात्रेय गोवंडे आणि त्यांची पत्नी सौ. गिरिजा या पति-पत्नीला सात संताने होती. त्यांमध्ये शेवटचे कन्यारत्न म्हणजे मालती. घरची परिस्थिति बेतात होती. गोवंडे कुटुंब मोठे असल्याने मालतीला लहानपणापासूनच घरातील

सर्व कामे करावयाची सवय होती. तिचे शालेय शिक्षण फारसे झाले नव्हते. ती मराठी फायनल परीक्षा उत्तीर्ण झाली होती. श्रीमामा, सौ. इंदिरा माता आणि श्रीदादा यांनी मालतीलाच पसंत केले. गोवंडे कुटुंबालाही श्रीदादांचे स्थळ पसंत पडले आणि श्रीदादा व मालती यांचा विवाह निश्चित झाला.

श्रीदादा व मालती यांच्या विवाहाची तिथि श्रीमामांनी निश्चित केली आणि हा विवाह मोठ्या थाटामाटाने सांगली गावी करण्याचे योजिले. पण तो योग आला नाही. याला असे कारण घडले :- बाबूरावजी कोटणीस यांच्या प्रथम पत्नी सौ. जानकीबाई या श्रीदादांना आपलाच पुत्र मानीत. श्रीदादांचा विवाह ठरला हे कळताच, त्या श्रीमामांच्याकडे येऊन म्हणाल्या, 'बापूराव, रामच्या विवाहात आम्ही पतिपत्नी देवक ठेवणार.' आपल्या चिरंजीवाचे लग्नात वराचे देवक गुरुघराण्यातील पूज्य माननीय पतिपत्नी ठेवणार, हे लक्षात घेऊन श्रीमामांनी त्या गोष्टीस होकारही दिला. परंतु देवाच्या मनात वेगळेच होते. किरकोळ आजाराचे निमित्त होऊन सौ जानकीबाई दि. ६-२-१९४२ रोजी कैलासवासी झाल्या. या दुःखद प्रसंगामुळे ठरलेल्या तिथीला हा विवाह पार पाडावा की नाही असा पेच श्रीमामांना पडला. त्याच वेळी गोवंडे मंडळी श्रीमामांना म्हणाली 'बापूराव आम्ही आमच्या दूरच्या नातेवाईकांना मुहूर्ताचा दिवस कळवला आहे.त्याप्रमाणे त्यांनी सवड काढून ठेवली आहे. आता जर मुहूर्ताचा दिवस बदलला तर ते त्यांना सोईचे होणार नाही.'' श्रीमामांनी गोवंडे कुटुंबाची अडचण लक्षात घेतली आणि त्यांनी असा तोडगा काढला:- ठरलेल्या मुहूर्तावरच विवाह उरकून घ्यावयाचा. पण लग्नाचे सांगली हे स्थान बदलावयाचे. विवाह सांगलीत न करता, तो नरसोबाचे वाडीस करावयाचा. ही कल्पना गोवंडे मंडळींना मान्य झाली. मग श्रीदादांचा विवाह मोठ्या थाटामाटाने सांगलीत व्हावयाचा होता, तो आता नरसोबाचे वाडीस साधेपणाने साजरा झाला. माघ वद्य ११, शके १८६४ (इ.स. १९४२) या शोभन दिनी हा विवाह संपन्न झाला



आणि मग केळकर मंडळी नूतन परिणीत वधूला घेऊन सांगलीत आली. सासरी मालतीचे नाव सीता असे ठेवण्यात आले. उंबरठ्यावरील माप पायाने ढकलून सौ. सीताने गृहप्रवेश केला. आता सौ. सीताचा वावर श्रीमामाच्या घरात सुरू झाला.

या केळकर घराण्याचे मुख्य कुलदैवत म्हणजे आचरे गावचा रामेश्वर. आता श्रीदादांचा शुभविवाह झाल्यावर, आचरे गावी जाऊन रामेश्वराचे दर्शन घेण्याचे श्रीमामांनी ठरविले. इ. स. १९४२ च्या मे महिन्यात मामा आपल्या सर्व कुटुंबासह आचरे गावी जाण्यास निघाले. वाटेमध्ये कणकवली हे गाव लागले. कणकवलीचे पुढे घाटातला रस्ता होता. तो ओलांडण्यासाठी एक बैलगाडी ठरविण्यात आली. बैलगाडी घाटाच्या उतरणीवर लागली आणि गाडीचे बैल गाडीच्या जोखडातून सुटले आणि मग बैलगाडी नुसती घरंगळू लागली. गाडीतील सर्व केळकर घाबरून गेले. परंतु रामेश्वराच्या कृपेने एका खडकावर आदळून गाडी थांबली. सर्व जण प्राणसंकटातून निभावून गेले. मानवी जीवनात ईश्वरच संकटे निर्माण करतो आणि तोच ती संकटे दूर करतो, या म्हणण्याचा प्रत्यय आला. यानंतरच्या पुढील प्रवासात काही विघ्न न येता प्रवास सुखरूपपणे पार पडला.

आचरे गावी पोचल्यावर रामेश्वराचे दर्शन इत्यादि गोष्टी यथासांगपणे पार पडल्या. रामेश्वरापुढे श्रीमामांचे कीर्तन झाले. नंतर एके दिवशी सर्व जण जवळच असणाऱ्या समुद्राच्या दर्शनासाठी सागर किनाऱ्यावर गेले. त्यावेळी समुद्रात ओहोटीची वेळ होती. सर्व जण किनाऱ्यावर उभे होते. तोच समुद्राची एक लाट सरसर पुढे आली आणि काही कळण्याच्या आत श्रीमामांच्या पायांना प्रदक्षिणा घालून झटक्यात परत गेली. सर्व जण चकित झाले. कारण ओहोटीच्या वेळी भरतीप्रमाणे समुद्राची लाट पुढे पुढे येत नाही.

रामेश्वराचे दर्शन झाल्यावर श्रीमामांनी परत निघण्याचा दिवस ठरविला. परत निघताना प्रथेप्रमाणे रामेश्वराला कौल लावला गेला. तेव्हा ''ठरलेल्या

दिवशी परत जाण्यास न निघता, त्याचे पुढील दिवशी निघावे असा रामेश्वराने कौल दिला.'' श्रीमामांनी तो कौल मान्य केला. मग ठरलेल्या दिवसाच्या दुसरे दिवशी केळकर मंडळी आचरे गावातून परत निघाली. वाटेत त्यांना कळले की काल त्या वाटेने गेलेल्या यात्रेकरूंच्या बैलगाडीवर वाघाने हल्ला केला होता. ते कळताच 'रामेश्वराने आपणास वाचविले' या भावनेने सर्वांनी मनातल्या मनात रामेश्वराच्या कौलाला धन्यवाद दिले आणि रामेश्वराचे गुणगान केले. नंतर परतीच्या प्रवासात कोणतेही विघ्न न येता केळकर कुटुंब सुखरूपपणे सांगलीस पोचले.

श्रीमामांचे चिरंजीव श्रीदादा हे पुन: एकदा १९४३ साली मॅट्रिकच्या परीक्षेत अनुत्तीर्ण झाले. मॅट्रिक उत्तीर्ण नसल्याने महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रश्नच उद्‌भवला नाही. त्यामुळे येथेच श्रीदादांच्या लौकिक शिक्षणाची इतिश्री झाली. आणि काहीच न करता श्रीदादा स्वस्थच राहिले. तथापि एका विवाहित पुरुषाने काही न करता घरी हरि हरि करीत स्वस्थ बसणे हे श्रीदादांच्या मातोश्री व पत्नी यांना पसंत नव्हते. काहीतरी करून श्रीदादांनी द्रव्यार्जन करावे असा त्यांचा लकडा असे. तेव्हा श्रीदादांनी नोकरी करण्याची तयारी दर्शविली. ते म्हणाले, ''नोकरी करण्यासाठी काही माझा जन्म नाही. तथापि आवश्यकता असल्यास मी नोकरी करीन.'' श्रीदादांची ही भूमिका कळल्यावर मग श्रीमामांनीच पुढाकार घेतला. त्या काळच्या सांगली संस्थानात एस्टॅब्लिशमेंट विभागाचे मुख्य अधिकारी श्री. अण्णासाहेब नाईक नावाचे गृहस्थ होते. ते श्रीमामांचे सिटी हायस्कूलमधील विद्यार्थी होते. त्यांना श्रीमामांचे बद्दल अतिशय आदर होता. त्यांच्याकडे श्रीमामांनी शब्द टाकला. तेव्हा संस्थानच्या दिवाणी ऑफिसात कारकूनाची एक जागा रिकामी आहे, हे श्री. नाईक यांच्या आढळात आले. त्यांनी ताबडतोब त्या जागी श्रीदादांची नेमणूक केल्याची ऑर्डर काढली. ती ऑर्डर हाती पडताच दिवाणी ऑफिसात कारकून म्हणून श्रीदादा नोकरीत रुजू झाले आणि श्रीदादांच्या अल्पकालीन नोकरीचा प्रारंभ झाला.



श्रीदादांचा विवाह इ. स. १९४२ साली झाला. त्यानंतर केळकर कुटुंबाने रामेश्वरची यात्रा केली. यात्रेहून परत आल्यावर लौकरच सौ. सीता या सुनेचा फलशोभनाचा/गर्भाधानाचा सोहळा पूर्वापार पद्धतीने थाटामाटात पार पाडण्यात आला. त्यानंतर दोन वर्षांनी दि. २३-१०-१९४४ रोजी श्रीमामांना पहिला नातू झाला. त्याचे नाव चंद्रशेखर असे ठेवण्यात आले.

पंढरपूरहून आल्यापासून दर द्वादशीला श्रीमामा वारकरी पद्धतीचे निरूपण करीत होते. एकदा त्यांच्या मनात आले :- शिवरात्री दिवशी आपण उभे राहून सतत नऊ तास निरूपण करावे. त्याप्रमाणे शिवरात्रीला श्रीमामांनी दुपारी १२ पासून निरूपणाला प्रारंभ केला. रात्री ९ ।। वाजता निरूपण संपले. जे श्रीमामा त्या काळी उभे रहाणे अशक्य झाल्याने खुर्चीत बसून कीर्तन करीत होते, त्याच श्रीमामांनी त्या दिवशी सतत नऊ तास उभे राहून निरूपण केले. नऊ तासांत श्रीमामांच्या आवाजातही फरक पडला नाही. प्रारंभी श्रीमामा बोलण्याच्या ज्या पट्टीत बोलत होते तीच पट्टी कडेपर्यंत कायम होती. त्या दिवशी श्रीमामांना रक्तदाबामुळे घेरी आली नाही आणि त्यांचे पायही दुखले नाहीत.

आणि ज्यावेळी तुकाराममहाराजांच्या त्रिशत संवत्सर महोत्सवाचा सोहळा चालू होता, त्या काळात श्रीमामांनी आपल्या घरी सतत नऊ तास साधनाला बसण्याचा कार्यक्रम केला. अनेक साधकांसह ते नऊ तासांचे साधन श्रीमामांनी पार पाडले (गोचमा, पृ.७८).

यथाक्रम १९४७ साल उजाडले. दि. २३-१२-१९४७ रोजी श्रीदादांच्या दुसऱ्या पुत्राचा जन्म झाला. त्याला सूर्यकांत असे नाव देण्यात आले. हा सूर्यकांत पुढे श्रीमामांच्या आगेमागेच करीत असे. त्यामुळे श्रीमामांची त्याचेवर मर्जी होती. पुढे तो थोडा मोठा झाल्यावर श्रीमामांनी त्याला उपदेशानुग्रहही दिला.

माघ वद्य प्रतिपदा स. स. १९२४ पासून श्रीमामांचे नित्य कीर्तन सुरू झाले होते. या त्यांच्या उपक्रमाला फेब्रुवारी १९४९ सालच्या माघ वद्य प्रतिपदेला

पंचवीस वर्षे पूर्ण होत होती. तेव्हा श्रीमामांच्या कीर्तनाचा रौप्य महोत्सव साजरा करण्याची भाषा श्रीदादांनी श्रीमामांचे जवळ काढली. तेव्हा श्रीमामा म्हणाले, ''रामजी, कोटणीसमहाराजांच्या आज्ञेनुसार मी देवाची सेवा म्हणून कीर्तन करीत आहे. त्या सेवेचा कसला रौप्य महोत्सव?'' श्रीमामांचे हे म्हणणे श्रीदादांना पटले नाही. कारण त्यांना वाटत होते :- श्रीमामा प्रसिद्धिपराङ्‌मुख आहेत हे खरे. परंतु पंचवीस वर्षे एकही दिवस खंड न पडता चाललेल्या श्रीमामांच्या नित्य कीर्तनाच्या व्रताची महती इतरांना कळणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी श्रीमामांचे पुढे त्यांच्या कीर्तनाचा रौप्य महोत्सव साजरा करण्याचा हट्टच धरला. तेव्हा श्रीमामांनी हा सोहोळा साजरा करण्यास नाखुषीने संमति दिली.

मग श्रीदादांनी परगावच्या काही संतसज्जनांना या रौप्यमहोत्सवाची निमंत्रण पत्रे धाडली. त्यातील काही जण उपस्थित राहिले तर काहींनी या कार्यक्रमास शुभेच्छा, शुभसंदेश पाठविले. पैठणचे भय्यासाहेब, गु. रानडे, केतकरमहाराज यांच्या शुभेच्छा आल्या. प्रा. सोनोपंत दांडेकर यांनी लिहिले ''या कराल कलियुगात श्रीमामांच्या नित्य कीर्तनाने रौप्यमहोत्सव गाठला आहे, हे अपूर्वच आहे'' (अकी). जोगेश्वरीच्या मंगेश रामचंद्र टाकीमहाराज यांनी लिहीले ''बहु भाग्याची गोष्ट हीच की गुरुभक्त श्रीबापूरावजी यांना भगवंताने सद्‌गुरूंच्या रूपात प्रत्यक्ष प्रगट होऊन हा आदेश दिला आणि त्यामुळेच हे अधिकारसंपन्न शिष्य आज पंचवीस वर्षे पावेतो ही हरिकीर्तनाची गुरुसेवा अव्याहतपणे चालवीत आहेत'' (अकी). यावेळी याच टाकीमहाराजांनी पद्यामध्ये श्रीमामांचा गौरव पुढीलप्रमाणे केला :-

आजी पूर्ण विसावरी तरि कृपे ही पाच वर्षे भली ।
श्रीमत् सद्‌गुरूच्या लिले करुनिया भाग्ये तुम्हा लाभली ।
केली कर्णपुटे पुनीत श्रवणे भक्ता जनांची सदा ।
पाजोनी बहु गोड कीर्तन सुधा श्रीबापुजी सर्वदा ।।१।।



बापूजी तरि स्नान आणि बरवे त्रिवेणीच्या संगमी ।
साधा पान तसे करूनि करवा वाखाणिले आजची ।
जे हे कीर्तन तेच श्रीगुरुवरे प्रगटोनिया दाविले ।
पाळा वंशपरंपरे करुनिया व्हा तीन्ही लोकी भले ।।२।।

टाकीमहाराजांचा हा संदेश श्रीदादांना इतका आवडला की त्यांनी तो काचेच्या फ्रेममध्ये बसवून घेतला. आजही तो संदेश त्याच स्वरूपात रामनिकेतनमध्ये दिसून येतो.

या कीर्तनाच्या रजत महोत्सवात अत्यंत महत्त्वाची आणि आनंदाची गोष्ट अशी घडली :- श्रीमामांचे उपदेशक गुरु श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर हे जातीने या समारंभात उपस्थित राहिले आणि त्यांनी आपल्या शिष्याच्या कीर्तन भक्तीची भरपूर स्तुति केली (अकी). यावेळी श्रीनारायणमहाराज यांचा फोटो काढण्याचे ठरले. पण नारायणमहाराज हेही श्रीमामांच्या प्रमाणेच प्रसिद्धिपराङ्‌मुख. ते म्हणाले, ''अहो, आता माझा फोटो कशाकरता?'' तथापि विमलाबाई कोटणीसांच्या आग्रहाने ते फोटोस बसण्यास तयार झाले. पण त्यांनी एक अट घातली की माझ्या बरोबर बापूराव सुद्धा फोटोत यावयास हवेत. ही अट श्रीमामांनी मान्य केली आणि खुर्चीत बसलेले नारायणमहाराज आणि त्यांच्या उजव्या बाजूस उभे असलेले श्रीमामा, असा त्या दोघांचा फोटो काढण्यात आला. हा फोटो आजही रामनिकेतनमध्ये झळकत आहे.

या रौप्यमहोत्सवात आणखी एक औचित्य साधण्यात आले ते असे :- ज्या कोटणीसमहाराजांच्या आज्ञेने श्रीमामांचे नित्य कीर्तन सुरू झाले, आणि ज्यांच्या कृपेने ते कीर्तन अखंड पंचवीस वर्षे चालले, त्यांचे ज्येष्ठ अधिकारी चिरंजीव श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराज यांचा गौरवपूर्वक सत्कार करण्यात आला.

या रौप्यमहोत्सवात श्रीदादांनी अनेक सज्जनांची कीर्तने, प्रवचने, निरूपणे, भजने आणि भाषणे आयोजित केली होती. अनेकांनी श्रीमामांच्या गुणांचा गौरव

करणारी भाषणे केली. काही जण म्हणाले :- काशी, रामेश्वर, प्रयाग, गोकर्ण, बद्रीकेदार, अयोध्या, द्वारका, पंढरपूर इत्यादि तीर्थक्षेत्रे या श्रीमामांच्या रामनिकेतनमध्ये एकवटली आहेत (अकी). एक वक्ता तर म्हणाला, ''हे मामांचे रामनिकेतन आणि तेथील त्यांचे कीर्तन सतत चालू असताना 'कशास जावे दूर । माझे येथेच पंढरपूर' असे वाटते.''

अशाप्रकारे मोठ्या धूमधडाक्याने श्रीमामांच्या नित्य कीर्तनाचा रौप्य महोत्सव पार पडला. यथाक्रम इ. स. १९४९ सालाचा नोव्हेंबर महिना उजाडला. या महिन्यात दिनांक १८-११-१९४९ या दिवशी श्रीमामांना तिसरा नातू झाला. या नातवाचे नाव अनल असे ठेवण्यात आले. हा अनल पुढे बी. कॉम् होऊन सांगली बँकेत मोठा ऑफिसर झाला.

यथाक्रम इ. स. १९५०-१९५१ साल उजाडले. यावेळी मुंबई जवळील पालघर नावाचे जे गाव आहे, तेथे रहाणाऱ्या श्रीमंत माईसाहेब दांडेकर या भाविक महिला सांगलीमध्ये रहाण्यास आल्या होत्या. काही दिवस त्यांचा मुक्काम श्रीमामांच्या घरी होता. त्यांना श्रीमामांचे विषयी फार आदर वाटत असे. श्रीमामांचे घरी असताना त्यांना सहजच असे कळून आले की श्रीमामांना साठावे वर्ष लागले आहे. परंतु त्यांच्या साठीशांतीचा सोहळा झालेला नाही. तेव्हा त्यांनी श्रीदादांना असे सुचविले, ''रामभाऊ, आपण श्रीमामांच्या साठीचा समारंभ करू. मी त्यांची समजूत घालते. फक्त हा सोहळा थाटामाटाने करूया नको. कारण ते त्यांना रुचणार नाही. तरी आपण हा समारंभ घरगुती स्वरूपात साधेपणाने पार पाडू या.'' ही मसलत श्रीदादांना पसंत पडली आणि मग श्रीदादा व माईसाहेब यांच्या पुढाकाराने श्रीमामांचा षष्ट्यब्दि सोहळा घरातच साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला श्री. वझे गुरूजी यांचे पौरोहित्य लाभले होते. त्यांनी सर्व कार्यक्रम शास्त्रोक्तपणे यथासांग पार पाडले. यावेळी माईसाहेबांच्या आग्रहामुळेच श्रीमामा, त्यांच्या पत्नी सौ. इंदिराबाई, इत्यादींचा फोटो काढण्यात आला. हा फोटो आजही रामनिकेतनमध्ये डौलाने चमकत आहे.



या सुमारास श्रीमामांचे चिरंजीव श्रीदादा यांच्या सांगली संस्थानच्या नोकरीत फरक पडला होता. इ. स. १९४८ नंतर गांधीवधोत्तरच्या काळात भारतातील देशी संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन होण्याचा/करण्याचा धडाका सुरू झाला. दक्षिण महाराष्ट्रातील अनेक संस्थाने महाराष्ट्र राज्यात विलीन होऊ लागली. सांगली संस्थानही विलीन झाले. संस्थानचे सेवक महाराष्ट्र राज्याचे सेवक बनले. आणि मग नोकरांच्या बदल्या होऊ लागल्या. त्यात श्रीदादांची बदली झाली आणि त्यांची बदली तासगावला झाली. ही बदली रद्द होऊ शकेल काय याची चाचपणी श्रीदादांनी केली. तेव्हा त्यांना सांगण्यात आले ''बदली रद्द होणार नाही. बदली नको असल्यास ग्रॅच्युइटी घेऊन सेवामुक्त व्हावे.'' मुळात श्रीदादांना नोकरी नकोच होती. आता बदली होऊन परगावी जाणे आले. तसे करणे आपणास जमणार नाही असे श्रीदादांना वाटले. तेव्हा नोकरी सोडून ग्रॅच्युईटी घ्यावे असे श्रीदादांना वाटू लागले. आपला हा बेत श्रीदादांनी श्रीमामांना सांगितला.आपल्या मुलाची मन:स्थिति श्रीमामांना नीट कळत होती म्हणून त्यांनी श्रीदादांच्या बेताला संमति दिली. श्रीमामांचे पाठबळ मिळताच श्रीदादांनी नोकरीचे त्यागपत्र दिले.

बायको आणि मुले असणारे तरुण श्रीदादा आता घरी स्वस्थ बसून काय करणार, असा प्रश्न पडलेल्या काही हितचिंतकांनी तासगावला पुरवठा खात्यात नोकरी मिळवून दिली. आणि इतरांच्या आग्रहाचा रेटा श्रीदादांच्या मागे इतका लागला की त्यांचे मन मोडू नये, या एकाच इच्छेने श्रीदादा या नवीन नोकरीवर रुजू झाले. या नोकरीतील परिस्थिति अत्यंत चमत्कारिक होती इतकी की ती अंगाशी येण्याची शक्यता होती. ती परिस्थिति श्रीदादांना अजिबात आवडली नाही. ही नोकरी ताबडतोब सोडावयाची असा त्यांनी मनाशी निश्चय केला आणि चार पाच दिवसांतच रजा मंजूर करवून घेऊन श्रीदादा सांगलीस आले. या नवीन नोकरीतील सर्व परिस्थिति त्यांनी श्रीमामांना समजावून सांगितली. ''या नोकरीत रहाणे हे मला त्रासदायक ठरेल'' असे त्यांनी श्रीमामांना स्पष्टपणे

सांगितले. त्यांच्या सांगण्याचा श्रीमामांनी नीट विचार केला. आणि नोकरी सोडण्याच्या श्रीदादांच्या बेताला आपली अनुमति दिली. मामांची संमति मिळताच श्रीदादांनी सांगलीतूनच नोकरीचे त्यागपत्र पाठवून दिले. अशा प्रकारे श्रीदादांच्या नोकरीची इतिश्री झाली.

माईसाहेब दांडेकरांच्या अत्याग्रहामुळे एके वर्षी श्रीमामा व सौ. इंदिराबाई हे दोघेही पालघरला गेले होते. सांगलीस परत येताना ते दोघे प्रा. के. वा. आपटे यांच्या मुंबईच्या घरी उतरले होते. त्यावेळी प्रा. आपटे हे मुंबईला नोकरी करीत होते. त्यांच्या घरचा पाहुणचार झाल्यावर श्रीमामा व सौ. इंदिरा परत निघाले. त्यांना पुण्यापर्यंत पोचवण्यास प्रा.आपटे त्यांच्या बरोबर गेले. पुण्यात भरत फाटक यांचे घरी मुक्काम असताना श्रीमामांनी देहू व आळंदी येथे जाण्याचा बेत केला. त्यानुसार श्रीमामा, सौ. इंदिरा, भरत फाटक आणि प्रा. आपटे हे सकाळच्या एस. टी. बसने प्रथम देहूला गेले. तेथे तुकाराममहाराजांचे दर्शन झाल्यावर श्रीमामा म्हणाले, ''आपण आता आळंदीला जावयाचे.'' पण आळंदीला जाण्यास संध्याकाळपर्यंत एस. टी. बस नव्हती. तेव्हा श्रीमामा बोलले, ''आपण एक बैलगाडी भाड्याने घेऊ आणि मधल्या रस्त्याने आळंदीला जाऊ.'' त्याप्रमाणे बैलगाडी ठरविण्यात आली. ते दिवस कडक उन्हाळ्याचे होते. बैलगाडीला छप्पराचे आच्छादन नव्हते. आणि तशा कडक उन्हात ते चौघेही जण बैलगाडीतून आळंदीला गेले. आळंदीत पोचण्यास बैलगाडीला दोन तास लागले. दोन तास चौघेही उन्हाचा तडाका सोसत बसले होते. आळंदीला ज्ञानेश्वरमहाराजांचे दर्शन घेतल्यावर सर्वजण एस. टी. स्टँडवर आले. बसला तुफान गर्दी होती. बसमध्ये उभे रहाण्यास जागा मिळाली. काही काळ चौघेही जण बसमध्ये उभे राहिले. नंतर बसण्यास जागा मिळाली. मग श्रीमामा व सौ. इंदिराबाई पुण्याहून निघाले आणि सांगलीत पोचले.

श्रीमामांच्या चौथ्या नातवाचा जन्म दि. २५-२-१९५६ रोजी झाला. त्याच्या जन्माच्या वेळची हकिकतही श्रीमामांचे मोठेपण दाखविणारी आहे.



सांगलीस आपल्या घरीच सौ. सीतावहिनी प्रसूत झाल्या. जन्मलेल्या मुलाचे अंग थंडगार पडलेले होते. त्याच्या अंगात चेतनाच नव्हती. त्याला शेक देणे सुरू करून डॉक्टरांना बोलावण्यात आले. परंतु डॉक्टरांचा काहीही उपाय लागू पडला नाही. त्यावेळी माईसाहेब दांडेकर श्रीमामांच्या घरी रहात होत्या. त्यांना नूतन मुलाची स्थिति कळली. त्या तडक श्रीमामांच्या कडे गेल्या आणि मुलाबद्दल सर्व सांगून त्या श्रीमामांना म्हणाल्या, ''मामा, आता तुम्हीच मुलासाठी देवाचे तीर्थ व अंगारा द्या. त्यांचा उपयोग होईल.'' तेव्हा कुलदेव रामेश्वर यांचे स्मरण करून श्रीमामांनी देवाचे तीर्थ व अंगारा माईसाहेबांच्या स्वाधीन केला. माईसाहेब नूतन अर्भकाजवळ आल्या. श्रीमामांनी दिलेले तीर्थ त्यांनी थोडे मुलाच्या मुखात घातले व थोडे मुलाच्या अंगावर शिंपडले. आणि मुलाच्या सर्व अंगाला श्रीमामांनी दिलेला अंगारा चोळून चोळून लावला. काही क्षणातच मुलाच्या अंगात चेतना आली आणि हातपाय हलवून मूल रडू लागले. पुढे या मुलाचे नाव अनिलप्रभू असे ठेवण्यात आले. हा मुलगा पुढे बी.एस्.सी. झाला आणि स्टेट बँकेत नोकरीला लागला.

***

# प्रकरण–९

## निंबरगी यात्रा, त्रितप महोत्सव

**(इ.स. १९५७-१९६०)**

अनंतराव कुलकर्णी नावाचे एक भक्त श्रीमामांच्या दर्शनास येत असत. त्यांना मधुकर नावाचा मुलगा होता. तो इ. स. १९५७-५८ च्या सुमारास टायफॉईडने आजारी पडला. पासष्ट दिवस तो तापाने तळमळत होता. डॉक्टरांनी त्याची आशा सोडली होती. श्रीमामा एक दिवस त्याचे घरी गेले. मधुकर क्षीण आवाजात श्रीमामांना म्हणाला, ''मामा, मी आता मरणार आहे. कारण डॉक्टरांनीही माझी आशा सोडलली आहे.'' हे ऐकल्यावर श्रीमामा त्याला म्हणाले, ''मधुकर, तू मुळीच मरणार नाहीस. तुला अजून पुष्कळ कार्य करायचे आहे.'' असे आश्वासन देऊन श्रीमामांनी त्याचे अंगावरून हात फिरविला आणि नंतर त्याचे कपाळावर अंगारा लावला. आणि मधुकर त्या जीवघेण्या दुखण्यातून वाचला. हाच मधुकर पुढे एम्.ए. होऊन कोल्हापूरला कॉमर्स कॉलेजमध्ये प्राध्यापक झाला आणि स्वामी अमलानंदाचा अनुग्रह घेऊन तो स्वामी प्रज्ञानंद झाला. त्यानेच आपली ही हकिकत एका लेखात कथन केली आहे.

अण्णा देवधर हे मामांचे भक्त होते. त्यांनी एकदा स्वत:च्या मोटारीतून श्रीमामांना सिद्धगिरि येथील काडसिद्धांचे दर्शन घडवून आणले (गोचमा,पृ.१०९).

सांगलीमध्ये पंडितराव परचुरे नावाचे श्रीमामांचे एक भक्त होते. त्यांच्या मनात एकदा असे आले :- ''निंबरगीकरमहाराज हे श्रीमामांच्या संप्रदायाचे प्रवर्तक. तेव्हा श्रीमामांना घेऊन, निंबरगीकरमहाराजांच्या समाधीच्या दर्शनास



आपण निंबरगीस जावे.'' त्यांनी आपला विचार श्रीमामांना सांगितला. त्यांना तो आवडला. निंबरगीचा हा प्रवास स्वतंत्र खाजगी मोटारीतून होणार असल्याने श्रीमामांना प्रवासाचा त्रास होणार नव्हता. इ. स. १९५८ मध्ये निंबरगीस जाण्याचे ठरले. श्रीमामांच्या घरची मंडळीही येणार होती. श्रीदादांनी सखाराम नाना जोगळेकर व प्रा. के. वा. आपटे यांना मुंबईहून सांगलीस बोलवून घेतले. कोल्हापूरहून आपली शिकारीची गाडी घेऊन, विजयसिंह सुर्वे हे श्रीमामांचे भक्त सांगलीत आले. श्रीमामा व सौ. इंदिरा यांच्यासाठी एक स्वतंत्र मोटार आणि सौ. सीता वहिनी व त्यांची मुले यांचेसाठी एक मोटार असा मोटारींचा ताफा जमला.

प्रवासाला निघण्याचा जो दिवस ठरला होता, त्याचे आधीपासून जोरदार पाऊस सुरू झाला. कर्नाटकात सगळीकडे नाले ओढ्यांना पाणी आले आहे असे कळले. परंतु निघण्याचे दिवशी पाऊस नसल्याने, सकाळी ६ वाजता सर्व जण चार मोटारीतून निघाले. वाटेत ठिकठिकाणी ओढे ओलांडावे लागले. एकदा एका ओढ्याच्या पाण्यातच श्रीमामांची मोटार बंद पडली. ओढ्याला पुनः पाणी आले असते तर खैर नव्हती. शेजारच्या शेतातले बैल आणवून श्रीमामांची मोटार पाण्याबाहेर काढण्यात आली. पुढे विजापुरवरून निंबरगीच्या वाटेला मोटारी लागल्या. थोडासा अंधार पडू लागला होता. निंबरगीच्या वाटेवर एके ठिकाणी अतिशय चिखल झालेला होता. त्यात मोटारी रुतण्याची भीति वाटल्याने पुढे जाणे रद्द करावे लागले. मग मागे वळून मोटारी जवळच असणाऱ्या चडचाण गावच्या रस्त्याने निघाल्या. चडचाणला पोचण्यास रात्रीचे आठ वाजले. सकाळी ६ ते रात्री ८ या चौदा तासांच्या प्रवासात श्रीमामा एकदाही मोटारीतून खाली उतरले नव्हते. ''श्रीमामा देव आहेत म्हणून ते देवासारखे स्थिर बसले,'' असे सौ. पमाताई परचुरे म्हणाल्या.

चडचाण गावी मारुतीच्या एका मोठ्या मंदिराजवळ मोटारी उभ्या करण्यात आल्या. आता मात्र श्रीमामा चट्दिशी मोटारीतून खाली उतरले आणि ते तडक

मारुतीच्या देवळात गेले. त्यांनी मारुतीला वंदन केले. आणि नित्याच्या कीर्तनाची वेळ टळून गेली असल्याने, त्यांनी ताबडतोब मारुतीच्या मूर्तीपुढे आपले नित्याचे कीर्तन सुरू केले. तासभर त्यांचे कीर्तन झाले. श्रीमामा जेव्हा कीर्तन करीत होते तेव्हा त्यांच्या भालप्रदेशावर भस्माचे तेज:पुंज पट्टे दिसून येत होते.

ती संपूर्ण रात्र चडचाण गावात व्यतीत करावी लागली. दुसरे दिवशी सकाळी मंडळी निंबरगीस जाण्यास निघाली. पूर्वी जेथे भरपूर चिखल होता तेथे आल्यावर त्या चिखलात आजूबाजूचे लहान मोठे दगड इत्यादि टाकून मोटारीसाठी रस्ता करण्यात आला. मोटारी पलीकडे गेल्या आणि मग थेट निंबरगीत जाऊन थांबल्या. तेथे सर्वांनी निंबरगीकरमहाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले आणि ''नमो नमो गुरूलिंग जंगमेशा ।। नाम राहितने । नारायण महात्मने । भव कडिसो बेगने । निजधामने'' हा अभंग म्हटला. समाधीचे दर्शन झाल्यावर श्रीमामांनी महाराजांच्या समाधीपुढे तासभर कीर्तन केले. त्यानंतर निंबरगीचे ग्राम दैवत असणाऱ्या, भीमराय नाव असणाऱ्या, मारुतीच्या दर्शनास सर्व जण निघाले. वाटेत ओढा होता आणि त्यात गुडघाभर पाणी होते. त्यावेळी एका मुसलमान माणसाने श्रीमामांना आपल्या पाठीवर घेतले आणि त्यांना ओढ्याचे पलीकडे पोचविले.

भीमरायाचे दर्शन घेऊन मंडळी परत फिरली. गावात आल्यावर सर्व जण निंबरगीकरमहाराजांच्या घरी गेले. घरातील मंडळींना श्रीमामांनी आहेर केला. त्यांनी श्रीमामा व इतर सर्वजण यांना तीर्थ प्रसाद दिला. मग समाधानाने सर्व मंडळी सांगलीस येण्यास परत फिरली. येताना श्रीमामांची गाडी उमदी गावी गेली. तेथे उमदीकरमहाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन श्रीमामा सांगलीस परत आले.

अनेक अडचणी आल्या तरी दयाळू निंबरगीकरमहाराज आपल्या भक्तांना त्यातून पार नेतात याचा प्रत्यय या निंबरगीच्या यात्रेत आला. तसेच, देहकष्ट भोगणे, तक्रार न करणे आणि कीर्तनाचा नेम चुकवू न देणे या श्रीमामांच्या



गुणांचा परिचय या यात्रेच्या निमित्ताने जवळच्या मंडळींना आला.

श्रीमामांना निंबरगीस नेऊन पंडितराव परचुरे यांचे समाधान झाले नाही. ते श्रीमामांना म्हणाले, ''मामा, आपण रेणागिरि येथील रेवणसिद्धाच्या दर्शनास जाऊन येऊ.'' श्रीमामा कबूल झाले. तेव्हा पंडितरावांनी श्रीमामांना रेणागिरीस नेले आणि त्यांना रेवणसिद्धांचे दर्शन घडविले (गोचमा, ११०).

या सुमारास श्रीमंत माईसाहेब दांडेकरांच्या आग्रहावरून श्रीदादा पालघरला गेले होते. त्यावेळी सांगलीत एके दिवशी सकाळी पूजा करताना मामांची शुद्ध गेली. त्यावेळी निंबरगीकरमहाराज पालघरात श्रीदादांचे पुढे प्रगट झाले आणि त्यांनी श्रीदादांना घाईने सांगलीस परतण्याची सूचना केली. त्याप्रमाणे श्रीदादा सांगलीस परतले.

आश्विन शुद्ध एकादशी, इ. स. १९५९ या दिवशी श्रीमामांचे रामनिकेतनमध्ये कीर्तन चालू होते. आणि अचानकपणे राम, सीता, ज्ञानेश्वरमहाराज, गुरूलिंगजंगममहाराज आणि तात्यासाहेबमहाराज कोटणीस हे श्रीमामांच्या कीर्तनात प्रगट झाले. ते सर्व उपस्थितांना दृश्य नव्हते. त्यावेळी देव्हाऱ्यावरील निशाण वारा नसताना फडफडू लागले आणि सर्वत्र एक वेगळाच प्रकाश पसरला आणि काही काळ अनामिक सुगंध सर्वत्र दरवळून राहिला होता (अकी, पृ. ११८-११९).

इ. स. १९५९ चे अंतास श्रीमामांची प्रकृति बरीच क्षीण झाली होती. तरी ते रोज सकाळी गंगाधर सिंगांच्या हनुमान समाधि मंदिरात कोटणीसमहाराजांच्या समाधीच्या दर्शनात जात असत. शरयू उपळावीकर नावाची श्रीमामांची एक भक्त होती. ती यावेळी श्रीमामांच्या बरोबर असे (गोचमा, पृ. ८३).

श्रीमामांची प्रकृति आता वयोमानानुसार बेतास बेत झाली होती. तथापि त्यांची नित्य कीर्तने चालू होती. अशा स्थितीत इ. स. १९६० साल उजाडले. हे साल श्रीमामांच्या नित्य कीर्तनाच्या इतिहासात महत्त्वाचे होते. कारण इ.स. १९२४ पासून सुरू झालेल्या श्रीमामांच्या नित्य कीर्तनाला ३६ वर्षे-तब्बल

तीन तपे-पुरी होत होती. साहजिकच त्यांच्या कीर्तनाच्या रौप्य महोत्सवाप्रमाणे त्यांच्या कीर्तनाचा त्रि-तप-महोत्सव साजरा होणे क्रमप्राप्तच होते.

तात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे इ. स. १९२४ सालच्या माघ महिन्यापासून श्रीमामांनी आपले नित्य कीर्तन सुरू केले होते. त्याला इ.स.१९६० मध्ये तीन तपे पूर्ण होणार होती. या प्रदीर्घ काळात रोज किमान एक कीर्तन या हिशोबाप्रमाणे श्रीमामांची १३२४० (३६५ x ३६) इतकी नित्य कीर्तने झाली होती. श्रीमामांना जरी आपल्या कीर्तन सेवेचा गौरव नको होता तरी श्रीदादांनी आपल्या हट्टाने श्रीमामांच्या कीर्तनाचा जसा रौप्यमहोत्सव घडवून आणला होता, त्याप्रमाणे यावर्षी श्रीमामांच्या कीर्तनाचा त्रितपमहोत्सव मोठ्या थाटामाटाने करण्याचे श्रीदादांनी ठरविले आणि त्याप्रमाणे तो महोत्सव पारही पाडला.

या त्रितप महोत्सवाच्या निमित्ताने रामनिकेतनमध्ये अनेक विद्वान, संत महंत यांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आल होते. भजने, निरूपणे, कीर्तने, प्रवचने आणि भाषणे आयोजित केली गेली होती. ह. भ. प. देवधर वकिल, ह. भ. प. देशमुख वकिल, ह. भ. प. हरेरामपंत बोडस, इत्यादि सज्जनांचे सुश्राव्य कार्यक्रम झाले. ह. भ. प. हरेरामपंत बोडस यांनी तर भगवद्गीतेच्या आधारे श्रीमामांच्या जीवनाचा आलेख श्रोत्यांपुढे सादर केला.

श्रीमामांच्या कीर्तन त्रितप महोत्सवाचे मुख्य पाहुणे होते सिद्धगिरीचे काडसिद्ध मठावरील तत्कालीन मठाधिपति काडसिद्धमहाराज. श्रीमामा व श्रीदादा या दोघांनाही निंबरगीकरमहाराजांचे विषयी अत्यंत आदर होता. या निंबरगीकरमहाराजांचे गुरु होते पहिले काडसिद्ध. त्यांची परंपरा सिद्धगिरीच्या काडसिद्ध मठात चालू होती. त्या परंपरेतील तत्कालीन काडसिद्धांना मुख्य पाहुणे म्हणून निवडण्यात एक औचित्य साधलेले होते. आणि काडसिद्धमहाराजांचे प्रवचन हे या समारंभाचे प्रमुख वैशिष्ट्य होते. ते म्हणाले, ''मामा म्हणजे नको. नको म्हणजे माणसाने अहंकार करू नये. अहंकार दूर सारून रामनामाचे स्मरण



केल्यास परमार्थ पूर्ण होतो. मामांनी आपल्या जीवनात अहंकार दूर सारला आणि आपला परमार्थ पूर्ण केला. आपल्या छत्तीस वर्षांच्या कीर्तनात श्रीमामांनी याच गोष्टीवर भर दिला.''

सिद्धगिरी मठाधिपति काडसिद्धमहाराजांचा दीपलक्ष्मी मासिकात प्रसिद्ध झालेला संदेश पुढील प्रमाणे आहे :-''आमच्या मामांचा परिचय फक्त दोन दिवसांचा. परिचयाचा पहिला दिवस मामांच्या तीन तपे कीर्तनाच्या उत्सवा दिवशी. त्यानंतर मामा सिद्धगिरीस आल्यावेळी. परिचय दोन दिवसांचा; परंतु त्यावेळी मामांनी आम्हास काय दिले हा महत्त्वाचा विषय. मामांनी आम्हास देऊ नये ते दिले. न संपणारी वस्तु दिली. विस्मरण न होणारी वस्तु दिली.''

संसारी मामा म्हणजे आईचा भाऊ (भाव). मामा आले की काहीतरी घेऊन येणारच; परंतु मला मिळाले नाही, तुला मिळाले नाही, अशीच मुलांची कुरकूर. असा पदार्थच मामा आणणार. थोड्याच वेळात मा, मा नाही नाही! असा आवाज उत्पन्न करणारे ते मामा.

''या मा,मा ची उत्पत्ति मी आणि माझे पासूनच. हे सर्व संसारी मामा, हे सर्वांचे मामा आहेतच. आमच्या परमार्थी मा,मा ची उत्पत्ति मा,मा, नाही ! नाही! पासून. मी कोणी नाही! अशीच आमच्या मामांची शिकवण-देणगी. छत्तीस वर्षे अव्याहत मी कोणी नाही! मी कोणी नाही ! सर्व प्रभूच !! अशीच शिकवण.''

''मला छत्तीस वर्षे तपश्चर्येचे फळ म्हणून हे जपून ठेव'' असे कळवळून सांगितले. आणि त्याबरोबर ''हे अमृतफळ सर्वांना मी जसे वाटले तसेच तू वाटत जा; संपवायचे नाही'' असे आश्वासन दिले. तेच मी करणे माझे कर्तव्य समजतो. मामांचे ऋण त्याशिवाय फिटावयाचे नाही. ऋणमुक्तेश्वर होण्या करता ऋणमुक्तेश्वर मामांचे स्मरण म्हणजेच मामांप्रमाणे कर्तव्य करीत रहाणे, हेच माझे कर्तव्य समजतो.''

त्रितप महोत्सवाच्या संपूर्ण उत्सवात निंबरगीकरमहाराजांचे अधिकारसंपन्न

पणतू श्रीगुरुसिद्दप्पामहाराज जातीने उपस्थित होते, हे या समारंभाचे दुसरे स्मरणीय वैशिष्ट्य होते.

या त्रितपमहोत्सवाच्या निमित्ताने जे एक दोन प्रसंग घडले त्यांचीही नोंद घेणे आवश्यक आहे. त्यातील पहिला प्रसंग असा:- श्रीमामांनी आपला नित्य कीर्तनाचा क्रम कसा व केव्हा सुरू केला याचे साधार आणि सविस्तर वर्णन करणारे एक छोटे पुस्तक प्रा. के. वा. आपटे यांनी लिहिले होते. त्याचे नाव 'श्रीगुरूतृतीयाकथा' असे होते. हे पुस्तक मुंबईचे श्री. स. वि. जोगळेकर यांनी प्रकाशित केले. हे पुस्तक तात्यासाहेबमहाराज कोटणीसमहाराजांना अर्पण करण्याचा कार्यक्रम श्रीगुरुसिद्दप्पामहाराज यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला.

दुसरा प्रसंग असा घडला की त्याचे योगे श्रीमामांचे महत्त्व ठळकपणे लोकांच्या लक्षात आले. माधवनगर येथील श्री. भा. द. लिमये, वासुदेवराव जोशी, बापूराव जोशी, तात्या करंदीकर इत्यादि मामाप्रेमी मंडळींनी असे ठरविले:- अखंड छत्तीस वर्षे श्रीमामांनी कीर्तन केले. या अभूतपूर्व कार्याबद्दल श्रीमामांचा सत्कार करावयाचा. तसे त्यांनी श्रीमामांना कळविले. श्रीमामांनी या गोष्टीला संमति दिली नाही. पुढे काय झाले ते श्री. भा. द. लिमये असे सांगतात :-

''आम्ही माधवनगर येथे ह. भ. प. वासुदेवराव जोशी यांचे घरालगत बांधलेल्या इमारतीत एका कीर्तन मंदिराचे उद्घाटन त्यांचे (श्रीमामांचे) हस्ते करून दुधाची तहान ताकावर भागवली. या कीर्तन मंदिराचे उद्घाटनप्रसंगी जो स्वल्प आहेर म्हणून माधवनगरातील कीर्तनप्रेमी श्रोत्यांचे वतीने (श्रीमामांना) करण्यात आला, तोही प. पू. बापूरावजींनी संप्रदायाचे मूळ प्रवर्तक श्रीगुरुलिंगजंगममहाराज यांचे पणतू श्रीगुरुसिद्दप्पामहाराज यांचेकडे निंबरगीसच आहेराचे श्रीफळ व महावस्त्र वगैरे सर्वच पाठवून द्या, असे सांगून श्रोत्यांना सहज मौन धरावयास लावले'' (पहिला दीप. मिरज, संवत्, २०१६, पृ. ३).

वरील प्रसंगी श्रीमामा जेव्हा माधवनगरास गेले होते, त्यावेळी माधवनगर येथील श्री. वा. वि. फडके यांनी श्रीमामांचे गुणवर्णन करणारी आणि त्यांना



शुभेच्छा देणारी एक संस्कृत रचना केली होती. आर्ष संस्कृतमधील ही रचना अशी आहे :-

गोविंदस्यागमने नुषिता: स्यो व संशय: ।
यस्य कृते चातकीव प्रतिक्षामो अयं क्षण: ।।१।।
विंदमोऽद्य वयं तस्मिन् श्रीभक्त: पुरुषोत्तम: ।
अनुष्ठितं व्रतं येन कीर्तनस्य प्रभावकृत् ।।२।।
दासो यो हनुमंतस्य श्रद्धावान् तत्परायण: ।
शांतो दांतो कृपालुश्च सर्वभूतहिते रत: ।।३।।
यस्य दर्शन सुखाकांक्षी श्रोतृवृंद: सदातुर: ।
सुफलोऽयं अद्य जात: उद्यमस्तत्प्रसादत: ।।४।।
न लाभो न कीर्तिश्च प्रियं नास्ति कभंजन ।
एकमेव हरेर्नाम सदास्ति सुखकारकम् ।।५।।
मस्तकं कर युग्नं च करिष्यामो तदर्षणम् ।
ददातु भगवांतस्यै दीर्घायुष्यादि-वैभवम् ।।६।।

श्रीमामांच्या कीर्तनाच्या रौप्यमहोत्सव प्रसंगी, श्रीदादांना मालाडच्या केतकरमहाराजांचे दि. ५-३-१९४९ चे पत्र आले होते. त्यात त्यांनी अशी शुभेच्छा व्यक्त केली होती :- ''आपले वडिलांनी सर्वस्वी भगवंताला वाहून घेतले आहे. त्यांची नित्य हरिकीर्तनाची सेवा श्रीकृपेनेच अखंड चालू राहील यात शंका नाही'' (गुरुतृतीया, पृ.१८). सांगावयास आनंद होतो की श्रीमामांची कीर्तन सेवा ही अखंड छत्तीस वर्षे चालली आणि त्यानंतरही श्रीमामांनी मरणकालापर्यंत कीर्तन केले.

इ. स. १९२४ ते १९६० या छत्तीस वर्षांत श्रीमामा कसे होते आणि त्यांनी काय केले हे सांगणारे एक उत्तम पद आहे. ते येथे उद्धृत केले आहे :-

तीन तपे केला कीर्तनाचा छंद । हृदयी परमानंद श्रोतयांचा ।।१।।
कष्टविला देह राबविले मन । संसारी असोन विरक्त हा ।।२।।

देही वा विदेही पूर्ण समाधानी । आनंद निधानी लक्ष सदा ।।३।।
परमार्थाची केली उभी पाठशाळा । आनंद गोपाळा भक्तमेळी ।।४।।
करोनिया सांगे सांगोनि करवी । भक्ता मोक्ष पदवी निश्चयाची ।।५।।
(गुरुतृतीया, पृ. २०).

अशाप्रकारे श्रीमामांच्या कीर्तनाचा त्रितप महोत्सव मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने पार पडला. इ. स. १९६० मध्ये पार पडलेल्या या महोत्सवानंतर श्रीमामा फक्त दोनच वर्षे या भूतलावर राहिले. त्यांच्या महानिर्वाणाचा प्रसंगही मनाला थक्क करणारा आहे. तो वर्णन करण्यापूर्वी मामांचे महत्त्व दाखवून देणाऱ्या त्यांच्या जीवनातील काही घटना संक्षिप्तपणे पहाणे आवश्यक आहे. तसेच श्रीमामांच्या अंगी कोणते गुण बाणलेले होते हे पहाणेही तितकेच महत्त्वाचे आहे. खेरीज श्रीमामांची जी ग्रंथसंपदा आज उपलब्ध आहे तिचा परिचय करून घेणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. म्हणून या तीन विषयांचा निर्देश आता केला आहे. आणि त्यानंतर श्रीमामांचा निर्वाणप्रसंग वर्णिलेला आहे.

***

## प्रकरण-१०

## श्रीमामांच्या जीवनातील कांही घटना, प्रसंग

श्रीमामांच्या दीर्घ जीवनात काही संस्मरणीय घटना/प्रसंग आहेत. त्यातील काही त्यांच्या लौकिक जीवनाशी संबंधित आहेत तर इतर काही त्यांच्या पारमार्थिक जीवनाशी संबंधित आहेत. त्यातील पूर्वोक्त घटना (अ) या शीर्षकाखाली यापुढे दिल्या आहेत. तर उत्तरोक्त प्रसंग हे (आ) या शीर्षकाखाली निर्देशिले आहेत.

**अ) लौकिक जीवनाशी निगडित घटना**

१) श्री. बळवंतराव गोडबोले या नावाचे शिक्षक शाळेत श्रीमामांचे सहकारी होते. एकदा ते आणि श्रीमामा फिरावयास निघाले. चालता चालता बळवंतरावांनी विचार केला, ''परत फिरू या'' असे बापूरावांनी म्हणेपर्यंत आपण परतायचे नाही. इकडे श्रीमामांच्या मनातही विचार आला की बळवंतराव हे ''परत फिरू या'' असे म्हणतील तेव्हा आपण परतू. दोघेही चालतच राहिले. ''आता परत फिरू या'' असे कोणीच म्हणेना. तसेच चालच चालत ते दोघेही नरसोबाच्या वाडीला पोचले. तेव्हा मात्र बळवंतरावांना रहावेना. ते म्हणाले, ''बापूराव, आत आपण परत फिरू या.'' तेव्हा श्रीमामा म्हणाले, ''बळवंतराव आता तुम्ही म्हणतात तर आपण परत फिरू.'' मग दोघेही सांगलीस परत आले.

२) श्री. अनंतराव म्हसकर हे मामांचे बालपणापासूनचे स्नेही. ते एकदा श्रीमामांना म्हणाले, ''बापू, आपण नेहमी म्हणतो की देव हा माणसाला अन्नदाता आहे. आपण या म्हणण्याची आज परीक्षा पाहू या.'' ''ठीक आहे''

श्रीमामा बोलले. सकाळीच दोघे बाहेर पडले आणि मिरजेच्या दिशेने चालू लागले. बराच वेळ गेला. अनंतरावांना भूक लागली.तेव्हा अनंतराव म्हणाले, ''बापू, आता आपण परत फिरू या.'' इतक्यात रस्त्याकडेच्या एका झोपडीतून एक वृद्ध गृहस्थ बाहेर आला आणि आणि त्या दोघांना हाक मारून त्याने म्हटले, ''बाबांनो, आता दुपार झाली आहे. माझ्या झोपडीत या आणि चटणी भाकर खावा. मग जिकडे जायचे तिकडे जावा.'' दोघेही झोपडीत शिरले. म्हाताऱ्याने दिलेली भाजी भाकर त्यांनी खाल्ली. मग श्रीमामा अनंतरावांना म्हणाले, ''अनंता, देव अन्न कसा देतो ते पाहिलेस ना!'' ''देव अन्नदाता आहे हे आता पटले'' अनंतराव उद्‌गारले. मग दोघेही सांगलीला परतले.

३) भीमाबाई नावाची एक स्त्री श्रीमामांच्या कीर्तनास येत असे. तिची अशी प्रसिद्‌धि होती की ती बाई पाठीत उसण भरणे, इत्यादीवर मंत्र घालून ते रोग बरे करते. तिला कुणीतरी विचारले, ''मावशी, इतका प्रभावी मंत्र तुम्हाला कुणी दिला?'' यावर भीमाबाई म्हणाली, ''अहो, हा मंत्र म्हणजे श्रीमामा कीर्तनात जे श्रीराम जय राम जय जय राम म्हणावयास सांगतात तोच मंत्र आहे. मी तोच मंत्र म्हणते.'' (अकी पृ.६५)

४) आप्पाराव पोवार नावाचे गृहस्थ हे श्रीमामांच्या नित्य कीर्तनात उपस्थित असत. श्रीमामा कीर्तनात 'रामाचे नाम घ्या' असे सांगत. ते ऐकून अप्पाराव रामनाम घेऊ लागले आणि तो त्यांचा छंद वाढत गेला. पुढे मामांच्या कीर्तनाचे महत्त्व सांगणारी पदे/अभंग त्यांना स्फुरले. त्यांनी ते अभंग 'गोविंद कीर्तन गुणगान' या शीर्षकाखाली प्रसिद्ध केले. रामनामाचा त्यांचा व्यासंग वाढत गेला आणि रामनाम म्हणतच त्यांनी देह ठेवला. त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी त्यांचे घरी कीर्तन करण्यास श्रीमामांना निमंत्रण येई. श्रीमामा तेथे जाऊन कीर्तन करीत.

५) तात्यासाहेब कोटणीसमहाराज हे नेहमी श्रीमामांची स्तुति करीत. तेव्हा एका गृहस्थाने त्यांना विचारले, ''महाराज, बापूराव आपल्या कीर्तनात रोज



येतही नाहीत. मग तुम्ही त्यांचे वर्णन कसे काय करता?'' यावर कोटणीसमहाराज म्हणाले, ''अखंडित वाचे श्रीराम स्मरण'' हेच कीर्तन आहे. बापूराव हे नामस्मरण सतत करीत असतात. तेव्हा ते माझ्या कीर्तनास आले नाहीत म्हणून काय बिघडले? '' बापूराव रात्रीसुद्‌धा नामस्मरण करतात काय यांची प्रचीति पहाण्याचे त्या गृहस्थांनी ठरविले आणि त्यांना दिसून आले की बापूराव रात्री सुद्‌धा नामस्मरणाचे साधन करीत असतात (अकी, पृ. ४७).

६) सांगलीत एक टांगेवाला होता. कधीतरी मामांचे कीर्तनास येत असे. त्याला दम्याचा विकार होता. दमा उसळला की त्याचा जीव घाबरा होई. त्याने श्रीमामांना दम्यावर उपाय विचारला. तेव्हा श्रीमामांनी त्याला अंगारा दिला. त्याने अंगारा भक्षण केला आणि त्याचा दमा बरा झाला (अकी, पृ. ६५).

७) विठाबाई पवार या नावाची स्त्री काहीतरी कारणाने वेड्यांसारखे करू लागली. ती श्रीमामांच्या कीर्तनात येऊन बसत असे. एकदा तिच्या स्वप्नात तात्यासाहेब कोटणीसमहाराज गेले आणि त्यांनी तिला सांगितले, ''बाई, ज्या केळकर महाराजांच्या कीर्तनास तुम्ही जाता त्यांच्या घरची धुणीभांडी करून तुम्ही त्यांची सेवा करा.'' या वचनाप्रमाणे ती मामांच्या घरी सेवा करू लागली. मग काही दिवसातच तिचे वेडेचार थांबले (अकी, पृ.७०).

८) साहित्यसम्राट् न. चिं. केळकर आणि श्रीमामा यांची एकदा गाठ पडली. तेव्हा न. चिं. केळकर म्हणाले, ''बापूराव, तुम्ही रोज कीर्तन करता. पण रोज कीर्तनाला विषय तरी कोणता घेता?'' श्रीमामा म्हणाले, ''ईश्वर आणि संत सज्जन यांचे गुणगाण करता करता मी रामनाम-जपाचे महत्त्व सांगतो.'' ''नामस्मरणाला इतके काय महत्त्व आहे? आणि रोज नामस्मरणाबद्दल वेगळे काय सांगणार?'' न. चि. केळकरांनी पृच्छा केली. त्यावर श्रीमामांनी उत्तर दिले, ''परमार्थात नामस्मरणाइतके महत्त्वाचे अन्य काही नाहीच आहे. आणि नामस्मरण हा विषयच असा आहे की त्याबद्दल मी जरी जन्मभर सांगत राहिलो तरी तो विषय संपणार नाही.'' मामांचे हे बोलणे ऐकताच न. चिं. केळकर

चकितच झाले.

९) श्रीमामा एकदा गुरुदर्शनासाठी चिमडला गेले होते. संध्याकाळी नारायणमहाराज यरगट्टीकर या गुरूंचे कीर्तन ऐकण्यास ते बसले. त्या कीर्तनात पापपुण्य म्हणजे काय असा विषय आला. नारायणमहाराजांनी श्रोत्यांनाच प्रश्न केला ''पाप आणि पुण्य म्हणजे काय हे मला कुणी सांगू शकेल काय?'' सर्व श्रोते चूप बसले. तेव्हा नारायणमहाराजांनी श्रीमामांना म्हटले, ''तुम्ही रोज कीर्तन करता. त्यात पाप व पुण्य हा विषय येत असणारच. त्याबद्दल तुम्ही काय सांगता?'' तेव्हा श्रीमामा उठून उभे राहिले आणि हात जोडून नम्रपणाने म्हणाले, ''महाराज, नामस्मरण हे पुण्य आहे आणि नामस्मरण न करणे हे पाप आहे.'' ही मामांची पाप-पुण्याची व्याख्या ऐकल्यावर नारायणमहाराज खूष झाले.

१०) भाटे आडनाव असणारी एक महिला होती. सांसारिक कटकटींनी तिच्या डोक्यावर परिणाम झाला. घरच्या मंडळींनी तिला नरसोबाच्या वाडीस नेले. ती दत्तसेवा करू लागली. काही दिवसांनी दत्तप्रभूंनी तिला दृष्टांत दिला, ''बाई, तू सांगलीस बापूराव केळकरांच्या नित्य कीर्तनास जात जा. तसे केल्याने तुझे मन शांत होईल.'' दत्त गुरूंच्या आज्ञेप्रमाणे ती बाई मामांच्या कीर्तनास येऊ लागली. हळुहळु तिच्या डोक्यावरचा परिणाम दूर झाला आणि तिचे मन शांत झाले (अकी पृ. ७१)

११) श्रीमामांच्या घराच्या अंगणात काही फुलझाडे होती. त्यांची फुले देवासाठी हार करण्यास श्रीमामा वापरत असत. गमतीची गोष्ट अशी की ही फुले सदा टवटवीत रहात (अकी पृ. ७७).

१२) श्रीमामांनी एक कुत्री पाळली होती. तिचे नाव काशी होते. ती मामांच्या आगेमागे फिरत असे. मामा जर सोवळ्या वस्त्रात असले तर ती त्यांच्या जवळ जात नसे. एकदा ही कुत्री मामांच्या वडिलांना चावली. ते मामांना आवडले नाही. त्यांनी तिला हाक मारून बोलावले नाही. तेव्हा काशी



बेचैन झाली. तिच्या डोळ्यातून पाणी येऊ लागले. ते पहाताच मामांनी तिला जवळ बोलावले व तिच्या पाठीवरून हात फिरविला. तेव्हा काशी शांत झाली (अकी ७६).

१३) मामांनी एक पोपट पाळलेला होता. त्याचा पिंजरा मामांच्या घराच्या पडवीत टांगलेला होता. हा पोपट सतत आवाज करीत असे. पण मामांचे कीर्तन सुरू झाले की तो गप्प राही (अकी, पृ.७७). हा पोपट बरीच वर्षे मामांच्या पडवीत दिसत असे.

१४) मामांच्या अंगणात कडु लिंब, शेवगा इत्यादि झाडे होती. त्यावर अनेक पक्षी येऊन बसत आणि चिवचिवाट करीत. परंतु मामांचे कीर्तन सुरू झाले की ते गप्प होत (अकी पृ.७७).

१४-अ) विठाबाई पवार या पुढे मामांच्या एकनिष्ठ भक्त बनल्या. वयपरत्वे त्यांना रोज मामांचे दर्शनास येणे जमेनासे झाले. त्या स्थितीत मामा त्यांचे घरी गेले. मामांना पहाताच त्यांना आनंद झाला. आणि मामांच्या पायांवर मस्तक ठेवताच त्यांचा प्राण निघून गेला (अकी, पृ. १२०-१२१).

१४-ब) राधाबाई गोरे या नावाच्या एक महिलाभक्त डोंबिवली गावी रहात. त्यांनी मामांना प्रार्थना केली ''मामा, रामराम म्हणता माझा प्राण जावा''. मामांच्या इच्छेने पुढे तसेच घडून आले. रामराम म्हणत त्यांनी देवापुढे डोके ठेवले आणि त्यांचे देहावसान झाले (अकी, पृ. १२०).

१५) एकतारीच्या साथीने भजन करणारा एक माणूस श्रीमामांचे कडे येई. त्याला मामा ''बोले बोले रामनामाची'' हे पद म्हणावयास सांगत. मग त्याला तांदूळ देऊन दोन आणे देत. दोन आणे देण्याचे कारण 'राम' या दोन अक्षरांच्या स्मरणाने कल्याण होते, असे मामांना सुचवायचे असावे (अकी, १२३).

१६) अनंतराव म्हसकर आणि मामा एकदा आचरे गावी चालले होते. त्या वेळी काही प्रवास पायी करावा लागे. असा पायी प्रवास करताना संध्याकाळ झाली. तेव्हा कुठेतरी रात्रीचा मुक्काम करून दुसरे दिवशी प्रवास सुरू करावा

असे त्यांनी ठरविले. थोड्या वेळाने त्यांना वाटेवर एक घर दिसले. तेथे मुक्काम करावयास मिळेल काय म्हणून विचारण्यास ते घरमालकाकडे गेले. घरमालकाने 'परक्यांना जागा नाही' असे म्हणून त्यांना उडवून लावले. तेव्हा त्यांची बायको आतून ओरडून म्हणाली, 'अहो, आपण घर काय डोक्यावर घेऊन जाणार आहो? ते वाटसरू आपल्या ओसरीवर राहिले तर काय बिघडणार आहे?' तेव्हा घरमालकाने त्यांना ओसरीवर रहाण्यास परवानगी दिली. मामांनी संध्याकाळची स्तोत्रे वगैरे म्हटली. ती ऐकल्यावर घरमालकाची वृत्ति पालटली. त्याने त्या दोघांना घरात बोलावले आणि त्यांना जेऊ घातले. इतकेच नव्हे तर त्यांच्या झोपण्याचीही व्यवस्था त्याने करून दिली (अकी, पृ. १२६).

१७) इ. स. १९६० नंतर प्रकृतीच्या कारणास्तव मामांनी मोजकेच अन्न घेण्यास सुरवात केली होती. पाच ते सात भाताचे घास ते घेत. अन्नाशिवाय मामा जगणार कसे, असा विचार करून मामांच्या सूनबाई सौ. सीताबाई भाताचे सात घास मोठे करीत आणि मामांना भरवीत (अकी, पृ. १३५).

१८) एक गृहस्थ मामांच्या कीर्तनास येत. कीर्तनात मधल्या विश्रांतीचे वेळी मामा त्यांना एकादे पद म्हणण्यास सांगत. पण हा गृहस्थ चांगलाच खट होता. तो संतांची निंदा असलेले पद म्हणत असे. पण मामा काही बोलत नसत. एकदा त्याने तात्यासाहेब कोटणीसमहाराजांची निंदा असणारे पद म्हटले. ते मामांना सहन झाले नाही. गुरूंची निंदा कोण सहन करणार? मामांनी त्यांना सांगितले, ''हे बघा, माझ्या गुरूची निंदा असणारी व संत निंदा असणारी पदे म्हणू नका. म्हणायची असल्यास माझी टिंगलटवाळी करणारी पदे म्हणा'' (गोचमा, ६९-७०).

१९) कोल्हापुरात रहाणारे महादेवराव माने यांना टी. बी. झाला होता. त्यांची मामांचेवर निष्ठा होती. ते एकदा मामांच्या दर्शनास आले. त्यावेळी जांभळे खाऊन मामांनी टाकून दिलेल्या जांभळाच्या बिया पडल्या आहेत असे त्यांना दिसले. मामांचे दर्शन घेतल्यावर त्यांनी त्या बिया गोळा केल्या आणि



त्या कोल्हापूरास नेल्या. पुढे त्या बिया वाळल्यावर त्यांनी त्यांची पूड केली आणि ती भक्षण करण्यास प्रारंभ केला. त्यांचा टी. बी. बरा झाला (दावि, पृ.५८).

२०) दिगवडे गावी असणाऱ्या मावशीचे डोके अधून मधून फार दुखत असे. ती डॉ. भडभडे यांच्याकडून गोळ्या घेई. त्यांनी तिचे डोके थांबत असे. एकदा डॉ. भडभडे परगावी गेले असता मावशीचे डोके दुखू लागले. त्यावेळी मामा तेथे होते. 'औषधाच्या भावनेने कधी कधी दुखणी बरी होतात' असे मामांना वाटे. त्याचा प्रयोग करून पहाण्याचे मामांनी ठरविले. मामांनी साबुदाण्याचे दाणे एका बाटलीत भरले व त्यांतून, दोन दाणे खाल्ले तर डोके थांबेल असे भडभडे म्हणाले होते असे मावशीला सांगितले. मावशीने ते दोन साबुदाण्याचे दाणे खाल्ले. त्यानंतर मावशीचे डोके पुनः दुखले नाही (गोस्मृ, पृ.८).

२१) सांगलीतील मुरलीधर मंदिरात एकसंबेकर शास्त्रींची प्रवचने होत. ते सांगत ''जे व्हायचे आहे ते होणारच आणि जे व्हायचे नाही ते होणार नाही.'' हे त्यावेळी मामांना पटले नाही. पण पुढे मात्र स्वानुभवाने मामांना ते पटले (गोस्मृ. पृ.३).

२२) मामांच्या घराच्या अंगणात एक जाईचा वेल होता. तो भिंतीवर चढला होता. त्या भिंतीला एक कोनाडा होता. त्या कोनाड्यात एका चिमणीने आपले घरटे केले होते. जाईची फुले काढता काढता मामांचा हात त्या चिमणीच्या घरट्यात गेला. पण चिमणी उडून गेली नाही (वही ९०).

२३) माघ शुद्ध द्वादशी, १९३८ या दिवशी मामांनी कीर्तनात निंबरगीकरमहाराजांची गोष्ट सांगितली. त्यावेळी सर्वत्र सुवास दरवळला. संतांचे प्रगटन झाले की असा सुवास दरवळतो असे म्हणतात (वही ९०).

२४) चिमडमहाराजांचे वेळी आराधनेच्या प्रसंगी तुकाराममहाराजांचा निर्याणाचा अभंग म्हटला जात नसे. ते मामांना प्रशस्त वाटले नाही. १९३८ सालापासून तो अभंग आराधनेचे वेळी म्हणण्याचा मामांनी प्रघात पाडला (वही ९०).

२५) सांगलीत लिमये नावाचे एक वैद्य होते. त्यांची वैद्यकी चालत नसे. साहजिकच त्यांच्या घरात दारिद्र्य होते. कधी कधी ते मामांच्या दर्शनास येत. त्यावेळी मामा त्यांना एक रुपया देत आणि त्यांना निरोप देत (अकी, ८५). त्यावेळी एका रुपयाची किंमत हल्लीच्या शंभर रुपयाएवढी होती.

२६) लवंभट बापट हे वेदमंत्र जाणणारे होते. त्यांना लोक गंमतीने 'पोपट ढणाढण' म्हणत. कधीतरी ते मंत्र म्हणत मामांचेकडे येत. आणि गुळपाणी मागत. गुळपाणी देऊन मामा त्यांची संभावना करीत (अकी, ८६).

२७) इ. स. १९३७ साली मामांना एक स्वप्न पडले. ते त्यांनी गणपतराव कानिटकर यांना सांगितले. स्वप्नात मामांचे दीक्षागुरू नारायणमहाराज यरगट्टीकर आले होते. त्यांनी मामांच्या जिभेवर बोटांनी ''राम'' ही अक्षरे काढली (वही, ९०).

२८) नाम घेण्यास मामा कीर्तनात सांगत. ते ऐकून एका गृहस्थाने मामांना म्हटले, ''मामा, वैखरी वाणीने नाम घेतले तर चालते ना?'' ''चालते'' मामा म्हणाले. त्या गृहस्थाने मग म्हटले, ''मामा, श्वासावर नाम घ्यावे काय?'' ''घ्यावे'' मामा उत्तरले. पुनः तो गृहस्थ विचारतो, ''मामा, मनात नामस्मरण केले तर कसे?'' ''चालेल की'' मामांनी सांगितले. तेव्हा तो गृहस्थ म्हणाला, ''मामा, तुम्ही सर्वच चालेल असे कसे म्हणता?'' त्यावर मामांनी जे उत्तर दिले ते स्मरणीय आहे. मामा म्हणाले, ''अहो, नाम घेणे हे महत्त्वाचे आहे. म्हणून ते कसेही घेतले तरी चालणार आहे.''

२९) एकदा मामांच्या दर्शनास सांगलीचे राजेसाहेब चिंतामणराव पटवर्धन आले होते. मामांचा वाड्याच्या पुढील दरवाजापासून ते अनवाणी चालत आले होते. मामांनी त्यांचे स्वागत केले आणि म्हटले, ''राजा हा विष्णूचा अंश आहे. आमचा राजा माझ्या घरी आला. मला खरे विष्णूचे दर्शन झाले'' असे म्हणून मामा त्यांना नमस्कार करू लागले. तेव्हा राजेसाहेब म्हणाले, ''मामा, आपला आशीर्वाद आम्हाला असावा'' (अकी, १०७).



३०) गणपतराव कानिटकर यांनी पुढील प्रसंगाची नोंद करून ठेवली आहे :- दि. २२-३-१९३८ रोजी मामांनी कीर्तनात नारदमुनींची गोष्ट सांगितली. कीर्तनात नारद प्रगट झाले. ''कीर्तनात नारद प्रगट झाले'' हे माझे भाग्य असे मामा म्हणाले. पुढे ते म्हणाले, ''नारदमुनि माझेकडून कीर्तन सेवा करवून घेणार'' (वही, ९०).

३१) एकदा मामा शहापूर गावी गेले होते. तेथे धर्मजागृति मासिकाचे संपादक सखाराम राजाराम बोडस यांचे भाषण झाले. त्यांचे नंतर मामांचे भाषण झाले. ''पूर्वजन्म माणसाला असतो.'' असे मामांनी आपल्या भाषणात सप्रमाण दाखवून दिले (वही, ९०).

३२) मंत्ररत्न अशी पदवी असणारे एक गृहस्थ होते. बाबूरावजी कोटणीस आणि मामा यांच्यात वितुष्ट यावे म्हणून त्या गृहस्थाने काही मंत्रप्रयोग केले आणि ते पुण्यास निघून गेले. तेथे गेल्यावर त्यांना रक्ती जुलाब सुरू झाले. ते थांबेनात. तेव्हा त्यांची पत्नी त्यांना म्हणाली, ''अहो, ज्या मामांच्या वर तुम्ही मंत्र प्रयोग केलात त्यांची क्षमा मागितल्याशिवाय तुमचे हे जुलाब थांबणार नाहीत.'' पत्नीचे म्हणणे त्याला पटले. मग स्पेशल मोटार करून तो सांगलीस मामांचेकडे आला आणि त्याने मामांची क्षमा मागितली. आणि मग त्याचे जुलाब थांबले (अकी, १००-११०).

३३) फाल्गुन वद्य द्वितीया (तुकाराम बीज), १९३८ साली मामांचा रामपाठ हा ग्रंथ पूर्ण झाला. तत्पूर्वी १९३७ साली मामांनी हनुमदगुरुचरित्रबोधसार हा ग्रंथ लिहिला होता. उत्तरोक्त ग्रंथात मामांचा फोटो यावा अशी गणपतराव कानिटकर व श्रीदादा यांची फार इच्छा होती. पण मामा आपला फोटोच काढू देत नव्हते. पण आता रामपाठ ग्रंथात मामांचा फोटो घालावयाचाच असा निश्चय गणपतरावांनी केला आणि मामांचा फोटो काढण्याचा प्रयत्न केला. पण तो प्रयत्न असफल झाला. तेव्हा गणपतरावांनी व श्रीदादा यांनी फोटो काढण्याचा फारच आग्रह धरला. तेव्हा मामा म्हणाले, ''आता असे करा. तात्यासाहेब

कोटणीसमहाराजांच्या फोटोपुढे चिठ्ठ्या टाका. फोटो काढावा अशी चिठ्ठी आली तर मी फोटो काढून घेण्यास तयार होईन.'' श्रीदादांनी चिठ्ठ्या टाकल्या. अभ्यंकर यांनी चिठ्ठी उचलली. ''फोटो काढावा'' अशी चिठ्ठी आली. तेव्हा गोगटे फोटोग्राफरकडून मामांचा फोटो काढण्यात आला व तो रामपाठात घालण्यात आला (वही ९०).

३४) मन एकाग्र असेल तर बसल्या जागी बाहेरच्या गोष्टी कळतात असे मामा म्हणत. त्याची प्रचीति पहावयास बळवंतराव गोडबोले मामांना म्हणाले, ''बापूराव, तुम्ही मन एकाग्र करा आणि आत्ता नदीच्या तटावरील बलभीम व्यायाम शाळेत काय चालले आहे ते सांगा.'' मामांनी मग एकाग्र केले आणि सांगितले, ''बलभीम व्यायाम शाळेत दोघे जण कुस्ती खेळत आहेत. एक जण मल्लखांब करतो आहे. आणि बाकीचे गप्पा मारीत बसले आहेत.'' लगेच बळवंतराव त्या व्यायाम शाळेत गेले आणि मामांनी सांगितलेले बरोबर आहे, याची प्रचीति त्यांना आली (गोस्मृ, पृ. १४).

३५) सांगलीत मारुतीच्या देवळाजवळ मुरलीधर मंदिरात अध्यात्मविद्यामंदिर आहे. तेथे एकदा मामांचे प्रवचन झाले. संकेश्वर पीठाचे जगद्‌गुरु शंकराचार्य प्रवचनास उपस्थित होते. मामांचे प्रवचन ऐकून त्यांनी संतोष प्रगट केला (अकी, ११०).

३५-अ) एकदा श्रीमामांना एक स्वप्न पडले. स्वप्नात श्रीमामांच्या जिभेवर 'नारायणराव' ही अक्षरे उमटली. ही गोष्ट त्यांनी गणपतराव कानिटकर यांना सांगितली (वही ९०).

### आ) पारमार्थिक जीवनाशी संबंधित घटना/प्रसंग

१) श्रीमामांचे मेहुणे पंडितराव फाटक. त्यांचा मुलगा भरत. तो नोकरीसाठी पुण्यात रहात होता. एकदा श्रीमामा त्याचेकडे गेले होते. त्यावेळी ते आळंदीला ज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधि दर्शनासाठी गेले. दर्शन झाल्यानंतर श्रीमामांच्या मनात विचार आला ''ज्ञानेश्वरमहाराजांचे समाधीपुढे आपणास कीर्तन करण्यास



अवसर मिळावा.'' तेव्हा त्यांनी ज्ञानेश्वर समाधिस्थानाच्या विश्वस्तांकडे परवानगी मागितली. मामांची योग्यता माहीत नसल्याने विश्वस्तांनी परवानगी दिली नाही. तेव्हा ''ज्ञानेश्वर माऊलीची इच्छा'' असे म्हणून मामा परत निघाले. ते परतीच्या बस स्टँडजवळ आले. तोच विश्वस्त धावत पळत श्रीमामांचे जवळ आले आणि म्हणाले, ''ज्ञानेश्वरमहाराजांना तुमचे कीर्तन ऐकावयाचे आहे असे त्यांनी मला दृष्टांत देऊन सांगितले आहे. तेव्हा तुम्ही परत चलावे आणि कीर्तन करावे.'' मामा परत आले. कीर्तनाची तयारी झाली. ज्ञानेश्वरमहाराजांचे समाधीचे वेळी कान्होजी पाठकांनी ज्या जागी नंदी व समाधि यांच्या मधल्या जागी-उभे राहून कीर्तन केले होते, त्याच जागी श्रीमामा कीर्तनास उभे राहिले. श्रीमामांनी कीर्तनात ज्ञानेश्वरमहाराजांचे गुणानुवाद गाईले. कीर्तन झाल्यावर विश्वस्तांनी श्रीमामांना श्रीफल दिले.

२) श्रीतुकाराममहाराजांचा त्रिशताब्दी महोत्सव साजरा होत होता. या काळात माघ वद्य प्रतिपदा ते फाल्गुन वद्य द्वितीया (तुकाराम बीज) या दिवसांत श्रीमामांनी दररोज नऊ तासाचे साधन ठेवले आणि ते पार पाडले. या काळात श्रीमामांचे नेहमीचे दैनिक कार्यक्रम चालू होतेच.

३) सांगलीजवळ तुंग या नावाचे एक गाव आहे. तेथे मारुतीचे जागृत देवस्थान आहे. या मारुतीच्या दर्शनास श्रीमामा गेले होते. देवस्थानच्या विश्वस्तांनी त्यांना कीर्तन करण्याची विनंति केली. त्याप्रमाणे श्रीमामांनी कीर्तन केले. कीर्तन संपताच मारुतीच्या गाभाऱ्यात एक दिव्य प्रकाश सर्वांना दिसला (अकी,पृ. ९७).

४) सांगलीच्या जवळ ब्रह्मनाळ हे गाव आहे. तेथे आनंदमूर्ति इत्यादि संतांच्या समाधि आहेत. आनंदमूर्तींचे समाधीसमोर मामांचे कीर्तन झाले. कीर्तन संपल्यावर एक सिद्‌धपुरुष मामांच्या जवळ आला आणि त्याने प्रसाद म्हणून श्रीमामांच्या हातावर एक आम्रफल ठेवले (अकी, ९७).

५) एकदा देहू गावी श्रीमामांचे कीर्तन झाले. कीर्तन झाल्यावर श्रीमामांना

शेंगांचा प्रसाद मिळाला (गोचमा, पृ. ८७).

६) सांगलीत प्लेगची साथ आली असता, नरसोबाचे वाडीजवळील कुरुंदवाड गावी श्रीमामा रहावयास गेले. वाडीच्या घाटाजवळच कुरुंदवाडचा घाट आहे. या कृष्णा नदीच्या घाटावर गणपतीचे देवालय आहे. तेथे श्रीमामांचे कीर्तन झाले. कीर्तन चालू असताना गणपतीच्या मूर्तीवरील सर्व फुले खाली गळून पडली. तर इकडे कृष्णा पंचगंगा संगमाच्या पाण्यावर दत्तगुरूंची पाऊले उमटलेली अनेकांना दिसली. नरसोबावाडीहून कुरुंदवाड घाटापर्यंत ही पाऊले उमटलेली होती. म्हणजे दत्तगुरू श्रीमामांच्या कीर्तनास आले होते (अकी, पृ. ९८).

७) श्रीमामा एकदा दुपारच्या समयी औदुंबरला गेले होते. दत्ताच्या विश्रांतीची वेळ असल्याने गाभाऱ्याची दारे बंद होती. दत्तगुरूंना मामांचे कीर्तन ऐकावयाचे होते. त्यांनी पुजाऱ्याला दृष्टांत देऊन गाभाऱ्याची दारे उघडण्यास सांगितले. बड्डम भटजी या पुजाऱ्याने गाभाऱ्याची दारे उघडली. दत्तगुरूंचे समोर मामांचे कीर्तन झाले (अकी, ९०).

८) एकदा श्रीमामा चिमडला गेले होते. तेथे त्यांनी साधुमहाराजांचे समाधि समोर कीर्तन केले. त्यावेळी साधुमहाराजांचे समाधिस्थान तेज:पुंज झाले होते, असे कीर्तनास उपस्थित असणाऱ्या सौ. पमाताई परचुरे यांनी सांगितले (अकी, १००).

९) अण्णा देवधर, आर्टीओ, हे श्रीमामांचे भक्त. त्यांनी एके समयी श्रीमामांना सिद्धगिरीवरील काडसिद्धाच्या समाधीचे दर्शनास नेले. काडसिद्धांचे समाधीसमोर श्रीमामांचे कीर्तन झाले. काडसिद्धाचे मठाधिपति श्रीमामांना हार घालू लागले. ''मी हार घालून घेत नाही'' असे श्रीमामा म्हणाले. त्यावर मठपति बोलले, ''काडसिद्धांच्या आज्ञेनेच मी तुम्हास हार घालीत आहे. तुम्ही नाही म्हणू नका.'' तेव्हा 'काडसिद्धां'ची इच्छा असे म्हणून श्रीमामांनी हार घालून घेतला (अकी, पृ.१००).

१०) सांगलीजवळ असणाऱ्या माधवनगर कॉटन मिलमध्ये श्रीमामांचे



कीर्तन झाले. फलटणचे संत डॉ. गोविंदबुवा उपळावीकर मामांच्या कीर्तनास आले होते. श्रीमामांच्या कीर्तनाने ते इतके आनंदित झाले की ते कीर्तनातच नाचू लागले. आणि श्रीमामांना आलिंगन देऊन, ते म्हणाले, ''बापूराव, तुम्ही कीर्तनात प्रत्यक्ष पांडुरंगालाच प्रगट केलेत'' (अकी, १०३).

११) निंबरगीकरमहाराजांचे परमाधिकारसंपन्न नातू श्रीनागाप्पाण्णामहाराज एकदा सांगलीस आले होते. त्यावेळी त्यांची व श्रीमामांची भेट झाली. आपल्या घरी श्रीमामांनी त्यांचा चांगला आदर सत्कार केला. काही काळाने नागाप्पाण्णामहाराज जाण्यास निघाले. त्यांच्यासाठी टांगा आणला होता व तो दारात उभा होता. नागाप्पाण्णामहाराज टांग्यात बसले. पण टांग्याचा घोडा जागचा हलेना. टांगेवाल्याने घोडा हाकण्याचा बराच प्रयत्न केला, घोड्याला चाबूक मारला तरी घोडा हलेना. हे पाहिल्यावर नागाप्पाण्णामहाराज म्हणाले, ''बापूराव तुमचे मजवर फार प्रेम आहे. तुमच्यापासून दूर जावे असे मला जसे वाटत नाही, तसे या घोड्यालाही वाटत नाही, पहा'' (अकी, १०६).

१२) एके दिवशी भर दुपारी २ वाजता श्रीमामा चट्कन उठले आणि पोषाख करू लागले. राममंदिरातील बैठक त्यांनी साफसूफ व नीट करून घेतली. तेव्हा घरच्या मंडळींनी विचारले, ''मामा, आत्ता काय आहे? तुम्ही आत्ता कीर्तन करणार आहात काय?'' त्यावर श्रीमामा म्हणाले, ''आत्ता गुरुदेव रानडे आमचेकडे येण्यास निघाले आहेत''. मामा इतके म्हणतात तोच गुरुदेव रानडे तेथे येऊन पोचले. त्यावेळी गुरूदेव रानडे सांगलीत आलेले होते.

१३) एकदा बाबूरावजी कोटणीसमहाराजांच्या कैवल्यधामात श्रीमामांचे कीर्तन चालू होते. या कैवल्यधामात गुरुलिंगजंगममहाराज, चिमडमहाराज आणि तात्यासाहेब कोटणीसमहाराज या त्रैमूर्तींची स्थापना केलेली आहे. मामांचे कीर्तन चालू असताना या त्रैमूर्ति डोलू लागल्या आहेत, असे दृश्य अनेकांना दिसले.

१४) सांगलीतील तूपवाले गाडगीळ यांचेकडे मालाडचे केतकरमहाराज

आले होते. श्रीमामा त्यांच्या दर्शनास गेले. तो दत्तजयंतीचा दिवस होता. केतकरमहाराज म्हणाले, ''बापूराव, दत्तजयंतीचे दिवशीचे तुमचे कीर्तन ऐकण्याची इच्छा आहे. तुम्ही इथेच कीर्तन कराल काय?'' श्रीमामा म्हणाले, ''दत्तजयंती दिवशी आमचे वाड्याच्या पुढील भागात असणाऱ्या बापट वकिलांच्या दत्तमंदिरात माझे दत्तजयंतीचे कीर्तन वर्षानुवर्षे चालू आहे. ती प्रथा कशी मोडता येईल?'' त्यावर केतकरमहाराज बोलले, ''ठीक आहे. आम्ही तेथेच तुमच्या कीर्तनास येऊ.'' त्याप्रमाणे केतकरमहाराज मामांच्या कीर्तनास आले. कीर्तन झाल्यावर ते म्हणाले, ''आत्ता दत्तगुरु कीर्तनात प्रगट झाले होते. ज्या कीर्तनात देव प्रगट होतो तेच खरे कीर्तन'' (अकी, १३२).

१५) सांगलीत गोविंदराव गाडगीळ यांचे घरी केतकरमहाराज उतरले होते. एक दिवस सकाळीच ते मामांचे घरी येण्यास निघाले. तर इकडे श्रीमामाही केतकरमहाराजांना भेटण्यास घरातून बाहेर पडले होते. वाटेतच बंडोपंत गोडबोले मामांना भेटले. ते श्रीमामांना म्हणाले, ''बापूराव, तुम्ही कुठे निघाला आहात? केतकरमहाराज तुमच्याकडे येण्यास निघाले आहेत.'' श्रीमामा म्हणाले, ''मीही केतकरमहाराजांच्या कडेच निघालो आहे. आत्ता असे करू. वाटेत केतकरमहाराजांची भेट झाली की आपण सर्वजण आमचे घरी जाऊ'' (अकी, २०).

१६) विटे गावाजवळ रेणागिरि पर्वतावर रेवणसिद्धांचे स्थान आहे. मामा एकदा रेवणसिद्धांच्या दर्शनास गेले होते. रेवणसिद्धांपुढे श्रीमामा उभे राहून नमस्कार करीत असताना एक अनामिक सुगंध सर्वत्र पसरला व तो सर्व उपस्थितांना जाणवला. साधु प्रगट झाले की असा सुगंध सुटतो, असे सांगितले जाते (अकी, ९८).

***

## प्रकरण–११

## मामांच्या अंगी मुरलेले गुण

अवगुण टाकून अंगी सद्गुण बाणवावेत, असे संत सांगतात. श्रीमामांनी आपल्या जीवनात हे तत्त्व अंमलात आणले होते. व्यवहारात आपण काहींना गुण/सद्गुण म्हणतो. परमार्थदृष्ट्या आत्मज्ञानप्राप्तीसाठी जे वीस गुण आवश्यक आहेत असे भगवद्गीता सांगते ते सर्वच्या सर्व श्रीमामांनी अंगी मुरविले होते. भगवद्गीतेने (१३.७.११) सांगितलेले हे गुण असे आहेत :-

१) **अमानित्व :-** गर्व नसणे; आत्मश्लाघा न करणे; श्रेष्ठांचा अपमान न करणे. २) **अदंभित्व :-** दंभ/ढोंग नसणे. ३) **अहिंसा :-** इतरांना पीडा न देणे; परपीडावर्जन. ४) **शांति :-** दुसऱ्यांनी अतिक्रम केला तरी मन स्थिर ठेवणे. ५) **आर्जव :-** सरळपणाने वागणे. ६) **आचार्योपासना :-** सद्गुरुची सेवा. ७) **शौच :-** काया, वाचा आणि मन यांची शुद्धि. ८) **आत्म-विनिग्रह :-** देह, इंद्रिये इत्यादींचा संयम पाळणे. ९) **स्थैर्य :-** मोक्षमार्गावर स्थिरपणाने राहणे. १०) **इंद्रियार्थेषु वैराग्य :-** शब्द इत्यादि इंद्रियांच्या विषयांच्या बाबतीत भोगण्याची आवड नसणे. ११) **जन्म-मृत्यू-जरा-व्याधि-दोषेषु-दर्शन:-** शरीर आहे तोपर्यंत जरा, रोग इत्यादींचे दोषरूपी दु:ख चुकत नाही, हे समजून असणे. १२) **अनासक्ति:-** एखाद्या गोष्टीविषयी अतिप्रेम नसणे. १३) **अनहंकार:-** अहंकाराचा अभाव. १४) **पुत्र-दार-गृहादिपु अनभिष्वंग :-** पुत्र इत्यादींचे बाबतीत अति आसक्ति नसणे. १५) **इष्ट-अनिष्ट-उपपत्तिषु-समचित्तत्व:-** इष्ट वा अनिष्ट गोष्टी प्राप्त झाल्या असता मनाचा समतोल न सुटणे. १६) **मयि**

**अनन्य योगेन अव्याभिचारिणी भक्ति :-** ईश्वराची एकनिष्ठ भक्ति. **१७) विविक्त-देश-सेवित्व :-** जनरहित अथवा चित्ताला समाधानकारक अशा स्थानात रहाणे. **१८) जनसंसदि अरति :-**लोकांच्या समुदायात असण्याची आवड नसणे. **१९) अध्यात्मज्ञान नित्यत्व :-** आत्मज्ञानावर निष्ठा. **२०) तत्वज्ञानार्थ - दर्शन :-** तत्त्वज्ञानाचे उद्दिष्ट लक्षात ठेवणे.

आध्यात्मिक ग्रंथांचे वाचन आणि मनन करून श्रीमामांनी हे गुण आपल्या अंगी बाणवून घेतले होते. त्यामुळे त्यांना आत्मज्ञान व आत्मसाक्षात्कार झाला हे वेगळे सांगणे नकोच. श्रीरामपाठातील २६-२९ हे अभंग आणि हनुमद्‌गुरूचरित्र बोधसार मधील सातवा अध्याय हे श्रीमामांच्या आत्मानुभवाची साक्ष देतात.

लौकिक दृष्ट्या असणारे आणि सहजपणे कळणारे मामांचे गुण पुढीलप्रमाणे सांगता येतील :-

**१) नम्रता :-** 'नम्र झाला भूता । तेणे कोंडिले अनंता' असे तुकाराममहाराजांचे वचन आहे. कुणीही नमस्कार केला तरी श्रीमामा प्रति नमस्कार करीत. श्रीमामांच्या वाड्यातील गद्रे आजी, खरे काकू, तसेच करंदीकर आजी या वयस्क स्त्रिया मामांना नमस्कार करण्यास येत. पण त्यांचा नमस्कार होण्यापूर्वीच मामा नतमस्तक होत. त्या मामांना म्हणत, ''मामा, तुम्ही आम्हाला नमस्कार का करता?'' तेव्हा श्रीमामा म्हणत, ''अहो, तेवढाच माझ्या मानेला व्यायाम होतो.'' एक गृहस्थ होते. त्यांची वर्तणूक तितकीशी चांगली नव्हती. मामा त्यालाही नमस्कार करीत. ''मामा, तुम्ही असे का करता?'' असे एकाने विचारले. तेव्हा श्रीमामा उत्तरले, ''अहो, तो कोटणीसमहाराजांच्या पालखीचा दांडा धरतो म्हणून मला तो वंदनीय आहे'' (अकी, पृ. ८८). यज्ञेश्वर दीक्षित हे श्रीमामांच्या वडिलांच्या गुरूघराण्यातील होते. वयाने ते श्रीमामांच्या पेक्षा लहान होते. तरी मामा त्यांना नमस्कार करीत. कीर्तन सुरू करण्यापूर्वी श्रीमामा सर्व लहान थोर श्रोत्यांना नमस्कार करीत आणि मग कीर्तन सुरू करीत.

**२) आईवर भक्ति :-** श्रीमामांना सख्ख्या आईचे सुख फार दिवस लाभले



नाही. आपली आई काळीसावळी होती एवढीच आठवण त्यांना होती. आई एक चांदीची वाटी वापरी. म्हणून ती वाटी मामांनी जपून ठेवली होती. एकदा श्रीमामांना अवघड जागी करट झाले होते. श्रीमामांना करटाचा फार ठणका लागला होता. म्हणून मामा विव्हळत होते. ''आई ग, आई ग'' असे म्हणत होते. एवढ्यात त्यांची आई तेथे आली; ती आकाशमार्गाने चालली होती. मामांचे-बापूचे-विव्हळणे ऐकून ती मामांचेकडे आली होती. तिने विचारले, ''बापू, तू का विव्हळत आहेस?'' श्रीमामा म्हणाले, ''आई ग, करट झाले आहे आणि ते फार ठणकत आहे. म्हणून मी विव्हळत आहे.'' तेव्हा आईने बापूच्या करटावरून हात फिरविला आणि करटाचा ठणका थांबला. ''आई, थांब की ग'' असे श्रीमामा म्हणाले. ''मला जाणे भाग आहे.'' असे म्हणून आई निघून गेली. इकडे श्रीमामांचे डोळ्यांत अश्रू भरले.

**३) शांति/सहनशीलता :-** श्रीमामांच्या जीवनात अनेक बरेवाईट प्रसंग आले. त्यांना राग यावा असे प्रसंगही घडले. पण मामांनी आपली सहनशीलता/शांति सोडली नाही.

श्रीमामा एकदा आपल्या घराच्या अंगणात सहज उभे होते. तितक्यात एक स्त्री आधण आलेले पाणी घेऊन आली आणि तिने ते श्रीमामांच्या पायांवर ओतले. पण श्रीमामा तिला काहीच बोलले नाहीत. पाय पोळले होते. तरी मामा शांतच. ते मुकाट्याने घरात गेले. त्यांनी पायाला व्यवस्थित गोडे तेल लावले आणि ते स्वस्थ बसले (अकी, पृ. ७१).

श्रीमामांच्या राममंदिरात श्रीमामांचे सोवळ्याचे देव होते. मामा रोज त्यांची सोवळ्याने पूजा करीत. एक माणूस त्या देवांवर सुताच्या गुंड्या टाकीत असे. त्याला श्रीमामा काही बोलत नसत. त्या सुताच्या गुंड्या काढून टाकून मग श्रीमामा सोवळ्याने पूजा करीत. काही दिवस हे असेच चालले. मामा आपणास काहीच म्हणत नाहीत हे पाहून तो गृहस्थ वरमला आणि त्याने सुताच्या गुंड्या टाकणे बंद केले (अकी, पृ. ६०).

श्रीमामांचे नित्यक्रम अगदी बांधील होते. त्यांना सवड मिळे ती दुपारी भोजनोत्तर काही काळ. या दुपारच्या वेळी भर उन्हात छत्री न घेता, श्रीमामा अनवाणी बाहेर पडत आणि संस्थानच्या गणपतीचे दर्शन घेत तसेच राजवाड्याजवळील लायब्ररीत जाऊन येत (अकी, पृ. १२५).

श्रीमामांच्या कीर्तनाला लोकांनी येऊ नये, आल्यास त्यांना त्रास व्हावा, या दृष्टीने एका बाईने असे केले :- मामांच्या अंगणातील विहिरीमधून एक घागरभर पाणी काढले आणि ते मामा कीर्तन करीत त्या मंदिरातील सोफ्यावर ओतले. जमीन मातीची असल्याने, ती ओली झाली. त्या बाईला काही न बोलता मामांनी ती ओल पुसून काढली आणि मग नेहमीप्रमाणे कीर्तन केले. असे काही दिवस चालले. पुढे त्या बाईला पश्चाताप झाला आणि ती बाई मामांना शरण आली (अकी, पृ. ५९)

मामा नित्यकींतन करतात हे न पाहवणारे एक गृहस्थ निघाले. त्यांनी शेंदूर घालून तयार केलेल्या करंज्या मामांना खाण्यास दिल्या. त्यातील चार दोन मामांनी खाल्ल्या, उरलेल्या घरी दिल्या. शेंदूर पोटात जाताच मामांचा घसा बसला. इतका की जवळच्या माणसांनाही कीर्तनात मामा काय बोलतात हे ऐकू येईनासे झाले. असे दोन तीन दिवस गेले. मग मामा कीर्तनात मनात म्हणाले, ‘‘देवा, माझे कीर्तन तुला नको असेल तर मला मरण दे. कीर्तन होणार नसल्यास मी मरणास तयार आहे. याउलट तुला, जर माझे कीर्तन व्हावे असे वाटत असेल, तर माझा आवाज पूर्वीप्रमाणे कर.’’ मामांच्या विनंतीला देव पावला. देवाने त्यांचा आवाज पूर्वीसारखा केला.

घरातल्या माणसांनी एक करंजी फोडून पाहिली होती. त्यांत शेंदूर आहे हे त्यांना कळले होते. ते त्यांनी मामांना सांगितले. करंज्या कुणी दिल्या हे मामांना माहीत होते पण मामांनी त्याचे नाव कुणाला सांगितले नाही.

शेवटी शेवटी तर श्रीमामा अनेक दुखण्यानी बेजार होते. तरी मला काही होत नाही असे म्हणून ते सर्व शारीरिक कष्ट सहन करीत होते.



**४) शिक्षित लोकांबद्दल आवड :-** श्रीमामा स्वत: मॅट्रिकपर्यंत शिकलेले होते. पण इतरांनी त्यापुढेही शिकावे असे त्यांना वाटे. त्यांच्या मते सुशिक्षित लोकांनी मोठ्या प्रमाणात परमार्थाकडे वळावयास हवे. तसे झाले तर इतर लोकही परमार्थाकडे वळतील अशी त्यांची धारणा होती. म्हणून श्रीमामा शिक्षित लोकांचे कौतुक करीत.

**५) आश्वासन खरे होई :-** नरहर दामोदर दिवेकर एकदा श्रीमामांना म्हणाले, ‘‘मामा, मी ज्ञानेश्वरी वाचतो. पण मला नीट कळत नाही. काय करावे?’’ श्रीमामा म्हणाले, ‘‘नरहरी, वाचन चालू ठेव. एकवीस पारायणे झाली की तुला अर्थ कळू लागेल.’’ दिवेकरांनी ज्ञानेश्वरीची २१ पारायणे केली आणि त्यांना ज्ञानेश्वरीचा अर्थ कळू लागला (गोस्मृ. पृ. १५)

एका गृहस्थाला एकदा श्रीमामांनी सांगितले ‘‘तुम्ही आत्ता ज्याची संगत करीत आहात, तो चांगला नाही. त्याची संगत सोडा. नाहीतर बरे होणार नाही.’’ पण त्या गृहस्थाने मामांचे ऐकले नाही. परिणामी त्या गृहस्थाच्या दुकानाचे वाटोळे झाले, दिवाळे निघाले (गोस्मृ. पृ. १६)

श्री. पळसुले नावाचे गृहस्थ मामांचेकडे येत असत. ते एकदा श्रीमामांना म्हणाले ‘‘मामा, तुम्ही मला मार्गदर्शन करावे.’’ तेव्हा मामा बोलले, ‘‘अहो, आत्ता तुमचे जे चालले आहे ते चालू दे. काही दिवसांनी मार्गदर्शन करणारे सद्‌गुरु तुम्हाला भेटतील.’’ पुढे श्री. पळसुले यांना पुण्याच्या गुळवणीमहाराजांचा अनुग्रह लाभला (गोस्मृ. पृ. १९).

श्री. बा. ग. जोशी हे इंटरच्या परीक्षेस बसणार होते. पण अभ्यास झाला नव्हता. तेव्हा काय करावे या पेचात ते होते. ते श्रीमामांच्या दर्शनास आले असताना श्रीमामा त्यांना म्हणाले, ‘‘जोशीबुवा, तुम्ही परीक्षेस बसा.’’ श्रीमामांच्यावर विश्वास ठेवून जोशी परीक्षेस बसले आणि पास झाले (गोस्मृ, पृ.२१).

अनेकदा श्रीमामा व सौ. मामी यांचा ‘अगोदर कोण जाणार’ या विषयी

संवाद चाले. सौ. मामी म्हणत, ''मी वटसावित्रीचे व्रत यथासांग केले आहे. तेव्हा मी अहेवपणी तुमचे अगोदर जाणार''. यावर श्रीमामा म्हणत, ''अग, तसे होणार नाही. पूर्वी मी दुखण्यातून वाचलो त्यावेळीच तुला वटसावित्रीचे फळ मिळाले अहे. आता तसे होणार नाही. आता मी अगोदर जाणार नंतर तू जाणार. पण हे लक्षात ठेव. माझ्यानंतर तू फार काळ जगणार नाहीस आणि तुला मरणाचे क्लेश होणार नाहीत.'' असेच पुढे घडून आले (अकी, पृ. १४६).

सिटी हायस्कूलमधील श्री. पळसुले नावाचे शिक्षक श्रीमामांच्या दर्शनास येत असत. पुढे त्यांनी रत्नागिरि येथे नोकरी धरली. नंतर ते एकदा श्रीमामांचे दर्शनास आले असताना, श्रीमामा त्यांना बोलले, ''अहो, पळसुले, तुम्हाला नागापासून भीति नाही'' ''असे का म्हणता मामा?'' त्यांनी विचारले. श्रीमामांनी उत्तर दिले, ''ते तुम्हाला लौकरच कळेल.'' पळसुले रत्नागिरीस परतले. नंतर तेथे एकदा त्यांच्या उशाशी नाग येऊन बसला. तो इतरांनी पाहिला. तो नाग तसाच परत गेला. ''संकट टळले'' म्हणून पळसुले यांना आनंद झाला. आता एकदा संतांचे दर्शन घेऊन यावे म्हणून ते जवळच्या पावस नावाच्या गावी स्वामी स्वरूपानंदांच्या दर्शनास गेले. पळसुलेनी नमस्कार करताच स्वामी म्हणाले, ''तुम्हाला नागापासून भीति नाही'' (अकी, पृ. १२२).

एकदा सांगलीतील श्री. शामराव लिमये फोटो काढण्यास मामांचे कडे आले होते. श्रीमामा त्यांना म्हणाले, ''शामराव, तुम्ही वडिलांचा फोटोग्राफीचा व्यवसाय पुढे चालविण्याचे ठरविले आहे. ठीक आहे. तुम्ही हा धंदा सचोटीने व शुद्ध अंत:करणाने करा. तुम्ही यशस्वी व्हाल.'' असे सांगून श्रीमामांनी त्यांचे पाठीवरून हात फिरविला. त्यानंतर शामरावांचा धंदा वाढतच गेला (अकी, पृ. १२३).

लक्ष्मीबाई आपटे मामांच्या कीर्तनास येत. रोज शिवपूजा करण्याचा त्यांचा नेम होता. शिवलिंगाला वहाण्यास त्यांनी एक चांदीचे बेलपत्र करून घेतले होते. ते एकदा हरवले. त्यांनी श्रीमामांना विचारले, ''मामा, ते बिल्वपत्र



सापडेल का हो?'' मामा उत्तरले, ''मामी काळजी करू नका. बिल्वपत्र सापडेल हो.'' पुढे मामींना ते बिल्वपत्र सापडले.

विनायकराव कानिटकर यांना बरोबर घेऊन श्रीमामा कैवल्यधामाकडे निघाले होते. वाटेत एक भला मोठा नाग आडवा आला. विनायकराव घाबरले. श्रीमामा म्हणाले, ''विनायकराव, हा नाग आपणास काही करणार नाही.'' मामांचे शब्द खरे ठरले. तो नाग सुळ्दिशी निघून गेला.

गायकवाड नावाचे गृहस्थ श्रीमामांच्या कीर्तनास येत. त्यांनी श्रीमामांना एकपात्री तुकाराम सिनेमा करून दाखविला. श्रीमामांना तो आवडला. खूष होऊन श्रीमामांनी, त्यांना हनुमद्‌गुरुचरित्रबोधसार हे पुस्तक दिले. तो म्हणाला, ''मामा, मला या पुस्तकाचा काय उपयोग? कारण मला लिहिता वाचता येत नाही.'' तेव्हा श्रीमामा म्हणाले, ''तुम्ही रोज या ग्रंथाची पूजा करा. तुम्हाला वाचता येऊ लागेल.'' श्रद्धेने गायकवाडांनी तसे केले आणि त्यांना वाचता येऊ लागले (अकी, पृ. ७१).

मामांच्या कीर्तनास येणाऱ्या एका बाईचा मुलगा वेडसर होता. त्याच्यावर पुष्कळ उपचार झाले पण गुण आला नाही. तेव्हा त्या बाईने मामांना विचारले, ''माझ्या मुलाचा वेडसरपणा दूर करण्यास काय करावे?'' मामांनी सागितले, ''मुलाचे वडिलांनी तीन दिवस रामरक्षा वाचावी आणि रामरक्षेने मंतरलेला अंगारा मुलाला लावावा. मग तुमचा मुलगा वेड्यासारखे करणार नाही.'' तसे करताच त्या मुलाचा वेडसरपणा गेला (वही ९०).

पटवर्धन या नावाचे एक गृहस्थ श्रीमामांच्या कीर्तनास येत. त्यांची नोकरी गेली. ते हवालदिल झाले. त्यांनी श्रीमामांना ती गोष्ट सांगितली. श्रीमामा बोलले, ''तुम्हाला दुसरी नोकरी लगेच मिळेल. काळजी करू नका.'' त्याप्रमाणे त्यांना दुसरी नोकरी लगेच मिळाली (गोचमा, पृ. ७१).

**६) प्रसिद्धी पराङ्‌मुखता/मोठेपणा नको :-** आपणास कुणी मोठेपणा द्यावा असे मामांना वाटत नसे. पांडुरंगमहाराजांच्या सार्थक नावाच्या ग्रंथात

श्रीमामांची प्रस्तावना होती. त्यांचे खाली श्रीमामांच्या नावापुढे 'महाराज' हे शब्द छापले होते. ते श्रीमामांना पसंत पडले नाही. त्या पुस्तकाच्या सर्व प्रती मध्ये मामांनी 'महाराज' शब्दावर कागदी पट्टी लावून घेतली.

आळंदीत श्रीमामांना ज्ञानेश्वरमहाराजांचे दर्शन झाले. तसे त्यांनी ज्ञानेश्वरमहाराजांचे रेखाचित्र काढले होते. पण त्याची त्यांनी वाच्यता केली नव्हती. ते तसेच ज्ञानेश्वरीमध्ये ठेवून दिले होते.

गुरुतृतीयेदिवशी श्रीमामांना कोटणीसमहाराजांनी कीर्तनाची आज्ञा दिली होती. त्या गोष्टीचाही गाजावाजा मामांनी केला नव्हता.

शाळेत नोकरी करीत असताना कधीतरी फोटो काढण्याचा प्रसंग येई. मामा त्यावेळी अगदी कडेच्या खुर्चीवर बसत. मामा बहुधा सभासमारंभास जात नसत. कधी कुठे श्रीमामा समारंभास गेले तरी ते अगदी मागे बसत (दीपलक्ष्मी, पृ.१५).

सर्वांना मोठेपणा/प्रसिद्धि हवी असते. पण मामा या विषयाला अपवाद होते. मामांनी आपल्या नित्य कीर्तनाची कधी जाहिरात केली नाही. आणि तशी करावी असे त्यांच्या मनातही येत नसे. रोजचे कीर्तन ही गुरुनिर्दिष्ट सेवा आहे; त्या सेवेचा कसला गाजावाजा करावयाचा असे ते म्हणत. म्हणून आपणास कोटणीसमहाराजांनी प्रकट होऊन नित्य कीर्तनाची आज्ञा दिली ही गोष्टही मामानी आपल्या 'रामजी' या पुत्राला सांगितली नव्हती. ती श्रीदादांना कळली ती गणपतराव कानिटकर यांच्यामुळे. गणपतराव कोटणीस महाराजांच्या चरित्राची प्रत करीत होते. त्यात त्या घटनेचा उल्लेख होता. त्यावरून ते गणपतरावांना कळले आणि त्यांनी ते श्रीदादांना सांगितले.

श्रीमामांच्या नित्य कीर्तनाला पंचवीस आणि नंतर छत्तीस वर्षे झाली. त्यांचे चिरंजीव श्रीदादा यांनी रौप्यमहोत्सव आणि त्रितप महोत्सव करण्याचे ठरविले. ते श्रीमामांना मुळीच नको होते. पण श्रीमामा आपल्या मुलाला प्रत्यक्ष ''राम'' मानीत. म्हणून मुलाच्या आग्रहास्तव त्यांनी या महोत्सवांना मान्यता



दिली.

श्रीमामांनी आपल्या कीर्तनाच्या संदर्भात वर्तमानपत्राच्या वार्ताहरांना कधी मुलाखतीही दिल्या नव्हत्या.

**७) धाडस/धीटपणा :-** मामा तसे धीट/धाडसी होते. एकदा श्रीमामा मावशीकडे दिगवडे गावी चालले होते. वाटेत सुरंगी नदी लागली. तिला बरेच पाणी होते. मामा तसेच धाडस करून पाण्यातून पुढे जाऊ लागले. पाणी मामांच्या ओठापर्यंत आले. मामांनी एक पाऊल पुढे टाकले आणि पाणी गळ्यापर्यंत आले (गोस्मृ, पृ. १०).

अनंतराव म्हसकर आणि श्रीमामा हे बालमित्र. सांगलीला कृष्णा नदी आहे. अनंतराव नदीत उत्तम पोहीत. मामांना मात्र पोहता येत नसे. ते मामांना म्हणत, ''बापू, मी बरोबर असल्याशिवाय तू पाण्यात जाऊ नको.'' एक दिवस श्रीमामा नदीवर गेले. पण अंनतराव आले नव्हते. तेव्हा ''पाण्यात पडले की पोहता येईल'' असा विचार करून श्रीमामा पाण्यात शिरले आणि बुडू लागले. तितक्यात अनंतराव तेथे आले व त्यांनी मामांना वाचविले (गोस्मृ, पृ. २-३).

एकदा रात्रीचे मामा दासबोध पठण करीत होते. एक साप त्यांच्या .हाताला टेकून काही काळ होता. मामा स्तब्धच बसले. मामांनी शांतपणे दासबोध वाचन चालू ठेवले. काही वेळाने तो साप आला तसा निघून गेला.

कैवल्यधामाकडे जात असताना एक भला मोठा नाग आडवा आला. मामा घाबरले नाहीत. मामा तसेच पुढे निघाले. साप बाजूने निघून गेला.

**८) नियमपालन :-** जे नियम घालून दिलेले आहेत अथवा आपण घालून घेतले आहेत, ते पाळावेत असा श्रीमामांचा आग्रह असे. स्वातंत्र्यसैनिक नाना जोशी हे एकदा सांगली म्युनिसिपालिटीत गेले असता, त्यांना असे दिसले:- घरपट्टी भरावयास आलेल्या माणसाची रांग होती. रांगेत मामा शेवटी होते. त्यांचे जवळ जाऊन नाना जोशी त्यांना म्हणाले, ''मामा, तुम्ही पुढे येऊन पैसे भरले तरी चालेल.'' त्यावर मामा उद्गारले, ''अहो, नियमाप्रमाणे मी शेवटी आहे .

मी पुढे येऊन पैसे भरणे योग्य नाही'' रांगेतून क्रमांक आल्यावर पैसे भरून मामा निघून गेले (अकी, पृ. १२४).

तात्यासाहेब कोटणीसमहाराजांनी श्रीमामांना तुकाराममहाराजांचे नित्यपाठाचे बारा अभंग रोज म्हणण्यास सांगितले होते. सकाळच्या कार्यक्रमात हे अभंग मामा रोज म्हणत.

कोटणीसमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे मामांनी आपले नित्य कीर्तन अखंड चालविले, हे तर प्रगटच आहे.

**९) आचार्योपासन/गुरुसेवा :-** श्रीमामांना कोटणीसमहाराजांचा साक्षात् उपदेश मिळाला नाही तरी मनाने ते कोटणीसमहाराजांनाच गुरु मानीत होते. गुरूची प्रत्यक्ष सेवा करणे हे सर्वांना शक्य नसते. पण गुरुवचन पाळणे हीच गुरूची खरी सेवा आहे. त्याप्रमाणे मामा न चुकता रोज साधना करीत आणि कीर्तन करीत.

हनुमद्‌गुरुचरित्रबोधसार हे पुस्तक लिहून त्यांनी कोटणीसमहाराजांची लेखन सेवाही केली.

आणखी मामा असे म्हणत :- ''मी भाग्यवंत आहे. कारण असे :- माझ्या घराच्या पूर्वेला कोटणीसमहाराजांचे कैवल्यधाम आहे. तेथून पश्चिमेकडे कोटणीसमहाराजांचे समाधि मंदिर आहे. त्या दोहोंच्या मध्ये माझे घर आहे. तेव्हा वारा पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहो अगर पश्चिमेकडून पूर्वेला, तो माझ्या घरावरून जातो. एकूण काय मला घरातच गुरूचे वारे प्राप्त होते.

श्रीमामा केवळ आपल्या गुरूला मान देत असे नाही तर गुरुघराण्यातील व्यक्तीलाही मान देत.

निंबरगीकरमहाराजांचे पणतू श्रीगुरुसिद्‌द्प्पामहाराज हे एकदा मामांचेकडे आले होते. भोजनोत्तर ते राममंदिरात पहुडले होते. दुपारच्या वेळी उकाडा असल्याने, श्रीमामा त्यांना हातपंख्याने वारा घालू लागले. तेव्हा गुरूसिद्‌दाप्पांनी डोळे उघडून मामांना म्हटले, ''मामा, तुम्ही असे करू नका.'' तेव्हा मामा



थांबले (गोचमा, पृ. १४४).

**१०) अंतर्ज्ञान :-** श्रीमामांना अंतर्ज्ञान असल्याने त्यांच्या परोक्ष जे घडे ते त्यांना कळत असे :-

मामांचे चिरंजीव श्रीदादा आणि गणपतराव कानिटकर यांना बाबूराव कोटणीसमहाराज म्हणाले, ''अहो, बापूरावजींच्या कीर्तनात फार वेळा जयजयकार येतात.'' त्यानंतर श्रीदादा व गणपतराव मामांच्या कीर्तनाला येऊन बसले. मौज अशी की त्या दिवशीच्या मामांच्या कीर्तनात जयजयकार आलाच नाही.

एकदा सौ. उषाताई भावे सौ. इंदिराबाईंना - मामांच्या पत्नीला - काही शंका विचारीत होत्या. सौ. इंदिराबाई म्हणाल्या, ''यांचे कीर्तन संपल्यावर तुम्ही या शंका यांना विचारा.'' त्यानंतर सौ. उषाताई मामांच्या कीर्तनास येऊन बसल्या. त्या दिवशी मामांच्या कीर्तनात असे घडले :- सौ. उषाताईंनी ज्या क्रमाने शंका विचारल्या होत्या त्याच क्रमाने मामांनी त्या शंकांचे निवारण केले.

कुलकर्णी हे विठ्ठलाचे उपासक होते. ते मामांच्या कीर्तनास येत. गुरुमुखाने नाम घ्यावे असे वाटून त्यांनी मामांना नामाबद्दल विचारले, ''मी कोणत्या देवाचे नाव घेऊ?'' त्यांना वाटत होते की मामा 'राम राम' असे नाम घेण्यास सांगतील. पण मामांनी त्यांचे मन ओळखून त्यांना 'विठ्ठल' नामाचा जप करण्यास सांगितले (गोचमा, पृ. ७०).

देवधर, आर.टी.ओ., हे मामांच्या कीर्तनास येत. एके दिवशी ते संध्याकाळी पत्ते खेळत बसले. त्यात मन रंगल्याने त्यांना कीर्तनास येण्यास उशीर झाला. त्यावेळी कीर्तनात मामा बोलून गेले, ''काही लोक कीर्तनापेक्षा पत्त्याच्या खेळाला महत्त्व देतात. पण पत्ते खेळून कधी देव भेटेल काय?'' (गोचमा,पृ.७१).

**११) समता :-** श्रीमामा एकदा बसले असताना एका स्त्रीने त्यांना नमस्कार केला. नमस्कार करणाऱ्याला साखर देण्याचा मामांचा नेम. पण त्या दिवशी त्या स्त्रीला साखर देण्याचे राहून गेले. त्यानंतर एक दोन मुले आली. नमस्कारानंतर मामांनी त्यांना साखर दिली. मग मामांच्या लक्षात आले की

मगाशी त्या स्त्रीला साखर देण्याचे राहून गेले. तेव्हा जरा दूर बसलेल्या त्या स्त्रीला मामांनी बोलावले आणि तिला साखरेचा प्रसाद दिला (गोचमा, पृ. ७३).

**१२) आपुलकी :-** मामा प्रपंचात अनासक्त असले तरी ते अगत्यवान् होते. त्यांच्याजवळ आपुलकी होती. ही आपुलकी कुटुंबापुरतीच होती असे नव्हे तर कुटुंबाबाहेरच्या माणसाविषयीही त्यांना आपुलकी वाटे.

आपल्या चिरंजीवांचे - श्रीदादांचे - कीर्तन चांगले होते हे त्यांना माहीत होते. ते आपल्या मुलाचे कौतुक करीत.

गणपतराव कानिटकर या गृहस्थांना मामा आपला मुलगा मानीत. गणपतराव अनेक दिवस मामांच्या घरातच राहिले होते.

श्रीमामांच्या वाड्यात माई करमरकर रहात होत्या. त्यांची भाची सुमन ही आईबापावेगळी पोरकी पोर. तिची भक्ति मामांवर होती. मामांनी तिला आपले मानले. मामांनी तिला आपल्या कन्येचे स्थान दिले आणि तिच्या विवाहात त्यांनी पत्नीसकट तिचे देवक ठेवले.

शरयू उपळावीकर या मुलीला मामांचे कीर्तन आपले घरी व्हावे असे वाटे. ती रोज मामांच्या कीर्तनास येत असे. शेवटी शेवटी मामांच्या शेवटच्या दुखण्यात तिने भीत भीत मामांना कीर्तन करण्याविषयी विचारले. तिची निष्ठा पाहून मामांनी तिच्या घरी ऋषिपंचमीचे दिवशी कीर्तन केले (दीपलक्ष्मी, पृ.१५).

ज. बा. देवधर हे अधूनमधून मामांच्या कीर्तनास येत. एकदा ते लागोपाठ तीन दिवस कीर्तनास गेले. मध्ये एक दिवस गेल्यावर ते पुन: कीर्तनास गेले. तेव्हा मामा म्हणाले, ''काल मी तुमची कीर्तनात वाट पाहिली'' (दीपलक्ष्मी, पृ.१५).

पां. सी. ऊर्फ बाळू गोखले हा इ. स. १९५६-५७ च्या सुमारास नवज्वराने आजारी पडला. मामांचे चिरंजीव श्रीदादा रोज त्याच्याकडे जाऊन त्याच्याजवळ बसत. तितक्यात श्रीदादांना परगावी जावे लागले. तेव्हा श्रीमामा बाळू गोखलेकडे



दररोज जाऊ लागले आणि त्याचेजवळ बसू लागले (दीपलक्ष्मी, पृ.७५-७६).

प्रा. म. अ. कुलकर्णी हे शिकत असताना वक्तृत्व स्पर्धेत भाग घेत. जाण्यापूर्वी ते मामांना नमस्कार करून जात. मग स्पर्धेत मिळालेले पारितोषिक दाखविण्यास ते मामांचेकडे येत. मामा त्यांना साखरेचा प्रसाद देऊन त्यांचे कौतुक करीत (दीपलक्ष्मी, पृ.२१).

पालघर या गावी जानकीबाई दांडेकर या नावाच्या एक बाई होत्या. त्यांची मामांचे वर निष्ठा होती. त्या मृत्युशय्येवर असता, त्यांना मामांच्या दर्शनाची तळमळ लागली तसे त्यांचेकडून मामांना पत्र आले. मामा लगेचच पालघरला गेले. मामांचे दर्शन झाल्यावर जानकीबाईंनी शांतपणे इहलोकीची यात्रा संपवली (गोचमा, पृ. ७५).

**१३) परपीडा वर्जन :-** परपीडा हे पाप आहे. श्रीमामा हे परपीडा टाळत असत. काया-वाचा-मनाने परपीडा होऊ नये याची काळजी ते घेत.

एकदा करंदीकर काकू मामांच्या दर्शनास गेल्या. मामा व सौ. मामी बसले होते. बोलता बोलता सौ. मामी करंदीकरकाकूंना म्हणाल्या, ''काकू, काल माझ्या हातून काही पैसे हरवले. शोधून सापडले नाहीत.'' दुसरे दिवशी करंदीकर काकू आल्यावर सौ. मामी त्यांना म्हणाल्या, ''काकू, काल मी पैसे हरविल्याचे जे तुम्हाला सांगितले ते यांना (=मामांना) आवडले नाही. त्यांचे म्हणणे असे:- आपले दु:ख दुसऱ्याला सांगू नये. तसे केल्याने परपीडा होते.''

असे असल्यामुळे आपल्याला काही झाले तरी मामा ते इतरांना सांगत नसत. मामांच्या शेवटच्या दुखण्यात रामभाऊ केळकर मास्तर मामांच्या प्रकृतीची चौकशी करण्यास आले. त्यांना मामा म्हणाले, ''रामभाऊ, आपल्याला जो काही त्रास होत असतो, तो दुसऱ्याला न सांगता, आपण मुकाट्याने सहन करावयास हवा.'' म्हणूनच मामा कोणतीही तक्रार न करता, हसतमुखाने स्वत:ची दुखणी सहन करीत होते (दीपलक्ष्मी, पृ.१५).

**१४) नामनिष्ठा :-** मामांची नामावर फार निष्ठा होती. 'श्रीराम जय राम

जय जय राम' हा त्यांचा नेमाचा मंत्र होता. नामाने सर्व काही घडते असे ते कीर्तनात सांगत.

एकदा मामांना विंचू चावला. नामस्मरण करून मामांनी विंचवाचे विष उतरवून घेतले.

एकदा एका गृहस्थास इंगळी चावली. तो हाय हाय करीत श्रीमामांचेकडे आला. कारण मामांचेवर त्याची निष्ठा होती. मामांनी नामस्मरण सुरू केले आणि त्यालाही करावयास सांगितले. त्या गृहस्थाचे इंगळीचे विष उतरले.

एकदा एका गृहस्थाने मामांना विचारले, ''मामा, गीतेत कोणता योग सांगितला आहे?'' ''गीतेत नामयोग सांगितला आहे,'' असे मामांनी उत्तर दिले.

एकदा गुरुदेव रानडे मामांच्याकडे आले होते. त्यांनी सहज मामांना म्हटले, ''बापूराव, तुम्ही दासबोध वाचता. त्यातला कोणता समास तुम्हाला आवडतो?'' ''नामाचा समास'' असे मामांनी उत्तर दिले. मामांचे सकाळचे जे पारमार्थिक कार्यक्रम असत, त्यात न चुकता नामाच्या समासाचे पठण होत असे.

**१५) कीर्तन निष्ठा :-** इ. स. १९२४ पासून मामांनी नित्य कीर्तनाला वाहून घेतले असल्याने त्यांची कीर्तननिष्ठा जबर होती, हे स्पष्ट आहे. त्यांनी नित्यनेमाने ३८ वर्षे कीर्तन केले ही गोष्ट बोलकी आहे.

इतर कुणी कीर्तनासाठी मामांना बोलावले तर कोणतीही सबब न सांगता मामा कीर्तनास जात. त्यामुळे नित्यकीर्तनाखेरीज एकाच दिवशी मामांची अनेक कीर्तने होत.

एकदा गुरुदेव रानडे सांगलीच्या राजेसाहेबांकडे उतरले होते. त्यांनी मामांना भेटीस येण्याचे निमंत्रण दिले. मामा आल्यावर रानडे म्हणाले, ''बापूराव आत्ता कीर्तन करणार काय?'' ''होय'' असे म्हणून मामांनी तेथे कीर्तन केले (गोचमा, पृ. ११५).

अशी अधिक कीर्तने झाल्यावर एकदा श्रीदादांनी मामांना विचारले, ''मामा,



तुम्हाला दमायला होत नाही का?'' ''नाही. मुळीच नाही. आणखी दोन कीर्तने सुद्धा मी करीन.'' मामांनी उत्तर दिले.

प्रारंभी श्रीमामा उभे राहून कीर्तन करीत. पुढे रक्तदाब झाल्यावर ते खुर्चीत बसून कीर्तन करू लागले. अंतिम दुखण्यात ते गादीवर बसून आणि शेवटी तर गादीवर निजून त्यांनी कीर्तन केले.

एकदा कीर्तन करताना मामांची शुद्ध हरपली. तेव्हा त्यांना खुर्चीवरून उठवून खाली झोपवण्यात आले. त्यावेळी श्रीमामांचे ओठ हलत आहेत, असे जवळच्या लोकांना दिसून आले. मामा काय म्हणत आहेत हे पहाण्यास एकाने कान जवळ केला तर मामांचे तोंडून कीर्तन बाहेर पडत होते, असे त्याला आढळले (गोचमा पृ.७२).

सोनोपंत दांडेकर मामांना म्हणत, ''बापूराव, तुम्ही एके ठिकाणी राहून कीर्तन करता. आम्ही सगळीकडे जाऊन कीर्तन करतो. त्यामुळे आम्हाला अधून मधून कीर्तन न केल्याने विश्रांति मिळते. पण तुम्हाला मात्र विश्रांति नाही.'' तेव्हा मामा म्हणत, ''सोनोपंत, मी केवळ निमित्तमात्र आहे. सद्गुरुकृपेने रोज कीर्तन चालू आहे. सर्व सत्ता सद्गुरूंची आहे.

आपले कीर्तन चुकेल या भीतीने ऑपरेशन करून हॉस्पिटलात मामा गेले नाहीत, (दा.वि., पृ.७२).

सांगलीतील गवळी गल्लीत एका देवालयात कीर्तन करण्यास मामांना बोलावण्यात आले. ठरल्यावेळी मामा तेथे गेले. पण निमंत्रकांचा पत्ता नव्हता. देवालयाला फक्त कडी होती. कडी काढून मामा आत गेले. देवालय झाडलेले नव्हते. मामांनी कोपऱ्यातील केरसुणी घेऊन देवालय स्वच्छ केले. कोपऱ्यात गुंडाळून ठेवलेले जाजम होते ते पसरले. आणि एकही श्रोता नसताना मामांनी कीर्तन सुरू केले.

कीर्तनात ब्रह्मदेव आला आणि मला ब्रह्मलोकाला बोलावू लागला तरी मी कीर्तन सोडून जाणार नाही असे मामा म्हणत.

सांगलीत विष्णुघाटाशेजारील वेणीराम मंदिरात श्री. शिरोलीकर यांनी रामनामाचा सप्ताह पुढाकार घेऊन केला. त्यांचे विनंतीवरून मामांनी तेथे कीर्तन केले. पण कीर्तनकाळी काही लोक बडबड करीत होते. तरी तिकडे लक्ष न देता मामांनी कीर्तन पुरे केले. आरतीचे वेळीही शिरोलीकर उपस्थित नव्हते. अन्य कुणाला तरी सांगून मामांनी आरती करून कीर्तन संपविले. नंतर एकदोन दिवसांनी शिरोलीकर मामांचेकडे येऊन त्यांची क्षमा मागून गेले (वही ९०).

**१६) इतरांना उत्तेजन /प्रेरणा :-** स्वत: मामांना प्रसिद्धि नको होती, पण इतरांनी पुढे जावे, आपली प्रगति करून घ्यावी, प्रसिद्ध व्हावे असे त्यांना वाटे. म्हणूनच मामा इतरांचे चांगले गुण लक्षात घेऊन त्यांना उत्तेजन/प्रेरणा देत.

समारंभप्रसंगी राममंदिरात अन्य कुणाचे तरी भजन/प्रवचन/कीर्तन होई. मामा त्याची स्तुति करीत.इतकेच काय पण कीर्तनाचे वेळी पेटीवादन, तबलावादन, झांजवादन इत्यादि चांगले झाले असे ते म्हणत (दीपलक्ष्मी, पृ.१६).

विनायकराव कानिटकर हे उत्तम नकला करीत. एकदा त्यांनी मामांच्या पुढे कीर्तनकाराची नक्कल केली. तेव्हा मामा त्यांना म्हणाले, ''विनायकराव, तुम्ही कीर्तनकाराची नक्कल चांगली केली. पण नक्कल न करता तुम्ही स्वत:च कीर्तन करण्यास प्रारंभ करावा.'' इतकेच बोलून मामा थांबले नाहीत. त्यांनी विनायकरावांना कीर्तनाची टिपणे लिहून दिली. त्यांच्या आधारे विनायकरावांनी मामांचे पुढे पहिले कीर्तन केले. पुढे विनायकराव उत्तम कीर्तने करू लागले. पुढे मामांनी विनायकरावांना कीर्तनासाठी आख्याने रचण्यास उत्तेजन दिले. विनायकरावांनी अनेक आख्याने रचली.

वासुदेवराव जोशी, बापूराव जोशी, माईसाहेब दांडेकर, रामभाऊ केळकर यांनाही मामांनी कीर्तने करण्याची प्रेरणा दिली. त्यातील वासुदेवराव जोशी हे पुढे उत्तम कीर्तनकार म्हणून प्रसिद्धीला आले (दीपलक्ष्मी, पृ.१७).

मामांच्या प्रेरणेने/उत्तेजनाने गणपतराव कानिटकर, उमाबाई बापट, पार्वतीबाई बोडस, अक्काताई मणेराजुरीकर या व्यक्तीही कीर्तन करू लागल्या



(गोचमा, ८७,८८,८९).

**१७) राष्ट्रप्रेम / मातृभूमिप्रेम :-** भारतात काँग्रेस पक्षाची स्थापना झाल्यानंतर इ. स. १९०० नंतरच्या दोन दशकात लो. टिळक, म. गांधी इत्यादि देशभक्तांच्या चळवळीने तरुण वर्गात मातृभूमीच्या प्रेमाची लाट उसळली होती. योगी अरविंद बाबू, त्यांचे गुरू मा. विष्णुपंत लेले यांच्या प्रमाणेच मामांच्या मनातही देशप्रेमाचे वारे शिरले होते.

असेच एकदा मामा झोपले असता त्यांना एक स्वप्न पडले. त्यावर त्यांनी एक काव्य रचले. ते चित्रमयजगत् आणि शालापत्रक या नियतकालिकात प्रसिद्ध झाले होते, असे गणपतराव कानिटकरांनी म्हटले आहे. ही कविता पुढीलप्रमाणे :-

''होतो शयनी निजलो त्यावेळी स्वप्न एक मज पडले ।
मन्माता येवोनि हालवुनी लक्ष दे असे बोले ।।१।।
का? काय? असे वदता मम वदनी ठेवुनि स्वकर माता ।
तुज झोप बरी आली दु:खे वदली नको निजू आता ।।२।।
वेळ असे लज्जेची माझी लज्जा जरी न राखशील ।
तरी कोण दुजा राखे ऐसे धरू मानसी खरे बोल ।।३।।
कर्तव्य असे पहिले पुत्राचे जाण की स्व-मातेचे ।
दु:ख कमी करणेचे नाही रे स्वस्थ जाय निजणेचे ।।४।।
अज्ञान स्थितीमध्ये तुजसाठी सर्व दु:ख सोसावे ।
झालासी सुज्ञ जरी तरी मातेने हाय दु:ख भोगावे ।।५।।
हे काय बरे वाटे सांग तु मानसी विचार करी ।
देहादिक नश्वर परी एक असे कीर्ती या जगात खरी ।।६।।
ऐकुनि वचन तियेचे धरिले मी चरण गाढ प्रेमाने ।
माफ करी अपराधा वदलो मातेसि प्रेमविद्ध मने ।।७।।
मातेने मज उठवुनि धरिले पुढती पुन: म्हणे मजसी ।

मी अंश असे भू चा त्या भूमातेसी का न स्मरसी ।।८।।
माता बाळपणाची परि भूमाता असेचि जन्माची ।
पोषक सर्व जगाची देई झडती तिला स्व कर्माची ।।९।।
इतक्यात स्वप्न सरले झालो जागा वळोनि जो पाहे ।
तो माता येवोनि प्रेमभरे हालवोनि या बाहे ।।१०।।''

असो. या कवितेवरून त्यांचे अंत:करणातील मातृप्रेम स्पष्ट होत आहे.

**१८) राष्ट्रभक्ति-** मामांना म. गांधींचे बद्दल फार आदर होता. म. गांधींनी स्वदेशीच्या चळवळीवर भर देऊन परकीयावर, चहा-कॉफीवर बहिष्कार घातला होता. यावेळी मामांनी चहा कॉफी सोडून दिली. आणि पुष्कळ काळ काँग्रेसचे स्वयंसेवक म्हणून काम केले. बेळगाव, नागपूर, कानपूर, अहमदाबाद येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात ते स्वयंसेवक म्हणून हजर होते.

अहमदाबाद काँग्रेसच्या अधिवेशनात, 'भाई हो' असे म. गांधीनी म्हणताच, जमलेले लोक कसे एकदम शांत झाले, हे मामा कीर्तनातही सांगत.

पुढे अरविंद बाबू इत्यादीप्रमाणे त्यांचा उत्साह मावळला आणि ''सदा नाम मुखी'' हा चरखा नंतर मामांनी घेतला (अकी, पृ.७९-८०). तथापि रथ व पालखी सोहाळ्यात प्रदक्षिणेच्या तिसऱ्या टप्प्यात मामा 'वंदे मारतम्' हे पद म्हणत असत (वही ९०).

**१९) देवाचे अनुसंधान :-** मामा काहीही करीत असले तरी त्यांचे नामाकडे अनुसंधान असे.

कैवल्यधामात कोटणीसमहाराजांच्या पुतळ्याचे अनावरण होते. या समारंभात दिंडी निघाली होती. ''सद्‌गुरुनाथ माझे आई । मला ठाव द्यावा पायी'' हे भजन सुरू होते. मामा आपल्याच रामनामाच्या अनुसंधानात होते. त्यात रमल्याने ते दिंडी सोडून बरेच पुढे गेले. मग त्यांना कुणीतरी हटकले. तेव्हा अनुसंधानामुळे आपण बरेच पुढे आलो आहोत, हे त्यांच्या लक्षात आले.

एकदा मंडईत जाऊन मामा घरी परतत होते. त्यांच्या मागे चिंतूनाना फडके



होते आणि ते मामांना हाका मारीत होते. परंतु मामांना त्याचा पत्ता नव्हता. ते तसेच पुढे चालले होते. मग भरभर चालून फडकेनी त्यांना गाठले व म्हटले, ''अहो बापूराव, मी तुम्हाला किती हाका मारल्या. तुमचे लक्ष कोठे होते?'' ''असे होते कधी कधी'' इतकेच उत्तर मामांनी दिले (गोस्मृ, पृ.१४).

***

# प्रकरण–१२

## श्रीमामांची ग्रंथसंपदा

श्रीमामांना जरी दीर्घ आयुष्य लाभले होते, तरी त्यांना लेखनास फारशी सवड मिळाली नाही असे दिसते. त्यामुळे त्यांची ग्रंथसंपदा फक्त तीन इतकीच आहे. श्रीमामांचे तीन ग्रंथ सध्या प्रकाशित स्वरूपात उपलब्ध आहेत, ते असे :-

**१) श्रीहनुमद्-गुरुचरित्र- बोधसार २) श्रीरामपाठ** आणि **३) अमृतवाणी.** हे तीनही ग्रंथ श्रीमामांचे चिरंजीव श्रीदादा ऊर्फ श्रीदासराम यांनीच प्रकाशित केले आहेत. यातील पहिला ग्रंथ १९३७ मध्ये, दुसरा ग्रंथ १९३८ मध्ये, आणि तिसरा ग्रंथ १९८१ मध्ये अशा क्रमाने प्रकाशित झाले होते. याचा अर्थ असा की पहिले दोन ग्रंथ हे श्रीमामा विद्यमान असताना प्रकाशित झालेले होते तर तिसरा ग्रंथ श्रीमामांचे महानिर्वाण झाल्यानंतर काही वर्षांनी प्रकाशित झाला होता. या तीन ग्रंथातील विषयांची ओळख आता येथे संक्षेपाने करून दिलेली आहे.

### १) श्रीहनुमद्-गुरुचरित्र-बोध-सार

या शीर्षकात हनुमद् शब्दाने हणमंतराव कोटणीस ऊर्फ तात्यासाहेब कोटणीसमहाराज हे अभिप्रेत आहेत. ते श्रीमामांना उपदेश करणारे गुरु नव्हते, पण श्रीमामा त्यांना गुरुस्थानी मानत. त्यांच्या जीवन चरित्रावरून काय बोध घेता येतो याचे सार या ग्रंथात वर्णिले आहे.

कोटणीसमहाराजांच्या लौकिक जीवनातील फार थोड्या प्रसंगांचा उल्लेख



या ग्रंथात आहे, जास्त भर दिला आहे तो त्यांच्या पारमार्थिक जीवनावर. या ग्रंथाचे एकूण अध्याय तेरा आहेत आणि ते ओवीबद्ध आहेत आणि एकूण ओवीसंख्या ७०० इतकीच आहे. या ग्रंथात आलेले विषय असे आहेत :-

पहिल्या अध्यायाचे नाव 'श्रीगणेश-सरस्वती-गुरुपरंपरा-स्तवन' आहे. त्यावरून कळते की या अध्यायात गणेश, सरस्वती आणि कोटणीसमहाराजांची गुरुपरंपरा यांचे स्तवन आहे. प्रथम गणेशाला वंदन आणि स्तवन आहे. श्रीमामा म्हणतात :- गणेश हा ॐकार स्वरूपी आहे (१.९). तो आधारचक्राचे ठिकाणी, वंशषसं या अक्षरांनी बनलेल्या सिंहासनावर विराजमान आहे. तो विघ्नहर्ता आहे. त्याची स्तुति केल्यावर गणेशाने श्रीमामांना आश्वासन दिले:- ''म्हणे ऊठ तुझी चिंता गेली । गुरुचरित्र वर्णन शैली । प्राप्त झाली तुजलागी ।। (१.१८) आणि ''गुरूचरित्र पूर्णत्वाप्रत । निर्विघ्नपणे जाईल।।'' त्यानंतर श्रीमामांनी सरस्वतीचे वर्णन करून तिला वंदन केले आहे. सरस्वती ही परमार्थाचे मूळ (१.२५) असून, ती शब्दशक्तिरूपिणी (१.२६) असून ती ''परेपासोनी वैखरी। रूप जियेचे चराचरी । व्यापक सकळांचे अंतरी ।।'' (१.२६) अशी आहे. ती ''ब्रह्मतनया'' असून ''मूळमाया तूर्या'' आहे (१.३६). तसेच ती ''सतरावी जीवन कळा'' आणि ''मोक्षश्री महामंगला'' (१.३७) आहे. तिचे स्तवन केल्यावर, तिने श्रीमामांना कथन केले ''आता वर्णन करी गुरुचरित्र गंभीर । ज्याचिये श्रवणे चराचर । पावन होतील तात्काळ ।।'' (१.४२). सरस्वतीकडून अशी आज्ञा झाल्यावर, श्रीमामा ''ॐकारयुक्त गुरुपरंपरेला'' (१.४९) वंदन करतात. शंकरस्वरूप रेवणसिद्ध, मरुळसिद्ध, काडसिद्ध, गुरुलिंगजंगम, (गुरुलिंगजंगमांची शिष्या) लक्ष्मी अक्का, गुरुलिंगजंगमांचे शिष्य रघुनाथप्रिय साधु, मग रामराय (= चिमडमहाराज) आणि नंतर हनुमंत अशी ही परंपरा आहे. हनुमंत हे ''धन्य धन्य रामभक्त । प्रपंचात परमार्थ'' (१.५६) त्यांनी साधला. गुरुपरंपरेला वंदन केल्यावर श्रीमामांना समाधान झाले, आणि मग त्या संतांच्या आशीर्वादानुरूप, त्यांनी गुरूचे चरित्र वर्णन करणे सुरू केले (१.५७).

दुसऱ्या अध्यायाचे नांव 'सद्‌गुरु स्तवन' असे आहे. 'गुरुस्वरूप ते अनंत' (२.१५) असून 'गुरुरूप' हे ब्रह्मरूप आहे (२.१३). मानवी शरीरात गुरु हे त्रिकूटस्थानी रहातात (२.२३१). त्रिकूटस्थानी इडा-पिंगला-सुषुम्ना म्हणजेच गंगा, यमुना, सरस्वती यांचा संगम आहे (२.३१). या संगमस्थानात गुरु रहातात (२.३४). गुरूंना-हनुमंत गुरूंना-वंदन करून, स्तवन केल्यावर, गुरु म्हणाले, ''तव मुखे बोलेन मी साचार'' (२.४६), तेच गुरुचरित्र मी वर्णन करीन असे श्रीमामा म्हणतात (२.४८). या गुरूचे चरित्राला ''साधक सिद्ध होय कैंसा । गुरूबोधीचा विषय ऐसा । करोनि दावितील सुगमसा । श्रीगुरू आपल्या सामर्थ्ये ।।'' (२.४९). याच स्थळी श्रीमामांना ज्ञानेश्वरमहाराजांचे स्मरण झाले. कारण 'प्रपंची परमार्थ साधशील।' (२.५३) असे पूर्वी त्यांनी श्रीमामांना आश्वासन दिले होते. त्यांनाही मामा नमस्कार करतात.

तिसऱ्या अध्यायाचे नांव 'अवतार वर्णन' असे आहे. यात प्रारंभी गुरूंनी काय सांगितले ते श्रीमामा असे सांगतात :- ''माझे चरित्र वर्णावे थोडक्यात । ओव्या करूनी सात शत । साधनमार्ग कळोनि येईल ज्यात । जेणे बद्धस्थिती पावेल ।।'' (३.५) बद्धापासुनि सिद्धवरी । गुरूकृपे कैसे साधन साधावे चतुरी । ते मी आचरोनी दाविले कुसरी । त्याचे वर्णन करावे ।। (३.६). मग श्रीमामा सांगतात :- मुधोळ गावी पांडुरंगराव कोटणीस हे गृहस्थ होते. ते चांगले भक्त होते. त्यांचे पत्नीला कार्तिक शुद्ध अष्टमी शके १७७६ रोजी तेरदळ गावी पुत्र झाला. त्याचे नाव हनुमंत असे ठेवण्यात आले. हा हनुमंत हा 'हनुमंताचा अवतार' (३.१९) होता. रामकालीन मारुतीने या प्रथम कलियुगात रामदास म्हणून अवतार घेतला. रामदासाने लग्न करावे ही आईची इच्छा अपुरी राहिली. ती पूर्ण करण्यास माऊलीने ह. पां. कोटणीस रूपाने जन्म घेतला. आणि या जन्मी ''येथे केला संसार । गृहस्थाश्रम एकनाथ ऐसा थोर । ऐसे मातेचे अंतर। तृप्त केले (३.२९).'' या कोटणीस अवतारात हनुमंताने काय केले ते या ग्रंथात मी वर्णन करीन, असे श्रीमामा म्हणतात.



चौथ्या अध्यायाचे नाव ''विवेक वैराग्य वर्णन'' आहे. या अध्यायात कोटणीसमहाराजांचे ठायी बालपणापासून नित्यानित्यवस्तुविवेक होता आणि त्यामुळे त्यांचे अंगी वैराग्य बाणले होते, असे श्रीमामांचे म्हणणे आहे.

नित्य ब्रह्म हे सतत असते. शरीर इत्यादि क्षणोक्षणी पालटत असल्याने ते अनित्य आहे. म्हणून अनित्याचा विचार टाकून नित्य ब्रह्मात मन सदा गुंतलेले असावे, असे कोटणीसमहाराजांच्या बाबतीत घडले. त्यामुळे त्यांच्या मनात विराग अथवा वैराग्य आले. या वैराग्यामुळे जगातील सर्व पदार्थातून कोटणीसमहाराजांचे मन निघाले. तथापि त्यांचा लौकिक आचार इतराप्रमाणेच चालू होता. मामा सांगतात :- ''ऐसे सद्‌गुरुंचे मन । निघाले असे सर्वातून । परी बाह्य आचरण । लौकिकाचारे दाविती ।'' (४.३७). म्हणून ''आत्मस्वरूप अंतरात । तेथे ठेवोनी राहती चित्त । बाह्य भोगी न रहावे रत । हे जयांनी साधिले।।'' (४.३८).

पाचव्या अध्यायाचे नाव आहे ''शमदमादि-साधन वर्णन''. कोटणीसमहाराजांच्या ठिकाणी शमदमादि-साधन-संपत्ति होती असे या अध्यायात सांगितले आहे. घरात रहात असतानाच कोटणीसमहाराजांनी शम, दम इत्यादि हस्तगत केले. ''शम म्हणजे मनासी जिंकावे । दम म्हणजे इंद्रिया जिणावे । हे सद्‌गुरु साधिती स्वभावे । गृहस्थितीत वर्तता ।।'' (५.४). मनाला अंतरात्म्याची स्थिति कळताच मनाला समाधान होते. ''मनासी होता समाधान । झाले सद्‌गुरुचे अधीन । ऐसे रीति शम साधन । सद्‌गुरुंनी साधिले।।'' (५.११). म्हणून ''नाही कधी हट्ट केला । अमुका पदार्थ द्यावा मला । जो जो ज्या वेळीसी मिळाला तो तो मानिला थोरचि ।।'' (५.१४). इंद्रियांना परमेश्वराकडे वळवून ''येणेचि परी सर्वेंद्रियांवरी मात । करोनी स्वाधीन ठेविली ।।'' (५.२७). याचप्रमाणे उपरति (५.३२), श्रद्धा (५.४३), समाधान (५.४७) इत्यादि साधले. अशाप्रकारे शमदमादिसाधन संपत्ति प्राप्त झाल्यावर ''ऐसी संपूर्ण तयारी । जाहली सद्‌गुरुंचे अंतरी।।'' (५.५०), कोटणीसांचे मनात

मुमुक्षुत्व उद्‌भवले (५.५१). मुमुक्षा म्हणजे मोक्ष मिळविण्याची इच्छा. ती मनात उद्‌भवली आणि तिचे समाधान कोण करील असा विचार आला (५.५२). हे सर्व होत असताना मुधोळ संस्थानात कोटणीसमहाराज नोकरी करीत होते. पगार कमी असल्याने घर खर्चाची ओढाताण असे (५.३१). परंतु मन स्थिर ठेवून कोटणीसमहाराजांनी वामनराव या चुलत्याला खूष ठेवले (५.३५). लहानपणीच त्यांचे लग्न झाले. त्यांच्या पत्नीचे नाव लक्ष्मी (५.३७).

सहाव्या अध्यायाचे नाव 'गुर्वनुग्रह-कृपाशीर्वाद-वर्णन' असे आहे. मोक्षाची इच्छा पूर्ण करण्यास सद्‌गुरुंचे मार्गदर्शन लागते. त्यासाठी कोटणीसांनी गुरूचा शोध सुरू केला (६.१७). आणि त्यांना कळून आले की चिमड या गावी रामचंद्रावमहाराज यरगट्टीकर हे अधिकारी सत्पुरुष आहेत. कोटणीसमहाराज त्यांच्याकडे गेले. त्रिकालज्ञानी यरगट्टीकरांनी कोटणीसांची पात्रता ओळखली (६.२४,२८) आणि त्यांना अनुग्रह दिला (६.३६). त्यानंतर कोटणीसमहाराजांनी झपाट्याने साधनाचा अभ्यास सुरू केला. आणि साधनाच्या सततच्या अभ्यासाने त्यांनी गुरूंची कृपा प्राप्त करून घेतली (६.४२). या अध्यायात कोटणीसमहाराजांच्या लौकिक जीवनातील एक प्रसंग सांगितला आहे, तो असा :- एकदा कोटणीसमहाराजांनी गुरूंना आपले घरी भोजनास बोलाविले. भोजनोत्तर आपला सर्व पगार गुरूंना दिला. तेव्हा त्यातील दोन रुपये परत देऊन गुरु म्हणाले, ''या दोन रुपयांनी तुझा प्रपंच आणि परमार्थ हे दोन्हीही पूर्ण होतील'' (६.५५-५६).

सातव्या अध्यायाचे नाव आहे 'साधनमार्गवर्णन'. गुरूकथित साधन करताना कोटणीसमहाराजांना या साधन मार्गावर काय काय अनुभव प्राप्त झाले याचे वर्णन या अध्यायात आहे.

साधकाचा साधनाचा सततचा प्रयत्न आणि गुरूकृपा यांच्या जोरावर निर्गुण ब्रह्माकडे जाणाऱ्या पश्चिम मार्गावर साधकाला पुढील टप्पे आणि नाद व प्रकाश यांचे अनुभव येतात. साधनातील पवनसिद्‌धि प्राप्त झाल्यावर साधक



प्रथम त्रिकूट स्थानी येतो. तेथे त्याला पीतप्रकाशयुक्त चार लिंग स्थान दिसते (७.२१). त्रिकूट ओलांडून पुढे गेल्यावर श्रीहाट स्थान लागते. येथे साधकाला लखलखीत पीत प्रकाश दिसतो (७.२८). श्रीहाटानंतर गोल्हाट मंडळ लागते. येथे सर्वत्र तेज असते आणि तेथे बिंदुस्वरूप शिवाचा साक्षात्कार होतो (७.३२). त्यानंतर औटपीठ स्थानी साधक येतो. येथे त्याला अनाहत ध्वनि ऐकू येतो आणि महेश्वररूपी परमेश्वर जगदेव स्वरूपात दिसतो. आणि येथे नील वर्णाची प्रभा पसरलेली असते (७.३६-३७). त्यानंतर भ्रमरगुंफा नावाचे स्थान लागते. या ठिकाणी साधकाला उन्मनी अवस्था प्राप्त होते (७.४४). त्यापुढे ब्रह्मरंध्र नावाचे स्थान लागते. येथे ''कोटि सूर्य तळपती । कोटी चंद्र प्रकाशती । शीतलपणे ।।'' (७.५०). यानंतर ब्रह्माचे निरामय निर्गुण स्वरूपात साधकाचा प्रवेश होतो (७.५१).

यानंतर कोटणीसमहाराजांच्या जीवनातील एक प्रसंग श्रीमामा सांगतात:- मुधोळची नोकरी सोडून कोटणीसमहाराज चिमडास आले. तेव्हा चिमडमहाराज तापनाशी तीर्थात माशांना अन्न घालीत होते. ते कोटणीसांना म्हणाले, ''या माशांना जो अन्न घालतो तोच तुझे रक्षण करील.'' नंतर भोजनोत्तर चिमडमहाराज म्हणाले, ''तुझे भाग्य अपरंपार वाढेल'' (७.६३). पुढे कोटणीसमहाराज सांगलीस येऊन वकिली करू लागले. त्यात त्यांची भरभराट झाली. ते नित्य कीर्तन करू लागले.

आठव्या अध्यायाचे नाव आहे ''कीर्तन-साधन-प्रसंग-वर्णन''. श्रीमामा प्रथमच सांगतात :- ''हरि गुणनाम संकीर्तन । हे तो सर्व साधनांचे साधन । जे साधिता भगवान । आपण स्वये वश होय ।।'' (८.४). नंतर ते कोटणीसांच्या कीर्तनाचे वर्णन करतात. देहात विशिष्ट ठिकाणी अखंड कीर्तन चालू असते (८.१३). तेथे कोटणीसमहाराज कीर्तनाकार झाले (८.१६). असे जे कीर्तन अंतरंगात होते तेच बाहेर प्रगटले (८.१९). आपल्या सद्‌गुरुसमोर कोटणीसमहाराजांनी पहिले कीर्तन केले. ते ऐकून चिमडमहाराज प्रसन्न झाले.

आणि नंतर हेच कीर्तन पुढे चालू राहिले (८.२१). कोटणीसमहाराजांचे कीर्तन ऐकल्यावर- ''ज्यांनी ज्यांनी कीर्तन आयकिले । तयांसी हे अनुभवा आले । ऐसे नाही आयकिले । आजवरी कीर्तन ।।'' (८.२९). शारीरिक व्याधि झाली तरी कीर्तनात खंड पडला नाही (८.५३). कोटणीसांचे कीर्तनास लोकांनी येऊ नये म्हणून काही विघ्नसंतोषी लोकांनी रस्त्यावर सराटे पसरले. हे लोक कोण हे माहीत असूनही कोटणीसमहाराज शांत राहिले (८.४९-५१). एकदा कीर्तनात लावलेली बत्ती विझण्यास आली. पण ''बत्ती उत्तम राहिली तेवत । कीर्तन संपेपर्यंत'' (८.६५). एकदा एक संन्यासी कीर्तनास आले होते, त्यांचे मनातील विचार जाणून, त्या दिवशीच्या कीर्तनात कोटणीसमहाराजांनी, ''तत्त्वमसि'' या उपनिषदातील महावाक्याचे विवरण केले (८.३४). कोटणीसमहाराजांचे कीर्तन ऐकल्यावर माईसाहेबमहाराज यरगट्टीकर या गुरुपत्नीने त्यांना गुरुपादुका दिल्या. एकदा चिमडास कोटणीसमहाराजांचे कीर्तनात रेवणसिद्ध प्रगटले (८.४४). 'कीर्तन हे शारीरिक व्याधीवर सुंदर औषध आहे,' असे एकदा कोटणीसमहाराज म्हणाले (८.७०).

नवव्या अध्यायाचे नाव 'गृहस्थाश्रम वर्णन' असे आहे. प्रत्यक्षात संत हे जरी परमेश्वराचे स्थानी रहात असतात, तरी लौकिकात ते कोणत्या तरी घरी रहात असतात (९.६-१३). सांगलीतील घरी रहात असता कोटणीसांनी सरळ वकिली करून धन मिळविले आणि ते योग्य कारणी खर्च केले (९.१७-१८). पैसा मिळवून कुळाला झालेले कर्ज फेडले आणि परोपकारी खर्च केले (९.२२-२३). त्यांचे घरी अनेक लोक रोज जेवणास असत. चिमडचा गुरूंचा मठ जीर्णोद्‌धार करून पुन: बांधून दिला (९.२६). एका गरीबाला तर त्यांनी एकदा जरीकाठी डोक्याचा रुमाल देऊन टाकला (९.३९). नानबा फडणीस या मित्रास तर आपल्या घरी सहकुटुंब ठेवून घेतले (९.५३). अशा प्रकारे आदर्श गृहस्थाश्रम पाळला.

दहाव्या अध्यायाचे नाव आहे 'सिद्‌ध-स्थिति वर्णन'. गृहस्थाश्रमात राहून



कोटणीसमहाराज जरी प्रपंच करीत होते, तरी ते सर्वातून अलिप्त होते (१०.७,१०). त्यांचे चित्त चैतन्यात समरसले होते (१०.२१). कोटणीसमहाराज सिद्‌ध झालेले असल्याने त्यांचे हातून काही चमत्कार घडले. ज्या कृष्णा नदीच्या तीरावर सांगली वसली आहे तिला एकदा महापूर आला. तेव्हा काही भक्तांच्या विनंतीस मान देऊन, कोटणीसमहाराजांनी कृष्णेच्या पाण्यास स्पर्श केला आणि पाण्याने उतार टाकला (१०.४१). कुरुंदवाडचे संस्थानाधिपति अण्णासाहेब पटवर्धन यांना गणपतीचा साक्षात्कार घडवला (१०.६०). मामांच्या राम या चिरंजीवाचे ठिकाणी ''आपुले अंतरीचे साधन थोर । प्रगटविती त्याचे अंतरी ।।'' (१०.६३) आणि त्यांच्या कृपेने राम हा बालपणापासून कीर्तन करू लागला (१०.६४). एकदा एक कर्नाटकातील माणूस कोटणीस यांच्या कीर्तनास आला. त्याला ''दाविला साक्षात्कार पूर्ण । सिद्‌धस्वरूपाचा अंतरी।।'' (१०.५८).

अकराव्या अध्यायाचे नाव ''साक्षात्कार स्थिति वर्णन'' असे आहे. यात काही संकीर्ण विषय आलेले आहेत, ते असे :- १) कोटणीसमहाराज सतत ज्या साक्षात्कारात असत तो सांगितला आहे :-

मन जयांचे आनंदाकारू । असे स्वरूपी सर्वदा ।। (११.६) 'ते स्वरूप स्वरूपाकार झाले' (११.७) होते. स्वयंप्रकाशी नील बिंदु, आनंद कंद असा दंड, अनंत तारका, पूर्णचंद्र, नाना रंगी प्रकाश त्यांना दिसत (११.८-१६).

श्रीमामांच्या घरी येऊन भोजन करून कोटणीसमहाराज गेले. जाताना शाळा केव्हा सुटते असे विचारले. ''पाच वाजता'' असे म्हटल्यावर ''ही फार छान वेळ आहे'' (११.२४) असे कोटणीसमहाराज म्हणाले. पुढे माघ वद्य प्रतिपदेपासून पाच वाजताच श्रीमामांनी कीर्तनाचा प्रारंभ केला. पौष वद्य षष्ठी, शके १८४५ या दिवशी कोटणीसमहाराज 'स्वरूपी स्वरूपाकार जाहले' (११.४८). त्यांचे निर्वाणानंतर दोन कन्या व चार पुत्र (११.५) कोटणीसमहाराजांच्या इच्छेप्रमाणे वागत राहिले (११.३९).

बाराव्या अध्यायाचे नाव ''स्वानुभव वर्णन'' असे आहे.

कोटणीसमहाराजांच्या निर्वाणानंतर श्रीमामांना त्यांचा जो अनुभव आला तो त्यांनी येथे सांगितला आहे. त्यांच्याच शब्दात तो असा आहे :-

''संत सद्‌गुरु आले गेले । हे तो आपुले बोलणे झाले । परी ते अखंडित राहिले । भक्तजनांकरणे ।। भक्तासाठी अवतरत ।। शेखी साधावया भक्तांचे हित । जरी आपुला भाव असेल । तरी प्रगट होऊनी भेटतील ।। सद्‌गुरूंनी देह ठेविल्यावरी । रात्री बोलत असता अवधारी । माघ वद्य तृतीया निधीरी । शके अठराशे पंचेचाळीस ।। अनंतराव म्हसकर । मज म्हणाले ऐकिला का प्रकार । तात्यांनी देह ठेविल्यावर । काशीत कीर्तन केलेसे ।। मनी आले की देह ठेविल्यावरी । कीर्तन होईल कोणे प्रकारी । ऐसे संशयित मन । माझे झाले असे जाण ।। बराच वेळ बोलिल्यावरी । रात्री बाराचा सुमार निर्धारी । त्यांचे खोलीतूनी उठोनी सत्वरी । घरी देवाजवळी आलोसे ।। माघ वद्य प्रतिपदेपासून। ते माघ वद्य दशमीपर्यंत जाण । दासबोध संपूर्ण वाचन । माझा नेम नेहमीचा।। त्या प्रमाणे देवापाशी । बैसलो दासबोध वाचनासी । तो एक दोन मिनिटांत पहा कैसी । नवल गोष्ट जाहली ।। प्रगट होऊनी सद्‌गुरुवर । उभे राहिले मज समोर । सहज पाहू लागलो वर । तो प्रत्यक्ष तात्या दिसले ।। पुनः खाली पाहून । श्रीदासबोध वाचू लागलो जाण । पुनः वर पाहता जाण । उभे प्रत्यक्ष तैसेचि । मनात ऐसे वाटले पाही । तेचि बोलत होतो काही । त्याचा भास तरी नाही । हा होत ।। ऐसे मनात येऊनि गेले । पुनः पाहताचि भले । तो तैसेचि उभे राहिले । प्रत्यक्ष दिसती मजलागी ।। मन झाले चकित । अंग झाले रोमांचित। तैसाचि उठोनि त्वरित । बसण्या आसन घातले ।। आसन घालिता सत्वर । बैसले श्रीसद्‌गुरु आसनावर । दासबोध वाचन सत्वर । पुढे वाचू लागलो ।। वाचणे संपपर्यंत । बैसले होते ऐकत । माझे मन संशयातीत । होते आता जाहले ।। या दिवसाचे आधी दोन दिवस । म्हणजे माघ वद्य प्रतिपदेस। आरंभ केला होता कीर्तनास। नित्य नेमे करावे म्हणूनी ।। मग पोथी खाली ठेवून । सद्‌गुरुंचे पाय धरिले जाण। मस्तक पायांवरी ठेवून । बोलिलो कृपा करावी ।। कीर्तन करावे



नित्य। हा हेतु धरूनी मनात । आरंभ केला असे सत्य । सद्‌गुरूंनी इच्छा पूर्ण करावी। आपण जैसे चालविले व्रत । तैसे माझे हातूनी चालवावे निश्चित । आपण सर्व करणार समर्थ । ऐसे बोलुनी पाय धरोनि राहिलो ।। प्रसन्न जाले सद्‌गुरुवर । मम मस्तकी ठेविले दोनी कर । मजला उठवोनी सत्वर । दृष्टीस दृष्टी दिधलीसे ।। कृपादृष्टीने पाहून । मजला दिधली संकेत खूण । तुझे हातुनी कीर्तन भक्ती जाण । मजप्रमाणे अखंड चालेल ।। ऐसी नेत्र संकेत खूण । होवुनिया प्रसन्न वदन । श्रीसद्‌गुरुंची अनुज्ञा जाण । नित्य नेमे कीर्तनासी दिधली ।। ऐसा देऊनी कृपावर । सद्‌गुरु अदृश्य जाहले सत्वर । ज्यांचे कृपे मम कीर्तन निरंतर । असे नित्य नेमे तेथे चालिले ।। शके आठराशे पंचेचाळीस जाण। माघ वद्य प्रतिपदेपासून । आज बारा वर्षे अकरा महिने पूर्ण । सेवा सद्‌गुरुंनी घेतली ।। (१२-६-३२).

या साक्षात्कारांनंतर तीन वर्षे गेल्यावर सद्‌गुरुच्या प्रेरणेने हनुमत् सद्‌गुरुंच्या पादुका श्रीमामाना आपोआप प्राप्त झाल्या. (१२.४०-४१) यानंतर श्रीमामांनी साडेतीन कोटि रामनामाचे पुरश्चरण केले. ते संपूर्ण झाल्यावर, वेणाबाईंच्या मठात समर्थ रामदासांनी स्थापन केलेला मारुति मिरज मठाधिपति यांचे कडून श्री. बाबूरावजी कोटणीस यांच्या मध्यस्थीने श्रीमामांस मिळाला (१२.४२-४३).

एकदा कीर्तनात मोठ्यांदा बोलता येईना. तेव्हा त्यांनी कोटणीस महाराजांची प्रार्थना केली. ''कीर्तन चालावे असे आपणास वाटत असेल तर माझा आवाज पूर्ववत् करावा.'' तात्काळ मामांचा आवाज पूर्ववत् मोठा झाला.

कोटणीसमहाराज एकदा श्रीमामांच्या सौ. इंदिराच्या स्वप्नात आले आणि त्यांनी नारदाचा प्रसाद म्हणून पाच हलव्याचे दाणे इंदिराबाईना दिले (१२.५१-५२). नारदांचा प्रसाद म्हणजे घरी होणारे नित्य कीर्तन. तात्यासाहेबांचे असे आलेले अनुभव श्रीमामांनी या अध्यायात सांगितले आहेत.

तेराव्या अध्यायाचे नांव 'फलश्रुति वर्णन' असे आहे. हे

हनुमत्गुरुचरित्रबोधसार विशिष्ट पद्धतीने वाचले असता काय फळ मिळेल ते या शेवटच्या अध्यायात सांगितले आहे. त्यानंतर उपसंहार करताना श्रीमामा म्हणतात :- माझे वडिलांनी चरित्र लिहिण्याचा विचार मला सांगितला होता. तो आज पूर्ण झाला. तेरा दिवसातच ग्रंथाचे तेरा अध्याय लिहून झाले. त्यानंतर माता-पिता, कुलदेव रामेश्वर, कुलस्वामिनी, नागाप्पाण्णा, नारायण महाराज यरगट्टीकर यांना वंदन करून श्रीमामांनी हा ग्रंथ समाप्त केला आहे.

***

## २) श्रीरामपाठ

श्रीमामा विद्यमान असतानाच इ. स. १९३८ साली ''श्रीरामपाठ'' हा ग्रंथ त्यांचे चिरंजीवानी-श्रीदादांनी-प्रकाशित केला होता. हनुमद्गुरुचरित्रबोधसार या ग्रंथाच्या मानाने हा ग्रंथ लहान आहे. बत्तीस अभंगांच्या विशिष्ट समूहाला श्रीमामांनी श्रीरामपाठ हे नाव दिले होते. ''बत्तीस अभंगाचे हे पुस्तक आकाराने लहान पण प्रभावाने फारच मोठे आहे. त्याचे मोल करणे म्हणजे श्रीप्रभुरामरायाचे मोल केलेप्रमाणे होणार आहे'', असे उद्गार श्रीरामरायांच्या पहिल्या आवृत्तीच्या गोपालनाथ (गोपाळकाका कोटणीस) या प्रस्तावनाकाराने काढले होते. तर ''श्रीरामपाठ म्हणजे मामा'' अशी अवस्था आहे, असे श्रीदादांनी म्हटले आहे.

वारकरी संप्रदायातील काही संतांचे हरिपाठ प्रसिद्ध आहेत. त्या हरिपाठांच्या धर्तीवर श्रीमामांनी श्रीरामपाठ लिहिलेला आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपाप्रसादाने आणि प्रेरणेने हा रामपाठ रचला गेला (३२.५) आणि रेवणसिद्धांच्या दर्शनाने या रामपाठाची समाप्ति झाली (३२.६).

श्रीमामा हे महान संत होते. संतांचे अभंग हे अंतःस्फूर्त असतात. त्यामुळे त्यांतील विषय हे नेहमी तार्किक दृष्ट्या सुसंगत आणि सुसूत्र असतातच असे नाही. रामपाठातील विषयांचे तसेच झाले आहे. म्हणून श्रीरामपाठातील विषय



थोडेफार सुसूत्ररीत्या एकत्र सांगण्याचा प्रयत्न पुढे केला आहे.

**परमार्थात नरदेहाचे महत्त्व-** मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्न करणे, हे प्रत्येक संसारी जीवाचे कर्तव्य आहे, असे साधुसंतांचे मत आहे. या संसारात नरदेह एकदाच प्राप्त होतो (२.४). याचा अर्थ असा नव्हे की जन्ममरणाच्या फेऱ्यात पुनः नरदेह प्राप्त होणार नाही, पण तो केव्हा आणि काय प्रकारचा प्राप्त होईल, हे मात्र सांगता येणार नाही. म्हणून आत्ता चालू घडीला जो नरदेह प्राप्त झाला आहे त्याचा सदुपयोग करून, 'नराचा नारायण' होण्याचे ध्येय आत्ताच साध्य करून घेणे आवश्यक आहे.

**सार आणि असार-** त्यासाठी पहिली पायरी म्हणून या संसारात सार/ महत्त्वाचे काय आहे आणि असार काय आहे, याचा शोध प्रथम करावयास हवा, तरच स्वतःचे हित/कल्याण प्राप्त करून घेता येते (२५.१). हा संसार/ प्रपंच सत्त्व, रज, आणि तम यांनी युक्त, त्रिगुणात्मक आहे, आणि तोच असार आहे. त्रिगुणात्मक संसाराचे अतीत असणारे निर्गुण तत्त्व ब्रह्म हेच फक्त सार आहे (२५.२). साहजिकच गुणातीत होऊन, देवाचे दर्शन झाले की मोक्ष हा परम पुरुषार्थ साधण्याचे स्वतःचे कार्य सफल होते (२५.३).

**अखंड सुखाचा शोध -** संसार हा मायिक आहे. या मायिक संसारात खंड सुख आहे (१७.१). म्हणजे येथे मिळालेले सुख कायम टिकून रहात नाही. तर सुखदुःखाची आभाळे येत जात असतात. आणि देहभाव आहे तोपर्यंत सुखदुःख चुकत नाही. म्हणून देहभावरहित झाल्याशिवाय, संसारातील विपत्ति/दुःख दूर होऊन, माणसाला खरे, अखंड सुख मिळणार नाही (१७.१-२). एक ईश्वर- श्रीराम-मात्र अखंड-सुख-रूप आहे (१७.१). म्हणून अखंड सुखासाठी ईश्वर प्राप्तीसाठी प्रयत्न माणसाने करावयास हवा.

**कोणता प्रयत्न -** देवाचा शोध करण्यास काही माणसे उगाच नसती खटपट करतात; पण अशा फुकटच्या खटपटीने देवाची प्राप्ति होत नाही. खरी खटपट काय हे न कळल्याने लोक उगाच दाही दिशा भटकत रहातात (५.१-२), योग, याग,

इत्यादींच्या खटाटोपात पडतात. पण त्यांचा उपयोग नसल्याने, योग, याग इत्यादि निरर्थक उपाधि आपल्या अंगाला चिकटवून घेऊ नयेत (५.४). कारण ही योग इत्यादि कर्मे व्यर्थ आहेत; त्यांचेसाठी फुकट श्रम मात्र होतात, पण पदरात मात्र फारसे काही पडत नाही (१४.१). या असल्या अन्य उपायांनी माणसाला फक्त शीण होतो (६.३).

रामनाम नीट उच्चारणे हीच ईश्वरप्राप्तीची खरी खटपट आहे (५.३). एक नाम घेतले की इतर कोणत्याही गोष्टीची गरज लागत नाही (२३.४). भक्तिप्रेमाने नाम घेतले की देवाची/ईश्वराची भेट/दर्शन होते (५.४). एकभावाने जो कोणी नाम उच्चारीत रहातो, त्याचा देव अंकित होतो (६.१). रामनाम नित्य उच्चारणाऱ्या पुरुषाला पुन: जन्ममरण नाही (८.१). त्याला मोक्षाचा-अखंड सुखाचा-लाभ होतो.

रामनाम घेणारा प्राणी दैववान्/नशीबवान् म्हटला पाहिजे (२३.३). रामनाम हे मुखी येणे ही महाभाग्याची गोष्ट आहे, त्याहून श्रेष्ठ असे दुसरे भाग्य नाही (१५.१). ऐहिक ऐश्वर्य आहे म्हणून ज्याला भाग्यवंत असे व्यवहारात म्हणतात, तो खरा भाग्यवंत नव्हे; कारण त्याला देवाचे दर्शन झालेले नाही. परंतु रामनाम घेतल्यामुळे जे भाग्यवंत आहेत, त्यांना मात्र देवाचे दर्शन होते (१५.२). त्यामुळे देवाला संतुष्ट करणारे हे नाम ज्याच्या आदराचा विषय नाही, तो माणूस पापाचे आगरच होय (९.३). रामनाम जो घेत नाही त्याचे बोलणे हे अधमपणाचे आहे. रामनाम न घेणारी वाणी ही अमंगल आहे (४.१).

रामनामाची थोरवी इतकी आहे की एक वेळ नाम घेतले, तर अधम माणूस सुद्धा संसारातून तरून जातो (२.३). रामनाम उच्चारण्याऱ्या माणसाचा संपूर्ण वंशच पुण्यवंत होतो (२१.२). म्हणून रामनामाचा साठा करावा. नामाचा असा साठा करणारा भाग्यवंत हरिभक्त जगामध्ये धन्य होतो (१५.३.४). जो कोणी भक्त नाही त्याचे जीवन लाजिरवाणे होते (३.१). जो हरीचा/देवाचा/ईश्वराचा भक्त आहे त्याचे जवळ देवाधिदेव वास करतो (१.४).



नाम सर्व तपांत श्रेष्ठ आहे (१३.१). नामाच्या प्रकाशाने माणसाच्या बुद्धीतील अंधार म्हणजे अज्ञान दूर होते. रामनामाचे ठिकाणी आसक्ति वाढत जाते, आणि अंतरीची ज्योति प्रगट होते (१३.२-४). रामनाम हे सर्व सुखांत श्रेष्ठ आहे (१७.४). संक्षेपाने सांगायचे झाल्यास, रामनाम कंठात असणे हे हितकारक आहे; कारण त्यामुळे जगजेठी/परमेश्वर संतुष्ट होतो (२५.४).

**रामनाम घेताना पाळण्याची पथ्ये -** रामनाम उच्चारण्यास काळ-वेळाचे बंधन नाही, ते सर्व काळी उच्चारण्यास हरकत नाही (१२.३). सर्वसाधारणपणे रामनामाचा उच्चार करताना, बाह्य बंधने काही नाहीत हे खरे असले तरी काही मानसिक पथ्ये पाळणे आवश्यक आहे. त्यामुळे रामनाम कसे घ्यावे हा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो. रामनाम हे धीटपणाने घ्यावयाचे आहे (२३.२-३) म्हणजे मी रामनाम घेतले तर लोक काय म्हणतील, इत्यादि प्रश्नांच्या बागुलबुवाला भिऊ नये, कितीही संकटे आली तरी त्यांना न भिता धैर्य धरून रामनाम घेतच रहावे. काय व्हायचे असेल ते होऊ दे, मी रामनाम सोडणार नाही, हा दृढ निश्चय हवा (२४.३). रामनाम हे आवडीने घ्यावे. (२१.१). करायचे म्हणून करायचे या जबरीच्या भूमिकेतून रामनाम घेऊ नये. भक्तिप्रेमाने नाम घ्यावे (५.४) अंत:करणातील काम-इच्छा-दूर झाल्याविना रामनामाचा साठा होत नाही (१५.३). कारण 'जहाँ काम वहाँ राम नहिं'' असा प्रकार आहे. पतिव्रतेला ज्याप्रमाणे पति त्याप्रमाणे सर्वस्व मानून एकविधपणे, एकनिष्ठेने नाम घ्यावयास हवे (२४.१). मग देवच भक्ताचा सखा होतो. (२४.४), देवच भक्तांचा संभाळ करतो (२४.२). असे झाल्यावर आणि काय पाहिजे?

**सत्संगतीचा महिमा -** देवाचे दर्शन झाले की, मुक्ति मिळते (१.१). पण देवाचे दर्शन होण्याचा मार्ग तरी कोणता? (उत्तर:-) संतांचे संगतीत देवाचे दर्शन होते; म्हणून संतांना-सद्गुरुला-शरण जाणे आवश्यक आहे (१०.१). परंतु संतांची संगति सर्वांना साधणे कसे शक्य आहे? बाह्य अर्थाने आपण ज्याला संगति म्हणतो, ती येथे अभिप्रेत नाही. संगति म्हणजे नामाची ''सम-

गति'' कशी आहे हे सद्‌गुरु / संत साधकास स्पष्ट करून सांगतात (१०.२). आणि नामाच्या या 'सम गतीत' 'हरीचा आठव' झाला की माणसाचा देहभाव नष्ट होतो (१७.३). देहभाव लयाला जाणे म्हणजेच 'उन्मन' होणे आणि या उन्मनी अवस्थेत आत्म्याचा साक्षात्कार होतो आणि रामनामाने हे साधते याची खूण पटते (१०.४).

**नाममार्ग -** निराळ्या शब्दांत सांगायचे झाल्यास, रामनाम हाच ईश्वर दर्शनाचा राजमार्ग आहे. हा मार्ग सर्वश्रेष्ठ आहे. या मार्गावर जीवाला कोणत्याही प्रकारचे कष्ट पडत नाहीत. हा नामाचा पंथ मनात दृढ धरून, इतर मार्गांनी जाण्याचा विचार सोडून द्यावा (१६.१.२).

हा नाममार्ग आहे कोठे? हा मार्ग शोधण्यास दूर बाहेर कोठे जाण्याची जरुरी नाही (२३.२). कारण हा मार्ग अत्यंत संनिध आहे; माणसाच्या स्वतःच्या देहातच हा पंथ आहे. जगातील मार्ग आपण शरीराने आक्रमण करतो पण नाममार्ग मात्र फक्त मनाने आक्रमण करावयाचा आहे आणि रामनामाचे हे गुह्य कळले की सहजपणे देवाचे दर्शन होते (१६.३.४).

रामनाम हे शंकराचे अंतरात आहे; आणि जीव हा चार वाचांच्या पलीकडे गेला की हे नाम काय स्वरूपाचे आहे हे त्याला कळून येते (२१.३). परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या चार वाचांच्या पलीकडे गेले की तेथे रामनामाखेरीज दुसरे काही आढळत नाही (२२.४).

**मनोमाळा -** रामनामाचा मार्ग मनाने आक्रमावयाचा आहे. त्यासाठी 'मनोमाळा' उपयोगी पडते. मनोमाळेच्या साहाय्याने रामनामाचे स्मरण केले की द्वैताचा लय होऊन, सर्वत्र अद्‌वैताची - एकमेव गोविंदाची - प्रचीति येते (१९.१-२). हिलाच 'रामकृष्ण माळा' म्हणावे. या माळेचे महत्त्व असे आहे की नामाचे अखंड स्मरण होते (१९.४).

ही मनोमाळ कशी वापरायची? मनाचे स्वरूप संकल्प आणि विकल्प असे आहे. म्हणजे मनात एक वृत्ति येते, ती नष्ट होते, दुसरी येते, असा प्रकार चालत



असतो. या वृत्तीच्या क्रियेमध्येच रामस्मरण करावयाचे (१२.४). म्हणजेच संकल्पात राम आणि विकल्पात राम, असे जमले की मनोमाळेचा उपयोग झाला (१९.३). निराळ्या शब्दांत सांगायचे झाल्यास, मनाचे संकल्प-विकल्प दूर होऊन नामस्मरण होऊ लागले की मनोमाळा जमली; हाच अंतरीचा जप. हा जप साध्य झाला की संसाराचा ससेमेरा सुटतो (२०.४).

**कोणत्या पुण्याने देवाची प्राप्ति -** देवाचे दर्शन होण्यास थोर पुण्य आवश्यक आहे (१.१). हे थोर पुण्य म्हणजे पाप-पुण्यापलीकडचे अनंत पुण्य होय. त्यासाठी प्रथम पापाचा नाश व्हावयास हवा. रामनाम न उच्चारणे हेच पाप आहे. नामाचा उच्चार सुरू झाला की पापाच्या राशीच्या राशी लयाला जातात. म्हणून रामनाम हे सर्वश्रेष्ठ आहे असे मुनिजन, संजसज्जन यांनी सांगून ठेवले आहे (७.१-२). इतर कर्मामध्ये पापाचा प्रवेश होण्याची शक्यता असते, पण रामनामात पापाचा विचार सुद्‌धा नाही. त्यामुळे मुखात रामनाम असणे हा थोर सदाचार आहे (७.३). सर्व पुण्यामध्ये नाम-पुण्य श्रेष्ठ आहे; त्यात कुठलेही उणेपण नाही (२.२). रामपाठ-रामनामाचा पाठ / स्मरण- केला की थोर/अनंत पुण्याची प्राप्ति होते (१.२). रामनामाने अगाध/अनंत पुण्याची प्राप्ति आहे (२१.४).

**नाममहिमा-** रामनामाचा महिमा विविध प्रकारांनी सांगता येतोः- रामनामाविना सर्व गोष्टी व्यर्थ आहेत (३.१). रामनाम हेच धन, मान किंबहुना सर्व काही आहे (३.२). या जगात तसेच देहात मंगल म्हणून काही असेल तर ते केवळ रामनामच आहे (४.२). सर्व तीर्थापेक्षा रामनाम पावन आणि पवित्र आहे (९.१). नित्यनेमाच्या नामाने अंतःकरणातला काम दूर होतो (८.२). रामनामाच्या नित्य उच्चाराने कळिकाळाचा थरकाप हातो. (४.३). रामनामाने सावध झालेल्या माणसाला कलिकाळ वंदन करतो (१२.१). रामनाम उच्चारणाऱ्या भक्ताचे पाय यमधर्म वंदन करतो; मग इतरांची काय कथा? (७.४). शंकराने प्राशन केलेल्या हलाहल विषाचा उपशम रामनामाने झाला, हे तर प्रसिद्‌ध आहे. जीवांच्या बाबतीत, त्यांची संसाराची हळहळ रामनामाने

दूर होते (९.३-४). किंबहुना, रानमामाच्या उच्चाराने मिळणाऱ्या सुखापुढे समाधीचे सुखही तुच्छ आहे (१०.१).

**नाम हे तत्त्वरूप आहे -** जे रामनाम इतके थोर आहे आणि ज्याने अनंत पुण्य प्राप्त होऊन, देवाचे दर्शन होते, त्या नामाचे स्वरूप तरी काय आहे? हे नाम असे आहे:- नाम हे नित्य नेमाचे आहे (८.२). ते कमी जास्त होत नाही; ते या मानवी देहात अखंडपणे स्फुरत असते (८.३). हे रामनाम तत्त्वरूप आहे. इतर सर्व तत्त्वे रामनामाविना विफल आहेत. या एकतत्त्व नामाचा शोध केला की या एका तत्त्वात तीन गोष्टींची ऐक्यता आढळून येते. इडा, पिंगला आणि सुषुम्ना यांचे ऐक्य झाले की तत्त्वरूप नाम हातात येते (अ.क्र.११).

**रामनाम गतिरूप -** रामनाम हे गतिरूप आहे व ही गति प्रत्येक देहात प्रचीतीस येते (१.३,३.४). या गतीच्या वेगात रामनामाचा उच्चार आहे (३.३). त्या गतीलाच संत, सद्गुरु अथवा ईश्वर यांची चरण-गति म्हणतात. ही रामनामाची गति प्रत्येक देहात अखंडपणे चालू आहे. आणि सद्गुरूंचा बोध झाल्यावरच ही रामनामाची गति कळून येते (१७.३).

ही नामगति म्हणजेच नामजप होय. या जपाला 'जपोनि जप' म्हणण्यास हरकत नाही (२०.१). यालाच 'अजपा' जप असे दुसरे नाव आहे. या गतीकडे लक्ष असले म्हणजे तेवढा जप होतो; या गतीकडे लक्ष नसले म्हणजे तेवढा जप वाया जातो. (२०.१) म्हणजे या गतीवर दृष्टि व कान आणि मन लागले की तितका जप होतो. नरदेहात असताना हाच जप करावयाचा आहे (२०.२).

**अनुभव** - रामनामाची गति वायुरूप आहे. ती संथ होऊन हळुहळु स्थिर होऊ लागली की 'राम-नाम-पवन' साधला जातो. आणि त्याबरोबर परमार्थातील विविध अनुभव साधकाला येऊ लागतात. हे अनुभव असे:- एक श्वास पवन साधला की मनाला थोर समाधान होते. दोन श्वास पवन साधण्याने मन समधातुक होते. चार श्वास पवन साधण्याच्या क्रियेने मन हे देहबुद्धिविरहित होते. एक पळ पवन साध्य झाला की जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीनही



अवस्थांत मन एकाग्र रहाते. दोन पळ पवन साधण्याने मनाचे उन्मन होते, मनाला उन्मनी अवस्था प्राप्त होते. चार पळे पवन साधला की दहा प्रकारचे नाद ऐकू येऊ लागतात. आठ पळे पवन साधण्याने कामाचा- इच्छेचा- संपूर्ण नाश होतो. पंधरा पळे पवन साधण्याच्या प्रक्रियेने (देहातील ब्रह्मांडस्थानी म्हणजे भ्रुकुटीवरच्या मधल्या भागात) ऊर्ध्वगमन साध्य होते. तीस पळे पवन साधला की साधक ब्रह्मस्थानात पोचतो. एक घटका पवन साध्य झाल्याने सहज दृष्टीचा लाभ होतो. दोन घटका पवन साधला की जीव ब्रह्मरंध्र नावाच्या स्थानातून पुढे सरकतो. चार घटका पवन साधल्यावर, ब्रह्मदेवाचे 'तारक' रूप आणि भगवान् शंकराचे 'बिंदु' रूप दर्शन होते. एक प्रहर पवन साधला की देहधर्म आटून जातात. दोन प्रहर पवन साधण्याने विष्णूचे दर्शन होते. विष्णूचे दर्शन झाले की जीवाचे साधन अहोरात्र चालू रहाते (अ.क्र.२६.२९). हे साधन ढळत/थांबत नाही. अशी समाधि साधली की वैकुंठ (नाम) परमात्मा आपल्याच हातात येतो (१८.३-४).

आत्मा हाच एकांत होय; त्यात सर्व पदार्थांचा आदि आणि अंत आहे; आत्म्यांमध्येच सर्वांचा अंत होतो (२२.२-३). हा एकांत बाणला म्हणजे आत्मदर्शन झाले की सर्वत्र आत्मरूपच दिसू लागते (२२.१).

**काही पारमार्थिक शब्दांचे स्पष्टीकरण :-** परमार्थात काही शब्द पुनः पुनः येतात. त्यातील काही शब्दांचे विवरण श्रीमामांनी जाता जाता केले आहे ते असे:- १) मंगल:- मन गळाले व मनाची खळबळ उरली नाही की मंगल (४.४) २) खटपट :- रामनाम नीट उच्चारणे हीच खरी खटपट (५.३) ३) भाव:- ज्यावीण सर्व वाव-फुकट-आहे व ज्याचा प्रभाव देहात दिसतो आणि तो कळला म्हणजे देव कळतो, तो (६.२-३). ४) हलाहल:- म्हणजे संसारातील हळहळ (९.४). ५) संगति म्हणजे समगति (१०.२). ६) सावध:- सहा रिपु जिंकून निर्विकार होणे म्हणजे सावध होणे (१२.२). ७) तप :- म्हणजे प्रकाशित होणे आणि बुद्धीतील अज्ञानरूपी अंधकार हाकून लावणे

(१३.२). ८) स्वधर्म :- जो सांगातीचा धर्म आहे, जो जन्मापासून मरणापर्यंत जीवाबरोबर असतो आणि ज्यात रामनामाचे वर्म आहे, तो स्वधर्म (१४.२-४). ९) एकांत :- ज्या एकात सर्वांचा अंत होतो, ज्या एकात (सर्वाचा) आदि व अंत आहे तो एकांत म्हणजे आत्मा (२२.२-३).

**संख्या वाचकांचा सांकेतिक अर्थ -** परमार्थात काही संख्यावाचकांना विशिष्ट सांकेतिक अर्थ आहेत. एक ते वीस या संख्या वाचकांचे सांकेतिक अर्थ ३०-३१ या अभंगांत आहेत. ते असे :- एक म्हणजे मीपण; दोन म्हणजे दुजाभाव; तीन म्हणजे तीन गुण; चार म्हणजे चार खाणी; पाच म्हणजे (इंद्रियांचे) पाच विषय; सहा म्हणजे काम, क्रोध इत्यादि सहा रिपु; सात म्हणजे सप्तविध धातु; आठ म्हणजे पाच महाभूते आणि तीन गुण; नऊ म्हणजे देहातील नऊ द्वारे; दहा म्हणजे दहा इंद्रिये; अकरावे मन (मन हे अकरावे इंद्रिय आहे); बारा म्हणजे चित्त; तेरा म्हणजे कुबुद्धि; चौदा म्हणजे चौदा विद्या; पंधरा म्हणजे अहंकार; सोळा म्हणजे सहा रिपु आणि दहा इंद्रिये. सतरा म्हणजे वासनेचे स्थान. अठरा म्हणजे जीवभाव; एकोणीस म्हणजे शिवाचे विस्मरण; आणि वीस म्हणजे नामस्मरण. विसाव्या नामस्मरणात 'विसावा' आहे.

अशाप्रकारे पारमार्थिक दृष्टीने महत्त्वाचे असणारे विषय या रामपाठात श्रीमामांनी मांडलेले आहेत.

या श्रीरामपाठाच्या पठणाचे फळ श्रीमामांनी असे सांगितले आहे:- श्रद्धापूर्वक जो कोणी रामपाठाचे पठण करील, त्याचेवर जगदीश कृपा करील (३२.१.२). आणि संसारातील सर्व आपत्तीमध्ये आणि अंतकाळी सीतापति राम त्याचे रक्षण करील (३२.४).

***



## (३) अमृतवाणी

तात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या साक्षात्कारात झालेल्या आज्ञेनुसार श्रीमामांनी देहपातापर्यंत अखंड ३८ वर्षे रोज हरिकीर्तन केले. वर्षानुवर्षे हा नेम चालविताना कीर्तनातील विवरणासाठी श्रीमामांनी काही अभंग-पदे अंत:स्फूर्तीने रचली. 'अमृतवाणी'च्या प्रकाशकांनी म्हटल्याप्रमाणे काही अभंग-पदात द्विरुक्ति होती अथवा काहीत थोडासा भेद होता. अशी अभंग-पदे गाळून एकूण १३०० अभंग-पदांचा गाथा म्हणजे अमृतवाणी आहे. या अमृतवाणीमध्ये प्रकाशकांनी अगोदरच प्रसिद्ध झालेल्या रामपाठाचाही अंतर्भाव केला आहे. रामपाठातील विषय येथे पाहून झाले आहेत. तेव्हा रामपाठ सोडून अमृतवाणीतील अन्य अभंग-पदांचा परिचय येथे करून दिला आहे.

अमृतवाणीतील बहुतांश पदांत 'दास' अशी भूमिका आहे. अधूनमधून गोविंद अशी मुद्रिका आहे. गोविंद हे मामांचे नाव. फक्त एका हिंदी भाषेतील पदामध्ये (क्र. ११५६) राधासुत अशी मुद्रिका आहे. राधा हे श्रीमामांच्या सख्ख्या मातोश्रींचे नाव होते.

अमृतवाणीतील पद-अभंगांत नमन, प्रार्थना, भजन, गौळण, कूट इत्यादि प्रकार आहेत. काही अभंगांची मांडणी प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात आहे. सर्वच रचना साधी, सोपी, सरळ आणि प्रासादिक आहे. पण प्रसंगानुरूप भाषा अलंकारांनी विभूषित आहे. प्रत्येक पद-अभंगात यमक आहेच. खेरीज लक्षणीय अशी यमके सुद्धा १०७, ४४६, ४४७, ५६६ या अभंगांत दिसून येतात. अभंग क्रमांक ४८, १८९ इत्यादीमधील अनुप्रास हा अलंकार लक्षात घेण्यासारखा आहे. अभंग क्रमांक १०३० मध्ये श्लेष अलंकाराचा सुंदर वापर आहे. आध्यात्मिक विषयांचे स्पष्टीकरण होण्यास आवश्यक अशी रूपके (अ.क्र. ६०, ६१, इत्यादि) आणि दृष्टांत (अ.क्र. २६९, ५५८ इत्यादी) हेही दिसून येतात.

अमृतवाणीतील पद्यरचनेत कधी कधी पुनरुक्ति जाणवते. त्या त्या विषयावर जोर देणे व त्याचा संस्कार किंवा ठसा श्रोत्यांच्या / वाचणाऱ्याच्या मनावर

बिंबवणे हा हेतु उघड आहे.

अमृतवाणीतील काही पंक्ति या पूर्वीच्या संतांच्या रचनेची आठवण करून देतात. उदा. केशवाचे नाम गाय (१०८-३), आयिता आलासे घराते पुसोनि (२९१-३), ब्रह्मादिका हाता नये/तो हा कीर्तनाचे सोये (९३४-३). कधी कधी काही चरणांनी मराठीतील म्हणींची स्मृति येते. उदा. भोळा भाव सिद्धि जाय (३८०.१).

**अभंगवाणीतील पद्यांची मांडणी -** ज्या कालिक क्रमाने पद्यरचना झाली तिची नोंद नसल्याने, प्रकाशकाने पद्यातील विषयांना धरून, नमन, भजन, सद्‌गुरुपद, सणपर्वकाळ इत्यादि विभाग पाडून ही पद्ये दिलेली आहेत. तथापि अंत:स्फूर्त काव्यात विषयांची अशी विभागणी अगदी काटेकोरपणे असू शकत नाही. त्यामुळे अमृतवाणीतील विषयांचा परिचय करून देताना, या विभागणीत न बसणाऱ्या विषयांचा परिचय प्रथम करून दिला आहे आणि नंतर वर्गवारी प्रमाणे पद्यांतील विषय सांगितले आहेत.

**संकीर्ण विषयांचा परिचय -** १) प्रार्थना :- काही अभंग पदांतून ईश्वराची प्रार्थना आहे. उदा. ईश्वर चिंतनात मन रमू दे (१०७७). २) गौळण :- एक गौळण सांगते की ''हरी विण मनी नच दुजे'' (१०९५). ३) कूटे :- वरवर विपरीत पण गूढ अर्थ असणारी ती कूटे होत. उदा. 'माय बापा जीवे मारणे' (३०४), 'उलटे देऊळ' (५५३) इत्यादि. ४) स्वचरित्रपर :- तीन अभंगांत मामांच्या जीवनात घडलेल्या काही घटनांचा उल्लेख आहे. 'अहो हनुमंत षष्ठी' (१५६) या अभंगात हनुमान समाधिमंदिरात श्रीमामांचे जे अंतिम कीर्तन झाले, त्याची खूण आहे. ५) स्पष्टीकरणे:- अभंगांच्या ओघात आलेली काही शब्दांची स्पष्टीकरणे लक्षणीय आहेत. उदा. उन्मन:- विषयानुनि निघे मन । तेचि जाणावे उन्मन । (८३.१). भजन :- मनोवृत्ती समाधान । हेचि देवाचे भजन ।। (२३५.३-६) ६) संकीर्ण विषय :- काही संकीर्ण विषयांवरील मामांचे विचार स्मरणीय आहेत:- गुरुशिष्य दोघेही अधिकारी असतील, तर दोघांना मोठेपणा



मिळतो (८७४.१). संत वचनांचा लाक्षणिक अर्थ हा मुख्यार्थापेक्षा महत्त्वाचा असतो (८३७.१). ७) तत्त्वज्ञान :- श्रीमामांना अभिप्रेत असणारे तत्त्वज्ञान असे आहे :- जीव, जग व माया या सर्वांना हरि हा मूळ आधार आहे (९२१.१-३ इत्यादि). दृश्य चराचर हे माया आहे (६६८.३). देव हा चैतन्यरूप ब्रह्म आहे (८१३.२; ८८१). ब्रह्म/देव/विष्णु सर्वव्यापक आहे, तो अस्तित्वरूप आहे आणि तो सर्व पदार्थात आहे (१२९-२, ९२३-४, इत्यादि). जरी ब्रह्म एकच आहे तरी या मायाजनित भ्रमामुळे द्वैत अथवा नानात्व दिसू लागते (१८२.२). माया ही ब्रह्माला झाकून टाकून जगाचा भास दाखविते (१७९.१). माया जीवाला भुलविते. त्याला प्रपंचाची झापडी घालते आणि देवाला विसरावयास लावते (२६३.२.३). जीव हा मूलत: ब्रह्मच आहे (२७७.१). माया मिथ्या आहे हे कळल्यावर जीवाला स्वत:च्या सत्य स्वरूपाचे ज्ञान होते (६८७.२; ३००.१). या सत्य ज्ञानाने जीवाला मोक्ष मिळतो (२७८.४).

आता अनुक्रमणिकेत दिलेल्या वर्गानुसार त्या त्या वर्गातील पदांच्या विषयाचा परिचय करून दिला आहे.

**वर्गीय विषयांचा परिचय-**

**१) नमन (१-३) :-** श्रीमामांच्या कीर्तनारंभीचे नमन म्हणजे 'नमो रामेश्वरा' हा अभंग. त्यात श्रीमामांची कुलदेवता व गुरुपरंपरा यांना वंदन आहे. 'रूप देखियल्या' या पदात श्रीमामांच्या 'राम' या उपास्यदेवतेचे ध्यान वर्णिले आहे.

**२) भजन (४-५) :-** ज्ञानेश्वर आणि राम यांचे भजन आहे.

**३) सद्‌गुरुपद (६-१९) -** परमार्थ साधण्यास मुमुक्षूला जो संत उपदेश देतो तो सद्‌गुरु. सद्‌गुरुशिवाय देवाची भेट होत नाही (६.१). सद्‌गुरु लाभणे ही दुर्लभ गोष्ट आहे (२११.३). गुरूचे वचन मानण्यात साधकाचे हित असते (३२.२). सद्‌गुरुरूपी मोहिनी पडली की क्षणोक्षणी देव दिसतो (१०.२).

गुरूच्या कृपेने शिवपद प्राप्त होते (१५४.१). गुरुकृपेचे अंजन डोळ्यात पडताच दृष्टीला भगवान् दिसू लागतो (१२४.२). गुरूच्या कृपेने निजसुख मिळते, स्वरूपाचा साक्षात्कार होतो (७.२). गुरूची कृपा होण्यास, त्यांनी जे नित्य नाम सांगितले आहे, ते घ्यावयास हवे (६.३). अशाप्रकारे साधकाच्या जीवनात सद्‌गुरु फार महत्त्वाचे आहेत (१७). सद्‌गरूंचा महिमा हा वाचेला वर्णन करता येत नाही (१६.१).

**४) सण, पर्वकाळ (२०-१७६) :-** हिंदु धर्मात अनेक सण, पर्वकाळ सांगितले आहेत. त्यांचे आध्यात्मिक दृष्ट्या स्वरूप काय, प्रयोजन काय, इत्यादि मामांनी येथे सांगितले आहे. उदा. गुढी पाडव्याला लिंबाचे पान खाणे:- नाम अमृत सेवन । हेचि लिंबाचे प्राशन ।। (२०.३). ''नवविध उपासना । हेचि नवरात्र जाणा'' (७९.१). ''दीप-ज्योति सहस्रदळी । पहाणे संतांची दिवाळी ।। (११६.१). रंगपंचमी म्हणजे 'पंच प्रवृत्ती नामात रंगता । पंचमी तत्त्वता रंगाची ती (१७३.३).

**(५) संसार (१७७-२०६) :-** संसार हा आसुरी मायेचा विस्तार आहे (१७८.१). म्हणून तो फळकट आहे (१८६.१). जीव हा जन्ममरणाच्या चक्रव्यूहात सापडलेला आहे (१९१.१). समुद्रात लाटांमुळे लाकडे एकत्र येतात व दूर जातात. त्याप्रमाणे संसारातले माणसांचे संबंध असतात (१९२.३). संसारातला व्यवहार हा महत्त्वाचा नाही (२२७.५). संसारात अणुमात्रसुद्धा सुख नाही (१८७.१). ''जो नर संसारा विकला । तो नर परमार्था मुकला।।'' (११२६.१). संसारातील तथाकथित सुख हा केवळ सुखाचा आभास आहे (९०२.१). या संसारातून सुटावयाचे असल्यास, ''नाम थोर आशा आहे'' (३८४.१). नामाची सवय लागणे हाच संसार तरून जाण्याचा उपाय आहे (७१४.१). मनात रामजप केल्याने संसार संपून जातो (१९५.५). नामाच्या योगाने ईश्वराचा साक्षात्कार झाला, तरच दुःखरूप संसार जीवाला सुखकर होतो (१९८.५). संक्षेपाने सांगायचे झाल्यास, ''आत्मस्वरूप पडता दृष्टी । सुटती



संसाराच्या गोष्टी ।।'' (९१३.१)

**(६) नरदेह (२०७-२२२) :-** माणसाला नरदेह प्राप्त होणे हे दुर्लभ आहे (२०७.३). कारण नरदेह प्राप्त होण्यास पाप आणि पुण्य समान व्हावे लागते (२१२.२). देह नाशवंत आहे (२०७.१). आणि आयुष्य क्षणभंगुर आहे (१११२.२). म्हणून जोपर्यंत देह सुखरूप/ठाकठीक आहे, आपल्या स्वाधीन आहे, तोपर्यंत देवाचे स्मरण, नामाचा जप करून घेतला पाहिजे (४३८.३ २१४-११). रामनामाच्या योगानेच या नरदेहाला मोल येणार आहे (३४५-३). देवाचे नाम उच्चारणे हेच नरदेहातील मुख्य आणि खरे काम आहे. (७२६.१; ५७५.३). मोक्षाला आवश्यक असणारे रत्नभांडार नरदेहात आहे (२१६.२). आणि ते नामस्मरणाने हस्तगत करून घ्यावयाचे आहे. मग देहात देवाची प्रचीति/अनुभव येतो । (२१९.४). नरदेहात ईश्वरी साक्षात्काराची मौज अनुभवून मुक्त व्हायचे आहे (२२२.१). अशाप्रकारे, ''नरदेह महापर्व'' (२०८.२) हे साधावयास हवे.

**(७) मन (२२३-२६१) :-** संकल्प आणि विकल्प हेच मनाचे स्वरूप आहे, पण त्यामुळे मन चंचल होते (२४४.३). परमार्थ साधावयाचा असेल तर मनाला आपल्या स्वाधीन करून घेणे आवश्यक आहे (२५७.२, ८०२.१). या मनावर जर आपण स्वार झालो म्हणजे जर आपण मनावर नियंत्रण मिळविले, तर परमार्थाला आवश्यक असा नामाचा उच्चार घडतो (२४०.५;२४४.३). नामाने, गुरूंनी सांगितलेल्या साधनाने, मन चांगले होते (२४७.१; २५४.२; ४०९.४). नामाच्या युक्तीने, गुरुकथित नामाने मन आपल्या स्वाधीन होते (२४०.५, २४४.३). गंगाजळाप्रमाणे स्वच्छ व शुद्ध झालेल्या मनामध्ये भगवान् प्रगट होतो (२४९.४, २५२.१, २२९.२). मन शुद्ध होणे म्हणजेच मनाचे उन्मन होणे होय. मनाचे उन्मन झाले की भगवानाची भेट होते, स्वरूपाचा साक्षात्कार होतो (२६१.२; २५३.३). मन म्हणजे जणु ब्रह्मचा महाल खोलणारी किल्ली आहे. (२३१.१)

**(८) उपदेश (२६२-५८३) :-** परमार्थ साधण्यास साधकाला आवश्यक तो उपदेश या विभागात आहे:- संसाराची करकर थांबणारी नाही; या करकरीतच नाम जपावयाचे आहे (५७४.१). गुरुवचनावर विश्वास ठेवल्याने परमार्थाचा ठेवा सापडतो (३९८.१). भाव सोडावयाचा नाही (३७९.२). नामाने विकल्प उरत नाही (३१४.३) एक ''रामनाम सार । मनी धरी हा विचार'' (२९३.१).

संसारात आपल्याला जी स्थिति प्राप्त झाली आहे, ती बरी आहे असे मानून निरंतर नाम गावे (३६८.१). देवच संकटांचा परिहार करतो (३६९.१). रामनामाने प्रारब्धाचे बंधन उरत नाही (२९८.५).

अहंकार देवाला आवडत नाही; म्हणून अहंकार टाकून रामनाम घ्यावे (३०४.७; ३०६.३). वाईट टाकावे चांगले घ्यावे (२८३.२). सत्संग धरला तर बरे होते (२८४.१). बुऱ्या संगाने पाप घडते (२८२.१). नामाचे विस्मरण हे पाप आहे; नाम हे पुण्य आहे (३२९.१;३३०.३,३३१.४). रामनामरूपी दंडाने वासनेला आवरून धर (२८६.२). मन एकाग्र कर (२८६.३).

नाम घेणे हेच जीवाचे कर्तव्य आहे (५५५.३). देवाला शरण जावे आणि त्याच्याकडे फक्त नामाचे मागणे मागावे (३६४.१). इतर सर्व विसरून नामस्मरण करावे हेच सर्व उपदेशाचे सार आहे (३५४.२).

**(९) विवेक (५८४-५९७) :-** परमार्थात विवेक हवा. अविवेक हा आंधळेपणा आहे (५८८.२). विवेकाने कल्याण होते (५९१.१). अविचाराने अहित होते. तर विचाराने हित होते (५९७.१). नित्य काय व अनित्य काय याचा विवेक करावा (५९५.१). विवेकाने तत्त्वज्ञान प्राप्त होते (५८४.२). असारात सार शोधणे म्हणजे विचार (५९७.३). रामनाम हेच विचार आहे, अन्य सर्व अविचार आहे (४७८.१). विवेकाने पूर्ण शांति मिळते (५८७.४). विवेकरूपी नदीच्या पलीकडे देवाचे दर्शन होते (५९१.३).

**(१०) वैराग्य (५९८-६०५) :-** वैराग्याच्या भाग्याने सर्वेश्वर भेटतो (६०२.१). वैराग्य म्हणजे मनाने केलेला विषयांचा त्याग होय (६०१.२).



मनाने विषयांचा त्याग झाला की देवाची कृपा दूर रहात नाही (६००.१).

**(११) भक्ति (६०६-६५०) :-** संसारातील पदार्थांवर प्रेम करून यातायात चुकत नाही (६०६.१) देवावरील निःस्वार्थ निःसीम प्रीति म्हणजे भक्ति. देवाला सर्वसमर्पण करणे ही प्रेमभक्ति आहे (६०९.६). भक्तीने देव कळून येतो (६४७.१). भक्ति नऊ प्रकारची आहे (तिचे विवरण ६०९.६४३ अभंगात आहे). भक्ति ही वाटते तितकी सोपी नाही. भक्ति म्हणजे असिधाराव्रत आहे (६०९.५). भक्तीचा सूक्ष्म मार्ग अवघड आहे (६०९.२).

**(१२) नाम (६५१-७७१) :-** सर्व काही नामात आहे (५७५.६). नाम हेच सर्वांचे हित आणि कल्याण आहे (४९२.३). नाम सकळांचे कोड पुरविते (१६०.४). नाम माणसाला पूर्णकाम करते (६२२.३). रामनाम ही कामधेनु आहे (११०.१). नामामुळे प्रपंचातील दुःख संपते. खरे सुख रामनामातच आहे (२८८.३; ५१५.१). नामाने सर्व काही कळून येते (४७१.३).

सर्व दोषांना नाम हेच प्रायश्चित्त आहे (६८३.१). रामनामाचा जप केल्याने संसार संपतो (१९५.५). संसार सागरात रामनाम हे जड, मूढ, दुराचारी आणि इतर लोक या सर्वांना उद्‌धारक, तारक आहे (११.२; ३५.५; ४९२.२). नामाने विकार, अहंकार व माया यांचा लय होतो (१९७.३; १३८.३; ५९८.३). मनामध्ये काम/इच्छा ठेवून नाम उच्चारीत बसल्यास काहीच फायदा नाही. म्हणून काम जाळून टाकून नाम जपावे (६७१.३; १७१.१).

नाम अखंड घेतल्याने समाधीचे सुख प्राप्त होते (३२६.२). नामाने नारायण मिळतो (६६०.१; ६६७.४; ६५६.२). गुरुनामाने परब्रह्म हस्तगत होते (६६१.६). नाम घेतल्याने मुक्ति मिळते हे ब्रह्मलिखित आहे (७२०.१).

ज्या नामाने वरील गोष्टी साध्य होतात ते नाम जसे समजले जाते तसे नाही; ते नाम समजून घ्यावयास हवे. हे नाम देहातील प्राणात, श्वासात आहे (७२९.१; ७६२.३; ६२७.१). नाम हे सहज असून ते सदा स्फुरण पावत असते (७५८.२). नाम हे चार वाचांच्या पलीकडे आहे (८१८.१). नामामध्ये

रूप आहे (८२०.३). नाम हेच रूप आहे (४०.३). नाम हेच ब्रह्म आहे (३९१.२). नामस्मरण कसे करावे आणि त्याने काय साधते याचा खुलासा ७२०-७२१ या अभंगात आहे.

**(१३) साधन (७७२-८०१) :-** परमार्थ प्राप्त होण्यास नाम हे एकच साधन आहे (७७४.४). रामनाम हेच मोक्षाचे साधन आहे (७७८.४). देहामध्ये असणाऱ्या नामात साधनाचा प्रयत्न व्हावयास हवा (७८०.२). सहज साधन हे गुरुकृपेने कळून येते. श्वासोच्छ्वासातील नामात रहाणे हेच ते साधन आहे (५०१.१-२). साधनाचे उत्तम विवरण हे अभंग ७८३ मध्ये सापडते.

**(१४) साधकांसाठी (८०२-९२०) :-** या अभंगात साधकांना मार्गदर्शन आहे:- संसारात सर्व काही देवाच्या इच्छेने घडते; म्हणून कोणत्याही गोष्टीची चिंता न करता देवाची चिंता (=चिंतन) केल्याने देव भेटतो (८८९.२; २१८.४; ९००.२). साधकाने सदाचाराने चालावे (८०५.१). शुद्ध अन्न ग्रहण केल्याने आचार आणि विचार शुद्ध होतात (८८४.११). नामाचा उच्चार हा श्रेष्ठाचार आहे (८०५.४). नामात दंग व्हावयास हवे (८९१.३). निर्धाराने देवाचे नाव घ्यावे (९९०.३). नामात राहून प्रपंच करावा (८९५.१). परमार्थ करताना आळस दूर सारावयास हवा (१०८५.१). मनातला अभिमान टाकावयास हवा (११०२.१). साधनात मन घटवावयाचे आहे (१११०.१). सदा रामनामाचा व्यासंग हवा (९२०.३). नाम हे आनंदाने घ्यावे (८८९.३). श्वासोच्छ्वासामध्ये नाम घ्यावे (८३६.३). सद्गुरुंनी जे करावयास सांगितले आहे (कृ) त्याचे पालन (पा) केले की गुरूकृपा होते (८५९.३).

**१५) देव (९२१-९४९) :-** देव हा सर्वांना आधार आहे (९२१.३). देव हा निराकार असून तो एकच आहे (९२३.३). चराचरात देव आहे, पण त्याचा शोध मात्र आपल्या देहात-अंतरात-करावयाचा आहे (९३१.२). देव हा भक्तांचे रक्षण करतो (९४१.१). नामाने देव हस्तगत होतो (६६७.४).

**१६) अनुभव (९५०-९८१) :-** परमार्थात साक्षात्कार होताना साधकाला नाना प्रकारचे अनुभव येतात. चार वाचांच्या पलीकडे गेल्यावर अंतरात ज्योत चमकते (९५८.१). उन्मनीच्या ओवरीत तेज दिसते (९६१.२). हे तेज अवर्णनीय आहे (९६१.३). हंसावरील प्रभुरामाचा साक्षात्कार होतो (९६९.४). औटपीठ नामक साधनमार्गावरील स्थानात विठ्ठलाचे दर्शन होते (९६७.३). अभंग क्रमांक ११५९ ते ११६९ यांमध्ये निरनिराळ्या अनुभवांचे वर्णन आहे.



**१७) संतपद (९८२-१०३२) :-** जगाला परमार्थाची सोय अथवा मार्ग दाखविण्यास संत या जगात अवतार घेतात (९९९.१). संत हे अरूप असणाऱ्या परमात्म्याला रूपात आणतात (१०३२.१). संतांच्या घरी हरी वास करतो (१०१६.१). संतांच्या हृदयात भगवंत असतो (१०२८.३).

साधुसंतांना मरणाचे भय वाटत नाही (१००३.१). ते साधनरूपी धनाने श्रीमंत असतात (१००५.४). संतसज्जन हे क्षमावंत असतात (१००७.१). संतसंगतीने परमात्मा प्राप्त होतो (१०१९.२). संतांचा अधिकार थोर असतो (९९८.२). साधुसंत खूष झाले तर माणसाच्या ललाटात, नशीबात जे नाही ते सुद्धा ते देतात (१११७४.१).

**१८) प्रासंगिक (१०३३-१०४०) :-** या अभंगांमध्ये कैवल्याचे धाम, मातृप्रेम, सत्यनारायण इत्यादि विषयांवरील श्रीमामांचे विचार व्यक्त झाले आहेत.

**१९) पौराणिक (१०४१-१०६९) :-** भगीरथ (१०१) वाल्मीकि (१०४२), गजेंद्र (१०५८), ध्रुव (१०६६) इत्यादि काही प्राचीन पौराणिक कथांचा निर्देश करून, त्यांचे तात्पर्य अथवा त्यांतून घ्यावयाचा बोध श्रीमामांनी मांडला आहे. उदा. भगीरथाप्रमाणे 'प्रयत्न करावा' हे भगीरथ कथेचे तात्पर्य सुचविले आहे.

**२०) पदे (१०७०-११९२) :-** या समूहात पुष्कळदा ध्रुवपद येत असल्याने 'पदे' हे शीर्षक वापरलेले आहे. यांमध्ये आलेले विषय हे अन्य विभागांतील विषयांप्रमाणेच आहेत. उदा. गुरूला शरण जा (१०७० ध्रुवपद) इत्यादि उपदेश आहे. जीव ब्रह्म आहे (११६५.५). हे तत्त्वज्ञान आहे. गुरुपद

म्हणजे संसारातून तारून नेणारी नौका आहे (११७२.५१). असे गुरूचे महत्त्व सांगितले आहे. संतांचा दीपावलीचा अनुभव १०९३ मध्ये असून ११५९ मध्ये त्याचे वर्णन आहे.

**२१) अधिक (११९३-१२४७) :-** या भागातील बहुतेक अभंगांत 'अधिक' अथवा 'सर्वाधिक' या शब्दांचा वापर आहे. कोणती एक गोष्ट अधिक (=चांगली, श्रेष्ठ, इत्यादि) म्हणजे दोन गोष्टीत अधिक चांगली कोणती अथवा अनेक गोष्टीत सर्वश्रेष्ठ गोष्ट कोणती, हे या अभंगांतून सांगितले आहे. उदा. मौन हे सर्वाधिक आहे (१२२२.२). देवापेक्षा नाम अधिक आहे (१२०१.१). ज्ञानामध्ये अनुभव. ज्ञान हे अधिक आहे (१२१७.१).

**२२) नित्यपाठ (१२४८-१२६७) :-** या अभंगांत चैत्र आणि श्रावण हे दोन महिने सोडून वर्षाच्या इतर महिन्यांमध्ये कीर्तनासाठी श्रीमामा जे अभंग घेत, त्यांचा संग्रह आहे. चैत्र महिन्यात कीर्तनासाठी श्रीमामा श्रीरामपाठाचे अभंग वापरीत तर श्रावण महिन्याला श्रीमामा 'साधनाचा मास' म्हणत आणि त्या महिन्यात ज्ञानेश्वरमहाराजांच्या हरिपाठावर कीर्तने करीत.

**२३) श्रीरामपाठ (१२६८-१२९९) :-** यातील विषयांचे विवेचन मागे येऊन गेले आहे.

**२४) अंतिम (१३००) :-** या अभंगात सर्व सार आले आहे. त्यातील ''अहंकाराच्या अभावाने देव होणे'' ही संकल्पना संपूर्ण परमार्थाला सारभूत आहे; तीच संकल्पना अंतिम आहे.

अमृतवाणीतील वर सांगितलेल्या विषयांच्या आधारे या अमृतवाणीची पुढील वैशिष्ट्ये लक्षात येतात.

१) या सांसारिक ऐहिक जीवनात 'अधिक' अथवा 'समधिक' काय आहे याचा उलगडा होतो. २) परमार्थी साधकाने जगात कसे वागावे हे स्पष्ट होते. ३) आपल्या सण-पर्वकाळांचे आध्यात्मिक मर्म लक्षात येते. ४) नामाचे महत्त्व मनावर बिंबते.



अमृतवाणीतील काही शब्दांचा वापर करून प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी अमृतवाणीचा जो निष्कर्ष सांगितला आहे तो पुढीलप्रमाणे आहे :-

या असार संसारात दुर्लभ नरदेह प्राप्त झाल्यावर, येथे कशात काय अधिक आहे हे जाणून घेऊन, सण-पर्वकाळांचा आध्यात्मिक अर्थ लक्षात घेऊन, संत-सद्‌गुरुंनी साधकासाठी केलेला उपदेश ध्यानात ठेवून, मनामध्ये विवेक, वैराग्य व भक्ति बाणवून, देवादिकांना नमन करून, त्यांचे भजन गाऊन, माणसाने नाम साधन केले तर त्याला देवाचा अनुभव येईल आणि त्याचे अंतिम ध्येय जे मोक्षसुख ते त्याला प्रासंगिकपणे नव्हे तर निश्चितपणे प्राप्त होईल, असा श्रीमामांच्या अमृतवाणीचा निष्कर्ष आहे.

***

# प्रकरण १२

# पुरवणी

(या पुरवणीमध्ये श्रीमामांच्या अन्य काही लेखन व त्यांच्या लेखनाशी संबंधित असणारे पुढील भाग मुद्दाम दिलेले आहेत. हे भाग असे :-

(१) श्रीगोविंदवचनामृत (२)-(३)'कैवल्यमार्ग' या ग्रंथाच्या दोन आवृत्त्यांना श्रीमामांनी लिहिलेल्या दोन प्रस्तावना (४)'सार्थक' नावाच्या ग्रंथाला श्रीमामांनी लिहिलेली प्रस्तावना (५)'अपरोक्ष ज्ञान व साक्षात्कार' या ग्रंथाचा गुणगौरव (अभिप्राय) (६) श्रीमामांच्या 'अमृतवाणी' ग्रंथाचे प्रा.म. अ. कुलकर्णी यांनी केलेले रसग्रहण (७) श्रीमामांच्या बोधाचे सार)

## (१)

## श्रीगोविंद वचनामृत

१) नामधनाने आपण श्रीमंत झाल्याशिवाय श्रीमंत देव आपली गाठ कसा घेणार?

२) नाम हा सहज परमार्थ आहे.

३) गुरुमार्ग सूक्ष्म आहे. आपण मीपणविरहित सूक्ष्म झालो की तो मार्ग सापडतो.

४) जगात चांगले वाईट मिसळून राहिले आहे. आपण सत्नामाशी तद्रूप झालो की वाईट ते सगळे गळून पडेल.

५) ज्या जपात देहभाव लयाला जातो तोच जप.

६) विविधतेतून एकाकार वृत्तीमधे येणे ही प्राणवृत्ती आहे.

७) प्राणवृत्तीतले जे साद आहेत त्यातच नाम आहे.

८) नामस्मरणाचे श्रवण केल्याने मीपणा नाहीसा होतो.

९) नामाची गति व मनाची गति एक व्हावी.

१०) नामस्मरण चित्ताला घासायला लागले की चित्त शुद्ध व्हावयास लागते.

११) मनोवेताळ स्वाधीन होण्यास चढता उतरता नाम घेणे ही गुरुकिल्ली.

१२) नामस्मरणाचा धडा संतांनी गुप्त ठेवलेला नाही. विचार करणाऱ्याला तो



प्रगटच आहे.

१३) नामात ब्रह्म साठविले आहे, म्हणून नाम ब्रह्मापेक्षा मोठे.

१४) त्रिगुणांत सत्त्वगुण नामस्मरण घडवितो पण त्याचे सामर्थ्य थोडे आहे. त्याच्या पलीकडे हरिगुण आहे. त्यात आल्याशिवाय अखंड नामस्मरण होणार नाही. त्या गुणात गुरुकृपेने येता येते.

१५) देव सर्वस्वाचे दान मागतो. ते देण्याचे बळ नामाने मिळते.

१६) निर्विषय होऊन नामस्मरणांत रंगणे ही थोर भक्ति.

१७) त्रिगुणातीत होण्यात देवप्राप्ति आहे. सत्त्वगुणांत रहाणे हेही 'दर्या में खसखस' एवढेच आहे.

१८) घोटणीने मात्रा गुणाला चढते; तसेच नामाचे आहे.

१९) गोवर्धनाला खरा आधार देवाचा. बाकी काठ्या. तसाच आपल्यालाही खरा आधार देवाचा.

२०) परेपाशी नामाचे स्फुरण आहे. त्यात रममाण होणे हे कोटी यज्ञाचे फळापेक्षा अधिक आहे.

२१) एकाग्र नामस्मरण होण्यास जो प्रत्यवाय तो विकल्प.

२२) जागृति, स्वप्न, सुषुप्ति हा मायेचा प्रांत.

२३) तुरीय व उन्मनी हा देवाचा प्रांत. येथे अखंड नामस्मरण घडते.

२४) नामाचे विधान बोलून दाखविता येणार नाही. ते आत समजून घ्यावयास पाहिजे.

२५) नाभिकमलाचे ठिकाणी शब्द उमटतो. तेथे नामाचा संकल्प ठेवून रहाणे हे साधन.

२६) नेम नीट होतो की नाही इकडे लक्ष पाहिजे.

२७) देहभान नष्ट होईपर्यंत म्हणजेच देहान्तापर्यंत नामस्मरण करावे लागते.

२८) नामानेच जीवन सुखी आणि समृद्ध होते.

२९) नामानेच गुरुकृपा होते व गुरूकृपेने अखंड नामस्मरण होत रहाते.

३०) नामानेच साक्षात्कार होतो व साक्षात्कारी जीवनात नामाशिवाय दुसरे काही रहातच नाही.

***

(२)

**।। श्रीसद्‌गुरु प्रसन्न ।।**

**कैवल्यमार्ग अथवा नित्यनियम भजनविधि**

## प्रस्तावना

**'कलौ तद्धरिकीर्तनात्' -श्रीमद्भागवत**

कमळ फुललें, म्हणजे भ्रमरांना आमंत्रणाची जरुरी नसते. ते त्याच्या सुवासाने मोहित होऊन त्यावर आपोआप झडप घालतात. तद्वत श्रीमत् सद्‌गुरु परमपूज्य रामचंद्ररावमहाराज यरगट्टीकर, वास्तव्य श्रीक्षेत्र चिमड, यांच्या विज्ञानाचें कमळ ज्यावेळी विकसित झाले, त्यावेळी त्याच्या परिमळानें मोहित होऊन श्रीमत् सद्‌गुरु परमपूज्य हणमंतरावजी ऊर्फ तात्यासाहेब कोटनीसमहाराज हे सद्‌गुरुचरणकमलासन्निध प्राप्त होऊन कृतार्थ झाले. त्यांनी आपल्या गुरुदेवाचे प्रत्यक्ष आचरण पाहून खरा सुखाचा मार्ग तेव्हांच उचलला, आणि संसारांत अलिप्त राहून, भक्तिज्ञानप्रसाराचें कार्य करण्यांत आपले सर्व आयुष्य वेचण्याचा निश्चय केला. व जी कामगिरी करण्यांत आजपर्यंतच्या थोर थोर विभूतींनी आपले सर्व आयुष्य खर्चून स्वत:ला कृतार्थ केले तेच ज्ञानप्रसाराचे म्हणजे भगवन्नामसंकीर्तनामृत सर्वत्रांना प्राशन करविण्याचे श्रेष्ठ कार्य आमरणांत करून ते कृतार्थ होऊन गेले. या त्यांच्या कार्याची स्मृति सांगलीकरांचे व तसेच ज्यांनी ज्यांनी त्यांचे कीर्तन श्रवण केले असेल त्यांचे अंत:करणांत अढळ होऊन राहिली आहे व त्यामुळें सर्वत्रांचे डोळे भजनमार्गाकडे लागले आहेत.

अशावेळी गु. भ. प. रा. रा. रघुनाथ हणमंत ऊर्फ बाबूराव कोटणीस वकिल यांनी आपले तीर्थरूप ब्रह्मीभूत श्रीमत् सद्‌गुरु परमपूज्य तात्यासाहेबमहाराज यांनी गुरुपरंपरागत जी नित्यनियम-भजन-पद्धति आचरणांत आणिली ती सर्वत्रांनी स्वीकारून कृतार्थ व्हावें या उदात्त हेतूनें ती छापून प्रसिद्ध करण्याचें ठरवून आपले परंपरागत ज्ञानप्रसाराचे कार्य चालू ठेविले, याबद्दल त्यांचे जितके आभार मानावेत तितके थोडेच होतील. त्यांनी यापूर्वीच १) कैवल्य-वैभव २) कैवल्य-



कुसुम व ३) कैवल्य-बोध अशी तीन पुस्तके प्रसिद्ध केलेली आहेत. तीर्थरूप श्रीमत् सद्‌गुरु परमपूज्य तात्यासाहेबमहाराज यांची नित्य कीर्तनाची परंपरा कायम ठेवून वरील नंबर २ व ३ ही पुस्तके त्यांनी केवळ एक वर्षांत प्रसिद्ध केली व पुन्हां कैवल्य-मार्ग अथवा नित्यनियम भजनविधि ज्यांत नित्यनियम भजन व इतर कांही पद्यें आहेत, असें हे चौथें (तुरीय) पुष्प इतक्या लवकर प्रसिद्ध केले. यांत गु. भ. प. बाबूराव कोटनीस यांची अद्वैत भक्ति-ज्ञान-प्रसाराची कळकळ अत्युत्कृष्ट रीतीनें दिसून येत आहे. ही बालकाची सेवा पाहून श्रीमत् सद्‌गुरु परमपूज्य रामचंद्ररावमहाराज व श्रीमत् सद्‌गुरु परमपूज्य तात्यासाहेबमहाराज यांना आनंद जाहल्याशिवाय राहणार नाही. तसेंच श्रीमत् सद्‌गुरु परमपूज्य नारायणरावमहाराज व श्रीमत् सद्‌गुरु परमपूज्य उद्धवरावमहाराज व त्यांच्या मातोश्री गं. श्रीमत् सद्‌गुरु परमपूज्य माईसाहेबमहाराज, वास्तव्य श्रीक्षेत्र चिमड, यांना अति आनंद व समाधान होणार आहे.

ह्या पुष्पांतील अखंड भजनामोद ग्रहण करण्यांत तर सांप्रदायिक व मुमुक्षजन कसूर करणार नाहींतच, पण हा आमोद आपल्या इतर संबंधी जनांला देखील सेवन करावयास लावण्यांत ते कसूर करणार नाहीत; ही स्मृति वाचकांच्या अंत:करणांत उत्पन्न करून व माझा अधिकार नसतां केवळ गुर्वाज्ञा म्हणून अशा रीतीने सद्‌गुरुंची वाङ्मयसेवा करण्याची आलेली संधि दवडूं नये म्हणून, पुढील तुरीय पुष्पाशेजारीच ही प्रस्तावना मंजरी मी सद्‌गुरुचरणी अर्पण केली आहे.

कार्तिक शु. ८
शके १८४७

**गोविंद अनंत केळकर**
असि. सायन्स-टीचर सिटी हायस्कूल
सांगली

(३)

## कैवल्यमार्ग अथवा नित्यनियम भजनविधि

## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

'कैवल्यमार्गाची' दुसरी आवृत्ति सर्वांगसुंदर निघालेली पाहून फार आनंद वाटतो. कोणत्याही ग्रंथास द्विवतीयावृत्तीचा सुप्रसंग लाभणे हा योग क्वचित्‌च येतो, आणि त्यांतून पारमार्थिक ग्रंथास लाभणेचा संभव फारच कमी. तथापि हा ''नित्यनियम भजनविधीचा'' ग्रंथ सांप्रदायिक दृष्टीनें फारच महत्त्वाचा, सर्वांना गुंगवून टाकणारा व चित्त वेधून घेणारा असल्याने याच्या प्रती खपणेस फारसा अवधि लागला नाही.

हा ग्रंथ घेणारास नित्यनैमित्तिक अशा दोन्ही उपासना पद्धतीचा लाभ होणारा आहे. साधनामध्यें येणारे अडथळे दूर होणारे आहेत. कैवल्यपदाची प्राप्ति 'कैवल्यमार्ग' या अन्वर्थक नांवाने होणारी आहे. पहिल्या आवृत्तीपेक्षां या ग्रंथांत कांही उपयुक्त अशी अधिक नित्यनैमित्तिक उपासना ग्रथित करणेत आली आहे. या ग्रंथांत पालखीसेवा, संकीर्ण पद्यसंग्रह व त्यातच श्रीसद्‌गुरु परमपूज्य श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे शिष्य कै. राजकवि साधुदास यांनी केलेली नित्यपूजा व प्रसाद-याचना दिलेली आहे. सांप्रदायांत गुरुपरंपरेचे आराधनेचे प्रसंगी म्हणणेंत येणारे श्रीसद्‌गुरु तुकाराममहाराज यांचे निजधाम-निर्याणाचे अभंग स्वतंत्र प्रकरण घालून दिले आहेत. त्याचाही सांप्रदायिकांना फार उपयोग होणार आहे. भगवान् श्रीसद्‌गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांची बोधसूत्रें सूत्ररूपाने गुंफून दिली आहेत. ती कोणासही चिंतनीय आहेत असे वाटल्याशिवाय रहाणार नाही. गुरुवर्य बाबूरावजी कोटणीस यांनी (१) 'कैवल्यवैभव' (आवृत्ति २ री) (२) 'कैवल्य कुसुम' (३) 'कैवल्यबोध' (४) 'कैवल्यपुरुष खंड पहिला' (५) 'कैवल्यपुरुष खंड दुसरा' (६) 'कैवल्य मनोबोधिनी' (७) 'कैवल्यपुरुष खंड पहिला भाग दुसरा' अशी ७ पुष्पें अल्पावधीत प्रसिद्ध करून 'कैवल्यमार्गाची' द्विवतीयावृत्ति इतकी सर्वांगसुंदर मुमुक्षूंचे हाती दिली आहे. ही श्रीतात्यासाहेबांची मोठीच सेवा होय. ही बालकाची सेवा पाहून हल्लीचे चिमड पीठावर विराजमान असलेले



अधिकारी सत्पुरुष श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर यांना अति आनंद व समाधान होणार आहे.

श्रीसद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे कृपेने त्यांची झालेली ही अल्प सेवा त्यांचेच पवित्र चरणी या सुप्रसंगी समर्पण करीत आहे.

सांगली,

चैत्र शुद्ध १२ शके १८७६

**गोविंद अनंत केळकर**

***

(४)

## पांडुरंगमहाराज ताम्हनकर यांच्या 'सार्थक' नावाच्या ग्रंथाला

## श्री मामांनी लिहिलेली प्रस्तावना

सार्थक होतें सार्थक होते । पुण्य पावन ज्ञान मार्ग हा । देवदर्शन होते ।। (श्रीसमर्थ रामदास)

धारवाडचे रिटायर्ड हेड पोष्ट मास्तर, हल्ली सांगलीस असलेले, ह. भ. प. पांडुरंगमहाराज ताम्हनकर, यांनी 'सार्थक' या नांवाचा छोटासा ओवीबद्ध ग्रंथ लिहून मुमुक्षु जनांना त्यांनी मोठा ठेवा दिला आहें असे मला वाटतें. अशा अधिकारी पुरुषांच्या सांगण्यावरून मी या ग्रंथासंबंधी 'प्रस्तावना' म्हणून चार शब्द लिहीत आहे. श्रीसद्‌गुरु तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांचे संबंधी त्यांचे अंत:करणांत नितांत प्रेम असल्यानें, या ग्रंथासंबंधी कांही लिहिणे हे माझे कर्तव्यच आहे असे मी समजतो.

हा ग्रंथ अगदी सुलभ भाषेंत लिहिला गेला असून, विचार, उच्चार आणि आचारात्मक त्रैमूर्ती दत्तावताराचे वर्णन ह. भ. प. पांडुरंगमहाराजांनी फार मार्मिक रीतीने केले असून या तीन शक्ती उपासनेने एकवटल्या म्हणजे श्रीदत्तात्रयांची कृपा, चिरशांती व निर्भेळ आनंद साधकाला कसा प्राप्त होतो, हें दाखविले

आहे.

''यथा चित्तं तथा वाचो, यथा वाचस्तथा क्रिया । चित्ते वाचि क्रियायांच साधूनां एकरूपता ।'' या उक्तीप्रमाणें या तिन्हीची एकरूपता झाल्यास, व्यावहारिक व पारमार्थिक दृष्टीनें, याचे काय महात्म्य आहे किंवा तात्त्विक दृष्टीनें, विश्वाची उभारणी व संहारणी करण्याची शक्तीही यांतच कशी आहे हे या ग्रंथावरून आकलन होण्यासारिखे आहे.

श्रीसद्‌गुरु पंतमहाराज बाळेकुंद्रीकरासारख्या महान् सत्पुरुषाचे कृपेंतील ह.भ.प.पांडुरंगमहाराज हे नि:सीम शिष्यापैकी एक असल्याने, तो प्रसाद आणि प्रेम, प्रत्येक अध्यायांत जागजागी उमटल्याचें वाचकांस दिसून येईल. ते जसे प्रेमळ गुरुभक्त आहेत तसेंच ते मातृभक्त आणि पितृभक्त आहेत, असे या ग्रंथावरून दिसून येईल. प्रत्येक अध्यायाचे शेवटी, त्यांनी मोठ्या आदराने आपल्या माता पित्यांचा उल्लेख केलेला दिसून येतो. सार्थकाचे मूळ जशी गुरुकृपा तसेंच आईबाबांचा आशीर्वाद हेही मूळच आहे, हे विसरतां येणार नाही.

ह.भ.प.पांडुरंगमहाराज यांचे पारमार्थिक महान् अधिकारी चुलते ह.भ.प.विनायकरावमहाराज ताम्हनकर ऊर्फ 'सांयी' यांनीच पांडुरंगमहाराजांना मोक्षगुरूची जोड करून दिली, ते उपकार पांडुरंगमहाराज विसरले नाहीत. यावरून या ग्रंथांतील गुरुप्रेमाचा ओलावा स्पष्ट दिसून येत आहे, ते म्हणतात 'सावित्री अन्नपूर्णा माता । नारायण पितृव्य वासुदेव पिता । विनायक दावी सद्‌गुरु दत्ता । उपकार डोंगराएवढा।।'' श्रीपंतांचे शिवाय एक पाऊलही ग्रंथकाराने टाकलेलें नाही. या दृष्टीने हे श्रीपंत प्रेमरूप सार्थक गुरुकृपेने ज्यांनी साधिले व इतरांनाही, ते साधता यावे म्हणून विचार, उच्चार आणि आचारात्मक त्याची मांडणी करून ग्रंथरूपाने तें अक्षरांत उतरविले आहे, हे खरेच स्तुत्य आहे. त्यांचे लेखन बरेच मोठे असून त्यांनी बरीच सुंदर व बहारीची पदे केली आहेत. 'सार्थक' या ग्रंथाचे श्रवण, पठण व निदिध्यासनानें, जीवाचे सार्थक कशांत



आहे हे कळल्यानंतर, वाचकांना साहजिकच त्याची गोडी लागेल. या ग्रंथ प्रकाशनानें, ह. भ. प. पांडुरंगमहाराज यांचे माता व पिता व श्रीपंतमहाराज व श्रीसांई यांना आनंद वाटल्यावाचून राहणार नाही. हा विचार ध्यानीं घेता ज्यानी हे प्रकाशनाचे कार्य केले ते खरोखर अभिनंदनीय आहेत एवढे विदित करून, श्रीसद्‌गुरु तात्यासाहेबमहाराज यांचे कृपेने स्फुरलेले चार शब्द मी श्रीसद्‌गुरु पंतमहाराज यांचे चरणी समर्पण करितो.

सांगली. ता. २६-१-१९५१ **गोविंद अनंत केळकर**

***

(५)

### अपरोक्ष ज्ञान व साक्षात्कार या ग्रंथाचा

## ग्रंथगुणगौरव (अभिप्राय)

'अपरोक्षज्ञान व साक्षात्कार' या ग्रंथासंबंधी चार शब्द लिहिण्याविषयीं गु. भ. प. कृष्णाजीपंत चिंचोरे यांनी सांगितल्यावरून, अर्थात् ही अनुज्ञाच आहे असें मानून मी यासंबंधी चार शब्द लिहीत आहे. ज्याप्रमाणे सूर्यप्रकाशाला दिवा दाखविण्याची जरूरी नाही, फक्त स्तुति करणें एवढेंच काम असतें, तद्वतच ही गोष्ट आहे. श्रीज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथाला कोणी प्रस्तावना लिहून त्याचा मोठेपणा दाखविण्याचें कारणच नाही. तशीच गोष्ट हा ग्रंथ ज्या स्वानुभवी पुरुषाकडून लिहिला गेला आहे, त्याबद्दल आहे.

वेद, श्रुति, स्मृति, शास्त्रे, ऋषि, मुनि व संत यांनी आत्मसाक्षात्काराचा मार्ग आपआपल्या मताप्रमाणें दाखविला आहे. आत्मसाक्षात्कार आपणास व्हावा असें वाटणारा मनुष्य आपल्या सामर्थ्याप्रमाणे या अनुभवी माणसांचे मार्ग शोधू लागतो; पण तो त्यामधें गोंधळतो. अज्ञानी हा अज्ञानीच असतो; पण ज्ञानीहि अज्ञानी बनतो. हा घोटाळा या 'अपरोक्षज्ञान व साक्षात्कार' या ग्रंथवाचनानें व अभ्यासानें त्या अभ्यासूचा दूर होईल, व स्वरुपाविष्करणनामक मोक्ष आपल्या 'मी' तच आहे, हा अनुभव येऊन तो अभ्यासू पूर्ण सुखी होऊन, खरें समाधान

त्याला प्राप्त होईल अशी मांडणी या ग्रंथाची केली आहे.

या ग्रंथासंबंधी बोलावयाचें तर आत्मानुभव यांत ज्ञानेश्वरी, अमृतानुभव या ग्रंथांचे तोडीचा उतरलेला आहे. वाचन कृपासंपादनाने यांतील ज्ञान जर कोणी आत्मसात् केले, तर या ग्रंथाचे चीज केल्यासारखे होणार आहे. अज्ञान व विज्ञान यांपलीकडे हें ज्ञान असल्यानें सर्वांनींच याचा विचार करणें जरूर आहे. वेद, शास्त्रें, उपनिषदें व संतवाङ्मय यांचें सार मंथन करून यांत एकसूत्रीपणानें गोंवून अंतिम सुख आत्मत्वांत असून गुरूपदिष्ट मार्गानें ते जाणून घ्यावयाचे आहे, हेंच यांत दाखविलें आहे. श्रीवासुदेवअण्णांनी निःशब्द ब्रह्मास शब्दरूप केल्यानें या ग्रंथाचें महत्त्व अधिकच आहे. अशा प्रकारे ही आध्यात्मिक वाङ्मयसेवा करून व ती प्रसिद्ध करून श्रीवासुदेवअण्णा व गु. भ. प. चिंचोरे यांनी मुमुक्षुजनांवर मोठा अनुग्रह केला आहे. याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून मी हे चार शब्द श्रीसद्गुरु तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांचे प्रेरणेनें लिहिलेले पुरे करतों.

आपला नम्र,

**गोविंद अनंत केळकर,** सांगली.

***

(६)

### श्रीमामांच्या 'अमृतवाणी' या अभंगगाथ्याचे

## प्रा. म. अ. कुलकर्णी यांनी केलेले रसग्रहण

अखंडनामसंकीर्तनयोगी श्रीमामामहाराज हे कीर्तनरंगी देवासन्निध सुखेचि डोलणाऱ्या महाभागवतापैकी एक संत होते. अखंड नामस्मरणाने ज्यांच्या अंतरीची ज्योती नित्य प्रकाशलेली होती व ज्यांच्या चित्ती सतत स्वानंदलहरी उठत राहिल्या होत्या, अशा भगवंताच्या प्रियतम भक्तश्रेष्ठांपैकी ते एक श्रेष्ठ भक्तराज होते. संतसंग आणि हरिकीर्तन या व्यतिरिक्त दुसरा कोणताही छंद न



धरता जीवनभर आदर्श परमार्थाचरण करणाऱ्या दुर्मिळ साधुपुरुषांपैकी ते एक साधुपुरुष होते. त्यांनी लिहिलेली 'अमृत वाणी' ही अभंग गाथा सर्वार्थाने अलौकिक अद्‌वितीय अशी आहे.

सिद्‌ध वस्तूचे साक्षात् दर्शन घडवून देणाऱ्या चिमडपीठाधीश सद्गुरु नारायणमहाराजांच्या दिव्य अनुग्रहाचा लाभ त्यांना झाला होता. याच परंपरेतील थोर पुण्यपुरुष श्रीहणमंतराव कोटणीसमहाराज यांच्या निर्याणानंतर ती कीर्तन परंपरा पुढे नित्य चालू ठेवणारे तेही श्रेष्ठ कीर्तनभक्त होते. अखंड नामस्मरणाच्या साम्राज्यावर आरुढ झालेले ते निष्ठावंत साधकश्रेष्ठ होते. आयुष्यभर त्यांनी नामाचे लेखन, नामाचे वाचन, नामाचे उच्चारण असा नामाचाच व्यवहार केला. त्यामुळे ते संतसज्जनांच्या गौरवाला सुपात्र ठरले. त्यांच्या व्यक्तिमत्वाला अनेकविध पैलू होते. अशा या थोर संताची बोधवचने म्हणजे ही 'अमृतवाणी' आहे. नमन, भजन, सद्गुरु, नरदेह, मन, विवेक, वैराग्य, भक्ति अशा चोवीस प्रकरणात विभागणी केलेले हे एकूण तेराशे अभंग आहेत. परतत्त्वाचा उदंड स्पर्श लाभलेला हा अथांग भक्तिरसार्णवच आहे.

प.पू. मामामहाराजांचे समग्र जीवन सद्गुरुप्रेम व नामभक्तीने भारलेले होते. त्याचे लोभसवाणे दर्शन या अभंगांमधून सर्वत्र होते. देव कोठे आहे? कसा आहे? तो काय करतो? याची उत्कंठा असेल तर हे समजण्यासाठीच आधी गुरु हवेत. गुरूशिवाय देवभेटी कोणी करून देऊ शकणार नाही. गुरुकृपा बळावरच या गोष्टी आकळता येतील. नित्य नाम घ्याल तरच गुरुकृपा लाभ होईल असा या मार्गातील सिद्‌धांत पहिल्याच अभंगात ते मांडतात. या सिद्‌धांतात तत्त्वाच्या पायावर मग स्वरूपसाक्षात्कारापर्यंत समग्र मंदिराची उभारणी कशी होते, कशी करावयाची असते, याचे चिंतन-मनन या गाथेत आहे. चिंतन-मनन केल्यानेच साधकाचे भाग्य उजळते. पाप-ताप-दैन्य सरून जाते. बंधनाच्या गाठी सुटून जातात, सर्वगत सम एकच ब्रह्म भरून राहिले आहे, याची प्रचीति येते. निजानंदलाभाची नेमकी वाट सापडते. मी एकाच वाक्यात म्हणेन, 'देवाचा

अनुभव आणून देणारी ही गाथा आहे!''

अविद्येचा पूर्ण त्याग होऊन विवेकावर आरूढ होणं हा खरा परमार्थ होय. विवेक हाच आत्मा आहे. त्या चैतन्यी चित्त रंगून गेले पाहिजे. मनाची भ्रांति नष्ट होण्यासाठी भजन कीर्तन हवेच हवे. नामस्मरण, भजन, कीर्तनाने कृतार्थतेचा लाभ होतो. असे सुंदर, मौलिक मार्गदर्शन या अभंगांमधून केलेले आहे.

यातील कोणताही अभंग उघडावा व त्यातील सूक्ष्मता, सूचकता व सखोलता ध्यानी घेत रहावे. प. पू. मामामहाराज सांगतात, ''दासा हृदयी हनुमान । सदा करितो कीर्तन'. हनुमंत हा दास्य भक्तीचा आदर्श. हनुमंताप्रमाणे मी दास्य भक्ती केली, मी मूर्तीमंत हनुमंतच झालो म्हणून तो श्रीराम कीर्तनी प्रगटला! संतश्रेष्ठ हनुमंतराव कोटणीस यांचा आदेश हृदयी साठवला, नव्हे त्या हनुमंतासच हृदयी साठवले. अहो तेच कीर्तन करतात! 'घरा आले हनुमंत' म्हणजे केवळ ८२७, गांवभाग या घरी हनुमंतराव कोटणीस आले एवढाच अर्थ नव्हे, या शरीररूपी गृहात अखंड वास्तव्य करण्यासाठी ते आले. ही खरी कृपा त्यांनी केली. मग तेच आता हरिकथाही प्रगट करीत आहेत.! 'गुरुगृही मौज भारी' म्हणजे आपले शरीर हेच सद्गुरुंच्या वास्तव्याचे विश्रांतीचे ठिकाण झाले की मग या साडेतीन हाताच्या देहातच चराचरीचे नवल, जे सद्गुरु दाखवून देतात तोच साक्षात्कार! असा आनंदलाभ घडावा, एवढेच मनोरथ होते, ते पूर्ण झाले. सद्गुरुंनी आपल्यापदी या दासाला ठाव दिला यातच सर्व काही आले अशा दृढतर गुरुभक्तीच्या पायावर प. पू. मामांच्या परमार्थाचे मंदिर उभे राहिले आहे. श्रीज्ञानदेव 'म्हणोनि शिष्य आणि गुरू नाथु । या दोहो शब्दांचा अर्थु। श्रीगुरूचि परि होतु । दोहों ठायी ।।' असे जे सांगतात त्याचा भावार्थ ज्याला कळला त्याच्या ध्यानी ह्या अमृतवाणीचे स्वरूप येऊ शकेल!

वर्षातील गुढी पाडवा आला की गुरुकृपेचा ध्वज उभारावयाचा असतो. भावशुद्धीच्या काठीला भक्तीचे वस्त्र बांधून त्यावर आनंदाचा कलश ठेवायचा असतो व नामामृताचा लिंब सेवन केला तर त्या भक्तजीवनातील सारेच नित्याचे



दिवस तेही पाडवाच होऊन जातात. जो द्वैतभाव टाकून अनन्यपदी रहातो तो अक्षय्य तृतीया साजरी करतो. वारकरी होणे, एकादशी करणे, नागपंचमी, हरतालका, गणेशपूजन, दसरा, दिवाळी, धनत्रयोदशी हे सारे सण, प्रसंग कसे व का साजरे करावयाचे त्याचे पारमार्थिक अन्वयार्थ काय आहेत हे मामामहाराजांनी सहज, डोळियाचा डोळा उघडून सांगितले, शिकविले आहे. गुरुकृपेने चित्शक्तीचा प्रकाश हृदयांतरी प्रकाशला की सत्य काय, मिथ्या काय हे स्पष्ट दिसू लागते. नित्य काय, अनित्य काय, ओळखता येते. ज्याने पाहिले, ओळखले त्याला संसार काय फसविणार? ज्याने निर्भ्रम होऊनच देव हाती घेतला त्याला पुन्हा भ्रम कधी होणारच नाही! ज्याने आयुष्यभर नामामृताच्या कावडी भरल्या तो संसारदुःखाच्या कावडी कधी वाहणारच नाही. जग ही धर्मशाळा आहे हे वेळीच ज्याच्या ध्यानी आले तो प्रवासी खऱ्या मुक्कामाच्या जागी नेऊन पोहोचणारा भक्तीमार्गीचा कावडीच होईल. जो संसारात अनासक्त होऊन गेला तो मुक्तच होऊन जाणार. जो देवकाजी देह झिजवितो तो कृतकृत्यच होणार असे मौलिक विवेचन या अभंग माध्यमातून जागोजागी आले आहे.

या विवेचन, चिंतनात दिव्यता आहे. प्रकाशमयता, प्रसाद भरलेला आहे. अशा गुरुकृपाप्राप्त प्रकाशामधून जे वाटचाल करीत जातील त्यांच्या जीवनातील पार्थिवता संपून जाऊन त्यांच्या समग्र अस्तित्त्वात विश्वचैतन्य सबाह्य अभ्यंतरी प्रगट होऊन जाते, याची खात्रीच हे अभंग देत रहातात. प. पू. मामामहाराज निर्धाराने, आत्मप्रत्ययाने सांगतात 'देव प्रगट'च आहे. त्याला ओळखून त्याचे फक्त स्मरण करावयाचे आहे. कल्पना टाकून भावना धरायची. विकल्प टाकून नामानुसंधानी रहायचे. संदेह निरसून त्याला जाणायचे, अनुभवावयाचे. आत्मवस्तु हाती आली, त्याने परमार्थ साधला. ज्याला समदृष्टी लाभली त्याने संसार जिंकला. सहा धुऊन जो साधु होतो तोच सत्संग साधतो.' असा सिद्धसिद्धांतीचा उपदेश या गाथेत पानापानावर भरलेला आहे. त्यातील भावनासामर्थ्य व विचार सामर्थ्य अक्षरशः थक्क करून टाकणारे आहे. त्यात ज्ञानोत्तरभक्तीचा घनदाट प्रकाश भरून गेलेला आहे. साधनेची सूक्ष्मता आहे. तशीच तपाची तेजस्विता

कोंदाटलेली आहे.

खरोखरीच ही अपूर्व अशी अभंग गाथा आहे. या अभंगांत कोठेही अस्वस्थता, साशंकता, असमाधान, आक्रोश, लयमात्रही आढळत नाही. इथे आहे ती सर्वत्र सत्त्वसंपन्नता, अनुभव संपन्नता. हर एक विचारामागील निश्चितता. अनुभवाचे पात्र भरभरून ओसंडते आहे. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, कबीर आदि साधुसंतांच्या विचार, तत्त्वज्ञानांच्या मनोज्ञ मिलाफामधून ही अमृतधारा तयार झाली आहे. देवावरील नि:सीम भक्तिप्रेमामधून सर्वस्व समर्पणार्थ ती प्रगटली आहे. या अमृतवाणीने परमार्थविश्व उजळून टाकले आहे. या आनंदाच्या आवारातून जी संतकृपा पाठीशी घेऊन जो विहार करू लागेल त्याला उघड्या डोळ्यांनी परतत्त्व दिसू लागेल. हरघडी चराचरावर चाललेला सुखाचा उत्सव प्रगट होऊ लागलेला पहावयास मिळेल. या शांतरसाच्या वर्षावांनी तो तृप्त, कृतकृत्य होऊन जाईल. श्रीदासराममहाराजांनी प. पू. मामामहाराजांची ही कीर्तनवाणी एकत्रित स्वरूपात संपादित करून, प्रकाशित करून असंख्य साधक, पारमर्थिकावर अलोट उपकारच केले आहेत. त्यांना मन:पूर्वक धन्यवाद !

***

## (७)
## मामांच्या बोधाचें सार

मामा एकदा चिमडला गेले होते. नारायणमहाराजांनी कीर्तनात पृच्छा केली, ''पुण्य कोणते? पाप कोणते?'' मामांनी नम्रपणे सांगितले, ''नाम न घेणे हे पाप, नाम घेणे हेच पुण्य!''

साहित्यसम्राट न. चिं. केळकरांनी मामांना विचारले, ''तुम्ही रोज कीर्तनात काय सांगता?'' ''नामाबद्दल सांगतो,'' मामा उत्तरले. ''पण दररोज काय सांगता'' त्यांनी पुन: विचारले. मामा म्हणाले, ''नामाबद्दल सांगण्यासारखे इतके आहे की ते सांगून संपणारे नाही.''



मामांचे प्रवचन काय, निरूपण काय, लेखन काय किंवा नित्यकीर्तन काय, सर्व नामाभोवती फिरत असे. मामांची सर्व शिकवण नाम हे केंद्र धरून आहे.

नामाबद्दल सांगताना मामा कीर्तनात तुकाराममहाराजांचा एक अभंग वारंवार म्हणून दाखवीत, तो असा-

न कळे ते कळो येईल उगले । नामे या विठ्ठले एकाचिया ।।१ ।।
न दिसे ते दिसो येईल उगले । नामे या विठ्ठले एकाचिया ।।२ ।।
न बोलो ते बोलो येईल उगले । नामे या विठ्ठले एकाचिया ।।३ ।।
न भेटे ते भेटो येईल उगले । नामे या विठ्ठले एकाचिया ।।४ ।।
अलभ्य तो लाभ होईल अपार । नाम निरंतर म्हणता वाचे ।।५ ।।
तुका म्हणे आसक्त जीव सर्वभावे । तरतील नावे विठोबाच्या ।।६ ।।

नाम कसे घ्यावे हे सांगताना, मामा 'हरिमुखे म्हणा हरिमुखे म्हणा' हे ज्ञानेश्वरमहाराजांचे वचन उच्चारत व म्हणत - 'हरि मुखाने म्हणावे. हरि मूकत्वाने म्हणावे.' याच्याही पुढे जाऊन कलिसंतरणोपनिषदातील कथा सांगून नामाच्या बाबतीतले 'नास्य विधि:' हे शब्द उच्चारून, 'नास्य विधीने' नाम घ्यावयाचे आहे, असे ते स्पष्टीकरण देत.

### मामांची अभंगवाणी

मामांना जे अभंग स्फुरले त्यांचा उपयोग मामा कीर्तनात निरूपणासाठी करीत. नाम या बिंदूभोवतीच मामांच्या अभंगांची मांडणी आहे. प्रसंगोपात्त इतर विषय असले तरी त्यांचा सांधा नामाशी जोडलेला आहे. खेरीज सणांचा पारमार्थिक अर्थ सांगणारे मामांचे अभंग आहेत.

उदा. 'तेरा माजी धन राशी । तेची धनत्रयोदशी'; 'लक्षस्वरुपी मिळाले । लक्ष्मीपूजन दासा भले'; 'सीमा उल्लंघन साधावा दसरा । जनांच्या आचारा सांडोनिया ।।१ ।। प्रवृत्ती बडबड उल्लंघोनी सीमा । निवृत्तीच्या धामा नामी यावे ।।२ ।। नाम सोने घ्यावे, नाम सोने द्यावे । मुहूर्त साधावे औटामध्ये ।।३ ।। दास म्हणे तरी भेटे ऋषीकेशी । सुवर्णाच्या राशी इच्छामात्रे ।।४ ।। 'दीपावली

दीप ज्योती नयनी पाहिली । सद्गुरुच्या पूर्ण कृपे हृदयी प्रगटली ।।१।। तेलवाती पात्राविण तेजकूसरी । चंद्रसूर्य विद्युताग्नि न पवे सरी ।।२।। अनंत दीप झळकताती स्वर्ग-महीवरी । पाताळी त्याच परी हृदय-मंदिरी ।।।३।। स्वयंप्रकाश झगझगाट होय अंबरी । पाहुनिया समाधान दास अंतरी ।।४।।' 'तीळ घ्या गुळ घ्या गोड बोला वाचे बोलताती । तीळगूळ म्हणजे काय याची पडली भ्रांती ।।१।। तीळ सूक्ष्म प्रेमस्थान नाम गूळ पाही । प्रेम भावे नाम घेता बोल गोड होई ।।२।।' 'जाळोनिया काम सदा जपे राम । सण हा परम उत्तमाचा ।।१।। बोलती अभद्र इच्छिताती भद्र । तया रामभद्र केवी भेटी ।।२।। शिवाचे मनीचे गाई नाम वाचे । सणी शिमगीयाचे तेची धन्य ।।३।।'

श्रीमामांची अनुभवाची पदेही मोठी बहारीची आहेत. त्यातील मासल्यादाखल एक पद संपूर्ण खाली देत आहे-

ते रूप पाही बरे मनुजा ते रूप पाही बरे ।।धृ.।।
ज्या रूपाचे दर्शन होता जगदाभास नुरे ।
सर्व ईषणा तृप्त होऊनी मन हे आनंदी विरे ।।१।।
वरवर पाहुनी काय पाहसी पस्तावाची उरे ।
हरिरूप पाहुनी मुखी वानिता हृदयी राम भरे ।।२।।
तेज लखाखीत भोवती मध्ये बिंदु सुनील सरे ।
त्यामध्ये श्रीराम विराजित निरखुनी पाही बरे ।।३।।
हनुमंताच्या कृपाकटाक्षे दिसले स्वरूप खरे ।
गोविंद म्हणे अंतरी जाऊनी उन्मनीत विरे ।।४।।

## साधकाचा आचार व सिद्धावस्था

संसारात राहून सिद्धावस्था साधायची आहे. हे अनेक संतांनी साधले. तात्यासाहेबमहाराजांनी हे कसे साधले हे सांगण्यास मामांनी 'हनुमद्गुरुचरित्र बोधसार' ग्रंथ लिहिला. सिद्धांचा आचार साधकांचा आदर्श असतो.



प्रथम नित्यानित्यविवेक हवा. संसार अनित्य आहे. ईश्वर, आत्मा नित्य आहे. अनित्यात वावरताना नित्याचे अनुसंधान हवे. त्यासाठी वैराग्य आवश्यक आहे. वैराग्य म्हणजे अनित्यातून मन निघणे. नित्य आत्मा आपल्यातच आहे, तोच 'एकान्त' आहे. त्यात रहावयाचे आहे. संसारांत इतरांप्रमाणे वागावे, पण आत सुटून असावे. 'एकान्तात' रहावे. त्यासाठी शम म्हणजे मनास जिंकणे व दम म्हणजे इंद्रिये जिंकणे आवश्यक आहे. मन अंतर्मुख झाले की ते समाधानी होते. इंद्रिये विषयातून काढून ईश्वराकडे लावावी. संसारात सर्व प्रकारची द्वंद्वे त्रस्त करतात. पण सर्व गोष्टीत समाधान मानण्यास शिकले पाहिजे. गुरूवरची व ईश्वरावरची श्रद्धा कधीही ढळता कामा नये.

या चर्मचक्षूला ईशदर्शन नाही. परमार्थ हा पांडित्याचा प्रांत नव्हे. अरूपाचे रूपदर्शन गुरुकृपेने होते. संतकृपा होऊन, संतांचा मार्ग अनुसरल्यावर निर्गुण देवदर्शन होते. ईशप्राप्तीचे साधन या देहात आहे. ते सद्गुरु दाखवितात. साधनाचा अभ्यास सतत करावयास हवा. जसे साधन तसा अनुभव. त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ, भ्रमरगुंफा, ब्रह्मरंध्र या पश्चिम मार्गाच्या स्थानांतील अनुभव घेत घेत साधक 'निरामय निर्गुण' स्थानी येतो. श्रीहाटस्थानी लखलखीत पीतप्रभा दिसते. गोल्हाट मंडळात श्याम तेज आहे. औटपीठ स्थानी नीलवर्णप्रभा आहे. भ्रमरगुंफेत उन्मनी अवस्था प्राप्त होते. ब्रह्मरंध्रात 'कोटी सूर्य तळपती शीतळपणे'. निरामय निर्गुणस्थान अनिर्वचनीय आहे. येथे साधक स्वस्वरूपाकार होऊन सिद्ध होतो.

परमार्थ साधण्यासाठी व साधल्यावर मामांनी स्वत: जे केले आणि जे कीर्तनात पुनः पुनः सांगितले, त्याचे सोलीव सार, गाभा म्हणजे मामांचा 'श्रीरामपाठ' आहे. 'श्रीरामपाठ म्हणजेच मामा' असे श्रीरामराय केळकरमहाराज म्हणतात. खरे म्हणजे मामा गेले नाहीत. रामपाठरूपाने ते आपल्यात व आपल्यापुढे आहेत. रामपाठात राम दडलेला आहे.

रामपाठात मामा सांगतात :-

### नरदेहाची महती

जीव संसारात आला आहे. संसारातून सुटका म्हणजे मोक्ष म्हणजे स्वस्वरूपाचा साक्षात्कार हे त्याचे ध्येय आहे. या ध्येयपूर्तीसाठी मानवदेह उपयोगी आहे. आत्ता प्राप्त झालेल्या नरदेहाचा उपयोग करून 'नराचा नारायण' होण्याचे भाग्य मिळविले पाहिजे.

### सार व असार

ध्येयसिद्धीसाठी प्रथम या संसारात सार काय व असार काय हे शोधले पाहिजे. सत्त्व, रज, तम या तीन गुणांनी युक्त असा हा जो नश्वर संसार आहे, तोच असार आहे. त्रिगुणात्मक संसाराचे पलीकडील निर्गुणतत्त्व ब्रह्म हेच सार आहे. गुणातीत होऊन ब्रह्माची प्राप्ति झाली की सार साधले व मोक्षसिद्धीचे ध्येय सफळ झाले.

### कोणता प्रयत्न ?

सार असे ब्रह्म शोधण्यास अनेक उपाय सांगितले जातात. खरा मार्ग फार थोड्यांना माहीत असतो. देवाचा शोध करण्यास लोक नसती खटपट करतात. निरर्थक खटपटीने ईश्वर मिळत नाही. खरी खटपट न कळल्याने लोक उगीच भटकत राहतात; योग, याग, इत्यादींच्या आट्यापिट्यात गुंतून राहातात. पण या नसत्या उपाधि चिकटून घेऊ नयेत. योगादि कर्मे व्यर्थ आहेत. त्यांचे पायी वृथा श्रम होतात.

रामनाम नीट उच्चारणे हीच ईश्वरप्राप्तीची खरी खटपट होय. एक नाम घेतले की इतर कोणत्याही गोष्टींची गरजच नाही. रामनाम मुखी असणे ही महाभाग्याची गोष्ट आहे. त्याहून श्रेष्ठ भाग्य या जगात नाही.

व्यवहारातील भाग्यवंत खरे भाग्यवंत नव्हेत, कारण त्यांना देवदर्शन नाही. रामनामाने जे भाग्यवंत आहेत ते खरे भाग्यवंत, कारण त्यांना ईश्वरदर्शन होते. रामनाम कंठी असले की जगजेठी संतुष्ट होतो. हरीच्या भक्ताजवळ हरि वास करतो.



### अखंड सुखासाठी रामनाम

सर्वांना सुख हवे असते. या मायिक संसारात खंड सुख मिळते; ते सतत टिकत नाही. सुखानंतर दु:ख व दु:खानंतर सुख येते. देह व देहभाव आहे तोपर्यंत सुखदु:खाचे रहाटगाडगे चुकत नाही, देहभावरहित झाल्यावरच जीवाची संसारातील विपत्ति दूर होऊन त्याला अखंड सुख मिळते. रामनामाने देहभाव दूर होतो, म्हणून रामनामानेच अखंड सुख मिळते. केवळ रामच अखंड सुखरूप आहे. रामनामाने राम मिळाला की पदरात अखंड सुख पडलेच.

### रामनामाने रामाची प्राप्ति

देवाचे दर्शन होण्यास थोर पुण्य लागते. म्हणजे पापपुण्यापलीकडचे अनंत पुण्य होय. रामनामाचा पाठ केला की अनंत, अगाध पुण्याची प्राप्ति होते. पापाच्या राशि शिल्लक रहात नाहीत. रामनामामुळे रामाचे दर्शन होते.

### नामाचा महिमा

रामनामाविना सर्व गोष्टी व्यर्थ आहेत. रामनाम हेच धन, मान, किंबहुना सर्व काही आहे. सर्व तीर्थांपेक्षा रामनाम पवित्र व पावन आहे. या जगात आणि देहात रामनाम हे एकच मंगल आहे. नाम हे सर्व तपांत श्रेष्ठ आहे. रामनामाच्या नित्य उच्चारणाने कळिकाळाचा थरकाप उडतो. रामनाम उच्चारणाऱ्यांचे पाय यमधर्म वंदन करतो. रामनामाने शंकराचे हलाहल विष शमले. रामनामाने संसाराची हळहळ शमते. रामनाम उच्चारणाऱ्याच्या सुखापुढे समाधीचे सुखही तुच्छ आहे. नामाच्या प्रकाशाने बुद्धीतील अज्ञान दूर होते, रामनामात आसक्ति वाढते, आणि अंतरीची ज्योति प्रगट होते.

### रामनाम घेताना पाळण्याची पथ्ये

जीवाच्या भवरोगावर रामनाम हे रामबाण औषध आहे. हे औषध घेताना पथ्ये पाळल्यास ते गुणकारी होते. ही पथ्ये अशी- १) रामनाम धीटपणे घ्यावे. लोकांच्या टीकेची व येणाऱ्या संकटांची व अडचणींची पर्वा न करता, धैर्य धरून रामनाम घेत राहिले पाहिजे. २) काय व्हायचे असेल ते होवो, रामनाम

सोडणार नाही, असा दृढनिश्चय हवा. ३) रामनाम आवडीने घ्यावे. जबरीच्या भावनेने रामनाम घेऊ नये. भक्तिप्रेमाने रामनामाचा उच्चार झाला पाहिजे. ४) अंत:करणातील 'काम' दूर झाल्याशिवाय रानमामाचा साठा होत नाही. म्हणून काम दूर सारून नाम साठवावयाचे आहे. ५) पतिव्रता ज्याप्रमाणे पतीला सर्वस्व मानते, त्याप्रमाणे परमेश्वरालाच सर्वस्व मानून, एकविधपणे, एकनिष्ठेने नाम घेत राहिले पाहिजे.

## नामाचा मार्ग

रामदर्शनाचा रामनाम हा राजमार्ग आहे. हाच मार्ग सर्वश्रेष्ठ आहे. या मार्गावर जीवाला कोणत्याही प्रकारचे कष्ट नाहीत. हा मार्ग बाहेर कुठे नसून, प्रत्येकाच्या देहात आहे व तो मनाने आक्रमण करावयाचा आहे. मानवदेहातच रामनाम आहे. परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या चार वाचांच्या पलीकडे नाम आहे.

## मनोमाळा

रामनामाचा मार्ग मनाने आक्रमावयाचा आहे, म्हणजे मनोमाळेने रामनामाचे स्मरण करावयाचे आहे. ही मनोमाळा कशी वापरावयाची? मन हे संकल्पविकल्पात्मक आहे. संकल्पात राम आणि विकल्पात राम असे असले की मनोमाळा जमली. हीच रामकृष्णमाळा, हाच अंतरीचा जप. हा जप जमला की संसाराचा ससेमिरा सुटतो; द्वैताचा लय होऊन, अद्वैताची प्राप्ति होते.

## सत्संगतीने ईश्वरदर्शन

सत्संगतीने ईश्वरदर्शन होते. पण सत्संगतीचा अर्थ नीट जाणून घेतला पाहिजे. सत्संगति म्हणजे सत् नामाची समगति होय, हे संतसद्‌गुरु साधकाला स्पष्ट करून सांगतात. या समगतीत हरीचा आठव झाला की देहाचा देहभाव नष्ट होतो. देहभाव लयाला जाऊन उन्मनी अवस्था लागते; तेथेच आत्म्याचा साक्षात्कार होतो.



## नाम तत्त्वरूप आहे

ज्या नामाने राम हातात येतो, ते नाम तत्त्वरूप आहे. ते अनित्य नसून नित्य आहे. ते आपल्या देहात अखंडपणे स्फुरत असते. इडा, पिंगला व सुषुम्ना या तीन्हींचे ऐक्य झाले की तत्त्वरूप नाम हाती येते.

## नाम गतिरूप आहे

नाम तत्त्वरूप आहे, म्हणजेच ते नाम गतिरूप आहे. रामनामाची ही गति प्रत्येकाच्या देहात प्रचीतीस येते. रामनामाची ही गति सद्‌गुरु साधकाला दाखवून देतात.

ही नामगति म्हणजेच नामोच्चारण म्हणजेच नामाचा जप होय. या गतीकडे लक्ष नसले म्हणजे तितकी गति म्हणजे तितका जप वाया गेला. नामाच्या गतीवर लक्ष केंद्रीभूत झाले की तितका जप झाला. नरदेहात आल्यावर हाच जप साधावयाचा आहे, त्यानेच कार्यभाग व्हावयाचा आहे.

## परमार्थातील अनुभव

रामनाम गतिरूप आहे. ही गति वायुरूप आहे. या गतीवर लक्ष ठेवणे म्हणजे जप करणे. हे जमू लागले याचाच अर्थ 'रामनामपवन' साधू लागला आणि 'पवन' साधण्याची ही क्रिया जसजशी साधू लागते, तसतसे परमार्थातील विविध अनुभव साधकाला येऊ लागतात. हे अनुभव असे- एक श्वास पवन साधला की मनाला फार समाधान होते. दोन श्वास पवन साधण्याने मन समधातुक होते. चार श्वास पवन साधल्यावर मन हे देहबुद्धिरहित होते. एक पळ पवन साध्य झाला की जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तीनही अवस्थेत मन एकाग्र रहाते. दोन पळे पवन साधला की मनाचे उन्मन होऊन उन्मनी अवस्था लागते. चार पळे पवन साधण्याने दहा प्रकारचे नाद ऐकू येतात. आठ पळे पवन साधला की कामाचा नाश होतो. पंधरा पळे पवन साधण्याने देहातील ब्रह्मांडस्थानात ऊर्ध्वगमन साध्य होते. तीस पळे पवन साधण्याने साधक देहातील ब्रह्मस्थानात पोचतो. एक घटका पवन साध्य झाल्यावर 'सहज' दृष्टीचा लाभ होतो. दोन

घटका पवन साधला की जीव 'ब्रह्मरंध्र' या स्थानातून पुढे सरकतो. चार घटका पवन साधल्यावर, ब्रह्मदेवाचे तारक-स्वरुप आणि भगवान शंकराचे बिंदुरूप दर्शन होते. एक प्रहर पवन साधला की देहधर्म आटून जातात. दोन प्रहर पवन साधण्याने विष्णूचे दर्शन होते. विष्णूचे दर्शन एकदा झाले की मग साधकाचे साधन अहोरात्र चालूच राहते. ही स्थिति साध्य झाली की आपले ध्येय साधलेच. परमात्मा आपल्या हातातच आला. परमात्मदर्शनाने या जीवनातच मुक्ति प्राप्त झाली, अखंड सुख गवसले, जीवनाचे सार्थक झाले.

***

## प्रकरण–१३

## श्रीमामांचे महानिर्वाण

**(इ. स. १९६०-६२)**

श्रीमामांच्या नित्य कीर्तनाचा त्रितप-महोत्सव इ.स. १९६० साली यथासांगपणे पार पडला. आता श्रीमामांचे वय झाले होते. तरुणपणी श्रीमामांनी व्यायाम करून शरीर प्रकृति चांगली राखली होती. पण शरीरावर अपक्षय इत्यादि विकारांचा परिणाम झालेला होताच. इ. स. १९४० पूर्वी त्यांना रक्तदाब जडला होता. घेरी येई म्हणून त्यांनी खुर्चीत बसून कीर्तन करणे सुरू केले होते. त्यानंतर दैनिक साधन, कीर्तन, प्रवचन इत्यादीसाठी बसण्याची क्रिया वाढत गेली आणि व्यायामाचा अभाव नडला. या कारणांनी श्रीमामांना मधुमेहाचा विकार झाला. त्यासाठी पथ्य सुरू झाले. त्यामुळे त्यांची प्रकृति कमजोर होऊ लागली. अशा स्थितीत श्रीमामांना आणखी एक रोग झाला. तो म्हणजे पाठीच्या मणक्यातील क्षय. हेही कमी झाले म्हणूनच की काय श्रीमामांच्या मूत्रपिंडात कॅन्सरची लक्षणेही दिसून येऊ लागली. डॉ. रानडे, डॉ. आपटे यांना तर श्रीमामांच्या पोटात अपेंडिक्स असावा अशीही शंका होती. इतके झाले तरी श्रीमामा डॉक्टरकडे जाण्यास आणि औषध घेण्यास नाखूष होते. मग कुणी प्रकृतीबद्दल विचारले तर त्यांचे उत्तर ठरलेले असे की, मला काही होत नाही. माझी प्रकृति ठीक आहे, हे त्यांचे केवळ बोलणे नव्हते. कारण शरीर म्हणजे आत्मा नव्हे हे श्रीमामांना पूर्णपणे पटले असल्याने, त्यांच्या चेहऱ्यावर रोगामुळे होणाऱ्या वेदनांचा लवलेशही दिसत नसे. ते आपल्या नेहमीच्या रामनामाच्या धूनमध्ये असत. हे सर्व खरे असले तरी त्यांचे शरीरावर वय आणि रोग यांचा परिणाम झालेला होताच.

आणि त्यामुळे त्रितप महोत्सवाचे वेळी त्याची शरीर प्रकृति बेतासबात झाली होती आणि त्रितप महोत्सवानंतर त्यांची प्रकृति भराभर खालावतच गेली.

आता रोज कीर्तन करावयाचे म्हटल्यावर शरीराची साथ आवश्यकच होती. पण श्रीमामांचे विकल झालेले शरीर ही साथ देण्यास असमर्थ ठरू लागले. इतके की नेहमीप्रमाणे खुर्चीत बसून कीर्तन करणे हेही त्यांना जमेनासे झाले. तेव्हा जमिनीवर पसरलेल्या गादीवर बसून आणि भिंतीला टेकून श्रीमामा कीर्तन करू लागले. आणि कीर्तनापूर्वी आणि कीर्तनानंतर श्रीमामा त्या गादीवरच लवंडून विश्रांति घेत. शरीराची कितीही विकलांग स्थिति झाली तरी आपला नित्य कीर्तन करण्याचा नेम चुकवायचा नाही असा श्रीमामांचा ठाम निर्धार आणि निश्चय होता. ''मामा, आता कीर्तन बंद करून तुम्ही विश्रांति घ्या,'' असे जर कुणी सुचविले तर श्रीमामा तत्काळ उत्तर देत ''माझे काहीही होवो. मरेपर्यंत कीर्तन करण्याचे कार्य मी सोडणार नाही,'' आणि हे शब्द श्रीमामांनी खरेच करून दाखविले.

श्रीमामा अशा विकलांग स्थितीत असतानाच इ.इ. १९६१ हे साल उजाडले. या १९६१ साली कृष्णा नदीला महापूर आला. महापुराचे पाणी सांगली गावात शिरले. श्रीमामांच्या घराच्या अंगणातही पाणी भरले. अंगणातील विहीर पुराच्या पाण्याने भरून गेली. तेव्हा काही भक्तांनी श्रीमामांना प्रार्थना केली की श्रीमामांनी जर कृष्णामाईची प्रार्थना केली तर पूर ओसरून जाईल. श्रीमामांनी ते मान्य केले. तेव्हा त्यांनी श्रीमामांच्या हाताला धरून कृष्णा नदीच्या पाण्यात आणले. श्रीमामांनी कृष्णा नदीला नमस्कार केला, एक नारळ व एक रुपया कृष्णानदीच्या पाण्यात सोडला आणि प्रार्थना केली, ''मातोश्री, आम्हां बालकांवर कृपा करा. आणि आपण आपल्या नेहमीच्या पात्रात जावा.'' लगेच पाण्याला उतार पडला.

असे दिसते की या इ. स. १९६१ मध्येच श्रीमामांनी आता फार दिवस या जगात न रहाता या जगाचा निरोप घ्यावयाचा असा निर्णय घेतला होता. आणि श्रीमामांच्या या



निर्याणाच्या पूर्व सूचना काही लोकांना मिळाल्या. त्या अशा :- नारायणराव जोग यांना स्वप्न पडले. त्यांत त्यांना असे दिसले :- काशीमध्ये काशीविश्वेश्वराच्या मंदिरात भगवान् शिवशंकर, निंबरगीकरमहाराज, चिमडमहाराज, कोटणीसमहाराज इत्यादि गुरुमंडळी जमली होती आणि 'श्रीमामांना निजधामाला केव्हा न्यावयाचे' याची चर्चा करीत होती. चर्चेत निश्चित असे काही ठरेना. तेव्हा रघुनाथप्रिय साधुमहाराजांनी याबाबतीत निर्णय घ्यावा, असे ठरले. आणि मग उपस्थित असणाऱ्या साधुमहाराजांनी सहा महिन्यांचा कालावधि दिला (दा.वि.कु., पृ.८९-९०). इ.स. १९६१ साली श्रीमामांचे रामनवमीचे कीर्तन झाले. त्या कीर्तनास परगावचे काही भक्त आले होते. परत निघण्यापूर्वी श्रीमामांचा निरोप घेताना त्यातील श्री. सहस्रबुद्धे हे श्रीमामांना म्हणाले, ''मामा, आता आपले दर्शन पुढील वर्षी होणार''. यावर श्रीमामा म्हणाले ''अहो, एक वर्षाची काय शाश्वती! आत्ता झालेली ही भेटच लक्षात ठेवा.'' काही लोकांना घरात असणाऱ्या श्रीमामांच्या फोटोची फक्त फ्रेमच दिसली आतील फोटो दिसलाच नाही (अकी, पृ.१३३, दाविकु, पृ. ९१). श्रीमामांच्या एक भक्त सौ. इंदिराबाई वाटवे श्रीमामांना म्हणाल्या, ''मामा, तुमच्या मुखातून दासबोधावरील प्रवचने ऐकण्याची इच्छा आहे.'' त्यावर श्रीमामा म्हणाले, ''ते आता जमणार नाही. माझा रामजी (मामांचे चिरंजीव) पुढे दासबोध सांगेल, तो तुम्ही ऐका'' (अकी, पृ.१३४). नागनूर आडनावाच्या एक बाई या श्रीमामांच्या कीर्तनास येत असत. घरच्या गरीब परिस्थितीमुळे त्यांना कामे करावी लागत. त्यांत वेळ जात असल्याने, त्यांना कीर्तनास येणे जमेना, तेव्हा त्या श्रीमामांना म्हणाल्या, ''मामा, हल्ली मला रोज तुमच्या कीर्तनास येणे कामाच्या व्यापामुळे जमत नाही. त्यामुळे आमच्या घरीच असणाऱ्या औदुंबर वृक्षाला तुमचे स्मरण करून मी एक प्रदक्षिणा घालते.'' त्यावर श्रीमामा त्यांना म्हणाले, ''माई, यापुढे मी औदुंबर वृक्षातच विसावा घेणार आहे'' (अकी, पृ.१३४). तसेच आता श्रीमामा श्रीदादांना वरचेवर सांगू लागले, ''रामजी, कोटणीसमहाराजांच्या आज्ञेने आपल्या

घराण्यात कीर्तनाची परंपरा आली आहे. माझ्यानंतर ती तू चालू ठेव. तुझी प्रकृति अशक्त आहे. तरी तू रोज पाच मिनिटे का होईना नेम म्हणून कीर्तन करीत जा. चुकू नको'' (अकी, पृ.१३७).

श्रीमामांच्या अशाच विकल परिस्थितीत इ.स. १९६२ हे वर्ष आले. दरवर्षी पौष महिन्यात वद्य प्रतिपदा ते वद्य षष्ठी या दिवसांत श्रीमामांचे कीर्तन गंगाधर सिंगांच्या हनुमान् समाधिमंदिरात होत असे. पण या वर्षी देहाच्या अपंगतेमुळे प्रत्यक्ष तेथे जाऊन कीर्तन करणे हे श्रीमामांना अशक्य झाले. श्रीमामांचे मन कीर्तनास जाण्यास उत्सुक होते पण शरीर तयार नव्हते. अशा परिस्थितीत, पौष वद्य षष्ठीला नेहमीप्रमाणे आपल्या मंदिरात श्रीमामांचे कीर्तन व्हावे असे कोटणीसमहाराजांनाच वाटले आणि तसे त्यांनी घडवून आणले. त्यांनी गंगाधर सिंगांना प्रेरणा दिली ''गंगाधर, तू बापूरावजींच्या घरी जा. त्यांना खुर्चीत बसवून आणि उचलून इथे मंदिरात आण आणि माझ्या पुढे त्यांचे कीर्तन करवून घे.'' तेव्हा गंगाधरराव, सोनोपंत लागू (दावि, पृ. ८६) इत्यादींनी पाच सहा तगडी माणसे आपल्या बरोबर घेतली आणि ते श्रीमामांच्या घरी आले, आणि म्हणाले, ''बापूराव, तात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या प्रेरणेनुसार आम्ही आलो आहे. एका खुर्चीत तुम्हाला बसवून, खुर्ची उचलून तुम्हाला आज आम्ही हनुमान समाधि मंदिरात नेणार आहोत. कोटणीसमहाराजांच्या प्रतिमेसमोर आज तुमचे कीर्तन व्हावे अशी कोटणीसमहाराजांचीच इच्छा आहे. तुम्ही नाही म्हणू नका.'' यावर श्रीमामा काय बोलणार? आपल्या मनातील इच्छा पुरी होत आहे याचा त्यांना आनंद झाला. आणि मग खुर्चीत बसलेल्या श्रीमामांना उचलून अलगदपणे हनुमान समाधिमंदिरात नेण्यात आले आणि तेथे श्रीमामांचे कीर्तन सुरू झाले.

कीर्तनाच्या विवरणास श्रीमामांनी पुढील अभंग घेतला होता :-

**अहो हनुमंत षष्ठी । करती स्वानंदाची पुष्टी ।।१ ।।**
**षडैश्वर्य देऊन । करिती भक्तांचे रक्षण ।।२ ।।**
**गोविंदासी नेमी । आणिती गंगाधर स्वामी ।।**


हा अभंग श्रीमामांना तिथल्या तिथे स्फुरला होता.

श्रीमामा कीर्तन करीत नसून जणु कोटणीसमहाराजच कीर्तन करीत आहेत, असे काही श्रोत्यांना वाटले (दा.वि., पृ. ८७). श्रीमामा कीर्तनात म्हणाले ''खरेच मी परमार्थातला एक साधा भक्त आहे. पण आज कोटणीसमहाराजांनी माझे कौतुक केले आहे. आणि त्यांनी मला येथे आणवून घेतले. त्यांचा मोठेपणा अगाध आहे. त्यांचे उपकार मी कोणत्या तोंडाने मानणार? असो. आज घडले ते केवळ श्रीकोटणीसमहाराजांच्या इच्छेने. यापुढे मी शरीराने येथे येऊन कीर्तन करू शकेन असे मला वाटत नाही. त्यामुळे पुढील वर्षी पौष वद्य षष्ठीला हनुमान समाधिमंदिरात माझे कीर्तन होणार नाही''. श्रीमामांचे शब्द खरे ठरले. पौषानंतरच्या माघ महिन्यातील शुद्ध नवमीला श्रीमामांनी महाप्रयाण केले.

हनुमान समाधिमंदिरातील हे शेवटचे श्रीमामांचे कीर्तन संपल्यावर, त्यांना पूर्वीप्रमाणेच खुर्चीत बसवून आणि उचलून श्रीमामांच्या घरी नेण्यात आले. घरी पोचल्यावर गंगाधरराव सिंग श्रीमामांना म्हणाले, ''बापूरावजी, मला वाटते की आज तुम्ही 'मौज दिसती रे' हा अभंग म्हणावा.'' ''ठीक आहे'' असे म्हणून श्रीमामांनी टाळ्या वाजवीत तो अभंग म्हटला. मग श्रीमामांचा नेहमीचा दिनक्रम सुरू झाला. श्रीमामांनी कीर्तनाची टिपणे करण्याचे काम सुरू केले होते, तेही सुरू झाले.

याच स्थितीत वरील पौष महिन्यानंतरचा माघ मास उजाडला. या महिन्याच्या कीर्तनाची टिपणे सुरू झाली होती. शनिवार माघ शुद्ध सप्तमी आणि रविवार माघ शुद्ध अष्टमी या दोन दिवसांची कीर्तनाची टिपणे लिहून झाली. सोमवार माघ शुद्ध नवमीला कीर्तनासाठी पुढील अभंग सांगितला :- मूळ स्वभाव गुरुनाम । श्रीराम जयराम जयजय राम ।१।। अहंकाराच्या अभावे । देव होशील स्वभावे ।।२।। गोविंद म्हणे स्वस्वभाव । जीवा सोडी रे अभाव ।।३।। पण या अभंगाची टिपणे श्रीमामांनी सांगितली नाहीत. आणि 'अभंगाचे

विवरण रामजी करेल'' असे श्रीमामा बोलले. यावरून माघ शुद्ध नवमीला (इ. स. १९६२) देह ठेवण्याचे श्रीमामांनी ठरविले होते, हे कळून येते.

माघ शुद्ध नवमीला श्रीमामांनी निर्वाण करावयाचे जे ठरविले होते, त्याचा एक सोहळाच झाला. या सोहळ्याचा प्रारंभ माघ शुद्ध सप्तमीपासून सुरू झाला. माघ शुद्ध सप्तमी, शनिवार, या दिवशी श्रीमामांचे रोजचे संध्याकाळचे कीर्तन झाले. त्यानंतर का कोण जाणे श्रीमामांनी रात्री आणखी एक कीर्तन केले. हे कीर्तन संपताच श्रीमामांना बेसुमार ताप भरला. रात्रभर श्रीमामा तापाने फणफणत होते. कशीतरी रात्र संपली. दुसरे दिवशी माघ शुद्ध अष्टमी, रविवार. या सबंध दिवसात श्रीमामांचा ताप उतरलाच नाही. याच दिवशी श्रीदादांनाही फ्ल्यूचा ताप आला. तेही झोपूनच होते. तथापि स्वतःच्या अंगात ताप असतानाही श्रीदादा काही वेळ श्रीमामांचे जवळ येऊन श्रीमामांच्या कपाळावर हात फिरवीत बसत. त्यांनी काही वेळ श्रीमामांचे मस्तक आपल्या मांडीवर घेतले. त्यावेळी श्रीदादांना श्रीमामांच्या नयनांत चमचमणारे नील तेज दिसले. तापामुळे श्रीदादांना जेव्हा अगदीच बसवेनासे झाले तेव्हा ते श्रीमामांचे जवळून उठून आपल्या अंथरुणावर जाऊन झोपले.

या रविवारी डॉक्टरांना घरी बोलावण्यात आले. ते येत जात होते आणि श्रीमामांचे शरीरावर औषधे, इंजेक्शने यांचा प्रयोग करीत होते. पण श्रीमामांचे वर त्यांचा फारसा परिणाम दिसून येत नव्हता. भक्तमंडळी श्रीमामांच्या घरी काळजीने जमली होती.

माघ शुद्ध अष्टमी रविवार, या दिवशी संध्याकाळचे पाच वाजले. पाच ही श्रीमामांच्या नित्य कीर्तनाची वेळ. पाच वाजताच श्रीमामा कीर्तन करण्यास उठू लागले. तेव्हा शेजारी बसलेले बापूराव गोडबोले श्रीमामांना बोलले, ''मामा आज तुम्हाला गादीवर बसूनसुद्धा कीर्तन करणे जमेल असे दिसत नाही. तेव्हा तुम्ही गादीवर झोपल्या झोपल्याच कीर्तन करा.'' ते म्हणणे श्रीमामांना पटले. त्याप्रमाणे गादीवर निजल्या निजल्या अवस्थेतच श्रीमामांनी कीर्तन केले. या



कीर्तनात स्पष्टीकरणाचा अभंग होता :- एक भावे मुख्य कामी सावधान । दया क्षमा पूर्ण शांति जेथे ।।१ ।। टाकी धावे देव मूळ स्वभाव नाम । त्याचा योगक्षेम देवकृपे ।।२ ।। मनाचे सामर्थ्ये होई मायातीत । जाणती पंडित मर्म खूण ।।३ ।। दास म्हणे तया नाही काळ भय । अंतरी अभय नामयोगे ।।४।। या अभंगाचे विवरण करताना 'सतीचे वाण' कसे असते ते श्रीमामांनी सांगितले. श्रीमामांच्या कीर्तनाचा नित्य नेम हे सुद्धा एक प्रकारचे सतीचे वाणच होते (अकी, पृ.१३९).

रविवारचे कीर्तन संपल्यावर श्रीमामांनी मौन धारण केले. त्यांचे मन देवाकडेच होते. रात्र चढत चढत गेली. रात्रीचे बाराचा सुमार झाला. त्यावेळी श्रीमामांच्या शेजारी सखारामनाना जोगळेकर जागत बसून होते. अचानक श्रीमामांनी त्यांना विचारले, ''नाना, आज वार कुठला आहे?'' ''आज रविवार आहे. आत्ता बारा वाजायला आले आहेत.'' असे नाना जोगळेकरांनी उत्तर दिले. त्यानंतर ''आनंदू रे की परमानंदू रे'' हे पद म्हणण्यास श्रीमामांनी प्रारंभ केला. पद म्हणून झाल्यावर श्रीमामांनी पुनः मौन धारण केले.

रविवारची पहाट झाली. सौ. इंदिराबाईसुद्धा श्रीमामांच्या संनिधच बसल्या होत्या. त्यांनी श्रीमामांना म्हटले, ''अहो, तुम्ही कोटणीसमहाराजांचे फोटोकडे पाहिलेत ना?'' श्रीमामा म्हणाले ''अग, तो कोटणीमहाराजांचा फोटो आहे. ''दासा ह्रदयी हनुमान'' असल्याने खरे म्हणजे माझ्या ह्रदयातच कोटणीसमहाराज आहेत.'' श्रीमामांच्या घरी जमलेल्या भक्तमंडळींच्या दृष्टीने ती रात्र भयाण तसेच भयानक होती. पण श्रीमामा मात्र मौन धारण करून आत्मानंदात निमग्न झाले होते.

रविवार माघ शुद्ध अष्टमीची रात्र संपली. सोमवार उजाडला. हा सोमवार म्हणजे माघ शुद्ध नवमीचा दिवस.श्रीमामांचा ताप गेला होता. त्यांचा चेहरा पूर्ववत् झाला होता. श्रीमामांची प्रकृति फारच खालावली आहे हे कळल्यावर सकाळपासूनच मामांच्या घरात भक्तांची गर्दी झाली होती. हे लोक पुनः कोठे

गेले नाहीत. त्यांनी स्वयंस्फूर्तीने रामनामस्मरण सुरू केले होते. ''जय जय श्रीराम जय जय श्रीराम'' असा नामाचा घोष चालू होता. सकाळीच डॉक्टर आले. त्यांनी श्रीमामांना तपासले. त्यांना श्रीमामांच्या जगण्याची काहीच आशा दिसली नाही. कारण श्रीमामांच्या सर्व नाड्या सुटल्या होत्या. तेव्हा डॉक्टर म्हणाले, ''दुपारी दोन वाजेपर्यंत आम्हाला बोलावू नका. तोपर्यंत आहे तोच उपचार चालू राहू दे.'' असे सांगून डॉक्टर निघून गेले. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा होता की दुपारी २ पर्यंत श्रीमामा तग धरू शकणार नाहीत. बिचारे डॉक्टर. त्यांना परमार्थाचे सामर्थ्य काय कळणार?

हळु हळु वेळ जात होता. आणि दुपारचे दोन वाजले. श्रीमामा आहेत तसेच होते. तेव्हा डॉक्टरांचे बोलणे आठवल्यावर, दुपारी २ वाजल्यानंतर डॉक्टरना पुनः बोलावणे करण्यात आले. ''श्रीमामा अजून आहेत'' हे ऐकल्यावर चकित झालेले. डॉ. फडणीस आले आणि म्हणाले, ''हे अघटितच घडले आहे.'' डॉक्टर दुसरे काय म्हणणार?

याच सुमारास कान्हेरे बुवा हे श्रीमामांच्या दर्शनास आले होते. श्रीमामांनी डोळे उघडले. श्रीमामांच्या डोळ्यात कान्हेरे बुवांना निळी ज्योत दिसली. ती पाहून ते आश्चर्यचकित झाले. असे दिसते की यावेळी प्रभु श्रीराम आणि श्रीमामा यांचा जो संवाद झाला तो कान्हेरे बुवांना ऐकू आला. प्रभु श्रीराम:- ''गोविंदा, तुला निजधामास येण्याचा दिवस आला आहे.'' श्रीमामा :- ''या महिन्यातील गुरुतृतीयेचा दिवस पाहण्याची माझी इच्छा होती.'' प्रभु श्रीराम''अरे, तू आणि गुरु एकच आहात. तेव्हा आता मुदत मागू नको. लौकर गुरुरूप हो'' (अकी, पृ.१४१).

नेहमीप्रमाणे काळ पुढे पुढे सरकत होता. सोमवार संध्याकाळचे पाचचे ठोके घड्याळात पडले. ते ऐकताच श्रीमामांनी ताड्‌दिशी डोळे सताड उघडले कारण त्यांच्या नित्य कीर्तनाची वेळ झाली होती. श्रीमामांच्या डोळ्यांत निळा प्रकाश चमकला. तो श्रीदादा इत्यादींना दिसला. ''म्हणा श्रीराम जय राम जय जय राम'' असे श्रीमामा तार स्वरात म्हणाले. श्रीमामा इतक्या मोठ्यांदा म्हणाले की अंगणातील विहिरीपर्यंत बसलेल्या सर्व भक्तांना तो मंत्र ऐकू आला. ''श्रीराम जय राम जय जय राम'' हा श्रीमामांचा लाडका मंत्र होता. तो म्हणा असे श्रीमामांनी म्हटल्यावर लोकांनी ''जय जय श्रीराम जय जय श्रीराम'' हा घोष बंद केला आणि सर्वजण ''श्रीराम जय राम जय जय राम'' हा तेरा अक्षरी महामंत्र म्हणू लागले.



पेटी, तबला इत्यादि उपाधीसह असणारे कीर्तन हे बाह्य कीर्तन होय. ज्या कोटणीसमहाराजांनी श्रीमामांना कीर्तन करण्याची आज्ञा दिली होती, ते सांगतात की, ''अखंडित वाचे श्रीराम स्मरण । हेचि पै कीर्तन दासलागी ।।'' कोटणीसमहाराजांच्या या वचनानुसार ''श्रीराम जय राम जय जय राम'' या नामाचा उच्चार करून श्रीमामांनी माघ शुद्ध नवमीचे कीर्तन केले. आणि अखेरच्या दिवसापर्यंत कीर्तन करण्याचा आपला निश्चय पार पाडला. शरीर विकल झाले असले तरी श्रीमामांच्या आत नामस्मरण चालू आहे आणि तेच त्यांच्या मुखांतून बाहेर पडले, हे सर्व उपस्थित लोकांना कळून आले.

सोमवार सकाळपासून श्रीमामांच्या नाड्या सुटलेल्या असल्याने त्यांची अधिक जगण्याची आशा डॉक्टरांनीही सोडली होती. तथापि आध्यात्मिक जीवन हे वेगळेच असते. अध्यात्माच्या जोरावर श्रीमामांनी संध्याकाळी पाच वाजता नामस्मरण करून कीर्तनाचा नेम पार पाडला.

यावेळी श्रीमामांचे चिरंजीव श्रीदादा हे तापाने आजारी असल्याने ते झोपून होते. म्हणून लौकिकाच्या दृष्टीने कीर्तन व्हावयास हवे होते. श्रीमामांचे एक भक्त वासुदेवराव जोशी यांनी हे लौकिक कीर्तन केले. या कीर्तनात त्यांनी श्रीमामांचा मोठेपणा वर्णन करून सांगितला. कीर्तन संपताच नाना जोगळेकर, बंडोपंत गोडबोले, दादा कुलकर्णी, येसूताई फडके, करंदीकर काकू इत्यादि जमलेल्या अनेक स्त्रीपुरुषांनी पुनः 'श्रीराम जयराम, जय जय राम' या मंत्राचा घोष सुरू केला (गोचमा, पृ.१३२) (दावि, पृ. ९८).

संध्याकाळ संपली. रात्र सुरू झाली. रात्रीचे अकरा वाजले, साडे अकरा वाजले, आणि पावणे बाराचा समय झाला. श्रीमामांचे प्रत्यक्ष निर्वाण जवळ आले होते. श्रीदादांनी श्रीमामांचे मस्तक आपल्या मांडीवर घेतले (दा.वि.पृ.९९). परमेश्वर श्रीमामांना हळुहळु आपल्या जवळ घेत होता. तितक्यात कुणीतरी श्रीमामांच्या छातीला हात लावून पाहिला. श्रीमामांच्या हृदयाची धडधड थांबली होती. घड्याळात ११-५० वाजले होते. झाले! संपले! श्रीमामांचे लौकिक जीवन शेवटास गेले! श्रीमामांची आत्मज्योत परमात्मज्योतीत मिसळून गेली.

श्रीमामांच्या कलेवरा भोवती ''श्रीराम जय राम जय जय राम'' हा घोष रात्रभर चालू होता. सकाळ झाली. सर्व वातावरण शोकाकुल होते. पण पुढील गोष्टी टाळता येत नाहीत. श्रीमामांच्या अंत्य यात्रेची तयारी सुरू झाली. अण्णा देवधर यांनी श्रीमामांची पंचारती केली. मग श्रीमामांची पालखी चौघांच्या खांद्यावरून अगदी साधेपणाने निघाली. नदीकाठच्या हनुमान् समाधि मंदिराजवळ पालखी आली. तेथे गंगाधरराव सिंग, सोनोपंत लागू इत्यादींनी श्रीमामांची आरती केली (गोचमा, पृ.१३५). आरती झाल्यावर अंत्य यात्रा अमरधामच्या स्मशानभूमीत शिरली. तेथे रचलेल्या चितेवर श्रीमामांचे निष्प्राण शरीर ठेवण्यात आले. भटजी और्ध्वदेहिक मंत्र उच्चारीत होते. भटजी सांगतील तसे श्रीदादा करीत होते. श्रीमामांच्या प्राणरहित देहाला मंत्राग्नि देण्यात आला.

चिता धडधडत असताना लक्षात रहाण्यासारखा एक प्रसंग घडला. सांगलीत त्यावेळी पांडुरंगमहाराज ताम्हनकर हे अवधूतपंथी संत रहात होते. श्रीमामा निजधामाला गेले त्यावेळी ते आजारी होते. श्रीमामांच्या आजारपणातही ते श्रीमामांना पहाण्यास येऊ शकले नव्हते. ते श्रीमामांचे चहाते होते. ते श्रीमामांना मानणारे होते. ते श्रीमामांना एकनाथांचा अवतार म्हणत. श्रीमामांच्या निर्वाणाची वार्ता त्यांच्या कानांवर गेली. त्यांना घरी राहवले नाही. ते तसेच धडपडत उठले आणि अडखळत अडखळत कृष्णानदीच्या तीरावरील अमरधामात आले. त्यांनी पेटलेल्या चितेला एक प्रदक्षिणा घातली आणि चितेपुढे साष्टांग नमस्कार केला.



चिता धगधगू लागल्यावर काही लोकांनी श्रीमामांचे गुण आणि महिमा वर्णन करणारी भाषणे केली. दत्तोपंत बापट वकिल म्हणाले, ''श्रीमामा हे सांगली शिक्षण संस्थेचे आजीव सदस्य होते आणि ते उत्तम शिक्षक होते. ते सद्गृहस्थ, गुरुभक्त आणि कीर्तननिष्ठ होते'' (गोचमा, पृ.१३८). मोरोपंत कुलकर्णी यांनी सांगितले ''श्रीमामांनी आता निरंजनी घर केले आहे. ते आता आपणांमध्ये नाहीत. तरी त्यांनी आपणासाठी निर्मल चारित्र्याचा आदर्श ठेवला आहे'' (गोचमा, पृ. १३८). पंडितराव दांडेकर उद्गारले, ''संत हे सामान्य जनांना आधार असतात, आणि ते मार्गदर्शक असतात. ते पाठीशी असले की यशप्राप्ति होते. त्यांच्या योगे राष्ट्राची उन्नति होते. अशा एका संतांचा-श्रीमामांचा-आधार आज सुटला (गोचमा, पृ. १३८). श्री. जामदार म्हणाले, ''देव ज्याच्यावर संतुष्ट होता असा श्रीमामा हा सांगलीचा संत आज गेला'' (गोचमा,पृ.१३८).

***

## प्रकरण–१४

## श्रीमामांच्या महानिर्वाणानंतर

श्रीमामांच्या महानिर्वाणानंतर त्यांच्या निर्याणाची वार्ता वर्तमानपत्रांत आली. परगावच्या श्रीमामांच्या ज्या चहात्यांनाही श्रीमामांच्या निर्वाणाची वार्ता कळली त्यातील सोनोपंत दांडेकर इत्यादि काहींची श्रीदादांना सांत्वनपर पत्रे आली (गोचमा,१३९). तसेच काही परगावचे आणि काही स्थानिक लोक हे श्रीमामांचेकडे समक्ष येऊन श्रीदादांचे सांत्वन करून गेले. त्यातील काहींचा निर्देश येथे केला आहे. प्रा. ऐनापुरे, चित्रकार जि. भि. दीक्षित, प्रा. दामले, गुरुसिद्द्प्पामहाराज, पुरुषोत्तम दामोदर जोशी, बाबूराव करमरकर, वासूनाना आपटे, बाबूराव आगरकर, मणेश्वर अत्रे, शंभुराव इनामदार, अनंतराव जोशी, सीताराम बापू करंदीकर, कृष्णाजीपंत चिंचोरे, लक्ष्मणबुवा निजामपुरकर, श्रीमंत वाडीकर, गोविंदमहाराज वाटेगावकर, इत्यादि (गोचमा, पृ.१४०).

श्रीमामांच्या दहन संस्कारानंतर तिसरे दिवशी अस्थिसंचयन झाले. सर्व अस्थि काळजीपूर्वक गोळा करण्यात आल्या. दहावे दिवशी पिंडदान झाले. श्रीमामा परमार्थात पूर्ण झाले असल्याने त्यांची कोणतीच इच्छा राहिली नव्हती. काकस्पर्श पिंडाला लगेच झाला. पण तत्पूर्वी श्रीदादा म्हणाले की तुमच्या इच्छेप्रमाणे मी नित्य कीर्तनाचा नेम चालवीन.

ज्या श्रीमामांनी श्रीदादांचे लाड पुरविले, ज्या श्रीमामांनी श्रीदादांचा प्रेमाने



प्रतिपाळ केला, ज्या श्रीमामांनी अनेकदा श्रीदादांच्या वचनांस मान दिला, ज्या श्रीमामांनी श्रीदादांचे 'रामस्वरूप' जाणले होते, जे श्रीमामा श्रीदादांना 'घरात वावरणारा रामप्रभु' असे म्हणत, ते श्रीमामा लौकिक अर्थाने श्रीदादांना सोडून गेले. त्यांचे पितृछत्र हरपले, ते पोरके झाले. मनुष्य गेला तरी व्यवहार अडून रहात नाही. त्याप्रमाणे श्रीदादांचे व्यवहार सुरू झाले. त्यामध्ये श्रीमामांचे प्रमाणे नित्य कीर्तन. आपल्या निर्याणापूर्वी अनेकदा श्रीमामा श्रीदादांना म्हणाले होते, ''रामजी, तात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या आज्ञेने आपल्या केळकर कुळात नित्य कीर्तन करण्याची परंपरा आली आहे. ती तू पुढे चालवावयास हवी. मला माहीत आहे की तुझी प्रकृति अशक्त आहे. तथापि तू नित्यनेम म्हणून रोज पाच मिनिटे का होईना नित्य कीर्तन चालू ठेव.'' श्रीमामांचे हे वचन श्रीदादांच्या चांगलेच लक्षात होते. त्यामुळे श्रीमामांच्या विरहाचे दुःख बाजूला सारून श्रीदादांनी श्रीमामांच्या निर्याणाच्या दुसऱ्या दिवसापासून म्हणजे माघ शुद्ध दशमी, इ. स. १९६२ पासून आपले नित्य कीर्तन सुरू केले. आणि येथेच हेही सांगण्यास हरकत नाही की श्रीमामांच्या प्रमाणेच श्रीदादांनीही 'कीर्तन, कीर्तन' असा उच्चार करून इ. स. २००१ मध्ये निर्वाण केले.

श्रीमामांची स्मृति सतत रहावी या दृष्टीने श्रीमामांचे एक दृश्य प्रतीक या स्वरूपात श्रीमामांचे एक शिलासिंहासन करून घेण्याचे श्रीदादांनी ठरविले. त्याप्रमाणे कोल्हापूरच्या एका शिल्पकाराकडून त्यांनी काळ्या पाषाणाचे एक वृंदावनवजा सिंहासन तयार करवून घेतले. त्या सिंहासनाचे वरचे दर्शनी बाजूवर निंबरगीकरमहाराजांचे नावाची पिंडी आणि श्रीमामांच्या पादुका आहेत. तसेच या सिंहासनाच्या उभ्या दर्शनी भागावर पुढील मजकूर कोरवून घेतला :-

**।। श्रीरामेश्वर प्रसन्न ।।**
**श्रीहनुमंतप्रभु आज्ञाप्रमाण नित्य हरिकीर्तननिष्ठ**
**ती. प. पू. कै. ह. भ. प.**
**श्रीगोविंद अनंत ऊर्फ श्रीबापूरावजी केळकर**
**यांनी एकही दिवस खंड न होता निर्याणापर्यंत**
**ज्या ठिकाणी ३८ वर्षे अखंड कीर्तन केले,**
**त्याच ठिकाणी स्थापिलेले सिंहासन**

**निर्याण** — **श्रींचा बालक**
**माघ शुद्‍ध ९, शके १८८३** — **राम गोविंद केळकर**
**माघ शुद्‍ध १०, शके १८८४**

राममंदिरात ज्या ठिकाणी बसून श्रीमामा कीर्तन करीत, त्याच स्थानी या सिंहासनाची स्थापना केलेली आहे. ''मामांच्या सिंहासनाची प्रतिष्ठापना रथसप्तमी दिवशी (इ. स. १९६३) करण्यात आली असून, त्याच्या प्रतिष्ठापना सोहळ्याचे वेळी आरती चालू असताना, (श्रीमामांचे) समाधीतून (=सिंहासनातून) एका अभंगाच्या पंक्ति बाहेर पडल्या :- नामरूप भगवान । माझा नामरूप भगवान ।। नामरूप सद्‍गुरु कृपा करी । नामचि वरती महान् ।। नामचि साधन नामचि कीर्तन । नामाविण नच ज्ञान ।। पंथही नामची प्राप्तिही नामची ।। दासा तेच प्रमाण ।।'' असा चमत्कार श्री.प्रकाश भावे यांनी आपल्या 'अखंड कीर्तनानंद' (पृ. १५२) या ग्रंथात नोंदवून ठेवला आहे. तसेच मध्व नवमी, दासबोध जयंती आणि भीष्माष्टमी या दिवशी हाच अभंग श्रीमामा समईच्या प्रकाशात म्हणत आहेत, असे दृश्य श्रीदादांना दिसले (अकी, पृ.१५३).

सिंहासनाची स्थापना झाल्यावर, वरचे बाजूस भिंतीवर श्रीमामांचे मोठे तैलचित्र फ्रेममध्ये बसवून लावण्यात आले. हे चित्र मामांचे एक भक्त सुप्रसिद्‍ध चित्रकार जि. भि. दीक्षित यांनी तयार केले.



श्रीमामांच्या पत्नी इंदिराबाई यांनी हे सिंहासन पाहिले व त्याचेवरून आपला हात हळुवारपणे फिरवून, त्यांनी जणु श्रीमामांच्या स्पर्शाचे सुख अनुभवले. त्यांच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रु वाहू लागले.

रोजची देवपूजा झाल्यावर या सिंहासनाची पूजा करण्याचा क्रम श्रीदादांनी सुरू केला.

श्रीमामांच्या निर्याणानंतर काही दिवसांनी इंदिराबाईंच्या स्वप्नात श्रीमामा आले. ते काहीतरी लिहीत होते. इंदिराबाईंनी विचारले, ''अहो, आत्ता तुम्ही काय लिहीत आहात?'' श्रीमामा उत्तरले, ''अग, आपणांकडे रोज कोण कोण येत होते त्यांची यादी मी करतोय. माझ्या निजधामाला जाण्याच्या गडबडीत त्यांना नमस्कार करावयाचा राहून गेला. आता, हा खडीसाखरेचा पुडा मी देवापुढे ठेवतो. त्यांतील एकेक खडा प्रत्येकाला दे, आणि त्याला माझा नमस्कार सांग'' (अकी, पृ. १५१).

श्रीमामांचे महानिर्वाणानंतर लगेचच त्यांचे एक निष्ठावान भक्त श्री. न. दा. दिवेकर, बी. ए. बी. टी. यांनी स्वयंस्फूर्तीने श्रीमामांचे ओवीबद्‍ध चरित्र लिहिले. ते त्यांनी इंदिराबाई व श्रीदादा यांना वाचून दाखविले. त्यानंतर काय घडले हे श्रीदादांच्या पुढील अभंगात गोविलेले आहे :-

**एकदा माझिये स्वप्नी मामा आले । बहुपरी झाले बोलणे त्यांचे ।।१ ।।**
**अण्णांनी चरित्र लिहिले हे कथिले । तव ते म्हणाले ऐकिले की ।।१ ।।**
**'नरहरीचे तसे आहेच' म्हणोनि । रंगले कीर्तनी हनुमंतसेवे ।।३ ।।**
**बालरामा नाही वाटले ते स्वप्न । मागुते कळोन आले त्यासी ।।४ ।।**

(गोचमा, पृ. १४७).

श्रीमामांच्या पूर्वी मरण यावे अशी इंदिराबाईंची इच्छा होती. पण तसे होणार नव्हते हे त्यांना माहीत होते. तथापि श्रीमामांच्या निर्वाणाने त्यांना फार मोठा धक्का बसला. त्यांनी हाय खाल्ली. आधीच त्यांची प्रकृति यथायथा झालेली होती; त्यांचे जेवणखाण कमी झाले होते. त्यात हा धक्का बसल्याने त्यांची

प्रकृति खालावत गेली. श्रीदादांनी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण इंदिराबाईंचे वर काहीही परिणाम झाली नाही. ''आता मला जगण्याची मुळीच इच्छा नाही'' असे त्या वरचेवर म्हणू लागल्या. अखेर श्रीमामांच्या निर्वाणाला एक वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच माघ शुद्ध चतुर्थी, शके १८८४ (इ. स. १९६३) रोजी दुपारी ३-५० च्या सुमारास, तुकाराममहाराजांचे बारा अभंग म्हणत, त्यांनी देहत्याग केला. आईच्या निर्याणाने श्रीदादांना परमावधीचे दु:ख झाले. पण ते तात्पुरते बाजूला सारून, श्रीदादांनी त्या दिवशीचे आपले नित्याचे कीर्तन पार पाडले.

श्री. दिवेकर यांनी लिहिलेले श्रीमामांचे चरित्र मुद्रणालयात छापण्यास गेले होते. मुद्रण पूर्ण होण्यापूर्वीच इंदिराबाईंचे निर्याण झाले. तेव्हा त्यांची थोरवी गाणारा एक ओवीबद्ध अध्याय दिवेकरांनी रचला आणि तो श्रीमामांच्या चरित्रात शेवटचा चौदावा अध्याय म्हणून जोडून दिला. अशा प्रकारे श्रीमामा व इंदिरा या पतिपत्नीचे जोड चरित्र 'गोविंद-चरित-मानस' या शीर्षकाखाली १९६३ मध्ये प्रकाशित झाले.

पितृवियोगानंतर एक वर्षाच्या आतच श्रीदादांना मातृवियोग सोसावा लागला. लौकिक दृष्ट्या हे दोन्ही वियोग श्रीदादांना क्लेशदायक होते. परंतु हा शोक बाजूला सारून श्रीदादांनी आपले पारमार्थिक कार्यक्रम आणि नित्याच्या कीर्तनाचे व्रत चालूच ठेवले.

श्रीमामांच्या आज्ञेप्रमाणे माघ शुद्ध दशमीपासून श्रीदादांनी नित्याचे कीर्तन सुरू केले होतेच. याखेरीज श्रीमामा कीर्तनाखेरीज जे अन्य काही दैनिक कार्यक्रम करीत, तेही करण्यास श्रीदादांनी प्रारंभ केला. जसे:- सकाळची देवपूजा, दासबोधातील नामाच्या समासाचे पठण व आरती; दुपारी कीर्तनापूर्वीचे दासबोध इत्यादी वरील प्रवचन; कीर्तनानंतर पंचपदी. श्रीमामा नैमित्तिकपणे रामायण व गुरुचरित्र वाचीत; ते वाचनही श्रीदादांनी सुरू केले. खेरीज श्रीमामांच्या कारकीर्दीतल्या प्रमाणे आराधना, पुण्यस्मरण, रथ, पालखी, इत्यादि प्रासंगिक



कार्यक्रमही श्रीदादा पार पाडू लागले.

या नित्य, नैमित्तिक आणि प्रासंगिक कार्यक्रमांच्या जोडीने श्रीदादांनी पुढील नवीन कार्यक्रम सुरू केले :- कीर्तनोत्तर पंचपदीच्या पठणापूर्वी श्रीमामांच्या रामपाठाचे पठण. तसेच साधकाने त्रिकाल साधन करावे, या श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या वचनाप्रमाणे श्रीदादांनी त्रिकाल साधन सुरू केले. तसेच, श्रीमामांची जयंती साजरी करण्याचा उपक्रमही श्रीदादांनी आरंभिला. या जयंतीच्या कीर्तनात श्रीदादा शरयू उपळावीकरला श्रीमामांचा पाळणा म्हणावयास सांगत. हा पाळणा तिलाच स्फुरलेला होता. तसेच श्रीदादा श्रीमामांची वार्षिक पुण्यतिथि साजरी करीत. सकाळी श्रीमामांचे श्राद्ध झाल्यानंतर भक्तांना महाप्रसाद देण्याची प्रथा त्यांनी सुरू केली आणि याच दिवशी नित्याच्या कीर्तनानंतर श्रीमामांच्या निर्याणाच्या वेळेला श्रीदादा श्रीमामांच्या आराधनेचे कीर्तन करीत.

दुसरीकडे आणखी एक घटना घडली. ती अशी:- गंगाधरसिंगांनी कोटणीसमहाराजांचे हनुमान् समाधिमंदिर अगोदरच उभे केले होते. त्याच्या मागील बाजूस एक औदुंबर वृक्ष होता. कोटणीसमहाराजांच्या अस्थि जमिनीत पुरून त्यावर हा औदुंबर वृक्ष लावण्यात आलेला होता. त्याच वृक्षाखाली गंगाधरसिंगांनी श्रीमामांचा अस्थिकलशही पुरून ठेवला (अकी., पृ.१५१).

श्रीमामा विद्यमान असताना त्यांच्या सामर्थ्याचे अनुभव काही भक्तांना आले होते. आणि महत्त्वाचे हे की श्रीमामांच्या निर्वाणानंतरही त्यांच्या सामर्थ्याचे दाखले काही भक्तांना आले. ते आता यापुढे दिले आहेत.

श्री. अनंतराव जोशी (दादर-मुंबई) सांगतात :- इ. स. १९५५ पासून आम्ही गुरुतृतीयेच्या उत्सवासाठी सांगलीस जात होतो. इ.स. १९७० साली असे घडले :- उत्सवाला जाण्यापूर्वीच डॉक्टरकडून परत येताना रस्त्यात एक पाऊलही पुढे पडेना. घर जवळ असून टॅक्सी करावी लागली. पहाटे उठल्यावर श्रीमामांना प्रार्थना केली, ''मामा, मला तुमचे उत्सवाला सांगलीस यावयाचे आहे.'' आणि एकाएकी मला असा उत्साह आला की आम्ही ठरल्याप्रमाणे

निघून सांगलीत उत्सवामध्ये उपस्थित राहिलो.

श्री. शामराव दत्तात्रय शिंदे (सांगली) कथन करतात:- मी इ.स. १९६९ साली आजारी पडलो. जुलाब व उलट्या होऊ लागल्या. बेशुद्ध पडलो. संध्याकाळी शुद्धीवर आलो. मनात गुरुवर्य मामांचे स्मरण केले. मला बरे वाटू लागले. पुढे डोळे फार दुखू लागले. ''मुंबईस जाऊन डोळे नीट तपासून घ्या'' असे मला डॉक्टर म्हणाले. मी अगदी घाबरून गेलो. मामांच्या समाधीला लघुरुद्र करण्याचा विचार केला. आणि आश्चर्य असे की माझे डोळे बरे झाले.

रामभाऊ केळकर मास्तर हे श्रीमामांचे भक्त. श्रीमामांच्या निर्याणाच्या प्रसंगी ते म्हैसाळ येथे नोकरीस होते. त्यावेळी त्यांची पत्नी नवव्या महिन्यात होती. तिला गरोदरपणाचा फार त्रास होत असे. तथापि ती सतत श्रीमामांचे स्मरण करीत असे. एक दिवस तिला स्वप्न पडले. स्वप्नात मामांचे घरचे स्वयंपाकगृहात ती उभी होती. तेथे मामी (= इंदिराबाई) आणि माईसाहेब दांडेकर होत्या. माईसाहेब दांडेकर केळकरांच्या पत्नीला म्हणाल्या, ''कुठे गेले आहेत मामा? ते तर इथेच आहेत. ते पहा आले मामा'' आणि खरेच मामा स्वयंपाकगृहात येत होते. केळकरांच्या पत्नीने त्यांना नमस्कार केला. मामांनी प्रसाद म्हणून तिला साखर दिली आणि सांगितले ''काळजीचे कारण नाही.'' हे स्वप्न पडले कार्तिक शुद्ध ११, १९६२. स्वप्नांनंतर दुसरे दिवसापासूनच केळकरांच्या पत्नीचा त्रास कमी झाला आणि पुढे तिची सुखरूप प्रसूति झाली (दीपलक्ष्मी).

किसनराव भिडे हे बाळू गोखले यांचे मित्र. ज्ञानेश्वरमहाराजांनी श्रीमामांना आळंदी क्षेत्री साक्षात् दर्शन दिले होते हे गोखले यांचेकडून ऐकल्यानंतर, ते श्रीमामांचे रामनिकेतनमध्ये आले. तेथील श्रीमामांचे सिंहासन व त्यावरील श्रीमामांचे चित्र पाहिल्यावर, ते फार आकृष्ट झाले. श्रीमामा आपणास काहीतरी शिकवीत आहेत असे त्यांना वाटले. आणि मग ते रोज श्रीमामांचे दर्शनास येऊ लागले. आणि श्रीमामांच्या विषयी त्यांच्या मनात जबरदस्त श्रद्धा निर्माण



झाली. हे किसनराव भिडे इ. स. १९७० मध्ये आजारी पडले. यातून आपण बरे होऊ असे किसनराव व डॉक्टर या दोहोंनाही वाटेनासे झाले. तेव्हा किसनरावांनी श्रीमामांचा फोटो आपल्या उशाशी ठेवण्यास सांगितले. तसे करताच त्यांच्या दुखण्यास उतार पडला आणि पुढे ते खडबडीत बरे झाले (गोस्मृ).

बाळासाहेब जोशी यांचे पत्नीला अचानक दिसेनासे झाले. जोशींनी ही हकिकत किसनराव भिडे यांना सांगितली. किसनराव त्यांना म्हणाले ''अहो जोशीबुवा, असे करा. मामांचा फोटो ठेवा. त्याच्या दोन बाजूंना दोन उदबत्त्या लावा. आणि मग उदबत्त्यांचा अंगारा तुमच्या पत्नीच्या दोन्ही डोळ्यांना लावा, लगेच त्यांना दिसू लागेल.'' जोशीनी तसे केले आणि त्यांच्या पत्नीला दिसू लागले (गोस्मृ).

सांगलीत रहाणाऱ्या रानडे आत्याबाई दररोज श्रीमामांच्या कीर्तनाला येत. वृद्धावस्था आली म्हणून त्यांच्या भाच्याने त्यांना मिरजेस आपल्या घरी रहाण्यास नेले. त्यावेळी श्रीमामांचे निर्वाण झाले होते. एके दिवशी त्यांना श्रीमामांच्या दर्शनाची फारच ओढ लागली. त्यांच्या बॅगेत दीपलक्ष्मी मासिकाचा मामामहाराज केळकर विशेषांक होता. त्याच्या मुखपृष्ठावरील श्रीमामांच्या फोटोच्या चरणी त्यांनी आपले मस्तक ठेवले आणि त्यांचे देहावसान झाले (अकी, पृ.१२१).

श्री. सखाराम वि. जोगळेकरांचा अनुभव असा आहे :- ''श्रीमामांच्या निर्वाणानंतर त्यांच्या अस्थींचे दर्शन मुंबईतील भक्तांना व्हावे आणि मग त्या अस्थि समुद्रात विसर्जित कराव्यात म्हणून मी काही अस्थि घेऊन मुंबईस आलो. महाशिवरात्रीला समुद्रात अस्थिविसर्जन करायचे होते. माघ वद्य ११ रोजी चेंबूरला माझे स्नेही रावसाहेब सांडू यांना अस्थिदर्शन घडविण्यास मी त्यांच्याकडे गेलो. परत येण्यास रात्र झाली. चेंबूरहून परत येताना दादर टी.टी. पर्यंतची बस मिळाली. त्यावेळी मुंबईत ट्रॅम चालू होती. ट्रॅमने गिरगावला जावे म्हणून ट्रॅमच्या शेडमध्ये उभा होतो. तितक्यात टिळक ब्रिजवरून एक रिकामी लॉरी भरधाव आली आणि ती ट्रॅमचे शेडमध्ये शिरली. मला लॉरीचा धक्का

लागला, मी बाजूला फेकलो गेलो आणि बेशुद्ध पडलो. काही वेळाने मी शुद्धीवर आलो. माझ्या भोवती पोलीस व माणसे जमली होती. माझा उजव्या हाताला दुखापत होऊन रक्तस्राव सुरू झाला होता. पोलिसांनी मला सायन हॉस्पिटलात नेले. तेथे बँडेज वगैरे बांधण्यात आले. माझे नाव पत्ता लिहून घेऊन पोलिसांनी मला सोडून दिले. त्यावेळी माझे मेहुणे प्रा. के. वा. आपटे हे मुंबईला परळच्या पोस्ट ऑफिसजवळ रहात होते. रात्री दोनचा सुमार झाला होता. तेव्हा गिरगावला न जाता मेहुण्यांचेकडे जावे असे मी ठरविले आणि त्याप्रमाणे मी पोलिसांना सांगितले. पोलिसांनी मला आपटे यांचे घरी पोचविले. मी रात्री अचानक आलेला पाहून आपटे व त्यांची पत्नी चकित झाले. मी त्यांना सर्व हकिकत सांगितली. तेथे माझी अधिक काळजी घेण्यात आली. आणि मला चहा देण्यात आला. ''काळ आला होता पण सद्गुरूंचे सामर्थ्याने वेळ आली नव्हती'' हे खरे ठरले. त्याच्या पुढचा प्रकारही महत्त्वाचा आहे. माझा उजवा हात दुसरे दिवशी डॉक्टरला दाखविला. हाताला फ्रॅक्चर आहे असे ते म्हणाले. पण फारसे डॉक्टरी उपाय न करता फ्रॅक्चर बरे झाले. हातात कोणताही दोष नव्हता. हात १५ दिवसात पूर्ववत् झाला.''

***

## प्रकरण-१५

## श्रीमामांच्या संदर्भात भक्तजनांची मनोगते

श्रीमामांच्या पारमार्थिक कार्याबद्दल आदर असणारे श्रीमामांचे अनेक भक्त होते. त्यांना श्रीमामांविषयी काय वाटे हे त्यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले आहे. त्यांची ही मनोगते यापुढे दिलेली आहेत.

### (१)
### पुण्यवंत व्हावे घेता सज्जनांची नावे

**- लक्ष्मण बुवा निझामपूरकर, पुणे**

सज्जनांच्या केवळ स्मरणाने अनंत जन्माची पापे भस्म होतात. (तुका म्हणे पापे जाती संतांचिया जपे). भगवंत सांगतात, ''अर्जुना, ज्या कर्माने माझी प्राप्ती होते ते पुण्य (मातें पाविजे ते शुद्ध पुण्य). ईश्वराला प्राप्त करून देणारे सुकृत एका संतांच्याच संगतीत, उपदेशात आहे. संतांच्याकडे फक्त देवच मिळेल. 'एका जनार्दनी संत । पूर्ण करती मनोरथ ।।' असे अनेकांचे परमार्थाचे मनोरथ ह. भ. प. भगवत्स्वरूप मामा यांनी पूर्ण केले. मी तर अनेक वेळां त्यांचे दर्शनाने समाधानाला पावलो. संपूर्ण आयुष्य ज्यांनी भगवत्सेवेसाठी कीर्तनसेवा करून वेचले, त्यांचे वर्णन व उपकार या वाणीने काय पूर्ण होणार? 'काय द्यावे ह्यासी व्हावे उतराई । ठेविता हा पायीं जीव थोडा ।।'

देवाला आणि भक्तांना एका वेळी आनंद होतो, असे साधन एक कीर्तनच होय. भगवंताच्या आवडीचा विषय आयुष्यभर त्यानी सेविला, त्या आनंदात

आत्मतृप्त झाले व वैकुंठीचा देव वैकुंठीच्या सुखाला न लाचावता श्रीमामांच्या कीर्तनाला लाचावला.

ज्यांनी आपला संसार परमार्थरूप केला, सद्‌गुरुकृपेने अपरोक्ष अनुभूति ज्यांना झाली, ते हे महापुरुष आमचे मामा होत. तेच संसार परमार्थरूप करू शकतात. अद्वैत ज्ञानात 'हा माझा प्रपंच, हा माझा परमार्थ' असे द्वैत उरतच नाही.

'दुजे खंडे जरी, अवघा एकरूप हरी' 'अद्वैतकुसरी विरळा जाणे'

अशी कुशलता आमचे मामांनी अनुभवली.

सर्वेंद्रियांचा विषय एकमेव नारायण ज्यांचा झाला, तेच आत्मतृप्त होत. जन्मभर इंद्रियांना सेवनास कितीही विषय दिले तरी तृप्तीचा अनुभव नाही. त्यापेक्षा सर्वेन्द्रियांना आनंदघन आत्माराम संतकृपेने अपरोक्ष अनुभवता आला तर जीवित धन्य आहे. 'तुका म्हणे धन्य झालो, आजी विठ्ठला भेटलो ।।' ती धन्यता सद्‌गुरुकृपेने प्रपंचात राहून श्रीमामांनी अनुभवली.

'मंथोनी नवनीता तैसा घे अनंता' हे ज्ञानोबा माऊलींचे वचन त्यांनी सार्थ केले, म्हणून त्यांचा महिमा अनुपम आहे. सूर्य, चंद्र, समुद्र यांचीही उपमा त्यांना लागू पडणार नाही. सूर्य ताप देतो; हे तापरहित करतात. चंद्राला कलंक आहे; यांना जन्ममरणाचा कलंक नाही. समुद्र खारट आहे; यांचे चरित्र गोड आहे. समुद्रात भरती ओहोटी आहे; हे सदानंदी निमग्न आहेत. तसेच, 'लोह परिसाची न साहे उपमा, सद्‌गुरुमहिमा अगाध तो'. लोखंडाचा स्पर्श परिसास झाला म्हणजे सोने होईल, पण परिस होणार नाही. पण सज्जनकृपेचे वैभव असे आहे :- स्वीयं साम्यं विधत्ते । (शंकराचार्य) अर्थात 'आपणासारखे करिती तत्काळ, नाही काळवेळ तयालागी'. एका दोहऱ्यात म्हटले आहे- संत बडे परमार्थी सीतल उनका अंग । ताप बुझावत देत हैं सबको अपना रंग ।। जे त्रिविध तापांची होळी करतात, त्या संतांचे उपकार काय वर्णावे? 'काय वानू मी या संतांचे उपकार, मज निरंतर जागविती.' ते बोधाने आम्हास जागे ठेवतात.



'तया उतराई कवण्या गुणे, जन्मा नाही येणे ऐसे केले'

अर्थात् पवित्र ते कुल पावन तो देश । जेथे हरीचे दास जन्म घेती ।। पुण्यश्री मामांची तीच कीर्तन-परंपरा परमप्रेमळ, सत्कुलावतंस, श्रीरामभाऊ चालवीत आहेत. 'शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी'

***

## (२)

## पिकलिया सुखाचा परिमलु

**प्रा. म. अ. कुलकर्णी, कुंभोजकर,** कोल्हापूर

सूर्याच्या अंगाला घासून स्वच्छ करणे शक्य आहे काय? कल्पवृक्षावर फुलांचा साज चढविता येईल काय? क्षीरसागराला कोणत्या पक्वान्नाचा नैवेद्य दाखवावा? कापराला कशाचा सुवास द्यावा? चंदनाला कशाची उटी द्यावी? अमृताला कशाचे भोजन घालावे? आकाशावर मांडव कसा घालावा? तसेच सद्‌गुरुकृपेचा महिमा कोणत्या शब्दांत व्यक्त करावा? असे ज्ञानेश्वरमहाराजांनी जे काही म्हटले आहे, त्याची प्रचीति आज ती. पू. मामांचे संदर्भात काही लिहिताना अथवा बोलताना येते. ती. प. पू. मामांचेसंबंधी काय काय नि किती लिहावे या विचाराने मति कुंठित होते, वाचा पांगुळते.

ती. प. पू. मामांच्या राममंदिरामध्ये मी पहिल्यांदा केव्हा गेलो आणि ती. प. पू. मामांना प्रथम केव्हा पाहिले, हे नेमके आज आठवत नाही. पण त्यांचे संबंधी विचार करू लागताना, त्यांची विविध रुपं या क्षणी देखील अगदी लख्खन दृष्टीसमोर उभी राहातात.... सकाळच्या प्रहरी निळा कद नेसून देवपूजा करीत असलेले, दुपारच्या प्रहरी एखाद्या ग्रंथाचे वाचन करीत असलेले, संध्याकाळी नित्यनियमाचे प्रसन्न कीर्तन करीत असलेले, आपल्या नातवंडांच्या इतकेच आम्हा इतर सर्व मुलांवरही तितकेच प्रेम करणारे, राममंदिरातील पोपटाची व नातवंडाने पाळलेल्या कुत्र्याचीही ममतेनं सेवाशुश्रूषा करणारे, कुणी कितीही

त्रास दिला तरी चेहऱ्यावरचा प्रसन्न शांतपणा कधीही ढळू न देणारे, साधुसंतांच्या चरणी अति नम्र असणारे, वाटेल तेवढी संकटं आली तरी कीर्तनात खंड न पडू देणारे, आणि अखेरच्या काळात नानाविध आजारांना न जुमानता आपल्या सद्‌गुरुंच्या समाधीच्या दर्शनाला न चुकता जाणारे, अशी मामांची विविध काळांतील असंख्य रुपं अंत:करणावर कोरल्यासारखी उमटली आहेत.

रामनवमीचा उत्सव आहे. राममंदिर आणि बाहेरील पटांगण, पताका-मांडवांनी सुशोभित केलं आहे. रामाच्या मूर्तीपुढे ती. पू. मामा कीर्तनासाठी उभे आहेत. शेजारी रामदादा पेटीवर आणि लाखेबुवा किंवा कोणीतरी पखवाजावर साथ करीत आहेत. भोवताली असंख्य भाविक लोकांची गर्दी झाली आहे. मामांच्या समोरच फुलांच्या माळांनी सजविलेला पाळणा बांधला आहे. बाहेर ऊन रणरणत आहे. पण देहभान हरपून ती. प. पू. मामा रामजन्माची कथा सांगताहेत. दशरथाचं दु:ख, पुत्रकामेष्टी यज्ञाची सांगता, मिळालेले पायसदान, कौसल्येचे डोहाळे, ते सांगताना 'आणा रे धनुष्य मारीन रावणा । लंका बिभीषणा देईन मी ।।' हे म्हटलेलं पद, वसिष्ठमुनींच आगमन, त्यांनी दिलेला आशीर्वाद आणि मग होणारा रामजन्म !! 'श्रीराम जयराम जयजय राम' हा रामनामाचा घोष, वाद्यांचा मंगल गजर, असा अंतर्बाह्य रामप्रेमानं ओथंबून गेलेला मामांच्याकडील रामजन्माचा सोहळा, ज्यांनी पाहिला आहे, ते तो सोहळा जन्मजन्मांतरी विसरू शकणार नाहीत. नित्याच्या कथाकीर्तनात ती. पू. मामा नेहमी रंगलेले हे असावयाचेच, पण रामजन्माच्या सोहळ्याचे वेळी, त्यांच्या कथेतून, पदांतून, स्वरातून, हावभावांतून, त्यांच्या अंतर्यामी असणारा रामनामाचा भक्तिरस व आनंद जणू चहू दिशांना वर्षत असायचा.

राममंदिरात साजऱ्या होणाऱ्या रामनवमी, हनुमानजयंती, गुरुतृतीया अशा समारंभउत्सवांना आम्ही अनेक लहान लहान मुलं दर वर्षी न चुकता जात असू. ती. पू. मामांचं कीर्तन हे एक मुख्य आकर्षण असेच; पण त्याच्या जोडीला रामदादांनी गायलेली पदं, त्यांचं निरूपण, दिमडीवरील भजन, यांचंही आकर्षण



असे. पण त्याहीपेक्षा आमच्या बालबुद्‌धीला आणि मनाला आकर्षण असे ते सर्वांना लहान थोरांना अत्यंत आस्थेनं आणि अगत्यानं दिल्या जाणाऱ्या प्रसादाचं. ती. पू. मामांच्याकडे वेळीअवेळी केव्हांही गेलं तरी प्रत्येकाला, निदान चिमूटभर, साखरेचा प्रसाद हा हमखास मिळेच मिळे. या 'प्रसादा'च्या आणि साखरेच्या चिमटीनं लहानथोर सारेजणच एकदा जे आकृष्ट झाले ते कायमचेच! यातूनच निदान आमच्यासारख्या लहान लहान मुलांची मनं संस्कारित झाली, श्रद्‌धायुक्त झाली.

हायस्कूल, कॉलेजमध्ये असताना, मी वक्तृत्वस्पर्धातून भाग घेत असे. प्रत्येक स्पर्धेला जाताना, ती. पू. मामांचा आशीर्वाद घेऊनच जाई आणि परत येई तो विजय संपादन करूनच. बक्षीस म्हणून मिळालेली ढाल, पदक, पेला, प्रशस्तिपत्र ती. पू. मामांना दाखविताना त्या वयात विलक्षण आनंद वाटायचा. अभिमान आणि उत्साह यांनी मी फुलून जायचा. ती. पू. मामांनाही फार फार आनंद होई, समाधान वाटे. 'प्रसादा'ची साखर हातावर ठेवता ठेवता मोजक्या शब्दात ते कौतुक करीत.

एकदा योगयोग असा :- सुप्रसिद्‌ध कीर्तनकार ह. भ. प. लक्ष्मणबुवा निजामपूरकर मामांचेकडे आले होते. मी त्याचवेळी बक्षीस ढाल घेऊन मामांचेकडे गेलो होतो. ती. पू. मामांनी माझी व निजामपूरकरांची ओळख करून दिली. ती एवढ्या अगत्यानं आणि कौतुकानं की क्षणभर निजामपूरकर बुवाही चकित झाले. निजामपुरकरबुवा मला म्हणाले, ''मी सांगलीला किंवा इकडे आसपास कीर्तनाला आलो की सर्वप्रथम मामांच्या दर्शनाला येतो. त्यांचा आशीर्वाद घेतला की चार चार महिने माझी कीर्तनं निर्विघ्नपणे पार पडतात. बाळ, तू मोठा भाग्यवान् आहेस. तुझ्या वाणीला ती. पू. मामांचा आशिर्वाद लाभला आहे!''

अशा किती आठवणी सांगाव्यात. असंख्य आठवणी माझ्याजवळ आहेत. पण विशेष अशा दोन वेगवेगळ्याच आठवणी मी येथे सांगतो.

नित्यनियमाने न चुकता, दररोज ती. पू. मामांच्या कीर्तनाला जाण्यांपैकी मी

नव्हतो. पण अधूनमधून जमेल तेव्हा शक्यतो हजर राही. ५५ किंवा ५६ सालातील गुरुतृतीयेच्या उत्सवाचा तो दिवस असावा. संध्याकाळच्या कीर्तनाला असंख्य श्रोते जमले होते. त्यांच्यापैकीच मी एक. कीर्तन झाले, प्रसाद वाटला. काही कामानिमित्त मी थोडा वेळ थांबलो. काम झाल्यावर परत निघालो. जाताना पुन्हा एकदा ती. पू. मामांचे दर्शन घेतले. मामांनी शेजारीच असलेल्या साखरेच्या डब्यातून चिमूटभर साखर माझ्या हातावर प्रसाद म्हणून ठेवली. त्या साखरेबरोबर तळहातावर थोडे जड कांहीतरी लागले. मूठ उघडून पाहिली, तो त्यात चार आण्यांचे चांदीचे नाणे! मी मामांना म्हणालो, ''या साखरेतून चार आणे आले आहेत.' तेव्हा मामा मला म्हणाले, ''तोही प्रसादच आहे.'' साखरेची मूठ तशीच धरून मी घरी आलो. ते चार आणे काढून देव्हाऱ्यामध्ये ठेवले. सर्वांनी घरी साखरेचा प्रसाद घेतला. गंमत अशी- त्या वर्षापासून मला कधीही पैसे कमी पडले नाहीत!

आयुष्यात मी कधीही विसरू शकणारच नाही अशी गोष्ट. ५७-५८ साली घडली. मी त्यावेळी टॉयफाइडने फार आजारी होतो. तीनदा ताप उलटला होता. जवळ जवळ सहा महिने मी अंथरुणावर खिळून होतो. या अंगावरून त्या अंगावरही होता येईना. त्यावेळी माझे वडील रोज रात्री मामांचेकडे दर्शनाकरता जात असत. आणि ती. पू. मामाही माझेकरता एक अंगाऱ्याची पुडी तयार करून माझ्या वडिलांचेकडे देत, आस्थेने माझी चौकशी करीत. माझे दुखणे काही केल्या हटेना. इतकेच नव्हे तर डॉक्टरांनीही जवळजवळ आशा सोडली होती; शेवटी तर एकदा ते म्हणाले, ''आता याला हॉस्पिटलमध्ये ठेवू या. माझे सर्व इलाज आता थकले.'' या त्यांच्या उद्गारांचा माझ्या मनावर अतिशय विपरीत परिणाम झाला. माझा आत्मविश्वासच संपला. या आजारात आता आपली जीवनयात्रा संपणार, हेच मनाने घेतले. मरणाच्या भीतीने मी अगदी हादरून गेलो. माझी झोपच उडाली. चार दिवस भयाण मन:स्थितीत मी होतो. माझ्या वडिलांनी माझी ही मन:स्थिती शेवटी ती. पू. मामांना सांगितली. तसे



सकाळीच मामा मुद्दाम मला पहायला घरी आले. माझ्या उशापाशी बसून, माझ्या साऱ्या अंगावरून त्यांनी हात फिरविला व मला ते म्हणाले, ''हे बघ, तुला मुळीच धक्का लागणार नाही. तुझ्या डोक्यातले वेडेवाकडे विचार काढून टाक बघू''. मी क्षीण आवाजात त्यांना म्हणालो, ''मामा, डॉक्टरांनीही आशा सोडली आहे. तेच सांगत होते...'' त्यासरशी काही आगळ्याच आत्मविश्वासानं मामा मला म्हणाले, ''डॉक्टरांशीच काय, कोणाशीही पैज लावून सांगायला मी तयार आहे- तुला आजारात मुळीच धक्का लागणार नाही. (त्यावेळची त्यांची ती मुद्रा व डोळे अद्यापि मला स्मरताहेत). तुला एकदोन दिवसांतच आराम वाटेल.'' असं त्यांनी सांगितलं. त्यांच्या शब्दांवर मी पूर्ण भरंवसा टाकला आणि स्वस्थ पडून राहिलो. त्याच रात्री शांत झोप लागली, चांगला घाम आला आणि दुसऱ्या दिवसापासून आराम पडू लागला. थोड्याच दिवसांत मी पूर्ण बरा झालो. ती. पू. मामांनी आम्हां बालकांच्यावर अशी अपार कृपा केली. आपत्ति-संकटांचे निवारण केले. उत्कर्षाच्या वाटा दाखवून दिल्या. पण हे सारं काही करताना पुन्हा ती. पू. मामा सर्वांतून अलिप्तही असायचे! कासवी जशी आपल्या स्नेहदृष्टीनं आपल्या पिलांचं संगोपन करते, तसंच जणू ते सर्वांचं संगोपन करीत.

साधुसंतांच्या वाट्याला येणारी निंदानालस्ती, मानहानि, गैरसमज यांच्या वावटळी मामांच्या बाबतीतही अनेकदां उठवल्या गेल्या. नाना तऱ्हेचे गैरसमज आप्तस्वजनांत पसरविले गेले. पण ती. पू. मामा सदैव शांत, धीरगंभीर असत. नामकीर्तनात आणि नामानुसंधानात ते सदैव रमलेले असत. त्यांनी कुणाही दुष्ट, दुर्जनाबद्दल साधा अपशब्दही कधी उच्चारला नाही, मग प्रतिकार करणे अगर तशाच विपरीतपणानं कृति करणं दूरच!

ती. पू. मामा निंदा-नालस्ती संबंधीच उदासीन होते असं नव्हे तर कीर्ति, मान-सन्मान, मोठेपणा, प्रसिद्धि, या साऱ्यांपासूनही फार फार अलिप्त होते. अंतरीच्या भक्तांसाठी ते जाति-धर्माचा, काळवेळेचा विचारसुद्धा न करता,

तत्काळ धावून जात पण थोरामोठ्यांकडे आपण होऊन कधीही जात नसत. परम आदरणीय गुरुवर्य रानड्यांच्यासारखे थोर संत आपण होऊन मग ती. पू. मामांचेकडे येऊन जात. पण मोठी संतमंडळी आपल्याकडे येतात, याचाही गाजावाजा मामांनी कधी कोणाजवळ केला नाही. अशा त्यांच्या अतिनम्र आणि अलिप्त वृत्तीमुळं त्यांचा थोरपणा त्यांनी कोणाला कळूच दिला नाही. आम्ही त्यांच्याभोवती वावरणारी मुलं लहान तर होतोच, पण अज्ञानीही होतो. त्याहून खरं सांगायचं तर जवळच्या मोठ्या लोकांनाही आपला मोठेपणा, अधिकार, श्रेष्ठता यांसारख्या गोष्टी ती. पू. मामांनी कधी दर्शवू दिल्या नाहीत, जाणवू दिल्या नाहीत!

आज ती. पू. मामांचं एकेक वागणं, सांगणं, बोलणं आठवू लागलं की आता ध्यानात येऊ लागतं की, अरे आम्ही त्या कल्पवृक्षाच्या छायेत खेळत होतो, प्रत्यक्ष कामधेनूच्या हातूनच प्रसाद घेत होतो. मामा सूर्याप्रमाणं आपला योग आचरीत होते नि चंद्राप्रमाणे सर्वांवर कृपेचा अमृतवर्षाव करीत होते. सर्व तऱ्हेचं लौकिक मोठेपण त्यांनी गुरूभक्तीत, नामस्मरणात, कथाकीर्तनात बुडवून टाकलं होतं. समर्थ रामदास म्हणाले होते - सोने आणि परिमळे । इक्षुदंडालागी फळे । गौल्य माधुर्य रसाळे । तरी ते अपूर्व शोभा ।। तैसा हरिदास आणि विरक्त । ज्ञाता आणि प्रेमळ भक्त । वित्पन्न आणि वादरहित । तरी तेही अपूर्वता ।। अशी सारी अपूर्वताच मामांचे ठिकाणी भरून राहिली होती.

ती. पू. मामांनी जवळजवळ ४० वर्षे अखंड कीर्तने केली. दोन हजारांहून अधिक अभंग लिहिले. अंतरंगी भक्त बनून जवळी येणाऱ्याला परमार्थीचे गूज सांगितले, लहान थोर, पात्र अपात्र, सर्वांकरिता भक्ति-प्रेमाचा आनंदोत्सव चालू ठेवला. हे सारं ते कशाच्या जोरावर करू शकले? हे सामर्थ्य त्यांना नेमकं कुठं नि कसं सांपडलं? निदान आता तरी ते समजू कळू शकेल? अभ्यासिता येईल?

परवा सहज ती. पू. मामांनी लिहिलेलं ''श्रीहनुमद्गुरूचरित्र-बोधसार'' हे पुस्तक वाचीत होतो. ओव्यामागून ओव्या वाचीत होतो. त्या ओव्यांमधून साधनमार्गाचे गूज सांगितले आहे. ती. पू. मामांनी आपल्या सद्गुरूचा महिमा



तर वर्णन केला आहेच, पण त्यातील प्रत्येक ओवीमागे ती. पू. मामांचीच साक्षात मूर्ती उभी आहे, हे मला जाणवू लागले. मामांनी आपल्या सद्गुरूंचे केलेले सर्वच्या सर्व वर्णन अक्षरशः मामांनाही लागू पडते आहे, असा बोध होऊ लागला. 'हिंडता फिरता बोलता चालता । नाना व्यवसायी चित्त असता । टाकोनी अनित्याची वार्ता । नित्यामाजी वर्ततसे ।। आत्मस्वरूप अंतरंगात । तेथे ठेवोनी राहती चित्त । बाह्यभोगी न रहावे रत । हे जयांनी साधिले ।। साधिता साधन संपत्ती । येर भाग्याची कायसी महती । बाह्य भाग्याची कल्पनाही चित्ती । ज्याचे अंतरी असेना ।। धरती श्रद्धा नित्य अंतरी । की देव आपुला साहाकारी । त्याची भक्ती वारंवारी । मनोमनी करावी ।। हरिगुणनामसंकीर्तन। हे तो सर्व साधनांचे साधन । जे साधिता भगवान । आपण स्वये वश होय ।। व्याधी उपाधी आली जरी । कीर्तन चालविती निरंतरी । अखंड कीर्तनभीतरी। खंड कैचा पडेल ।।' यासारख्या ओव्या वाचताना मी थक्क होऊन गेलो. कारण ती. पू. मामा अगदी असेच वर्तत होते. सद्गुरु हणमंतराव कोटणीस यांचे चरित्र मामांनी लिहावे अशी इच्छा त्यांच्या वडिलांनी (कै. अनंत गंगाधर केळकर यांनी) केव्हाच व्यक्त केली होती, पण चरित्र लिहून प्रसिद्ध होण्यास तेरा वर्षे काल जावा लागला. मला वाटते, मामांनी तो काल मुद्दाम जाऊ दिला. आपल्या सद्गुरूंच्या सर्व गुणांचा आलेख जणू ते आपल्या अंत:करणावर आधी कोरीत होते! सद्गुरूंचा प्रत्येक गुण आत्मसात् करीत करीत त्यांच्यासारखेच होत होते. ती. पू. मामांनी लिहिलेले 'श्रीहनुमद्गुरु चरित्रबोधसार' हे सद्गुरु तात्यासाहेब कोटणीसांचे चरित्र वाचताना मला प्रामाणिकपणे असे वाटते आहे की हे सारे चरित्र मामांचेही आहे. जसे नामस्मरणाने भक्त तोची देव, देव तोची भक्त अशी किमया घडते तीच किमया येथे शिष्य तोची गुरु, गुरु तोची शिष्य अशा स्वरूपात झालेली आहे असे वाटू लागते.

'श्रीरामपाठात' ती. पू. मामांनी अवघ्या ३२ अभंगांत अवघ्या अध्यात्माचे मर्म सांगितले आहे:- जन्मापासून अखेरच्या क्षणापर्यंत अखंड नामस्मरण

करावे. संकल्पी विकल्पी त्या रामालाच जाणण्याचा प्रयत्न करावा. अखंड रामनाम उच्चारणाऱ्याचा देहभाव नष्ट होईल. पतिव्रता जशी पतीची अगर आई जशी बालकाची काळजी घेते, तसाच प्रत्यक्ष देवच अशा भक्ताची काळजी वाहील, नव्हे आत बाहेर सर्वत्र हरी प्रगटलेला त्याला दिसेल, अनुभव येईल. हेच ती. पू. मामांनी सर्वांना सांगितले. स्वतः अनुभवून इतरांना सांगितले.

ती. पू. मामांनी आपल्या सद्गुरूबद्दल लिहिताना सांगितले आहे :- ''स्वरूपी स्वरूपाकार झाले । ते साधुसंत नाही गेले । निर्गुणरूपे जगदाकार झाले । जगी व्यापूनी राहती ।। संत सद्गुरु आले गेले । हे तो आपुले बोलणे झाले । परी ते अखंडित राहिले । भक्तजनाकारणे ।।'' ती. पू. मामांचे संबंधी विचार करताना मला नेहमी हेच वाटते. ती. पू. मामा आमच्यातून गेलेले नाहीत. ते जाऊ शकणार नाहीत. ते निर्गुणरूपे जगदाकार होऊन, आम्हा बालकांच्या, भक्तजनांच्या कल्याणाकरता अखंड कृपेचा वर्षाव करीत आहेत.

नामरूप मामा झाले । अमर कीर्तन करून गेले ।
जे ऋषि बोलले । ते दाविले सत्य करुनि ।।१।।
त्यांची काया गेली खरे । परि ते भरले जगदाकारे ।
हे मिथ्या की खरे । महानुभाव जाणती ।।२।।

***

## (३)

## विनयसम्राट मामा

**- ग. ब. देशमुख, जि. सरकारी वकील,** सांगली

ख्रिस्ताब्द १९५० ची ही गोष्ट असावी. सांगली येथे एका मुलकी अधिकाऱ्याच्या मुलाची मुंज होती. मुहूर्त सकाळी ७-८ च्या सुमाराचा असावा. मलाही आमंत्रण होते. मुहूर्तापूर्वी सुमारे अर्धा तास, मी नियोजित स्थळी गेलो. विशेष आमंत्रितांची बैठक माडीवर होती. यजमानांनी मला माडीवर नेले.



बैठकीचे मुख्यभागी (मध्यभागी) मुख्यासन होते. बैठकीवर एका बाजूला, मी बसलो. तीन चारजण अगोदर आलेले होते. अल्पावधीत मामा तेथे आले. मी उठून त्यांना अभिवादन केले. प्रसन्न सस्मित प्रतिनमस्काराने मामांनी त्याचा स्वीकार केला. ते मजजवळ येऊन बसले. नेहमीप्रमाणे आत्मीयतेने त्यांनी माझी विचारपूस केली. पाठोपाठ बरीच मंडळी जमली. ऐन मुहूर्ताचे घाईत, एक श्वेतवस्त्रधारी पुढारी तेथे उगवले. तसल्याही गडबडीत, अंगावरचे सोवळे सावरीत, यजमान तेथे धावत आले. उपस्थित नेत्यास त्यांनी कृतज्ञतापूर्वक मध्यासनावर बसविले. दंतप्रदर्शन करून, उशिराबद्दल त्या नेत्याने दिलगिरी व्यक्त केली. थोड्याच वेळांत, समारंभ आवरला. पानसुपारी सुरू झाली. यजमान पुनः वर आले.

''हे बापूरावजी केळकर, इथले थोर संत.'' मामांकडे पहात, यजमानांनी, हसत हसत, त्या पुढाऱ्यांना ओळख करून दिली.

''अस्सं काय?'' चे आश्चर्य व्यक्त करून, जाता जाता गडबडीत, त्याने मामांच्या नमस्कृतीचा, मोठ्या मेहेरबानीने कसातरी स्वीकार केला.

अहंभावाच्या कडक इस्त्रीने ताठरलेला एक जीव व विश्वैक्य पावलेला आनंदमग्न महात्मा, असे परस्परविरोधी दर्शन घडविणारा, तो प्रसंग होता. सभ्यतेचा मलयानिल सुगंध व अहंभावाचा तो उग्र दर्प उपस्थितांच्या नजरेतून सुटू शकले नाहीत. सत्पुरुषांपुढे लीन होण्याचे, अनायासे आलेले सद्भाग्य, दवडल्याबद्दल, मला त्या नेत्याची कीव वाटली. मामांवर मात्र या प्रकाराचा कांहीच परिणाम दिसला नाही.

''अखंड अगर्वता होऊनि असती । तयांची विनय हेचि संपत्ती '' हा मामांचा स्थायीभाव असे. अहंभावाचा वाराही त्यांना कधी शिवला नाही.

''तो अहंकाराते दवडुनी । सकळ काम सांडुनी ।
विचरे विश्व होऊनी । विश्वामाजी ।।'' ज्ञा. २-७१, ३६७

या श्रीज्ञानेश्वरवचनानुसार त्यांची रहाणी असे आणि म्हणूनच श्रीमद्भगवद्गीता

अध्याय १३, श्लोक ७ ते ११ यांत नमूद असलेला 'अमानित्व अदंभित्वादि' समस्त ज्ञान चिन्हांचा कलाप त्यांचे ठायी स्थिर झालेला आढळून येई. त्यांची गुरुभक्ति तर असीम होती.

सद्‌गुरु-आज्ञेनुसार, अखंड अडतीस वर्षे कीर्तनसेवा करून ''रामनाम मुद्रांकित । गोविंद गुरूचा अंकित'' या त्यांच्याच स्वत:च्या अभंग-पंक्ति त्यांनी यथार्थ केल्या.

ब्रह्मीभूत तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांनी दोन तपें (पंचवीस वर्षे) नामासंकीर्तन करून, सांगली 'बहुत चांगली'' केली, तर त्यांच्या या थोर शिष्यांनी-ब्रह्मीभूत परमपूज्य मामांनी-या सांगलीला, आपल्या प्रदीर्घ कीर्तन सेवेने 'तीर्थरूपता' प्राप्त करून दिली.

डोक्याला लाल जरीकांठी रुमाल, अंगात साधा (बिनकफ-कॉलरचा) सदरा, त्यावर बंद गळ्याचा कोट, नेसते धोतर व पायांत वहाणा, असा त्यांचा साधा पेहराव असे. मुद्रा नेहमी प्रसन्न. अंगकांति गौरवर्णाची.

''बाहेरीं कर्मैं क्षाळला । भीतरीं ज्ञानें उजळला । इहीं दोहीं परी आला । पाखाळा एका'' ज्ञा. १३-७-४६४. असे मामा अंतर्बाह्य उजळ व तेजस्वी होते. श्रीगोविंद अनंत तथा बापूराव केळकर, असे त्यांचे लौकिक नांव असले तरी ''मामा'' या जवळिकेच्या नांवानेच आम्ही त्यांना संबोधित असूं. सिटी हायस्कूल सांगली या प्रशालेतील त्यांचा विद्यार्थी या नात्याने ख्रिस्ताब्द १९३२ साली, मामांचा मला प्रथम परिचय घडला. आम्हा विद्यार्थ्यांना 'मामा' त्यावेळी महाभारतादि ग्रंथद्वारा धार्मिक पाठ देत.

''मामा'' थोर साक्षात्कारी होते. त्यांचा परमार्थाधिकार श्रेष्ठ प्रतीचा होता. ''ऐसेनि बा समरसे । दृष्टी जै उल्लासे । ते भक्ति पै ऐसे । आम्ही म्हणो'' ज्ञा. १४,२६,३८८ या माउलीवचनानुसार, मामांची भक्ति विशाल व स्थिर झालेली होती. त्यांच्याबद्दल आम्हां सर्वांना परमोत्कट आदर असे. पण त्यांच्या हयातीत त्यांची थोरवी, यथार्थपणे कोणालाच उमगली नाही. तरी पण, या महान्



साक्षात्कारी पुरुषाला आम्ही दीर्घकाळ जवळून पाहू शकलो, त्यांचा पद्मकर आमचे पाठीवरून कित्येकदां फिरला, त्यांच्या अनंत कृपाकटाक्षांनी, आम्ही अक्षरश: न्हाऊन निघालो, हे काय आमचे कमी भाग्य? मामांच्या सान्निध्यांत आलेला प्रत्येक जीव खरोखरच भाग्यवान्!

''माझी काया गेली खरे । परि मी आहे जगदाकारे'' या समर्थवचनानुसार, मामांची ती प्रसन्न देहाकृति दृष्टीआड झाली असली, तरी या विशाल विश्वात्मकाच्या रूपाने मामा अखंड संन्निधच आहेत, हा विचार अंत:करण उन्नत केल्यावाचून रहात नाही. मामांच्या या विश्वात्मक स्वरूपाला, त्या विनम्र विराटाला माझे कोटि कोटि प्रणाम!

श्रीज्ञानेशमातृचरणार्पणमस्तु

***

## (४)

## काळावर मात करणारे श्रीबापूरावजी केळकर

**- श्री. वि. तु. कोल्हापुरे**

श्रीबापूरावजी केळकर हे सांगलीच्या भाविक जनतेला 'मामा' नावानेच अधिक ज्ञात आहेत. मामांचं व्यक्तिमत्त्वही त्या संज्ञेला साजेसंच होतं. त्यांच्या सान्निध्यात आलेल्या प्रत्येकाला, मामांच्या चर्येत माऊलीच्या ममतेची अनुभूति आलीच पाहिजे, असा कनवाळू भाव त्यांच्या चर्येवर ओसंडून राहिला होता.

तीर्थस्वरूप मामा म्हणजे शब्दश: त्यांचा जीवनौघ एखाद्या निर्मळ तीर्थस्थानाप्रमाणे पवित्र, वंदनीय, पूजनीय होता. असल्या जीवनाचा आविष्कार आजच्या युगात अपवादानेच दृग्गोचर होईल. भौतिक विचारांचे थैमान चालू असलेल्या आणि अशाश्वताच्या मागे द्रुतगतीने जाणाऱ्या सांप्रतच्या मानवांत ती. मामांनी आक्रमिलेला परमार्थाचा शाश्वत मार्ग हा या कालातील एक महान् दैवयोगच होय!

श्रीसद्गुरू तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांच्या साक्षात्कारी प्रेरणेने ती. मामांनी या मार्गात पदार्पण केले आणि अव्वल दर्जाच्या संतमालिकेत अढळस्थान प्राप्त करून घेतले. भगवद्भक्तीची थोर तपश्चर्या ती. मामांनी आपल्या आयुष्यात पूर्ण केली. संसारात राहून परमार्थ केला. संसार व परमार्थ ही विरोधी टोके ज्वलंत निष्ठेने तडीपार केली व संसारी साधुपुरुष या अशक्य कोटीतील महान् संज्ञेचे ते स्वामी बनले! ती.मामांची गणना उत्तम संसारी पुरुषांत केली जाते; त्याहीपेक्षा उज्ज्वल परमार्थी पुरुष म्हणून त्यांचा नावलौकिक अधिक आहे. परमार्थ हाच त्यांच्या संसाराचा स्थायिभाव होता. ती. मामांच्याकडे उपासना, ध्यानधारणा, ईशस्तवन, नामस्मरण, नामसंकीर्तन इत्यादि अहोरात्र चालू असत. अखंड नामस्मरणात ती. मामांनी आयुष्य घालविले; अंतीही 'श्रीराम जय राम जय जय राम' हा उच्चार करून ते अनंतात विलीन झाले. या प्रसंगीही एक अद्भुत घटना घडली, ती. मामांनी अंतकाळसमयी कीर्तनाची वेळ होईपर्यंत साक्षात् काळाला थोपवून ठेवले होते. ही अनेकांनी पाहिलेली चक्षुर्वै सत्यं घटना आहे; कल्पनेतील कहाणी नव्हे. सर्व शरीर थंडगार झाले असताना, नाडी सुटलेली असताना, नित्याच्या कीर्तनाच्या वेळी, 'श्रीराम जयराम जय जय राम' निर्वाणीचा संदेश देऊन श्रीबापूरावजींनी प्रत्यक्ष काळावरही मात केली आणि ती. मामांच्या थोर पारमार्थिक अधिकाराची प्रचीति सर्व उपस्थितांना आली. अशा थोर सत्पुरुषाचे साहचर्य, सान्निध्य आणि त्यांच्या अमृतवाणीचा लाभ ज्या महाभागांना मिळाला ते धन्य होत! त्यांची पूर्व पुण्याई मोठी!

प्रसिद्धिपराड्मुखता ही ती. मामांच्या जीवनातील प्रमुख गोष्ट. देवाचं नामस्मरण करायचं; त्याची जाहिरात कशाला? नाम ओठात नसतं, कंठात असतं; त्या नामाची पारायणं केली असं या ओठानं सांगण्यात काय मतलब? नाम कंठगतच असलं पाहिजे. ही मामांची वृत्ति असल्यानं, त्यांच्या कार्याचा गाजावाजा फार झाला नाही; खऱ्या अर्थाने त्यांचे पारमार्थिक कार्य झाले.

ती. मामांच्या 'श्रीरामनिकेतन' या वास्तूत मामांची अनेक छायाचित्रे



पहावयाला मिळतात. संसारी आणि परमार्थी या दोन्ही अवस्थेतील छायाचित्रे तेथे आढळतात. या छायाचित्रांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांत ती. मामांच्या मुद्रेवर झळकणारे प्रसन्नतेचे तेज. प्रसन्नतेत परमेश्वर वास करतो. जे जे प्रसन्न असते ते ते परमेश्वररूप होय. ती. मामांच्या मुद्रेवर विलसणारे प्रसन्नतेचे तेज हे परमेश्वरी प्रभावाचे द्योतक होय. 'नर करणी करे तो नरका नारायण हो जाय'. ती. मामा साक्षात् नारायणरूप होते!

***

## (५)

## शांतिदायक मामा

**- श्री. गो. वा. केळकर**

माझे वडील अत्यंत धार्मिक विचारसरणीचे. वयाचे १६ वर्षापासून ७४ वर्षांचे वयापर्यंत रोज लिंगार्चन करीत. मृत्यूचे दिवशीही १५ मिनिटे अगोदर लिंगार्चन करून त्यांनी जीवितयात्रा संपवली. घरचे वातावरणच धार्मिक होते. मी लहानपणी वडलांचे धाकाने नित्यनैमित्तिक पूजा वगैरे ब्रह्मकर्म करी व पुढे हौसेने करू लागलो.अध्यात्माची पुढे गोडी लागली. सरकारी नोकरीत जिल्ह्यांच्या ठिकाणी माझ्या बदल्या होत. त्यामुळे कीर्तने, प्रवचने ऐकावयास मिळत. धार्मिक पुस्तकांचे वाचनही यथाशक्ति करत होतो. परंतु मनाचे समाधान होत नव्हते. तशात शरीरप्रकृति यथातथा. सरकारी कामाचा बोजा. संसारातील अनेक दुःख देणारे प्रसंग. त्यामुळेही मन बेचैन होते. सुख, समाधान, शांति नव्हती.

१९४८ साली माझी सांगलीला बदली झाली. ट्रेझरी ऑफिसात श्रीराम गोविंद केळकर यांची गाठ पडली. त्यांचे बरोबर एक दिवस श्री. बापूरावजींचे कीर्तनास गेलो. श्री. बापूरावजी उर्फ मामा यांचे व्यक्तिमत्त्वाची छाप माझेवर

पडली. कचेरीतील कामातून सवड सापडली की कीर्तनास जाऊ लागलो. इतर कीर्तनांपेक्षा या कीर्तनात विशेष काहीतरी आहे असे वाटू लागले. किंबहुना माझे मनाचे समाधान होण्यास योग्य असे हे कीर्तन आहे, असे वाटू लागले. मामा हे प्रापंचिक, पण चेहऱ्यावर विलक्षण शांति, बोलण्यात मृदुता, आणि वागणुकीत सौजन्य व प्रेम. कीर्तनात श्रद्धा, तळमळ, भक्तीचे उत्कट दर्शन. यामुळे मी प्रभावित झालो. 'ज्याच्या अंतरंगात देवाची वसती आहे तो मनुष्य अत्यंत सौम्य स्वरूपाचा बनतो. त्याला पहाताच हा कोणीतरी आपल्या दाट ओळखीचा स्नेही असावा असे वाटू लागते. त्याला पाहून, भय, उद्वेग असल्या विकारांची बाधा पाहणाराला होत नाही. ज्याप्रमाणे वृक्षाचा अंकुर आपल्या बाह्य सौंदर्याने भूमीतील अतिरम्य रस स्वत:मध्ये साठविल्याचे निदर्शनास आणतो, त्याप्रमाणे देवाला हृदयात अखंड वागविणाऱ्या माणसाचे रूप असते. (वसति हृदि सनातने च तस्मिन् भवति पुमान् जगतोऽस्य सौम्यरूप:। क्षितिरसमतिरम्घमात्मनोंत: कथयति चारुतयैव सालपोत: ।। विष्णुपुराण ३-७-२५), ब्राह्मी स्थितीस पोचल्याची ओळख पटविणारे सौम्यत्व मामांचे चेहऱ्यावर दिसून आले.

परिचय पुष्कळच झाला. मधूनमधून मामांचे घरी जेवावयासही गेलो. कीर्तनाशिवाय इतर वेळीही जात होतो. सामान्य माणसे बोलतात, वागतात तसे मामा वागत, बोलत होते; विनोद करीत होते. मला त्यांचे सहवासात शांति समाधान लाभत होते. शरीर प्रकृति सुधारत होती. मनाची घडीही नीट बसत होती.

मामांचे पत्नीचीही थोडी ओळख करून दिली पाहिजे. माझी तर पूर्ण समजूत आहे की कै सौ. इंदिराबाईंनी मामांचे चारित्र्यास पूर्णता आणली. त्यांच्या मुखावर तपश्चर्येचे पातिव्रत्याचे तेज अपूर्व होते. त्यांच्या हातचा स्वयंपाक जेवण्याचे भाग्य मला लाभले, त्यामुळे मी धन्य आहे.

नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ । मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ।। तो मी वैकुंठी नसे । वेळ एक भानुबिंबीही न दिसे । वरी योगियांचीही मानसे । उमरडोनि जाय ।। मी हरपला पांडवा । परी तयापासी गिवसावा । जेथे नाम घोष बरवा । करिती माझा ।।



मामांचे कीर्तनातील नामघोषात तो सत् चित् आनंदघन परमात्मा मला सापडला.

आपल्याला जो पुरुष मार्गदर्शनाला पाहिजे होता, जे समाधान जी शांति आपणाला मिळाली नव्हती, तो सर्व लाभ मला मामांचे सहवासात झाला.

मामा लौकिक जगातून गेले, समाधिस्थ झाले. परंतु त्यांनी माझे हृदयांत कायमचे स्थान घेतले.

आताही ज्या ज्या वेळी मनांत अशांति होते, त्या त्या वेळी मी मामांचे स्मरण करतो व मला शांति लाभते.

***

## (६)
## मामांचे अवतार कार्य

**- श्री. जि. भि. दीक्षित, चित्रकार, पुणे**

परमेश्वराचे कार्य करण्याकरिता या कलियुगामध्ये साधुसंतांचे अवतार पूर्वी झाले, आज आहेत व पुढेही होणार. एकनाथमहाराज या संतमहंतांना नाना 'अवतार गारा' असे संबोधितात.

आमच्या चिमड संप्रदायात आत्मारामाचा अनुग्रह श्रीसद्गुरु रामभाऊमहाराज यरगट्टीकर यांच्या आज्ञेने श्रीसद्गुरु कृष्णरूप तात्यांनी दिला. आमच्या मनाला जागृति रहाण्याकरिता गोविंदरूपात त्यांनी आपल्यामागे मामांना तीन तपे हरिकीर्तनाकरता उभे केले. कारण तात्यांचा अनुग्रह घेतेवेळी आम्ही लहान वयात शिकत होतो. सद्गुरुमाऊलीचं प्रेम लाभणं आणि परमार्थात प्रवेशपरीक्षा

पास होणं हे बहुधा जन्माचं आमचं सुकृतच उदयाला आले. मामा म्हणतात= जो वैराग्य भाग्ये भाग्यवंत । तया भगवंत भेटतसे ।। हे भाग्य या दासानुदासाला मामांच्या सहवासात मिळाले.

नामस्मरणाची बैठक स्थिर होण्यास मला मामांच्या कीर्तनात निळोबारायांचा 'गोड नाम तुमचे देवा । गोड सेवा तुमची ।।' हा अभंग म्हणण्यास ते का सांगत होते, याचा अनुभव मला स्थलकाळपरिस्थितीशी झगडतांना प्रत्यक्ष आला व आजही येत आहे.

माझ्या आवडीचा विषय चित्रकला. ती साध्य नसून साधन आहे, हे मामांनी पटवून दिले, व स्वस्वरूपानुसंधानात रहावयास शिकविले.

मामांच्या वास्तूत जाऊन नामसंकीर्तन ऐकले की जो आनंद, समाधान होते, ते शब्दातीत आहे. त्या ठिकाणी त्रयोदशाक्षरी आत्मबिंबाचा किरणप्रकाश श्रीराम जयराम जयजयराम या नादब्रह्मात, जयघोष करून तेवत ठेवला. मामांनी पुनः श्रीसमर्थांना आणून बसविले व अनेक मुमुक्षुजनांना मार्गदर्शन चालू ठेवले.

सध्याची स्थलकालपरिस्थिति पाहिली की जगात विचार करण्याची व माणुसकीने वागण्याची पातळी शिल्लकच राहिली नाही असे दिसते. सत्ता, स्वार्थसाधूपणा वाढला आहे. समर्थ म्हणतात त्याप्रमाणे 'अन्न नाही वस्त्र नाही। सौख्य नाही जनामध्ये । आश्रयो पाहता नाही । बुद्धी दे रघुनायका ।।' अशी वेळ आली आहे, व पुढेही वाढतच जाणार. असा कलीचा प्रभाव ओळखूनच, आज हजारो वर्षे संतसज्जन जगात पुन्हा पुन्हा अवतरून, मुमुक्षुजनांना जागे करून, साधक बनवीत आहेत. हेच अवतारकार्य आमच्या मामांनी त्यांच्या जीवनात, कायिक, वाचिक, मानसिक, दुःसह परिस्थितीशी झगडून, अखंड ३८ वर्षे हरिगुणनामसंकीर्तनात राहून, करून दाखविले.

***



## (७)

## मला दिसलेले मामा

**श्री. न. दा. दिवेकर**

मामा हे कीर्तनकार होते, शिक्षक होते. पण त्यांच्या शिकवण्याचा विषय वेगळा होता. बोलावे कसे हे ते न बोलून शिकवीत. कुणी गप्पा मारायला गेल्यास त्यांचे मौन ठरलेले असे. परमार्थ बोलायला गेल्यास सूचक बोलत. 'अखंड वाणी वदवावी । यथायोग्य' या समर्थवचनाचे समर्थपण मामांच्या आचरणावरून जेवढे समजले तेवढे एरव्ही समजले नसते. सम दृष्टी म्हणजे काय हे त्यांच्या दृष्टिक्षेपावरून समजत असे. निष्ठा म्हणजे काय हे त्यांनी आपल्या आचरणाने दाखविले. स्वरूपस्थिती म्हणजे काय, हे त्यांना पहाताच समजत असे. नामस्मरणाचा रंग त्यांच्या कीर्तनात पहाता येई.

अंतर्बाह्य परमार्थाने रंगलेले जीवन म्हणजे मामा होते. आपणाकडे वळलेली त्यांची दृष्टि ही कृपा होती. त्यांच्या मुखातून निघालेला शब्द हा अनुग्रह होता. त्यांनी गाइलेला जप हा मंत्र होता. त्यांचा क्षणभर लाभलेला सहवास हे समाधान होते. मामांच्या जे जवळ आले ते कधीच दूर गेले नाहीत.

अननुभूत आणि अखंड सुखाची जोड करून देणारे ते सद्गुरु, ही जर व्याख्या असेल तर ती मामांना संपूर्णपणे यथायोग्य दिसत होती. 'महाराज' ही लागलेली उपाधि मामांनी खोडून टाकली. पण हृदयाहृदयातून **'राजाधिराजमहाराज'** ही उमटलेली अक्षरे त्यांना पुसता आली नाहीत. कोणत्याच विशेषणांनी मामांचे पूर्ण वर्णन करता येणार नाही. तरी अखंड भक्तिप्रेमाचा झरा ज्यांच्या अंतःकरणात मामांनी निर्माण केला तेच त्यांचे शब्दांशिवाय वर्णन करू शकतील.

आमचे बिऱ्हाड मामांच्या वाड्यातच होते. मामांच्या स्वभावाचे जे बारकावे मला पाहता आले, त्यात अमाप बोध भरला आहे, अशी माझी खात्री आहे. त्यांचे जीवन मला जेवढे व जसे कळले तेवढे व तसे मी या लेखात शब्दांकित

करीत आहे.

अंताजीपंत हे मामांचे वडिल. त्यांना नाना म्हणत. नाना व मामा दोघांनी आपले जीवन परमार्थाला वाहिले होते. नाना हे शिवउपासक, मामा राम उपासक. शिव उपासकाच्या पोटी राम उपासक जन्माला आला, हा एक चमत्कारच आहे. दोघांच्या स्वभावातही जाणवण्यासारखा फरक होता. नाना तापट तर मामा कमालीचे शांत. नानांनी रुद्रावतार धारण केला की मामांचा शांत स्वभाव फारच उठून दिसे. एखादी तक्रार करायची झाल्यास, नाना घरात नसताना मामांच्याजवळ करणे आम्हाला जास्त सोईचे वाटे. नाना तापट असले तरी त्यांच्या प्रेमाचा प्रत्ययही अनेकदां येत असे.

एकदा मामा कामावरून गरी आले. संध्याकाळी फुलझाडांना पाणी घालणे हे त्यांचे काम. पाणी काढण्यास ते विहिरीवर गेले. नाना सोप्यात जमाखर्च लिहीत बसले होते. त्यांनी हातातला टाक खाली टाकला व ते मोठ्याने म्हणाले, ''बापू, थांब, मी पाणी ओढून देतो. तू झाडांना घाल.'' वास्तविक मामांची शरीरयष्टी व्यायामाने नानांपेक्षाही सुदृढ होती. पण आपल्या एकुलत्या एक मुलाला विहिरीजवळ जाऊ द्यावयाचे नाही हा नानांचा निर्धार होता. आपल्या मुलाला ते प्राणापलीकडे जपत.

पोहायला शिकायची संधी मामांना कधीच मिळाली नाही. कारण मातापित्यांच्या आज्ञेबाहेर जावयाचे नाही, हे मामांचे व्रत होते. मामा पाण्याला भीत असेही नव्हते. दिगवड्याला जाताना एकदा त्यांनी सुरंगी नदी ओलांडली होती. नदीला पूर होता. उतार पाहून नदीपार होण्याचे मामांनी ठरविले. मामा पाण्यात शिरले. ओठापर्यंत पाणी आले. एक पाऊल पुढे टाकले की पायाचा आधार सुटला असता. ईश्वरावर भरंवसा टाकून मामांनी पाऊल टाकले. पाणी कमी होते. ही गोष्ट मामा अनेकदा कीर्तनात सांगत. ईश्वरावर विश्वास ठेवून पुढे टाकलेले पाऊल मागे घ्यावयाचे नाही, हा मामांचा बाणा होता.

पाण्यात उभे राहून गायत्रीपुरश्चरणे करणे, इत्यादीला नानांनी कधी आडकाठी



केली नाही. कोणतेही घेतलेले काम तडीस नेणे, ही जिद्द, हा पराक्रम, ही हौस मामांचे ठिकाणी भरपूर होती.

मामांच्या पायाखालून एकदा मोठा नाग गेला. मामांनी लोक गोळा केले नाहीत, तो मारला नाही, त्या रस्त्याने जाण्याचे सोडले नाही.

नानांनाच परमार्थाची आवड नसती तर मामांच्या परमार्थाला कोणते वळण लागले असते, हे सांगणे कठिण आहे. अंगी योग्यता असताना, मिळालेली चांगली नोकरी लाथाडणारा मुलगा कोणत्या आईबापांना आवडेल? आणि अशा मुलाच्या कीर्तनात मागे झांज घेऊन साथ देणारा पिता पाहिला, म्हणजे ही पिता-पुत्राची जोडी परमेश्वराने मुद्दाम निर्माण करून पाठविली व तीहि सामान्य माणसांना सन्मार्ग दाखविण्यासाठी, असे म्हटल्यावाचून रहावत नाही. अंतकाळी नानांना लोकांनी विचारले, ''आपली काही इच्छा आहे काय?'' ''मी पूर्ण समाधानी आहे. वाईट एवढेच वाटते की बापूचे कीर्तन आता ऐकावयास मिळणार नाही. देवाची इच्छा.'' असे बोलून ॐ नमः शिवाय मंत्राचा जप करीत नानांनी देह ठेवला.

## मामांचे कीर्तन

नानांना मामांच्या कीर्तनाची गोडी वाटण्यासारखे मामांच्या कीर्तनात काय होते? ना गोड आवाज; ना विद्वत्तेचा हव्यास; ना संगीताचे ज्ञान; ना साथीदारांची खुलावट; ना विषयाची विविधता; ना मनोरंजक गोष्टी; ना रोषणाई. धो धो वाहणारा गंगेचा ओघ म्हणजे मामांचे कीर्तन नव्हते. भगवान् शंकराच्या जटेतून निघणारी लहानशी अमृतधारा म्हणजे मामांचे कीर्तन होते. क्षणार्धात व्यक्तातून अव्यक्तात शिरणारी. तिचा एक थेंब ज्याच्या श्रवणपुटातून हृदयात पोचला तो कृतार्थ झाला. नानांच्या अंतःकरणात असलेले निर्व्याज प्रेम ज्यांच्या अंतःकरणात होते त्या भूमीत मामांनी पेरलेले बीज रुजले आहे, उगवले आहे. डोळ्यांतील कृतज्ञतेच्या अश्रूंचा पाऊस त्या रोपट्यावर पडतो आहे व ते जोपासले जात आहे. मामांच्या कीर्तनात एक होते. आईचा जिव्हाळा. साक्षात्काराची तळपती

ज्योत. आई उपनिषदातले उतारे पाठ म्हणत नाही. पण ती आपल्या लेकराचे कल्याण जाणते. मुलगा मोठा झाला म्हणजे उपनिषदातले उतारे देऊन तो आईच्या प्रेमाचे वर्णन करू पाहतो, पण ते त्याला जमत नाही. महाकवीच्या उताऱ्यानेही काम भागत नाही. मग त्याचे डोळे तरळतात. गालावरून अश्रू ओघळतात. तीच कृतज्ञता. तेच वर्णन. तेच मौन आईच्या प्रेमाचे यथार्थ वर्णन करू शकते. मामांचे कीर्तन या प्रकारचे होते.

लिहिण्याच्या ओघात मी बराच पुढे आलो. लहानपणी मला मामा कसे दिसत होते, ते अजून सांगावयाचे आहे.

संध्याकाळ झाली की वाड्यातील मंडळी गप्पा मारण्यास अंगणात येत. त्यात मामा मला कधीच दिसले नाहीत. गप्पा मारण्याकरता मामा घरातसुद्‌धा कधी मोकळे आढळत नसत. वहीत टिपणे काढण्याचे काम ते करीत.

इतर लोक मला खूप उपदेश करीत. मामांनी कधीच केला नाही. माझ्या काही तक्रारी घेऊन आई मामांच्याकडे जाई. "सोनाराने कान टोचले म्हणजे बरे" हे तिला पाठ होते. त्यावर मी मामांची गाठ घेण्याचे बरेच दिवस टाळीत असे. पण एकाच वाड्यात राहात असल्याने समोरासमोर गाठ पडणे अपरिहार्य होते. मामा नुसते स्मित हास्य करीत. माझ्या छातीवरचे दडपण कमी होई. इतरांनी आपल्याला वाईट म्हटले तरी चालेल, मामांनी म्हणू नये, असे मला तेव्हांही वाटे. आई वरचेवर मामांच्याकडे जाई. माझे शंभर अपराध ऐकून होईपर्यंत मामा वाट पहातील व मग सुदर्शनाचा फेरा आपल्या भोवती फिरेल, ही भीति मात्र माझ्या मनांत राहिली होती. मामा शेवटी एवढेच म्हणाले, "राधाकाकू, तुम्ही काळजी करू नका. तो आपला आपण सुधारेल." मामांचे सुदर्शन आले नाही पण मामांचे सु-दर्शन आले.

चार भिंतींच्या आत कोंडून घेऊन मामांना कंटाळा कसा येत नाही, असा एक विचार मनांत येई. एके दिवशी त्यांच्या घरातले ग्रंथ पाहिले आणि छाती दडपली. शाळेची पुस्तके नीट वाचून होण्याची मला पंचाईत. तर मामा ग्रंथसंभाराशी



सलगी करीत. जाहीररीत्या मामांचे गीता-भागवत-वाचन, वाचनालयांत वाचन व एकांतात वाचन. पुन्हा वह्या आहेतच. माणसाला दोनचार मित्र असतात. मामांची मैत्री हजारो ग्रंथांशी. स्वभाव अबोल. सगळा उत्साह अध्यात्म ग्रंथ हृदयसंपुटात साठविण्यात खर्च होत असे. बाहेर पडावयाचे ते पायांना व्यायाम हवा म्हणून, देवदर्शन व्हावे म्हणून, संतदर्शन व्हावे म्हणून.

या आणि इतर कारणांनी मामा मला इतरांपेक्षा वेगळे वाटत. संत कसे असतात हे त्यावेळी मला कळत नव्हते. पण मामांच्या वेगळेपणाचा ठसा माझ्या मनावर उमटला होता.

पुढे महाविद्यालयाच्या वातावरणातला झगमगाट माझ्या डोळ्यापुढे आला. मामांच्या घरातला नंदादीप डोळ्यांना दिसेनासा झाला. ती धुंदी यथाकाळ उतरली. पण तेव्हां मामांचा प्रतापसूर्य अस्ताचलाकडे झुकला होता. गाडी सुटायच्या आत मी पुनः स्टेशनवर आलो. गाडी चुकली नाही हे भाग्य!

आडगावी राहणाऱ्या सद्‌भक्ताची कीर्ति होऊ शकते, हे आजच्या जाहिरातीच्या युगात कोणाला पटणार सुद्‌धा नाही. व्यासपीठावर खुर्च्या मांडून बसलेल्या माननीय पाहुण्यांपैकी एखाद्याचे आभार मानावयाचे अनवधानाने राहून जाते. पण एका विश्ववंद्य पुरुषाने-कै. सोनोपंत दांडेकरांनी-श्रोत्यांच्या गर्दीत एका कोपऱ्यात बसलेल्या थोर पुरुषाच्या-मामांच्या-पुण्याईचा गाभा गायला सुरवात केली तेव्हां सगळेच चकित झाले. एका प्रज्ञावंत संपादकाला साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांना मामांच्या नित्यकीर्तनाची वार्ता कळली; तेव्हा तेही विस्मयाने चौकशी करू लागले. तेव्हां दुसरा धक्का बसला. भारतातल्या हरिप्रियांची मामांच्याकडे येजा सुरू झाली तेव्हा तिसरा धक्का बसला. एका संतांनी, पुण्याचे सहस्रबुद्‌धेमहाराज यांनी बसल्या जाग्यालाच मामांचे गुणगान सुरू केले तेव्हां आणखी एक धक्का बसला. कडेकोट बंदोबस्तात ठेवलेल्या मामांच्या तपश्चर्येचे तेज झाकू शकले नाही. कीर्ति हवी की नको हे आता मामांच्या इच्छेवर राहिलेच नाही, यालाच देवाची इच्छा म्हणतात.

मामांच्या कीर्तनात पाहिलेली चक्षुर्वैसत्यं हकीकत अशी आहे- त्रयोदशाक्षरी मंत्राच्या घडडाटात लोकांना डोल येत. अप्पा पवारांनी त्यातली दोनच अक्षरे पकडली, ती मरणांतापर्यंत. अनेकांची विकल्प-भूते पार निघून गेली. मामांचे दर्शन म्हणजे देवाचे दर्शन असे अनेकांना वाटे. त्यांच्या हातचा साखरेचा प्रसाद मिळाला की त्याबरोबर समाधानही घेऊन लोक घरी जात. संसारतप्त जीवांना मामांचे श्रीरामनिकेतन विश्रांतिस्थान वाटे. मामांना व्याधि होत्या, पण त्यांच्या चेहऱ्यावर त्या दिसत नसत. श्रोतेही आपल्या व्याधि विसरून कीर्तनाला बसत. मामांनी देह ठेवला तेव्हां त्यांच्यासारख्याच व्याधि असलेल्यांनी-लाखेबुवा, वैद्य, इत्यादींनी-मागोमाग गमन केले. जणू काही मामांनीच त्यांचा मृत्यु थोपवून धरला होता.

एकदा एक थोर व्यक्ति मामांच्या राममंदिरात आली, ''या ठिकाणी काही वेगळाच अनुभव येतो आहे. या वातावरणातल्या अणुरेणुतून काही जादू आहे, प्रसन्नता आहे, आगळे सुख आहे.'' असे तिला जाणवले.

संसाराची सर्व चिंता बाजूला ठेवून सगळा दिवस मामा परमार्थात घालवत. लोकनिंदाही मामांनी सहन केली. मामा आपल्या सतत समाधानाच्या धूनमध्ये असत.

मामांच्या शब्दांत सामर्थ्य आहे. मामा संसारात आहेत पण आसक्त नाहीत. अंत:करणात वेगळ्या प्रेमाचा ओलावा आहे. वाणीवर संयम आहे. स्वीकारलेल्या परमार्थमार्गाने जाण्याचा करारीपणा आहे. ध्येयसिद्धीचे समाधान चेहऱ्यावर आहे. मोजक्या शब्दांत दुसऱ्याला मार्गाला लावण्याची हातोटी आहे. अनाग्रही वृत्ति आहे. आपला कीर्तनाचा नेम अचूक चालविण्याची जिद्द आहे. जवळ आलेल्यांचे कल्याण करण्याची कळकळ आहे व योग्यता आहे. स्तुतीची अभिलाषा नाही. निंदेची पर्वा नाही. हे सर्व मला कळून चुकले.

अशा अलौकिक व्यक्तिमत्त्वाच्या सांनिध्यात जो जो आला, त्याच्याजवळ एका अनिर्वचनीय सुखाची ठेव राहिली आहे.



आमच्यासारख्या सामान्य माणसांना मामांनी जे कृतिपाठ दिले, आचरुन दाखविले, त्यासाठी त्यांचे सदैव ऋणी राहण्याखेरीज आमच्याजवळ काहीच नाही. त्यांचे स्मरण आम्हाला सदैव मार्गदर्शक व प्रेरक होत राहिले आहे.

असे एक उदात्त आणि भव्य जीवन आपल्याला या डोळ्यांनी पहावयास मिळाले हे फार मोठे भाग्य आहे. त्या दिव्य जीवनाचा सुगंध आजही अनेकांच्या अंत:करणात दरवळत आहे.

मामा अजरामर झाले. त्यांना अर्पण करण्याकरता त्यांच्याच नंदनवनातून वेचलेल्या नऊ पुष्पांचा-नऊ रत्नांचा-हार त्यांच्या पदी मी अर्पण करतो.

१) आपल्या परमार्थाचा गाजावाजा करू नये. २) सद्गुरूंची आज्ञा प्राणपणाने पाळावी. ३) मानसन्मानाच्या आहारी जाऊ नये. ४) खूप वाचावे, सार घ्यावे. ५) वाणी परमार्थासाठी वेचावी. ६) मागू नये, दिले तर हुरळू नये. ७) व्याधि येतील, परमार्थाला अंतरु नये. ८) प्रारब्धाच्या झंझावाताला टक्कर देऊन परमार्थ चालवावा. ९) कीर्तीकडे पाठ फिरवावी.

मामा नवमीसाठी जगले. नवमी साधून त्यांनी देह ठेवला. हा नवरत्नांचा हार मामांना शोभला. त्याकडे पहात आपणही मार्ग चोखाळावा.

हार हा नवरत्नांचा समर्पून पदांबुजी ।
प्रार्थना एक ही माझी राहो स्मरण अंतरी ।

***

## (८)

## मला माहीत असलेले मामा

**-वसंत रामचंद्र कुलकर्णी**

### प. पू. मामांचे निर्याण

कलेवर पडलं, प्रारब्धाचा क्षय झाला आणि अक्षय अशा आत्मतत्त्वाशी प.पू.मामा एकरूप झाले. जन्मभर अट्टाहास केला त्याप्रमाणे शेवट गोड झाला.

माघ शु. ९ शके १८८३, सोमवार ता. १२-२-६२ रोजी सायंकाळी ५ वाजतां अत्यंत विकल अवस्थेत असतांना वैखरी वाणीने **'श्रीराम जयराम जयजयराम'** या तारक मंत्राचा मोठ्याने उच्चार करून, सर्वांना नरदेह साधल्याचा अखेरचा अमरसंदेश देऊन, प. पू. मामांनी आपली वाणी बंद केली आणि आपल्या सद्गुरुंचे चिंतन करीत म्हणजे ब्रह्मचिंतन करीत या नश्वर शरीराचा इच्छेने त्याग केला. अनंत गंगाधराचा हा सुपुत्र-गोविंद अनंत-अशा तऱ्हेने परत अनंतात विलीन झाला. एकही दिवस न चुकतां अखंड अडतीस वर्षे वाजणारी कीर्तनाची झांज आपल्या मुलाच्या स्वाधीन करून प. पू. मामा सगुण-रूपाने समाप्त झाले आणि निर्गुण-रूपाने निरंतर राहिले. असंख्य भक्तांना दु:ख सागरांत (आणि जे नामात राहिले त्यांना सुख-सागरांत) लोटून ते आमच्यांतून कायमचे निघून गेले. एक उदात्त सं(थ)त जीवन शांत होऊन दृष्टीआड झाले, सृष्टी पलीकडील तत्त्वांत सामावून विश्वाकार बनले.

**मामा आणि मामी**

प. पू. मामांचे संपूर्ण नांव गोविंद अनंत तथा बापूरावजी केळकर असे होते. लोक त्यांना 'मामा' या नांवानेच ओळखीत. त्यांच्या पत्नीचे म्हणजे मामीचे लौकिक नांव इंदिराबाई असे असून, उभयतांही वर्णाने गौर व नाकी-डोळी नीटस होती. त्यांना पहातांच अनोळखी माणसाच्याही मनांत आदर उत्पन्न होई. त्यांचा संसार म्हणजे दांपत्य जीवनाचा आदर्श होता. दुधावरील सायीप्रमाणे मामींचा स्वभाव मृदु आणि गोड होता. दुधांत पाणी जसं एकजीव होतं तशा त्या आपल्या पतीच्या जीवनाशी एकरूप झाल्या. त्यांना स्वत:चं स्वतंत्र असं अस्तित्वच नव्हतं. ''दो डोळां एक पाहणें, दो ओठीं एक बोलणे' या श्रीज्ञानदेवांच्या उक्तीप्रमाणे उभयतां देहानें जरी भिन्न असली तरी त्यांतील विचारधारा एक होती आणि म्हणूनच मामींनी मामांचा प्रपंच कडेला नेला आणि मामांनी मामींचा परमार्थ पुरा केला. दोघांनीही साकीबाकी चुकती करून टाकली. प. पू. मामांच्या निर्याणानंतर, त्यांनी आपला देह, एक वर्षाच्या आंतच, सांगून संपविला.



यावरूनच त्यांची पारमार्थिक योग्यता कळून येते. ज्या दिवशी प. पू. मामा गेले त्या दिवशी मामीही पण गेल्या. नंतर उरलेल्या मामी म्हणजे, निष्प्राण शरीराच्या होणाऱ्या यांत्रिक हालचालींचा सांगाडा होता. त्या मामांच्या सहधर्मचारिणी होत्या एवढे सांगितले म्हणजे त्यांचे वेगळे चरित्र आणि चारित्र्य सांगण्याची गरज नाही.

**प्रपंच आणि परमार्थ**

प. पू. मामांचा प्रपंच नमुनेदार होता. हातांत हात घालून चालणाऱ्या जिवलग स्नेह्याप्रमाणे त्यांचा प्रपंच आणि परमार्थ होता. प्रेमळ परोपकारी पत्नी, आज्ञाधारक हरि-भक्त मुलगा, सुशील सून, हंसरी आणि खेळकर नातवंडे या प्रपंच-परिवाराच्या कोंदणात ते अंगठीवरच्या खड्यासारखे शोभून दिसत. पै-पाहुणे, अतिथि-अभ्यागत, इष्ट-मित्र या सर्वांचा परामर्ष ते व्यावहारिक दक्षतेने घेत. रस नसूनही ते प्रपंचात समरस झाल्यासारखे दाखवीत. ते प्रपंचाचे केवळ साक्षी होते म्हणूनच तो त्यांना बाधक न ठरतां उपकारक ठरला. प्रपंचाच्या नाठाळ घोड्यावर बसून त्यांनी परमार्थ-मार्गावर फार मोठी घोडदौड केली हेंच त्यांचे वैशिष्ट्य होय. प्रपंच आणि परमार्थ यशस्वी करून दाखविणारे प. पू. मामा हे सव्यसाची संत होते. त्यांचे समग्र-जीवन म्हणजे प्रपंच-परमार्थ-समन्वयाचा सुंदर वस्तु-पाठ होता असे म्हणावयास हरकत नाही.

**मी अमुक ऐसा नोहावी से चि लोकां ।**

ज्या क्षणीं त्यांच्यावर गुरुकृपा झाली त्या क्षणींच त्यांनी आपले स्वत:चे अस्तित्व पार पुसून टाकले. फळ-भाराने लवलेल्या आम्रवृक्षापमाणे ते सदैव सर्वांपुढे नतमस्तक असत. 'मी' या शब्दाचा उच्चार ते केवळ भाषिक व्यवहारासाठी करीत. एरवी त्यांच्या 'मी' त 'अहं' ची उर्मि बिलकूल नव्हती. विषारी दांत काढलेल्या सापाप्रमाणे या 'मी' ला ते खेळवीत असत. 'अहंकार गेला। तुका म्हणे देव झाला' या अवस्थेला ते पोचले होते. त्यामुळे लौकिक मानप्रतिष्ठा त्यांना वनमवत् झाली होती. आणि म्हणूनच त्यांनी आपल्याला सिद्‌धि आणि

प्रसिद्‌धि या दोहोंचाही स्पर्श होऊं दिला नाही.

## मामांचे चमत्कार

संत म्हटला की त्याने चमत्कार केले पाहिजेत किंवा जो चमत्कार करतो तो संत अशी एक चमत्कारिक समजूत लोकांच्या मनांत कायम घर करून बसली आहे. खरे म्हणजे संत आणि चमत्कार यांचा अन्योन्य संबंध कांही नाही. परंतु जग मात्र चमत्काराशिवाय नमस्कार करायला तयार नसतं. प. पू. मामांनी चमत्कारही केले नाहीत आणि लोकांकडून नमस्काराची अपेक्षाही पण केली नाही. उलट जन्मभर तेच सर्वांना नमस्कार करीत आले. चमत्कार करण्याचे अंगी सामर्थ्य असूनही त्यांनी चमत्कार केले नाहीत यांतच त्यांचे 'संतत्व' दडलेले आहे. नाही म्हणावयास एकही दिवस न चुकता अखंड अडतीस वर्षे कीर्तने करून दाखविण्याचा चमत्कार मात्र त्यांनी उघडपणे सर्वांना करून दाखविला. परंतु ते त्यांस चमत्कार न म्हणतां गुरुकृपा म्हणत. एकंदरीत त्यांना चमत्काराचे वावडे होते असे दिसते.

## मामांची कीर्तने

प. पू. मामा गुर्वाज्ञेप्रमाणे नित्य सायंकाळी सहा ते साडेसातपर्यंत कीर्तन करीत. नित्यकीर्तन हीच त्यांची नित्याची उपासना. ती त्यांनी आमरणान्त चालविली. सद्‌गुरुच्या पादुका घरीच स्थापन करून त्यांनी आपल्या घराचेंच मंदिर बनविले होते. ते आपली कीर्तने घरच्या सोप्यावर आणि सोप्या भाषेत करीत. त्यांचा श्रोतृ-वर्ग ठराविक आणि तोही नित्य नेमाने येणारा असा होता. कीर्तनासाठी तबलापेटीची साथ कधीं असे तर कधीं नसे, पण त्यामुळे कीर्तनाच्या रंगात कधी फरक पडला नाही. सद्‌गुरुसेवा म्हणून, ते नित्यकीर्तन करीत. त्यामुळे त्यांच्या कीर्तनाचा रंग तबलापेटीच्या साथीवर किंवा उपस्थितांच्या संख्येवर अवलंबून नसे. सायंकाळी ६ वाजले की ते हातांत झांज घेऊन कीर्तनासाठी खुर्चीवर येऊन बसत. खुर्चीवर स्थानापन्न होण्यापूर्वी मंदिरातील सर्व देव-देवतांच्या व सत्पुरुषांच्या फोटोंना 'अवघें ब्रह्म-रुप रिता नाही ठाव । प्रतिमा तो देव कैसा नोहे' हा भाव पोटी ठेवून नमस्कार करीत. सांप्रदायिक पद्‌धतीप्रमाणे सुरवातीस सद्‌गुरुनमनाची व देवता आवाहनाची पदे म्हणून झाल्यानंतर ह्या दिवसासाठी निवडलेला अभंग म्हणून दाखवीत व त्यावर सुमारें तासभर संत वचनांच्या आधारें सर्वांना सहज समजेल अशा सोप्या भाषेत विवरण करीत. शब्दांचे अवडंबर किंवा शाब्दिक कोट्यांच्या कोलांट्या उड्या त्यांत कधीही नसत. भाविकांचा पोटी कळवळा असल्याने संतांचे हृदगत मोठ्या कौशल्याने उलगडून दाखवीत. 'दीन दुर्बळासी सुख-राशी हरिकथा' अशा थाटाचे त्यांचे कीर्तन असे. त्यांचे बोल अनुभवांतून आले असल्याने ऐकणाऱ्यांच्या मनांत भक्तिप्रेमाचा खोल ठसा उमटून त्यांना सात्त्विक आनंदाचा लाभ होत असे. काही कथा ते पुन्हां पुन्हां सांगत, पण त्यांचा शिळेपणा श्रोत्यांना कधीही जाणवला नाही. त्या नित्य-नूतन वाटत. त्यांनी आपल्या कीर्तनांत 'भक्ती ज्ञाना विरहीत' इतर गोष्टी कधींही केल्या नाहीत. त्यामुळे ज्ञानी समाधान पावत, जिज्ञासु तृप्त होत आणि आर्त आपले दु:ख विसरीत. जन्मभर त्यांनी आपल्या कीर्तनांतून नामाचा प्रचार आणि प्रसार केला. नामा-व्यतिरिक्त ते कधींही बोलले नाहीत. अट्टाहासाने 'नामाचा महिमा' ते लोकांच्या मनावर बिंबवीत. नामाशिवाय त्यांना कांहीही माहीत नव्हते असे म्हटले तरी चालेल. नाम हा त्यांचा आत्मा होता. आपल्या कीर्तनाचा समन्वय शेवटी नामाशी घालून, ते त्या दिवसासाठी निवडलेल्या अभंगावरील आपले निरूपण संपवीत. नंतर 'श्रीराम जयराम जयजयराम' या तारक मंत्राची १०८ मण्यांची माळ होऊन सर्वांना बुक्का लावून झाल्यानंतर नित्य एका संताची गोष्ट सांगत. संताची गोष्ट सांगून झाल्यानंतर, 'हेचि दान देगा देवा' होऊन, आरती, प्रसाद होऊन कीर्तन समाप्त होत असे. अशा पद्‌धतीने अखंड अडतीस वर्षे कीर्तन करून त्यांनी जनता-जनार्दनाची फार मोठी सेवा केली. त्यांचे मोल आपणांस कधीच करता येणार नाही. तथापि त्याची थोडी फार कल्पना येण्यासाठी खाली एकाजनार्दनाच्या ओव्या देऊन, आणि प. पू. मामांच्या पवित्र स्मृतीला वंदन करून हा लेख

संपवितो-

कीर्तने स्वधर्म वाढे । कीर्तने स्वधर्म जोडे ।
कीर्तने परब्रह्म आंतुडे । मुक्ति कीर्तनापुढे लाजोनि जाय ।
भावे करितां हरिकीर्तन । तेणे संतोषे जनार्दन ।
उभयतां पडे आलिंगन । मिठी परतोनि सुटेना ।।
तेव्हा सबाह्याभ्यंतरी । देव प्रगटे चराचरी ।
दुजे देखावया संसारी । सर्वथा उरी उरेना ।।
एवं योगयागादि तप आसने । पोरटी केली हरि-कीर्तने ।
कलियुगी नाम-स्मरणें । जड उद्धरणें कीर्तनी ।।

**- नाथभागवत अ. ५**

***

## (९)

## दोन संतांचा संबंध

**श्री. गोविंदमहाराज कुलकर्णी,** सांगली

गेल्या ८-१० वर्षांत सांगलीत दोन संत होऊन गेले. ते म्हणजे कीर्तनरत्न ह. भ. प. कै. गोविंद अनंत उर्फ बापूरावजी केळकर, दुसरे प्रेमयोगी कै. श्री. स. पांडुरंगमहाराज ताम्हनकर. या दोघांचा संबंध काय होता, ते येथे सांगण्याचे ठरविले आहे.

श्रीबापूरावजी म्हणजेच मामा हे श्रीएकनाथमहाराजांचा अवतार असे श्रीपांडुरंगमहाराज म्हणत. याविषयीचे त्यांचे पद पुढीलप्रमाणे आहे-

एकनाथ पैठणवाला । सांगली आवडली त्याला ।।ध्रु०।।
पंचक्रोशी ही दत्तप्रभूंची । कृष्णा वाहे अमृतजलाची ।
पावनभूमी तपोवनाची । स्थान पाहूनी धाला ।।१।।



कुलसंशोधन करिता करिता । केळकरांचे आले चित्ता ।
अनंत तनूची घेऊन सत्ता । राधाकुशी अवतरला ।।२।।
एकनाथ गोविंद जाहला । हनुमंताची दीक्षा त्याला ।
नामरसाचा पिऊनि प्याला । रंगी रंगुनि गेला ।।३।।
दासबोध हरिपाठ भागवत । ज्ञानेश्वरी रामायण सांगत ।
प्रवचन कीर्तन रंगी नाचत । डोलवी श्रोतृगणाला ।।४।।
पैठण क्षेत्री अतृप्त हेतू । सांगलीत पूर्णेच्छा होतू ।
हरिभक्तीचा कळस डोलतु । पांडुरंग मनी भरला ।।५।।

श्री. अनंतराव केळकरांच्या सात्त्विक घराण्यात श्रीएकनाथांनी मामांचे रूपाने अवतार घेतला. श्री. अनंतराव श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे कीर्तनास जात; मामाही त्यांचेबरोबर जात. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे संसारात राहून परमार्थ मामांनी केला. विवाहकाळच्या 'सावधान' शब्दाने मामा परमार्थातच सावध झाले.

श्रीकोटणीसमहाराजांच्या निर्याणानंतर, मामा रात्री दासबोध वाचीत होते. त्यावेळी श्रीतात्यासाहेबमहाराज प्रगट झाले व त्यांनी मामांना कीर्तन करण्याची आज्ञा दिली. हा दिवस माघ वद्य तृतीया होय. या दिवशी मामांचेकडे गुरुतृतीयेचा मोठा सोहळा होई. या उत्सवात रात्री श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर यांचे एकतारी व दिमडी यावरचे दत्तपंथी भजन होई.

श्रीमामा व श्रीसमर्थ पांडुरंगमहाराज यांचे संबंध अत्यंत प्रेमाचे होते. पांडुरंगमहाराजांनी श्रीअवधूत भजनमाला, सार्थक व आनंद असे तीन प्रासादिक ग्रंथ लिहिले. भजनमालेतील पदे श्रीमामांना फारच आवडत. सार्थक व आनंद या ग्रंथांचा प्रकाशन समारंभ श्रीराममनिकेतनमध्येच झाला. सार्थक ग्रंथास प्रस्तावना म्हणून श्रीमामांनी प्रेमाने चार शब्द लिहिले. श्रीमामांचे थोर सुपुत्र श्रीरामराय यांनीही श्रीसमर्थ पांडुरंगमहाराजांचा अल्प परिचय दिलेला आहे.

श्रीमामांचे घरी पांडुरंगमहाराजांचे जाणे येणे असे, मधून मधून ते मामांच्या

कीर्तनासही जात.

भगवान् रामचंद्राचे जसे रामायण, तसे मामांचे मामायण, असे वाटून पांडुरंगमहाराजांनी 'मामायण' नावाचा लहानसा लेखही लिहिलेला आहे.

दरवर्षी समाधिमंदिरात हनुमानषष्ठीच्या उत्सवात मामांचे कीर्तन असे. शेवटच्या वर्षी मामा म्हणाले, 'पुढल्या वर्षी या उत्सवात माझे कीर्तन होणार नाही.' ते खरे झाले. व्याधिग्रस्त अवस्थेत 'मला काही होत नाही' असे मामा म्हणत. मामांना आधुनिक जनकच म्हणावे लागेल,. पण देहधर्माप्रमाणे देह मृत्यु नेणारच. सोमवार, माघ शुद्ध ९, शके १८८३, रात्री ११-५० ला मामांनी देह ठेवला; ज्योतीत ज्योत मिसळून गेली. मंगळवारी सकाळी मामांची महायात्रा कृष्णानदीवर गेली.

ही वार्ता पांडुरंगमहाराजांना समजली. त्या वेळी महाराजांचे अंगात चालण्याची शक्ति नव्हती; दृष्टी क्षीण झालेली होती. पण प्रेम स्वस्थ बसू देईना. कोणासतरी बरोबर घ्यावे हेही न सुचून, पांडुरंगमहाराज गडबडीने कृष्णाकाठी अडखळत अडखळत आले. लोकांनी त्यांना आधार दिला. समर्थ पांडुरंगमहाराजांनी स्नान करून मामांना अखेरच्या तीन प्रदक्षिणा साश्रु नयनाने घालून, साष्टांग दंडवत घातला.

यथाकाळ रामनिकेतनात ज्या ठिकाणी बसून मामा कीर्तन करीत, त्या ठिकाणी रामरायांनी सिंहासन स्थापन केले व त्याचेच वरचे बाजूस भिंतीवर मामांचे भव्य तैलचित्र लावण्यात आले.

श्रीपांडुरंगमहाराज ८-१५ दिवसांनी श्रीरामरायांचेकडे येत. असेच एकदा ते आले असतांना, ते मामांच्या सिंहासनाच्या समोर उभे राहिले; दोन्ही हात जोडून ते मामांना म्हणाले, ''आपण आता श्रीसद्‌गुरुंचे पायाशी राहिला. श्रीपंतप्रभूंचे कृपाशीर्वादाने माझा परमार्थ सुखाचा झाला. मला आता या जर्जर देहाचा कंटाळा आला आहे. आपले भेटीस यावे, असे मला वाटू लागले आहे. हा माझा विनंति अर्ज आपण श्रीपंतप्रभूंना कळवा आणि पांडुरंगाला बोलावून



घ्या.'' आणि थोड्याच काळात श्रीपांडुरंगमहाराजांनीही आपले कार्य संपविले.

श्रीमामांचा व श्रीपांडुरंगमहाराजांचा इहलोकी असेतो प्रेमाचा संबंध होता. नंतरहि तो तसाच राहिला याचे एक गमक असे:- मामांचे 'श्रीगोविंद चरितमानस' हे चरित्र ज्या अण्णा दिवेकरांनी लिहिले त्यांनीच पांडुरंगमहाराजांचे 'श्रीसमर्थ पांडुरंग विजय' हे चरित्र लिहिले. श्री. अण्णा दिवेकर हे श्रीमामा व पांडुरंगमहाराज या दोघांच्याही कृपेतील होते.

श्रीमामांचे पश्चात् त्यांची नित्य कीर्तनाची परंपरा त्यांचे थोर सुपुत्र श्रीरामराय यांनी चालू ठेवली. श्रीमामा व पांडुरंगमहाराज यांच्यात जो परस्पर प्रेमसंबंध होता, तो त्यांचे पश्चात् त्यांचे भक्तांनीही चालू ठेवला आहे. हे प्रेमाचे नाते पूर्वीप्रमाणेच आहे व हे नाते अशा प्रकारे चढते वाढते राहो, अशी श्रीमामा व पांडुरंगमहाराज यांचे चरणी प्रार्थना.

***

## (१०)

## मामा संतांचा राजा

**-ह.भ.प. वासुदेवराव जोशी,** माधवनगर

माधवनगरच्या श्रीमंत नातूशेठनी मला एकदा विचारलं, ''तुम्ही एखादा साक्षात्कारी पुरुष पाहिला आहे काय?'' मी तात्काळ उत्तरलो, ''मी पाहिला आहेच, तुम्हालाही दाखवीन.'' त्यांना घेऊन मी मामांच्याकडे आलो. परत त्यावर नातूशेठ म्हणाले, ''तुमचे म्हणणे अगदी बरोबर आहे.''

### करील ते काय नोहे महाराज

उभे राहून चार लोकांपुढे बोलणे मला महासंकट वाटे. आणि मला मामा म्हणाले, ''वासुदेवराव, तुम्ही कीर्तनाला उभे राहा.'' माझ्या पोटात भीतीचा गोळा उभा राहिला. आणि मामांच्या शब्दाला मी कसा मान दिला व तो धीर मला कसा झाला, याचे आजही मला आश्चर्य वाटते.

### नेमा न ढळे निर्धारी

एकदा मामा पालघरला जात होते. मी त्यांचेबरोबर होतो. मामांच्या नित्यकीर्तनाची वेळ झाली. आम्ही आगगाडीत होतो. मामा मला म्हणाले, ''वासुदेवराव, कीर्तनाची वेळ झाली.'' झाले, हाताच्या टाळीवर गाडीतच कीर्तन सुरू झाले. आगगाडीतल्या प्रवाशांना गाडीत कीर्तन ऐकण्याचा हा पहिला आणि शेवटचाच प्रसंग असावा.

'कीर्तनासाठी जन्म' ही मामांची निष्ठा होती. नामस्मरण हा त्यांच्या कीर्तनाचा विषय आणि 'आधी केले मग सांगितले' याचा प्रत्यय मामांच्या शब्दांत येई.

### नमूचि आवडे

कीर्तनाला येणाऱ्या माणसाला पहिला नमस्कार मामांचा. मग त्या माणसाचे डोके मामांच्या पायावर. ही नम्रता मान वाकविण्यापुरतीच नव्हती तर बोलण्यातही होती. कोणी आपल्या गुरूच्या नात्यातला म्हणून तर कोणी आपल्या वडिलांच्या गुरूंच्या नात्यातला म्हणून, एक ना दोन त्यांच्या नम्रतेला कोणतेही कारण पुरे.

### अंतकाळ

मामांचा अंतकाळही भव्य आणि दिव्य होता. नातूशेठना घेऊन मी मामांच्याकडे आलो होतो.मामा अंथरुणावर होते. मामा मला म्हणाले, ''वासुदेवराव, हे कडेपर्यंत जायला पाहिजे.'' मला या वाक्याचा बोध होईना. जीवनाचा अस्त होईपर्यंत ज्यांनी आपला जीवनक्रम सद्गुरूंना पसंत पडेल अशा रीतीने चालवला, त्यांना आता कडेपर्यंत काय न्यावयाचे आहे. त्यांना कडेपर्यंत न्यावयाचे होते कीर्तन आणि ते त्यांनी साधले.

जी बोधज्योत मामांनी उजळून ठेवली आहे, त्यामुळेच त्यांचे दर्शन आगळे आहे. मामांचे दर्शन मला झाले नसते तर माझ्या जीवनाला कोणते वळण लागले असते, हे मला सांगता येत नाही.

***



## (११)

## श्रीबापूरावजी संत असे !

**श्री. यज्ञेश्वरपंत दीक्षित,** सांगली

कीर्तनप्रेमी श्रीबापूरावजी केळकरमहाराज हे नामयोगी, संतप्रेमी, गुरुनिष्ठ संतशिरोमणि होते. थोर संतांचे नुसते दर्शनही फुकट जात नाही, हा अनुभव मला आला.

काही वर्षापूर्वी येथील गणपति मंदिरात एकदोन वेळा प. पू. बापूरावजींच्या दर्शनाचा लाभ मला झाला आणि माझ्या ठिकाणी त्यावेळी सात्त्विक भाव निर्माण होऊन अंत:करण शुद्ध झाले. शास्त्रकारांनी म्हटलेच आहे की 'दर्शनात् एव साधव:'. श्रीबापूरावजींच्या दर्शनातच माझ्या सर्व परमार्थाचे बीज आहे. प. पू. बापूरावजींचे प्रथम दर्शन झाले, त्यावेळी त्यांचे ठिकाणी असलेली मूर्तिमंत शांति, सात्त्विकता, ऋजुता वगैरे गुण पाहून मी आनंद समुद्रात बुडून गेलो. माझ्या पहाण्यात तोपर्यंत अशी व्यक्ति नव्हती. (पुढे काही वर्षांनी) योगिराज गुळवणीमहाराजांचे दर्शन झाले; त्यांचे ठिकाणी मला हे सर्व गुण आढळले. त्यांना पाहून 'आज पुन: बापूरावजींचे दर्शन झाले' असे मला वाटले.

संतांत तीन प्रकार मानता येतात. १) ईश्वरच संतरूपाने येतो. उदा. दत्त, कपिल हे ईश्वरकोटी संत २) पूर्वजन्मात अभ्यासाने परिपूर्ण असलेले, पण काही प्रतिबंध असल्याने, दुसरा जन्म प्राप्त झालेले, परंतु जन्मत:च संत असणारे. हे जीवकोटी संत. उदा. नारद, वामदेव ३) या जन्मातच प्रथमपासून अभ्यास करून, गुरूकृपेने संत पदवीला प्राप्त झालेले.

पहिल्या व दुसऱ्या प्रकारच्या संतांपासून साधकाला घेण्यासारखे काही विशेष असत नाही, कारण ते सिद्धकोटीतील असतात. परंतु तिसऱ्या प्रकारच्या संतांच्या चरित्रापासून साधकाला पुष्कळ बोध घेता येतो. या प्रकारचे संत श्रीबापूरावजी होते.

गुरुकृपेच्या, संतकृपेच्या व देवकृपेच्या सामर्थ्याने श्रीबापूरावजींकडून सातत्याने

३८ वर्षे कीर्तनसेवा व नामस्मरण घडले व या स्मरणाची, कीर्तनाची, परमार्थाची, ज्ञानाची, भक्तीची व गुरुनिष्ठेची परिपूर्णता म्हणून गीतेत भगवंतांनी ''ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन् मामनुस्मरन् । यः प्रयाति त्यजन् देहं स याति परमां गतिम्'' या श्लोकात सांगितल्याप्रमाणे, त्यांचा अंतकाल नामस्मरणाने अत्यंत गोड झाला.

मामांच्यासारख्या थोर संतांचे स्मरण केले असताही चित्त शुद्ध होते. आमच्या कर्माप्रमाणे जर आम्हाला पुनः जन्म प्राप्त होण्याचा असेल, तर बापूरावजींसारख्या संतांची सेवा करण्याच सुयोग येवो, अशी त्यांचेच चरणी प्रार्थना करतो.

***

## (१२)

## कीर्तनावतार मामा

(- **श्री. भ. रा. नाईक,** मुख्याध्यापक, पटवर्धन हायस्कूल सांगली.)

गुरुदेव बापूरावजी केळकर उर्फ मामा यांच्याबद्दल कीर्तनावतार या उपाधीनेच अनेक जण त्यांचा गौरव करतात. आणि तो किती सार्थ आहे हे त्यांच्या अखंड ३८ वर्षांच्या नित्य कीर्तनसेवेवरून लक्षात येण्यासारखे आहे. कीर्तनाची सेवा श्रीरामप्रभूने त्यांच्याकडून करवून घेऊन, या कलियुगात साधन म्हणून 'कीर्तन' हा भक्तीचा प्रकार परमेश्वराला किती प्रिय आहे, हे सर्व साधकांच्या व उपासकांच्या लक्षात आणून दिले.

कीर्तन हा मामांचा सहज धर्म झाला होता. साहजिकच या सेवेत सहभागी होणाऱ्यांविषयी त्यांना विशेष जिव्हाळा वाटत असे. हे पुढील गोष्टीवरून कळून येते : एकदा माधवनगरात ह. भ. प. वासुदेवरावजी जोशी यांच्या घरी मामांचे कीर्तन झाले. कीर्तनात तबल्याची साथ श्री. कवठेकर यांनी केली (कवठेकरांची ही निष्काम सेवा आज अनेक वर्षे चालू आहे). कीर्तनाच्या सुरवातीचे हरिस्मरण झाल्यावर, मामांनी प्रथम कुणाच्या सेवेचा उल्लेख केला तर तो श्री. कवठेकरांच्या



तबल्याच्या साथीचा होय. दुसऱ्यांच्या परमाणुतुल्य गुणांचा मेरूप्रमाणे उल्लेख संतपुरुषांकडून कसा होतो, हे मी त्या दिवशी प्रथम ऐकले. मी त्या कीर्तनास उपस्थित होतो. त्यानंतर कितीतरी दिवस प. पू. मामांनी कवठेकरांचा केलेला गौरवही अधून मधून माझी चिंतनिका बनून राहिली होती. अबोध मनात गेलेल्या या चिंतनिकेतून, त्यांच्याच कृपेने जो बोध उदित झाला नि मन आनंदाने भरून आले. त्याचा शब्दांत उल्लेख करता येणे कठिण आहे. गुरुदेवांच्या कृपेला पात्र होण्यासाठी, त्यांच्या सेवेत असलेल्या साधकांचे, आर्तांचे नि मुमुक्षूंचे आपण गुणच पाहिले पाहिजेत, एवढेच नव्हे तर त्या गुणांचे अंतःकरणपूर्वक रसग्रहण आपणास करता आले पाहिजे; आणि देव पहावयाचा असेल तर तो स्वतःमध्ये शोधला पाहिजे, तरच सत्संग फलदायी होतो; एरवी बारान् बारा वर्षे साधनेचा सोस केला तर त्याचा उपयोग नाही, हा बोध मनावर सहजपणे ठसला, नि मन प्रेमाने भरून आले.

प. पू. मामांच्या केवळ एका कीर्तनातील उपस्थितीची ही माझी मिळकत आहे. तो लाभ मला अधिक मिळावयास हवा होता, असे वाटून कधी कधी मन उदास होते. आता धीर येतो तो त्यांचे चिरंजीव श्रीराम यांच्या वचनामृतातून. हे चार शब्द लिहिण्यास मी प्रवृत्त होऊ शकलो व मजकडून हे होऊ शकले, ही केवळ त्यांची कृपा म्हटली पाहिजे.

ज्यांनी देह ठेवीपर्यंत अखंड अडतीस वर्षे केवळ भगवत्प्रेमाने हरिकीर्तन केले व ज्यांच्या एकाच कीर्तनामधून श्रोत्यांच्या मनाचा पालट होतो, आणि विकारी मन वरच्या पातळीची नांदणूक पत्करते, त्या गुरुदेव मामांना कीर्तनावतार म्हणावयाचे नाही तर आणखी काय म्हणावयाचे? नि कोणत्या शब्दांनी त्यांची आरती करावयाची?

***

## ( १३ )

## मामा-आमचे सर

**- डॉ. ग. वा. तगारे,** एम्. ए. पीएच्. डी.

माझ्या जीवनास योग्य वळण देणाऱ्या ज्या थोर व्यक्ति होऊन गेल्या, त्यात ब्र. भू. मामासाहेब केळकरांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे.

१९२१-२२ चे सुमारास सांगली सिटीस्कूलमध्ये मी इयत्ता २ रीत (हल्लीच्या भाषेत इयत्ता ६ वीत) असता, ब्र. भू. मामासाहेब आम्हाला सायन्स व मॉरल शिकवीत असत. ते कधीही रागावलेले मला आठवत नाही. त्यांच्या थोर चारित्र्याचा ठसा आम्हा मुलांचे मनावर एवढा खोल उमटला होता की इतरांच्या तासाला दंगा करणारी मुले त्यांच्या तासाला शांत असत.

तो त्यांच्या आध्यात्मिक साधनेचा काळ होता. मुले सांगत, 'केळकर सर गोमूत्रातील भाकरी खात.' ब्र. भू. तात्यासाहेब कोटणीसमहाराजांकडे असणारे माझे चुलते मला सांगत की, आमचे सर अंथरुणाला पाठ न लावता रात्रभर साधना करतात. ब्र. भू. तात्यासाहेबांनी सुद्धा अशीच साधना केली हे मला कै. गोपाळराव मुजुमदार (साधुदास कवि) यांनी स्वानुभवावरून सांगितले होते. यावरून आमच्या परंपरेत, प्रपंचात राहून अशी कठोर तपस्या करण्याची पूर्वापार पद्धत दिसते. १९४४-४५ साली मी याबद्दल केळकरसरांना विचारले तेव्हा त्यांनी संकोचपूर्वक आपण असे साधन करीत असल्याचे मान्य केले आणि 'सद्‌गुरुवर भार घालून निष्ठापूर्वक साधन केल्यास, हे सर्व शक्य होते.' असे सांगितले व या काळात सांभाळावयाची काही पथ्ये त्यांनी स्पष्ट केली. भागवतकारांनी म्हटले आहे, 'जितेन्द्रियस्यात्मरतेर्बुधस्य गृहाश्रमः किं न करोत्यवद्यम्' (भाग. ५,१,१७)-ज्याने इंद्रिये जिंकली आहेत व जो आत्मस्वरूपात रममाण झाला आहे असा ज्ञानी पुरुष गृहस्थाश्रमात असला तरी त्याला अपाय होत नाही. संतांनी 'साधन हे सोपे' म्हटले असले तरी हा मार्ग तीक्ष्ण धारेच्या तलवारीवरून चालण्यासारखा कठिण आहे, याची असा तपस्येचा मार्ग



चोखाळणारांना प्रचीति येते.

केळकरसरांच्या आठवणी सांगण्याच्या भरात मी फार पुढे आलो. मी सिटीहायस्कूलमध्ये विद्यार्थी असतात 'केळकर सर रजेवर गेले, त्यांनी राजीनामा दिला' अशा बातम्या ऐकल्या. 'बदली झाल्याने असे झाले' असे काही माहीतगार मित्रांनी सांगितले. पुढे उत्तरायुष्यात समक्ष चौकशी केल्यावर समजले की सरांनी स्थलसीमेच्या मर्यादा घालून नामजपाचा संकल्प सोडला होता; बदलीच्या ठिकाणी जाणे म्हणजे संकल्प भंग; तो व्रतभंग टाळण्यास त्यांनी नोकरी सोडली.

१९४४ च्या गुरुपौर्णिमेला ब्र. भू. तात्यासाहेब कोटणीसांच्या पादुका श्रीदादासाहेब कोटणीसांचेकडून मला मिळाल्या. त्यापूर्वी तात्यासाहेबांच्या फोटोसमोर बसून मी परंपरागत उपासना करीत असे. पण पादुका घरी आल्याने जबाबदारी वाढली. उपासनेचे सर्व तपशील समूजन घेण्यास मी सांगलीस आलो. दादासाहेब सांगलीस नसल्याने व केळकरसरांची अधिकारसंपन्नता मला माहीत असल्यामुळे मी त्यांच्याकडे आलो. त्यांनी स्वतःची 'कैवल्यमार्गा' ची प्रत आवश्यक त्या स्थळी खुणा करून दिली व ब्र. भू. तात्यासाहेबांचे वेळी उपासनेचा बडिवार काय असे हेही सांगितले. 'बापा ज्ञानिया रे... गोविंदाचे भवभय हरुनि नेसि आपण स्वतः रे' हा त्यांचा अभंग लिहिलेली प्रत अद्याप माझ्या वापरात आहे. त्याप्रसंगी त्यांनी आपलेपणाने जे पारमार्थिक बारकावे सांगितले ते महत्त्वाचे होते.

१९५२ साली कोल्हापूरला माझी बदली झाल्याने, सांगलीला मी अधिक निकट आलो. त्यावेळी 'कीर्तनरंगी रंगलेले संत' असा मामासाहेबांच्या कीर्तीचा सुगंध सर्वत्र पसरलेला होता. गोकुळअष्टमी आणि हनुमानषष्ठी (पौष वद्य षष्ठी) या निमित्त मी सांगलीस आलो की सरांचे दर्शनास येत असे, त्यावेळी त्यांच्याविषयी मी जे ऐकत असे त्यावरून 'तितिक्षवः कारुणिकाः सुहृदः साधुभूषणाः ।।' (भाग. ३.२५.२१) - सत्पुरुष सहनशील, दयाळू, सर्व प्राणिमात्रांचे सुहृद्,

अजातशत्रू, शांत असतात. इत्यादि भागवतात वर्णन केलेली सत्पुरुषांची लक्षणे त्यांचे ठिकाणी मूर्तिमंत असल्याचे आढळते.

नामनिष्ठा हा केळकरसरांचा स्थायीभाव होता. त्यांच्या पठणात दासबोधातील नामभक्तीचा समास (४.३) असे. हा समास आणि 'एतन्निर्विद्यमा-नानामिच्छतामकुतो' भयम् (भाग. २.१.११) इत्यादि भागवतातील व संतवाङ्मयातील नामस्मरणाची माहात्म्यविषयक वचने एकत्र वाचली म्हणजे सर्व संतांच्या शिकवणीतील अभेद लक्षात येतो.

दुसऱ्याचा गौरव करणे हा सरांचा स्वभाव. माझ्या गौरवामुळे मला फार संकोचल्यासारखे होई.

मी एकदा त्यांना म्हणालो, 'सर, तुमच्या जाणतेपणी तात्यांचा सहवास तुम्हाला लाभला. पण तात्या गेले तेव्हा मी फार लहान होतो.' मला मध्येच थांबवून ते म्हणाले, 'तात्यासाहेब खरेच गेले असे तुम्हाला पटते का?' मी गोंधळलो. भौतिक शरीर म्हणजे सद्‌गुरु नव्हेत. देहपातानंतरसुद्धा सद्‌गुरु मार्गदर्शन करतात, हे त्यांना सुचवावयाचे होते.

तात्यासाहेबांनी स्वत:च्या देहपातानंतरच कीर्तनपरंपरा चालविण्याचा आदेश त्यांना दिला होता व वर्षानुवर्षे, नव्हे तपानुतपे ते ती आज्ञा पाळत होते. इतकेच नव्हे तर स्वत:चा देहपात होत असतानासुद्धा दि. १२-२-१९६२ रोजी सायंकाळी ५ वाजता, 'श्रीराम जयराम जयजयराम' म्हणा हे शब्द उच्चारून ती आज्ञा मामासाहेबांनी पाळली. धन्य धन्य त्या सद्‌गुरुभक्त मामांची!

आमच्या सरांचे जीवन हाच श्रेष्ठ पारमार्थिक जीवनाचा आदर्श वस्तुपाठ होता, ग्रंथ होता. त्यामुळे ग्रंथरचना करून प्रसिद्धि मिळविण्याची इच्छा त्यांना झाली नाही. पण परमार्थात इतक्या रंगलेल्या संतांचेकडून काही वाङ्मय सेवा करवून घेऊन त्यांचे नंतरच्या पिढीला मार्गदर्शन व्हावे, अशी ईश्वरी इच्छा होती. तीर्थरुपांच्या इच्छेनुरूप मामांनी साधन-मार्गास धरून 'श्रीहनुमद्‌गुरूचरित्रबोधसार' हे तात्यासाहेबांचे चरित्र लिहिले (१९३७). या चरित्रात ठिकठिकाणी अंतरीच्या



खुणा आढळतात.

परमार्थातील ब्रह्मानंदाचे आकंठ पान करून मामासाहेबांना स्फुरलेले सहजोद्गार अभंग-पदांचे रूपाने विखुरले आहेत. त्यांचा संग्रह करून त्यांना योग्य ती प्रसिद्धि त्यांचे चिरंजीव ह. भ. प. संत रामराय केळकर देतीलच.

माझ्या दृष्टीने मामासाहेब केळकरांचे सम्यग्दर्शन घडविणारी त्यांची रचना म्हणजे 'श्रीरामपाठ'. ३२ अभंगांच्या या छोट्या रचनेत त्यांनी आपले तत्त्वज्ञान व उपासना-मार्ग यांची सूत्रमय, सूचक भाषेत अतिशय सुबोध मांडणी केली आहे. नवीन आवृत्तीतील प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी दिलेला उपन्यास वाचून 'रामपाठ' वाचल्यास, ब्र. भू. मामासाहेबांच्या पारमार्थिक अधिकाराविषयी अधिक स्पष्ट कल्पना येईल. ''श्रीरामपाठ म्हणजे मामा'' हे संत श्रीरामरायांचे शब्द अक्षरश: खरे आहेत.

तात्यासाहेबांचे नंतर अडतीस वर्षे ज्यांनी सतत नामगंगेच्या प्रवाहाने या भूभागास तीर्थत्व आणले, आणि 'भजनपूजन साधूनी बळे । जिंकियेले कळिकाळ।।' अशा संतमालिकेत ज्यांना श्रेष्ठ स्थान आहे, त्या महाभागवत मामासाहेबांना मी सादर प्रणाम करतो.

***

## (१४)

## मला दिसलेले दोन मामा

**- प्रा. रा. कृ. ऐनापुरे**, सांगली.

''...जैसे हरिहर प्रेमभावे । आले खेवा ।।''

''आपण सर्व श्रोते रोजच माझे कीर्तन ऐकता. आता माझी ही कीर्तनसेवा मी थांबवितो, व सोनोपंतांना प्रवचन करण्याबद्दल विनंति करतो. आज आपण त्यांचेच ऐकू या.''

''मी मुद्दाम बापूरावजींचे कीर्तन ऐकण्यासाठी आलो. पण जेवायला

आलेल्याला त्यांनी वाढायला लावले!''

वरील पहिले वचन श्रीबापूरावजी उर्फ मामासाहेब केळकरांचे; दुसरे, सोनोपंत म्हणजे मामासाहेब दांडेकर यांचे. सुमारे दहा वर्षापूर्वीची गोष्ट. सांगलीस दरवर्षी पौष महिन्यात श्रीहणमंतरावजी कोटणीसमहाराजांची पुण्यतिथि समाधिमंदिरात व कैवल्यधामात साजरी होते. दरवर्षी समाधिमंदिरात ह. भ. प. मामासाहेब केळकरांचे कीर्तन असे, तर कैवलधामात ह. भ. प. मामासाहेब दांडेकरांचे एक दिवस निरूपण किंवा प्रवचन असे. एक वर्षी संध्याकाळी मामासाहेब दांडेकर समाधिमंदिराकडे निघाले. तेव्हा मामासाहेब केळकरांचे कीर्तन चालू होते. दांडेकर मामा आलेले पहाताच केळकरमामांनी वर दिलेले उद्गार काढले व ते खाली बसले. दांडेकरमामांनी वरीलप्रमाणे विनोदी उपोद्घात करून, ''सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रता:'' या गीतावचनावर प्रवचन केले.

महत्संगस्तु दुर्लभः अगभ्यः ।<br>
बहु अवघड आहे संतभेटी ।<br>
परि या जगजेठी करुणा केली ।।

माझ्या पूर्वसुकृताने या दोन्ही मामांचा थोडाफार सहवास मला लाभला. भोर येथे दांडेकरमामांचे प्रथम दर्शन तर बालवयातच घडले व त्यांच्याच कृपेमुळे इथे सांगलीला आल्यावर, श्रीकेळकरमामांचे दर्शन व सहवास यांचा पुण्यलाभ घडला. या दोन संत मामांचे जीवन पाहताना त्यात आढळणारे साम्य पाहून, माझे मन तर अगदी आश्चर्यचकित होऊन जाते. दोघांचाही जन्म घरंदाज व 'शुचीनां श्रीमतां गेहे' झालेला. दोघांनाही अगदी बालवयापासून देवधर्माची, कथा कीर्तनाची आवड. जणू काय ध्रुवप्रल्हादाचा वारसा घेऊन आलेले. दोघेही बालभक्त अलौकिकच!

दोन्ही मामांनी नोकरी केली ती शिक्षण क्षेत्रातच. पारमार्थिक मनोभूमिकेशी जुळणारा हा व्यवसाय! त्यांच्या पवित्र मनावर 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह



विद्यते' हे भगवद्वचन ठसावे, हे स्वाभाविकच आहे. केळकरमामा येथील सिटी हायस्कूलमध्ये मॉरल व सायन्सचे शिक्षक होते, तर दांडेकरमामा स. प. महाविद्यालयात तत्त्वज्ञान शिकवीत. 'धर्मासी नीतीशी शेस भरण्या' चे हे देवकार्य या दोघांनी अंगीकारले खरे; पण त्यासाठी त्यांनी बालपणापासून स्वीकारलेली व जोपासलेली ईश्वरनिष्ठा मात्र यत्किंचित्‌ही ढळू दिली नाही. त्यांच्या जीवनात मध्यबिंदु होता ईशसेवा, व त्या अनुषंगाने लौकिक जीवनाचे वर्तुळ.

ईशसेवेत अंतराय होऊ पहात आहे हे केळकरमामांना दिसून येताच त्यांनी तत्काळ नोकरीचा राजीनामा दिला व सर्वस्वी भगवंताची सेवा चालू ठेवली. तसे काही दांडेकरमामांचे बाबतीत घडले नाही. दांडेकरमामांचे आषाढी-कार्तिकी वारीचे व्रत. दरवर्षी वारीसाठी रजा घ्यावी लागणार, याची जाणीव करून देऊनच ते शिक्षण प्रसारकमंडळीचे आजीव सदस्य झाले होते. त्यातूनही काही घडलेच तर खिशात राजीनामा तयार होताच, पण तसा काही प्रसंग आला नाही. संस्थेने त्यांची योग्यता ओळखून, त्यांना हव्या त्या सवलती दिल्या.

हे दोघे केवळ विद्यार्थ्यांचेच मार्गदर्शक नव्हते, तर समाजालाही उत्तम वळण लावणारे होते. आता तरी आपल्या सर्वांच्या अनुभवाला ही गोष्ट आलेली आहे. ''तुका म्हणे तैसे संत आणि जन । दोहोंशी समान मानू नये ।।''

''ज्ञानदेव गुरू ज्ञानदेव तारू । उतरी पैलपारू ज्ञानदेव ।।''

केळकरमामा व दांडेकरमामा या दोघांचीही श्रीज्ञानेश्वरमाऊलीवर अत्यंत प्रखर निष्ठा होती. दोघांचेही जीवनसर्वस्व ज्ञानोबामाऊली. केळकरमामांच्या जीवनातील पुढील दोन प्रसंग अंत:करण हेलावणारे आहेत.

एकदा प्लेगच्या आजारात त्यांची नाडी थांबली. 'हे आटोपले' म्हणून बाहेर लोकांनी तयारी चालविली. आत हलकल्लोळ उडाला. काही वेळ गेला. केळकरमामांनी डोळे उघडले व क्षीण आवाजात ते पाणी मागू लागले. प्लेगमधून वाचले. पुढे त्यांनी सांगितले, ''सूक्ष्मदेहाने मी वर चाललोच होतो. पण

ज्ञानाईच्या कृपेने परत माघारी आलो.'' प्लेगच्या दुखण्यात उशाशी फक्त श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा फोटो होता. या दुखण्यातून बरे झाले खरे पण जिभेवर परिणाम झाला. बोलणे अशक्य झाले. लोकांनी अनेक औषधे सुचविली, ती मामांनी दुर्लक्षिली. भगवती ज्ञानेश्वरीची १०८ पारायणे सुरू केली आणि ज्ञानेशांच्या कृपेने वाणी पुन: पहिल्यासारखी झाली. 'करील ते काय नोहे महाराज' या तुकोबांच्या समर्थवाणीचा लोकांना पुन्हा प्रत्यय आला.

दुसरा प्रसंग आळंदीतला आहे. केळकरमामा दर्शनास आलेले. पण जुलाब सुरू झाले. पण तसेच खुरडत, लोळण घेत, ज्ञानोबामाऊलींच्या संजीवन समाधीपुढे आले व हात जोडून म्हणाले, ''ज्ञानोबा माऊली, देहाचा मोह नाही. पण सेवा अंतरत आहे. म्हणून वाईट वाटते. आपल्या कृपेने जगलो तर चरणसेवा साधेल. इतक्याउपर आपली इच्छा!'' आणि आश्चर्य असे की जुलाबाचे दुखणे कुठल्या कुठे पळून गेले.

'गृहस्थाश्रमात पडू की नको' याचाही कौल केळकरमामांनी माऊलीला लावला व माऊलीच्याच दृष्टांताने गृहस्थाश्रम स्वीकारला. या प्रसंगी केळकर मामांना झालेले श्रीज्ञानेशांचे नाथपंथीय दर्शन एक आगळेच मानले जाते. त्या दर्शनानुरूप मामांनी स्वहस्ते काढलेले ज्ञानेश्वरांचे चित्र आज त्यांचे घरी पहाण्यास मिळते.

मामासाहेब दांडेकरांचेही सगळे जीवन माऊलीच्या चिंतनाशी समरस झालेले आढळते. अगदी बालवयातच त्यांना वै. जोगमहाराजांचा सहवास लाभला. बोवांच्या कृपेने मामांना ज्ञानेश्वरीची गोडी लागली व ते ज्ञानराजांच्या भक्तीकडे ओढले गेले. त्यांनी जन्मभर ज्ञानेश्वरीचे जे चिंतन केले ते त्यांच्या स्वसंपादित ज्ञानेश्वरीत जवळजवळ १५० पानांच्या प्रदीर्घ प्रस्तावनेच्या रूपाने आपल्यापुढे आलेले आहे.

मामांच्या बोलण्यात, सांगण्यात, किंवा लिखाणात कधीही ज्ञानेश्वरमहाराजांचा अगर कोणत्याही संतांचा उल्लेख एकेरी केलेला आढळत नाही.



**नाही पारू गुरूभक्ती (ज्ञा. १३-४५२)**

दोन्ही मामांची आपल्या सद्‌गुरुवरील निष्ठा अजोड होती. गुरुघरची मोलकरीण आली तरी केळकरमामा तिच्या पायांवर डोके ठेवीत. 'ऐसे या गुरुग्रामीचे आले । का स्वये गुरूनीच धाडिले । तरी गतायुष्या जोडले । आयुष्य जैसे ।।' या ओवीची आठवण करून देणारा हा त्यांचा श्रेष्ठ भाव आढळून येई. गुरुवर्य तात्यासाहेब कोटणीसमहाराजांनी 'तू आता दररोज कीर्तन करीत जा,' हा दिलेला आदेश त्यांनी आमरणान्त कसोशीने पाळला व 'गुरूआज्ञे निवासु । आपणची' हे खरे करून दाखविले.

श्री. दांडेकरमामांचीसुद्धा गुरुभक्ती अशीच अलौकिक होती. 'गुरुबंधु सौजन्ये सुजनु' किंवा 'गुरुसंप्रदायधर्म । तेची जयाचे वर्णाश्रम' हा ज्ञानराजांचा आदर्श मामांचा स्थायी भाव झाला होता. 'विष्णुसहस्रनाम' ते रोज म्हणत. पण आपल्या गुरूंचे नाव 'विष्णु' आहे, म्हणून त्यांची त्या स्तोत्रावर कमालीची भक्ति.

''कोणी काहीतरी केली आचरणे । मज या कीर्तनेवीण नाही ।।''

दोन्ही मामांनी जीवनभर कीर्तन उपासना केली, स्वान्त:सुखाय केली. या दुसऱ्या भक्तीत दोघेहीजण स्वत: रंगले व लोकांनाही रंगविले, तल्लीन करून टाकले. हजारो लोकांना मेघवृष्टिन्यायाने उपदेश केला, अंतरातल्या तळमळीनं. या दोघा साधुपुरुषांच्या कीर्तनगंगेत अनेक तृषितांनी आपली तहान भागवून घेतली, अनेकांनी आपल्या जीवनमाळाचे नंदनवन बनविले, अनेकांच्या जीवन रोपट्यांचे डौलदार वृक्ष झाले. हे सर्व करीत असता दोघा मामांनी कधी कंटाळा केला नाही की शिणवठा मानला नाही. जणू 'सासिन्नले प्रसन्नतेचे मळे' 'किंबहुना दिवसरात्री । पुढीलांचे सुख उन्नती । आपीत आपीत स्वार्थी । प्रवेशिजे ।' हे ध्येय डोळ्यापुढे सदोदित ठेवलेले असे. हे 'आधुनिक' 'कृपावन्त संतद्वय' त्यांची 'काय मी पतित कीर्ति वानू?'

बापूरावमामांचे व सोनेपंतमामांचे एकमेकांवरील प्रेम निरतिशय, नि:स्वार्थ,

निर्हेतुक व निरामय असे होते. पुण्यास गुरूवर्य सोनुमामांचे दर्शनास मी जेव्हा जेव्हा जाई, त्या त्या वेळेस त्यांचा पहिला प्रश्न असायचा, ''बापूरावजी कसे आहेत?'' ते इथे सांगलीस आल्यावर, कामाची कितीही गडबड नि घाई असली तरी ते केळकरमामांचे घरी, थोडा वेळ का होईना, जाऊन यायचेच. दोघा महात्म्यांच्या अशा या दिव्य प्रेमाचे वर्णन ज्ञानराजमाऊलींच्या खालील ओवींत करून, ही वाङमयपूजा 'गोविंद-शंकर' या हरिहरांच्या चरणी विनम्र भावाने अर्पण करतो-

''जैशी जवळिकेची सरोवरे । उचंबळलिया कालवती परस्परे ।
मग तरंगासी धवळारे । तरंगची होती ।।

***

## (१५)

## मामा : स्मरण आणि चिंतन

**- प्रा. डॉ. गं. वि. कुलकर्णी,** कोल्हापूर

**''हा पुरुष म्हणजे संसार मोजण्याचे मापन किंवा अष्टांगयोगाची सामग्री दाखविणारा जणू दिवाच होय! ज्याप्रमाणे सुवासानेच चंदनाचे रूप धरावे, त्याप्रमाणे हा पुरुष जसा काही संतोषाचाच बनविलेला अथवा सिद्धांच्या समुदायातून काढलेला असावा, इतक्या योग्यतेचा साधकदशेत तयार झालेला दिसतो.''**

**- संत ज्ञानेश्वरमहाराज**

बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट. मी सांगलीच्या सिटीहायस्कूलमध्ये शिकत होतो. माझा थोरला भाऊही तेथेच शिकून मॅट्रिक झाला होता. तो आम्हाला सांगायचा, ''आपल्या शाळेत केळकरसर होते. फार चांगले शिकवीत. पण त्यांनी शाळा सोडली आणि आता ते कीर्तन करतात.'' आम्हाला तेव्हां कुतूहल वाटायचं, सिटीहायस्कूलसारख्या मातब्बर शाळेतली नोकरी सोडून जन्मभर कीर्तन करीत



रहाणारे हे केळकरसर आहेत तरी कोण? आणि ते परमार्थ करतात म्हणजे करतात तरी काय? पण ते तेवढ्यावरच राहिलं. त्यांचं नांव अधूनमधून कानावर येई. त्यांच्या राममंदिरातील कार्यक्रमाची घरी व आसपास चर्चा होई. पण वर्तमानपत्रात त्यांचे नाव आलेले आम्ही पाहिले नाही. गाजावाजा न करता, आपल्या साधनात आणि आत्मानंदात ते रंगून लौकिक जीवनापासून पराङमुख झाले असावेत. काही असो, त्यावेळी त्यांचे दर्शनाचा सुयोग मला आला नाही, एवढेच खरे.

**ते अविस्मरणीय दर्शन ! ते कीर्तन !**

त्यानंतर बऱ्याच वर्षांनी तो सुयोग आला. मी नुकताच मोठ्या आजारातून उठलो होतो. त्रिविध तापांनी होरपळून पोळून निघालेल्या माझ्या मनाला संत-संगाची विलक्षण तहान लागली होती. श्री. अप्पा खुजगावकर हे आमचे निकटचे आप्त. त्यांची व मामासाहेबांची ओळख होती. त्यांच्याबरोबर मी राममंदिरात गेलो. वेळ सकाळची, प्रसन्न वातावरण. शुभ्र पोषाख केलेले, साध्या वेषातले मामा येरझारा घालीत होते. त्यांना तेव्हा मी प्रथमच पाहिले. त्यांची धीरगंभीर, सात्त्विक मुद्रा, गौरवर्ण, ठेंगणी मूर्ती पाहून मन प्रसन्न आणि आदरयुक्त झाले. नम्रभावाने वाकून मी त्यांना वंदन केले. त्यांना माझी ओळख करून दिली गेली. त्यांनी फार आस्थेने माझी चौकशी केली. आपल्या करुणार्द्र, प्रेमळ नजरेने मला न्हाऊ घातले. मला फार मोठा दिलासा वाटला, धीर आला. दिव्यत्त्वाची तेथे प्रचीति आली. ती शब्दांत मावणारी नव्हती. माझी आर्तता पाहून मामांनी मार्गदर्शन केले. 'नाम नियमानं घेतलं पाहिजे. सुरवातीस थोडा वेळ घेतलं तरी हरकत नाही. पण मन निर्विकार आणि निर्विचार राहिलं पाहिजे.' मामा फार बोलले नाहीत. प्रसाद म्हणून त्यांनी आपल्या चिरंजीवाकडून 'श्रीज्ञानेतेहत्तिशी' हे पुस्तक देवविले, आणि आपला आशीर्वाद दिला. तो प्रसाद मी अजून जपून ठेवला आहे.

खरोखरच ते पहिले दर्शन अविस्मरणीय होते. माझ्या जीवनातले ते सुवर्ण

क्षण होते. त्या क्षणात जणू ईश्वरी कृपा साक्षात् अवतरली होती, 'कैवल्याचे रोप लावियले द्वारी.'

त्यावेळी मी काही दिवस सांगलीस राहिलो. मामांच्या सायंकाळच्या कीर्तनास मी जाई. अजून एक कीर्तन आठवते. फाल्गुनी पौर्णिमेचा दिवस होता. 'गीत-गान' या विषयावर मामा कीर्तन करीत होते. त्यांचे पाठांतर जबर होते. आवाज गोड आणि धीरगंभीर होता. विषय-प्रतिपादनात कळकळ आणि विलक्षण तन्मयता होती. परमार्थाशिवाय दुसरा विषय त्यात नव्हता. अस्सल प्रासादिक विचार प्रासादिक भाषेत उमटत होते. संतांचे मनोगत खुले होत होते. नामस्मरण, ईशस्मरण हा केंद्रबिंदु होता. भक्तीचा जिव्हाळा आणि ज्ञानाची व्यापकता यांचा गंगायमुनासंगम पाहण्याचे व त्यात स्नान करण्याचे भाग्य मला तेथे मिळाले. 'कीर्तनाचेनी नट नाचे । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे । जे नामाची नाही पापाचे । ऐसे केले ।।' या ज्ञानेश्वरमहाराजांच्या वचनाची रोख प्रचीति मला तेथे येत होती. पुनीत होऊन भारावलेल्या अंत:करणाने मी तेथून बाहेर आलो. हे कीर्तन माझ्या कायमचे स्मरणात राहिले आहे.

### पुन: श्रीराममंदिरात

पहिल्या भेटीचे वेळी मामांचे चिरंजीव श्रीरामराय यांची ओळख झाली होती. त्यांनी लिहिलेले 'ज्ञानदेवतेहत्तिशी' वरील भाष्य मी वाचले होते. एवढ्या लहान वयात इतका अवघड विषय त्यांनी आत्मसात् केला व अधिकारवाणीने त्यावर सुलभ भाष्य लिहिले, याचे मला आश्चर्य वाटे. संत मामांच्या आपल्या पूज्य पिताजींच्या पावलावर पाऊल टाकून परमार्थात सबंध जीवन व्यतीत करणारे, अखंड कीर्तनाची परंपरा चालविणारे श्रीरामराय हे मला मामांच्या इतकेच वंदनीय वाटले. गुरुकृपेशिवाय व पूर्वसुकृताशिवाय ही गोष्ट अशक्य आहे! त्यांच्या पुनर्भेटीचा योग अलीकडे आला.

त्याचे असे झाले- काही कामानिमित्त मी सांगलीत आलो होतो. आमचे आदरणीय स्नेही ह. भ. प. गोविंदराव जरंडीकर यांच्या प्रेरणेने श्री. दिवेकरांच्या



घरी काही परमार्थप्रेमी मंडळींसह आम्ही जमलो होतो. पू. मामांच्या आठवणी निघाल्या. श्री. दिवेकरांनी लिहिलेले 'श्रीगोविंदचरितमानस' हे मामांचे चरित्र त्यांच्याकडून मिळाले. मी ते चरित्र अधाशीपणाने वाचले आणि मला धन्य वाटले. मामांच्या उदात्तरम्य जीवनाची ती रसाळ गाथा वाचून मन गहिवरून आले. अत्यंत आनंद वाटला. मामा किती थोर होते, लहानसहान गोष्टीतही त्यांची थोरवी कशी दिसून येई, त्यांची भक्ति केवढी अगाध होती याची कल्पना आली. मामांची मूर्ति, त्यांच्याविषयीचा आदर व भक्तिभाव माझ्या हृदयात पुन्हा प्रज्वलित झाला. पुन्हा एकदा राममंदिरात जाऊन, तो महापुरुष ज्या वास्तूत वावरला तिचे दर्शन घ्यावे व पावन व्हावे, श्रीरामरायांची भेट घ्यावी, अशी ओढ लागली. लौकरच तसे घडले. पू. मामांच्या सिंहासनास व पू. कोटणीसमहाराजांस वंदन केल्यावर तास दीड तास श्रीरामरायांच्या संगतीत कसा गेला कळलेही नाही. प्रत्यक्ष संत मामांची भेट झाल्याचा तो आनंद केवळ शब्दातीत होता. संत देहाने गेले तरी सद्भाव असला तर ते आनंदरूपाने प्रगट होतात व आपल्या चिरंतन अस्तित्वाची जाणीव देतात. मामांच्या आशीर्वादाची शिदोरी घेऊन मी बाहेर पडलो.

### संत मामांचे मोठेपण : थोडे चिंतन

संत मामांचे मोठेपण समजणे सोपे नाही. ते समजले असे म्हणणेही धारिष्ट्याचे आहे. तथापि त्यांच्या मोठेपणाची एक चतु:सूत्री मला जाणवली. प्रथमत: त्यांची अनन्य निष्ठा, परमार्थाच्या आड येणाऱ्या नोकरीचा त्यांनी केलेला त्याग, एक दिवसही खंड न पडता शेवटच्या श्वासापर्यंत केलेले कीर्तन, शांतपणे सहन केलेले सारे भोग. दुसरी गोष्ट : त्यांची प्रतिभासंपन्नता. रोज नवे कीर्तन करून नामस्मरणाचा विषय त्यांनी रंगवला. ते स्वत: रंगले व इतरांनाही त्यांनी रंगविले. हजारो अभंग, पदे त्यांनी लिहिली. त्यांचा परमार्थ यांत्रिक नसून निर्मितिक्षम (क्रिएटिव्ह) होता. तिसरी गोष्ट - अधिकारसंपन्नता, 'आधी केले मग सांगितले', 'बोले तैसा चाले', अशी त्यांची साधी विनम्र जीवनपद्धती

असल्यामुळे व त्यांच्या श्रेष्ठ गुरुभक्तीमुळे व तपश्चर्येमुळे त्यांना उपदेश करण्याचा अधिकार होता. त्यांच्या वाणीत, सबंध व्यक्तिमत्त्वात तेज भरून राहिले होते. तरीही ते अत्यंत निरहंकारी हाते. चवथी गोष्ट- प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय आणि भगवद्गीतेच्या अर्थाने लोकसंग्रह. त्यांच्या परमार्थाला प्रपंच आड न येता तो सहाय्यकच झाला. आपल्या उदाहरणाने त्या दोहोंचा समन्वय शक्यच आहे. इतकेच नव्हे तर इष्ट आहे, हे त्यांनी दाखवून दिले. त्यांची साधना जितकी वैयक्तिक तितकीच सामाजिक होती. कोऱ्या कागदाने शुभ्र व कोरे रहावयाचे ठरविले तर तो शुभ्र निष्कलंक रहातो, पण शेवटी 'कोरा'च ठरतो. पण सामान्यांना जवळ करूनही जो निष्कलंक रहातो, तो तसा असूनही कोरा उरत नाही. 'स्वार्थो यस्य परार्थ एव' या कोटीतले मामा होते. त्यांनी एकान्त व लोकान्त दोन्हीही साधले. मामा ज्ञानी भक्त असल्यामुळे त्यांना हे सहज साधले. खऱ्या अर्थाने मामांनी जीवनाचे 'सार्थक' केले व इतरांनाही ही सार्थकता दिली आणि ते 'आधुनिक एकनाथ' ठरले.

अशा महापुरुषाला पू. कोटणीसमहाराजांनी देहपातानंतरही दर्शन देऊन, कीर्तनाचा आदेश दिला, तर त्यात नवल काय? ते आचऱ्याला समुद्रदर्शनाला गेले असतांना, ओहोटी असतानाही, समुद्र त्यांच्या पदस्पर्शासाठी धावला तर आश्चर्य काय? थोर गुरुभक्त म्हणूनच सद्गुरु त्यांचा गौरव का बरे करणार नाहीत?

### एकच आदेश

पू. मामांच्या बाह्य जीवनाचे अनुकरण आपणास साधणार नाही, तरी स्वत:च्या अंतरात्म्याशी एकनिष्ठ राहून, सहजानंदात रमून, अखंड नामस्मरण करण्याचा त्यांचा आदेश आपण जीवनात आणल्यास, त्यांची खरी सेवा (से=आठवण वा=उत्तम) केल्यासारखे होईल.

**'एक तत्त्व नाम दृढ धरी मना'** हे स्वत: आचरून, इतरांना सांगण्यासाठी त्यांचा अवतार होता हेच त्यांचे खरे जीवन आणि हाच त्यांचा खरा संदेश!



त्यांचे पुण्यस्मरण करतांना, आपण एवढेच म्हणू-

**धन्य त्यांचे जीवन । धन्य त्यांचे स्मरण । धन्य त्यांचे वचन । राममय ।।**

***

## (१६)

## धन्य ते मामा !

**-मोरेश्वरबुवा कुलकर्णी**

झाले बहु सांगलीसी अधिकारी थोर श्रेष्ठ अमित भले ।
आत्मपरी स्थिर होऊनि नम्रत्वे वंद्य ठरती जे आगळे ।।

असे गु. प. पू. मामा होते. 'अमानित्वं अदम्भित्वं अहिंसा क्षान्तिरार्जवम्' या गीतेतील श्लोकाचे प्रात्यक्षिक म्हणजे मामा.

जागृति स्वप्न सुषुप्ति परमात्मा एक वस्तु अंतरी ते ।
अद्वैत भाव संतत नम्रपणे सर्व भूती भीतरी ते ।।

भगवंताशी अखंड अनुसंधानामुळे सर्वांभूती शुद्ध भाव आणि सम दृष्टि हेच मामांचे बाबतीत प्रत्ययास येई.

इ. स. १९२७ पासून मी मराठी सातवीसाठी सांगली धरली, ती आजतागायत. माझ्या सौ. मातोश्री ह्या वारकरी संप्रदायातील निष्ठावंत. त्यांच्या बरोबरच गु. मामांचे कीर्तनासाठी जाण्याची संधि मिळे. या नामसंकीर्तनानेच भगवंत प्रसन्न होऊन जीवन सफळ होते, म्हणून कीर्तनभक्ति परम श्रेष्ठ. श्रीसद्गुरु तात्यासाहेबांची पूर्ण कृपा संपादन करून, त्यांचे हे कार्य अविरत चालविण्याचे मामांचे ध्येय परम भाग्याचे वाटते.

मामांची रहाणी अगदी साधी असे. पोषाखही साधाच. त्यांना पाहताक्षणीच एक प्रकारचे सात्त्विक प्रेमाचे भरते येई. सकाळ दुपार त्यांचेकडे केव्हाही जावे. ते आपल्या उपासनेत गढलेले असत. तरीही प्रत्येकाशी चार शब्द बोलत. त्यांची भाषा म्हणजे- साच आणि मवाळ । मितुले आणि रसाळ । शब्द जैसे

कल्लोळ । अमृताचे ।। या ज्ञानेश्वरीतील उक्तीनुसार. कधी ते मोठ्याने किंवा रागाने बोलल्याचे स्मरत नाही.

पहाटेपासून मामांची दिनचर्या अगदी ठरलेली. श्रीतुकाराममहाराजांचे १२ अभंग ते अनेकदा म्हणत. सकाळी ८ वाजता दासबोध वाचन. संध्याकाळी प्रवचन व कीर्तन. नंतर रात्री एकांतातील मुख्य साधन. कीर्तन सेवेत व्यत्यय नको म्हणून त्यांनी सिटी हायस्कूलमधील आपली शिक्षकाची नोकरीही सोडली.

प्रथम त्यांची आर्थिक परिस्थिति चांगली होती. पण नोकरी सोडल्यावर त्यात कुचंबणा होत गेली. शारीरिकदृष्ट्याही रोगग्रस्त स्थितीशी तोंड द्यावे लागले. तथापि या सर्व परिस्थितीमध्ये एका आत्मिक बळाचे सामर्थ्यामुळे त्यांची साधनावृत्ति हलली नाही. अडचणींचे निवेदनही त्यांनी कोणाजवळ केले नाही. सर्व सोसून ते आनंदात असत.

गु. प. पू. मामांनी ३८ वर्षे बिनचूकपणे, वक्तशीरपणे, अव्याहत कीर्तनभक्ति साधली. त्यांचे कीर्तनात मुख्यतः नामाचे महत्त्व व त्यासाठी लागणाऱ्या चित्तशुद्धीच्या साधनाची आवश्यकता, हा मुख्य भाग असे. कीर्तनात तबला, पेटी, इत्यादींची साथ असायची; पण त्यांचा उपयोग फक्त नामचिंतनासाठीच. नहून त्याविना काही नडण्यासारखे नव्हते. ज्यांना अंतरंगातील जिव्हाळ्याचा स्वर साधला त्यांना बाह्य स्वराचे काय? मामांचे अस्खलित कीर्तन ऐकून श्रोते तटस्थ होत. विवेचनात गोष्टी येत, पण त्यामुळे विषयाचे गांभीर्य वाढे. कीर्तनात भक्तिज्ञानाव्यतिरिक्त अन्य विषय ओढून ताणून आणण्याचे प्रयत्न मामा कधीच करत नसत.

गुरूभक्त परमश्रेष्ठची भूषण हे सांगली सदा ठरले ।
कीर्तनगंगे न्हावुनी भक्तिमार्गीय पुनीत जे केले ।।

गु. प. पू. मामांना पाहून, 'आंतर बाह्य शुचिता' या वाक्याची प्रचीति अनेकांनी घेतली. मामांचे सहज बोलण्यातूनसुद्धा, भेटणाऱ्या व्यक्तीवर सुविचाराचा ठसा उमटत असे.



तुका म्हणे करून दावी । त्याचे पाय माझे जीवी ।।

ज्या मामांचे सर्व आयुष्य भक्तिमार्गात गेले, त्या मामांचे घरातील सर्वच वातावरण व्यावहारिक व पारमार्थिक उन्नतिपर ठरणे साहजिक होय.

भक्ति ज्ञानविरागे संगमी नित सर्वकाळ वसती जे ।
नामामृत सेवुनिया वाटियले तेचि अमृता सहजे ।।

जन्मभर कीर्तनसेवा करून मामांनी आम्हा भोळ्या भाविकांसाठी हे परमार्थ भांडार खुले करून ठेवले. मामांच्या कीर्तनश्रवणाचा लाभ असंख्य लोकांनी घेतला आहे. मी एक सामान्य श्रोता. कीर्तनातील विषयास अनुसरून मी एखादा अभंग म्हणत असे. प्रत्येक वेळी मामा गोड करून घेत. त्यांच्या आशीर्वादाचे फळ म्हणजेच माझी भगवन्नामाची गोडी वाढत आहे.

वै. गु. मामासाहेब दांडेकरांना मामांचेविषयी आत्यंतिक आदर असून, ते येथे आल्यावेळी केळकरधामात स्वतः येऊन मामांची भेट घेत. गु. कै. दांडेकरांनी सर्वत्र हिंडून भागवतधर्माचा प्रसार केला; आणि गु. मामांनी सांगलीत राहूनच हे कार्य अखंडपणाने केले.

श्रीसंत मळणगावकरमहाराजांनाही केळकरांचेबद्दल आत्यंतिक आदर वाटत होता.

वाचे बरवे कवित्व । कवित्वी बरवे रसिकत्व । रसिकत्वे परतत्त्व । स्पर्शू जैसा ।। या माऊलींचे ओवीप्रमाणे गु. मामांनी काव्यरचना विपुल केलेली आहे. त्यांचे काव्यामध्ये मुख्यतः परतत्त्वाचा भाग असून, त्यांचे मुखातून अनेक वेळां अधून मधून ते ऐकावयास मिळाल्याचे स्मरते. मामांचा रामपाठ हा तर श्रीज्ञानेश्वरमाऊलींचे हरिपाठाइतका आम्हास पूज्य वाटतो. अलीकडे काव्यनिर्मिति भरपूर होत आहे. पण त्यातील विषय अगदी सामान्य. पण नरदेहाचे सार्थक कशात आहे, श्रद्धा कोठे ठेवावी, हे सांगून परतत्त्वाचा भाव जागृत करणारे काव्य आवश्यक नाही काय?

मामा हे अजातशत्रु असून, सर्व ठिकाणी ईश्वर पहाणारे होते.

निर्वैर शांत राहुनी सर्वपणे आयु साच भूषविले ।
हरिनामी रंगुनिया सर्वत्री ईशतत्त्व जाणितले । असे मामा होते.

सत्श्रवणाचे महत्त्व फार आहे. मन एकसारखे परमार्थामध्ये रंगण्यास श्रवण हेच युक्त साधन होय. गु. मामांनी आमच्या कृष्णाकाठच्या सांगलीस आपले कीर्तन ऐकवून पवित्र केले आहे. नामस्मरणानेच परमात्मा निकट राहून भक्तास खरी दृष्टी प्राप्त करून देतो. म्हणून 'सर्व काही नामानेच होते' हे मामांचे ठरलेले वाक्य असे.

निरहंकारवृत्तीने राहून, परमात्म्याशी ऐक्य भावाचे नाते साधून, ज्यांनी इहलोकीही धन्यता मिळविली ते महापुरुष मामा धन्य होत.

उत्तम ते उरे कीर्ति मागे । 'पुण्यवंत व्हावे । घेता सज्जनांची नावे'; म्हणून या थोर संतांचे मामांचे स्मरण माझ्याप्रमाणेच सर्वांना होणे साहजिक आहे.

***

## (१७)

## मामा आणि दादा

**- श्री. भाऊसाहेब जोशी, सांगली**

मामांनी परमार्थासाठी आपले सर्व आयुष्य वेचले, गुरुआज्ञा प्रमाण मानून, अखंड कीर्तन ३८ वर्षे केले. संत शिरोमणी तुकाराममहाराजांचे खालोखाल 'आधुनिक तुकाराममहाराज' अशी संज्ञा मामांना उचित होईल. 'बोले तैसा चाले' या उक्तीप्रमाणे मामांनी ३८ वर्षे अखंड नामसंकीर्तन केले, म्हणून ते वंदनीय झाले.

स्वप्नातील दान खरे करून दाखवून राजा हरिश्चंद्राने हलाहल कष्ट सहन केले. त्यातच राजा हरिश्चंद्राचे श्रेष्ठत्त्व दडलेले आहे. मामांच्या बाबतीतही तसेच आहे. एकदा मामा दासबोध वाचीत असताना, श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज प्रगट झाले व त्यांनी मामांना कीर्तन करण्याची आज्ञा केली. ती प्रमाण मानून



मामांनी ३८ वर्षे कीर्तन केले. त्यात खंड होऊ नये म्हणून त्यांनी नोकरीचा राजीनामाही दिला व भगवद्भक्तीत सारे आयुष्य वेचले. सतत नामस्मरण, पारमार्थिक वाचन व चिंतन आणि मनन हा मामांचा छंद होता. दिवसातून चार वेळां कीर्तन करावे लागले तरी मामा आनंदाने आणि जोमाने करीत. कीर्तनासाठी कीर्तन हा त्यांचा छंद होता. परमार्थाची उत्स्फूर्त आवड व भक्ति यामुळे ते कीर्तनात अतिदंग होऊन जात. श्रोतृसमुदाय असो नसो, रोजच्या कीर्तनाच्या वेळी मामा कीर्तनास उभे राहत. परगावी जाण्याचा प्रसंग आला तर मामा रेल्वेगाडीत सुद्धा कीर्तनाची वेळ झाली की कीर्तन सुरू करीत. कीर्तनासाठी त्यांनी लोकापवाद मानला नाही. त्यांचे कीर्तनात प्रत्यक्ष देवदर्शन झाल्यासारखे लोकांना वाटे.

### हाराने हार खाली

अनेक कीर्तनकार हार घालतात व घालून घेतात. मामांनी कधीही हार घातला नाही व घालून घेतला नाही. म्हणून पैठणच्या नाथमहाराजांना मामांच्या नकळत त्यांचे पाठीमागून हार घालावा लागला, तो लगेच मामांनी बाजूला काढून ठेवला.

मामांनी परमार्थाला जत्रेचे स्वरुप आणले नाही. मामांच्या नित्य कीर्तनात ऐकलेला मामांचा बोध लक्षात घेऊनच, अनेक जण नाम घेऊ लागले व मामांचे एकनिष्ठ भक्त बनले,

### दादा, मामांची परंपरा चालू ठेवणारे सुपुत्र

मामांचे चिरंजीव श्रीरामरायमहाराज यांनी मामांची कीर्तनपरंपरा पुढे चालू ठेवली. आपल्या रामाने आपली कीर्तनपरंपरा पुढे चालवावी, अशी मामांची इच्छा होती व 'माझेनंतर राम कीर्तन करील' असे ते लोकांना सांगतही असत. वडिलांच्या इच्छेप्रमाणे दादांनी नित्य कीर्तन चालू केले.

### आवड असेल तर सवड होते

दादांच्या कीर्तनातही नामाचे माहात्म्यच असते. ते ऐकून शंकाकुशंका

मनात धरून येणाऱ्या श्रोत्यांच्या शंका दूर होतात, असे अनेकांचे अनुभव असून, मला स्वत:ला तसा अनुभव आला आहे.

१९६५ साली मी प्रथम त्यांचे कीर्तनास गेलो. 'आवड असेल तर सवड होते व भगवद्भक्ति करता येते' हा विषय ते सांगत होते. त्या कीर्तनाने माझ्या मनात उसळलेल्या अनेक शंकांच्या वावटळीचे शमन झाले. तेव्हा माझी श्रद्धा बसली व त्यावेळी मला भगवत्प्राप्ति झाल्याचा व भगवद्-भक्तीचा मार्ग कळल्याचा आनंद झाला. 'परमेश्वर दाखवता येत नाही, त्याचा अनुभव घ्यावयाचा असतो,' हा बोध मला त्यांचे कीर्तनातून झाला. तेव्हापासून नियमितपणे मी त्यांचे कीर्तनास जाऊ लागलो.

यापूर्वी मी दर महिन्यात नरसोबावाडीच्या दत्ताला जात असे. माझे मित्र श्री. दत्ताराम अकरेकर यांच्या सांगण्याप्रमाणे पंचामृतस्नानाचे वेळी पादुकांचे दर्शन घेतल्याने मला निर्भय आत्मसामर्थ्य मिळत होते. असा क्रम चालू असता, १९६५ साली माझ्या सासूबाई सौ. सीताबाई भिडे व त्यांची मैत्रीण सौ. इंदिराबाई वाटवे यांनी माझा क्रम पाहून मामांचे समाधीचे दर्शन घेण्याचा व श्रीदादांचे कीर्तनास येण्याचा अनेक वेळा आग्रह केला. माझे वडील कै. पांडुरंगराव जोशी हे इंचगेरीपंथातील भाऊसाहेबमहाराजांचे शिष्य होते. भजन व पठण यातच त्यांनी आपले आयुष्य व्यतीत करून, संसारात परमार्थ केला. त्यांच्या आचरणाचे संस्कार माझ्यावर होऊन भजन, कीर्तन याकडेही माझा कल होऊ लागला. बारा अभंग वाचन आमचेकडे नित्य असे. आणि १९६५ साली फळले भाग्य माझे व मी दादांचेकडे जाऊ लागलो. दर महिन्यास नरसोबावाडीस जाण्याचे बंद केले व दादा हेच दत्त असा माझा निश्चय झाला.

मामा व दादा यांच्यात मला फरक आढळून येत नाही. व्यवहारत: दोघे पितापुत्र; पण दोघांची कृति, उच्चार, आचार संतांचा आहे. मामा व दादा यांची कृपा आम्हांवर सतत राहो व आयुष्याची वाटचाल सुखाची व पारमार्थिक वृद्धिंगतेची होवो, हीच त्यांचे चरणी नम्र प्रार्थना!



## (१८)

## मामा : साक्षात्कारी संत

**- श्री. वि. द. देवधर**

परमात्म्याची प्राप्ति करून घेणं किंवा शाश्वत ब्रह्मस्वरुपात विलीन होणं हे मानवी जीवनाचे ध्येय मानलं जातं. मानवी देहात असतांना 'नराचा नारायण होणं' हे संतांच्या कृपेनंच शक्य होतं. जीवात्म्याला परमात्म्याशी जोडणारा दुवा म्हणजे संत होत.

परमेश्वर दयाळू व कृपाळू आहे. पण संत परमात्म्यापेक्षाही दयाळू व उदार असतात. प्रथम काहीतरी घेऊन मगच देव आपल्या कृपेचा वर्षाव करतो. सुदाम्याचे पोहे खाल्ल्यानंतरच श्रीकृष्णांनी त्याला सोन्याची नगरी दिली. म्हणूनच नामदेवमहाराजांनी म्हटले, ''उदारांचा राणा म्हणविसी आपणा । सांग त्वा कवणा काय दिले.'' पण संत मात्र निरपेक्षवृत्तीने भक्तावर कृपा करतात. देव व संत यांत आणखी एक फरक आहे. काय मागावे हे देव भक्ताला सांगत नाही, पण भक्ताने काय मागावे, हे संत त्याला सांगतात, व तसे केल्याने त्याचे आत्यंतिक कल्याण हाते.या बाबतीत आनंदमूर्तींची गोष्ट प्रसिद्धच आहे. म्हणून संतांबद्दल ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ''या संतापरीस उदार । त्रिभुवनी नाही थोर।।'' तर निळोबाराय सांगतात ''उदार ऐसा न दिसेची दृष्टी । पहाताची सृष्टी मज आता.''

अनेक संतांनी भारतभूमि पावन केली आहे. आधुनिक काळातील संतांत, पुण्यधाम सांगलीचे प. पू. मामा केळकर यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. एकनाथमहाराजांचेप्रमाणे प्रपंचालाच परमार्थमय करून दाखविणाऱ्या मामांचेविषयी 'सांगलीचे एकनाथ' हीच भावना लोकांच्या मनात ठसली, यात नवल ते काय? प्रपंचात कमलपत्राप्रमाणे अलिप्त राहून, परमार्थकिमया कशी साध्य करावी, हे दोघांनी आपल्या चारित्र्याने प्रापंचिकांना दाखवून दिले.

बालवयापासून 'शांती' ने मामांचं हृदय आपलं निवासस्थान केलं होतं.

प्रत्येक कार्य प्रामाणिकपणाने करण्याची मामांची सवय होती. वैराग्य तर सूर्यप्रकाशासारखं प्रखर. तरी ज्ञानेश्वरमाऊलीची आज्ञा म्हणून संसाराचा खेळ मांडला खरा; पण चित्त मात्र श्रीरामाचे चरणी!

रामाचा प्रसाद वाटावा असा पुत्र मामा व सौ. इंदिराबाई यांच्या पोटी आला व 'पुत्र व्हावा ऐसा ज्याचा तिन्ही लोकी झेंडा' हे शब्द मामांच्या संसारात खरे झाले. अशा थोर मातापित्याच्या पोटी जन्म झाल्याने, राम स्वत:ला धन्य समजतात. ही भावना ते बोलूनही दाखवितात :- मोक्ष मिळाला नाही तरी चालेल, पण हेच आईबाप जन्मोजन्मी दे, असं मागणं राम परमेश्वराजवळ मागतात. अशा पुत्राकडून कीर्तनपरंपरा चालविली जाईल अशी मामांनाही निश्चिंती आली.

रामनामाच्या आड नोकरी आली; ती झुगारून देऊन मामा अखंड नामयज्ञात मग्न झाले. कोटणीसमहाराजांच्या आज्ञेने मामांनी कीर्तनसेवा सुरू केली व लोकांच्या निंदेची पर्वा न करता, श्रीराम आणि आपण ही खूणगाठ बांधून मामांनी ती अविचलपणे चालविली.

मामांच्या कीर्तनसेवेला २५ वर्षे झाली. भक्तांनी रौप्यमहोत्सव करण्याचे ठरवून मामांच्याकडे परवानगी मागितली. पण मामा प्रसिद्धिपराङ्मुख असल्याने, 'सेवेचा बोलबाला कशाला' असे मामा म्हणाले. आपणच आपला सत्कार करावयाच्या किंवा इतरांना सांगून सत्कार करवून घ्यावयाच्या या दिवसांत, मामांची वृत्ति जगावेगळीच नाही का?

नारायणमहाराजांच्या मातोश्री प. पू. माईसाहेब यरगट्टीकर एकदा मामांच्या कीर्तनास आल्या, ''जड जीवांना हाताशी धरून योग्य मार्गदर्शन करा. ते तुमचे काम आहे.'' असे त्या म्हणाल्या.

मामांचे कीर्तन ऐकण्याचा मोह प्रत्यक्ष परमेश्वराला पडे, हे इतरांपासून छपून राहिले नाही. कुरुंदवाडच्या घाटावर जेव्हा मामांचे कीर्तन झाले, तेव्हा दत्तगुरूंची पाऊले संगमावरील पाण्यात उमटलेली अनेकांनी पाहिली. औदुंबरला जेव्हा दुपारी मामांचे कीर्तन झाले, तेव्हा श्रीगुरूंची विश्रांतीची वेळ म्हणून मंदिराची दारे बंद होती. पण दत्तगुरूंनी पुजाऱ्यांना दृष्टांत देऊन, दारे उघडावयास लावली. मामांच्या कीर्तनसेवेचा प्रेमपूर्वक स्वीकार भगवंताने केला.



आळंदीलाही आधी मामांच्या कीर्तनाला नकार देणाऱ्या पंचांचे अंत:करण ज्ञानेश्वरमाऊलीनं पालटवून शेवटी प्रसाद म्हणून नारळ देवविला.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या प्रेरणेने व कृपेने मामांनी 'श्रीरामपाठ' हा प्रासादिक ग्रंथ लिहिला. रामपाठ साधकांना खरोखरच मार्गदर्शक आहे यात शंका नाही. रामपाठाचे द्वारा चिरंतन सुखाचा मार्ग मामांनी सांगितला. रामपाठ लिहून झाल्यावर, मामांना साक्षात् रेवणसिद्धांचं दर्शन झालं.

मामा रामपाठात एके ठिकाणी म्हणतात-

तरो अथवा बुडो नाम न सोडीन । प्रतिज्ञा ही जाण जीवी धरी ।।

ही प्रतिज्ञा मामांनी आपल्या जीवनात खरी करून दाखविली. समर्थांनी म्हटल्याप्रमणे 'आधी केले मग सांगितले' ही उक्ति मामांनी खरी करून दाखविली याची प्रचीति रामपाठ वाचून येते.

मामांची एक गोष्ट लक्षणीय आहे. प्रापंचिक गोष्टी व अडचणी यांविषयी जर बोलणं सुरू झालं, तर मामांचं बोलणं एकदम बंद होई. ते नेहमी म्हणत की रामनामाखेरीज अंगारे, धुपारे, गंडेदोरे माझ्याजवळ नाहीत. 'आणिक नेणती टाणेटोणे नामस्मरणावाचोनी' हेच खरे.

आपला अंतकाळ मामांनी अनेक प्रकारांनी भक्तांना सुचवला. आपली अखेरची एकमेव इच्छा- कीर्तनपरंपरा चालू ठेवण्याची- त्यांनी प. पू. रामांचेजवळ व्यक्त केली. खऱ्या संतांना भक्तजनांचा कसा कळवळा असतो, त्याचंच हे बोलकं उदाहरण! आपल्या पश्चात् भक्तांना नंतरही अडचण भासू नये, म्हणून अनेक रोगांनी शरीर ग्रस्त असतानाही त्यांनी आपल्या कीर्तनांची टाचणं करून ठेवली.

मामांची कीर्तनाची निष्ठा एवढी की अंगात ताप असतानाही, उभं रहावत

नसतानाही, अष्टमीच्या कीर्तनाला मामा उठू लागले, तेव्हां भक्तांनी निजूनच कीर्तन करण्याची त्यांना विनंती केली. मामांनी ती मानली. त्या अष्टमीच्या कीर्तनात, सतीच्या गोष्टी सांगून, मामांनी आपण घेतलेले अखंड कीर्तनाचं वाण पुरं केलं. कीर्तन संपल्यावर त्यांनी मौन धारण केलं. अंतरात ते जागृत होते व देवाशी त्यांचा सुसंवाद चालू होता. मामांच्या या आंतरजागृतीचं प्रत्यंतर असे : दुसरे दिवशी नवमीला, बरोबर पाच वाजता, निळ्या तेजाने भरलेले आपले नेत्र उघडून, मामांनी- 'श्रीराम जयराम जय जय राम' असा मोठ्याने गजर केला. ज्यासाठी आयुष्य वेचलं, तेच रामनाम मुखातून आलं व हे प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पहाण्याचं भाग्य मला लाभलं. तोच अखेरचा संदेश देऊन बाराला दहा मिनिटे कमी असताना, मामांचा आत्मा परमात्म्यात विलीन झाला.

मामा ज्या मार्गानं गेले त्या मार्गानं जाण्यातच आपलं कल्याण आहे, हित आहे. मामांच्या आठवणींनीही मनाला समाधान प्राप्त होतं.

***

## (१९)

## देवाचियेसाठी आळवावे देवा!

**- प्रा. ना. य. कुलकर्णी,** ब्रह्मपुरी (विदर्भ)

पू. मामांचे कीर्तन ही एक अलौकिक वस्तु होती. कोणत्याही साधनाचे रुढ, लौकिक व यथार्थ, आंतरिक असे दोन प्रकार दिसून येतात. कीर्तनाच्या क्षेत्रातही या प्रकारांचे दर्शन झाले तर आश्चर्य वाटण्याजोगे त्यात काहीच नाही.

### रूढ, लौकिक कीर्तन

रूढ वा लौकिक कीर्तन भाविक लोकांच्या परिचयाचे आहेच. प्रतिष्ठेचे पैंजण पायी घालून, धनयोग्याच्या तालावर विषयाच्या चिपळ्या धरीत, प्रापंचिक मनुष्याभोवती फिरणारे व संसारचक्रात श्रोत्यावक्त्यांना जन्मोजन्मी फिरवणारे ते



लौकिक कीर्तन. धर्माचं रूपांतर धंद्यात करावं, उपासनेची उपाधी मानावी व कलेचा विक्रय करीत हिंडावं, हा रूढ कीर्तनाचा खाक्या. इतरांवर भाव मारण्यासाठी भावमाहात्म्य गावं, पण स्वतःच्या जीवनात मात्र बिदागीच्या भावापेक्षा कोणत्याही अन्य उदात्त भावाची तोंडओळखही असू नये, हा केवढा विरोधाभास! हा भास प्रपंच-परमार्थाच्या विरोधातून साकारला असल्याने व 'इह ना परत्र' असा त्याचा परिणाम प्रत्यक्ष अनुभवास येत असल्याने, त्यास खोटे तरी कसे म्हणावे? कीर्तनरंगात रंगून हरिप्रेमाचा आगळा रंग भोगणाऱ्या विठूच्या तान्हुल्याची लौकिक कीर्तनासंबंधीची साक्ष अशीच आहे. नामदेवमहाराज परमार्थपथाचा वाटाड्या पारखण्यासाठी पायपीट करीत होते. वैदिक, पंडित, पुराणिक यांची प्रभु पाठमोरी पोपटपंची प्राशन करून पस्तावलेले नामदेवराय लौकिक हरिदासाकडे जातात. तेव्हा त्या दासपण हरवून बसलेल्या हरिदासाची स्थिति मोठ्या यथार्थतेने ते रेखाटतात. ते म्हणतात- 'हरिदासासी पुसो भक्तीचा उपाव । तो त्यापाशी भाव नाही कोठे ।।' लौकिकात वाचेने नामाचा बडिवार सांगतात, पण अंतरंगी मात्र 'सदाकाळी विषयाचे पडिभर' असतात. श्रीसमर्थांनीसुद्धा या लौकिक कीर्तनाचा उल्लेख त्यागार्थ केला आहे. शृंगारिक-नवरसिक कीर्तन करून 'कळे' च्या मागे लागलेले हरिदास केवळ हरि सोडून बाकी सर्व गोष्टींचे दास होतात. त्यांचे मन व चित्त 'कळाकार' झालेले असल्यामुळे, हरिकीर्तनातले फक्त कीर्तन उरते. प्राण जातो, राहते कलेवर. 'कले'वर खूष होणाऱ्यांच्या पदरी अखेर 'कले'वर येणार नाही तर काय? केवळ नादाच्या नादाला लागलेले, असुरवृत्तीने 'सुरा'ची कास धरणारे, बेताल वागून तालाचा तोरा मिरविणारे, कामवासना घेऊन निष्कामाकडे जाणारे महाभाग, 'अंग हरिरूप' करणारे, समाधिसुख ओवाळून टाकणारे कीर्तन, कसे करु शकतील? श्रीसमर्थ म्हणतात :

सर्पी वेढिले चंदनासी । विधाना आड विवसी । नाना कळा देवासी । आड तैशा ।। सांडून देव सर्वज्ञ । नादामध्ये व्हावे मग्न ।। ते प्रत्यक्ष विघ्न। आडवे आले ।। येक मन ते गुंतले स्वरी । कोणी चिंतावा श्रीहरी । बळेचि

धरुनिया चोरी । सुश्रूषा घेतली ।। करिता देवाचे दर्शन । आडवे आले राग ज्ञान । तेणे धरुनिया मन । स्वरामागे नेले ।। भेटो जाता राजद्वारी । बळेचि नेले बेगारी । कळावंता तैसी परी । कळेने केली ।। श्रीहरिवीण जे कळा । तेची जाणावी अवकळा । देवास सांडून वेगळा । प्रत्यक्ष पडिला ।।

अशा प्रकारचे लौकिक वा रूढ कीर्तन अंगवळणी पडल्यामुळे, खऱ्या कीर्तनाची चव चाखण्याचे सामर्थ्यही नष्टप्राय होते, हाच सर्वात मोठा तोटा.

**उपासना-कीर्तन, हरिकीर्तन**

कीर्तनाची अलौकिक अशी एक पातळी आहे. जेथे देवभक्तांचा संवाद घडतो, वक्ता रंगतो, तर श्रोत्यांचा संसार भंगतो. देवासाठी, दिव्य भावनेने, देवसाक्षित्वात घडलेले कीर्तन तेच खरे कीर्तन. या कीर्तनात हरिप्रेमच सर्व वाद्यांचा मुकुटमणि बनते. हाताची चिपळी, हृदयाचा स्वर, भावनेचा ताल व शुद्ध भावाचा रंग असा थाट असतो. 'आपुलिया सुखस्वार्थासाठी' ही हरिकथा असल्याने, बाह्यांगाचे दिखाऊ अवडंबर यात नसते. श्रोता वक्ता श्रीरामसमर्थ, हेच या कथेचे मुख्य सूत्र. पू. मामांनी अशा प्रकारची हरिकथा केली आणि जन्ममरणाची व्यथा कायमची घालवली.

अशा कीर्तनातली पू. मामांची ती भावमूर्ती किती रमणीय वाटते! लौकिक श्रोते नसले तरी कीर्तनाला उभे राहताना, आठही दिशांला नम्रपणे नमस्कार करणारे, चिमडच्या मठातील एका कोपऱ्यात करतालावर कीर्तन करणारे, पांच रोगांनी शरीर जर्जर झाले असताही प्रसन्न मुद्रेने नाममहिमा गाणारे, ब्रह्मपदी लीन होण्यापूर्वी दहा महिन्यांची कीर्तन-टिपणे प्रकृतीला अधीन ठेवून पुरुषार्थाने लिहून काढणारे व सूर्योदयी शरीराच्या सर्व नाड्या सुटल्या असतानाही सायंकाळी पांचचा ठोका पडताच हात वर करून 'श्रीराम जयराम जयजयराम' चा गजर करून 'अनंता'च्या अमरपुत्राचा वारसा सिद्ध करणारे मामा हेच खरे नारदीय कीर्तनपीठाचे वारसदार!

ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम, रामदास यांचे कीर्तन कसे होते, ते पू. मामांनी



सांगलीत ३८ वर्षे करून दाखविले. कीर्तन ही त्यांची जीवननिष्ठा होती. देखादेखीचे कीर्तन हा त्यांचा स्वभावच नव्हता. याचे प्रत्यंतर म्हणूनच की काय मोठमोठ्या योग्यांनाही न जिंकता येणारी देहबुद्धि त्यांनी कीर्तननिष्ठेने जिंकली होती. अर्थातच देहबुद्धीबरोबर येणारा क्षुद्र प्रतिष्ठेचा पसाराही शून्यवत् ठरला होता.

**जळो हे भूषण नाम माझे**

सदा देवकाजी झिजणे हाच नरदेहाचा परमार्थ हेतु. हा निश्चय ठायीचाच नेमून गेल्यामुळे, आपल्या ऋषितुल्य साधनेचा मामांनी कधीही गाजावाजा केला नाही. उलट सानपणाचे भूषण मिरविण्यातच त्यांनी धन्यता मानली. अलौकिक कीर्तननिष्ठेने योग, ध्यान, भक्ति, जप या मार्गातले श्रेष्ठातिश्रेष्ठ अनुभव त्यांचे गाठी असूनही, ती गाठोडी बाजारात मांडून सोडण्याचा बाजारूपणा त्यांनी कधी केला नाही. वास्तविक त्यांच्याजवळ आध्यात्मिक अधिकाराचे एवढे प्रचंड भांडवल होते की केवळ त्याचे व्याजावरही ऐहिक वैभवाची दिवाळी साजरी करणे त्यांना अशक्य नव्हते.

कोणी एक इसम अंतकाळचे क्षण मोजीत मृत्यूच्या दारवंठ्यावर पडतो. पू. मामांच्या दर्शनाचा ध्यास घेतो. आता क्षणाचा सोबती आहे, असे समजून पू. मामांना बोलावण्यास कोणी व्यक्ती येते. उत्तर मिळते, 'उद्या सकाळी त्यांना भेटण्यास जरुर येतो'. क्षणाच्या सोबत्याला उद्याचा हवाला! निरोप्या निराश होतो. त्याला एक सज्जन परस्पर सांगतात, ''अरे, मामा उद्या येतो म्हणाले आहेत ना? मग निश्चिंत असा. तो उद्यापर्यंत हमखास मरत नाही. संतवाणी या भूमीत झूठ ठरत नसते.'' दुसरा दिवस उजाडतो. कोणाला न कळविता ठरल्याप्रमाणे पू. मामा त्या मरणासन्न माणसाकडे जातात. त्याला अभय देतात. स्वहस्ते त्याला औषधपाणी पोचते करतात. मृत्यू पोबारा करतो. ही किमया औषधाची की औषध नेऊन देणाऱ्याची! पू. मामा डॉक्टराचे बिल देण्यासाठी जातात. डॉक्टराकडे बिलाची रक्कम आधीच पोहोचती झालेली असते. मृत्यु टळला.

बिल परस्पर भागले. पण या घटनेचा पत्ता मामांच्या घरच्या लोकांनाही नसतो. अकर्त्याच्या अवस्थेत मामा शांत असतात.

कोणाचे वेड जाते, तर कोणा बी. एड्. कॉलेजमधील विद्यार्थ्यांचे संकट निश्चित टळणार आहे, याची सूचना त्याला मिळते. तर केव्हा अभिमानाने अनुग्रह मागण्यासाठी आलेल्या प्रतिष्ठिताला सर्वज्ञपणाचे सर्टिफिकेट मिळते. हे सारे घडते; पण धनी कोठेच दिसत नाही.

एवढे अमानित्व मूर्तिमंत साकार करणारे मामांचे कीर्तन होते. त्या कीर्तनाचे वर्णन काय करावे? ''जैसे कीर्तन करावे । तैसे वर्तोन दावावें'' या जातीतले ते कीर्तन. आचार-विचार-उच्चार या त्रिवेणी संगमाचे प्रयागतीर्थ म्हणजे मामांचे कीर्तन.

श्रीसमर्थ म्हणतात- मन ठेऊनी ईश्वरी । जो कोणी हरिकथा करी । तोचि ये संसारी । धन्य झाला ।। जयास हरिकथेची गोडी । उठे तीच नवी आवडी । तयास जोडली जोडी । सर्वोत्तमाची ।। या नाव हरिदास । जयासी नामीं विश्वास ।। असे अलौकिक कीर्तन करून धन्य धन्य झालेल्या पू. मामांचे चरणी अनंत प्रणाम.

***

# (२०)

# विदेही परी देहधारी

## श्रीसद्‌गुरु मामाहाराज आणि श्रीमद्भगवद्गीता

**- श्री. उत्तमराव शंकर जप्तीवाले**

वरील शीर्षक मोठे कठिण आहे. गीतेत भगवंत आणि अर्जुन यांचा संवाद आहे. पूज्यपाद मामामहाराज म्हणजे चालते बोलते देव म्हणजे भगवंतच. परंतु या लेखाचा लेखक अर्जुन नाही. त्यामुळे पू. मामामहाराजांबद्दल लिहिणे आणि त्यातही पू. मामाहाराज आणि श्रीमद्‌भगवद्‌गीता अशा मथळ्याखाली लिहिणे



अत्यंत कठिण आहे. मामांना एक अत्यंत आवडीची गोष्ट होती, जवळ जवळ हीच एक त्यांची जीवनातील आसक्ति होती. आणि ती म्हणजे 'कीर्तन'. 'मामा कीर्तन करू या' असे म्हटले की मामा दोनदोन डिग्री ताप असला तरी उठणार! आणि याच त्यांच्या कीर्तनाच्या आवडीने, कीर्तनाच्या ध्यासाने अगर कीर्तनाच्या आसक्तीने एका महान साक्षात्कारी पुरुषाचे जीवन आम्हाला पहावयास मिळाले. पुनुरुक्तीचा दोष पतकरून लिहावेसे वाटते. ''मामा भगवंत होते.'' ते स्थितप्रज्ञ होते. ते योगी होते. ते संन्याशी होते (फक्त भगवी वस्त्रं नव्हती). ते योगारुढ ज्ञानी भक्त होते.

पू.मामांची सर्व विशेषणे गीतेत ठिकठिकाणी आढळतात. म्हणून लेखाचे शीर्षक जरी कठिण असले तरी पूर्णत्वाकडे जाणाऱ्या (आणि नेणाऱ्या सुद्‌धा!) या संत पुरुषाचा आणि गीतेचा काय संबंध आहे हे पाहण्याचा या लेखाद्वारे प्रयत्न, प्रपंच करू या. पू. मामांना कीर्तनाची अत्यंत आवड होती.

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते । तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।। हे त्यांच्या जीवनपद्‌धतीचे सूत्र होते. कीर्तनच का? तर कीर्तन एक आपल्या नित्य नियमाचा, ध्यानधारणेचाच एक भाग म्हणून त्यांनी स्वीकारले होता. 'बापूराव! सायंकाळी ५ ही वेळ कीर्तनाला चांगली आहे.' असे सद्‌गुरु तात्यासाहेबमहाराजानी सांगताच कीर्तन हा पू. मामांच्या साधनेचा एक अविभाज्य भाग झाला. 'कीर्तन हे सद्‌गुरुंची आज्ञा म्हणून चालू आहे की त्याला अन्य काही कारण आहे?'' या प्रश्नावर सततं कीर्तयंतो मां यतंतश्च दृढव्रताः । नमस्यंतश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ।। ९/१४ हे गीतावचन त्यांनी उद्‌घृत केले आणि ते म्हणाले, ''आम्ही रामोपासक. जेथे रामकथा-कीर्तन चालते तेथे मारुतिराय उपस्थित असतातच अशी आम्हा रामोपासकांची श्रद्‌धा आहे. सुदैवाने माझ्या सद्‌गुरुंचे नांव 'हनुमंत' आहे. त्यांनीच मला कीर्तनभक्तीची वाट दाखविली आहे. कीर्तनसेवा मी केली तर त्यांना ती रुजू होईल. ते उपस्थित राहतील व मला 'नित्ययुक्त' ठेवतील.'' 'सततं कीर्तयंतो' हा श्लोक व त्यातील 'नित्ययुक्त'

शब्दाने त्यांचे गीतेवरचे प्रेम मला स्पष्ट झालं.

'नित्ययुक्त' भगवंताशी सतत जोडला गेलेला हा महात्मा 'मां सततं कीर्तयंत:' भगवंताची सतत स्तुति करीत असे, भगवंताचे गुणगान करीत असे. भगवंताच्या कीर्तनात भजनात सर्वच येते. जीवनाच्या भिन्न भिन्न अवस्थांतही ते भगवंताचे कीर्तन करीत होते. सुख किंवा दु:ख, संपत्ति किंवा विपत्ति या सर्व अवस्थांत त्यांचे भगवंत कीर्तन चालू असे. पू. मामांच्या मते या श्लोकात (९/१४) सततं हा शब्द महत्त्वाचा आहे. ते म्हणत केवळ कीर्तन करीत बसून चालणार नाही. तर दृढव्रता: कीर्यवन्त: यतंत: झाले पाहिजे- असले पाहिजे, सतत प्रयत्नशील असले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

ते योगी होते, योगारुढ होते. म्हणजे काय? सहाव्या अध्यायांत उत्तम योग्याची लक्षणे दिली आहेत. ती सर्व लक्षणे पू. मामांना लागू पडतात. या अध्यायात संकल्पशून्यता समजावली आहे. योगारूढाचे वर्णन केले आहे आणि मध्येच परिश्रम करणे ही जीवाच्या हातची गोष्ट आहे, असे स्पष्ट प्रतिपादले आहे. उत्तम योग्याची वर्णनयुक्त लक्षणं भगवंत सांगतात-

गीता श्लोक- ६/७,८

जितात्मन: प्रशांतस्य परमात्मा समाहित: ।
शोतोष्णसुखदुखेवु तथा मानापमानयो : ।।७।।
ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेन्दिय:।
युक्त इत्युच्ते योगी समलोष्टाश्मकांचन: ।।८।।

सूज्ञ वाचकांनी या श्लोकावरील अनेक विद्वान अधिकारी मंडळीचे भाष्य ऐकले वा वाचले असेल! म्हणून थोडे तसेच पुढे जाऊ.

आध्यात्मिक क्षेत्रांत श्रद्धेला असामान्य स्थान आहे. परंतु बुद्धीला दुय्यम स्थान त्यांना मान्य नव्हते आणि यालाच ते गीतेचा आधार देत. एका चर्चेत त्यानी गीतेतील दुसऱ्या अध्यायातील ५० वा श्लोक सांगितला. अनुभवसिद्ध विद्वत्तापूर्ण आणि गीता प्रेमाने ओथंबलेल्या विवेचनात आमचे मीपण त्यांनी



केव्हाच हिराऊन घेतले होते. तो श्लोक असा :-

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।
तस्माद्योगाय युज्यस्व योग:कर्मसु कौशलम् ।

समत्वबुद्धियुक्त पुरुष पुण्य व पाप दोन्हीही या लोकीच त्यागितो अर्थात् त्यापासून लिप्त होत नाही म्हणून समत्वबुद्धियोगासाठीच प्रयत्न कर (हा) समत्वबुद्धिरूपी योगच कर्मातील चतुरता अर्थात् कर्मसंबंधातून सुटण्याचा उपाय आहे.

यापुढील श्लोक क्र. ५१ बुद्धियोगावरच आहे. या दोन्ही श्लोकांवर भाष्य करताना त्यांनी सांगितले की ज्या अर्थी गीतेने इंद्रिये, मन, बुद्धि व आत्मा असा क्रम लावला आहे, त्या अर्थी बुद्धीचा क्रमांक आत्म्याच्या खालोखाल आहे. म्हणून बुद्धियोग हीच आत्मबोधाची प्राथमिक तयारी आहे. बुद्धीला प्राधान्य दिले पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते. बुद्धि हे जीवाला परमेश्वराने दिलेले शस्त्र असे ते मानीत. या शस्त्राचा उपयोग करून षड्‌रिपूंना खलास करण्याचे स्वातंत्र्य जीवाला आहे. कर्मस्वातंत्र्य! हे ते हेच असे ते म्हणत. कर्म, भक्ति, ज्ञान या सर्व मार्गांना बुद्धियोगाची बैठक देणे जरुरीचे आहे असे ते मानीत. यासाठी म्हणजे आम्हाला (प्रस्तुत लेखक व डॉ. नि. वा. रानडे) सोपे करून सांगण्यासाठी पू. मामांनी एक समीकरण चतुष्टय सांगितले ते असे-

कर्मयोग=बुद्धियोग+निष्कामकर्म
भक्तियोग=बुद्धियोग+ईश्वरभक्ती
ध्यानयोग=बुद्धियोग+अनन्य ईश्वरचिंतन
ज्ञानयोग=बुद्धियोग+आत्मैक्याची प्रचीति

परंतु यातही पू. मामांनी एक धोक्याची सूचना दिली होती बुद्धियोगांत अहंकाराचा अंकुर साधकाच्या नकळत जोपासला जाण्याची शक्यता! मग यावर उपाय काय? नामयोग किंवा गीतेचा ध्यानयोग. कर्मयोग-कर्ममार्ग, भक्तियोग-भक्तिमार्ग अशी पृथक्‌पृथक् विचार करण्याची पद्धति त्यांना मंजूर नव्हती.

जीवाला एकाच जीवनात अंतिम पूर्णत्वाकडे जाताना सर्व मार्ग उपलब्ध आहेत. कोणता योग अगर मार्ग त्याने उपयोगात आणावा, त्याचे आपण (जीव) असलेल्या अवस्थेत किती वापर करावा यासाठी निर्णय घेण्यास त्याला बुद्‌धि (निर्णयात्मका) दिली. निर्णय होत नसेल तर सद्‌गुरूंकडे धाव घेतलीच पाहिजे. विकासोत्कर्ष पावते असताना कर्मयोग, ज्ञानयोग अगर भक्तिमार्गाने 'मी' पूर्णत्वाकडे जाईन हा साधकाचा अहंकार आहे, म्हणूनच येथे सद्‌गुरूची आवश्यकता आहे. साधकाच्या अवस्थेचे चिकित्सापूर्वक विश्लेषण (विच्छेदन नव्हे) करून सद्‌गुरु त्याला नामयोगात ध्यानयोगात (नेमात-बैठकीत) मार्गदर्शन करतात. वर उल्लेखिलेले समीकरणचतुष्टय पू. मामांनी आमच्यासाठी खालील सूत्रात मांडले.

कर्ममार्ग=ध्यान (नाम)+चैतन्यैकरस ईश्वराला फलार्पण

ज्ञानमार्ग=ध्यान (नाम)+अखंडैकरस परमेश्वराचे दर्शन

भक्तिमार्ग=ध्यान (नाम)+आनंदैकरस परमेश्वराचे प्रेम

दासबोध हा जरी संप्रदायाचा प्रमाणग्रंथ असला तरी गीतेचे त्यांचे अतूट असे एक नाते होते. गीतेतील एखादी शंका विचारताच मामा एका विशिष्ट भावावस्थेत जात आणि आपल्या सुमधुर प्रासादिक वाणीने, प्रसन्न मुखाने आम्हाला नि:शंक करीत. श्रीभगवद्‌गीविषयीचे त्यांचे प्रेम-आदर शब्दबद्ध करणे अशक्य आहे. ते म्हणत ''गीता म्हणजे योगेश्वर भगवान् श्रीकृष्णाच्या मुखारविंदातून स्त्रवलेले माधुर्य व सौंदर्य यांचे वाङ्‌मयीन स्वरूप. या वाङ्‌मयाने मानवाला जीवन जगण्याची हिम्मत दिली आहे. जीवन हा संग्राम आहे. जीवन रडण्यासाठी नाही! पळून जाण्यासाठी नाही! हसण्यासाठी आहे, खेळण्यासाठी आहे, हिम्मतीने झुंज देण्यासाठी आहे. अखंड आशा व अतूट श्रद्‌धेच्या बळावर आध्यात्मिक विकास साधण्यासाठी आहे. पापाच्या खड्ड्यात असलेल्या अधमात अधम मनुष्यापासून सुरवात करून लोकोत्तर भक्ति करीत असलेल्या उत्तम पुरुषापर्यंत सर्वांना मार्गदर्शन करण्याचा विडा गीतेने उचलला आहे.'' पू. मामा आणि गीता असा लेखनप्रपंच करताना एकनाथमहाराजांची आठवण होते.



भागवतात चवथ्या अध्यायात एकनाथमहाराज म्हणतात त्याप्रमाणे पू. मामांचे जीवन होते- नाथांची ओवी अशी- जो अजन्मा परि जन्माधारी । अकर्मा परिकर्मे करी विदेही । तो देहधारी ।। होऊनी संसारी स्वधर्मपाळी ।। किंवा ६ वा अध्याय: ज्यासी आत्मसुख निरंतर । देहधारी परिअवतार त्याचे चरण पवित्रकर ।।

गंगासागर आदि तीर्थासी अकराव्या अध्यायात आत्मसाक्षात्कारी पुरुषाची अनेक लक्षणे नाथानी सांगितली आहेत आणि होण्यासाठी प्रेमासारखा सुलभ मार्ग नाही असे ते म्हणतात. आणि पू. मामामहाराजांनी आपल्या कीर्तनातून सर्वांना प्रेमयोगाचाच प्रसाद वाटला.

।। मामामहाराज की जय ।।

***

## (२१)

## श्रीमामायण

**- श्रीपांडुरंगमहाराज ताम्हणकर, सांगली.**

त्रेतायुगात श्रीवाल्मीकिमुनींनी शतकोटी रामायण लिहिले. कलियुगात श्रीगोस्वामी तुलीदासजी, पैठणकर श्रीएकनाथमहाराज, श्रीधरस्वामी यांनी आपापल्या परी श्रीरामचरितामृतांचा वर्षाव करून भक्तांना सुखी केले. हे पाहून मर्यादापुरुष भगवान श्रीरामरायांना आपणही काहीतरी 'अयन' करावेसे वाटले. स्थलांचा शोध करता करता, सांगलीत केळकर कुळातील परमथोर अधिकारी संत श्रीगोविंदरावजी पसंत पडले. त्यांच्या पुत्राच्या रूपाने अवतार घेतला; नावात बदल केला नाही.

श्रीसंत गोविंदरावजी यांची व माझी पहिली भेट त्यांच्या वाड्यात संध्याकाळी ४ चे सुमारास, 'माया' शब्दावरून झाली. मामा प्रसन्न चर्येचे हालते बोलते चित्रच; धैर्यमेरू, शांतिसागर, तितिक्षामूर्ति, सौजन्यमूर्ति, मृदु शब्दांनी बोध

करणारे संत होते. त्यांचे कीर्तन म्हणजे परमपवित्र, वहाती गंगामाई; कोणीही यावे, स्नान करून, बुड्या मारून, मलरहित होऊन, पवित्र व्हावे.

मामांच्या चरित्रातील चमत्कार पाहून, ईश्वराच्या भक्तवात्सल्याचे सानंद, सप्रेम, सश्रद्ध कौतुक करावेसे वाटते. एवढेच नव्हे तर ज्या भक्तांच्या रक्षणाकरता ईश्वराला कृत्योन्मुख व्हावे लागते, त्या भक्तांच्या भक्तीचेही भरपूर कौतुक करावेसे वाटते.

मामा, मामी व पुत्र म्हणजे मर्यादापुरुषोत्तम राम, सीता व लक्ष्मण, म्हणजे भगवान श्रीकृष्ण, रुक्मिणी व प्रद्युम्न, म्हणजे गॉड, सन व होली घोस्ट म्हणजे ईश्वर, पुत्र व पवित्र चैतन्य. असे दुर्लभ दर्शन आम्हासारख्यांना प्रत्यक्ष पहावयाला मिळाले. केवढा मोठा लाभ केळकर कुलाने आम्हाला मिळवून दिला.

संत-पित्याचे सर्वच सद्गुण श्रीरामरायांच्यात उतरले आहेत. श्रीरामराय आपल्या वडिलांना मामा म्हणत. म्हणून मामांचे चरित्र ते 'मामायण' असे मी नाव दिले आहे.

श्रीरामरायांनी आपल्या पित्याची नित्य कीर्तनाची परंपरा चालविली आहे. आणि अधिकाराने नव्हे पण वयाने वडील म्हणून, त्यांचा हल्लीचा नित्यक्रम निर्विघ्नपणे चालेल, असा मंगल आशीर्वाद देतो.

***

## (२२)

## अखंड नाम संकीर्तनयोगी श्रीमामा

**- डॉ. के. वा. आपटे**

प्रपंच पार पाडून परमार्थाची परमोच्च पदवी प्राप्त करून घेणारे श्रीमामामहाराज ऊर्फ गोविंद अनंत केळकर हे सत्पुरुष सांगलीत होऊन गेले. त्यांची अनेक चरित्रे लिहिली गेली आहेत. त्यावरून त्यांची काही असामान्य वैशिष्ट्ये कळून येतात. अध्यात्माशी निगडित असणाऱ्या अशा काही वैशिष्ट्यांची येथे नोंद



केली आहे.

श्री. गोंदवलेकरमहाराज व इतर काही संत यांच्याप्रमाणे मामामहाराजांच्या मनात बालपणापासून ईश्वरभक्तीची बिजे रुजलेली होती. तेव्हापासूनच त्यांची ज्ञानेश्वरमहाराजांवर अपार निष्ठा होती. ते ज्ञानेश्वरमाऊलीचे भजन करीत असत. या वृत्तीमुळे विवाहाच्या बंधनात न पडता ईश्वर दर्शनाचा प्रयत्न करीत राहणे, अशी त्यांची भूमिका झाली. परंतु त्यांचे विवाहाचे वय होताच आईवडिलांनी मुलाच्यामागे लकडा लावला. कारण तो एकुलता एक होता. यावेळी मामा म्हणाले, ''ज्ञानेश्वरमहाराजांनी जर मला विवाहाला परवानगी दिली, तर मी विवाह करेन.'' हे म्हणणे व्यावहारिक दृष्ट्या चमत्कारिक होते. कारण त्यावेळी ज्ञानेश्वरमहाराज विद्यमान नव्हते. मामांचे वडील अनंतरावजी हे परमार्थमार्गी असल्याने त्यांनी मामांच्या म्हणण्याला रुकार दिला. त्यानंतर मामांनी आळंदीला जाऊन ज्ञानेश्वरीचे पारायण सुरू केले. ज्ञानेश्वरमहाराजांनी त्यांना दृष्टांत दिला, असे सांगितले जाते. याप्रसंगी मामांना ज्ञानेश्वरांचा जसा दृष्टांत झाला, त्यांचे रेखाचित्र मामांनी काढून ठेवले, ही घटना १९०४ मधील आहे.

विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या अनेक वर्षात राज्यात प्लेगने धुमाकूळ घातलेला होता. विवाहानंतर काही काळत मामा प्लेगने आजारी पडले. त्या काळी प्लेगवर उपाय असा काही नव्हता. मामा प्लेगातून बचावले. परंतु वाचेवर परिणाम होऊन त्यांना नीट बोलता येईनासे झाले. मामा डॉक्टर-वैद्यांकडे गेले नाही. त्यांनी पुन्हा ज्ञानेश्वरीकडे धाव घेतली. ज्ञानेश्वरीची १०८ पारायणे केली. त्यानंतर मामांची वाणी पूर्ववत् झाली. यथावकाश मामांना १९२० मध्ये पुत्रप्राप्ति झाली. आता आपण पत्नीच्या ऋणातून मुक्त झालो. असे मामांना वाटू लागले. त्यामुळे यापुढील काळात मामांनी वानप्रस्थत्व पत्करले. संसारात असताना, तरुण वय असताना संयम पाळणे हे असिधाराव्रत मामांनी अंगिकारले. याबाबतीत पत्नीने त्यांना सहकार्य केले.

१९०१ पासून चिमडपंथीय तात्यासाहेब कोटणीसमहाराजांची हरिकीर्तने

नित्य नियमाने सांगलीत सुरू झाली. या कीर्तनांना मामा जात. त्यांची कोटणीसमहाराजांवर निष्ठा बसली. महाराजांच्या आज्ञेनेच मामा चिमड येथील नारायणमहाराज यरगट्टीकर या गुरूकडे गेले व त्यांचा अनुग्रह घेतला आणि साधनाभ्यास सुरू केला. १९२४ च्या पौष महिन्यात तात्यासाहेब निर्वाणास गेले. तात्यासाहेबांच्या आज्ञेप्रमाणे मामांनी कीर्तनसेवा नियमाने आमरण ३८ वर्षे पाळली. या सेवेत पगार नव्हता. कोणतीही सुट्टी नव्हती आणि तेथे कोणत्याहि कारणाने रजा घेता येत नव्हती. अशी ती खडतर सेवा होती.

प्रपंचाला हातभार लागावा म्हणून मामा सिटी हायस्कूलमध्ये शिक्षक झाले. या काळात त्यांनी साडेतीन कोटि रामनामाचे पुनश्चरण आरंभिले. पुरश्चरणकाळात गाव सोडायचे नव्हते. दरम्यान, त्यांची परगावी बदली करण्यात आली. माणसांची सेवा व ईश्वराची सेवा यात महत्त्वाची सेवा कोणती? हा प्रश्न येथे आला. मामांनी ईश्वरसेवा महत्त्वाची मानून आपल्या ऐहिक नोकरीचे त्यागपत्र दिले आणि नवल असे की, पिता व पत्नी यापैकी कुणीहि या विरुद्ध ब्र काढला नाही.

एकदा मामा पांडुरंगाच्या दर्शनास पंढरपुरास गेले होते. मामांच्या गळ्यात वारकरी पंथाची माळ नसल्याने त्यांना एका विशिष्ठ मठात कीर्तन करण्याची परवानगी मिळाली नाही. तेव्हा त्यांनी इतरत्र कीर्तन केले. पुढे मामा पांडुरंगाच्या दर्शनास गेले असताना कुणीतरी मागून त्यांच्या गळ्यात पुष्पमाला घातली. त्यामध्ये त्यांना एक तुळशीची माळ मिळाली. या प्रसंगाची स्मृती म्हणून मामा प्रति द्वादशीस वारकरी पद्धतीचे निरूपण करू लागले. १९४३ च्या शिवरात्रीला मामांनी दुपारी १२ ला सुरू केलेले निरुपण रात्री साडे नऊपर्यंत चालविले. निरूपणाच्या वेळेच्या बाबतीत हा एक उच्चांकच आहे.

तात्यासाहेबमहाराजांच्या आज्ञेप्रमाणे मामांनी अखंड कीर्तन केले. कोणत्याहि परिस्थितीत त्यांनी कीर्तनव्रत पार पाडले. याची काही उदाहरणे लक्षणीय आहेत. मामांच्या बहिणीचे ऑपरेशन मिरजेच्या मिशन हॉस्पिटलमध्ये झाले. तेथे राहण्याची



पाळी मामांवर आली. दवाखान्याच्या व्हरांड्यातील एका जिन्याखाली उभे राहून हाताच्या टाळीवर मामांनी कीर्तन केले. आगगाडीने मामा पालघर गावी निघाले होते. गाडीतच कीर्तनाची वेळ झाली. डब्यातील इतर मंडळी काय म्हणतील हा विचार न करता मामांनी डब्यातच कीर्तन केले. १९५७ मध्ये मामा निंबरगीच्या यात्रेस गेले. त्यावेळी त्यांचे वय ६५ वर्षाचे होते. सांगलीहून सकाळी ६ वाजता ही मंडळी मोटारीने निघाली. वाटेत पावसाने ओढे वगैरे आले असल्याने चडचण गावी पोहोचण्यास रात्रीचे आठ वाजले. विश्रांती, जेवण इत्यादी कसलीच भाषा न काढता मामा तडक शेजारच्या मारुतिमंदिरात गेले. कीर्तन सुरू केले. शेवटच्या दुखण्यातहि मामांची काया विकल झाली होती. पण कीर्तनाच्या वेळी मामा उठून बसत आणि नंतर बिछान्यावर पडून रहात. शेवटच्या दिवशी तर लौकिकदृष्ट्या मामांच्या नाड्या सुटल्या होत्या. डॉक्टर मंडळींनी मामांची आशा सोडली होती. पण कीर्तनाची पाचची वेळ होताच मामांनी **'श्रीराम जयराम जय जय राम'** हा मंत्र उच्च स्वराने उच्चारला. नामरूपाने मामांनी अंतिम कीर्तन केले, असे अनेक प्रकारचे असामान्यत्व मामामहाराजांच्या चरित्रात दिसून येते.

***

## (२३)
## सततं कीर्तयन्तो मां !!

**- प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी**

भगवंतांनी आपणास अत्यंत प्रिय असणाऱ्या गोष्टींचा निर्देश गीता, पुराणादि ग्रंथातून वारंवार केला आहे. आपणास 'भक्ति आणि भक्त' हे प्राणाहुनी परांते' प्रिय असल्याचे निक्षून सांगितले आहे. देव भक्तिभावाचा भुकेला असून अनन्य भक्ति करणाऱ्या भक्तांच्या घरी राबण्यात, भक्तांची हलकी सलकी कामे करण्यात भगवंतास धन्यता वाटते, असा इतिहास आहे. अर्जुनाच्या घोड्याचा लगाम

धरून आपल्या पृथ्वीमोलाच्या पीतांबरातून घोड्यांना चंदी घालणारे भगवंत द्वारकेचे राणे पांडवाघरी । या स्वरूपात दिसून येतात. संत जनाईच्या शेण्या थापणारे, तिच्या घरी दळण-कांडण करणारे भगवंत, एकनाथांच्या घरी कावडी कावडीने पाणी भरत असत. नाथांना गंध उगाळून देण्यापासून सर्व पूजासाहित्य सज्ज ठेवण्यापर्यंत देवांचे तत्पर कार्य सुरू असे.

प्रत्यक्ष भगवंतांनी दास होऊन रहावे. असे भक्तीचे सामर्थ्य असून भागवत पुराणात भक्तराज प्रल्हादाने भक्तीचे नवविध प्रकार उद्‌घोषित केले आहेत. 'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् । अर्चनं वंदनं दास्यं सख्यामान्मनिवेदनम् ।।'

अर्थात भक्तीचे हे विविध प्रकार जरी मांडले गेले असले, तरी त्या सर्वातून 'एक भक्तीच' एकाकार होते. ही भक्ति सतत अहर्निश अखंड चालावी यासाठी निरंतर जागे रहावे लागते. अभ्यासाने व सत्संगाने मग हळूहळू 'पडिले वळण इंद्रिया सकळ' अशी स्थिति होते. एकनाथांनी अशा भक्तीला सहजावस्था किंवा सहजसमाधि असे म्हटले आहे. तस्मात्सर्वैपुकालेषु ।।

नाथ भागवतात या 'सततम्' अखंड भक्तीची व्याख्या सांगताना नाथ लिहितात- 'अहर्निश माझी कथा । अहर्निश माझी वार्ता । अहर्निश माझे ध्याता। भक्ति तस्पता ती नाव ।।' अर्थात अहर्निश म्हणजे रात्रंदिवस. अशी अहर्निश सहजा भक्ति हाच परमार्थ साधला पाहिजे, असे तुकाराममहाराज बारा अभंगात सांगतात- अहर्निश सदा परमार्थ करावा । पाय न ठेवावा आडमार्गी। ही अहर्निश भक्ति म्हणजेच गीतेत भगवंतांनी म्हटल्याप्रमाणे सततं कीर्तयन्तो माम् अशी स्थिति होय. खाता, पिता जेविता, धंदा करिता भक्तीचे अनुसंधान न सोडता अनन्य भावाने भगवंताचे अखंड स्मरण ठेवणे हे पूर्ण भक्तीचे वर्म होय. भगवान् गीतेत सांगतात की, तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च ।। अर्थात् भगवंतांचं स्मरण ठेवून श्वासोच्छ्‌वासी, निमिषोन्मेषी सकळ जीवन व्यापार सुरू असले तरी ते श्रीकृष्णार्पणच होतात, त्या कर्मांचा लेप अंगी लागत नाही.



निष्काम कर्मयोगाची ही गुरुकिल्लीच होय.

**फोडिले भांडार**

मध्ययुगीन काळात संतानी भक्तीचे हे भाण्डार लहानथोर याती, भलते नारी- नर, अवघ्यांना खुले केले. भक्ति-भजनभाग्याने भगवंत पदवीस पोहोचता येते असे प्रगाढ आश्वासन स्वानुभवाने संतानी दाखवून दिले. भागवत भक्तीचे औपनिषदिक काळानंतर अध्यात्मक्षेत्रात केलेले हे एक फार मोठे क्रांतिकार्य आहे.

संत नामदेवांनी 'नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी।' अशा प्रतिज्ञेने श्रीरंगाचा भक्तिरंग उभा केला. सुंभाचा करदोटा । रकट्याची लंगोटी । नामा वाळवंटी कीर्तन करी। असे स्वरूप पाहून प्रत्यक्ष पांडुरंग देखील भान हरपून नाचू लागले. 'नामदेव कीर्तन करी पुढे बा नाचे पांडुरंग' हा प्रत्यक्षानुभव जनाबाईंनी देखील अनुभवला.

नामदेवांचे अभंग भक्तिकार्य पूर्णत्वास नेण्यासाठी तुकारामांचा अवतार झाला. त्यांनी तर 'सततं कीर्तयन्तो माम्' ही भगवंतवाणी कळसास नेली. तुका झालासे कळस । या वचनात भक्तीची परमावधी झालेली दिसते. अशा सतत भक्तिकीर्तनाने अवघी पंढरी दुमदुमुन गेली.

तुकाराममहाराजांचे अवतार मानले गेलेले देव निंबर्गी येथील (विजापूर) श्रीगुरुलिंगजंगममहाराज यांनी भक्तिसाधनेचे एक नवे पर्व उघडले. श्रीसाधुमहाराज हे त्यांचे शिष्य. त्यांनी श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर आणि श्रीरामचंद्रमहाराज यांना पूर्ण कृपानुग्रह केला.या दोघांनी पुढे कर्नाटक-महाराष्ट्राबाहेर नामभक्तिसाधन मार्ग प्रशस्त केला.

**सांगली कीर्तनपंढरी**

श्रीरामचंद्रमहाराजांचे पट्टशिष्य सांगलीचे श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज यांनी दोन तपाहून अधिक म्हणजे २५ वर्षे नित्य अखंड कीर्तन करून सांगली नगरी ही कीर्तनपंढरी म्हणून ख्यातकीर्त केली. त्यांच्यानंतर त्यांचे सुपुत्र

श्रीरघुनाथदादा यांनी कीर्तनाची परंपरा चालू ठेवली. श्रीकोटणीसमहाराजांनी ज्यांना कीर्तनानुग्रह दिला, असे श्रीमामामहाराज यांनी तर तीन तपाहून अधिक म्हणजे ३८ वर्षे नित्य अखंड कीर्तन करून सांगलीतील भक्तिकीर्तनपरंपरा उज्ज्वल केली. श्रीमामांच्यानंतर त्यांचे परमाधिकारसंपन्न चिरंजीव सद्‌गुरु श्रीदादा यांनी तीच कीर्तनपरंपरा चढत्या वाढत्या भक्तिरंगाने समर्थपणे चालविली आहे.

अशा रीतीने गेली ६०-६५ वर्षे ही अखंड कीर्तनपरंपरा चालू आहे. सांगली ही जशी नाट्यपंढरी म्हणून विख्यात आहे. तद्वत् गेली पाऊणशे वर्षे सतत चाललेल्या या कीर्तनभक्तीमुळे 'कीर्तनपंढरी' म्हणून सांगलीचे नांव गाजत आहे. कोटणीसमहाराजांच्या कृपेने चाललेली ही श्रीमामांची व श्रीदादांची कीर्तनभक्ति 'स्वान्तः सुखाय, जगतो हिताय' ठरली आहे. अखंड कीर्तनाचा हा नंदादीप अध्यात्मकैवल्याचे तेज पसरीत आहे, हे पाहिले म्हणजे गीतेत भगवंतांनी म्हटल्याप्रमाणे 'सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रता।' या वचनाचे प्रत्यंतर येते.

**शत शत प्रणाम**

यावर्षी फाल्गुन महिन्यात श्रीमामांची जन्मशताब्दी साजरी होत आहे. त्या निमित्ताने त्यांच्या अखंड कीर्तन भक्तीची ही स्मरण भक्ति त्यांच्या चरणी अर्पण करून हे अल्प आत्मनिवेदन संपवीत आहे. याप्रसंगी त्यांच्या चरणी आमचे शत शत प्रणाम!

***

## (२४)

## निर्दोष आध्यात्मिक जीवनाचा आदर्श

**- प्रा. म. अ. कुलकर्णी**

मामामहाराज केळकर यांना आम्ही आमच्या बालपणापासून पाहिले, ऐकले आहे. 'शांतीचा मांदूस । भरला असे सदोदित ।। एका जनार्दनी धन्य । त्याचे दर्शन जगन्मान्य' अशाच शब्दात गौरव करावा अशी ती विभूति होती. 'नाही मानसी तळमळ । सदा शांत गंगाजळ' या त्यांच्या अवस्थेत कोणत्याहि देशकाल परिस्थितीत अणुमात्र फरक पडलेला कधीहि दिसला नाही. नित्य नैमित्तिक कर्मे करताना, एकांती लोकांती वावरताना, आधी व्याधी-उपाधी सोसताना किंवा आनंदाच्या, सुखाच्या अशाहि संपन्न स्थितीत असताना त्यांच्या वागण्या बोलण्यात कधी काही डावे उजवे झाले आहे असा एकहि प्रसंग स्मरत नाही.



'हे परब्रह्मेस्थिति निःस्सीम । जे अनुभविता निष्काम । जे पावले परब्रह्म। अनायासे ।' या त्यांच्या स्थितीत कधी किंचितहि बदल झालेला दिसला नाही. सर्वार्थाने निर्दोष आध्यात्मिक जीवनाचा आदर्श उभा करणारा तो थोर महात्मा पूर्वपुण्ये करून, केवळ भाग्यवशात्, आपल्याला भेटला याचेच राहून राहून समाधान वाटते. मामामहाराजांची ग्रंथरचना तशी संख्येने थोडी आहे. पण अनुभव आणि आशयघन संपन्नतेच्या दृष्टीने ती निःसंशय महान् आहे. अगदी आत्मप्रत्ययानेच बोलावयाचे तर, त्या समग्र लेखनाहूनहि त्यांचे प्रत्यक्षांतील जीवन अधिक महान् होते.

ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकारामादि श्रेष्ठ संत, जेव्हा आदर्श संतांच्या खाणाखुणा सांगतात, किंवा अखंड ब्रह्मस्थित सत्पुरुषाचे वर्णन करू लागतात,तेव्हा प्रत्येक वर्णन वाचताना, अभ्यासताना असे लक्षात येत जाते की, मामामहाराज केळकर अगदी असेच होते. त्यांचे भव्य दिव्यपण हे प्रत्येक आकलनानंतर आजहि उंच, उंच झाल्याचे प्रत्ययाला येते. त्यांच्या अलौकिकत्वाचे नवनवे पैलू ध्यानी घेता आश्चर्य वाटते. पण अशा महात्म्याने आपल्यावरहि आत्मीयतेने प्रेम केले, याची धन्यता त्याहून अनंतपटीनी सुख देते. संतश्रेष्ठ नामदेवमहाराज म्हणतात, 'देवा तुझे अवघेचि बरवे । परि त्याहुनि बरवे प्रेम तुझे' हा संतोष, त्यांच्या विषयीचा आदरभाव सतत शतगुणित करीत जातो.

अखंडनामसंकीर्तनयोगी अशा सार्थ विशेषणांनी त्यांचा निर्देश केला जातो.

महाराष्ट्रात व कर्नाटकात प्रसिद्ध असलेला 'चिमड संप्रदाय' हा पूर्णार्थाने 'नाथसिद्ध' संप्रदायच आहे. श्रीरेवणसिद्ध, मरुळसिद्ध, काडसिद्ध, श्रीगुरुलिंगजंगममहाराज अशा दिव्य अवतारी महात्म्यांनी ते स्वर्गीय दिव्य नाम जगदोद्धारार्थ या भूलोकी तप:सामर्थ्ये करून आणले. सिद्धवस्तूचे साक्षात् स्वरूप दर्शन घडवून नामसाधनभक्ति सांगणे, वाढविणे ही या संप्रदायाची मूळ प्रेरणा. इथे कोणत्याहि वेडगळ समजुतीला, संकुचित भावनेला थारा नाही. उगाच शरीराला वा जीवाला जखडून टाकणारी भाराभर बंधने या संप्रदायात सांगितलेली नाहीत किंवा कर्मकांडांचे अवाजवी स्तोम कोणीहि माजविलेले नाही.

संत एकनाथ सांगतात, अंतरंग साधने करावी परमार्था । त्यागावी सर्वथा बहिरंग ।। चित्तशुद्धी झाल्या अंतरंगा अधिकार । विवेक निर्धार सांगतसो ।। तेच सूत्र याहि संप्रदायाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. योग, याग, तप, तीर्थादि साधनाकष्टांचा पसारा विचारपूर्वक बाजूला सारून, समाजातील साबडे बागडेहि उद्धरून जावेत यासाठी वैकुंठावरी नेऊन पोहचविणारा सुलभ नामस्मरण मार्ग सांगितला आहे.

मामामहाराजांनी आयुष्यभर शुद्ध परमार्थ केला. सतत नामस्मरण, चिंतन, मनन व कीर्तन या द्वारा जी सर्वोत्तम अवस्था प्राप्त करून घ्यावयाची, ती घेतली आणि 'नामसार नामसार सर्वांमाजी' हेच निर्धारपूर्वक साऱ्या भाविक अभाविकांना आचार-विचारांद्वारा पटवून दिले.

मामामहाराज नामधारकाची व्याख्या 'जो आपले चित्त अखंड नामस्मरणातच जडवून टाकतो तो, नामधारक.' अशी करतात. 'नाम बिंबले शरीरी । शरीर नामचि उच्चारी' अशी नामधारकाची अवस्था होते. ती प्राप्त व्हावी हे ते अपेक्षितात. नामस्मरणाने चित्तशुद्धी होणे, पूर्णबोध होणे, यालाच ते प्राधान्य देतात. विकल्परहित श्रद्धा हे विश्वासाचे रूप स्पष्ट करून परमार्थात विज्ञानालाच, अनुभवालाच प्राधान्य आहे. याचे दिग्दर्शनहि ते करतात.



अंतर्यामीचा रामच जेव्हा अखंड नामस्मरण आपोआप करू लागतो, ती स्वरूपाची खूण, तो अनुभव शब्दातीत असतो अशी नोंद ते करतात. चित्त चैतन्यी मिळून जाणे तोच आत्मसुखलाभाचा दिव्य अनुभव आहे. नामस्मरणाने ही दिव्यानुभूति प्रगटते हे त्यांचे सांगणे आहे. नामस्मरण हेच तप, नामस्मरण हे ज्ञान, त्या परीते काही नाही हाच सिद्धांत मामामहाराज सांगतात. त्या नामाने सारी सृष्टि ब्रह्मानंदाने अंतर्बाह्य भरलेली अनुभवता येते. त्यासाठी सद्गुरुकृपा लाभ व्हावा लागतो व साधुसंगतीत नामस्मरण व्हावे लागते व साधुसंगतीत नामस्मरण व्हावे लागते, हे निजगूजहि ते सांगतात. अनन्यभक्ताचा योगक्षेम देव चालवतोच. योगक्षेमाची चिंता करू नका. नामस्मरणाने जीवनकृतार्थता साधा ही त्यांची शिकवण आहे.

मामामहाराज स्वत: या निजनिष्ठने अध्यात्मजीवन जगत आले. आपला सारा संसार त्यांनी ब्रह्मरूपच करून टाकला. त्यांचा परमार्थ हा कधी लौकिकासाठी नव्हताच. कोणी निंदो वा वंदो त्यांनी त्याची कधी पर्वा केली नाही. कोणी शत्रू होवो वा मित्र होवो, त्यांनी कधी कोणाशी वादविवाद केला नाही. परिस्थिति अनुकूल होवो वा प्रतिकूल होवो, कधी त्यांनी शांति ढळून दिली नाही. हा आपला व तो परका असा भेदभाव कधी मानला नाही. कधी कोणाशी ताठा धरला नाही. कधी द्वेषमत्सर केला नाही. कधी नम्रता, सुलीनता सोडली नाही.

ब्रह्मस्थित महात्म्यांची सारी लक्षणे त्यांच्या ठायी अशी भरभरून ओसंडत होती. नामप्राप्त नित्यानंदात त्यांचे सारे अस्तित्व रंगून गेलेले होते. चंद्राहून शीतल व रवीहून सोज्वळ असे ते विलोभनीय व्यक्तिमत्व होते. त्यांचे अमृताहून गोड असे बोलणे, गगनाहून मृदु वागणे, मेघाने वृष्टी करावी तसे सांगणे आज फक्त आठवले की आपणाला सुस्नात झाल्याचा अनुभव येत राहतो. 'गाऊ सुखे नामावली । सुख कल्लोळी सर्वदा । नाचू संतमेळी सदा । कीर्तनी रंगवू गोविंदा।। असे उत्स्फूर्त उद्गार मनी वारंवार उठतात. एक दिव्यस्पर्श जाणवणारा उल्हास अंतर्यामी प्रकटत राहतो. सद्भावे साधु, संत, देव यांनाहि संतोषविणारे

हे सद्‌भावे कीर्तन करणारी ती प्रसन्नमुख मूर्ति आठवते व आपोआप वंदनासाठी हात जोडले जातात.

***

## (२५)
## ऐसे कीर्तन श्रीमामांचे

**प्र. स. भावे**

हरि कीर्तनाकारणे जन्म झाला । हरि कीर्तनी साच अखंड ठेला ।
हरि कीर्तनानुग्रहो सत् प्रचिती । नमो कीर्तनानंद गोविंद चित्ती ।।

- दासराम

ज्यांचा केवळ नामासाठी अवतार झाला, केवळ कीर्तनासाठी अवतार झाला, असा महात्मा म्हणजे श्रीमामामहाराज. देवासाठी कीर्तन करणारे म्हणजे श्रीमामामहाराज. आपल्या अखंड नामसंकीर्तनाने मुमुक्षूला आत्मोद्‌धाराचा मार्ग सांगून देव नाही असे म्हणणाऱ्यांना देव आहे असे म्हणायला लावणारा महात्मा म्हणजे श्रीमामामहाराज. आपल्या अखंड नामसंकीर्तनाने सांगलीला क्षेत्राचे स्वरूप प्राप्त करून देणारा अखंड कीर्तनानंद योगी पुरुष म्हणजे श्रीगोविंद अनंत तथा श्रीमामामहाराज केळकर होय.

श्रीमामांचा कीर्तनदरबार आगळा वेगळा होता. श्रीमामांचे कीर्तन हे वेगळेच होते. कीर्तन ही प्राचीन काळापासून चालत आलेली नारदाची गादी. मधुर वाद्यांचा झंकार, गीतांचा मधुर स्वर जिथे असेल तिथे कीर्तन रंगायला कितीसा वेळ? ताल उत्तम आहे. सूर उत्तम आहे आणि कीर्तनकारांचे वक्तृत्व अफाट आहे. असा त्रिवेणी संगम असल्यावर ते कीर्तन रंगतेच रंगते. 'आधीच सोन्याचे, वरती जडावाचे लेणे श्रीमंताचे शोभिवंत' असेच वर्णन करणे सार्थ ठरेल. परंतु श्रीमामांच्या कीर्तनाचे वर्णन करत असताना वरील गोष्टी त्यांच्या कीर्तनात नव्हत्या, असे नव्हे. तथापि श्रीमामांचे या गोष्टीकडे लक्षच नसायचे. तबला-



पेटी असली काय आणि नसली काय श्रीमामांच्या कीर्तनाचा रंग कधीच बदलला नाही. श्रीमामामहाराज कीर्तनात देवाला आळवू लागले की, भक्तिरसाची गंगा दुथडी भरून वाहू लागे.

श्रीमामामहाराजांचे कीर्तन म्हणजे नित्य नवी नवलाई, नित्य नवी परवणी. श्रीमामांचे कीर्तन म्हणजे अमृताचे सिंचन. श्रीमामांचे कीर्तन म्हणजे भक्तीचे गुणगान. अखंड परमेश्वराचे नाम मुखाने घ्यायचे हेच त्यांचे कीर्तन. श्रीमामांच्या अंत:करणात सतत नामच विराजमान झाले होते. अखंड चोवीस तास कीर्तन दरबारात श्रीमामा निमग्न असायचे. श्रीमामांचे कीर्तन म्हणजे एकत्वाने नटलेले अद्वैताचे साम्राज्य होते. श्रीमामांनी नामाचा बाजार भरवला, हरिनामाचा दरबार भरवला. 'काळ वेळ नामस्मरणासी नाही सदासर्वदाही उच्चारावे' अशी अवस्था श्रीमामांच्या कीर्तनाची होती. कृष्णामाईचा प्रवाह जेव्हा चोवीस तास वाहतो, तेव्हा कुठे दोन तास गणपतीच्या देवापुढे कारंजा उडतो, असे श्रीमामांचे कीर्तन होते.

''एक लक्ष का रुपया देता देती हिरे तेरा । तेरा माजी साठविला तो परमेश्वर सारा''. हरिनामात रंगून सर्वत्र मामामहाराजांनी परमेश्वर पाहिला. श्रीमामांच्या कीर्तनात सच्चिदानंद परमात्म्याची प्रचीति अनेकांनी घेतली होती. कीर्तन हा श्रीमामांचा सहज धर्म झालेला होता.

कीर्तने स्वधर्म वाढे । कीर्तने स्वधर्मे जोडे । कीर्तने परब्रह्म आतुडे । मुक्ति कीर्तनापुढे लाजोनी जाय । भावे करिता हरिकीर्तन । तेणे संतोष जनार्दन । उभयता पडे आलिंगन । मिठी परतोनी सुटेना । कलियुगी नामस्मरणे । जड उद्‌धरणे कीर्तनी । या नाथ भागवतातील ओव्या श्रीमामांना तंतोतंत लागू पडतात. नामरसाचा पेला पिऊन श्रीमामा रंगात रंगून गेलेले होते. कीर्तनात नामशिवाय उच्चार नाही. श्रीमामांनी भगवान सद्‌गुरु तात्यासाहेबमहाराजांच्या आज्ञेनुसार अखंड अडतीस वर्षे हा कीर्तनाचा नंदादीप सतत तेवत ठेवला. ज्या कीर्तनात देव प्रगट होतो ते खरे कीर्तन! गुरुदेव रानडेसाहेब तर श्रीमामांच्या

कीर्तनाबद्दल म्हणत असत. 'देवासाठी कीर्तन करणारे एकटे श्री. बापूराव'. आप्पाराव पोवार आपल्या अभंगात म्हणतात-

काय सांगू ऐशा कीर्तनाची थोरी । डोळा दिसे हरिनाम गजरी ।

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीहि कीर्तनाचे वर्णन केले आहे. ते म्हणतात- किंबहुना तुमचे केले । धर्म कीर्तन सिद्धी नेले । येथे माझे नि उरले । पायीकपण ।।

कारण ज्ञानेश्वरी हे ज्ञानेश्वरमहाराजांचे कीर्तन होते. तसेच श्रीमामांचे नाम हेच कीर्तन होते. अखंडित वाचे श्रीराम स्मरण । हेचि ते कीर्तन दासालागी। या ओळी श्रीमामांच्या कीर्तनाला लागू पडतात.

'प्रेम छंदे नाचे डोले । हरपला देह भाव' अशी अवस्था श्रीमामांच्या कीर्तनाची होती. ''आपल्या परमार्थाचा गाजावाजा नको. सद्‌गुरुंची आज्ञा प्राणपणाने पाळावी. मानसन्मानाच्या आहारी जाऊ नये. खूप वाचावे, सार घ्यावे. वाणी परमार्थासाठी वेचावी. मागू नये. दिले तर हुरळू नये. प्रारब्धाच्या झंजावाताला टक्कर देत परमार्थ चालवावा. कीर्तीकडे पाठ फिरवावी.'' ही सारी वचने श्रीमामांच्या कीर्तनात येत. तेच त्यांचे सांगणे. श्रीमामामहाराज कीर्तनासाठी अवतरले, त्यासाठी जगले. कीर्तन साधून त्यांनी आपला देह ठेवला.

कणकवलीचे विदेही संत श्रीनानामहाराज बर्वे श्रीमामांच्या कीर्तनाचे वर्णन करताना म्हणतात-

अनुदिन अभिनव कीर्तन चाले । हृदयभुवनी मधुमाधव डोले ।
प्राणापानहि येथे मिनले । सर्वांगी चैतन्य कोंदले ।
चैतन्याची अनुपम लीला । देही विदेही मुदे नांदला ।
गोविंदा आनंद वर्षला । त्याची चाले कीर्तन लीला ।
नानांसी आनंद जाहला । आनंदे संतोष दाटला ।
आनंदे संतोष दाटला ।

कीर्तननिष्ठेची विनम्र प्रतिमा म्हणजे श्रीमामा. श्रीमामांच्या नामसंकीर्तनात हरिनामाची धमाल उडत असे. गुरुकृपेने चैतन्याचा साक्षात्कार झालेला. त्यामुळे



आत्मभावाची जागृति श्रीमामांची झालेली होती. 'आत हरि-बाहेर हरि' अशी अवस्था श्रीमामांची होती. देवाशी सुसंवाद साधणारे श्रीमामांचे कीर्तन होते. अव्याहत केले कीर्तन चांगले । गोविंद रंगले राम रंगी असे मुकुंदबुवांच्या शब्दात थोडक्यात सांगता येईल.

***

## (२६)

## कीर्तनपंढरीतील अध्यात्मयोगी

**- केशव गणेश जोशी**

आज सर्व जगात आणि ओघानेच भारतातहि खूप वैज्ञानिक प्रगति झालेली दिसून येते. रावणाच्या वेळी त्याच्या राज्यात सर्व पंचमहाभूते आपापली कामे निमूटपणे करीत असत हे पण ऐकतो. पण आज आपण त्याची प्रत्यक्ष प्रचीति घेत आहोत. ही पंचमहाभूते आज खऱ्या अर्थाने माणसांचे दास झालेली आहेत. भौतिक सुख-साधनांची रेलचेल झालेली आहे. विज्ञानाने माणसाच्या सुख-समृद्धीत निश्चितपणे वाढ झाली आहे. त्रास, दुःख, श्रम कमी झाले आहेत. हे विज्ञानाचे महदुपकार आहेत. तरी सुद्धा मानव 'खऱ्या' अर्थाने सुखी झाला नाही. जितक्या सोयी अधिक, तितक्या गैरसोयीहि अधिक, जितके औषधांचे शोध व डॉक्टरांची संख्या अधिक तितके रोगहि विविध आणि विपुल, अन्नधान्याचे शोध जितके अधिक, तितकी टंचाईपण अधिक, जितकी संपत्ति अधिक, तितकी हावदेखील वाढते आहे. याचे एकमेव कारण मनुष्याचे मन जितके सुसंस्कृत, संयमी व सदाचारी व्हायला हवे. ते झालेले नाही व हे काम विज्ञान करू शकत नाही. नेमके हेच कार्य अध्यात्म व थोर संत यांनी केले आहे व आजहि ते करत आहेत.

परंतु संतांच्या या कामगिरीचे मूल्यमापन वस्तुनिष्ठ पद्धतीने केले जात नाही, ही गोष्ट मनाला क्लेशदायक वाटते. ''संत हे केवळ टाळकुटे होते.

त्यांच्यामुळे समाजाचा काडीमात्र फायदा झाला नाहीच. उलट समाजाला त्यांनी निराशेच्या गर्तेत लोटले व देश रसातळास गेला.'' अशा प्रकारच्या टीका अनेक तथाकथित समाजसुधारकांनी व विचारवंतांनी केलेल्या आढळतात.

परंतु अंतर्मुख होऊन अंमळ विचार केला तर या टीकांतील वैय्यर्थ दिसून येईल. संतांनीच समाजात जागृति, समता, एकता निर्माण करण्यास फार मोठा हातभार लावला. याचे मध्ययुगीन व अर्वाचीन इतिहासातील अनेक दाखले सहजपणे देता येतील. कबीर, नानक, तुलसी यांनी सामाजिक रुढीवर घणाघाती हल्ले करून सामाजिक एकतेचा हिरिरीने पुरस्कार केला. महाराष्ट्रात तर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम यांनी भागवत धर्माच्या प्रसारमाध्यमातून समतेचा डांगोरा पिटला. संत एकनाथ, राष्ट्रसंत रामदास, स्वा. विवेकानंद, अरविंद घोष, प.पू.गाडगेमहाराज, श्रीकैकाडीमहाराज, स्वामी स्वरूपानंद या संतांनी केलेली सामाजिक सुधारणा, सामाजिक संघटना, देशभक्ति कमी प्रतीची होती असे कोण बरे म्हणू शकेल? किंबहुना यांच्या इतकी समाजसुधारणा व ऐक्य क्वचित्‌च आजच्या तथाकथित सुधारकांनी केले असेल.

प्रारंभी सांगितल्याप्रमाणे आज इतक्या भौतिक सुखसोयी असूनहि मनुष्य अशांत, अस्वस्थ का आहे? समाजात भ्रष्टाचार, वैफल्य, स्वार्थ यांची बजबजपुरी का वाढलेली दिसून येते? अनेक भेद वाढीस लागून दंगेधोपे बेसुमार का वाढले आहेत? मनुष्याला खऱ्या अर्थाने समाधानाची प्राप्ती का होत नाही? ही निखळ शांती, हे निखळ समाधान एका निरपेक्ष प्रेमानेच मिळू शकते. हे समाधान मिळविण्याचा अचूक उपाय कोणता हे फक्त सद्‌गुरु-श्रेष्ठ संतच सांगू शकतात. म्हणूनच 'गुरू हा प्राणविसावा माझा' असे श्रीज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. श्रीमामामहाराजांनी आपल्या अखंड ३८ वर्षाच्या नित्यकीर्तनाद्वारे आपल्या अनेक श्रोत्यांत सद्‌विचारांचे बीजारोपण केले. सद्‌विचार रुजला की, त्यापाठोपाठ सदाचरण आपोआपच होते. परस्पर भ्रातृभाव, प्रेम हे गुण वाढीस लागतात व निकोप, निरोगी समाजाच्या वाढीस मदत होते. श्रीमामा संत होते म्हणून ते



समाजापासून दूर मुळीच नव्हते.

त्यांचा जन्म १८८८ मध्ये म्हणजे पारतंत्र्य काळात झाल्यामुळे स्वातंत्र्य आंदोलनाचे पडसाद त्यांच्याहि जीवनात उमटलेले दिसतात. स्वत:च्या लग्नासाठी श्रीज्ञानदेवांची संमति घेण्यासाठी ते आळंदीस गेले होते. तेथून परत येत असताना त्यांनी पुण्यास लोकमान्य टिळकांची गाठ घेतली होती. स्वातंत्र्याची ओढ त्यांच्याहि मनाला लागून राहिली होती. परकीय सत्तेशी झगडून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ज्या काँग्रेसची स्थापना झाली होती, त्या काँग्रेसच्या नागपूर, कानपूर, बेळगाव, अहमदाबाद येथील अखिल भारतीय अधिवेशनासाठी ते स्वयंसेवक म्हणून गेले होते. प्रखर देशभक्तीची ज्योत तेवत असल्याखेरीज त्या पारतंत्र्याच्या काळात कोण स्वयंसेवक होण्यास तयार होईल का? महात्मा गांधींच्या आदेशानुसार परदेशी चहा, साखर यावर बहिष्कार असल्यामुळे मामांनी चहा सोडला होता,.

लोकमान्य टिळकांच्या चतु:सूत्रीनुसार स्वतंत्र विचारांचे राष्ट्रीय शिक्षण देण्यासाठी स्वतंत्र शैक्षणिक संस्था काढण्याचे वारेच त्यावेळी महाराष्ट्रभर वाहात होते. सांगली येथील सांगली एज्युकेशन सोसायटी ही प्रख्यात संस्था व तिचे सिटी हायस्कूल हे त्यापैकीच एक होय,. या संस्थेच्या संस्थापनेत इतर संस्थापकांबरोबर मामांचाहि मोठा वाटा होता. त्या शाळेत विनावेतन त्यांनी काही दिवस मॉरल व ड्राईंग विषयाचे अध्यापनहि केले होते.

कीर्तनाद्वारे मामांनी अनेक व्यसनाधीन लोकांना व्यसनमुक्त केले, त्यांना सदाचरणी बनवले. वर म्हटल्याप्रमाणे त्यांनी असंख्यांच्या मनात सदाचाराचे बीजारोपण केले. अनेक रुग्णांच्या घरी जाऊन त्यांना ते धीर देत असत, औषधे सांगत. मामांच्यारखा सत्पुरुष आपल्या सारख्या सामान्यांच्या घरी येतो व अंगावरून हात फिरवून प्रेमाने धीर देतो, केवळ ही एकच गोष्ट रोग्याच्या मनात क्रांति करून जाई व तो रोगमुक्त होई. समाजसेवेचे, समाजशिक्षणाचे, देशभक्तीचे असे अनेक पैलू त्यांच्या जीवनचरित्रात दिसून येतात. मामांनी आपल्या कीर्तनाद्वारे

लोकांना सर्वसामान्य माणसातसुद्धा देव पाहण्यास शिकविले. धर्म, जाति, पंथ, संप्रदाय यांच्या भिंती कोसळून पडल्याशिवाय परमेश्वराचा साक्षात्कार होत नसतो, अशी त्यांची शिकवण व वर्तन होते. त्यांचे नाव तसे फारच थोड्यांना माहीत असेल. परंतु तेराव्या शतकातील श्रीज्ञानेश्वरांचे नांव लोकांपुढे यायला सोळावे शतक उजाडावे लागले. श्रीसंत एकनाथांनी ज्ञानेश्वरांच्या समाधीचा शोध घेऊन ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत जनतेपुढे ठेवली, तेव्हाच ज्ञानदेवांची ओळख खऱ्या अर्थाने जगाला झाली. मामामहाराजांचेही असेच आहे. काही कालांनी ते निश्चितपणे सर्वत्र प्रकाशात येतील. अखंड कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी लोकसेवेचे व ईश्वरसेवेचे महनीय कार्य केले.

श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाजांच्या जोडीने त्यांनी सांगलीचे 'कीर्तनपंढरी' हे नांव सार्थ केले. त्यांच्या पश्चात् त्यांचे हे सर्व कार्य श्रीदासराममहाराज गेली २६ वर्षे आजतागायत पुढे चालवीत आहेत. दि. २७ फेब्रुवारी रोजी त्यांची जन्मशताब्दी मोठ्या थाटाने त्यांच्या रहात्या घरी 'श्रीरामनिकेतना'त साजरी होत आहे. या निमित्ताने श्रीमामांचे नांव व कार्य सर्व दूर जावे म्हणूनच केवळ या लेखाचा हा प्रपंच. प. पू. श्रीमामांच्या जन्मशताब्दिनिमित्त त्यांना विनम्र प्रणिपात.

***

## (२७)

## दासबोधी विवरण । तेच मामांचे आचरण

**- बाबूराव गोखले**

मानवाच्या जीवनांत रोज उगवते ती मंगल प्रभातच असते आणि ज्यांनी 'प्रभाते मनी राम चिंतीत जावा' या स्फूर्तिदायक श्लोकाचा उद्घोष करून दिवसाची सुरूवात केली, त्यांचा सारा दिवस मंगलमय होतोच यांत तिळमात्र शंका बाळण्याचं कारण नाही. दिवसभर कष्ट करून थकला भागलेला जीव रात्रीची विश्रांति घेऊन उगवत्या सूर्यदेवाला 'नित्य उपासनेने माझी ईश्वरनिष्ठा



वाढवून त्या ईश्वराला शरण जाण्यासाठी मला शुभ आचार, शुभ विचार, शुभचिंतन करण्याची स्फूर्ति दे' हीच प्रार्थना करीत असतो. रात्रभर पेंगुळलेल्या कळ्या उमलून येतात. पक्षीगण उत्साहाने चिवचिवाट करीत असतात. उषादेवी हाती निरांजने घेऊन सूर्यदेवाला ओवाळण्यासाठी सिद्ध झालेली असते आणि या अशा मंगल वातावरणात मानवाला समता, सभ्यता, सामंजस्य, सहिष्णुता आणि समाधान देण्यासाठी सूर्यदेव आशीर्वादाचे हात पसरून सारी सृष्टि प्रकाशमय करून टाकतो आणि असे प्रकाशमय जीवनाचे अधिष्ठान घेऊन साऱ्या मानवजातीला जीवनाचे दिव्य संदेश देण्यासाठी बाराव्या शतकातील ज्ञानदेवाच्या पासून विसाव्या शतकातील अखंडकीर्तनयोगी मामामहाराज केळकरांच्या पर्यंत अनेक सत्पुरुष, संतमहंत यांनी आपल्या आचरणाने स्वस्वरूपाकार होण्याच्या क्षणापर्यंत प्रत्येक दिवशी उगवणाऱ्या सूर्य देवाच्या साक्षीने 'मानवी जीवनांत काही उन्नत, उदात्त, मंगलकार्य कर' हा दिव्य ईश्वरी संदेश आपल्या मानव जातीला दिला, म्हणून ते संत या महत्पदाला पोहोचले.

पण आज मात्र विपरीत परिस्थिति सभोवार दिसत आहे. धर्माबद्दलच्या विकृत संकल्पना मनाशी धरून आणि धर्मांचे आदेश म्हणून खून, मारामाऱ्या, जाळपोळ, रक्तपात, भ्रष्टाचार, अत्याचार करण्यात कांही मानवांना धन्यता वाटते. त्यांना दररोज उगवणारा सूर्यदेव खरा स्वधर्म सांगण्यासाठीच उगवत असतो याची जाणच नसते. कारण त्यांनी सारा दिवस कुकर्माच्या योजना आखण्यात आणि सारी रात्र त्या पार पाडण्यात घालवलेली असल्यामुळे त्यांनी मंगल पहाट कधी पाहिलेली नसते. कारण कुकर्मे करून ते या मंगलसमयी गाढ झोपी गेलेले असतात आणि उठतात तो तळपणाऱ्या सूर्याचा माध्यानकाळ असतो. पण त्यांना या प्रभातीच्या मंगलतेची, आत्मबोधाची जाण येणारच कशी? पण असे विपरीत घडत असताना देखील काजळलेल्या ढगास असते एक रुपेरी कडा हे पटवून देण्यासाठी या भारतमातेने असे सत्पुरुष जन्माला घालून हडबडू गडबडू नका । सर्व धर्मामध्ये धर्म । स्वरूपी राहणे हा स्वधर्म । हेचि जाणावे वर्म ।

जीवनाचे कोडे उलगडून दाखविणारे दिव्य संदेश देणाऱ्या समर्थांच्यापासून 'एकवेळ मुखी उच्चारिता राम । तरती अधम हेळा मात्रे' असा सगुण उपदेश करणाऱ्या मामामहाराजांच्या पर्यंत अनेक संतांची मालिका प्रकट करून आम्हा सामान्य जीवांना खऱ्या मानवतेचे दिव्य दर्शन दिलेले आहे.

मामामहाराज यांनी १३ कोटि जप, १९७ ज्ञानेश्वरीची पारायणे, उपनिषदापासून गुरुचरित्रापर्यंत अवघ्या सत्पुरुषांच्या ग्रंथांचे परिशीलन करून सर्व आयुष्य साधनेत घालवून 'जाले साधनांचे फळ । संसार झाला सफल । निर्गुण ब्रह्म ते निश्चल । अंतरी बिंबले' हा साक्षात्कार जीवनांत अनुभवला.

मामामहाराजांच्या जीवनाचा अभ्यास केला तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते; ती म्हणजे समर्थांचे आणि मामामहाराजांच्या जीवनाचे धागे एकरूप झालेले होते. कारण स्वरूपाकार झाल्यानंतर एक वर्षाने सद्गुरु तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांनी साक्षात् दर्शन देऊन अखंड कीर्तनाचा जो दिव्य संदेश दिला. त्यावेळी मामामहाराज वाचीत होते, तो दासबोध होता आणि त्यामुळे 'सद्गुरु वचन तोचि वेदांत । सद्गुरु वचन तोचि सिद्धांत । सद्गुरु वचन तोचि धादांत । संप्रचीत आता।।' हे व्रत मामानी अखेरच्या श्वासापर्यंत अत्यंत निष्ठेने पाळलेले दिसून येते.

मामांच्या समाधानी जीवनाचे वर्म, 'स्मरण देवाचे करावे । अखंड नाम जपत जावे । नामस्मरणे पावावे । समाधान।।' या समर्थांच्या अनुभव सिद्ध वचनामधून प्रतीत होत नाही का? येचि जन्मे काले । संसारी होइजे निराळे । मोक्ष पाविजे निश्चले । स्वरूपाकारे । या समर्थ वचनांचा साक्षात् अनुभव घेऊन मामामहाराज स्वरूपाकार झाले.

मामामहाराज सर्व काळ ध्यानांत मग्न असल्यामुळे ते फारसे बोलत नसत. पण त्यांचे हे मुकेपण म्हणजे, मुकेपणाचे बोलणे । हे जयाचि तोचि जाणे । याचे साक्षात प्रत्यंतरच होते आणि म्हणूनच, सदा स्वरूपानुसंधान । हे मुख्य साधूचे लक्षण । जगी असोनि आपण । जगावेगळा । अशी त्यांची स्थिति होती.



मामामहाराजांनी प्रपंच केला पण तो त्या प्रपंचातील कर्तव्यकर्मे पार पाडण्यासाठी ईश्वराने आपल्या हाती दिलेला एक पवित्र विश्वस्त निधि आहे याच भावनेने केला. त्यांना प्रपंचात पडावयाचे नव्हते, पण घरच्या वडिलधाऱ्यांचा अवमानहि करावयाचा नाही. म्हणून लग्नाचा घरांत विषय निघताच ते तडक आळंदीला माऊलीच्या दर्शनाला गेले. तेथे मामानी विरागी याचा खरा अर्थ जाणून घेऊन प्रपंच केला. वैराग्याचा खरा अर्थ वस्तु जवळ बाळगणे हा नसून ऐहिक वस्तूबद्दल आसक्ति नसणे हा आहे आणि मामांनी या दिव्य संदेशाचे पालन आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत केले. सद्गुरुंच्या आदेशाप्रमाणे मामामहाराजांनी अखंड ३८ वर्षे कीर्तन केले पण ते केव्हा तर 'उत्तम गुणे स्वये घ्यावे । ते बहुताति सांगावे । वर्तल्यावीण बोलावे । ते शब्द मिथ्या।।' या समर्थांच्या सुस्पष्ट वचनांचे पालन केल्यानंतर आणि त्यामुळेच मामांच्या कीर्तनात विलोभनीय असा एक सुगंध नेहमी दरवळत असावयाचा. कारण त्यांचे कीर्तन म्हणजे देवाचेनि प्रसन्नपणे । जे जे बोलणे । ते ते अत्यंत श्लाघ्यवाणे । या नांव प्रासादिक ।

याचा प्रत्यक्ष अनुभव साधकांना येत असे. मामामहाराज फार बोलत नसत पण तो त्यांचा सहजभाव होता. पण असे असून देखील जगामध्ये जगमित्र । जिव्हेपाशी आहे सूत्र । याचे अत्यंत काटेकोरपणाने पालन मामांनी जन्मभर केले. कांही विचारण्यासाठी आलेल्या साधकाला त्यांनी कधी नाराज केले नाही की कधी विन्मुख पाठविले नाही. एक साधक एकदा मामांना नामस्मरण कसे करावे हे विचारण्यासाठी आला. 'मोठ्याने नामे घ्यावे का?' उत्तर- 'घ्यावे' की. 'वैखरीने नाम घेतले तर काय होईल?' उत्तर- घेऊन पहावयास हरकत नाही. मनातल्या मानत नाम घ्यावे का? उत्तर - घ्यावे. श्वासोच्छ्वासी नाम आहे म्हणतात हे लक्ष देऊन ऐकावे का? उत्तर- हो हो जरूर ऐकावे । अहो तुम्ही सर्वच करावे म्हणता हे कसे काय ? उत्तर- तुम्ही भाविक सज्जन आहात तेव्हा तुम्हाला जमेल तसे घ्या, पण नाम घ्या एवढेच मला सांगायचे आहे. प्रश्न

घेऊन आलेल्या साधकाला या सोप्या पण मार्मिक व विनम्रभावाने समाधान देणारे मामामहाराज. त्यांची जन्मशताब्दी आज साजरी करीत आहोत. या मंगल सोहळ्यात आम्हा साधकांना आम्ही केलेल्या कामाचा हिशोब त्यांना स्वमुखाने द्यावयाचा आहे. कारण मामामहाराज कसे होते, तर ते साक्षात् परब्रह्मच होते. त्यांनी आपले अवघे जीवन ईश्वररूप केलेले होते.

स्वप्नात घडला दृष्टांत । तोचि आचारिला साक्षात् । अवघे जीवन गुरू आज्ञेत । वेचून मामा झाले कृतार्थ । अशा या भगवत्स्वरुप मामामहाराजांना त्यांच्या जन्मशताब्दी समारंभात कोटि कोटि प्रणाम । ॐ तत् सत् ।

***

## (२८)

## अमृत स्पर्श

**- शाम लिमये, फोटोग्राफर,** सांगली.

प. पू. मामामहाराज केळकर यांना जवळून पाहणेचा योग मला मी माझे वडिलांचे व्यवसायात हाताखाली उमेदवारी सुरू केली त्यावेळीच प्रत्यक्ष प्रथम आला. या अंकात छापलेला मामांचा फोटो घेणेसाठी 'रामनिकेतन'मध्ये मी वडिलांबरोबर गेलो होतो. फोटो झालेवर मामांचा आशिर्वाद घेणेसाठी वडिलांनी मला नेले. मी मामांना नमस्कार करिताच मला त्यांनी जवळ बसवून घेतले व मला एकच प्रश्न विचारला. 'तुझे या व्यवसायावर मनापासून प्रेम आहे का?' तात्काळ मी 'हो आहे' असे म्हणताच मामा म्हणाले, 'पुण्याई आहेच. तरीपण या व्यवसायात शांत चित्त आचरण ठेवलेस, तर धंद्यात तू निश्चितच यशस्वी होशील' असे म्हणून मोठ्या प्रेमाने मामांनी माझे पाठीवर आशिर्वादाचा हात फिरवला. आज या घटनेस जवळजवळ सत्तावीस वर्षे झाली. परंतु त्या क्षणी पूज्य मामांचा मला जाणवलेला तो अमृतस्पर्श आजपर्यंत मी विसरलो नाही. माझे व्यवसायामुळे मला आजपर्यंत अनेक साधु-संत, सत्पुरुषांचे दर्शन व



आशिर्वाद घेणेचे सद्भाग्य लाभले आहे. परंतु त्या सर्वांपेक्षा पू. मामांनी माझे पाठीवरून फिरविलेला तो आशिर्वादाचा स्पर्श एकमेवाद्वितीयच!

***

## (२९)

## काव्यपुष्प

**- सौ. कमलिनी गोखले**

सूक्ष्म देहा हा धारण करूनी आपुल्या सदनी वास करी
पुत्र मुखाने वदते झाले 'राम राम' हा मंत्र घरी ।।१।।
त्याच गुरूंच्या पुण्यतिथीला जमती भाविक किती
भक्तिरसाची सरिता पाहून कुंठित झाली मति ।।२।।
समाधीचे मग घेता दर्शन जोडून दो हस्तक
आशिर्वाद ते मागून घेण्या झाले नतमस्तक ।।३।।
कीर्तनात मग रंगून जाता नाम मुखी स्फुरले
श्रीरामाचा गजर ऐकता मद मत्सर विरले ।।४।।
प्रसाद घेऊन घरी परतला भक्तांचा मेळा
सुखावलेले नयन बोलती अगम्य हा सोहळा ।।५।।
सतेज राहो काव्यपुष्प हे गुरूचे चरणावर
विनम्र भावे कमला विनवी जोडून दोन्ही कर ।।६।।

***

## (३०)

## कीर्तनभक्तीचा नंदादीप

संतभूमि सांगलीतील हरिभक्तपरायण श्री. गोविंदराव अनंत केळकर तथा

मामामहाराज हे आधुनिक काळातील एक थोर संत असून, ते प्रत्यक्ष एकनाथमहाराजांचे अवतार मानले जातात. कीर्तनभक्तीसाठीच त्यांचा अवतार झाला होता. आळंदी येथे त्यांना श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे दृष्टांतदर्शन झाले असून, ज्ञानेशांनीच त्यांना 'प्रपंच करून परमार्थ करण्याचा' आदेश दिला. या दृष्टांतात श्री. मामांना ज्ञानेश्वरमहाराज जसे दिसले तसेच त्यांनी चित्रात रेखांकित केले. ज्ञानेश्वरांचे चित्र काढून श्री. मामांनी एकनाथमहाराजांचे राहिलेले एक कार्यच पूर्ण केले आहे. हे मूळ चित्र श्रीमामांच्या श्रीराममंदिरात लावले आहे.

ज्ञानेश्वरमहाराजांचे समाधिव्युत्थान अवस्थेतील हे भावपूर्ण दर्शन विलक्षण मोहक असून, दंड-कमंडलू-धारण केलेली, कफनी परिधान केलेली, कानांत रुद्राक्षकुंडल धारण केलेली, पायात खडावा घातलेली ज्ञानेशांची संपूर्ण उभी मूर्ति पाहून आपणास नाथपंथी महायोगिराजांचे दर्शन घडते. या मूळ चित्राची प्रतिकृती चित्ररूपाने आळंदी-पंढरपूर इत्यादि क्षेत्रस्थानी लावावी असा अनेक भाविकांचा आग्रह असून त्या दृष्टीने प्रयत्नही सुरू आहेत.

या अस्सल प्रतिमेमुळे भाविकांना श्रीज्ञानेशांच्या प्रत्यक्ष दर्शनाचा लाभ होणार आहे. श्री. मामांचे हे उपकार कधीच विसरता येणार नाहीत. त्यांच्याविषयी सांगलीतील महान दत्तभक्त संत श्री. पांडुरंगबुवा ताम्हनकरमहाराज म्हणतात-

''एकनाथ पैठणवाला । सांगली आवडली त्याला ।''

श्रीमामांच्या रुपाने साक्षात् नाथांनीच अवतार घेतला. नाथांच्याप्रमाणे श्रीमामांनी देखील अवघा प्रपंचच परमार्थरूप केला.

**तप:पूत जीवन**

श्रीमामांचा नित्यक्रम विलक्षण रेखीव आणि तप:पूत असा होता. कृष्णामाईचे स्थान, पाण्यात उभे राहून गायत्रीपुरश्चरण, तेजोपासनेसाठी व बलोपासनेसाठी सूर्यनमस्कार, भागवत-दासबोध-ज्ञानेश्वरी-तुलसीरामायण-आनंदरामायण-गुरुचरित्र इत्यादि थोर ग्रंथांचे वाचन-मनन अशी त्यांची तप:साधना सुरू असे.

एके दिवशी बुधगाव स्टेशनवर ब्रह्मचैतन्य श्री. गोंदवलेकरमहाराजांच्या



दर्शनाचा अचानक योग आला. या प्रथम भेटीतच श्री. मामांना प्रेमळ आशीर्वाद देऊन महाराज म्हणाले- ''हा पुढे महासाधु होणार आहे!''

करील ते काय नोहे महाराज! श्रीमामांचे विशुद्ध आचरण, तप:पूत जीवन आणि परमार्थाची उत्कट तळमळ यांमुळे लौकरच श्री. मामांना चिमडचे अधिकारसंपन्न साक्षात्कारी सिद्ध सद्‌गुरु श्री. नारायणमहाराज यरगट्टीकर यांचा अनुग्रह लाभला. श्री. मामांचे पारमार्थिक जीवन उजळून निघाले. श्रीसद्‌गुरूंच्या कृपानुग्रहानंतर रात्र रात्र त्यांची साधना चाले. ज्ञानेश्वरमहाराज हे श्रीमामांचे अविचल निष्ठाकेंद्र. त्यांनी ज्ञानेश्वरीची १०८ पारायणे केली. नामसाधना तर 'सर्वेषु कालेषु' सुरू होतीच. त्यातच कीर्तनभक्तीचा त्यांना अनुग्रह झाला.

**कीर्तनपंढरीतील नारद**

श्रीमामांचा अवतार कीर्तनभक्तीसाठीच झाला होता. लहानपणापासूनच त्यांना कीर्तनाचा विलक्षण छंद. सांगली म्हणजे कीर्तनपंढरी! अशा सांगलीत त्यावेळी सद्‌गुरु श्री. तात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या कीर्तनाचा रंग उसळला होता. त्यांनी दोन तपांहून अधिक, म्हणजे २५ वर्षे अखंड कीर्तनरंग उभारला. आपली कीर्तनपरंपरा अशीच अखंडपणे पुढे चालावी अशी त्यांची इच्छा होती. त्यामुळे आपल्या निर्वाणानंतर त्यांनी प्रत्यक्ष प्रकट होऊन श्रीमामांना नित्य कीर्तनाचा अनुग्रहपूर्वक आदेश दिला. श्रीसद्‌गुरूंची ही कीर्तनआज्ञा प्रमाण मानून श्रीमामांनी अक्षरश: एकही दिवस खंड पडू न देता, अखेरच्या दिवसापर्यंत नित्य कीर्तन केले. श्रीसद्‌गुरूंची सेवा म्हणून त्यांनी तीन तपांहून अधिक म्हणजे ३८ वर्षे अखंड कीर्तन केले. श्रीगोरक्षाने मत्स्येंद्रनाथांचा पराभव करावा तद्वत् या गुरुशिष्यांचा हा गोड कीर्तनसोहळा अपूर्व ठरला आहे. श्रीमामा या कीर्तन पंढरीतील नारदच ठरले!

२५+३८=६३ वर्षे चालत आलेली ही कीर्तनजान्हवी श्रीमामांच्या निर्वाणानंतरही खंडित झाली नाही. श्रीमामांच्या महानिर्वाणाच्या दुसऱ्या दिवसापासून श्रीमामांचे परमाधिकारसंपन्न चिरंजीव श्रीदासराम ऊर्फ

श्रीरामरायमहाराज केळकर हे नित्य अखंड कीर्तन करीत आहेत. त्यालाही पूर्ण १६ वर्षे झाली. अशी ही ८० वर्षांची अखंड कीर्तनपरंपरा खरोखर अपूर्व अशीच आहे. एवढेच नव्हे तर श्रीरामरायमहाराजांचे चिरंजीव श्रीचंद्रशेखर हे देखील भावपूर्ण कीर्तन करीत असतात. किंबहुना त्यांचे अवघे घरच कीर्तनमय झाले आहे. एकनाथांच्या वाड्याप्रमाणेच श्रीमामांच्या घराचे मंदिर झाले. 'श्रीरामनिकेतन' म्हणजे या परिसरातील एक अध्यात्म केंद्र बनले आहे. पिढ्या-पिढ्यांतून चालत आलेले हे कीर्तनसातत्य विलक्षण आगळे असेच आहे.

श्रीमामांची नित्य कीर्तनसेवा माघ व।। तृतीया शुक्रवार श. १८४५ रोजी सुरू झाली, श. १८८१ मध्ये तीन तपे पूर्ण झाली. त्यावेळी गुरुतृतीयेला त्यांच्या कीर्तनाचा त्रितपमहोत्सव साजरा करण्यात आला होता. 'सोनियाचा दिन अमृते पाहिला' असा हा गोड सोहळा. ही गुरुतृतीया झगमगत्या दिव्यांनी उजळून गेली. तीन तपांच्या कीर्तनतेजाने न्हाऊन निघाली. सांगलीसारख्या कीर्तन पंढरीच्या इतिहासात ही गुरुतृतीया सुवर्णाक्षरांनी लिहिली गेली आहे.

**ग्रंथसंपदा**

श्रीमामा 'मार्गाधारे वर्तून' 'विश्व मोहरे' लावण्यासाठी अखंड प्रयत्नरत होते. त्यासाठीच त्यांनी नित्य कीर्तनसेवा स्वीकारली होती. त्याबरोबरच ते महाराष्ट्र शारदेची शब्दकुसुमांनी पूजा बांधीत होते. एकेक ग्रंथाची घडण होत होती. श्रीमामांच्या साहित्यसंपदेचा विचार करता, प्रामुख्याने तीन ग्रंथांचा निर्देश करावा लागेल.

१) श्रीहनुमद्गुरुचरित्रबोधसार २) अभंगांचा गाथा, आणि ३) श्रीरामपाठ

या ग्रंथांतून एका परीने श्रीमामांचेच आध्यात्मिक चरित्र प्रकट झाले आहे असे म्हणता येईल. वरील ग्रंथांचा थोडक्यात परिचय असा :

**।। श्रीहनुमद्गुरुचरित्रबोधसार ।।**

श्रीमामांनी आपले परमसद्गुरु, अवतारी पुरुष श्रीहणमंतरावजी उर्फ तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांचे चरित्र मोठ्या भक्तिभावाने लिहिले असून,



त्यात त्यांनी सद्गुरुंच्या-प्रपंचातील परमावस्थेचा महिमा वर्णन केला आहे. प्रपंचात राहून सिद्धावस्था कशी सिद्ध करावी याचा वस्तुपाठच इथे दिसून येतो. 'सिद्धांचा आचार मुमुक्षु साधकांचा आदर्श असतो' याचे प्रत्यंतर या ग्रंथातून येते. आपल्या सद्गुरुंच्या दृष्टांताप्रमाणे श्रीमामांनी गुरुभक्तीने भारावून हे चरित्र अवघ्या सातशे ओव्यात लिहिले आहे. ओवीओवीतून त्यांचा भक्तिभाव पदोपदी प्रकट झाला आहे.

त्रयोदशाक्षरी सिद्ध मंत्राचा साक्षात्कार झालेल्या श्रीमामांनी या ग्रंथाची विभागणी त्रयोदश अध्यायांत केली असून या गुरुचरित्र ग्रंथाची रचना देखील तेरा दिवसांतच पूर्ण झाली आहे. प्रत्यक्ष श्रीगुरूंच्या साक्षात्काराचा दैवी आशीर्वाद या ग्रंथरचनेमागे उभा आहे.'मी दिधलासे कृपा वरद वर । आता वर्णन करी गुरुचरित्र गंभीर । ज्याचिये श्रवणें चराचर । पावन होती तात्काळ।।१.४२।।

अशा रीतीने श्रीमामांच्या तप:पूत लेखणीतून उतरलेले हे 'श्रीगुरुचरित्र' मुमुक्ष-साधकांना 'बोधसार' ठरणारे असेच आहे.

'स्वरूप' संप्रदायतील सिद्धसाक्षात्कारी आत्मप्रचीतीच्या भाषेत हा ग्रंथ प्रकट झालेला प्रारंभापासून दिसून येतो. 'आधार चक्रीचा श्रीगणेश' त्यांनी आरंभी पूजिला असून 'दशविध वाद्यांचिया ध्वनी' गजरात या विघ्नहर गणेशाची पूजा होते. शब्दशक्तिरूपिणी सतरावी जीवनकळा सरस्वतीच्या रूपात चर्चिली जाते. तर 'ॐकारयुक्त गुरुपरंपरेसी' ते वंदन करतात. पुढे श्रीसद्गुरुंचे वर्णन करताना तर 'अवर्णनीया वर्णन करीतसे' असे ते सांगतात. हे सद्गुरुरूप- 'गुरुरूप ब्रह्मरूप । शब्द दोन अर्थ एक ।' असे असून त्यांचे वास्तव्य 'त्रिकूट शिखरावरती स्वामी । आपण राहता नित्य नेमी' असे ते सांगतात. पुढे- 'इडा पिंगला सुषुम्ना । गंगा सरस्वती यमुना । यांची ओळखावी खुणा । गुरुकृपें करोनि ।।' असे सांगून 'साधक सिद्ध होय कैसा । गुरूबोधींचा विषय ऐसा' अशा शब्दांत आपल्या ग्रंथाचा मध्यवर्ती आशय ते स्पष्ट करतात.

मग यथाक्रम आपल्या परम सद्गुरुंचा अवतार, त्यांचे विवेक, वैराग्य,

शमदमादि साधन, त्यांची 'मोक्षो मे भूयात् इतीच्छा।', त्यांची सद्गुरुप्राप्ति, त्यांची अखंड कीर्तन साधना, त्यांचा आदर्श असा गृहस्थाश्रम, त्यांचे सिद्ध साक्षात्कारी जीवन इत्यादी चरित्र मोठ्या श्रद्धेने वर्णन करून द्वादशाध्यायात श्रीमामांनी श्रीगुरूंच्या आदेशावरून स्वानुभवांचे निवेदन केले आहे. ग्रंथाच्या शेवटी तेराव्या अध्यायात फलश्रुति कथन केली आहे.

त्रयोदशाध्यायी हे श्रीगुरुचरित्र साक्षात् गंगातीर्थ (त्यांचे चरित्र सांगतोय) असून त्यात गंगेप्रमाणेच शैत्यपावनत्वादी गुण आहेत. हे श्रीगुरूंचे चरित्र अपार असून 'ऐसा सद्गुरुमहिमा । वर्णवेना न कळे सीमा ।।' अशा विनम्र भावनेने त्यांनी श्रीसद्गुरूंचा महिमा, उत्कटभक्तीने वर्णिला आहे. श्रीमामांच्या अपरंपार गुरुभक्तीचा आविष्कार पुढील ओवीत दिसून येतो.

'सद्गुरु असता देहधारी । अथवा देह ठेविल्यावरी ।
भक्तां रक्षिति निर्धारी । सदासर्वदा सप्रेमें ।।१२.६४।।'

'कीर्तनी वृंदावन डोलवित' असा सद्गुरुंचा कीर्तनमहिमादेखील त्यांनी सांगितला आहे.

या श्रीगुरुचरित्राचा सातवा संपूर्ण अध्याय आणि अध्याय ११ मधील ८ ते १५ या ओव्यांतून श्रीमामांनी साक्षात्कारातील सिद्धानुभव सांगितले असून, त्यांचा स्वानुभवच इथे प्रकटलेला दिसतो.

स्वयंप्रकाश नीळ बिंदु । दंड प्रकटे आनंदकंदु ।
चित्ता चैतन्य प्रसादु । अखंडित मिळतसे ।।११-८।।
पडे गडद अंध:कार । तात्काळ प्रकाश प्रगटे थोर ।
चंद्र सूर्य नसतां हा प्रकार । येत असे अनुभवा ।।११.१३।।

इत्यादी निवेदन आत्मप्रचीतीविना केवळ अशक्यच.

सारांश सातशे श्लोकांच्या भगवद्गीतेप्रमाणे सातशे ओव्यांत लिहिलेले हे छोटेखानी गुरुचरित्र म्हणजे नित्यपठणात ठेवता येण्याजोगे श्रीगुरुस्तोत्रच म्हणता येईल. या ग्रंथपठणाने अंत:शुद्धि होऊन दु:ख-दैन्य-परिहार होईल. शेवटी



'त्यासी भेटेल भगवंत । साक्षात्कार स्वरूपे' असा निर्वाळा स्वत: श्री. मामांनीच दिला आहे.

### ।। अभंग गाथा ।।

श्रीमामांनी प्रसंगोपात उत्स्फूर्तपणे केलेल्या अभंगांची संख्या दोन हजारांहून अधिक आहे. कीर्तनप्रसंगनिमित्ताने लिहिलेल्या या स्फुरद्रूप अभंगांत विविध विषय आले असले, तरी त्या सर्वांची नामभक्तीशी गाठ पक्की बसलेली आहे. या सर्वच अभंगांतील आशयाचे केंद्र 'नामसाधना' हेच असून, त्यात नरदेहाची महती, रामनाम महिमा, रामनाम घेण्याची पथ्ये, नामाचे मार्ग, मनोमाळा, नामाचे तात्त्विक गतिरूप स्वरूप, इत्यादी गोष्टी त्यांनी स्वानुभवातून मांडल्या आहेत. त्यांच्या अंतरीचा भावकल्लोळ अभंगात उचंबळून प्रकट झाला आहे. 'अंतरीचे धावे । स्वभावें बाहेरी' याचे आपणास प्रत्यंतर येते.

### नामविकासी कमळ

श्रीमामांचे जीवनच नामरूप बनले होते. त्यामुळे त्यांच्या अभंगांतूनही त्यांनी नाममहिमा परोपरीने आळविलेला दिसतो. जगाला सूर्यविकासी कमळ माहीत आहे. चंद्रविकासी कमळ माहीत आहे. परंतु सद्गुरु मामा हे नामविकासी कमळ आहेत. सूर्यविकासी कमळे रात्री झोपी जातात. चंद्रविकासी कमळे दिवसा घट्ट मिटून असतात; पण श्रीमामा नामात सदैव फुललेलेच असत. त्यांना मिटणे माहीतच नव्हते. कारण नाम हे अखंड असून, नाम म्हणजेच मामा असे समीकरण बनले होते. कीर्तनप्रसंगी तर या विकसित कमळाची उत्फुल्लता विशेष दिसून येत असे. नामरूप अभंगवाणीने तर ते अजरामर झाले आहेतच, किंबहुना 'जोवरि नामाचा महिमा । तोवरि मामांचा महिमा।।' असेच म्हणता येईल.

श्रीमामांनी नामाचे शिखर गाठले असून नामाच्या उच्चतम शिखरावरून एखाद्या महर्षीप्रमाणेच विहार करीत असताना स्फुरलेली सिद्धवाणी त्यांच्या अभंगात दिसून येते. 'नाम' हीच त्यांची प्रयोगशाळा होती. अथातो नाम

जिज्ञासा । नाम जाणायचे, अनुभवयाचे, हाच त्यांचा छंद! त्यासाठीच नामाचे दुर्भेद्य कवच धारण करून, नामाच्या चंदनी मनोऱ्यात बसून, नामसिद्धीचीच वाणी त्यांनी प्रकट केली. 'नामयोग' हीच त्यांची साधना आणि तेच त्यांचे साध्य! बाह्य उपाधींचा उपसर्ग पचवून त्यांनी तुकोबांप्रमाणेच आपली अभंगगंगा वाहती ठेवली.

सूर्य-चंद्रांमुळे सागराच्या पृष्ठभागावर प्रचंड वादळे उत्पन्न होतात; पण अशा व्यवहारी प्रलयवादळात देखील सागराच्या तळाशी शांतपणे 'नाममोती' वेचण्याचे श्रीमामांचे अखंड साधन सुरू आहे.

त्यामुळेच 'परिपक्व सोलीव सुखाचे बोल' असे त्यांच्या अभंगवाणीविषयी म्हणता येईल.

श्रीमामांच्या अभंगवाणीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, आपल्या राष्ट्रीय सणांचा त्यांनी प्रकट केलेला आध्यात्मिक आशय, दसरा, दिवाळी, मकरसंक्रमण, शिमगा इत्यादी सणांचे पारमार्थिक मर्म त्यांनी विलक्षण मार्मिकतेने सांगितले आहे. उदा.

१) तेरामाजी धनराशी । तेचि धनत्रयोदशी ।

२) लक्ष स्वरूपी मिळाले । लक्ष्मीपूजन दासा भले ।

३) सीमा उल्लंघन साधावा दसरा । जनांच्या आचारा सांडोनिया ।।

४) नाम सोने घ्यावे, नाम सोने द्यावे । मुहूर्त साधावे औटामध्ये ।।

५) शिवाचे मनीचे गाई नाम वाचे । सणी शिमगियाचे तेची धन्य ।।

इत्यादी श्रीमामांच्या अभंगवाणीतील प्रासादिक गोडवा अवीट असून, आशय आणि अभिव्यक्ति या दोन्ही दृष्टींनी त्याची थोरवी, नि:संशय आहे. श्रीमामांचा अभंगगाथा प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

**रामनामाचा प्रसाद**

वरीलप्रमाणे अभंगरचना सुरू असतानाच श्रीमामांनी साडेतीन कोटी रामनामाचे पुरश्चरणही पूर्ण केले-



साडेतीन कोटी पुरश्चरण । करिता झाले प्रभुदर्शन ।।
मारुतीराय धाऊनि आले । भक्ताघरी उभे ठेले ।।

श्रीरामानंदमहाराजांच्या या उक्तीप्रमाणे खरोखरच त्या दिवशी मिरज येथील श्रीवेणाबाईच्या मठातील श्रीसमर्थांच्या हातचा प्रसाद मारुति श्रीमामांना प्रसाद म्हणून, श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराज यांनी आणून दिला. अशी शुभंकर प्रसादचिन्हे श्रीमामांच्या जीवनात पदोपदी उमटत होती.

**।। श्रीरामपाठ ।।**

'श्रीरामपाठ' हा श्रीमामांचा सर्वात छोटा ग्रंथ असून, यांत बत्तीस अभंग आहेत. हा ग्रंथ आकाराने छोटा असला तरी भावानुभूतीच्या दृष्टीने फार मोठा आहे.

ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे 'बिंब तरी बचके एवढे । तरी प्रकाशा त्रैलोक्य थोकडे ।' अशी या छोट्या ग्रंथाची थोरवी आहे. प्रत्यक्ष ज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपाप्रसादानेच श्रीरामपाठाची रचना झाली आहे.

ज्ञानेश्वरकृपाप्रसादे रचिले । तयांचिये बोले समाधान ।।

श्रीमामांच्या सोलीव स्वानंद सुखाचे स्वप्नच इथे साकार झाले आहे. श्रीमामांना साधारणत: वयाच्या ५०-५१ व्या वर्षी (श. १८१० मध्ये) श्रीरामपाठाचे स्फुरण झाले. आयुष्यातील ऐन मध्यान्हीचे अध्यात्मतेजच जणू इथे अल्पाक्षर रमणीयतेने प्रकट झाले आहे. श्रीमामांच्या परिणतप्रज्ञ वाणीचा हा हुंकार विलक्षण सूत्ररूपाने प्रकट झाला आहे.

'श्रीरामपाठाचा दाता सद्‌गुरु' अशा दैवी वरदानाचे हे मंत्रस्फुरण असून, थोर संतांच्या हरिपाठाप्रमाणेच यातील सर्व अभंग हरिनामभक्तीने संयुक्त असेच आहेत. श्रीरामपाठाच्या अभंगांतून हरिनामाच्या महाबोधार्थाचे मर्मच आविष्कृत झाले आहे.

'श्रीरामपाठ' म्हणजे श्री. मामांच्या आयुष्यातील अखंड नामघोष गौरवाचा परिपक्व असा अध्याय आहे असे म्हणता येईल. साक्षात् अनुभूतीची ही स्फुरद्‌रूप

वाणी आहे. आत्मानुभवाचा हा सहजाविष्कार आहे. प्रत्यक्ष प्रचीतीचे मंत्रसामर्थ्य रामपाठात सामाविले आहे. थोर संतांचे सहजोद्गार सिद्धमंत्र कसे असतात याचे हे मूर्तिमंत उदाहरण आहे.

श्रीरामपाठ म्हणजे एका अर्थी आत्मसाक्षात्काराचा समंत्र सिद्धप्रयोग आहे. देहातील पवनवेगातून देवाकडे झेपावणारा गतिमान आवेग त्यात सामावला असून, व्यष्टीचे आणि समस्त सृष्टीचे देहकवच भेदून परमेष्ठीला भिडणारे प्रयोगसिद्ध सामर्थ्य या बत्तीस अंभगांतून प्रकट झाले आहे. देहातील वायुलहरीच्या नामगतीप्रमाणेच या श्रीरामपाठात देखील तालबद्ध संगीताची एक लय भरून राहिलेली जाणवते. एकांतात निवांतपणे रामपाठ वाचताना त्याचे प्रत्यंतर आल्याविना राहात नाही. आळंदीच्या ज्ञानेश्वर समाधिमंदिरातील गाभाऱ्यात घुमणाऱ्या अंतर्नादाप्रमाणेच ही धून शांत-गंभीर अशी आहे. रामपाठाच्या वेळी नकळत आपणही ठेका धरतो, तल्लीन होतो. तुकारामांच्या बारा अभंगातील ताल-तोल गोडवा इथेही जाणवत राहतो.

'रामनाम गती देहात प्रचिती' ही रामपाठाची प्रतिज्ञा असून याच प्रमेयाची जणु प्रयोगसिद्ध मांडणी पुढील अभंगांतून केली गेली आहे. मंगल रामनामाच्या योगाने सकल देहभावांचा निरास होतो, मन:शुद्धी होते, संतसंग घडून येतो, आणि या देहातच विदेही आत्मारामाचे तेज प्रकाशित होऊ लागते. अखंड सुखाची प्राप्ति होते. हीच खरी सहजसमाधी होय. 'जेथे देवराज भेटी होय' हीच रामपाठाची प्रमेयसिद्धि समोर येते.

श्रीरामपाठात जीव-शिवभेटीचा जणू अनुभवसिद्ध असा प्रयोगच मांडलेला दिसतो. 'मोक्षाची ती वाट जवळीच नीट' असे प्रतिज्ञोत्तर विधान करून, या वाटेची वाटचाल इथे एखाद्या प्रेमळ सद्गुरुप्रमाणे समजावून सांगितलेली दिसते. या दृष्टीने रामपाठातील २५ ते २९ हे पाच अभंग म्हणजे साधनसिद्धीचा अनुभवसिद्ध निष्कर्षच म्हणता येईल. सद्गुरुकृपेचे विज्ञान 'गोविंद म्हणे गुरूकृपेचे विज्ञान । बोलिलो संपूर्ण हनुमंत कृपे ।।'



श्रीरामपाठात सद्गुरुकृपेने आत्मज्ञानाचे संपूर्ण विज्ञान सांगितले गेले असून, साधकाला सगुणनिर्गुणापलीकडील ते विष्णुरूप कसे प्रचीतीला येत जाते ते ठामपणे सांगितले आहे. 'देवराज भेटीतील' अनुभव कसकसे येत जातात याची क्रमवार मांडणी येथे आपणास दिसून येते.

सद्गुरुकृपेने सबीज नाममंत्र प्राप्त झाल्यानंतर साधनेत येत जाणाऱ्या अनुभवाविषयी ते लिहितात-

'जव एक श्वास साधेल पवन । मना समाधान थोर वाटे ।
जव दोन श्वास साधेल पवन । सम धातुक मन होत असे ।
जव चार श्वास साधेल पवन । विरहित मन देहबुद्धी ।'

साधकाची साधना अशीच क्रमाने वृद्धिंगत होत राहिली तर एका पळाच्या अभ्यासाने जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तिन्ही अवस्थांतही मन एकाग्र होते. दोन पळांनी मनाचे उन्मन होते. चार पळांनी अनुहताचे दशनाद ऐकू येऊ लागतात. आठ पळांनी मनुष्य निर्विषय होतो. पंधरा पळाने शक्तिजागरण घडते. आणि तीस पळांच्या अभ्यासाने ब्रह्मस्थानी आगमन होते. त्याही पुढे ते सांगतात की, एका घटकेच्या अभ्यासाने दृष्टि अंतर्मुख बनते. दोन घटकांच्या साधनेने ब्रह्मरंध्राचे भेदन होते. चार घटकांच्या साधनेने तारक बिंदूचे दर्शन घडते. आणि मग अशा रीतीने नामसाधना अखंड सुरू झाली की, एक प्रहराच्या पवन विजयाने सारे देहधर्म आटून जातात. देहीच विदेही अवस्था प्राप्त होते. मग पुढे आणखी ते सांगतात-

'ज्यासी दोन प्रहर साधेल पवन । विष्णूचे दर्शन होत असे ।
साधिलिया जीवा विष्णूचे दर्शन । अष्टौप्रहर साधन चालतसे ।।'

असा हा श्रीमामांच्या साधनसिद्धीचा निजानुभवच प्रकट होताना दिसतो. एका श्वासापासून पळापळाने घटकाप्रहर अष्टौप्रहरापर्यंत चढत जाणारा हा ब्रह्मपदीचा चढता-चढता अनुभवमार्ग इतक्या शास्त्रोक्त रीतीने व ठामपणे क्वचितच मांडला गेला असेल.

## प्राकृत विज्ञानोपनिषद

श्रीरामपाठाचा आणखी एक विशेष म्हणजे सूत्रबद्ध व्याख्यानात्मक परिभाषा. अल्पाक्षर रमणीयतेने नटलेल्या या रामपाठाची तुलना करताना मंत्रद्रष्ट्या ऋषींच्या उपनिषदांची सहजच आठवण होते. छोट्या छोट्या गतिमान आणि धावत्या अभंगचरणांतून अतिशय सूत्रबद्ध रीतीने येथे अध्यात्माचा अवघड आशय सहज सघन होत जातो. उदा.

१) भाव म्हणजे काय, ज्याविण सर्व वाव । २) संगती म्हणजे समगती जाणे । ३) एक असे आत्मा ज्यांत आदि अंत । तो स्वये एकांत ओळखावा। ४) गोविंद म्हणे मन गळतां मंगळ । मनाची खळबळ जेथे नुरे ।। ५) रामनाम मुखी थोर सदाचार ६) तप म्हणजे काय प्रकाशित होणे । अंधार दवडणे बुद्धितील ।। ७) जपोनि जपणे जप बोलिलासे । अशी ही रामपाठातील औपनिषदिक वारसा सांगणारी सूत्रबद्ध भाषा आहे. असे हे प्राकृत उपनिषदाचे कोडिसवाणे रूप आहे.

अध्यात्म विज्ञानाची ही परिभाषा संगतवारपणे आपले प्रमेय मांडून 'रामनामी जाण सर्व काही' असा निष्कर्ष सांगते. त्यातूनच भाविकांना मग-

'तया रक्षी स्वये रामसीतापती । सर्वत्र आकांती अंतकाळी ।।'

असे प्रगाढ आश्वासन मिळते. यापेक्षा अधिक कोणत्याही अभिवचनाची अपेक्षाच उरत नाही.

जाता जाता रामपाठाच्या शेवटी 'सांडोनि आळस पाठ करा' असे कळकळीने सांगण्यासही श्रीमामा विसरले नाहीत. इथे त्यांच्यातील प्रेमळ सद्‌गुरुसाधक शिष्याची काळजी घेताना सहजच दिसून येतात.

रामपाठातील पाठांतरसुलभ प्रासादिक वाणीमुळे व त्यातील सूक्ष्म सखोल वैचारिकतेमुळे, त्याचे संस्कारसामर्थ्यही विलक्षण प्रभावी ठरले आहे.

शेवटी रामपाठासंबंधी ज्ञानेशांच्याच शब्दांत सांगायचे तर असे म्हणता येईल-



एवं गुरूकृपे लाधलें । समाधिधन जे आपले ।
तें ग्रंथीं बांधौनि दिधले । गोसावी मज ।। (१८.१७६३)

## स्वानंदसुखाची सनद

श्रीरामपाठात श्रीसद्‌गुरु मामांचे प्रत्यक्ष प्रचीतीचे बोल प्रकटले आहेत यात तिळमात्र संदेह नाही. 'इडा आणि पिंगला सुषुम्नेंत सरतां । रामनाम हातां येत असे ।।' या शब्दात त्यांची स्वानुभूति रामपाठात व्यक्त झाली असून, रामपाठ लिहून झाल्यावर त्यांना साक्षात् रेवणसिद्धांचे दर्शन झाले आहे. श्रीसद्‌गुरु मामांनी रामपाठाद्वारे साधकांना स्वानंद-सुखाची सनदच मिळवून दिली आहे. 'रामनाम' हीच त्यांची जीवना प्रतिज्ञा होती. रामपाठात ते म्हणतात,

'तरो अथवा बुडो नाम न सोडीन । प्रतिज्ञा ही जाण जीवीं धरी ।।'

आपली ही प्रतिज्ञा श्रीमामांनी आपल्या जीवनात विलक्षण जिद्दीने सिद्ध करून दाखविलेली दिसते.

## इच्छामरणाचा अनुपम निर्वाणसोहळा

महापुरुषांचे निर्वाणही अनुपम असते. श्रीमामांच्या महानिर्वाणाचा सोहळा देखील असाच आहे. सोमवार माघ शु. ।। नवमी (सरती भीष्माष्टमी) श. १८८३, दि. १२-२-१९६२. अनेक दुर्धर व्याधीना आश्रय देणाऱ्या श्रीमामांच्या नाड्या सकाळी ६ पासून सुटत चाललेल्या होत्या. डॉक्टरांनी जास्तीत जास्त दुपारी २ पर्यंत वाट पाहा म्हणून सांगितले होते. बाकी सर्व सामसूम झाले होते. पार्थिव देहात कसलीच हालचाल नव्हती. घरातील वातावरण विलक्षण शांततेने भरून गेले होते. काळजी-चिंता यांनी सारेच व्याकुळ होते. श्रीमामांच्या नित्य कीर्तनाची वेळ पाच वाजताची! पण... आज कीर्तन कुठले? आज कीर्तन कसे होणार? कुणालाच काही सुचत नव्हते, दर्शनासाठी भाविकांची गर्दी वाढत होती. डॉक्टरांनी दिलेली वेळ तर केव्हाच उलटून गेलेली होती! दुपारचे दोन उलटले, तीन उलटे; चार वाजले. काय समजायचे? का कुणास ठाऊक? कुठल्या तरी प्रचंड आत्मिक इच्छाशक्तीच्या जोरावर श्रीमामांची जीवनज्योत अजूनही तेवत होती.

काय हवे होते त्यांना? कोणती इच्छा राहिली होती त्यांची? अखंडपणे ३८ वर्षे नित्य हरिकीर्तनात रंगून गेलेल्या योगिराज गोविंदजींची अखेरची इच्छा तरी कोणती राहिली असणार? त्यांना काय हवे असेल?

इतरांना कसे कळावे? क्षणाक्षणाला काळजी मात्र वाढत होती. दुपारी ४।। वाजून गेले. नित्यकीर्तनाची वेळ अगदी जवळ आली, नव्हे पाच वाजलेच! ठण्...ठण्.... ठण्.... पाचाचे टोल पडू लागले आणि अक्षरशः अघटित चमत्कार घडून आला. इकडे पाचाचे टोल पडू लागले आणि अक्षरशः अघटित चमत्कार घडून आला. इकडे पाचाचे टोल पडले होते, त्याच वेळी श्रीमामांनी आपले डोके वर उचलले. डोळे उघडले. त्यांच्या नेत्रात नीलवर्णाची तेजज्योत त्यांचे चिरंजीव श्रीरामरायमहाराज यांना दिसून आली. श्रीमामांनी मोठ्याने सांगितले- 'श्रीराम जयराम जयजयराम म्हणा।'. अंगणातील कोपऱ्यात असलेल्या विहिरीपर्यंत आवाज ऐकू जाईल इतक्या मोठ्याने त्यांनी श्रीरामनामाचा मंत्र उच्चारला. आपल्या अखेरच्या दिवसाचे नित्यकीर्तनच त्यांनी केले. तोच त्यांचा जीवनसंदेश! सर्वांना विलक्षण आश्चर्य वाटले. सारेच अतर्क्य! विचारापलीकडचे! डॉक्टर देखील म्हणाले की 'हे सद्गुरुंचे सामर्थ्य. हे आमच्या शास्त्रात बसत नाही!'

आपली नित्य कीर्तनसाधना निर्वाणाच्या दिवशी देखील निग्रहाने पाळणाऱ्या श्रीमामांनी साधनेचा अपूर्व आदर्श दाखवून दिला.

मोठ्या भक्तिभावाने श्रीरामनामाचा अखंड गजर सुरू झाला. हा हरिनामजागर रात्री ११-५० पर्यंत चालू होता. या नामसंकीर्तनातच श्रीमामा नामरूप झाले! श्रीमामा ब्रह्मचैतन्यरूप पावले!

इच्छामरणी भीष्माचार्यांच्याप्रमाणे श्रीमामांनी देखील आपल्या भीष्मव्रताची प्रचीति आणून दिली. आपल्या नित्याच्या कीर्तनासाठीच श्रीमामांनी काळालाही थोपवून धरले. श्रीमामा कृतार्थ झाले. धन्य झाले! श्रीमामा स्वानंदभुवनी विराजमान झाले. 'शेवटचा दीस गोड झाला!' श्रीगोविंदाय नमः।



## (३१)

# अलौकिक महासाधु नित्यहरिकीर्तननिष्ठ श्रीमामामहाराज केळकर

**- प्र. स. भावे**

परमेश्वराचे अवतार संत महात्मे. ते परमेश्वराच्या इच्छेने जगात वावरतात. आडरानी जाणाऱ्या अज्ञ जनांना परमेश्वराजवळ पोचण्याचा मार्ग दाखवतात. मार्गात संत महात्मे दीपस्तंभाप्रमाणे उभे राहतात. या कलियुगात असे अनेक महासाधु जन्माला आले म्हणूनच जग थोड्याफार प्रमाणात सुखी आहे असे म्हणावेसे वाटते. कस्तुरी कोपऱ्यात जाऊन दडली तरी तिचा सुगंध कसा लपून राहील? संत महात्मे अलौकिक असतात. कीर्तीकडे त्यांनी पाठ फिरवलेली असते. सामान्य जनांचा उद्धार करण्यासाठी संतांचे अवतार असतात, त्यामुळे आपल्या नावाचा डांगोरा ते कधीच पिटत नाहीत. असाच एक अलौकिक साधु पुरुष सांगलीला कृष्णामातेच्या पुनीत जलाने पवित्र झालेल्या भूमीत अवतरला, आपले अलौकिक कार्य करून निजधामास गेला. त्या देवस्वरूप विभूतीचे नांव ''गोविंद उर्फ बापूरावजी केळकर तथा श्रीमामामहाराज केळकर''. सागराप्रमाणे अतिविशाल असणारे श्रीमामांचे चरित्र चार दोन पानांत कसे लिहिता येईल? तरी पण त्यांचे शब्दचरित्र थोडक्यांत गुंफण्याचा प्रयत्न मी करणार आहे.

अखंड ध्यान श्रीरामाचे । अखंड पूजन श्रीरामाचे ।।
अखंड कीर्तन श्रीरामाचे । हेचि गोविंदचरित ।।

असे त्यांचे सार्थ वर्णन करता येईल, किंवा सांगलीचे अवधूत सांप्रदायी संत ताम्हणकरमहाराजांचे शब्दांत सांगायचे झाल्यास- ''जीवन मुक्त देखना गर है किनकी आस । जा देखो गोविंदको समज पडेगी खास'' असे म्हणता येईल. अद्वैतात एकतान झालेले, व्यवहारात परमार्थ चाखणारे, संसार परमार्थ-रूप करणारे असे श्रीमामामहाराज हे अलौकिक अद्वितीय संतश्रेष्ठ होते. संसार व

साक्षात्कार यांचा सुंदर संगम म्हणजे श्रीमामामहाराज केळकर. देवासाठी कीर्तन करणाऱ्या श्रीमामांना वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू वै. मामासाहेब दांडेकर तर त्यांना आधुनिक एकनाथ म्हणूनच संबोधित आणि ते उचितही आहे.

एकनाथमहाराज पैठणचे; त्यांनी ३ तपे नाम संकीर्तन केले; जनासामान्यांना नामाचे महत्व पटवून सांगितले. त्यांचे घरी प्रत्यक्ष भगवान श्रीखंड्याच्या रूपाने वावरत होता. स्वत:च्या पूजेसाठी स्वत:च चंदन उगाळीत होता, हे नाथमहाराजांना जेव्हा कळले तेव्हा तो जगन्नायक अंतर्धानही पावलेला होता! आपल्या घरी भगवंताला फार कष्ट पडले याची बोचणी नाथमहाराजांना लागून राहिली. त्याची भरपाई झाली पाहिजे म्हणून की काय सांगलीत श्रीनाथांनी श्रीमामामहाराजांच्या रूपाने पुन: अवतार घेतला व पुन: तीन तपे अखंड नाम संकीर्तन केले. नव्हे नव्हे तर त्यावर दोन जास्त म्हणजे अखंड ३८ वर्षे अगदी आपल्या देहांतापर्यन्त! म्हणूनच श्रीमामामहाराजांना 'आधुनिक एकनाथ' म्हणून ओळखले जाते. श्रीताम्हणकरमहाराज म्हणतात-

पैठण क्षेत्री अतृप्त हेतु । सांगलीत पूर्णेच्छा होतु ।।
हरीभक्तीचा कळस डोलतु । पांडुरंग मनी भरला ।।

**जन्म व बालपण :**

श्रीमामांचे पिताजी अंताजीपंत उर्फ नाना एक महान शिवभक्त होते. या 'शिवभक्ताच्या' पोटी श्रीमामांचा अवतार झाला. एका गोठाण्यात त्यांचा जन्म झाला म्हणून त्यांचे नांव गोविंद असे ठेवण्यात आले, दिसामासानी बाल गोविंद वाढू लागला. नोकरीच्या निमित्ताने अंताजीपंतांना सांगलीस वास्तव्य करावे लागले. त्यांच्याबरोबर त्यांची अंगुली धरून बाल गोविंद सांगलीस आला. बालपणी कधी हट्ट नाही. देवाच्या फोटोकडे तासन्तास पहात बसावे. खेळावे तेही देवाच्या मूर्तीशी! लहानपणी श्रीब्रह्मचैतन्यमहाराज गोंदवलेकर यांच्या दर्शनाला गेलेले असतांना ''हा मुलगा पुढे महासाधू होईल'' असा त्यांनी



आशीर्वाद देऊन ठेवलेला होता! लहानपणी भल्या पहाटे उठावे, कृष्णा नदीत स्नान करावे, गायत्री पुरश्चरणे करावीत, गोमूत्रातील भाकरी खावी! कडू लिंबाचा रस घ्यावा. बलोपासना करावी. दररोज १२०० जोर व १२०० बैठका हा त्यांचा नित्य व्यायाम. त्यामुळे वज्रदेही मारुतीप्रमाणे त्यांचे शरीर बनलेले होते.

मुखी रामनामाचा घास घालावा हा त्यांचा नित्यनेम, ही त्यांची दिनचर्या. परमेश्वराच्या चिंतनात काळ व्यतीत होत होता. शिक्षण चालू होतेच. त्यावेळच्या प्रथेनुसार घरात विवाहाच्या गोष्टी चालू झाल्या. श्रीमामांना अंगावर आकाश कोसळल्याचा भास झाला, कारण परमेश्वर चिंतनात विवाह म्हणजे फार मोठे विघ्न वाटले श्रीमामांना! बालपणापासून श्रीज्ञानेश्वरमहाराजांचेवर अतोनात निष्ठा! विवाहाची अनुमति मागण्यासाठी सन १९०४ मध्यें श्रीमामा आळंदीला आले आणि बसले आळंदीला अनुष्ठानासाठी. आणि अहो आश्चर्यम्! ती दीनजनांची साऊली, ज्ञानराज माऊली प्रत्यक्ष समोर उभी राहिली आणि 'प्रपंच करून परमार्थ कर, व तुला योग्य गुरूची गाठ पडेल.' असा आशीर्वाद दिला. माझ्या माहितीप्रमाणे परमेश्वराजवळ विवाहाची अनुमती मागणारे एक आणि एकच श्रीमामामहाराज होते. साक्षात्काराचे 'रेखाचित्र' त्यांनी स्वत: काढले असून घरात लावलेले आहे. त्यावेळी प्लेगची साथ मोठ्या प्रमाणांत येई. अशाच एका प्लेगच्या साथीचे वेळी प्लेगने मामांना गाठले. त्यातून ते वाचलेहि परंतु त्यांची वाचा गेली, परंतु ज्ञानेश्वर माऊलीवर भिस्त ठेऊन श्रीज्ञानेश्वरीची पारायणे पुनश्च सुरू झाली. ती पूर्ण होताच श्रीमामांची अस्खलित वाणी पुनश्च सुरू झाली. चिमडच्या श्रीनारायणमहाराजांच्या अनुग्रहानंतर त्यांनी रात्र रात्र साधना केली. सांगली श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराजांनी अखंड २५ वर्षे कीर्तन केले, ही परंपरा टिकली पाहिजे. चालली पाहिजे, ही एकच इच्छा त्यांची होती. श्रीमामांचा माघ वद्य प्रतिपदा ते माघ वद्य नवमीपर्यन्त दासबोध पारायणाचा नेम होता. माघ वद्य तृतीये दिवशी रात्री १२ वाजता कोटणीसमहाराज प्रकट झाले आणि त्यांनी ''तू नित्य कीर्तन करीत जा'' अशी आज्ञा केली. ही आज्ञा

शिरसावंद्य मानून श्रीमामांनी आपल्या देहांतापर्यंत अखंड ३८ वर्षे ही कीर्तन गंगेची नामज्योत अखंड तेवत ठेवली. श्री. कोटणीसमहाराजांनी देह त्यागानंतर केलेली ही आज्ञा होती आणि ती श्रीमामामहाराजांनी अखंडपणे ती कीर्तन परंपरा चालवली यातच मामांची सद्गुरुनिष्ठा किती होती हे वाचकांच्या सहज ध्यानी येईल.

श्रीमामांची 'कीर्तनभक्ति' पाहून, 'नामनिष्ठा' पाहून पावसचे (रत्नागिरी) श्रीस्वामी स्वरूपानंद म्हणत, ''श्रीमामा म्हणजे राम भक्ति आणि रामभक्ति म्हणजे श्रीमामा''. श्रीमामांनी पापपुण्याची केलेली व्याख्या फारच बोलकी आहे. ते म्हणत नाम म्हणजे पुण्य व अनाम म्हणजे पाप. मला वाटते ही व्याख्या कुणालाही खोडून काढता येणार नाही. कीर्तनात विषयाची मांडणी सुद्धा नाम हा केंद्र बिंदु धरून केलेली असायची. साहित्याचार्य न. चिं. केळकरांनी श्रीमामांना विचारले 'एक नाम या विषयावर इतकी वर्षे कसे काय सांगता?' त्यावर श्रीमामा म्हणाले 'नाम या विषयावर एवढे सांगण्यासारखे आहे कीं माझ्या आयुष्यात तरी सांगून संपेल, असे दिसत नाही'. श्रीमांची नेमनिष्ठा एवढी अचाट होती. कधीकधी ते कीर्तनात सांगत, ''मला आता ब्रह्मदेव जरी बोलवायला आला तरी त्याला सांगेन- बाबा थोडा वेळ थांब. माझा कीर्तनाचा नेम व्हायचा आहे.'' ही कीर्तन परंपरा खंडित व्हावी म्हणून अनेक विघ्नसंतोषी माणसांनी नाना संकटे त्यांच्या समोर निर्माण केली, पण श्रीमामांचे तपसामर्थ्यच अफाट. त्यामुळे त्यांची कीर्तनगंगा अखंड प्रवाहितच राहिली. स्वरूपानंदात तल्लीन झालेल्या श्रीमामांना त्या संकटांचे कांहीच वाटले नाही! हे सारे व्यवस्थित आणि अखंड चालू होते पण सेवेचा बोलबाला नाही. शिष्यांचा भोवती गराडा नाही. सदा कीर्तीकडे पाठ फिरवलेली. सद्गुरुंची आज्ञा प्राणासमान मानून आपली वाणी नामासाठी त्यांनी वेचली. त्यांच्या नामनिष्ठेने प्रभावित होऊन अनेक साधुजन, संतमहात्मे त्यांच्या भेटीसाठी येत. वारकरी संप्रदायाचे अध्वर्यु वै. मामासाहेब दांडेकर यांचा तर श्रीमामांचेवर विशेष लोभ. वै. मामासाहेब



सांगलीत आले आणि श्रीमामांना न भेटता गेले असे एकदाही नाही घडले. एकदा तर ते चक्क पावसात भिजत श्रीमामांचे घरी आले होते! संतच संतांना जाणतात हेच खरे!

ज्या कार्यासाठी श्रीमामांचा अवतार झाला ते तर अखंडपणे चालूच होते. अनेक 'दुर्धर रोगांनी' श्रीमामांचे शरीर जवळ केले. त्यांनाही आवडला संत समागम! संतांना मरणाचे भय कधीच असत नाही. कारण ते इच्छामरणी असतात. श्रीमामांच्या निर्याणाचा एक अविस्मरणीय सोहळा झाला.

आपुले मरण पाहीले म्या डोळा तो सुख सोहळा अनुपम ।।

दि. १२ फेब्रुवारी १९६२ रोजी सकाळी ६ वाजता नाड्या सुटलेल्या असताना संध्याकाळी ५ वाजतांच ''श्रीराम जयराम जय जय राम'' या त्रयोदशाक्षरी मंत्राचा उद्घोष त्यांनी केला. अखंड नामस्मरण हेच त्यांचे कीर्तन! श्रीमामांची कीर्तन निष्ठा काळाला लाजवणारी. सारेच काही शास्त्राच्या पलीकडचे! श्रीमामांनी आपला कीर्तन नेम पुरा केला. श्रीमामांनी सोमवार माघ शुद्ध नवमी शके १८८३ रात्रौ ११ वाजून ५० मिनिटांनी आपले इहजीवन संपवले. श्रीमामांची आत्मज्योति परमात्मज्योतीत तद्रूप झाली.

श्रीमामांची ही कीर्तनपरंपरा त्याच निष्ठेने, त्याच प्रेमाने, त्याच भक्तीने चढत्या वाढत्या श्रेणीने त्यांचे परमाधिकारसंपन्न सुपुत्र परमपूज्य सद्गुरु रामराय तथा दासराममहाराज केळकर अखंड चालवत आहेत !

***

## (३२)

## कीर्तन दरबार श्रीमामांचा

**- प्रकाश सदाशिव भावे,** एम. ए.

'गोविंद' ज्याच्या नांवात सुद्धा आनंद आहे, त्याहून म्हणावयाचे झाल्यास

परमानंद आहे. परमेश्वरासाठी वेडे झालेले हजारो भक्तराज होऊन गेले, पुढेही होतील परंतु ज्यांचा केवळ नामासाठी अवतार झाला, कीर्तनासाठी अवतार झाला आणि ज्यांचे केवळ देवासाठी कीर्तन, असा महात्मा होणे दुर्लभ!

सदरहू महात्मा केवळ नामात राहिला. विरहाने तो कासावीस झाला. नामाच्या सहवासाने जो स्वत:ला विसरला. नाट्यपंढरी सांगलीचे कीर्तन पंढरीत रुपांतर करणारा, आपल्या अखंड नामसंकीर्तनाने मुमुक्षूंना आत्मोद्धाराचा मार्ग सांगून अध्यात्माच्या क्षेत्रात सांगली बहुत चांगली असे इतरांना म्हणावयास लावणारा, देव नाही असे म्हणणाऱ्यांना आपल्या अखंड नामसाधनाने देव आहे असे म्हणायला लावणारे योगी पुरुष अखंडनामसंकीर्तनयोगी, ब्रह्मीभूत, एकनाथावतार पू.श्रीगोविंद अनंत उर्फ श्रीबापूरावजी केळकर तथा श्रीमामामहाराज केळकर.

श्रीमामामहाराजांचा कीर्तनदरबारही आगळावेगळा; साचा एक परंतु खाक्या निराळा. कीर्तन ही प्राचीन काळापासून चालत आलेली नारदाची गादी, मधुर वाद्यांचा झंकार जिथे असेल, भक्तिगीतांचा मधुर स्वर असेल, ताल उत्तम, सूर उत्तम, वक्तृत्व ही उत्तम त्या कीर्तनदरबाराचा थाट काय वर्णन करावा.

परंतु श्रीमामामहाराजांच्या कीर्तन दरबारीचा थाट काय वर्णावा? श्रीमामामहाराज कीर्तनात देवाला आळवू लागले की भक्तिरसाची गंगा दुथडी भरून वाहू लागे. त्या नामगंगेत अखंड डुंबावे आणि स्वत:ला धन्य करून घ्यावे. श्रीमामामहाराजांचे कीर्तन म्हणजे नित्य नवी पर्वणी. अमृताचे सिंचन करणारा कीर्तन दरबार! अशा या कीर्तनाला वैभवाचे स्थान देऊन श्रीमामामहाराजांनी देवाला सुप्रसन्न करून घेतले. नव्हे नव्हे तर देवालाच त्यांनी आपल्या कीर्तनातला श्रोता करून टाकले.

श्रीमामामहाराजांचे कीर्तन म्हणजे भक्तीचे गुणगान. जड जीवांचे मोक्षाचे ते साधन होते. देवालाही मंत्रमुग्ध करण्याचे सामर्थ्य त्यात होते. (श्रीमामामहाराज कीर्तनात सांगत, देव भावाचा भुकेला आहे.)



श्रीमामामहाराज म्हणजे कीर्तन दरबारातले चक्रवर्ती होत; पदावर बसून त्यांनी ती पदवी घेतली होती. पदी बसोनी पदवी घेई । श्रीगोविंदजी निजपद ठायी । कीर्तन दरबारात श्रीमामामहाराज 'चैतन्याचा दिनमणी म्हणून शोभले, श्रीमामामहाराज हे कीर्तन दरबारातील राजे होते. त्यांच्या अंत:करणात सतत नामच विराजमान झालेले होते. अखंड २४ तास कीर्तन दरबारात मामा निमग्न असायचे. त्यामुळेच कीर्तननामाचा ध्वज आकाशात झगमग झगमग करीत डोलू लागला- श्रीमामामहाराजांचा कीर्तन दरबार म्हणजे एकत्वाने नटलेले अद्वैताचे भांडार.

श्रीमामामहाराजांनी नामाचा बाजार भरवला, नामाचा दरबार भरवला. पूर्वी राजेमहाराजे केव्हातरी दरबार भरवत. श्रीमामामहाराजांचा कीर्तन दरबार अहोरात्र चालू असे. त्याला काळ वेळ नसे. कारण 'काळ वेळ नामस्मरणासी नाही सदा सर्वदाही उच्चारावे' अशी अवस्था मामामहाराजांच्या कीर्तन दरबारची होती. कृष्णामाईचा प्रवाह २४ तास वाहतो तेव्हा कुठे दोन तास गणपतीच्या देवापुढे कारंजा उडतो. त्या दरबारात नामच घ्यायचे नामच द्यायचे असे दासराममहाराज नामसंकीर्तनात सांगत असतात

दासराममहाराजानी एका अभंगात म्हटले आहे- 'एक लक्ष का रुपया देता देती हिरे तेरा ।। तेरा माजी साठविला तो परमेश्वर सारा ।।' श्रीमामामहाराजांचा कीर्तन दरबार 'या तेरात' साठविलेला होता. 'काळ गुलाम सलाम करी' असा त्यांचा अधिकार होता. मामामहाराज कीर्तनात म्हणायचे, 'आता यावेळी मला ब्रह्मदेव जरी बोलवायला आला तरी त्याला मी सांगेन माझे आता कीर्तन चालू आहे मला आता यायला वेळ नाही.' नामरूप रत्नांची श्रीमामामहाराजांनी अक्षरश: लयलूट केली! मामामहाराजांचा दरबार नवरत्नानी लखलखीत झालेला, सुशोभित झालेला. नामाचा संबंध चैतन्याशी एकरूप झालेला होता. श्रीमामामहाराज कीर्तन दरबारात चैतन्याशी बोलत, त्याबरोबरच रहात, त्याच्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. त्यामुळे सोऽहं ध्वनि कायमच त्यांच्या दरबारात घुमत

राहिला.

स्वरूपानुसंधान हे साधूचे लक्षण आहे, असे समर्थ म्हणतात. मामामहाराज जेव्हा बघावे तेव्हा अनुसंधानात निमग्न असायचे.

अबीर गुलाल उधळीत रंग । नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग। अशी मामामहाराजांच्या कीर्तन दरबारातील स्थिति होती. हरिनामात रंगून सर्वत्र मामामहाराजांनी परमेश्वर पाहिला. श्रीमामामहाराजांच्या कीर्तन दरबारात सत्‌चित्‌आनंदघन परमात्म्याची प्रचीति अनेकांनी घेतली होती. 'अलभ्य तो लाभ होईल अपार नाम निरंतर म्हणता वाचे' असे मामामहाराजांचे सांगणे होते. कीर्तन हा मामामहाराजांचा सहज धर्म झालेला होता. नाथ भागवतात कीर्तनाबद्दल सांगितलेली ओवी फारच बोलकी आहे :-

कीर्तने स्वधर्म वाढें । कीर्तने स्वधर्म जोडे ।
कीर्तने परब्रह्म आंतुडे । मुक्ति कीर्तनापुढे लाजोनि जाय ।
भावे करिता हरिकीर्तन । तेणे संतोषे जनार्दन ।
उभयता पडे आलिंगन । मिठी परतोनी सुटेना ।
कलियुगी नाम-स्मरणे । जड उद्‌धरणे कीर्तनी ।

हेच काम श्रीमामामहाराजांनी तहहयात केले. नाम रसाचा पेला पिऊन श्रीमामामहाराज रंगात रंगून गेलेले एक अलौकिक साधु पुरुष होते.

श्रीमामामहाराजांच्या कीर्तन दरबारात बुधगांवचे विदेही संत गुंडुबुवा भान हरपून नाचायचे! ही गोष्ट ऐकल्यानंतर नामदेव कीर्तन करी पुढे नाचे पांडुरंग, या अभंगाची आठवण झाल्याखेरीज राहणार नाही. मामामहाराज कीर्तनभक्तीचा कळस होते.

'हरिभक्तीचा कळस डोलतु । पांडुरंग मनी भरला' असे पांडुरंगमहाराज ताम्हनकर म्हणत असत. पावसचे स्वामी स्वरूपानंद मामामहाराजांचे बाबतीत म्हणत असत. ''श्रीमामामहाराज म्हणजे रामभक्ति आणि रामभक्ति म्हणजे मामा.''



''श्रीमामामहाराज हे पूर्ण कोटीचे संत आहेत'' असे गुंडुबुवा म्हणत असत. ताम्हनकरमहाराजच आपल्या अभंगात म्हणतात 'पुरा गोंदा म्हणूनी । गुंडा सांगे मला ।' गुरुदेव रानडे साहेब तर म्हणत 'देवासाठी' कीर्तन करणारे एकटे बापूराव.'

मामामहाराजांचे बाबतीत अनेक लोक असे म्हणतात की 'मामानी आम्हाला न संपणारी वस्तू दिली. विस्मरण न होणारी वस्तू दिली.'

मामामहाराजांनी भगवान् सद्‌गुरु तात्यासाहेबमहाराजांच्या आज्ञेनुसार अखंड अडतीस वर्षे हा कीर्तनाचा नंदादीप तेवत ठेवला.

रामनाम मुद्रांकित । गोविंद गुरूचा अंकित या त्यांच्या स्वतःच्या अभंगाच्या ओळी त्यांनी यथार्थ करून दाखविल्या. कीर्तन दरबारात नामाशिवाय दुसरा विचार नाही, दुसरा उच्चार नाही.

हा कीर्तनरथ ब्रह्मीभूत संत तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांच्या अनुज्ञेने श्रीमामामहाराजांनी हाकारला. कोटणीसमहाराजांच्या कीर्तनाचे वर्णन करताना राजकवि साधूदास म्हणतात :-

काका झांज धरी जनू सूर करी साथीस नाना करी ।
अप्पाचा पखवाज दिक्षित बसे सानंद पेटीवरी ।
अंतोबा करताल देती खुलती पंतामुखी मूर्चना ।
गातो गायन साधुदास करती तात्या यदा कीर्तना ।

अगदी तसेच अप्पाराव पोवार मामामहाराजांच्या कीर्तनाचे वर्णन करताना म्हणतात.

''काय सांगु ऐशा कीर्तनाची थोरी । डोळा दिसें हरी नाम गजरी ।।''

किंवा

''गुरू आज्ञे बापूराव नित्य हे कीर्तन । लाधता निमग्न होती ब्रह्मी ।।''

हे कीर्तनाचे वर्णन श्रीमामामहाराजांच्या कीर्तनात घेऊन जाते. त्याचप्रमाणे 'ज्ञानेश्वर वचने मिळाले यथार्थ। हनुमंत समर्थ जोडियले' या ओळी

ज्ञानेश्वरमहाराजांच्या मामामहाराजांच्या वरील अभंग प्रेमाची ग्वाही देतात. कारण खुद्द ज्ञानेश्वरमहाराजांचाही कीर्तन दरबार असाच नटलेला होता. ते स्वत:च असे म्हणतात- 'किंबहुना तुमचे केले । धर्म कीर्तन हे सिद्धी गेले । येथे माझे नि उरले । पायीकपण ।।' कारण ज्ञानेश्वर हेच ज्ञानेश्वरमहाराजांचे कीर्तन होते तसेच मामामहाराजांचे नाम हेच कीर्तन होते.

अखंडित वाचे श्रीराम स्मरण । हेचि पै कीर्तन दासालागी । या पंक्ती लागू पडतात की मामामहाराजांच्या नामसंकीर्तनालाही. आपल्या परमार्थाचा गाजावाजा नको, सद्‌गुरुची आज्ञा प्राणपणाने पाळावी, मानसन्मानाच्या आहारी जाऊ नये, खूप वाचावे, सार घ्यावे, वाणी परमार्थासाठी वेचावी, मागू नये, दिले तर हुरळू नये, व्याधि आल्या तरी परमार्थाला अंतरू नये, प्रारब्धाच्या झंजावाताला टक्कर देत परमार्थ चालवावा, कीर्तीकडे पाठ फिरवावी, ही सारी मामामहाराजांच्या कीर्तन दरबाराची वैशिष्ट्ये! मामामहाराज कीर्तनासाठी अवतरले, त्यासाठी जगले. कीर्तन साधून त्यांनी आपला देह ठेवला.

कीर्तन दरबाराचे वर्णन करणारे अभंग तंतोतंत मामामहाराजांच्या दरबारात लागू पडतात. म्हणून ते अभंग जसेच्या तसे देण्याचा मोह मला अनिवार होतो आहे. 'कीर्तनासी उभा शुक सुखाचा सोहळा प्रल्हाद तो ताल धरी । घेवोनिया टाळा ।। उद्धवाचे हाती झांज । नारदाते विणा । पार्थ उभा पाठीमागे । देई दिव्य ताना । मृदंग वाजवी इंद्र । चपळाई फार । सनकादिक मुनी सारे । करती जयजयकार ।' श्रीबाबूराव कोटणीसजीमहाराज किंवा तुकाराममहाराजांच्या शब्दात सांगायचे झाल्यास, 'कीर्तन चांग कीर्तन चांग । होय अंग हरीरूप । प्रेम छंदे नाचे डोले । हारपला देह भाव । एक देशी जीव कळा । हा सकळा सोयरा। तुका म्हणे उरला देव । गेला भेव ते काळे ।' अशी अवस्था मामामहाराजांच्या कीर्तनाची होती. दररोज नित्य नवी नवलाई होती. नित्य नवा कीर्तनी कैसा ओढवला रंग । श्रोता आणि वक्ता स्वये झाला श्रीरंग ।

कीर्तनात मामामहाराजांनी स्वत: बुड्या तर मारल्याच पण मुमुक्षूंना त्यात



बुड्या मारायला लावल्या ते अगदी ब्रह्मसागराच्या तळाशी नेऊन बसवले अप्पाराव पवार आपल्या गोविंदकीर्तनगुणगान मध्ये म्हणतात- ''गुरूआज्ञे बापूराव नित्य हे कीर्तन । लाधता निमग्न होती ब्रह्मी''

कणकवलीचे विदेही संत नानामहाराज बर्वे श्रीमामामहाराजांच्या कीर्तनाचे वर्णन करताना म्हणतात- अनुदिन अभिनव कीर्तन चाले । हृदय भुवनी मधु-माधव डोले । प्राणापानही अेथ मिनले । सर्वांगी चैतन्य कोंदले । चैतन्याची अनुपम लिला । देही विदेही मुदे नांदला । गोविंदी आनंद वर्षला । त्याची चाले कीर्तन लिला । नानाशी आनंद जाहला । आनंदे संतोष दाटला ।

देही विदेही आनंदात नांदणारा एक महात्मा मामामहाराजांचे वर्णन करतो आहे. यातच सारे काही आले आहे. संतच संताना जाणतात हेच खरे!

कीर्तन निष्ठेची मूर्तिमंत विनम्र प्रतिमा म्हणजे श्रीमामामहाराज. श्रीदासराममहाराजांनी म्हटले आहे 'श्रीगोविंदजी' विनम्र प्रतिमा । कीर्तन निष्ठेची'. श्रीमामामहाराजांच्या नामसंकीर्तनात हरिनामाची धमाल उडत असे. गुरुकृपेने चैतन्याचा साक्षात्कार झालेला; त्यामुळे आत्मभावाची जागृती झालेली. त्यामुळे देहाचे स्मरण मामामहाराजांना नसायचेच. 'आत हरी बाहेर हरी' अशी अवस्था त्यांची होती आणि असे महात्मे निंदास्तुतीच्या पलीकडे गेलेले असतात. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपेने हरी हीच समाधी त्यांना लाभलेली म्हणजे नरामध्ये हरी कसा प्रगट करावा याचे एकमेव उदाहरण श्रीमामामहाराजांचे संकीर्तन.'

स्तुती न ऐकावी । निंदा ऐकावी तरिच त्या पदवी । प्राप्त होय

हे आचरणात आणणारे श्रीमामामहाराज होते. त्यामुळेच ते असे लिहू शकले, बोलू शकले, त्यामुळे अनेक दु:खराशी पुढे उभ्या राहिल्या तरी केवळ नामाच्या योगाने श्रीमामामहाराज अविचल राहिले. शांतीचा महासागर बनून गेले. कोणी निंदा कोणी वंदा । आम्हा स्वहिताचा धंदा, असे मामामहाराजांचे वागणे होते.

टेंबू गावचे हैपती मुकुंदबुवा रामदासी यांचा अभंग फारच बोलका आहे ते

म्हणतात-

अव्याहत केले कीर्तन चांगले । गोविंद रंगले राम रंगी । रामरंगी रंग रंगोनी सुरंग । होऊनिया दंग अभंगात । गीती गीते गावी । ओवी आठवावी। वाणी ते गुंफावी । नाममाळा । नाममाळा जप । नाममाळा तप । रामरूपी लप । सांगताती । सांगताती थोडे । आचरिता कोडे । ऐसे ज्ञान जोडे । ज्याच्या पायी । तेचि ते गोविंद । मानितो मुकुंद । सांगतो स्वानंद साठवावा।।

महान् साधु चिन्मयानंद श्रीराम निकेतन येथे (श्रीमामामहाराजांचे घरी) आले, त्यावेळी त्यांना कोणीसे म्हणाले, 'श्रीमामामहाराजांचे नातू श्री. चंद्रशेखर अण्णा सुद्धा चांगले कीर्तन करतात'. यावर किंचितसे स्मित करून स्वामीजी बोलते झाले, ''अहो त्यात काय आश्चर्य, इथल्या खिडक्या, दारे, भिंती सुद्धा चांगले कीर्तन करतील, इतके इथलं वातावरण नाममय झाले आहे.''

आज मितीस हे असंच चालू आहे, चालू राहील, यात संशय धरण्याचे कारण नाही. कारण प्रत्यक्ष भगवंतांनी असे म्हटले आहे 'संशयात्मा बिनश्यति' श्रीमामामहाराजांचे पश्चात् त्यांचे अधिकारसंपन्न चिरंजीव प्रल्हादावतार प. पू. रामराय तथा दासराममहाराज केळकर हेही अखंड नामसंकीर्तनाने भक्तीचा साधासुधा मार्ग विशद करून सांगताहेत. आपल्या पितृदेवांची आज्ञा प्रमाण मानून हा नामसंकीर्तनाचा वेलू गगनापर्यंत नेऊन सांगलीला वैकुंठाचे रूप प्राप्त करून देतायेत. त्यांचे चिरंजीव श्रीचंद्रशेखर अण्णा हेही भक्तिरसाने ओथंबलेले नामसंकीर्तन करतात.

असा आहे कीर्तन दरबार अखंड नामसंकीर्तनात न्हाऊन निघणारा, महाराष्ट्रातल्या ज्ञात-अज्ञात संतांचे माहेरघर बनून राहिलेला. म्हणून 'सांगली हा गांव । पुण्यभूमी ठाव । दैवताचे नांव । श्रीगोविंद' असेच प्रत्येक जण म्हणत राहतील.

प. पू. दासराम यांच्या नामसंकीर्तनातील काही मोती एकत्र ओवून मी हा 'कीर्तन दरबार श्रीमामांचा' हार गुंफला आहे. त्यात माझे स्वत:चे काही नाही.



तो हार श्रीमामामहाराजांना अर्पण करून त्यांना वंदन करून येथेच लेखणीस विराम देतो.

***

## (३३)

## पू. मामांचे हृद्गत एक रहस्यभेदी अभंग

**- गं. वि. कुलकर्णी,** कोल्हापूर

मी कोण हे उमगता । सत्य ज्ञान येई हाता ।।१।।
आपणासी नोळखीले । सर्व ज्ञान व्यर्थ गेले ।।२।।
वाढवोनी अभिमान । केले आपणा बंधन ।।३।।
दास म्हणे नामी सरता । कळे मीपणाची वार्ता ।।४।।

**-अमृतवाणी** (पृ.६४ अभंग-३००)

पूज्य ती. मामांच्या 'अमृतवाणी' तला हा अंतिम रहस्य व्यक्त करणारा अभंग आहे. याचा अर्थ अगदी सरळ, स्पष्ट आहे. संताचे अभंग नेहमी प्रासादिक असतात. मामांचेही तसेच आहेत पण त्यात गूढ अर्थ अनुभवावाचून समजणार नाही. वरवरचा अर्थ समजला तरी तो फसवा असतो. ''नामा म्हणे श्रेष्ठ ग्रंथ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी'' असेच या अभंगाचे आहे. तरीही मामांनी यातील रहस्य उघडे करण्याचा प्रयत्न केला आहे. गुरुकृपेने ते पूर्ण उमगणारे आहे. त्यावर कांही प्रकाश टाकता येतो का, ते आपण पाहू या.

पहिल्या चरणात म्हटले आहे की, परम सत्य, परमेश्वर, त्याचे ज्ञान हातात येण्यासाठी म्हणजे त्याचा अनुभव, साक्षात्कार होण्यासाठी 'मी कोण?' हे उमगले पाहिजे. जगभर वणावणा हिंडून, भाराभर ग्रंथ वाचून, अनेक प्रकारचे योग, याग, धार्मिक विधि करून, कोणतीही मोठी परोपकाराची कृत्ये करून, कसलेही पराक्रम करून, हे सत्याचे ज्ञान होणार नाही. ''बहु हिंडता सुख होणार नाही । शिणावें परी नातुडे हीत काही'' असाच अनुभव समर्थ सांगतात,

त्याप्रमाणे येईल. तेव्हा जवळात जवळचा साक्षात् मार्ग म्हणजे ज्याला आपण 'मी' 'मी' असे सतत म्हणतो त्याच्या खऱ्या स्वरूपाला ओळखणे. त्याचा नेहमी शोध घेणे. 'मी कोण?' असे स्वत:ला अत्यंत तीव्रतेने, तळमळीने विचारत राहणे. नाहीतर - 'देव जवळी अंतरी । भेटी नाहीं जन्मभरी' अशी स्थिती होईल.

दुसऱ्या चरणात मामांनी या 'स्व'च्या ओळखीखेरीज इतर ज्ञान फोल आहे, असे म्हटले आहे. 'इतर ज्ञान' (सर्व ज्ञान) यामध्ये सर्व प्रकारचे भौतिक, आध्यात्मिक (बौद्धिक ज्ञान), शास्त्रीय ज्ञान आले. मनुष्य बहुश्रुत होईल, विद्वान् पंडित होईल. कीर्तिमान, श्रीमान् होईल, पण तो केव्हाही आत्मज्ञानी होणार नाही. कारण त्याने 'मी' ला ओळखले नाही. ''अगा वेदविद जरी झाला। तरी माते नेणता वाया गेला ।। भूस उपणिता कोंडा उडाला जैसा।।'' असे ज्ञानेश्वरमाऊली यथार्थतेने म्हणते आहे. अन्यत्र तिने मोराअंगी पिसे असतात, त्यांना डोळे असतात, पण त्यांनी पाहता येत नाही, तसे हे शास्त्रज्ञान, कलाज्ञान असते असा मार्मिक दृष्टांत दिला आहे.

आजच्या विज्ञानयुगात माणसाचे ज्ञान गगनभेदी, पाताळभेदी झाले आहे. मनुष्य चंद्रावर जाऊन पोहचला आहे. कधी नव्हे त्याने तिथले ज्ञानही हस्तगत केले आहे. तत्त्वज्ञानाने नवे नवे पल्ले गाठले आहेत. हे व्यावहारिक दृष्टीने आवश्यक आहे. ठीक आहे, पण... पण त्याचा सत्याच्या ज्ञानासाठी, अखंड परमानंदासाठी, मुक्तीसाठी, भक्तीसाठी काडीइतकाही उपयोग नाही.

तिसऱ्या चरणात उलट या ज्ञानाने मनुष्याचा अहंकार वाढतो आणि तो अधिकच बद्ध होतो, हा धोका सांगितला आहे. कारण 'मी ज्ञानी आहे' 'मी संशोधक आहे' 'मी विद्वान, पंडित, निसर्गावर मात करणारा आहे' असा अभिमान त्याला होणे स्वाभाविक आहे. जितका अभिमान अधिक तितका सत्यज्ञानाला प्रतिबंध मोठा. त्याच्यापेक्षा साधा मनुष्य बरा. त्याचा 'भोळा भाव' त्याला तारतो- 'मला काय समजत नाही, हे मला समजते.' असे म्हणणारा



सॉक्रेटिस आत्मज्ञानी होतो, होऊ शकतो आणि हसत हसत विषाचा प्याला घेऊन मरणाला जिंकून उरतो. ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवात ज्ञान हेही बंधन आहे असे म्हणून ज्ञानाचे खंडन केले आहे (ज्ञान बंध-इ.). ते मननीय आहे. अन्यत्रही ते सांगतात-

''म्हणोनि थोरपण तऱ्हा सांडिजे । व्युत्पत्ति आघवी विसरिजे । जै जगा धाकुटे होइजे । तै जवळीक माझी।।'' याचाच अर्थ ''नम्र झाला भूतां। तेणे कोंडिले अनंता'' असा आहे. ढोंगी नम्रता नव्हे, तर खरी प्रामाणिक नम्रता ही सत्यज्ञानाची खूण आहे, रहस्य आहे.

तेव्हा 'मी' ला ओळखल्याखेरीज सर्व काही व्यर्थ आहे. असे २,३ चरणात नि:संदिग्धपणे सांगितले आहे.

चवथ्या चरणात, मग या 'मी' चे ज्ञान, त्याची ओळख कशी होते? याचे उत्कृष्ठ दिग्दर्शन केले आहे. 'आधी केले मग सांगितले' या न्यायाने आधी स्वत: अनुभव घेऊन 'दास' (कविवर्य मामा) म्हणतात की, नामामध्ये आपण सरलो, रंगून गेलो की मी कोण, याचे ज्ञान, ओळख होते. नाम, अर्थात भगवंताचे नाम, सद्गुरूचे नाम. मग ते 'रामनाम' असो, 'रामकृष्णहरी' असो किंवा 'जय जगदंब' वा अन्य कोणतेही असो. नामस्मरण हाच 'मी'ला ओळखण्याचा रामबाण उपाय. 'हरी मुखें म्हणा' असे ते वैखरीने तर सतत घ्यायचेच, तसा प्रयत्न करायचाच, पण ते अखंड, सतत कसे घ्यायचे? त्यासाठी आतून चाललेल्या 'सोऽहम्' या अखंड नामजपाकडे लक्ष द्यायचे. 'सोऽहं सोऽहं' वृत्ती होता । जाय गळोनी अहंता' (पृ. १७०, अभंग ८४०). एरव्ही मनुष्य 'अहं' घेतो व 'स:' टाकतो; म्हणूनच तो अज्ञानात पिचत राहतो, नेमका उलट्या दिशेने चालतो. पण 'अहम्' टाकला, सोडला, आणि 'स' (परमात्मा) घेतला, तर भक्त वासनेतून मुक्त होतो. तोच खरा नामधारक जो नित्यनामाकडे लक्ष देतो, अखंड नामस्मरणाचा वेध घेतो, हेच मामांना पुन्हा पुन्हा सांगायचे आहे. ते म्हणतात- 'सोऽहं भाव सर्व भाव' हाच खरा भाव 'मी कोणीतरी अपूर्ण आहे,

मला काही काळानंतर पूर्ण व्हायचे आहे.' असे मानणे मूर्खपणाचे आहे. यात माणसाची ऊर्जा फार मोठ्या प्रमाणात वाया जाते. 'मी पूर्ण आधीच आहे. तोच (म्ह.पूर्णता) हा माझा स्वभाव आहे. शांती, सर्वज्ञता, सर्वव्यापकता, सर्वसमर्थता हा माझा स्वभाव आहे. मी चित् - सत् आनंद आहे' असा रोख अनुभव म्हणजेच सोऽहं भाव. 'तो (परमात्मा) म्हणजेच मी.' केवळ असे बोलणे नव्हे, तर अशी श्रद्धा, एवढेच नव्हे तर अशी प्रचीति गुरुशिष्यांच्या एकांतात बोध होतो तो हाच ''तत् त्वं असि'' ('ते' तू आहेस). भ. रमणमहर्षि म्हणत - 'तुम्ही साक्षात्कारी आधीच आहात, फक्त कसे ते ओळखा. जाणा.' म्हणून मामा कळकळीने सांगतात- 'गोविंद म्हणे सोऽहं हंस । तेथे जडवी मानस' (पृ. १७०, अभंग ३). ''परमहंसाचे लक्षण । सोऽहं हंसी ज्याचे मन ।। सहज वर्म ओळखोनी । मना साधिली उन्मनी । गोविंद म्हणे यातिकुळ धर्म जाहले निर्मूळ।'' (पृ. १७१, अभंग ८४६).

वेद-उपनिषदे, गीता, सर्व अध्यात्मशास्त्र, सर्व धर्म, सर्व तत्त्वज्ञान यांचे हेच रहस्य. संत तुकोबाराय म्हणूनच म्हणतात- ''वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा । येरांनी वहावा भार माथा ।। निजनिष्ठे नाम घ्यावे । विठ्ठलाशी शरण जावें ।। वेद अनंत बोलिला । अर्थ इतुकाचि साधिला ।। इ. यातले निजनिष्ठा नाम म्हणजेच 'सोऽहम्', 'अहम्-अहम्' मामांच्या शब्दांत - 'मूळ स्वभाव गुरुनाम । श्रीराम जयराम जयजयराम', बाकीचा सारा अभाव आहे. जीवा ! तो सोडून दे. स्व-स्थ (स्वस्थ) रहा. आपला स्वभाव पहा.' (अमृतवाणी पृ. २७५ अ. १३००)

भ. रमणमहर्षींनी हेच रहस्य अक्षरमणिमाला या उत्कृष्ट भक्तिकाव्यात अरुणाचलाला (शिवाला) उद्देशून व्यक्त केले आहे. ते म्हणतात-

स्वत:हुनी नच सत्य वेगळे । असेच कथिशी अरुणाचला ।
हाच तुझा संदेश नसे का । निज मौनातुन अरुणाचला ?
स्वत:स शोधी आंतरनेत्रे । सापडेल मग अरुणाचला ।



असा तुझा आदेश प्रियतमा । अखंड घुमतो अरुणाचला ।
अखंड घेता शोध स्वत:चा । सांपडशी मज अरुणाचला ।
माझ्यापाशी माझ्याठायी । आत्म्यातव तू अरुणाचला ।
ॐ तत् सत्

***

## (३४)

## ।। अखंड संकीर्तन नामयोगी ।।

## ।। श्रीगोविंद संकीर्तन ।।

**- मा. डॉ. दा. वि. कुलकर्णी**

नामार्थ कीर्तन सुखार्थ नाम । कृतार्थ गोविंद अनंत नाम ।।
रंगात रमले श्रीरंग रंगी । अखंड संकीर्तन नामयोगी ।।१ ।।
ज्ञानेश दर्शन पवित्र चित्र । ज्या रेखिले मंगल ही सुचित्र ।।
गोविंदराजा महा राजयोगी । अखंड संकीर्तन नामयोगी ।।२ ।।
हनुमत्पदी लीन गोविंद दास । मत्स्येंद्र गोरक्ष अद्वैत खास ।।
रेणागिरी रेवणसिद्ध मार्गी । अखंड संकीर्तन नामयोगी ।।३ ।।
अध्यात्मज्ञानी प्रपंची विरागी । सिद्धस्वरूपी आकाशमार्गी ।।
गुह्यार्थ चिन्मात्र चैतन्य भोगी । अखंड संकीर्तन नामयोगी ।।४ ।।
गोविंदनामे तरले अपार । तरती तसे कीं जन पैलपार ।।
शांती महासागर वीतरागी । अखंड संकीर्तन नामयोगी ।।५ ।।
गोविंद संकीर्तन नामयोगी । घ्या नाम श्वासीं वसे अंतरंगी ।।
हा बोध आदेश असे मनास । दासानुदास नमितो पदास ।।६ ।।

***

## प्रकरण–१६

# श्रीमामांच्या संदर्भात इतरांची वचने

## (अ)

**१) आर. एन. जोशी (प्राध्यापक) -** आजारी पडल्यावर देखील त्यांनी आपल्या कीर्तन कार्यात कधी खंड पडू दिला नाही (दीपलक्ष्मी पृ. ३२).

**२) उ. शं. जप्तीवाले (शिक्षक) -** पूज्यपाद मामामहाराज म्हणजे चालते बोलते भगवंतच. पू. मामा हे परब्रह्मात वस्ती करून आहेत (विदेही, इ.) (प्रवचनकार).

**३) काकासाहेब तुळपुळे (प्रवचनकार) -** मामा हे चिमड संप्रदायाचे कळस झाले आहेत. चिमड संप्रदायाची ध्वजा त्यांनी फडकवत ठेवली आहे. (अकी पृ. १०३)

**४) केतकरमहाराज (गोंदवलेकरमहाराजांचे शिष्य) -** खरे कीर्तन बापूरावांचे, त्यांच्या कीर्तनात देव प्रगट होतो. सांगलीत पाहण्यासारखे काय आहे असे जर मला विचारले तर उत्तर आहे बापूरावांचे घर!

**५) के. वा. आपटे (प्रा.डॉ.) -** मामा आपल्या मुलाचा अधिकार जाणून होते. श्रीदादांचे कीर्तन वा प्रवचन ऐकल्यावर मामा उघडपणे म्हणत 'रामजी, तुझ्या कीर्तनातल्या सारखे विषय इतर कुठे वाचावयास वा ऐकावयास मिळत नाहीत.'' (दीपलक्ष्मी) (के.वा.आ). श्रीबापूरावांचे महान् कार्य म्हणजे त्यांचे नित्य नेमाचे ३८ वर्षांचे अखंड हरिकीर्तन (गोचमा). अत्यंत साधी राहणी व साधा वेष, आहारातील नियमितपणा, निर्व्यसनीपणा, नम्रता, पुढे पुढे न करण्याची प्रवृत्ति आणि प्रसिद्धविन्मुखता हे त्यांचे ठळक वैशिष्ट्य होते (गोचमा).

**५ अ) ग. वा. तगारे (डॉ. संशोधक) :** नामनिष्ठा हा केळकर सरांचा



स्थायीभाव होता. (दीपलक्ष्मी पृ. ४५)

**६) ग. का. रायकर (संपादक दीपलक्ष्मी मासिक) -** ढोंग नाही, सेवेचे अवडंबर नाही, मठ नाही. शिष्यांचा सभोवती गराडा नाही अगर आपल्या उपासनेची जाहिरात अगर प्रसिद्धी नाही. अशा वृत्तीने वागणारे मामा केळकर हे एक आदर्श सत्पुरुष होऊन गेले (दीपलक्ष्मी).

**६ अ) गं. वि. कुलकर्णी (प्रा. डॉ.) :** पू. मामांचे जीवन चरित्र व व्यक्तिमत्त्व असामान्य व दिव्य आहे. अवताराला शोभेल असे आहे, हे त्यातल्या तपशीलावरून व घटनावरून कळून येते. धन्य त्यांचे जीवन । धन्य त्यांचे स्मरण । धन्य त्यांचे वचन । राम मय ।। (दीपलक्ष्मी)

**७) ग. बा. देशमुख (ॲडव्होकेट) :** मामा थोर साक्षात्कारी होते. त्यांचा परमार्थाधिकार श्रेष्ठ प्रतीचा होता (दीपलक्ष्मी). 'रामनाम' हेच या महापुरुषाचे जीवन सर्वस्व होते (अमृतवाणी).

**७ अ) गुळवणीमहाराज :** (योगिराज) श्रीमामांच्या निर्वाणानंतर मामांचे सिंहासन त्यांचे घरी स्थापन झाले होते. त्यावेळी गुळवणीमहाराज मामांचे घरी आले होते. त्यांनी मामांच्या सिंहासनाला हार घालावा असे सुचवण्यात आले. तेव्हा ते म्हणाले 'देवाला हार घालवयास कष्ट कसले? या महात्म्याला फार थोड्यांनी ओळखले. (अकी, पृ १०४).

**८) गुंडुबुवा (बुधगावचे विदेही साधू) -** गोंदा[१] पुरा

**९) गोपाळ काका कोटणीस (चिमड सांप्रदायी) :** तात्यासाहेबमहाराजांचे नंतर त्यांच्या शिष्यांमध्ये बापूरावांनीच खरी कर्तबगारीची कामगिरी केली आहे (वही ९०).

**१०) गोपाळ परचुरे -** विनम्रता, सात्त्विक वृत्ति, अखंड साधना, आणि अडतीस वर्षांची अखंड कीर्तनसेवा म्हणजेच प. पू. श्रीमामांचे चरित्र होय

---

१= गोंदा म्हणजे गोविंदा म्हणजेच बापूराव केळकर.

(गोचमा).

**११) गो. वा. केळकर (भूतपूर्व ट्रेझरी ऑफिसर) -** आत्ताही ज्या ज्या वेळी मनात अशांति होते त्या त्या वेळी श्रीमामांचे स्मरण करतो व मला शांति लाभते (दीपलक्ष्मी पृ. ३१)

**१२) गोविंदपंत घोसरवाडकर (देवाचा संचार होणारे सत्पुरुष)-** संचारावस्थेत ते उद्गारले 'अखंड नामस्मरणाने आणि अखंड कीर्तनाने बापूराव केळकर चिमड सांप्रदायातील अधिकारी सत्पुरुष होतील (अकी, १०५).

**१३) गोंदवलेकरमहाराज -** (बुधगांव स्टेशनवर जाऊन श्रीमामांनी गोंदवलेकरमहाराजांचे दर्शन घेतले होते. त्यानंतर शेजारीच असणाऱ्या पाठक मास्तरांना गोंदवलेकरमहाराज म्हणाले) ''हा तरुण पुढे महान साधू होणार आहे.''

**१४) जि. भि. दीक्षित (सुप्रसिद्ध चित्रकार) -** मामांच्या वास्तूत जाऊन नामसंकीर्तन ऐकले की जो आनंद, समाधान होते, ते शब्दातीत आहे (दीपलक्ष्मी, पृ. ३).

**१५) दा. वि. कुलकर्णी (प्रा.डॉ.)-** श्रीक्षेत्र सांगली येथील चिमड संप्रदायाचे महान साक्षात्कारी संत, एकनाथ अवतार, श्रीमामामहाराज तथा बापूरावजी केळकर ऊर्फ गोविंद अनंत केळकर यांचे जीवन चरित्र म्हणजे अनादि संतपरंपरेचे दिव्य दर्शन होय. ज्यांना श्रीहनुमंत सद्गुरूंनी महानिर्वाणानंतर प्रत्यक्ष प्रगट होऊन अखंड कीर्तनानुग्रह दिला, ज्यांना श्रीक्षेत्र आळंदी येथे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे साक्षात् दर्शन झाले, ज्यांनी आयुष्यात तेरा कोटि रामनामाचे पुरश्चरण केले, असे नामयोगी म्हणजेच सांगलीचे श्रीमामामामहाराज केळकर हे होत (मामामहाराज केळकर चरित्र पृ. १५). नाम म्हणजे नाम असे समीकरण बनले होते. निरपेक्ष निरहंकार वृत्तीने त्यांचे कीर्तनानुष्ठान सुरू होते (मामामहाराज चरित्र).

**१६) दास गणू (कीर्तनकार, आधुनिक संत चरित्रकार महीपति) -** (श्रीमामांचेघरी त्यांचे कीर्तन झाले. त्यावेळी ते म्हणाले) ''हे मामांचे घर म्हणजे नाथांचे घर आहे. (गो. स्मृ. पृ. १७)



**१७) दासराममहाराज -** ती. प. पू. श्रीमामांचा पिंडच मुळी कीर्तनाचा. ते लहानपणापासूनच कीर्तन करीतच होते. त्यांना कीर्तनाचा छंदच होता (अमृतवाणी).

**१८) न. दा. दिवेकर (शिक्षक/चरित्रकार) -** अखंड ध्यान श्रीरामाचे । अखंड पूजन श्रीरामाचे । अखंड कीर्तन श्रीरामाचे । हेचि गोविंद चरित्र ।। (गोचमा १०-१६५) अंतर्बाह्य परमार्थाने रंगलेले जीवन म्हणजे मामा होते (दीपलक्ष्मी).

**१९) ना. य. कुलकर्णी (प्राध्यापक) (ब्रह्मपुरी) -** अनंताच्या अमरपुत्राचा वारसा सिद्ध करणारे मामा हे खरे नारदीय कीर्तनाचे वारसदार होते (दीपलक्ष्मी पृ. ६०).

**२०) नारायणमहाराज यरगट्टीकर, चिमड -** (मामाचे महानिर्वाण झाल्याचे कळल्यावर उद्गारले) ''एक थोर गुरुभक्त गेला'' (अकी पृ. १०३).

**२०-अ) पुरुषार्थ मासिक** (ऑक्टो. नोव्हे. १९६४) कै. तात्यासाहेब कोटणीसानंतर त्यांच्याच आदेशाप्रमाणे अखंड कीर्तनभक्ति व कीर्तनयोग आचरणारे बापूराव आमच्या माहितीप्रमाणे दक्षिण महाराष्ट्रात तरी एकमेव साक्षात्कारी पुरुष दिसतात.

**२१) प्रकाश भावे (शिक्षक, तबलापटु, चरित्रकार) -** श्रीमामा कीर्तनासाठी अवतरले, कीर्तनासाठी जगले आणि कीर्तनातच त्यांनी आपला देह ठेवला. कीर्तन म्हणजे मामांचा पंचप्राण. कीर्तन म्हणजे श्रीमामांचे औषध. त्यांनी कीर्तनाने अंग हरिरूप बनवून टाकले होते. आकाशाप्रमाणे निर्लेप असणारे श्रीमामा अतीव नम्र होते. स्तुतीची अभिलाषा नाही, निंदेची पर्वा नाही, प्रसिद्धीची हाव तर नाहीच नाही. श्रीमामा देही असून विदेही होते (विदेही परी देही). देहात राहून, देहापासून अलिप्त राहून, चैतन्याशी समरस होणारे मामामहाराज एक अलौकिक महासाधु होते. संसार परमार्थरूप करणारे श्रीमामामहाराज

संतश्रेष्ठ होते. सामान्यात राहून असामान्य ठरलेले, परमार्थाची पाठशाला उभी करणारे, श्रीमामामहाराज एक दिव्य पुरुष होते (अखंड कीर्तनानंतर पृ. ८).

**२२) बापूमहाराज दिवेकर, वाटेगाव -** (वाटेगावचे संत बापूमहाराज दिवेकर हे श्रीमामांचेकडे आले होते. त्यांना श्रीमामांनी नमस्कार केला. ते श्रीमामांना नमस्कार करू लागले. श्रीमामा त्यांना तसे करू देईनात) तेव्हा बापूमहाराज म्हणाले, ''बापूराव तुमच्या आत जो देव प्रगट झाला आहे, त्याला मी नमस्कार करणार आहे'' (अकी पृ. १०१).

**२३) भय्यासाहेब पैठणकरमहाराज -** (हे मामांचेकडे आले असताना ते म्हणाले) ''बापूराव, तुम्ही रोज कीर्तन करीत असल्याने, तुम्हीच खरे एकनाथमहाराजांचे वंशज आहात.''

**२४) भ. रा. नाईक (मुख्याध्यापक) -** कीर्तन हा मामांचा सहज धर्म झाला होता (दीपलक्ष्मी पृ. ४४).

**२५) भाऊसाहेब उमदीकरमहाराज -** (तेरदळास श्रीमामा दर्शनास गेले असता, उमदीकरमहाराजांनी त्यांना एक केळे प्रसाद म्हणून दिले आणि आशीर्वाद दिला) ''भक्तीचा थाट होईल.''

**२६) भाऊसाहेब जोशी -** मामांनी परमार्थासाठी आपले सर्व आयुष्य वेचले (दीपलक्ष्मी पृ. ५५)

**२७) म. अ. कुलकर्णी (प्राध्यापक, स्वामी प्रज्ञानंद) -** प. पू. मामामहाराज केळकर हे सर्वार्थाने ईश्वर कोटीतील महापुरुष होते. निष्ठावंत भगवद् भक्तांचे भूषण होते. त्यांच्या संदर्भात सर्व साधुसंतांनी 'भला भला लोकी' असे गौरवाचेच उद्गार काढले. देव, ऋषी, मुनि, ढोंगी अशांनीही परमसंतोष व्यक्त करावा, असे श्रेष्ठ जीवन ते जगले.

आचार शुद्ध, विचार शुद्ध, वीतरागी, पुण्यश्लोक महात्मा म्हणून आदराने ज्यांच्याकडे अंगुलिनिर्देश करावा व त्रिवार वंदन करावे अशा उत्तम गुणांनी नटलेले ते सत्पुरुष होते.



प. पू. मामामहाराजांच्या जीवनचरित्राचे 'एका जनार्दनी राम परिपूर्ण । प्रपंच परमार्थ रामचि जाण' हे सार आहे. आयुष्यभर संदेहरहित साधन करून, अंतर्बाह्य समाधानाची शाश्वत स्थिति त्यांनी भोगली.

दंभ, मत्सर, लोभ, क्रोध, शोक रहित होऊन निर्मल-निश्चित निवांत अशी साधुत्वाची श्रेष्ठतम अवस्था त्यांनी सद्गुरुकृपेने प्राप्त करून घेतली. (अकी प्रस्तावना)

**२८) म. धों. गोखले -** देवाच्या भेटीसाठी पडेल तो त्याग आनंदाने पत्करणे हेच श्रीमान् मामासाहेब केळकरांचे ब्रीद वाक्य होते (दीपलक्ष्मी)

गुरुवर्य हणमंत पांडुरंग तथा तात्यासाहेब कोटणीस यांची कीर्तनपरंपरा सद्गुरूला साजेल अशा थाटाने आचरणांत श्रीमामासाहेब केळकरांनी राखली.

झाकलेल्या रत्नांपैकी माझे स्नेही गुरुवर्य बापूराव केळकर हे होते. त्यांनी देवाला जवळ केल्याने, श्रीरामदास्वामींनी म्हटल्याप्रमाणे ''असो ऐसे सकळही गेले । परंतु एकचि राहिले । जे स्वरुपाकार झाले । आत्मज्ञानी । ते एकचि राहिले'' या कोटीत मामा सामील झाले आहेत.

**२९) मामासाहेब उर्फ शं. वा. दांडेकर-** (प्राचार्य, कीर्तन/निरुपणकार) कै. बापूरावजींचे चरित्र म्हणजे या सांगली क्षेत्राच्या आध्यात्मिक इतिहासाचे एक पान होय (गोचमा). बापूरावांनी परमार्थासाठी परमार्थ केला आणि सांगलीत परमार्थ जागविला.

**३०) मोरेश्वर बा. कुलकर्णी (भजनपटु)-** भगवंतापाशी अखंड अनुसंधानामुळे सर्वाभूती शुद्ध भाव आणि सम दृष्टि हेच मामांचे बाबतीत प्रत्ययास येई (दीपलक्ष्मी).

**३१) यज्ञेश्वरपंत दीक्षित -** कीर्तनप्रेमी श्रीबापूरावजी केळकरमहाराज हे नामयोगी, संतप्रेमी, गुरुनिष्ठ संतशिरोमणि होते (दीपलक्ष्मी).

**३२) रा. कृ. ऐनापुरे (प्राध्यापक, निरूपणकार)** - केळकर मामा व दांडेकरमामा या दोघांचीही मानेश्वर माऊलीवर अत्यंत प्रखर निष्ठा होती (दीपलक्ष्मी).

**३३) रा. द. रानडे (गुरुदेव)** - (एकदा श्रीमामा गुरुदेवांच्या दर्शनास गेले व त्यांना नमस्कार करू लागले तेव्हा गुरुदेव म्हणाले) ''बापूराव, तुम्ही पुण्य पुरुष आहात. तुम्ही मला नमस्कार करू नका. मीच तुम्हाला नमस्कार करतो''. देवासाठी कीर्तन करणारे फक्त बापूराव केळकर आहेत.

**३४) रावसाहेब सहस्रबुद्धे** - (स. वि. ऊर्फ नाना जोगळेकर रावसाहेबांचे कडे गेले असताना रावसाहेब सहस्रबुद्धे त्यांना म्हणाले) सांगलीत ज्या थोर महात्म्यांकडे तुम्ही जाता, त्यांच्या चरणांची संगत सोडू नका.

**३५) लक्ष्मबुवा निजामपुरकर (कीर्तनकार)** - (एका कीर्तन संमेलनाचे अध्यक्ष असणारे लक्ष्मणबुवा अध्यक्षीय भाषणात म्हणाले) (१) ''एकनाथांच्या नंतर नित्यनेमाने कीर्तन करणारे सांगलीचे श्रीमामा केळकरयांचे नाव घेतल्याशित्ताय मला व्याख्यानाला सुरवात करता येणार नाही.'' (अकी पृ. १३३) (२) अनेकांचे परमार्थाचे मनोरथ ह. भ. प. भगवत्स्वरुप मामा यांनी पूर्ण केले. ज्यांनी आपला संसार परमार्थरूप केला, सद्गुरुकृपेने अपरोक्ष अनुभूति ज्यांना आली, ते हे महापुरुष आमचे मामा होत (दीपलक्ष्मी).

**३६) लोटलीकर (ज्ञानेश्वरी पारायणकार)** - ''बापूराव, तात्यासाहेबाच्या नित्य कीर्तनाची परंपरा खरोखरच तुम्हीच चालवत आहात'' (अकी पृ १०४).

**३७) व. रा. कुलकर्णी** - प्रपंचाच्या नाठाळ घोड्यावर बसून त्यांनी परमार्थ मार्गावर फार माठी घोडदौड केली. हेच त्यांचे वैशिष्ट्य होय (दीपलक्ष्मी).

**३८) वासुदेवराव जोशी (कीर्तनकार)** - कीर्तनासाठी जन्म ही मामांची निष्ठा होती (दीपलक्ष्मी).

**३९) वि. तु. कोल्हापुरे** - (मामांनी) संसार व परमार्थ ही विरोधी टोके ज्वलंत निष्ठेने तडीपार केली व संसारी साधुपुरुष या अशक्य कोटीतील महान् संज्ञेचे ते स्वामी बनले. (दीपलक्ष्मी)

**४०) वि. द. देवधर (आर. टी. ओ.)**- आधुनिक काळातील संतांत पुण्यधाम सांगलीचे प. पू. मामा केळकर यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल



(दीपलक्ष्मी).

**४१) शालुमामा (अंबुरावमहाराजांचे शिष्य)**- चिमड संप्रदायात उच्च योग्यतेचा कोण आहे म्हणून विचाराल तर मी मामांचे नाव घेईन (वही क्र. ९०).

**४२) श्रीपाद दामोदर सातवळेकर**- (मामा म्हणजे) अखंड नाम संकीर्तन योगी.

**४३) स्वामी अमलानंद** - निष्काम, निर्लोभ, निर्दंभ भक्तिप्रेमाने भगवंताला आवडेल असे अखंड कीर्तन करून, भक्तिसुखाच्या भाग्याचे ते धनी झालेले होते (अमृतवाणी). ह. भ. प. मामासाहेब केळकर हे चिमड संप्रदायामधील एक थोर अधिकारी सत्पुरुषच होते ते निष्ठावंत रामभक्त होते (अमृतवाणी).

**४४) स्वामी स्वरुपानंद** - (स्वामी स्वरूपानंद म. दा. भट यांना सांगत.) रामाची भक्ति कशी करावी हे सांगलीच्या बापूराव केळकरमहाराजांच्याकडून शिकावे. रामभक्ति म्हणजे बापूराव आणि बापूराव म्हणजे रामभक्ति (अकी, पृ. १०४)

***

# (आ)

# श्रीगोविंद–चरितम्

### ।। नमः श्रीसद्गुरुनाथाय ।।

प. पू. सद्गुरुदासराममहाराज, अत्रोपस्थिताः सर्वे सज्जनाः, मम साधक-बन्धुभगिन्यश्च

अद्य सद्गुरुश्रीमामामहाराजानां जन्मशताब्दिवर्षस्य अंतिमः दिनः । गतवर्षस्य फाल्गुनमासादारभ्य प्रतिमासे शुक्लपक्षे दशम्यां तिथौ कस्यचित् महतः प्रवचनकारस्य प्रचवनं संपन्नं जातम् । अद्य अस्य शताब्दिसमारोहस्य संवत्सरस्य प्रमुखः दिवसः । अतः वयं सर्वे प्रमुदितचेताः अत्र उपस्थिताः स्मः । अस्मिन् परममंगले अवसरे ब्र. भू. मामामहाराजांना चरित्रं संस्कृतभाषायां वर्णयितुं मम सद्गुरुभिः परमश्रद्धेय-दासराममहाराजैः आज्ञापितोऽस्मि । वस्तुतः न कोऽपि महान् संस्कृतवक्ताऽहम् न वा श्रेष्ठः प्रवचनकारः । अत्र बहवः विद्वद्वर्याः, महन्तः संस्कृतज्ञाः । वयसा ज्ञानेन अनुभवेन च श्रेष्ठाः । गरिष्ठा च सज्जनाः उपस्थिताः सन्ति । तेषां पुरतः संस्कृतभाषायां किं वदाम्यहम्? किन्तु मम सद्गुरुदासराममहाराजेभ्यः संस्कृता भाषा अतीव रोचते । अतः सद्गुरुतोषणेन समं नान्यत् परमं भाग्यं इति मत्वा तस्य आज्ञां शिरसि कृत्वा ब्र. भू. मामामहाराजानां चरित्रं संक्षेपेण कथयाम्यहम् ।

अस्मिन्नेव दिने शतवर्षेभ्यः पूर्व श्रीमामामहाराजांना जन्म बिल्वग्राम (बेलगांव) मण्डले शहापुरग्रामे अभवत् । 'गोविंदः' इति तेषां नामधेयम् । तेषां पितरौ श्रीअनन्तमहोदयः राधाबाई च । बाल्यात् प्रभृति बालगोविन्दाय अध्यात्म-मार्गे रुचिः आसीत् । ईश्वरस्य भजनं पूजनं शिबिकावहनं एतादृशीसु क्रीडासु बाल्यतः स सततं रमते स्म । मौजीबन्धनानन्तरं ज्ञानोपासनया सह बलोपासना अपि तेन कृता । 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' अत एव सः प्रत्यहं द्वादशशतपर्यन्तं सूर्यनमस्कारादि व्यायामं करोति स्म । गौरकायः बलदण्डशरीरः तेजस्वी गोविन्दः



सर्वेषां मनांसि आकर्षति स्म।

अधुना एव मया उक्तं यत् बाल्यतः एव परमार्थे सः सततं रमते स्म । अतः स्वविवाहविषये अनुत्सुकः आसीत् सः किन्तु तस्य पितरौ अतीव उत्सुकौ । श्रीज्ञानेश्वरमहाराजे गोविन्दस्य नितान्ता भक्तिः आसीत् । अतः 'श्रीज्ञानेश्वरमहाराजस्य सम्मतिं गृहीष्यामि' इति तेन सूचितम् । तदर्थंच अयं पंचदशवर्षीयः गोविन्दः अलंकापुरीं गतः । तत्र तेन श्रीज्ञानेश्वरीग्रंथराजस्य पारायणं प्रारब्धम् । यतिवेषधारी भगवान् ज्ञानेशः तस्य अग्रे अवातरत् । 'यतो भावस्ततो देवः' इति सत्यमेव । पूर्णकामः बालगोविन्दः एकभावेन तं अपश्यत् । तदा सस्मिवदनः श्रीज्ञानेशोऽवद्त - 'गृहस्थाश्रमं स्वीकृत्य अनुसर परमार्थसरणीम्' इति । अनन्तरं श्रीज्ञानदेवस्य आज्ञया गोविंदस्य विवाहः संपन्नो जातः । इन्दिरा इति तस्य भार्यायाः नाम । एवं पितृवचनस्य परिपालनं कृतं तेन । न किमपि अन्यत् उदाहरणं अनेन तुल्यं सकले जगतीतले ।

अलंकापुर्यां गोविंदेन यथा दृष्टं तथा श्रीज्ञानदेवस्य पूर्णचित्रं रेखांकितम् । अद्यापि तद् रेखाचित्रं 'श्रीरामनिकेतने' विराजते।

अथ एकदा श्रीअनंतमहोदयेन सह गोविन्दः बुधगाव-रेल-स्थानं श्रीगोंदवलेकरमहाराजस्य दर्शनार्थं गतः । तदा तस्मै आशीर्वादं दत्वा 'अयं बालः महान साधुः भवेत्' इति ब्रह्मचैतन्यमूर्तिना भविष्यवाणी कृता आसीत् । अनन्तरं चिमडसंप्रदायस्य सद्गुरुणा श्रीनारायणमहाराजेन उपदिष्टेन मार्गेण गोविन्देन महती साधना कृता । तेन गायत्रीपुरश्चरणं, श्रीरामनाम्नः त्रयोदशकोटिमितं पुरश्चरणं, श्रीज्ञानेश्वरीग्रंथस्य १०८ पारायणानि च कृतानि । एक एव गोविन्दः अनन्तरं 'बापूराव केलकरः' तथा 'श्रीमामामहाराजः' इति नाम्ना सुविख्यातः अभवत् ।

१९२० ख्रिस्ताब्दे 'शुचीनां श्रीमंता गेहे' इति भगवद्वचनानुसारेण श्रीमामामहाराजांना एकः पुत्रोऽजायत स एव सदैव-स्वानंदनिवासी मम सद्गुरुः श्रीदासराममहाराजः । श्रीज्ञानेश्वरमहाराजस्य आज्ञया एव मामामहाराजेन विवाहः

कृतः आसीत् । अत एव भगवतः ज्ञानेशस्य एव एषा महती कृपा यत् सर्वेषां भक्तानां कृते श्रीदासराममहाराजस्य उपलब्धिः अभवत् ।

१९२४ ख्रिस्ताब्दे चिमडसंप्रदायस्य महान् अधिकारिपुरुषः विख्यातः कीर्तनकारः च. प. पू. श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराजः महानिर्वाणपदवीं गतः। अनेन एव श्रीकोटणीसमहाराजेन एव श्रीरामरायस्य जन्मनः चतुर्दशे दिने अत्रागत्य तं स्वांके गृहीत्वा स्पर्शदीक्षा प्रदत्ता । प. पू. श्रीतात्यासाहेबकोटणीसमहाराजस्य निर्वाणादनन्तरं एकमासाभ्यन्तरे माघमासे वद्यपक्षे तृतीयायां तिथौ मध्यरात्रसमये ब्र. भू. तात्यासाहेबकोटणीसमहाराजः दासबोध-ग्रंथं पठतः गोविंदस्य अग्रे साक्षात् प्रकटीभूतः । तस्मै च नित्यं हरिकीर्तनं कर्तुं आज्ञां दत्तवान् । एषा गुर्वाज्ञा श्रीमामामहाराजैः आमरणं परिपालिता । गुर्वाज्ञां परिपालयितुं तैः सेवास्थानान्तरकारणात् सांगलीशिक्षणसंस्थायाः अध्यापकपदस्य त्यागपत्रं प्रदत्तम्। अहो सद्गुरुचरणयोः कियती निष्ठा एषा!

एतदनन्तरं श्रीमामामहाराजाः आमरणं अखण्डत्वेन ३८ वर्षाणि हरिकीर्तनं कृतवन्तः । तेषां कीर्तनस्य एकमात्रः विषयः 'नाम-महिमा' इति आसीत् । बिना नाम नैव तेषां कीर्तनम् । विना नाम नैव तेषां चिन्तनम् । विना नाम नैव तेषां ध्यानम् । विना नाम नव तेषां जीवनम् । 'नाम' इति केन्द्रबिन्दुं कृत्वा तत् परितः तेषां कीर्तनं सततं परिभ्रमति स्म । 'नाम गतिरूपं अस्ति । जीवनस्यापि गतिः अस्ति । नाम्ना एव मानवः गतिं-सद्गतिं प्राप्नोति । इति तेषां कीर्तनानां सारम् । प्रतिदिनं स्वे कीर्तने ते अतीव सुलभायां मधुरभाषायां च नाममहिमानं वर्णयन्ति स्म । रामनाम्नः नैकाः जपमालाः मध्येकीर्तनं भवन्ति स्म । कीर्तनाय कियन्तः श्रोतारः आगताः इति न दृष्टवा, वाद्यादीनां चिन्तामपि अकृत्वा सायंकाले पंचवादनसमये उपस्थितं श्रोतृवृन्दं भक्तिभावेन प्रणम्य कीर्तनं कुर्वन्ति स्म । साधनमहत्त्वं नाम-महिमा गुरुनिष्ठा ईश्वरभक्तिः आदीनां विषयाणां प्रतिपादनं ते अतीव सुलभरीत्या कुर्वन्ति स्म ।

अथ एकदा श्रीमामामहाराजाः पुण्यपत्तनं गताः आसन् । तत्र ते साहित्य



सम्राट्न.चिं.केलकरमहोदयं मिलिवन्तः । तस्मिन् समये श्री. न. चिं. केलकरमहोदयः मामामहाराजान् अपृच्छत्- 'सांगलीग्रामे प्रतिदिनं अखण्डत्वेन कीर्तयन्तः के ते बापूरावकेलकर नाम गृहस्थाः?'

तदा अधोग्रीवाः श्रीमहाराजाः तं नम्रतापूर्वकं अवदन् -

'अल्प-बहु, बहु-अल्पमात्रेण क्रियते कीर्तनं मया इति' ।

श्रीकेळकरमहोदयेन पृष्टम् - 'प्रतिदिनं भवतां कीर्तनस्य के विषयाः'

तदनु श्रीमहाराजैः दत्तं उत्तरम् - 'नाममहिमा' इति ।

ततः आश्चर्येण केळकरमहोदयः अपृच्छत् -

'किं कथयन्ति प्रत्यहं नाम इति विषये?'

तदा श्रीमहामराजैः प्रदत्तं उत्तरं अतीव स्मरणीयम् । पुनः पुनः स्मरणीयम्। तैः उक्तम् 'नाम-महिमानं वर्णयितुं बहून्यपि जन्मानि नैव पूरयिष्यन्ति मे इति।

तत् श्रुत्वा स्तिमितः साहित्यसम्राट् श्रीमामामहाराजान् सादरं प्रणिपातं चकार।

सततं परमार्थे रममाणः श्रीमहाराजः प्रपंचमपि सुचारूरूपेण संपादितवान् । स्वपुत्रस्य रामरायस्य विवाहः १९४२ ख्रिस्ताब्दे तैः महत्या विभूत्या संपादितः । श्रीरामरायेण अपि अतीव अनुरूपा, परमार्थ-परायणा कर्मयोगिनी, आतिथ्यशीला, 'रामसेवातत्पराच' मूर्तिमती 'सीता' लब्धा।

श्रीमामामहाराजाः नाम महती नम्रता । यदा कमपि पुरुषं आगच्छन्तं प्रांगणे पश्यन्ति तदा तत्क्षणे एव ते नतमस्तकाः नम्राश्च भवन्ति स्म । श्रीमहाराजाः 'मूर्तिमत् शान्तिब्रह्म एव । स्वे जीवने नैकानि दुःखानि अनुभूतानि तैः । ये बहूनि दुःखानि अनुभवन्ति ते एव सन्तः साधवः सत्पुरुषाश्च।

श्रीमहाराजानां शान्तस्वभावस्य सा कथा सुपरिचिता अस्ति । तेषां हितशत्रुषु का अपि स्त्री कीर्तने विघ्नं कर्तुं समीपकूपात् जलमानीय अत्र भूमौ जलवृष्टिं अकरोत् । सकला भूमिः जलमया पंकिला भवति स्म। एषः क्रमः एकमासपर्यन्तं सातत्येन प्रारभते स्म । सर्वे जनाः संतप्ताः अभवन् । किन्तु एकेन अपि शब्देन नैवोक्ता सा महिला श्रीमहाराजैः । अन्ते च पश्चात्तापेन दग्धा सा महाराजानां

चरणौ पतिता शरणागता च ।

सर्वेषां जीवानां शरीराणि भिन्नानि सन्ति किन्तु तेषु सर्वेषु जीवेषु व्याप्तं चैतन्यं एकमेव अस्ति । अत: श्रीमामामहाराजा: स्वे कीर्तने वारंवारं कथयन्ति स्म यत् विविधानां धर्म-पन्थ-संप्रदायादिभेदांना भित्तय: यदा समूलं संपूर्णतया विनश्यन्ति तदा एव साक्षात्कार: भवति । एतादृशानां आध्यात्मिकमूल्यानां पुन: प्रस्थापनेन एव राष्ट्रीय एकात्मता शक्या भवेत् इत्यत्र नास्ति सन्देहलवोऽपि। श्रीमामामहाराजै: एतदेव अध्यात्म-प्रसारकार्य आमरणं कृतम् । श्रीसद्गुरुदासरामश्चापि इदमेव कार्यं नित्यश: अनुसरति । अत एव सकल-संप्रदायानां सत्पुरुषा: अत्र श्रीरामनिकेतनं भूयो भूय: आगच्छन्ति स्म । श्रीसोनोपंतदाण्डेकरमहाभाग:, प्रख्यातस्तत्त्वज्ञ: गुरुदेवरानडेमहोदय: विदेही सत्पुरुष: श्रीगुंडूमहाराज:, श्रीटाकीमहाराज: श्रीपांडुरंग ताम्हनकरमहाराज:, सर्मथभक्त: शंकरश्रीकृष्णदेव:, गोजीवनचौंडेमहाराज: एते सत्पुरुषा: अत्र आगत्य परमानन्दं प्राप्नुवन्ति स्म ।

श्रीमामामहाराजै: विविधानां विषयाणां उपरि विपुला: अभंगा: भक्तिरस पूर्णानि च पदानि विरचितानि । एषा समग्रा रचना 'अमृतवाणी' नाम ग्रंथे संकलितास्ति । अतीव सुलभा रचना एषा । उदा. श्रूयन्ताम् एका रचना - भक्ती प्रेम सूत्र ओळखावे तंत्र । ज्यात नाममंत्र सदा असे ।।१।। मुखी नाम घेता देव देई हाता । मूकपण साधिता मुखी नाम ।।२।। हरिमुखे हरिनामाचा उच्चार । साधन हे थोर आन नसे ।।३।। ऐसा थोर आहे नामाचा महिमा । ज्यास नाही सीमा दास म्हणे ।।४।।

सन्तश्रेष्ठस्य श्रीतुकाराममहाराजस्य अभंगानां इव अतीव सरला, सुलभा भक्तिरसपूर्णा च रचना एषा । यथा श्रीज्ञानदेवस्य हरिपाठ: तथैव श्रीमामामहाराजानां 'रामपाठ:' पारमार्थिकानां साधकानां च कृते अतीव उपयुक्त: ।

श्रीमामामहाराजांना संपूर्ण जीवनं साक्षात् कृतिपाठ: आसीत् । अहर्निशं ते परमार्थे निरता: आसन् । 'आधी केले मग सांगितले', आदौ कृतं पश्चात्



कथितम् इति समर्थवचनानुसारेण श्रीमहाराजा: आमरणं वर्तन्ते स्म । तेषां संपूर्णं जीवनमेव साधनीभूतं अभूत् । अहर्निशं ब्रह्मणि रममाणां मामामहाराजसदृशा: सन्त: खलु अतीव भाग्यवन्त: । तेषां नम्रता ऋजुता च, तेषां अहंकारराहित्यं कारुण्यंच, तेषां त्याग: प्रेमच, तेषां शान्ति: मधुरा वृत्तिश्च कान् गुणान् कथं वर्णयाम्यहम्? श्रीमहाराजानां स्वभाव: अतीव मृदु-मधुर आसीत् । जगदगुरुभि: शंकराचार्यै: बिरचितं 'मधुराष्टकम्' अस्मिन्नवसरे स्मराम्यहम् । तस्य कंचिद् अंशं पठ्यते मया ।

अधरं मधुरं वदनं नयनं मधुरं हसितं मधुरम ।
हृदयं मधुरं गमनं मधुरं मथुरादिपतेरखिलं मधुरम् ।।

यथा मथुराधिपते: भगवत: श्रीकृष्णस्य अखिलं एवं मधुरं तथैव श्रीमामामहाराजांना वृत्तिर्मधुरा कृतिरपि मधुरा । तेषां वदनं मधुरं सदनं मधुरम् । तेषां गमनं मधुरं नमनं मधुरम् । तेषां वर्तनं मधुरं कीर्तनं मधुरम् । तेषां ध्यानं मधुरं स्मरणं अपि मधुरम् । किं बहुना महाराजांना मरणं अपि मधुरम् ।

श्रीमामामहाराजांना अन्तकालोऽपि भव्यो दिव्यश्च! श्रीमहाराजा: मरणासन्ना:। सर्वे जना: चिन्ताकुला: । विख्याता: आंग्लवैद्या: अपि तेषां जीवनाशां त्यक्तवन्त:। एकस्यैव पुत्रस्य श्रीरामरायस्य दु:खावस्थां वर्णयितुं क: समर्थ:? मामामहाराजांना एतादृशी निश्चेष्टितावस्था त्रिप्रहरपर्यन्तं आसीत् । तेषां कीर्तन- वेला समीपे आगता । सायंकाले पंचवादनसमये श्रीमहाराजै: श्रीराम जयराम जयजय राम इति नामघोष: उच्चै: कृत: । कूपस्य समीपे उपविष्टै: जनै: श्रुतोयं घोष: । १९६२ ख्रिस्ताब्दे माघमासे शुक्लपक्षे नवम्यां तिथौ सोमवासरे पंचवादन-समये नामोच्चारणरूपेण नित्यं हरिकीर्तनं कृत्वा एव मध्यरात्रौ श्रीमामामहाराजा: महानिर्वाणं गता: । रामं ध्यात्वा राम: अभवन् । सद्गुरुश्रीतात्यासाहेबमहाराजस्य आज्ञानुसारेण तै: कृतेन अखण्डकीर्तनानुष्ठानेन एव सांगलीनगरी 'कीर्तनपंढरी' इति नाम्ना सार्थवती बभूव । तेषां पश्चात् संप्रति श्रीदासराममहाराज: अखण्डत्वेन हरिकीर्तनं करोति । श्रीदासरामस्य ज्येष्ठ: सुपुत्र: चन्द्रशेखर: तथा आण्णामहोदय:

अपि सुललितं भावपूर्णं च कीर्तनं करोति । अस्मिन् केलकरकुले एषा परमा पावनी, मोक्षदायिनी कीर्तनगंगा अक्षुण्णतया प्रवाहिता स्थास्यति इत्यत्र नास्ति संशयलेशोऽपि । अस्तु । एतादृशः महात्मा न पुनर्भविष्यति । यथा गगनं गगनाकारं सागर : सागरोपमः तथैव श्रीमामामहाराजैः समं मामामहाराजा एव । आमरणं अखण्डत्वेन कीर्तनं कृत्वा एव अखंड नामसंकीर्तनयोगी इति सार्थं नामाभिधानं श्रीमहाराजाः प्राप्तवन्तः ।

भो मम प्रियाः बन्धुभगिन्य :

यथा शिवमहिम्नःस्तोत्रम् तथैव गोविन्दमहिम्नःस्तोत्रम् एतद् अतिविशालं, अतीव अपारम् । एतद् वर्णयितुं न समर्थोऽहम् । यद् यद् मया उक्तं तत्तद् परमश्रद्धेयः मम सद्गुरुः श्रीदासराममहाराजः एवं मम मुखेन उक्तवान् । निमित्तमात्रोऽहं केवलम् ।

सद्गुरुश्रीमामाहाराजानां जन्मशताब्दिमहोत्सवं द्रष्टुं सर्वेभ्यश्च आशीर्वचनं दातुं श्रीसद्गुरुनिम्बरगीकरमहाराज श्रीरघुनाथप्रियसाधुमहाराज श्रीचिमडमहाराज श्रीतात्यासाहेबकोटणीसमहाराजादय सर्वे सत्पुरुषाः अत्र उपस्थिताः सन्ति । शक्तिरूपिणी श्रीसीतावहिनी अपि एतं समारोहं पश्यति । सर्वेषां तत्रभवतां पूज्यपादेषु भक्तिभावेन प्रणम्य तथा एव श्रीसद्गुरुदासरामस्य चरणकमले सर्वभावेन प्रणिपत्य सर्वेभ्यः श्रोतृभ्यः च धन्यवादान् समर्प्य अहं विरमामि ।

अन्ते सद्गुरुचरणयोः एका प्रार्थना सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ।।

ॐ शांन्तिः शान्तिः शान्तिः

***

## प्रकरण-१७

## असे होते मामा (कांही आठवणी)

ह. भ. प. वै. बापूरावजी केळकर हे एक हरिगुरुकृपाप्राप्त असे अधिकारी पुरुष होते. आपले सद्गुरु संत श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज यांच्या आज्ञेने त्यांनी आजन्म असंख्य कीर्तने केली ती केवळ सेवा या भावनेनेंच केली. त्यांच्या कीर्तनात भक्ति, नाम, सत्संगति, अध्यात्म याच विषयांचे विवरण होत असे. आम्हांस त्यांचे कीर्तन ऐकण्याचा सुयोग आला होता. शुद्ध आचरण, सद्गुरुनिष्ठा, ईश्वरभाव हे गुण उत्कटतेने त्यांच्या ठिकाणी बसत होते. आदरणीय व अनुकरणीय असे जीवन त्यांनी व्यतीत केले.

**- ह. भ. प. धुंडामहाराज देगलूरकर,** पंढरपूर

सूर्याकडे पाहून त्राटक करण्यास मला मामांनी सांगितले. त्याप्रमाणे मी करीत राहिले.

**- ताई देशपांडे**

सोमवारी रात्री १२ च्या सुमाराला मामांनी देह ठेवला. त्याच दिवशी रात्री स्वप्नात मला त्यांची गादी रिकामी दिसली.

**- अनुताई शिर्तीकर**

मामांच्या कृपेने आम्हाला काशीयात्रा घडली. त्यांचे स्मरण करून आमचे जीवन सुरळीत चालले आहे.

**- सौ. सोनुताई माने**

एकदा माझ्या घरी मामांचे कीर्तन झाले, ते इतके रंगले की ते माझ्या स्मृतीतून जाणे अशक्य आहे.

**- श्री. तात्यासाहेब वाले**

दुसऱ्यांच्या मनातील व्यथा ओळखून त्यावर मामा कीर्तनात चार शब्द बोलत, असे मला वारंवार अनुभवास आले, मला तो चमत्कारच वाटतो.

**- सौ. ताई उदगावकर**

नरसिंहवाडीतील विद्युद्दीपप्रगटीकरण मामांच्या हस्ते झाले हे मला मामांच्या योग्यतेचे प्रतीक वाटते.

**-कल्याण श्रीपाद कुलकर्णी**

माझ्या सौ ची मावशी माई करमरकर सांगलीस मामांच्या वाड्यात राही. तिच्याच आग्रहाने १९५२ च्या जुलैमध्ये आम्ही सांगलीस गेलो. प्रथमदर्शनीच मामांनी माझे मन हिरावून घेतले. नंतर माझी आईही मामांचे दर्शनाला गेली. आमच्याप्रमाणेच तिचेही मन तिथे रमले. १९५५ पासून आम्ही दरवर्षी गुरुतृतीयेच्या उत्सवाला सांगलीस जाऊ लागलो. माझ्या आईवडिलांच्या पुण्याईनेच हा लाभ घडला. त्यानंतर १-२ वेळां संतश्रेष्ठ मामांचे आमचे घरी येणे घडले. माझ्यावर कोणतेही संकट आले तरी आपल्या पाठीशी मामा आहेत ही दृढ भावना असते. या संदर्भात गतवर्षी घडलेली गोष्ट अशी :- गतवर्षीचा उत्सव १४ फेब्रुवारी १९७० ला होता. आत्तापर्यंत उत्सवास जाण्याचा नेम चुकला नव्हता. पण तो यंदा चुकणार असे वाटू लागले. कारण जानेवारीत कमी रक्तदाबाचा विकार मला जडला. डॉक्टरांना विचारून सांगलीस जाण्यास १३ फेब्रुवारीची तिकिटे रिझर्व्ह केली. पण १२ फेब्रुवारीला डॉक्टरकडून परत येताना रस्यात एक पाऊलही पुढे पडेना. घर जवळ असून टॅक्सीने घरी जावे लागले. नामस्मरण चालू होते. पहाटे उठून मामांना प्रार्थना केली, ''मामा, मला तुमचे उत्सवाला सांगलीस जावयाचे आहे.' आणि एकाएकी मला असा उत्साह आला की आम्ही ठरल्याप्रमाणे निघून सांगलीस सुखरूप पोचलो. आणि तेव्हापासून



आत्तापर्यंत मला कसलाही त्रास झाला नाही. मामांच्याबद्दल एक आंतरिक ओढ व जिव्हाळा वाटतो. मामांनी आमच्या 'उपासनेला दृढ चालवावे' एवढीच त्यांचे चरणी प्रार्थना!

**- श्री. अनंतराव जोशी, मुंबई**

आडनांव संत असले तरी तो मनुष्य संत असतो असे नाही. संत चमत्कार करतात पण चमत्कार करतात ते संत नव्हेत. संत चमत्कार करतात असे म्हणण्यापेक्षा त्यांचे द्वारा ईश्वर चमत्कार घडवितो असे म्हणता येते.

माझ्या धाकट्या बहिणीचे लग्न मामांच्या घरीच झाले. मामांनीच तिचे देवक ठेवले होते. भोजनाच्या वेळी अनपेक्षितपणे जास्त मंडळी जेवण्यास आली. सर्वांना पुरेसा स्वयंपाक नव्हता. माझ्या माई मावशीने हे मामांना सांगितले. मामा स्वयंपाकगृहात आले व अन्नाकडे पाहात ते बोलले, ''माई, घाबरू नका. सर्व ठीक होईल. वाढणे सुरू करा.'' माईला मामांचे वाक्य प्रमाण. सर्व मंडळींना तो स्वयंपाक पुरलाच; इतकेच नव्हे तर काही शिल्लकही उरला.

**- सौ. मंगलाबाई जोशी,** मुंबई

प. पू. मामांच्याकडे १९२० सालापासून मी जात येत असे. म. गांधीच्या चळवळीत मी कॉलेज सोडले. आता मोकळीक मिळाल्याने, मामांचा परिचय वाढण्यास मदत झाली. पुढे मी दुकानदारीचा व्यवसाय सुरू केला. हे त्यांना माहीत होते. स्नेहबुद्धीने ते मला चार उपदेशाच्या गोष्टी सांगत.

१९४८ साली भयानक आगीत आमच्या स्थैर्याचा निकाल लागला. नामदीक्षा घेऊन एखाद्या तीर्थक्षेत्री जाऊन जप करीत बसावे, असा विचार माझ्या मनात येत होता. मामा अंतर्ज्ञानी असल्याने, त्यांनी हे ओळखले. ते मला म्हणाले, ''तुमचा विश्वास माझेवरी । हे मज समाधान अंतरी । कर्मसु कौशलम् हे अंतरी । सूत्र धरावे कर्मयोगाचे ।। तुम्हासी असे हे अवगत । तेची वाढवावे निश्चित । आदरे रक्षावे ईश्वरी मनोगत । यशापयशी न भुलावे ।।''

पण मला ते एकदम पटले नाही. कारण कर्मसंन्यास घेऊन मला नामधारक व्हावयाचे होते. मी पुनः त्यांचेकडे पाहिले. मामा पुन्हा म्हणाले, ''पंडितराव, घाई करू नका. थोडे दिवस थांबा. तुम्ही प्रगतिपथावर चालला आहात. तुमची निष्ठा तुम्हाला जागे करील व तुम्हाला मार्ग दाखवील. जगाचा नियंता परमेश्वर आहे.''

मी बुचकळ्यात पडलो. पण यातच कांही तरी असले पाहिजे व ते आपण हुडकले पाहिजे असे वाटू लागले. मला निराश होण्याचे कारण काय? सम्यक् उपदेशाचे सार हुडकावे लागते आणि ते मला मामांच्याकडून मिळाले अशी माझी श्रद्धा आहे.

- **श्री. पंडितराव दांडेकर,** कारखानदार, सांगली

पू. माईसाहेब दांडेकर यांच्यामुळे मला मामांच्या अलभ्य दर्शनाचा लाभ झाला. माईसाहेबांचेकडे मामांची कीर्तने होत. त्यात मी तबल्याची साथ करीत असे. आणि सांगावयास आनंद वाटतो की आध्यात्मिक सुखाचा आनंद मी आज उपभोगीत आहे.

- **श्री. मामा मराठे,** पालघर

विष्णुघाटावरील विष्णूचे देवळांत मी राही. वैकुंठचतुर्दशीच्या उत्सवात तेथे मामांची कीर्तने होत. मामा कीर्तनात देहभान विसरत. प्रत्यक्ष उपदेश न करता, ते कीर्तनातून कोणाला काय पाहिजे ते देत. आपण काय करावयास हवे व काय करावयास नको, हे केवळ मामांचे कीर्तन ऐकून, श्रोत्यांना कळे.

- **श्री. द. ल. कुलकर्णी,** सांगली

११ फेब्रुवारी १९६२ या दिवशी दुपारी २।। च्या सुमारास आजारी मामांच्या जवळ बसण्यास आम्ही गेलो होतो. याच दिवशी सायंकाळी सांगलीत पंडित नेहरूंचे भाषण होते. 'तुम्ही सर्व जण त्यांच्या भाषणास जा. माझी तब्येत ठीक आहे'' असे ती. मामांनी आम्हास सांगितले. ते पुढे म्हणाले, ''राजेसाहेबांकडे नेहरू जाऊन आले की नाही?'' आम्ही म्हटले, ''नाही. नेहरूंना कुठला वेळ



होणार? राजेसाहेबांकडे चहापानास नेहरु निश्चित जातील.'' आम्ही भाषणास गेलो आणि आम्हाला कळले की भाषणानंतर नेहरू राजेसाहेबांकडे जाऊन आले.

### तेजोमय दर्शन

ती. मामांच्या निर्याणापूर्वीची गोष्ट. मी व श्री. बाळू गोखले नेहमीप्रमाणे मामांच्या दर्शनास आलो होतो आणि चकित होऊन २-३ मिनिटे आम्ही तसेच त्यांचेकडे पहात राहिलो. कारण त्या वेळचे मामांचे दर्शनच अपूर्व होते. मामांचा चेहरा अतीव तेज:पुंज दिसत होता. संपूर्ण शरीरच तेजोमय दिसत होते. मामांचे डोळे निळसर तेजस्वी दिसत होते. (हे नीट वर्णन करण्यास मला शब्दच सुचत नाही). परतताना आम्ही एकमेकांना म्हणालो सुद्धा, की आज ती. मामांचा चेहरा व अंग किती तेज:पुंज दिसते नाही! त्या वेळची ती. मामांची मूर्ती अजूनही माझ्या डोळ्यापुढे उभी राहते.

- **श्री. सुरेश महादेव जोशी,** पुणे, ओव्हरसीअर

१९३५ साली सेवानिवृत्त झाल्यावर माझे वडील सांगलीस स्थायिक झाले. सतत एक तप माझे वडील व मातोश्री प. पू. मामांच्या कीर्तनास नेमाने जात होते. माझे वडील शेवटचे आजारी होते. त्यावेळी मी पुण्यास नोकरीला होतो. सौ. आईचे पत्र आले. लगेच रात्रीच्या गाडीने सांगलीस जाण्यास निघालो. माझ्या दुर्दैवाने, मी पोचण्यापूर्वीच, वडिलांचे निधन झाले. आश्चर्य असे, माझ्या वडिलांचे और्ध्वदेहिक करण्यात गु. मामांनी स्वतः पुढाकार घेतला. त्यांनी स्वतः अग्नि हातात घेतला, हे मला मग कळले. आणि ती. मामांच्या थोर हृदयाची प्रचीति आली.

- **श्री. ना. द. लिमये,** नाशिक

माझे रहाणे कोल्हापूरला असे. १९५५ साली मी प. पू. मामांचा आसरा घेतला. १९५६ साली माझी प्रकृति बिघडली. मोठमोठे डॉक्टर व वैद्य हतबल झाले. शेवटी मला पुण्याच्या हॉस्पिटलात दाखल करण्याचे ठरले. तत्पूर्वी मामांच्या दर्शनास मला सांगलीत आणण्यात आले. घरच्या मंडळींनी प. पू.

मामांच्या घरी जाऊन सर्व स्थिति कथन केली. मामांनी धीर दिला. तीर्थप्रसाद दिला. 'काही काळजी करू नका.' म्हणून सांगितले. आणि त्या दिवसापासून माझी प्रकृति सुधारत गेली. १-२ वर्षात पूर्ण बरा होऊन, मी माझ्या सरकारी नोकरीवर हजर झालो.

पुढे मी एकदा नवीन व्यापार सुरू करण्याची इच्छा मामांच्या जवळ बोलून दाखविली. त्यांनी सहजपणे होकार दिला. त्यांनी सागितले, 'तुम्ही खुशाल नवीन व्यापार चालू करा. यशस्वी व्हाल.' ते त्यांचे उद्‌गार सार्थ झाले आहेत. माझा व्यापारधंदा भरभराटीत आला आहे. याच्यामागे प. पू. मामांचा प्रेमळ आशीर्वाद आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे.

आजही हरघडी त्यांची स्मृति हृदयात जागृत होते, तेव्हा डोळे ओलावतात, मन भरून येते व उद्‌गार बाहेर पडतात-

तुम्ही संत माय बाप कृपावंत । काय मी पतित कीर्ति बानू ।।

**- श्री. महादेव कृष्णा माने,** कोल्हापूर

१९४७ चा मे महिना. त्या वेळी मी सांगलीत शिक्षक होतो व प. पू. मामांच्या कीर्तनाला जात होतो. एक दिवस दुपारी अंग दुखून जोराचा ताप आला. हातपाय गार पडले. नाडी लागेना. पाणी घोटेना. दातखीळ बसली. याच अवस्थेत ५ तास गेले. ''मला मामांना भेटायचंय. निदान श्रीराम भाऊंना तरी बोलवा.'' असे अस्पष्ट शब्द तोंडातून चाचपडत बाहेर पडत हाते. सौ. चा धीर सुटला. संध्याकाळी ७ ला ती मामांचे घरी गेली. सौ. मामींना तिने सर्व हकिकत सांगितली. अंगारा देऊन सौ. मामी म्हणाल्या, ''ते उद्या सकाळी येतील.'' सौ. डोळ्यातून पाणी काढू लागली. सौ. मामी म्हणाल्या ''उद्या त्यांची (मामांची) भेट होईपर्यंत आजाऱ्याच्या रक्षणाची हमी त्यांच्याकडे (मामांकडे) आहे. तुम्ही निष्काळजी असा.'' सौ. परत आली व अंगाऱ्याची चिमूट माझे तोंडात घातली. पाण्याच्या घोटाबरोबर अंगारा पोटात गेला. दातखिळी सुटू लागली. दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता गु. मामा आले. अर्धवट शुद्‌धीतच



मी मामांना मानेने नमस्कार केला. मामांनी माझ्या अंगावरून हात फिरविला. मला बरे वाटू लागले. नंतर १ महिनाभर ते रोज सकाळी मजकडे येऊ लागले. तेवढ्यात मला चांगले बरे वाटू लागले.

**- श्री. रामभाऊ केळकर,** मास्तर, हरिपूर

एकदा माझी सुशीला नावाची मुलगी फार आजारी पडली. तिला खूप ताप आला होता. आम्ही सर्वांनी तिची आशा सोडली होती. तेवढ्यात मला प. पू. मामांची आठवण झाली. सकाळी ९ वाजता मी त्यांना बोलावण्यास गेले. 'तुम्ही पुढे चला, मी आलोच. तुम्ही इतक्या का घाबरता?' ते म्हणाले, 'हिला तर काहीच झाले नाही', घरी आल्यावर ते म्हणाले. नंतर त्यांनी तीर्थ देऊन, आपल्या हाताने अंगारा चोळला आणि १२ वाजेपर्यंत सुशीलेचा ताप जाऊन तिला बरे वाटू लागले.

**- सौ. रुक्मिणी बाबूराव नाईक,** सांगली

आमचे हे लहानपणापासून व्यंकटेशस्तोत्र म्हणत. पुढे व्यापारात पडल्यावर, ते म्हणायचे राहून जाऊ लागले. अशीच ८-१० वर्षे गेली, एकदा यांच्या मनात आले की व्यंकटेशस्तोत्र म्हणण्यास सुरूवात करावी. पण तेही तसेच राहून गेले. पुढे हे एकदा ती. मामांच्या कीर्तनास आले. प. पू. मामांनी ह्यांना हाक मारून सांगितले की तुम्ही रोज जेवणाचे आधी व्यंकटेशस्तोत्र म्हणत जा. तेव्हापासून हे रोज व्यंकटेशस्तोत्र म्हणू लागले.

प. पू. मामांचे कीर्तन ऐकून मी नियमित आहार घेण्याचे ठरविले. एक महिनाभर गेला. ती. मामांचे घरचे मला जेवणाचे आमंत्रण आले, नवरात्रीची सवाष्ण म्हणून. मी जेवणास गेले. मनात आले की आता नियमित आहार जमणार नाही. त्याच वेळी प. पू. मामा घरच्यांना म्हणशले, ''पमाताईंना आग्रह करू नका. त्यांना जेवढे पाहिजे तेवढेच वाढा.'' आणि माझा नेम मोडला नाही.

प. पू. मामांचे शेवटचे दिवस होते. मी त्यावेळी तासगावला औषध घेण्यास गेले होते. एके रात्री स्वप्नात येऊन मामांनी 'या' अशी बोटाने मला

खूण केली. मी उठून त्यांचे पायावर डोके ठेवण्यास गेले, तो ते देवघरात जाऊन गुप्त झाले. पुढल्याच सोमवारी प. पू. मामांनी महानिर्वाण केले.

ह्यांनाही अशीच पूर्वसूचना मिळाली. आमचे काँक्रीटचे घर होते. यांना एकदा स्वप्नात असे दिसले की घराची स्लॅब उडून गेली आहे व फक्त भिंती राहिल्या आहेत. आम्हा दोघांचे छत्र म्हणजे प. पू. मामा. हे छत्र लौकरच जाणार, हे आम्हाला नंतर कळाले.

- **सौ. पमाताई परचुरे,** सांगली

'जो नामात आहे तो शुद्धीत आहे' असे श्रीगोंदवलेकरमहाराज म्हणत. याची प्रचीति प. पू मामांनी आम्हाला आणून दिली. माघ शुद्ध ९, सोमवार मामांच्या निर्याणाच दिवस झाला. या दिवशी संध्याकाळी पाच वाजता, अत्यंत विकल अवस्थेत असतांनाही, त्यांनी सर्वांना स्पष्टपणे ऐकू जाईल इतक्या मोठ्या आवाजात, वैखरीवाणीने 'श्रीराम जयराम जयजयराम' या त्रयोदशाक्षरी मंत्राचा उच्चार केला. त्या वेळी श्री. बापूराव गोडबोले प. पू. मामांचे उशाशी व मी पायाशी बसलो होतो,. जन्मभर मामांनी नाम घेतले. नाम हा त्यांचा स्वभाव बनला होता. 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' या तुकोक्तीप्रमाणे मामांच्या जे आत होते तेच शेवटी बाहेर आले व आपण अखेरपर्यंत शुद्धीत आहोत, हे प. पू. मामांनी सर्वांना दाखवून दिले.

- **श्री. व. रा. कुलकर्णी,** सांगली

मी गोंदवल्यास गेलो होतो. एक दिवस राहून, दुसरे दिवशी प्रसाद घेऊन निघालो. मोटारीने मायणीस आलो. सायंकाळचे ६ वाजले होते. मला विट्यास जावयाचे होते. मोटारीची चौकशी केली. मोटार सकाळी ६ वाजताच असते असे कळले. विट्यास जाणारे आणखी दोन प्रवासी होते. रात्री ८।। पर्यंत मारुतीच्या देवळात बसून होतो. मनात मामांचे स्मरण करीत होतो. सुमारे १५ मिनिटांत एक फोर्ड मोटार आली. ''विट्यास कोण येणार का? चला'', फोर्डचा ड्रायव्हर म्हणाला. आम्ही तिघे जण त्या फोर्डमधून विट्याला रात्री १० वाजता पोचलो.



गुरूवर्य मामांचे निर्वाण झाले. महायात्रेला जाऊन दुपारी १ वाजता मी घरी आलो. त्याच दिवसापासून प. पू. रामभाऊंनी कीर्तन करण्यास आरंभ केला. मी कीर्तनास गेलो होतो. कीर्तनानंतर घरी निघालो. मन अस्वस्थ होते. आता १०-१२ दिवस कीर्तनास जाऊ नये असा विचार ठरविला. त्याच रात्री झोपल्यावर पहाटे ५ ला स्वप्न पडले. स्वप्नात मामांचे कीर्तन चालू होते. मामांना साष्टांग नमस्कार घातला. त्यांनी जवळ बसवून घेतले. मग मला आरती घेण्यास सांगितले. मी आरती घेतली. नंतर मामा मला म्हणाले, ''तुम्ही कीर्तनास येणार नाही असे ठरविलेत. तसे न करता दररोज कीर्तनास येत जावा व आरती घेत जावा.'' दुसरे दिवसापासून मी प. पू. रामभाऊंच्या कीर्तनास जाऊ लागलो.

गुरुवर्य मामांचा एक मोठा फोटो आपल्या घरात असावा असे मनात येई, पण हे कसे जमणार, हाही विचार येई. एके दिवशी श्री. ज. बा. देवधर यांनी मामांच्या फोटोच्या चार मोठ्या प्रती तयार करवून श्रीरामभाऊंचेकडे आणून दिल्या व त्यांतील एक प्रत बर्वेमास्तरांना देण्यास सांगितले. दुसरे दिवशी रात्री श्रीरामभाऊंनी मला तो फोटो दिला.

माझ्या उजव्या पायास गुडघ्यापर्यंत इसब झाले होते. त्यातून रक्त व पू वहायचा. तशातच नोकरीसाठी रोज हरिपूरला जावे लागे. तेथून आल्यावर कीर्तनास जात होतो. असेच २-३ महिने गेले. अगदी त्रासून गेलो. खूप औषधे लावली. गुण नाही. एके दिवशी सौ. चे स्वप्नात गु. मामा आले. 'मास्तर घरात आहेत काय?' त्यांनी विचारले. सौ. म्हणाली, 'मास्तर कीर्तनास गेले आहेत.' मामा म्हणाले, 'मीही तिकडेच निघालो आहे.' सौ. ने आग्रह केल्यावर, घरात येऊन मामा पाटावर बसले. सौ. ने पृच्छा केली, 'का आला होता?' मामा म्हणाले, ''मास्तरांची प्रकृति बरी नाही. शिवाय इसबाने ते हैराण झाले आहेत. म्हणून त्यांना भेटण्यास आलो.'' थोडे दिलेले दूध घेऊन मामा निघाले. जाताना म्हणाले, ''मास्तरांना आता बरे वाटेल.'' आणि त्याच दिवसापासून माझे इसब वाळू लागले व पुढे पूर्ण बरे झाले.

- **श्री. रा. ना. बर्वेमास्तर,** सांगली

मामांच्या नित्यदर्शनाला जाण्याचा नेम मी केला होता. एके दिवशी लहान मुले घरात ठेऊनच मी रात्री ८ च्या वेळी गेले. त्या वेळी कीर्तनात रोजची जपाची माळ चालली होती. माळ संपेपर्यंत मी बसले. तेव्हां मनात आले की आज कीर्तन संपण्यास उशीर होणार. तेव्हा आता मामांना नमस्कार करायला मला कसा मिळणार? आणि कीर्तन होईपर्यंत थांबावे तो घरी जाण्यास उशीर होणार. मी मामांचेकडे दृष्टि लावली होती. जपाची माळ संपल्यावर, मामांनी मला हाताने खूण करून बोलावले. मी जाऊन नमस्कार केला व समाधानाने घरी परतले.

**- सौ. कमल श्रीपाद जोशी**

माझे नेहमीचे राहणे मुंबईला असे. सवड मिळताच मी सद्गुरु श्रीमामांचेकडे दर्शनास जात असे. एकदा परत येतांना, त्यांच्या दर्शनास व निरोप घेण्यास गेलो. 'उद्या सकाळी ४ च्या गाडीने मुंबईस जाणार' असे मी त्यांना सांगितले. पुण्याकडची गाडी मिरजेहून माधवनगरला येते. माधवनगरला माझे एक स्नेही ह. भ. प. वासुदेवराव जोशी राहतात. रात्री मी त्यांच्याकडे रहावे व पहाटे ४ वाजता येणारी गाडी माधवनगरला पकडावी, असे त्यांनी सुचविले होते. ते मी मान्य केले होते. हा बेत मी पू. मामांना सांगितला. 'तुम्ही मिरजेहूनच का जात नाही?' असे मामा म्हणाले.

रात्री माधवनगरला ह. भ. प. वासुदेव रावांचेकडे राहिलो. पहाटे स्टेशनवर गेलो. पहाटे ४।। वाजता येणारी गाडी त्या दिवशी ४ तास उशीरा आली व सकाळी ८।। ला सुटली. थंडीचे दिवस होते. पहाटेपासूनच थंडीत कुडकुडत मी स्टेशनवर बसलो होतो. ''मामांचे ऐकले असते तर'' हा विचार मनात आला व यापुढे ते सांगतील तसे वागण्याचा निश्चय केला.

असाच प्रसंग माझ्या माईमावशीवर आला होता. मामांचे कीर्तन ऐकण्यास माईमावशी एकटीच सांगलीस मामांचे वाड्यात राही. ती एकदा मुंबईला (तिचे मुलगे मुंबईला आहेत) येण्यास निघाली. एकनाथषष्ठीचा दिवस होता तो.



जाण्याचे सांगण्यास माईमावशी मामांचेकडे गेली. ''माई, आज एकनाथषष्ठी आहे. उद्या का नाही जात?'' मावशी म्हणाली, ''आजच्या बेताप्रमाणे मुलांना पत्रे घातली आहेत तेव्हा गेले पाहिजे.''

सांगलीहून पुणे स्टेशनवर मावशी पोचली. परंतु तिला कळले की त्या दिवशी पुण्याहून मुंबईला जाणाऱ्या गाड्या काही कारणाने बंद होत्या. मावशीला संबंध रात्र पुणे स्टेशनवर काढावी लागली. दुसरे दिवशी सकाळची गाडी तिला मिळाली. वाटेत मामांचे शब्द तिला आठवत होते.

**- श्री. स. वि. जोगळेकर,** मुंबई

माझी बहीण चंद्राक्का आपल्या नामदेव या मुलाला घेऊन प. पू. मामांच्या नित्य कीर्तनास जात. नामदेव सतत १० वर्षे कीर्तनात पूर्णपणे रंगून गेला होता. त्याचेवर मामांची कृपा होती. तो १९४२ साली अनंतात विलीन झाला. तत्पूर्वी आजारीपणात तो दोन महिने आमच्याकडे होता. नामदेव अंथरुणाला खिळून असता, प. पू. मामा नित्य दुपारी त्यांच्याकडे येत. त्याचेजवळ बसून, पाठीवरून हात फिरवत व परत जात. ईश्वरी सूत्राप्रमाणे नामदेव कालवश झाल्यावर आम्हाला दुःख झाले; केळकर कुटुंबीयांना सुद्धा या दुःखद घटनेचा चटका लागला.

**- श्री. ना. द. कुंभोजकर,** कोल्हापूर

१९४६ सालची गोष्ट. श्रीमामा पांडवपंचमी दिवशी रथोत्सवाचे वर्णन करीत होते. 'श्रीसाधुमहाराज आज इथे प्रगट झालेले आहेत. ते भाग्यवंतांनाच दिसणार', चिपळी धरलेला हात पुढे करून मामा म्हणत होते, तोच लख्ख तेज मोठ्या दरवाजातून देवापर्यंत आले. कीर्तन संपल्यावर कधी नव्हे ते मामांनी विचारले, 'आज कीर्तन कसे झाले, विनायकराव!' मी म्हणालो, 'फारच छान!' व त्यांना वरील हकिकत सांगितली. 'विनायकराव, बरोबर बोललात. आज साधुमहाराज खरंच प्रगट झाले होते,' असे मामा म्हणाले.

रविवार दि. २८-४-४० पहाटेची गोष्ट. प. पू. मामा व मी पौष महिना

असल्याने कैवल्यधामात काकडारतीस चाललो होतो. त्यावेळी मामांचे पायामधून साप जाताना दिसला. मी सापाला मारण्यास दगड, वगैरे पाहू लागलो. मामा म्हणाले, 'आपण काकडारतीस चाललो आहोत. साप काही करणार नाही.' आणि खरेच साप निघून गेला.

बुधवार दि. ३१-१-४५ रोजी मामांचे नित्याचे कीर्तन चालू होते. मामांच्या हातातील झांजांचा आवाज न आल्याने, झांज वाजवण्यास न घेताच मी कीर्तनास बसलो. कीर्तन संपल्यावर मी विचारले, ''आज कीर्तनात झांजा का वाजविल्या नाहीत?'' मामा म्हणाले, ''झांजा नव्हत्या? मला काहीच कळले नाही.'' इतके मामांचे मन कीर्तनात तदाकार असे.

- **ह. भ. प. विनायकराव कानिटकर,** सांगली

माझे श्वशुर श्री. स. गोविंदबुवा तथा बापू दिवेकर यांचे मामांचे घरी एकदा प्रवचन झाले. प्रवचन झाल्यावर मामा बुवांचे पाया पडले. बुवांनी नमस्कार करण्यास मामांना पाय पुढे करण्यास सांगितले, मामा म्हणाले, ''मी लहान आहे. माझे पाया पडू नका.'' बुवा म्हणाले, ''मी बापूरावजी केळकरांच्या पाया पडत नाही. हृदयस्थ आत्म्याच्या पाया पडत आहे.'' तेव्हा मामांनी आपले पाय पुढे केले.

ती. मामांच्या शेवटच्या आजारपणात शेवटचे दोन दिवस मी सतत त्यांचे जवळ होतो. मामा देहावरच नसल्याने देहदुःख त्यानं जाणवतच नव्हते. माघ शु. नवमीला मी डॉक्टरांना विचारले, ''यांना देह ठेवण्यास किती वेळ लागेल?'' डॉक्टर म्हणाले, ''अशी केस आमचे पाहण्यात नाही. घटकेत नाडी उत्तम तर घटकेत जास्त असा प्रकार चालू आहे. ते जाणार केव्हा हे सांगता येणार नाही!'' त्या दिवशी दुपारी ३।-३।। चे सुमारास मामांच्या पोटात कॅन्सरची गाठ फुटली व नाकातोंडातून रक्त येऊ लागले. पण मामा देहातीत असल्याने कण्हणे, ओरडणे, विव्हळणे काही नाही. ''मामा औषध घ्या.'' म्हटले की तोंड उघडत. ते दुसऱ्यासाठीच औषध घेत; त्यांना औषधाची जरुरीच नव्हती.



दुपारपासून मंडळी जमू लागली होती. आपल्या इच्छेप्रमाणे लोक नाम घेत होते. पण मामांना पाहिजे होता तो नामघोष कोणी करीत नव्हता. म्हणून सायंकाळी ५ वाजता त्यांनी सर्वांना 'श्रीराम जयराम जयजयराम' म्हणावयास सांगितले. त्या वेळी त्यांचे जे रूप दिसले ते वर्णन करण्यापलीकडचे आहे. नंतर रात्री ११-५० ला त्यांनी देह ठेवला. महायात्रा सकाळी निघाली. तोपर्यंत त्यांचे शरीरात कोणताही फरक झाला नव्हता. पहिलेच तेज चेहऱ्यावर विलसत होते.

मामा आजारी होते. डॉक्टरांनी त्यांना एक्सरे काढून घेण्यास सांगितले. मामा तयार होईनात. माझ्या मुलाने हेमंताने त्यांना विचारले, ''फोटो का काढून घेत नाही?'' मामा म्हणत, ''अरे मला काही होत नाही आहे. उगीच फोटो कशाला?'' हेमंता म्हणाला, ''आम्हाला वाटते, तुम्ही फोटो काढून घ्यावा. आमचे समजुतीसाठी फोटो काढून घ्या.'' मग मामा तयार झाले.

- **श्री. बापूराव गोडबोले,** सांगली

जगन्नियामक परमेश्वराच्या कृपेने वंदनीय बापूरावजींच्याकडून सामान्य संसारी लोकांच्या मनोमंदिरात तीन तपांहून अधिक काळ सतत कीर्तनसेवेने जो ज्ञानदीप प्रज्वलित केला गेला, त्याचे द्योतक म्हणूनच की काय त्यांचे हातूनच श्रीक्षेत्र नृसिंहवाडीच्या श्रीदत्तमंदिरातील विद्युद्दीपांचे प्रकाशन घडले, असे माझ्या श्रद्धाळू मनाला वाटते. अध्यात्मात अंतर्मुख होऊन रंगलेले वंदनीय बापूरावजींच्यासारखे अधिकारी दुर्मिळच आहेत.

- **श्री. क. श्री. कुलकर्णी,** इचलकरंजी (ज्ञानेश्वरी प्रवचनकार)

एकदा माझा व ह्यांचा वाद झाला. माझे खरे होते तरी ते ऐकून घेईनात. मला फार वाईट वाटले. मी मामांना मनात म्हटले की धड संसारही नाही व परमार्थही नाही. तशीच मी नामस्मरणाला बसले. १०-१५ मिनिटांत मामांचे दर्शन झाले व मनाला समाधान झाले.

- **सौ. कुसुमताई सोमण,** पापडी

मी नित्य मामांच्या कीर्तनास जात असे. एकदा माझ्या मनात आले की,

संत हे देव आहेत. मामा संत आहेत म्हणजे देव आहेत. देवाच्या मागे तेजोवलय असते. तेव्हा मामांच्याही ठिकाणी हे तेजोवलय दिसावे, असे माझ्या मनात आले. एकदा असा प्रकार झाला; प. पू. मामा तक्क्यास टेकून खोलीत बसले होते. मी खोलीत गेले. मामांच्या मागे तेजोवलय दिसले. ते पहाताच मी चकित व आनंदित झाले. थोड्या वेळाने ते तेजोवलय हळूहळू मामांच्याच ठिकाणी लय पावले.

**- कु. शरयू उपळावीकर,** सांगली

सन १९५१ मध्ये आमचे मालक विनायकराव दोषिक तापाने आजारी पडले. त्यातच मॅनेंजिटिस झाला. मानेला सूज आली. डोळे सुजले. अशा स्थितीतच 'मला मामांना भेटवा' असे हे वरचेवर म्हणत. मामा आले. ''विनायकराव घाबरू नका.'' मामा बोलले. मग मामा मला म्हणाले, ''निर्मलाबाई, तुकोबारायांचे १२ अभंग १३ वेळां म्हणत जा सर्व काही ठीक होईल.'' १२ अभंग १३ वेळां म्हणण्यास मी सुरवात केली. दोनच दिवसांत आमचे मालकांना उतार पडला. ७ दिवसात ते अंथरुणावर उठून बसू लागले. महिन्यात हिंडायला लागले. मामांचे दर्शनाला गेले. मामा म्हणाले, ''विनायकराव, आता जाण्याची घाई करू नका. जेवण करून सावकाश जा.'' त्या दिवशी मामांचे घरी जेवले आणि त्यांनी १ तासभर कीर्तनही केले. मामांच्या अगाध सामर्थ्याचे मी काय वर्णन करू शकणार?

**- सौ. निर्मलाबाई कानिटकर,** सांगली.

सद्‌गुरु बापूरावजींचे चरणी । साष्टांग नमन त्यांचे चरणी ।।

आता सद्‌गुरु बापूरावजी आपल्यात नसले तरी विश्वरूपाने अढळ पदावर बसले आहेत. बापूरावजी नामधारक होते, म्हणूनच त्यांनी नामाने परमेश्वराला हृदयी धरून ठेवले. बापूरावजी सुखदु:खाच्या पलीकडे गेलेले होते. ते अंतरी निर्मळ व साधे होते. एकदा मी सांगलीला आलो. मला कैवल्यधामात जायचे होते. मामांनी-बापूरावजीनी-मला माझा हात धरून सांगली स्टेशनपासून



कैवल्यधामापर्यंत पोचविले. हे काहीच नव्हे. एकदा दोनदा तर मला भयंकर संकटांतून बापूरावजींनी वाचविले.

देव व सद्‌गुरु एक मानून जर आपण गोविंदचरणी लीन झालो, तर बापूरावजी निश्चित मोक्ष देतील. जगात आपण कुठेही गेलो तरी बापूरावजी पाठीशी उभे आहेत, ही पक्की खूणगाठ असावी. कारण ते सोहंस्वरूपी आहेत.

**श्री. म. रा. बेळगली,** चिमड

गुरुदेव प. पू. श्री. बापूरावजी हे साक्षात्कारी संत होऊन गेले. स्थितप्रज्ञाप्रमाणे सर्व गुण पूर्णांशाने त्यांचे ठिकाणी होते.

मामांच्या आजारपणातील गोष्ट, दुसऱ्याचा आधार घेऊन मामा समाधीचे दर्शन घेऊन येत. दोन नंबर शाळेजवळ मी त्यांना एकदा पाहिले. सायकलवरून उतरून, नमस्कार करून 'तब्येत कशी काय?' असे विचारले. ते म्हणाले, ''आनंद आहे. तब्येत चांगली आहे!'' खरे म्हणजे त्या वेळी त्यांची तब्येत बिलकूल बरी नव्हती. पण तक्रार करण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. ''समाधीचे दर्शन व रोजचे कीर्तन झाले म्हणजे तब्येत छान! आनंदी आनंद'' असे ते म्हणत.

**- श्री. ज. बा. देवधर,** सांगली

श्रीशंकर आपल्या घरी जेवणास यावेत, असे १२ वर्षे मला वाटत होते. तशी तळमळ लागली. पुढे मी सांगलीस आले व ह. भ. प. मामांचे कीर्तनास जाऊ लागले. ६ महिन्यांनी एक स्वप्न पडले : मामा आमचे घरी आले. माझ्या शेजारी एक बाई होती, तिने त्यांना बसण्यास पाट दिला व पुढे ताट ठेवून भाकरी वाढली व दूध वाढावयास लागली तेव्हा मी तिला सांगितले, ''साय पडू दे. ते संत आहेत.'' आणि मी जागी झाले. वेणुताई फडकेबाईंना मी हे स्वप्न सांगितले, ''तुझ्या मनात मामांना जेवावयास बोलवायचे आहे काय'' त्यांनी विचारले. मी होय म्हटले. त्याप्रमाणे आम्ही मामांना जेवण्यास बोलावले. मामा आमचेकडे येऊन जेऊन गेले. तेव्हापासून मनाची तळमळ शांत झाली.

**- श्रीमती अंबुताई लिमये**

पालघरच्या श्रीमंत माईसाहेब दांडेकर यांच्याकडे मामा येत. त्यावेळी मी माईसाहेबांच्या वाड्यात रहात होतो. मी त्यावेळी टी. डी. च्या शिक्षणक्रमासाठी मुंबईला रुइया कॉलेजमध्ये जात असे. त्यावेळी माझी परिस्थिती फार अडचणीची होती. शाळेची बिनपगारी रजा व घरी मंडळींची प्रकृती बिघडलेली. जुलाब, आमांश, हातपाय गार पडणे, इत्यादि तक्रारी होत्या. त्यातच त्यांना दिवस गेलेले होते. प्रपंचाची तोंडमिळवणी कशी करावी ही विवंचना होती. मामांना सर्व परिस्थिती विदितच होती. मी त्यांना एकदोनदा आमचे घरी नेले. त्यांचा एकच मंगल आशीर्वाद असे 'सर्व काही व्यवस्थित होईल.' माझे शिक्षणाचे वर्ष व्यवस्थित पार पडले. आमच्या मंडळींची प्रकृति रोगजर्जर असूनही व्यवस्थित प्रसूति झाली व मला मुलगा झाला.मामांचा आशीर्वाद खरोखर फलद्रूप झाला. श्रीज्ञानेश्वर पाठिराखा- सद्‌गुरुसारिखा असता पाठिराखा । इतरांची लेखा कोणकरी ।। हेच खरे.

**- श्री. गो. के. सप्तर्षि,** पालघर

१९५६-५७ चा काल. मी नुकताच एस. एस. सी. परीक्षा उत्तीर्ण झालो होतो. पुढे काय करावयाचे याचा विचार चालू होता. परंतु दरम्यान् नवज्वराने गाठले. आजारी पडल्यावर ती. प. पू. दादा आमचे घरी अगदी नित्य नियमाने येत. जरा वेळ बसून प्रसाद व अंगारा देऊन जात. पुढे ती. प. पू. दादांना मुंबईस जावे लागले. माझ्या मनांत विचार आला. आता माझेकडे कोण येणार? मला प्रसाद कोण देणार? व मला लवकर बरे कसे होता येणार? पण ती. प. पू. मामांनी हे जणू जाणलेच व ते ती. प. पू. दादा मुंबईस गेल्यावर माझेकडे नेहमी प्रतिदिनी येऊ लागले. रोज नित्याची सकाळची आरती झाली की ती. प. पू. मामा माझे घरी येत. थोडा वेळ बसून कांही गोष्टी सांगत व अंगारा आणि प्रसाद देत. असा नेम सुमारे १५ दिवसतरी चालू होता. लवकरच मी आजारातून बरा झालो. ती. प. पू. मामांसारख्या थोर संतांनी माझेकडे नित्यनियमाने यावे याचे मला फार विशेष वाटे. त्यांचे मागे किती नित्यनैमित्तिक कार्यक्रम होते हे सर्वांना



माहीत आहेच. अशा थोर महात्म्यांनी माझेवर कृपा करून मला आशीर्वाद दिला. यातच मी स्वत:ला धन्य म्हणवितो. त्यांनी अशीच कृपादृष्टि ठेवून आपल्या स्वरूपात मला एकरूप करून घ्यावे अशी त्यांचे चरणी प्रार्थना!

**- बाळू**

आमच्या वाड्यात राहणारा माझा मित्र श्री. बाळू गोखले प. पू. मामांच्या कीर्तनास जाई. पण मला ती बुद्धि होत नव्हती. एकदा मी व बाळू आळंदीला गेलो. तेथे बाळूने मला श्रीमामा व ज्ञानेश्वरमहाराज यांचा संबंध सांगितला तो असा- मामा ज्ञानेश्वरांचे दर्शन घेऊन येत असता, त्यांची मिलिटरीत भरती करण्याचा प्रयत्न झाला. त्यावेळी अचानक एक टांगेवाला तेथे आला व त्याने मामांना लो. टिळकांच्या घरी पुण्याला पोचविले. आपली अनेक संकटे टाळण्यास मामांचा उपयोग होईल, या भावनेने प्रेरित होऊन, सांगलीस आल्यावर मी मामांचे घरी रोज जाऊ लागलो.

मामांचे घरी अनेक उत्सव व समारंभ होत. पण इतर समारंभापेक्षा यांत काहीतरी जास्त महत्त्वाचे आहे, एवढा मात्र मला अनुभव आला.

माझा स्वत:चा भविष्य सांगण्याचा छंद. भविष्य बरोबर येते, असे मला वाटण्यास लावण्याचा अट्टाहास मामांनीच केला. मला जर कोणी विचारले व त्यात मला जर अडचण आली तर मी मामांच्या फोटोकडे बघून मगच काय तो उपाय सांगतो व ते खरे ठरल्याचा आनंद मिळतो.

माझ्यावर आलेल्या दुखण्याच्या आपत्तीस तोंड देतानासुद्‌धा, व ते बरे होण्यास ती. मामांची आठवणच कारणीभूत झाली.

**- श्री. किसनराव भिडे,** सांगली

ती. प. पू. मामांच्या वाड्यात माझी मावशी करमरकर रहात होती. तिच्याकडे मी मुंबईहून रहाण्यास आले होते. त्या वेळी श्रीसाईबाबांची पोथी वाचत असे. एकदा मनात आले की साईबाबांची पोथी वाचावयास लागण्यापूर्वी मामांचे दर्शन झाले असते तर किती बरे झाले असते. त्या दिवशी मामांच्या कीर्तनात

गुरु कसे असतात, संतांत श्रेष्ठ कनिष्ठ मानण्याचे कारण नाही, इत्यादि विषय आला व साईबाबांची गोष्ट आली. त्यावरून सर्व संत एकच कसे असतात व ते शंकानिरसन कसे करतात, हे कळून आले. आणि साईबाबांनीच मामांचेकडे पाठविले हे कळून आले.

दरवर्षीप्रमाणे आम्ही उत्सवाला आलो असता सौ. मामी मला म्हणाल्या, ''तुझ्या यशवंतच्या मुंजीला मुंबईला येण्यास कसे जमणार? आम्ही आता थकलो.'' तेव्हा प. पू. मामा स्मितपूर्वक म्हणाले, ''त्यात काय आहे? त्यांनाच आपण मुंजीला इकडे बोलवू व इकडेच यशवंतची मुंज करू.'' १९६५ ला आमची सांगलीला बदली झाली व त्याच वर्षी मामांच्याच घरी व श्रीराम रायांच्या आशीर्वादाखाली चि. प्रभूबरोबरच चि. यशवंतचीही मुंज झाली.

**- सौ. सु. के. आपटे,** सांगली

ती. प. पू. मामांच्या कीर्तनाच्या ३६ व्या वाढदिवसाच्या उत्सवात मी पुण्याहून मामांचेकडे आले होते. माझ्याजवळच्या शैल्य लिंगाला बेल वाहिल्याशिवाय जेवायचे नाही असा माझा नेम होता. मामांच्या घरचे देवांतच हे लिंग मी ठेवले होते. एक दिवस मी बेल घालावयास गेले तो काय लिंग ठेवण्याचा तांब्याचा नाग होता, पण लिंग नव्हते. सगळीकडे शोधूनही लिंग मिळाले नाही. हे मामांना सांगितल्यावर, ते म्हणाले, 'आई, तुम्ही काही काळजी करू नका. संध्याकाळपर्यंत लिंग मिळेल.' आणि संध्याकाळी ५ वाजता नागावर लिंग असलेले आढळून आले.

**- श्रीमती लक्ष्मीबाई आपटे,** पुणे

प. पू. मामांनी देह ठेवण्यापूर्वीची गोष्ट. मी नित्याप्रमाणे दर्शनास गेलो होतो. तेथे एक मुलगी मामांच्या कीर्तनाची टाचणे लिहीत बसली होती. तिला ते मामा सांगताना मी ऐकले, ''आता सोमवारपासूनची टाचणे राम सांगेल.'' आणि खरोखर सोमवारीच मामांनी महाप्रयाण केले. मामांना आपले प्रयाण अगोदरच कळले होते, ते काय निराळे सांगावयास हवे?



प. पू. मामांनी सोमवारी देह ठेवला. त्या दिवसाची गोष्ट. मी संध्याकाळी त्यांचे दर्शनास गेलो होतो. जमलेल्या मंडळींनी रामनामघोष चालविला होता. पण ते नाम मामा घेत त्यापेक्षा वेगळे होते. तो घोष ५-७ मिनिटे चालू राहिला. मग तो चमत्कार घडला. एकाएकी प. पू. मामांच्या मुखातून चक्क खणखणीत वाणी निघाली ''श्रीराम जयराम जय जय राम'' म्हणा. झाले सर्व मंडळी चकीत झाली. 'श्रीराम जयराम जय जय राम' हा घोष सुरू झाला.

**- धुं. ल. जोशी,** सांगली

न सोडी कधी कीर्तनाच्या व्रताला जनां सोनिया सारिखा बोध केला ।
प्रपंच ज्याचा परमार्थ झाला समाधी हि त्याची सुखवी मनाला ।।(स्वकृत)

शिरी जरतारी रुमाल, अंगी बंद गळ्याचा डगला, कटीस नेसूचे काचा कसलेले धोतर, गोरवर्णी, धष्टपुष्ट देहयष्टी, कपाळी गंध, नि डोळ्यांत शिवैक्याचे तरल तेज! अशी एक प्रतिमा माझ्या मनावर अर्धशतकापूर्वी उमटली. तिची एकहि रेखा अद्याप अस्पष्ट झालेली नाही, पुढेहि होणारी नाही. पार्थिव चित्रांचा रंग कालेकरून फिका होईल, पण मनश्चित्रे अक्षय्यच असतात! हेच होत ते कीर्तन तपस्वी, लोकवंदित सन्त श्रीमामाराव केळकर.

माझी पहिली आठवण जरा चमत्कारिक आहे. ख्रिस्ताब्द १९२९ असावे. जागे अभावी, भिडे वाड्यात भरणाऱ्या सिटी हायस्कूलमधील इंग्रजी ३ रीत मी होतो. त्यावेळी वेळापत्रकात 'मॉरल' नामे तास असे, हा सांप्रत नवनवल कर्णोत्सवच ठरेल! त्या विषयाचे शिक्षक केळकर... ते तासाला पाणी प्यायला सोडत नसत, याचा मला राग यायचा. बालमनास वाटे, हे नीती शिकवितात, नि साधी तृष्णाशमनाची दया दाखवीत नाहीत! पुढे प्रौढपणी उमजले की, त्यामागे निखळ शिस्तप्रेम होते. कीर्तनास जाऊ लागल्यानंतर तर, ह्या रागाचे प्रेमादरात केव्हा रुपांतर झाले, हे माझे मलाच कळले नाही. त्यांचाहि मजवर कृपालोभ होता. गेल्या दहा वर्षात त्यांनी मला अनेकदा स्वप्नात दर्शन दिलेले आहे.

कीर्तनकारांच्या अनेक परी अहेत. 'वरून कीर्तन आतून तमाशा' धर्तीचे

काही, कांहीच्या कीर्तनात गायन हे वक्तव्यास खाऊन टाकते; तर कांहीच्या कीर्तनात नि वर्तनात सुसंगति नसते, ते सत्त्वाचे कर्तन नि लोभाचे नर्तन असते! मामांच्या लेखी कीर्तन धंदा नसून धर्म होता. ह्या निष्ठेमुळे, भगवंती अंतराय घडावयास नको म्हणून त्यांनी चाकरीवर लाथ मारली होती. साथीचे अवडंबर ना कोठे विज्ञापन नाही, श्रोतेहि मोजके, अशा शांत वातावरणात त्यांनी कीर्तनाचा कालनियत ठेका चालूच ठेवला. ''मामा हे प्रेमळ नाते आहे. संसारातच रमणाऱ्यांना हे जणूं म्हणत 'मा, मा' (नको नको!). महाराष्ट्रात ३ मामा प्रसिद्ध. कर्मवीर शिंद्यांच्या शब्दात, श्रीदांडेकर, देशपांडे हे 'मेघवृष्टि' पद्धतीने काम करणारे, तर गु. केळकर 'सुवर्णकार-पद्धतीने'. वावग्या गोष्टी नाहीत.

कीर्तनाच्या शेवटी ते चुरमुरे प्रसाद म्हणून देत. त्याचा आशय त्यांनीच एकदा सांगितला होता- 'भक्तीत चूर व्हा? मुर!' हा अमृत संदेश मी यथाशक्ति जपत-जगत आलो आहे. गुरुवर्यांना विनम्र प्रणाम!

**भा. ल. रानडे,** सांगली.

***



## संदर्भ-सूची

१) अखंड कीर्तनानंद, प्रकाश भावे, सांगली, १९८८
२) अमृतवाणी, प्र. रा. गो. केळकर, सांगली, १९८१
३) केळकर कुल वृत्तांत - सं. सी. वि. केळकर व म. न. केळकर, पुणे,१९५२
४) गणपतराव कानिटकर, लेखन वही
५) गुरुतृतीया कथा, प्रा.के.वा.आपटे
६) गीतादर्शन मासिक
७) गोविंदचरितमानस, न. दा. दिवेकर, सांगली, द्वितीय आवृत्ति, २००५
८) गोविंददर्शन, रा. गो. केळकर, सांगली, १९८८
९) श्री. गोविंद स्मृति, संकलक-किसन य. भिडे, सांगली १९७२
१०) जीवनविकास, ऑक्टोबर १९८१
११) दीपलक्ष्मी मामामहाराज केळकर विशेषांक, मुंबई, १९७२
१२) नारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र, प्रा.डॉ. के. वा. आपटे,सांगली,२०१०
१३) पहिला दीप, सं. भा. लिमये, मिरज, संवत् २०१६
१४) माईसाहेब यरगट्टीकर यांचे चरित्र, प्रा. डॉ. के. वा. आपटे, सांगली, २०११
१४) मामांचे चरित्र हस्तलिखित, गणपतराव कानिटकर, १९३८
१६) मामामहाराज केळकर, प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी, पुणे, १९८३
१७) रामपाठ, प्र. रा. गो. केळकर, सांगली १९३७
१८) वाङ्मय शोभा, श्रावणमास विशेषांक, श्रीज्ञानेश्वर माऊली विशेषांक, १९८४
१९) श्रीदासराममहाराज चरितामृत, के. वा. आपटे, सांगली २००३
२०) संतकृपा, जून १९७८
२१) हणमंतरावजी कोटणीस यांचे चरित्र, साधुदास, सांगली, १९३७
२२) हनुमद्गुरुचरित्रबोधसार, गो. अ. केळकर, सांगली, १९३७

***

## संक्षेप

| | |
|---|---|
| अकी | अखंड कीर्तनानंद |
| गोस्मृ | गोविंद स्मृति |
| गोचमा | गोविंदचरितमानस |
| गोद | गोविंद दर्शन |
| दा.वि. | दा.वि.कुलकर्णी,मामामहाराज केळकर |
| वही | दादांची वही,९०,१२९ |

***



।। श्रीराम ।।

*

# श्रीमामांच्यावरील काव्यसंपदा

***

## (१)

# गोविंद दर्शन

रामकृष्ण हरी गोविंद । तेचि मूर्तिमंत गोविंद ।
हाचि मनी माझ्या आनंद । जन्मापासूनी ।।१।।
माझा योगचि अपूर्व । म्हणोनि तुम्ही पितृदेव ।
येता घेवोनि आलो ठेव । अध्यात्माचि ।।२।।
हनुमंतप्रभुच्या दारासी । रामबाळ आनंदेशी ।
मौक्तिकाचा चुरा हाताशी । जाताचि आला ।।३।।
माता इंदिरा भाग्यवंत । पतिव्रता निष्ठावंत ।
तिजला अनुग्रह प्राप्त । हनुमत्प्रभूचा ।।४।।
शिरी आला सद्‌गुरुहस्त । बाल राम असे गर्भात ।
तो निजगर्भ अनाहत । कानी पडला ।।५।।
मम मातेचे मामा । असती कुरुंदवाड ग्रामा ।
तेथ परमार्थाचि पौर्णिमा । उजळली ।।६।।
माझे जन्माचे पूर्वी । बहीण गेली पुण्य पर्वी ।
जिचे पायी आघवी । संपत्ति होती ।।७।।
मम माता करी रुदन । तिला दुःख झाले दारुण ।
समाचारे समाधान । होईना तिचे ।।८।।
महादेव मामावरी । मळणगांवकर कृपा करी ।
गाठी बांधोनि शिदोरी । औरवाडासी पातले ।।९।।
वजीरबाबा महानुभाव । तेथे राहती सदैव ।
धरोनिया सद्‌भाव । चरणा नमिले ।।१०।।
सांगती आपुली व्यथा । इंदिरा मातेचि कथा ।
प्रसन्नता चित्ता । बाबांच्या आली ।।११।।
तेधवा बाबांनी खारीक । मामांच्या हाती दिली बारीक ।
म्हणती हा प्रसाद एक । मातेसी द्यावा ।।१२।।

भक्षण करता येईल फळ । सांगतो हे प्रांजळ ।
पोटी पुत्र लडिवाळ । असे माऊलीच्या ।।१३।।
तो विष्णुभक्त होईल । हर्ष शोक जाईल ।
कधी न पस्तावेल । आयुवरी ।।१४।।
माझे मामा सद्गद । झाला बहु आमोद ।
पावेनिया स्वानंद । खारीक दिली ।।१५।।
पुढे जन्मला दासराम । हनुमत् सद्गुरुकृपा परम ।
श्रीगुरुलिंगजंगम । वोळले स्वये ।।१६।।
अंताजीपंत आजोबा । त्यांनी आळविले शिवसांबा ।
कुरुंदवाडी पातले ते शोभा । दुणावली ।।१७।।
श्रीमंत अण्णासाहेब कुरुंदवाडकर । गणेशोत्सव करिती सुंदर ।
हनुमत् सद्गुरु पातले सत्वर । हरिकीर्तना ।।१८।।
होती शके १८४२ गणेश चतुर्थी । आनंदले मंगलमूर्ती ।
सर्वांचिया चित्ती । समाधान ।।१९।।
हनुमत्सद्गुरू कीर्तन । तेथे प्रगटले गजानन ।
मनी इच्छिले ते पूर्ण । झाले असे ।।२०।।
श्रीमंतांनी धरिले मनी । तेचि दाविले करोनि ।
श्रीमंत लागले चरणी । हनुमंतांच्या ।।२१।।
तो अंताजीपंत आले । धरिली हनुमंत पाउले ।
आणि सद्गद विचारिले । विनम्र भावे ।।२२।।
आपली कृपा परिपूर्ण । नातू लाभला आम्हालागून ।
तया द्यावे आशीर्वचन । करूनि कृपा ।।२३।।
हनुमत्प्रभु आले घरी । प्रकाश उजळला भीतरी ।
तया भाग्याची सरी । वर्णवेना ।।२४।।
तयांचे हसरे डोळे । ज्यांनी ज्यांनी पाहिले ।
त्यांचे अंतरी ठसावले । ब्रह्मतेज ।।२५।।
होवोनिया सस्मित वदन । बालका मांडीवरी घेऊन ।
मस्तकी हस्त ठेवून । दृष्टीसी दृष्टी दिधलीसे ।।२६।।



प्रेमे बालका कुरवाळून । म्हणती हा बालपणापासून ।
करू लागेल हरीकीर्तन । वेदान्त सांगेल ।।२७।।
जे असे माझे अंतरी । ही प्रभु रामाची कृपा खरी ।
उमटली बाळाचे अंतरी । काय सांगो ।।२८।।
म्हणोनि या बालकाचे नाम । अंताजीपंत ठेवा राम ।
ऐसे बोलून सप्रेम । सांगितले ।।२९।।
झाला असे भक्तिसोहळा । गुरुपूजेचा थाट केला ।
अद्भुत ही लीला । नारायण प्रभूचि ।।३०।।
तेथोनिच फिरले सूत्र । हनुमंत सद्गुरु झाले स्वतंत्र ।
मग तेथे परतंत्र । राहिले कोठे ।।३१।।
भरलेली रुपयांची परात । रामप्रभू हनुमंताप्रत ।
देवोनि स्वप्नी म्हणती खैरात । करी परमार्थाचि ।।३२।।
राम ते श्रीराम समर्थ । हनुमंत साक्षात् हनुमंत ।
म्हणोनि वाढला परमार्थ । सांगलीसी ।।३३।।
शके अठराशे चव्वेचाळीस । माघ वद्य तृतीयेस ।
पाहोनी शुभ रविवारास । पर्वणी घडली ।।३४।।
गोविंद पितयांचे मनीचे जाणोन । हनुमंतजी आले धावून ।
नानबा पुंडलीक शामराव घेवूनि । बरोबरी ।।३५।।
परमानंद उसळला । भोजनाचा थाट केला ।
जो घडला सोहळा । अनुपम ।।३६।।
हात जोडोनि अंताजीपंत । गहिवरोन अकस्मात् ।
म्हणती प्रसन्नचित्त । श्लोक ऐका ।।३७।।
जनी रामसेवा मनी रामसेवा ।
तया रामनामी जयाला विसावा ।
हनुमंत हे नाम साजे जयाला ।
नमस्कार साष्टांग माझा तयाला ।।
मागुती जोडोनिया कर । होवोनिया विनम्र ।
गोविंदजी म्हणती सादर । सुश्लोक हा ।।३८।।

सदा सर्वदा योग तुझा घडावा ।
तुझे कारणी देह माझा पडावा ।
उपेक्षू नको गुणवंता अनंता ।
रघुनायका मागणे हेचि आता ।।
हनुमत्सुगुरु जगन्नायक । तेचि निके सद्गुरुनायक ।
प्रेमे ऐकिली भाक । प्रेमळाचि ।।३९।।
प्रसन्न होवोनि सद्गुरुवर । श्लोकेचि दिले प्रत्युत्तर ।
तो श्लोक हृदयांतर । व्यापिलासे गोविंदी ।।४०।।
बुडो ही धरा की लया विश्व जावो ।
पडो काळ हस्ते शिरी वज्रघावो ।
विसंबू नको सर्वथा नाममाळा ।
मुखी रामचंद्र स्मरा वेळोवेळा ।।
भोजन थाट झालियावरी । सद्गुरूंचि पाऊले शिरी ।
वंदिली सर्वानी परोपरी । सहर्षेचि ।।४१।।
रामजी बाजूसी उभा राहून । प्रेमे पाहतसे न्याहाळून ।
आनंद मावेना पूर्ण । बोलता नये ।।४२।।
दंगा करू नको कांही । ऐसे सांगते तया आई ।
हे साचले हृदयी । दासरामाच्या ।।४३।।
आईने विरजले दही । काय सांगावी नवलाई ।
संतोषली सद्गुरुमाई । हनुमंत ।।४४।।
दासरामे नमस्कारिता । कर ठेविला त्याचे माथा ।
ऐसी ही अद्भुत सत्ता । हनुमंताची ।।४५।।
हनुमंत सद्गुरू घरी चालले । जाता जाता सहजे पुसिले ।
शाळा सुटते कोणे वेळे । तेवढे सांगा ।।४६।।
गोविंद म्हणती पांचास । सद्गुरु सांगती सोल्हास ।
पाचाची वेळ तुम्हास । चांगली बहु ।।४७।।
सद्गुरु संतजन निघाले । सर्वांचे डोळे पाणावले ।
न परतती पाऊले । कोणाचीही ।।४८।।



घरी जाऊनी कौतुक केले । हनुमंतप्रभूंनी भले ।
तो सकळासी वाटले । कांही तरी बोलती ।।४९।।
दही विरजोनी आणणेस । हनुमंत सांगती अंताजीपंतास ।
घेवोनी जाता विशेष । घडले असे ।।५०।।
लोक चेष्टा करीत । अंताजीपंत निवांत ।
सांगताती हनुमंत । त्यांचे पंगती ।।५१।।
घाला दही भातावरी । ऐकोनि सत्वरी ।
दही वाढले भातावरी । अंताजींनी ।।५२।।
लोक झाले चकित । आले केळकरांच्या घरात ।
इंदिरा मातेसी पुसत । दही कैसे विरजले ।।५३।।
प्रेमापोटी असती बोलले । इंदिरामातेने सांगितले ।
दही प्रेमे विरजले । दुसरे काय ।।५४।।
येवढेसे दही खादले । आणि अद्वैतसाम्राज्य दिधले ।
ऐसे कोठे घडले । आजवरी ।।५५।।
सुदाम्याची आठवण । होत येथे मजलागून ।
मूठभरी पोहे खाऊन । कृष्णनाथ तोषला ।।५६।।
तया सुदाम्यालागून । श्रीकृष्णे आनंदून ।
दिले राजवैभव जाण । सुदामनगरी ।।५७।।
तेथे दिली राज्याची सनद । येथे दिली कीर्तनाची सनद ।
पांडुरंगमहाराज सद्गद । वर्णिताती ।।५८।।
शके अठराशे पंचेचाळीस । पौष वद्य षष्ठीस ।
सायंकाळी पाचास । स्वानंदनिवासी हनुमंत ।।५९।।
स्वानंदसुखनिवासी । झाले हनुमंत पूर्णत्वेसी ।
दीप प्रज्वळिला दीपेसी । दीपाकार ।।६०।।
शके अठराशे पंचेचाळीस । माघ वद्य तृतीया पर्वास ।
शुक्रवारी मध्यरात्रीस । हनुमत्सद्गुरु प्रगटले ।।६१।।
गोविंदजी दासबोध । वाचीत होते सानंद ।
तो घडले अगाध । गुरुकृपे ।।६२।।

नित्यकीर्तनाची आज्ञा दिधली । कृपाहस्त ठेवोनी भाळी ।
ते तंतोतंत पाळिली । गोविंदजींनी ।।६३।।
स्वरूपाकार होईपर्यंत । कीर्तन चालले अविरत ।
त्रिकाळ साधनासहित । नित्यनेमे ।।६४।।
कीर्तनासाठी कीर्तन । देवासाठी निमग्न ।
ऐसे बोलती आपण । गुरुदेव रानडे ।।६५।।
दादासाहेब चंदुरकर । सांगती मज वारंवार ।
गुरुदेवे सांगितले साचार । हजार वेळा ।।६६।।
याचे वाटते महत्त्व । हे तो नसे कवित्व ।
म्हणोनि हे जाणीव । सर्वकाळ अंतरी ।।६७।।
रामभाऊ सहस्त्रबुद्धे यांनी । परिसली चंदूरकरांची वाणी ।
तो तयालागुनी । वाटले अपूर्व ।।६८।।
पिताजी प्रसिद्धिपराङमुख । मौनेचि असती सम्यक ।
प्रश्ना उत्तर देती चोख । थोडक्यात ।।६९।।
स्वये कांही न बोलती । कोणी विचारल्या सांगती ।
साधन साधती । रात्रंदिवस ।।७०।।
पडवीसमोर दगडावर । वस्त्र न घेता पाठीवर ।
साधना बैसती रात्ररात्र । हे सकळांनी पाहिले ।।७१।।
तगारे विष्णु काशिनाथ । यांना श्रीहनुमंत सांगत ।
गोविंदजी सदोदित । साधन करिती ।।७२।।
याची खात्री होण्या साचार । तगारे येती वारंवार ।
चकित होवोनि सत्वर । गोविंदजींना वंदिती ।।७३।।
दीपलक्ष्मी विशेषांकांत । ऐसा हा वृत्तांत ।
डॉक्टर तगारे देत । आनंदेसी ।।७४।।
हनुमत्कृपेकरून । माझे बालपणापासून ।
चालिले जे साधन । ते न्यून की खरे ।।७५।।
म्हणोनिया एकवेळ । पिताजींना आदरे पुसिले ।
तव ते म्हणाले । प्रेमभरे ।।७६।।



आपण दोघे जावून । विचारू बाबूरावजीलागून ।
ते गुरुपुत्र महान । म्हणोनी ।।७७।।
बाबूरावजींना विचारिले । बैसोनिया दाखविले ।
तव ते म्हणाले । ऐसेचि चालू दे ।।७८।।
म्हणोनि तात्या दादा मामा । तयांचा दासरामा प्रेमा ।
नारायणे महिमा । दाविला असे ।।७९।।
मामांचे नित्यकीर्तन । बालपणापासून ।
साथ करीतसे धणी । दासराम ।।८०।।
पिताजी मामा ब्रह्मरूप । नित्य दिसती निर्विकल्प ।
त्यांना जे पाहती सविकल्प । निर्विकल्प होताती ।।८१।।
माझा जन्म झालियावर । मामांची प्रतिज्ञा भयंकर ।
भीष्मप्रतिज्ञा उग्र । तयांची वाटे ।।८२।।
त्यांनी स्वीकारले वानप्रस्थ । आणि नाही वाढविले प्रस्थ ।
आपण राहिले स्वस्थ । काय बोलो ।।८३।।
माझी नोकरी झाली थोडी । परी न गेलो देशोधडी ।
माझी सदाचि उडी । मामांच्या कीर्तनी ।।८४।।
अंताजीपंतांनी साथ दिली । त्रयोदश वर्षे भली ।
आणि शिवस्वरूप झाली । त्यांची काया ।।८५।।
श्रीलक्ष्मण दिक्षीत । अंताजीपंतांना पार्थिव देत ।
ती पार्थिवपूजा शेवटपर्यंत । चालविली तयांनी ।।८६।।
राम करी कीर्तन । आणि साथही करी प्रेमे भरून ।
गुरुलिंगजंगमे बोधवचन । प्रगटोनि दिधलेसे ।।८७।।
इंदिरा गोविंद दोघे भले । मातापिता मज लाभले ।
अनेक संताचे दर्शन घडले । म्हणोनिया ।।८८।।
भाग्ये आलो तुमचे पोटा । झालो ब्रह्मांडाहूनि मोठा ।
ऐसे वचन संतांचे सुभटा । आठविले ।।८९।।
येणाजाणाराचे अगत्य । मामा करिती सदोदित ।
विनम्र भावे मस्तक नत । सर्वांपुढे ।।९०।।

तया विनम्रपणाचे नाटक । करता न ये निश्चित देख ।
ते वेगळेपण अलौकिक । मज वाटे ।।९१।।
ना द्वेष ना मत्सर । कधी न कोणाचा तिरस्कार ।
स्वप्नीही कोणावर । न रागावती ।।९२।।
हे कडू हे आंबट । गोड हे तिखट ।
भोजनात किती मीठ । ऐसे न वदती ।।९३।।
आज स्वयंपाक रुचकर झाला । आज उशीर का केला ।
कधी न बोलती बोला । चुकोनिया ।।९४।।
स्वरूपाकार झालियावरी । दिसती ज्यांना साक्षात्कारी ।
हरिकीर्तन गजरी । रंगलेले ।।९५।।
ब्रह्मदेव आला येथ । म्हणे जाऊ सत्यलोकाप्रत ।
त्यांना मामा सांगत । होऊ दे कीर्तन ।।९६।।
ऐसी ही कीर्तननिष्ठा । नाही प्राणाची प्रतिष्ठा ।
अद्वय मार्ग चोखटा । दाविला जगा ।।९७।।
गोविंद गोविंद । मना लागो हाची छंद ।
आवडे सुखद । तुकोबांचा अभंग ।।९८।।
निंबरगी गुरुलिंगजंगम । हनुमंत मामा परम ।
तयांचे पदी दासराम । असो दे सदा ।।९९।।
"इये शरीराची माती । मेळवीन तिये क्षिती ।
जेथे चरण गती श्रीगुरूचे" । ऐसी श्रीज्ञानेश्वर माउली ।
ज्ञानेश्वरीये बोलिली । ती ओवी यथार्थ केली ।
श्रीमामांनी ।।१००।।
हनुमत्समाधि मंदिर । कृष्णाकाठी सुंदर ।
तयामागे औदुंबर । वृक्ष असे ।।१०१।।
तेथ श्रीमामांच्या अस्थि । अंतरी धरोनि भक्ती ।
गंगाधरराव प्रतिष्ठिती । औदुंबरापारी ।।१०२।।
तो वृक्ष देखता मनोहर । चित्त चाकाटे चतुर ।
मामा दिसती निरंतर । मज तेथे ।।१०३।।



श्रीमामांची अमृतवाणी । जे आली माझे श्रवणी ।
देहभान हरपोनि । गेले तेथ ।।१०४।।
मी तो केव्हाचि गेलो असे । मामांचे कीर्तन चालले असे ।
माझे अस्तित्वचि नसे । ऐसे गूज ।।१०५।।
अमृतवाणी ग्रंथ । झाला प्रसिद्ध जगात ।
तयाची स्थळ प्रत । श्रीधर करी ।।१०६।।
तयाते अभंग सांगता । मामा आहेत हे चित्ता ।
त्या संगतीची अपूर्वता । शब्दी न ये ।।१०७।।
गोविंद गोविंद गोविंद । सदा गर्जतो स्वांनद ।
आणि वंदितो पदारविंद । श्रीमामांचे ।।१०८।।

**– श्रीदासराममहाराज केळकर**

***

## (२)
## गोविंद-कीर्तन-गुण-गान

(१)

धन्य गोविंद गुरुभक्त । धन्य सद्‌गुरु हनुमंत ।।१।।
गुरु आज्ञेने कीर्तन । नित्य करिती प्रेम भरून ।।२।।
सद्‌गुरुंचे अधिष्ठान । असे पाहाती भक्तजन ।।३।।
सदा स्मरती मुखी नाम । डोलविती राजा राम ।।४।।
दास पोवार करी नमन । थोर गुरु भक्ता लागून ।।४।।

(२)

सद्‌गुरुंचे परी वाटती गोविंद । लावियेला छंद राम-नाम ।।१।।
कीर्तन ऐकता संशय फिटती । थोर निवारती गूढ प्रश्न ।।२।।
आपुला विश्वास ठेविता पायांसी । मग ते भाग्यासी पार नाही ।।३।।
आपुला अनुभव सांगतो मी ऐका । येथे कोणी शंका धरू नये ।।४।।
पोवार सांगतो ऐसा संत विरळा । जो का कळिकाळा हटवील ।।५।।

(३)

बापुराव धन्य मज स्मरणासी लाविले । अनुभवा दिले सर्व काही ।।१।।
म्हणता राजाराम होईल आराम । प्रगटे राजाराम समोरची ।।२।।
रामनामे माया जाईल पळून । डोळे भगवान राजाराम ।।३।।
सांगतो पोवार भाविक लोकांसी । शरण संतांसी जाता बरे ।।४।।

(४)

बापुराव केळकर धन्य धन्य संत ।
बहुता पुण्ये काळावरी केली ज्यांनी मात ।।१।।
ज्ञानेश्वर माऊलीची कृपा संपादिली ।
आशीर्वाद योगे राम सीता ही पावली ।।२।।

हनुमंत सद्गुरु बहु पुण्ये, लाभले । देह कष्टवुनी साधन केले ।।३।।
हनुमंत सद्गुरुराज डोलविले । त्यांचे आज्ञे कीर्तन नित्य चालविले ।।४।।
मारुतिराय धावूनी आले भक्तकाजासाठी ।
ऐशा संत गोविंदचरणी घालिती मिठी ।।५।।
अप्पा आला शरण गोविंद रायासी ।
धन्य धन्य धन्य झाले निश्चयेसी ।।६।।

(५)

साधु शिरोमणी तुकारामापरी । हरिकीर्तन हा जरी रंगले जे ।।१।।
ते हे धन्य मायबाप बापूराव । कीर्तनात देव प्रगट केला ।।२।।
सर्वामागोनिया जाणा बुक्का भाळी । लाविती कल्लोळी हरिनामाच्या ।।३।।
गळ्यामध्ये हार न घेती घालुनी । सर्वाभूती मनी नम्र भाव ।।४।।
कीर्तन करोनी पैका नाही घेत । मारियेली लाथ नोकरीसी ।।५।।
नोकरी त्यागुनी पूर्ण सेवा केली । मूर्ति जिंकियेली रामराय ।।६।।
विरक्ति हे अंगी गुरुआज्ञा प्रमाण । चालविले कीर्तन सद्गुरुंचे ।।७।।
ज्ञानेश्वर वचन मिळाले यथार्थ । हनुमंत समर्थ जोडियेले ।।८।।
ज्ञानेश्वर देवे बापुराया दर्शन । भोळा भाव पाहून दिले असे ।।९।।
भक्तकाजासाठी मारुतिरायांनी । प्रगट होवोनी वसती केली ।।१०।।
अप्पा पोवार म्हणे किती करू गौरवा । मजला अनुभव दाखविला ।।११।।

(६)

ऐकतो कीर्तन गोविंदरायांचे । आले माझे वाचे नाम तेणे ।।१।
काय सांगू ऐशा कीर्तनाची थोरी । डोळा दिसे हरी नामगजरी ।।२।।
सद्गुरुप्रसादे गोविंदा लाधले । रामरूप आले अनुभवासी ।।३।।
संत गोविंदासी *अप्पा* हा शरण । धरितो चरण प्रेमभावे ।।४।।

(७)

नामदेवा घडले नित्य हे कीर्तन । तेणे नारायण नाचविला ।।१।।

एकनाथा घडले नित्य हे कीर्तन । झाला नारायण टाळकरी ।।२।।
तुकारामा घडले नित्य हे कीर्तन । बोले नारायण त्यांचे मुखे ।।३।।
निळोबाराया घडले नित्य हे कीर्तन । दिले आलिंगन नारायणे ।।४।।
ज्ञानेश्वरमहाराजा नित्य घडले कीर्तन । स्वये भगवान विष्णु झाले ।।५।।
तात्यामहाराजा नित्य घडले कीर्तन । रेवणसिद्ध भगवान प्रगटले ।।६।।
गुरुआज्ञे बापूरावा नित्य कीर्तन । लाभता निमग्न होती ब्रह्मी ।।७।।
*अप्पा पोवार* सांगे अनुभवाची मात । साधूचे संगती तरणोपाय ।।८।।

(८)

बापूराव केळकर भक्तराज । लुटती ज्ञानाचे जहाज ।।१।।
वर्णवेना त्यांचे गुण । हृदयी धरितो चरण ।।२।।
त्यांचे चरित्र गाईन । अंगे पवित्र होईन ।।३।।
रामनाम गातो मुखी । कीर्तन ऐकून होतो सुखी ।।४।।
तात्यासाहेबमहाराज । त्यांनी केली सारी मौज ।।५।।
मृत्युमुखाचे पासुनी । सोडविले मज बंधनी ।।६।।
कैसे आले सोडवाया । माझी परतविली काया ।।७।।
ते हे धन्य बापूराव । भावा परी होय देव ।।८।।
आपुले सामर्थ्य झांकिती । अंत:करणी गुरूभक्ती ।।९।।
हरिभक्त बापूरावा । *अप्पा* नमितो धरूनी भावा ।।१०।।

(९)

गोविंदराज कीर्तन करिती । काय सांगू त्यांची महती ।।१।
झांज वाजवी दाणेकरी । साथ करिती नाना भारी ।।२।।
दामुअण्णा तबल्यावरी । घारपुरे मास्तर पेटीवरी ।।३।।
कीर्तनाचा भरला रंग । अभंग बोले पांडुरंग ।।४।।
गोविंदरायांची स्तुति । खटावकरमहाराज करिती ।।५।।
प्राप्ति ब्रह्मतन्मयता । गोविंदराया करिता कथा ।।६।।



हनुमंत सद्‌गुरुराज । कीर्तनी डोलती प्रेमे सहज ।।८।।
रामसीता धावुनी आली । मारुति मूर्ति प्रगटली ।।८।।
मौज लुटा मायबाप । घडे येथे जप तप ।।९।।
सहस्रबुद्‌धे स्वामी । नित्य कीर्तनासी येती ।।१०।।
राम बुक्का लावी भाळी । प्रेमानंदाचे कल्लोळी ।।११।।
अभंग बोलती अपार । होय कीर्तन गजर ।।१२।।
रामराय करिती आरती । भक्त वाटती खिरापती ।।१३।।
गोविंदरायाचा दास भाविक । *अप्पा पोवार* नि:शंक ।।१४।।

(१०)

पादुका प्रगटल्या स्वयेचि कीर्तनी । अघटित करणी हनुमंतांची ।।१।।
कैसे हे कीर्तन घडले बापूरावा । ऐकविते देवा नित्य मज ।।२।।
ऐकता कीर्तन पाहीन मी तुज । साक्षात्कार सहज पाहीन डोळां ।।३।।
बापूराव जाती कुरुंदवाडासी । न राहे या देसी प्राण आतां ।।४।।
धन्य हनुमंत धन्य बापूराव । *दास अप्पा* भावे लीन झाला ।।५।।

**- अप्पाराव अमृत पोवार**

# (३)

## अमृतकुंभ

### (१) (गोविंदरायांचा जन्म)

कृष्णाकाठी सांगली तटी यज्ञ मांडिला छान ।
त्या यज्ञासी यजमानाचा गोविंदाला मान ।।
नामयज्ञ तो श्रीरामांचा । कर्मयोग तो गोविंदाचा ।
रामजपाची उधळून रत्ने रामांचा सन्मान ।।१।।
बहुत सुकृते येते ओठी । रामजपाचा महिमा गाठी ।
देहकुडीची होडी तरते, असता कितीही सान ।।२।।

राम जपाच्या सहस्र नावा । तारतील रे दलित बांधवा ।।
गोविंदाचे वचन स्मरा रे, दुरिताला वरदान ।।३।।
जपातपाचे रामच वैभव । या रत्नांनी नटवा शैशव ।।
शैशवापरी अंत्यघडीचा, राम असो बलवान् ।।४।।

**(२) (ज्ञानेश्वरमहाराजांचा साक्षात्कार)**

सोनियाचे पिंपळाचा ओंजळी प्रसाद ।
ज्ञानमाऊलीची प्रेमे गोविंदा रे साद ।।
रामेश्वर नवलाबाई कुलेश्वर छान ।
माय राधिकेच्या पोटी गोविंदाचे दान ।।
पिता अंतूजींचा महिमा वर्णावा अगाध ।।१।।
लग्न करू बाळा आता, बोलता हसुन ।
आळंदीस जाऊनि येतो सांगतो दुरून ।
बैसता समाधिपाशी येई गोड नाद ।।२।।
इंदिरा प्रिया गोविंदा संसारी आनंदे ।
सदा रंगुनि नामात गाई राम मोदे ।
परि दृष्ट लागे त्यासी जरी ना प्रमाद ।।३।।
गाठीच्याच तापाने त्या जाणता आजार ।
म्हणे ज्ञान माऊली की घेईल कैवार।।
असे काय अंत्य घडी ही कैचा अपराध ।।४।।
ताप तोही निवता त्याचा निवांत बैसुनी ।
शुद्‌ध चित्त करुनि बैसे गोविंदा आसनी ।।
राम प्रभू फिरतो भक्ती कैवल्याची साथ ।।५।।

**(३) (प्लेगनंतर केलेली वाणी परत येते)**

अबोल झाली वाणी देवा, गाऊ कसा मी राम ।
पोटी असे जे ओठी राहू दे, नित्य मुखी हरिनाम ।।



माऊली पुढती अति लाडाने । यदुरायाची करी कीर्तने ।
परि मुखातुन उच्चाराचा प्रकटू दे श्रीराम ।।१।
लुळा पांगळा पर्वत चढतो । आंधळ्यास जो दृष्टि देतो ।
मुक्यामुखी जो राम बोलतो विसरू का ते धाम ।।२।।
बाळ बोबडे असता जवळी । ज्ञानमाऊली त्या कुरुवाळी ।
शब्दपल्लवी येई बहरुनि पडे जिवा आराम ।।३।।
बुधगावासी राम भेटला । गुरू पिपासू गोविंदाला ।
गोंदवल्याचा गणू सांगतो अविरत गावा राम ।।४।।
मिठी मारली आनंदाने । तरी न झाली तृप्त लोचने ।
तसेच पुढती चालती मामा, नाही जिवा विश्राम ।।५।।

(४) **(नारायणमहाराज यरगट्टीकरांचा अनुग्रह)**

चिमड गावचा गुरू नारायण गोविंदा भेटला ।
अनुग्रहास्तव चिन्मय ज्योति देतो वत्साला ।
कल्पवृक्ष तो संकल्पाचा । संकल्पाविण लाभ गुरूचा ।
गोविंदाचे मनी उमजला भाव तोच एकला ।।१।।
उमदीकरांच्या मनी वेधले । रंभाफळ त्या हाती दिधले ।
संतकृपेचा प्रसाद मंगल भाव रम्य सोहळा ।।२।।
साधु बोध हा गोविंदासी । होता लागे ध्यास मानसी ।
अखंड कीर्तन नामस्मरण, उजळू या गोकुळा ।।३।।
नाथपंथ हा चिमड गावचा । रेवणसिद्‌धे काड स्वामीचा ।
गुरुलिंगजंगम साधु राम की, हणमंते शोभला ।।४।।
धर्म पंथ वा जात कशाला । वटवृक्षाच्या एकच वेला ।
हाती धरुनि राम स्मरावा हृदयी जो बैसला ।।५।।

(५) **(गोविंदरावांचे निर्वाण)**

अखंड ओठी गोविंदाचे राम राम जय राम ।
हात लोपता माळ जपाची गाते श्रीजय राम ।।
थकले वैदू थकले डॉक्टर । म्हणती आता मृत्यु अनावर ।
इच्छाशक्ति त्याहून बळकट, देई जिवा विश्राम ।।१।।
गोविंदाची गोड कीर्तने । हेतु केवळ ज्ञान रक्षणे ।
या दानाविण राम मिळेना असोन कोटी दाम ।।२।।
वानर आपण जड बुद्धीचे । इवले इवले करतालाचे ।
ताल धरुनि गाऊ मोदे पुढती उभा श्रीराम ।।३।।
कृष्णातीर न च शरयूकाठी । उभा राहुनि तो जगजेठी ।
अजानबाहु स्वये दाखवी कैवल्याचे धाम ।।४।।
माघमासी अन् नवमी तिथिला । ज्ञानराज गुरू भेटायाला ।
मामा निघती वैकुंठाला गर्जा जय जय राम ।।५।।

**- बाळ गंगाधर धारप**

## (३)

## गीत गोविंदायन

(१) **(श्रीमामांचा जन्म)**

कराया देवाचे गुणगान अवतरे योगी एक महान ।
नामब्रह्म ते जगती आले चैतन्याची खाण ।।ध्रु.।।
वाहू लागे वात सुगंधी । मेघांची हो नभात गर्दी ।
दाही दिशाही आनंदाने म्हणती जय जय गान ।।१।।
तेजोमूर्ती बाल गोजिरी । कैवल्याचे तेज मुखावरी ।
एक अनामिक सुगंध पसरे प्रसन्न हो भगवान ।।२।।
अनंत उदरी पुत्र जन्मला । पुनीत कराया चराचराला ।



नाना म्हणती आम्हा लाभले ऐसे पुत्र निधान ।।३।।
माय जोजवी रवितेजाला । उधाण आले स्वानंदाला ।
गोठाणी हा जन्मा झाला ऐसा पुत्र महान ।।४।।
मोद जाहला भूलोकीला । नव भक्तीचा टाळ वाजला ।
शशिधर गातो आनंदाने गोविंदाचे गान ।।५।।

(२) **(बालपण)**

गोविंद गजरी अखंड रंगू । नाम घेऊनी पुनीत होऊ ।।ध्रु.।।
देव पुजेचा ध्यास मनाला । खंड न झाला नित सेवेला ।
गोविंद स्मरणे मनास सुखवु ।।१।।
असत्य भाषण कठोर वाणी । कधी न बोले अभद्र वाणी ।
समर्थचरणी विनीत होऊ ।।२।।
अध्यात्माची चर्चा मोठी । सद्ग्रंथांची भाषा ओठी ।
गोविंदरूपी श्रीराम पाहू ।।३।।
रामराम ही वदता वाणी। हृदी प्रगटली चिन्मय खाणी ।
त्रयोदशाक्षरी जपात न्हाऊ ।।४।।
नाम बिंब जे स्वयंप्रकाशी । लक्ष असे हो सदा अलक्षी ।
कैवल्यासी गळ्यात लेऊ ।।५।।
महिमा मोठा तव नामाचा । अमोल ठेवा महाव्रताचा ।
गोविंद हृदयी मिळून जाऊ ।।६।।

(३) **(आळंदीला ज्ञानेश्वर दर्शन)**

आळंदीशी कौल मागण्या श्रीमामा आले ।
अश्वत्थाच्या पारावरती ध्यान मग्न झाले ।।ध्रु.।
संसाराची घरात चर्चा । घाव उरी तो गोविंदाच्या ।
कशास देवा पुढे वाढिले कधी न मी चिंतिले ।।१।।

अश्वत्थाच्या वृक्षाखाली । गोविंदाची वृत्ती रमली ।
कौल मागतो देवा तुजला जे तुम्ही योजिले ।।२।।
नामासाठी देह झिजावा । परमेशाची व्हावी सेवा ।
भक्तिभाव हा मनी ठेवुनी पदरज मी नमिले ।।३।।
आज्ञा मजला मिळेल जेव्हा । तुझे चरण मी सोडीन तेव्हा ।
निर्धाराने गोविंदानी ज्ञानेशा प्रार्थिले ।।४।।
आर्त हाक श्रद्धेची ऐकून । हृदी भाव तसाच देखून ।
परब्रह्म ते रूप सावळे पुढे उभे राहिले ।।५।।
समर्थ सद्‌गुरु तुला भेटतील । संसारी परमार्थ साधशील ।
हरि समाधि मिळे तुजला ज्ञानराज बोलले ।।६।।
आशीर्वाद घेऊनिया आला । सेवेलागी सिद्‌ध जाहला ।
हरी हराशी नाते जुळले शुभ मंगल झाले ।।७।।

**(४) (कीर्तनासाठी गुरूची आज्ञा)**

चिन्मयरूपी हनुमंताची मूर्ती भूवर आली ।
नामसुधेची अक्षय गंगा गोविंदा दिधली ।।ध्रु.।।
माघ मासी प्रतिपदेशी । गोविंद बैसे पठण विधीशी ।
रामबोधी त्या वृत्ती रमली समर्थ गुरुमाऊली ।।१।।
हनुमंताची मूर्त गोजिरी । अवचित पुढती उभी गोचरी ।
परब्रह्म ते उभे ठाकता काया थरथरली ।।२।।
आसन ठेऊन बसावयाशी । गोविंद नमला गुरुपायाशी ।
हसरी मूर्ती चैतन्याची गोविंदा भेटली ।।३।
कीर्तन भक्ती नित्य हातुनी । व्हावे ऐसा हेत धरूनी ।
समर्थपायी विनवून म्हणती धरी कृपा साऊली ।।४।।
कीर्तन तुमचे अखंड होईल । दाही दिशांना सुगंध जाईल ।
वरद हस्त तो ठेऊन माथी मूर्ती हृदी विरली ।।५।।



**(५) (रामेश्वर यात्रा)**

हरिहरांच्या भेटीसाठी योगिराज चालले ।
स्वानंदाने निजत्व पावुन प्रसाद घेऊन आले ।।ध्रु.।।
आचरे गावी श्रीरामेश्वर । एकेठायी राम महेश्वर ।
त्या देवाला वंदन करण्या श्रीमामा चालले ।।१।।
श्रीरामेश्वर कुलदेवाला । जावे ऐसी आस मनाला ।
कठिण मार्ग तो सारा क्रमुनी देव मंदिरी आले ।।२।।
श्रीराऊळी मामा गेले । अश्रुंनी अभिषेक घातले ।
जय रामेश्वर कृपा करि प्रभो श्रीमामा बोलले ।।३।।
मामा आले सागरतीरी । ओहोटीची वेळ ती जरी ।
चरण क्षाळण्या सागर आला मामांना नमिले ।।४।
कौल मागती श्रीदेवाला । जाई उद्याला देव बोलला ।
आज्ञा मानुन मामा धरती रामेश्वर पाऊले ।।५।।
श्रीनामाचा मनी उमाळा । दो हृदयांचा जमला मेळा ।
पाहुन आपुल्या सद्‌भक्ताला देव हृदी राहिले ।।६।।

**(६) (कीर्तनाचे अंतरंग)**

श्रीनामाची फुले घेऊनी उधळीत जो गेला ।
आसमंत हा पावन करुनि कीर्तिगंध उरला ।।ध्रु.।।
ज्याचे कीर्तन देवासाठी देव हाच श्रोता ।
सुरवर डुलती उड्या मारती नाम भरे गाता ।।१।।
सम बुद्‌धीने समान झाला हरी पूर्ण अवतार ।
विदेहीपणे मुक्ती भोगित झाला स्वरूपाकार ।।२।।
चित्ती भरला हरिनारायण नाही अन्य विचार ।
भयाण संकट राशीवरती नाम एक आधार ।।३।।
हरिचे चिंतन श्रीमामांचे चालतसे दिनरात ।

ध्यानि मनी अन् लोकांतीही रमले जे नामात ।।४।।
नामामृत जो पिऊनी झाला बिंदुल्यात विरला ।
अखंड कीर्तन साच करोनी कीर्तनात जगला ।।५।।

**(७) (नामात्मा)**

अमृतवाणी श्रीमामांची नामामृत बोले ।
अमृत घेता नाम राहिले तारक जगी आले ।।ध्रु।।
नामयोग या स्थायी भावी रंगून जो गेला ।
मुखी ग्रास हा ब्रह्मरसाचा सुगंध दरवळला ।।१।।
अभंग सागर श्रीमामांचा चैतन्यी नटला ।
त्रयोदशाक्षरी नामामध्ये कैवल्यी रमला ।।२।।
नाम साधनी नाम चिंतनी नाम हाच भाव ।
नामाविण न च दुजा विचार नाम हाच देव ।।३।।
नामस्मरणी रमली वाणी कंठी नाममाळा ।
संसारी राहून शोभला वैराग्याचा पुतळा ।।४।।
अखंड कीर्तन श्रीमामांचे पूजन श्रीदेवाचे ।
भान विसरूनी कीर्तनरंगी देव पुढे नाचे ।।५।।
भक्त वत्सला हरि गोविंदा नमितो मी माथा ।
तव पायाशी जागा द्यावी आशिष द्या नाथा ।।६।।

**(८) (संतांची मांदियाळी)**

संत बोलती गोविंदाचे रामराज्य चालले ।
नाम मुखातील अमृत ठेवा राम राम बोले ।।ध्रु।।
गोविंद भेटे गणुमामाला । चैतन्य भेटले चैतन्याला ।
महासाधु हा असे जागता चैतन्य जी बोलले ।।१।।
भाऊरावजी कट्टा नेमी । श्रीगोविंदजी विनटे पायी ।
थाटच होईल हरिभक्तीचा भाऊराय वदले ।।२।।



हरिरंगी गोविंद रंगला । नामभक्तीचा कळस डोलला ।
पुराच आहे गोंदा म्हणूनी गुंडुबुवा नाचले ।।३।।
संत भेटती संतालागुनी । वासुदेवजी रामनिकेतनी ।
देवरूप तो त्याला नमू या योगिराज बोलले ।।४।।
नामनाथ हा साधुराणा । हरिभक्तीची स्कंधी वीणा ।
एकनाथ हा पैठणवाला पांडुरंग वदले ।।५।।

**(९) (गुरुनिष्ठा)**

गुरुवचनावर ठेऊन निष्ठा सर्वस्वा वाही ।
नाम निरंतर घेई त्याचा देव भार वाही ।।ध्रु।।
हरि सेवा ही गोड मानुनी । चंदनापरी देह झिजवुनी ।
आत्मसुखाच्या लाभासाठी दैन्य दुःख साही ।।१।।
गोविंद नामी रमुनी गेला । नामामृत जो पिऊनी धाला ।
द्रव्यार्जन ते जरी खुंटले चिंता केली नाही ।।२।।
नाम जपावे आत्मतृप्तिचे । भोजन घ्यावे कैवल्याचे ।
स्थिर चित्ताचे घेऊन आसन रामरूप पाही ।।३।।
गोड नाम ते घेई वाचे । तेच खायचे तेच प्यायचे ।
गुरूवाक्य ते प्रमाण मानुनी आत्मचिंतनी राही ।।४।।
सत् संकल्पाना लेऊनी गाठी । कीर्तन ज्याचे देवासाठी ।
विसरून आपणा बुड्या मारितो कैवल्याचे डोही ।।५।।
देव बोलला एके मेळी । अखंड राहीन तुझिया जवळी ।
तव नामाची कीर्ती राहील देतो तुजला ग्वाही ।।६।।

**(१०) (संदेश दीप)**

हरिनामाची कावड घेऊन हरिरंगी नटला ।
हरिनामाच्या रंगी रंगुन नामराज झाला ।।ध्रु।।
हृद मंदिरी नामी रमला । विदेहीपणे मुक्ती जगला ।

पिऊनी प्याला नामरसाचा आनंदी मुरला ।।१।।
ज्ञानाचे तू करुनि सिंचन । सुखमय सारे करिसी जीवन ।
कलश घेऊनि नामसुधेचा चराचरी शिंपिला ।।२।।
भाव ठेऊनी सद्गुरु चरणी । नामासाठी बाही वाणी ।
दीप करीचा हरिनामाचा प्रकाश दावीत गेला ।।३।।
दीप लाविला हरिभक्तीचा । मार्ग दाविला कैवल्याचा ।
कैवल्याचा सडा शिंपुनी मार्गदीप उजळिला ।।४।।
हरिसेवेसी प्राण वेचुनी । कृतार्थ केली सारी अवनी ।
फुले वेचुनी कैवल्याची मार्ग सुगंधित केला ।।५।।
नाम घ्यायचे नाम द्यायचे । देई फुकाचे अति मोलाचे ।
देऊनिया संदेश अमोलिक देवरूप झाला ।।६।।

**(११) (निजधामगमन)**

कैवल्याचा मंत्र गाऊनी जवळ करी निजधाम ।
श्रीराम जय राम जय जय राम ।।ध्रु।।
अखंड कीर्तन अडतीस वर्षे । श्रीनामाचा महिमा वर्षे ।
चैतन्याची फुले उधळुनी वाणी वदे श्रीराम ।।१।।
नाम फुकाचे प्रेमे घ्यावे । कैवल्याचे लेणे ल्यावे ।
सद्गद वाचे मामा वदती धन्य प्रभुचे नाम ।।२।।
ध्यानी मनी ते घेता ओठी । देव राहतो आपुल्या पाठी ।
सद्गुरुपायी भाव ठेविता । मिळे मना विश्राम ।।३।।
रामनाम जो नित्य उच्चारी । धन्य होतसे तो संसारी ।
संसारच मग होऊन जातो परमार्थाचे धाम ।।४।।
नामसुधेचे देऊन अमृत । पैलतिरावरी दृष्टी ठेवत ।
अक्षय गंगा श्रीमामांची गाते श्रीजय राम ।।५।।
अज्ञ पातकी पावन होती । नामप्रभावे पत्थर तरती ।



संजीवन तो मंत्र देऊनी झाले पूर्ण विराम ।।६।।

**(१२) (भवव्याधि निरसन)**

रामनाम ते अखंड घेऊन अढळपदी बसले ।
संसार आपदा सुखे झेलुनी शांतिसूर्य आले ।।ध्रु।।
शेंदुर करंज्या कोणी दिधल्या । वाचे वरती पडला घाला ।
गेली वाचा ये परतोनी राम प्रभु पावले ।।१।।
रोग पातले संत भेटीला । नामराज हा वैद्य जाहला ।
सुखसागर हे मामा दिसती अखंड कीर्तन चाले ।।२।।
दिवा जिथे हो तेथ काजळी । चंदनासही भुजंग कवळी ।
कुसुमाहून हा कोमल हृदयी राम राम बोले ।।३।।
नवनीतापरी सबाह्य निर्मळ । भाव अंतरी तसाच सोज्वळ ।
तिमिर पळाला तेज पाहुनी सूर्यबिंब प्रगटले ।।४।।
रामरूप ही झाली काया । दूर पळाली अवघी माया ।
गोविंदाच्या हृदय मंदिरी रामरूप कोंदले ।।५।।

**(१३) (समर्पण)**

जय गोविंद तुज अभिवादन तव चरणी सर्वस्व समर्पण ।
तव चरणी सर्वस्व समर्पण ।।ध्रु।।
मतीमंद मी चरित गायनी । वाग्विलासही नाही ज्ञानी ।
घुंगरट्याची झेप नभांतरी याची मजला जाण ।।१।।
राम राम हा तिलक कपाळी । लेऊन शमला वाल्या कोळी ।
त्या नामाने गाऊन गेला कैवल्याचे गान ।।२।।
अभंगातुनी तुजला ध्यावे । चित्त अर्पिले तैसे भावे ।
स्वर शब्दांचा हार गोविला त्यात ओतुनी प्राण ।।३।।
तुटकी फुटकी माझी सेवा । गोड मानुनी घ्यावी देवा ।
तव पायाचा विसर न व्हावा इतुके द्या मज दान ।।४।।
अमृत स्रवले अखंड कीर्तन । तारक जगती श्रीमामायण ।

सेवन करता कथामृताचे नाही कशाची वाण ।।५।।
चरित्र तुमचे दिव्य रसायन । मिळते जीवन करिता सेवन ।
शब्द फुलांची भरूनी ओंजळ गंगाजळ गंगेला अर्पण ।।६।।

**- प्रकाश भावे**

## (४)

## मामायण

एकव्रती स्त्रीवाणी पत्नीचे व्रत एक ।
ऐसा अखंड विजयी वीर सातवा धन्य विवेक ।।१।।
दशरथनंदन जानकीजीवन रामप्रभू अवतार ।
लीला अगाध पाहिली नाही ऐकिली हे साचार ।।२।।
सांगली ग्रामी केळकर गेही रामचंद्र अवतार ।
रामायण मामायण त्याने केला पूर्णावतार ।।३।।

**- पांडुरंगमहाराज ताम्हनकर**

## (५)

## विष्णुमय श्रीमामा

(श्री. न. दा. दिवेकर हे श्रीमामांचे एकनिष्ठ भक्त होते. त्यांनी जसे ओवीवृत्तात श्रीमामांचे चरित्र लिहिले आहे तसे त्यांनी श्रीमामांच्या वर श्लोक, गद्य, अभंग इत्यादि काव्य रचनाही केली आहे. विष्णूला वंदन करणरा 'शांताकारं भुजगशयनं' इत्यादि श्लोक प्रसिद्ध आहे. या श्लोकात विष्णूच्या संदर्भात जी विशेषणे वापरलेली आहेत ती श्रीमामांनाही लागू पडतात हे दाखविण्याचा प्रयत्न श्री. दिवेकरांनी केला आहे. तो यापुढे दिला आहे.)

शांताकारं, भुजगशयनं, पद्मनाभं, सुरेशं ।
विश्वाधारं, गगनसदृशं, मेघवर्णं शुभांगं ।



लक्ष्मीकांतं, कमलनयनं, योगिभिर्ध्यानगम्यं ।
वंदे विष्णुं भवभय हरं सर्वलोकैकनाथं ।।

**शांताकारं**

शांत संथ कृष्णामाई । सांगली क्षेत्रस्थांची पुण्याई ।
तैशीच आहे नवलाई । श्रीगोविंद दर्शनाची ।।१।।
प्रात:काळी माध्यान्हकाळी । सायंकाळी पर्वकाळी ।
येती सारी भक्तमंडळी । गोविंद दर्शनसुखासाठी ।।२।।
काळ पालटे क्षणाक्षणा । संसार सुखदु:खांच्या वेदना ।
मावळती श्रीराम निकेतना । वळता पाऊले भक्तांची ।।३।।
संसार दु:ख मावळे । तैसे संसार सुखही मावळे ।
एक नवीच प्रभा उजळे । अंतर्यामी ।।४।।
हे शांतिसुख आगळे । जे संसारी कधी न मिळे ।
म्हणोनी जीव तळमळे । नित्य दर्शनासाठी ।।५।।

**भुजगशयनं**

निंदा, अवज्ञा, हेळणा । आपदा, उपेक्षा, प्रतारणा ।
विघ्न, प्राणसंकट, मानखंडणा । सदोदित ।।६।।
द्रव्यार्जन खुंटले । आणि आप्तेष्टांनी घर भरले ।
संसार आपत्तींचे झाले । थैमान सुरू ।।७।।
कधी कोणाच्या वाटे न जावे । तरी विघ्नसंतोषी लोकांचे थवे ।
ऐकू नये ते ऐकावे । लागे कानी ।।८।।
बैसले दासबोध वाचनासाठी । तो भुजंगाने कडकडोनि मिठी ।
ऐशा विघ्नांच्या गाठी । नित्य नव्या ।।९।।
ऐसे हे नाना भुजंग । फणा काढोनी फुत्कारिती सवेग ।
तरीही स्वानंदाचा रंग । कदा न पालटे ।।१०।।

**पद्मनाभं**

कमळ चिखलात उगवते । परी कर्दमापासून अलिप्त ते ।
कमळ पाण्यांतून वर येते । पाण्याचा ओलावा न घेता ।।११।।
कमळ सदा सुप्रसन्न । चिखलपाणी हे त्यांचे अन्न ।
परी ते त्यापासून अभिन्न । अलिप्तता गुण त्याचा ।।१२।।
तैसा हा गोविंद सुयोगी । संसारी असोनि विरागी ।
देही असोन असंगी । खुणा दावी परमार्थाच्या ।।१३।।

**सुरेशं**

सुर म्हणजे देव । देव म्हणजे गुणगौरव ।
परमार्थाचे वैभव । दैवी गुणसंपदा ।।१४।।
प्रात:काळी उठावे । हरिस्मरणी असावे ।
अध्यात्मशास्त्र अभ्यासावे । निरंतर ।।१५।।
अनंत उपासनेची कामे । चाळवावी नित्यनेमे ।
कधी न दिसती रिकामे । क्षण क्षण सत्कार्यी ।।१६।।
करावे पुरश्चरण । सांगावे पुराण ।
वाचावे तुलसी रामायण । हनुमंत दर्शन नित्यनेमे ।।१७।।
जन बोलती बहुवस । मितभाषणी यांचा विश्वास ।
लघुसंदेशपदी निरास । करिती विकल्पांचा ।।१८।।
न करिता द्रव्यार्जन । संसार प्रारब्धी टाकून ।
करिती नित्य संकीर्तन । श्रीरामाचे ।।१९।।
साधा वेश साधी राहणी । सद्गुरु निष्ठा अंत:करणी ।
शूर मिरवे रणीं । तैसे गुरूवचन पालन ।।२०।।
आकाश गडगडोनि पडे । देह यातनांचे आदळती रणगाडे ।
तरी हे वीर निधडे । कोर न चुकती कर्तव्याची ।।२१।।
नको होते लग्नबंधन । तरी पाळिले श्रीज्ञानदेववचन ।



नको होते सद्गुरुपण । तरी आज्ञेस्तव तेही अंगिकारले ।।२२।।
मातृसेवा पितृसेवा । गुरुसेवा श्रीरामसेवा ।
संतसेवा कीर्तनसेवा । अहंकार देशोधडी ।।२३।।
ईश्वराची अवकृपा । ती मानावी त्याची कृपा ।
येणेच चुकती खेपा । जन्ममृत्युच्या ।।२४।।
ऐशी निष्ठा जबरदस्त । जीवनास लाविली कडक शिस्त ।
काम क्रोध केले उध्वस्त । कुरुक्षेत्र सारे जीवन ।।२५।।
ऐसा हा करारी स्वभाव । वज्रासम त्याचा घाव ।
हतप्रभ झाले दुर्दैव । यापुढे ।।२६।।

**विश्वाधारं**

किती एक संसारी जन । भोगिती दु:ख दारूण ।
अधिव्याधीनी गांजून । कंटाळती जीवाला ।।२७।।
बुद्धि कांही चालेना । सहाय्य कोणाचे मिळेना ।
हित ते आकळेना । कांही केल्या ।।२८।।
कोणा चिंता नोकरीची । कोणा व्यापार उदीमाची ।
कोणा भ्रांत दुपारची । मिळेना भाकरी ।।२९।।
सारे लोक धाव घेती । श्रीराम निकेतन शोधती ।
मामाना सांगती । आपुली गाऱ्हाणी ।।३०।।
ज्याचा भाव जसा । त्यास बोध देती तसा ।
विवेक जागृतीचा वळसा । सर्वाना ।।३१।।
म्हणोनि वाटे आधार । मामांचा सर्वांना फार ।
सर्वांचे माहेर । झाले श्रीरामनिकेतन ।।३२।।

**गगनसदृशं**

अभ्रे येती आणि जाती । परी आकाशाची पालटेना स्थिती ।
अखंड प्रसन्नता चित्ती । आणि मुखचंद्र शोभायमान ।।३३।।

निरभ्र आकाश पाहता । प्रसन्नता ये चित्ता ।
मावळती संसार चिंता । गोविंद दर्शने ।।३४।।
नभासारखे विशाल । नभासारखे मृदु कोमल ।
नभासारखे निर्मळ । ऐसे मामा ।।३५।।
नभ न खुपे कोणाला । नभ न अडवी कोणाला ।
नभ आधार सर्वाला । ऐसे मामा ।।३६।।
नभ असोन नाही । नसोनही असे काही ।
पवित्र सर्वांगी सर्वदाही । ऐसे मामा ।।३७।।

**मेघवर्णं**

सागरापासोन जलसंपत्ती । मेघ उदंड उचलती ।
अतिभारे काळवंडती । जाती मग देशांतरा ।।३८।।
उदंड मेघांचे दान । जलधारा वर्षती घन ।
तृप्त होती जन । धनधान्य समृद्धियोगे ।।३९।।
तैसे मामांचे अध्यात्मधन । स्वकष्टे अमित अर्जून ।
दान करावया नित्यकीर्तन । आरंभिले ।।४०।।
नि:संदेह झाले श्रोते । आणि अध्यात्मशास्त्र वेत्ते ।
आत्मसुखाचे भोक्ते । झाले सर्व ।।४१।।

**शुभांगं**

अष्टौप्रहर साधना । न चुकती मात्रा आणि काना ।
नेमूनि आपआपणा । दिनक्रमा चालविती ।।४२।।
अपशब्द न ये वाचे । सदा नाम श्रीरामाचे ।
वेड एक कीर्तनाचे । सदभ्यास सर्वदा ।।४३।।
मातापित्यांच्या आज्ञेबाहेर । कधी न वर्तणार ।
गुरूसेवेस वाहिले शरीर । शुद्ध मन ठेऊनी ।।४४।।
प्रियपुत्रासही एकेरी नांवाने । कधी नाही उच्चारणे ।



'रामजी' ऐसे हाक मारणे । सदा सर्वदा ।।४५।।
आदरे पाहती श्रोत्यांना । निंदकाना आणि वंदकाना ।
कधी न शिवे त्या मना । द्वेष आणि मत्सर ।।४६।।
मितभाषी एकांतवासी । गृहस्थाश्रमातही संन्यासी ।
सदा ज्यांची वसती । श्रीरामचरणी ।।४७।।
काया वाचा आणि मन । शुद्ध जैसे गंगाजीवन ।
सदा अंतरी प्रसन्न । हे चिन्ह शुभांगाचे ।।४८।।

**लक्ष्मीकांतं**

कधी न केले द्रव्यार्जन । केला संसार ईश्वरार्पण ।
वेचिला कण आणि क्षण । परमार्थासाठी ।।४९।।
प्रपंच होता मोठा । आणि द्रव्याचा परिमित साठा ।
लोकांनाही उत्कंठा । हा प्रपंच कसा चालतो ।।५०।।
एक धीर धरून विचारती । कैशी ही संसार स्थिती ।
जमाखर्चाची तोंडे मिळती । कैशी मिळती ।।५१।।
मामा बोलती प्रसन्न वदन । ईश्वर आहे दयाघन ।
लक्ष्मीकांत करूणापूर्ण । हात फिरवितो संसारी ।।५२।।
घरी ये जा पाहुण्यांची । आणि वसती नातेवाईकांची ।
तरीही उणीव कशाची । कधी न भासली ।।५३।।
ऐसा हा चमत्कार । चालला आयुष्यभर ।
नव्हे क्षणाचा हा प्रकार । हे महदाश्चर्य ।।५४।।

**कमलनयनं**

प्रकाश झाला अंतरी । तो प्रगटे गवाक्षाबाहेरी ।
तैशी मामांच्या नेत्रांतरी । प्रसन्नता प्रकाशमय ।।५५।।
ज्यांना ज्यांना ते पाहती । तेही प्रसन्नचित्त होती ।
ऐशी आहे महती । ईश्वरभक्तांची ।।५६।।

म्हणोनि जन धाव घेती । कृपादृष्टी अपेक्षिती ।
आणि त्यांची अपेक्षापूर्ती । नित्याची आणि अखंड ।।५७।।

**योगिभिर्ध्यानगम्यं**

जरी सारे जन । मामांना पाहती दिन प्रतिदिन ।
तरी मामांचे दर्शन । झाले फार थोड्याना ।।५८।।
कोणी नुसते देह पाहती । कोणी निंदा अवज्ञा करिती ।
आणि कोणी उपेक्षिती । पाहूनही मामांना ।।५९।।
देव सर्वत्र भरला । परी साक्षात्कार नव्हे प्रत्येकाला ।
तैशीच आहे विचित्र लीला । संत दर्शनाची ।।६०।।
जरी नसे भक्तियोग । जरी नसे अभ्यासयोग ।
जरी नसे अनुसंधानयोग । मग दर्शन कैचे ।।६१।।
जरी केला नमस्कार । तरी तोही शिष्टाचार ।
अंतरी श्रद्धेचा अंधार । मग दर्शन कैचे ।।६२।।
म्हणोन योगदृष्टी ज्याला । तोच अधिकारी गोविंद दर्शनाला ।
ना तरी अतिपरिचये झाला । दर्शनाला पारखा ।।६३।।

**वंदे विष्णुं**

गोविंदास नमन । तेच विष्णूस नमन ।
तेच आत्मदर्शन । साक्षात्कार वेगळा नव्हे ।।६४।।

**भवभयहरं**

जो गोविंदचरणी विनटला । भवभय कैसे त्याला ।
तो निर्भय आणि मोकळा झाला । संसारपाशातुनी ।।६५।।

**सर्वलोकैकनाथं**

जो कधी नव्हे अनाथ । म्हणोनि सर्वलोकैक नाथ ।
ज्याने धरिला पथ । गोविंद मंदिराचा ।।६६।।
त्या मंदिरात वसे गोविंद । गोविंद म्हणजे परमानंद ।



परमानंद म्हणजे परमपद । गोविंदपद अभंग ।।६७।।

**- न. दा. दिवेकर**

## (६)

## तेराच्या पाढ्यात मामा

(श्रीमामांना तेरा हा आकडा प्रिय होता. म्हणूनच त्यांना श्रीराम जय राम जय जय राम हा तेरा अक्षरी महामंत्र अतिशय प्रिय होता आणि शेवटच्या दिवशी पाच वाजता त्यांनी हाच महामंत्र मोठ्यांदा उच्चारला होता. या तेरा अंकाच्या पाढ्यात श्रीमामांना बसवण्याचा प्रयत्न पुढील पद्यात आहे.)

तेरा एके १३ । गोविंदाच्या चला घरा ।
तेरा दुणे २६ । जपात मामांचा कस ।
तेरा त्रिक ३९ । कीर्तन मामांचे पैस ।
तेरा चोक ५२ । करा मामांचे स्मरण ।
तेरा पाची ६५ । नामोच्चारी नाही कष्ट ।
तेरा सख्ख ७८ । पाहू रामाचे मंदिर ।
तेरा सत्ते ९१ । नाम मामांचे गाऊ ।
तेरा अठ्ठे १०४ । गोविंद नाम मने कसे ।
तेरा नव्वे ११७ । सोपे गोविंद नाम असे ।
तेरा दाहे १३० । रामनाम गाऊ सोपे ।

**- के. वा. आपटे**

### अ) संस्कृत रचना

### (१) भूपाळी

उत्तिष्ठोत्तिष्ठ गोविंद । उत्तिष्ठ करुणाकर ।
उत्तिष्ठ इंदिराकांत । त्राहि मां भवसागरात् ।।

**- न. दा. दिवेकर**

### (२)

उत्तिष्ठोत्तिष्ठ गोविंद भक्ता दर्शनकांक्षिण: ।

आगतास्तव सांनिध्ये तेषां त्वं मंगलं कुरु ।।१।।
गोविंदराज गोविंद भक्त-त्रासं निराकुरु ।
कल्याणं कुरु दासानां भक्तेभ्यो देहि दर्शनम् ।।२।।
अरे गोविंद गोविंद प्रोत्तिष्ठ शयनासनात् ।
भक्त्यागत-भक्तानां प्रभातं शोभनं कुरु ।।३।।
उत्तिष्ठोत्तिष्ठ गोविंद क्लेशं दुःखं निवारय ।
सर्वेषां कुरु कल्याणं सर्वेषां मंगलं कुरु ।।४।।

**- के. वा. आपटे**

**(३)**

गोविंद गोविंद गजाननस्त्वं गोविंद गोविंद सदाशिवस्त्वं ।
गोविंद गोविंद बोधस्वरुपं गोविंद गोविंद नमो नमस्ते ।।१।।

**- न. दा. दिवेकर**

**(४)**

**(नमस्कार चतुष्क)**

ज्ञान-योगेश्वरं वंदे गोविंदं परमेश्वरम् ।
गुरवे सच्चिदानंदगोविंदाय नमो नमः ।।१।।
भक्त-रत्नं संत-श्रेष्ठं भक्ति-मार्ग-प्रबोधकम् ।
आनंद-कंद-गोविंदं नमामि विनतकायः ।।२।।
अनंतस्य सुतं श्रेष्ठं राधा-मातुः सुपुत्रकम् ।
नारायणस्य शिष्यं च वंदे गोविंद-सद्‌गुरुम् ।।३।।
गंगाधरस्य नप्तारं गोविंदं वंश-वर्धनम् ।
नमामि सुजनाधारं सांगली-ग्राम-वासिनम् ।।४।।

**- के. वा. आपटे**

**(५)**

नमामि सरलं शांतं । गोविंद मुदमंगलम् ।



किंचिद् विश्राम्यतां देव । भक्तार्थं-परिपूर्तये ।।

**- न. दा. दिवेकर** (वही ५०)

**आ) हिंदी रचना**

**(१) दोहरे**

जीवन्मुक्त को देखना गर है किनकी आस ।
जा देखो गोविंद को समज पडेगी खास ।।१।।

**-पांडुरंगमहाराज ताम्हनकर**

**(२)**

हनुमंतदास गोविंदजी भक्तोंके शिरताज ।
पांडुरंगका सलाम लेना अब तो गरीब नवाज ।।

**-पांडुरंगमहाराज ताम्हनकर**

**(३)**

सीताके पति राम हो राम तो भगवान् हो ।
गोविंदके स्मरणसे भगवानका दर्शन हो ।।

**-साधु गंगादास, फक्कडपंथी**

**(४)**

गुरू गोविंद दोनो खेड का के लागु पाव ।
वालिहारी गुरूकी जिसने गोविंद दियो बनाय ।।

**- साधु गंगादास फक्कडपंथी**

**(५)**

दुनियामें मैं एक पगला हुँ आपके सामने खडा हुँ ।।
आपके सामने मैं अशिक्षित हुँ । गुरूकृपापर मैं काव्य मनाता हुँ ।।
इसीलिये मैं संत बापूरावजीको । शतशः प्रणाम करता हूँ ।।

**-हरिबाबा दीक्षित** (वही ५०)

**इ) कानडी पद**

**(१)**

राम राम राम सीता राम राम अमरी ।
रामस्मरणी व्हरतू कालवू व्यर्थ कळीय बेडरी ।।
ताईतंदी ह्यंडर मनकळू मिथ्य नंदू निशीधरी ।
काया-वाचा मन सरिद गुरूवीगे शरण होगरी ।
भक्तिभावादिंद सद्‌गुरु अमरम्मंदू अरियरी ।
गुरूविन अप्पणे हिंद मुक्तीयंब तिथीनरी ।
काम क्रोध मोह बिद्दू मनस झळझळ माडरी ।
चींती ईल्ल रे राम नन्यनसी जन्म मरण निगरी ।
परद्रव्यपरनारी नरक थंब तिळीयरी ।
न्यंबू महान्यंबू मोहा बिट्टू रामतन्य नीयरी ।
दिवसरात्री साधुसंतर संगनीऊ बैसरी ।
साधु बापुरावजी सारी हेळुव रामनाम जपसरी ।

**- महादेव रामचंद्र बेळगली,** चिमड

## ई) मराठी रचना

**पाळणा आणि भूपाळी**

**(१)**

आनंदी आनंद झाला ।
प्रभु कृपेने बालयोगी हा मम कुळी अवतरला ।।
सखे ग आनंदी आनंदी झाला ।
पालखी निजवूनी गीती गाऊ ।
ठेवू गोविंद नामाला ।
नाम ऐकुनी देव सुरवरा ।



मोद मनी झाला ।
रामेश्वर हा प्रसन्न झाला ।
मम दीनाच्या भक्ती भुलला ।
प्रसन्न होऊनि प्रसाद हा जणू ।
मम ओटी घातला ।
सखे ग आनंदी आनंद झाला ।।

**- सौ. इंदिराबाई साने**

**(२)**

जो जो जो जो रे, गोविंद, तू सच्चित् सुखकंद ।।ध्रु.।।
पाळणा सजविला, पुष्पहारांनी, झोपी तू जाई ।।१।।
निद्रा करी बाळा, सुंदरा, स्वजनानंदना ।।२।।
साधक भक्तांना, तोषविसी, दुःखांतक तू साचा ।।३।।
स्मित-वदना, संत सज्जना, निद्राधीन तू होई ।।४।।

**- के. वा. आपटे**

**(३)**

जो जो बाळा, अनंतनंदा, बालरवी तू तेजोस्पंदा ।।ध्रु.।।
बाल चिमुकल्या, परमानंदा, निसर्ग अवघा गातो गाना ।
आनंदाच्या दिव्य सागरी, निद्रा घे तू नंदा ।।१।।
तुला ठेविला हृदय पाळणा, चंद्र चांदण्या करिती औक्षणा ।
दृष्ट कुणाची तुला न लागो । हेच मागते गोविंदा ।।

**(अखंड कीर्तनानंद, पृ. १४)**

**(४)**

जो जो जो जो श्रीगोविंद । तव नामी आनंद ।।ध्रु.।।
प्रेम पालक हलविता । कृपा करा गुरूनाथा ।।१।।

हृदय पाळणा भक्तीचा । तो हा गुरूनामाचा ।।२।।
उन्मनी प्रगटले गोविंद । निज सुख परमानंद ।।३।।
कीर्तन भक्तीसी अवतार । नाम हे जगदोद्‌धार ।।४।।
गुप्त राखियला अधिकार । असोनी स्वरूपाकार ।।५।।
राधा सुपुत्र अविनाशी । शरयू हृदय निवासी ।।६।।

**- शरयू उपळावीकर**

## भूपाळी

**(ओवी)**

उठा उठा हो भक्तजन । दिसू लागला अरुण ।
घ्यावे पूजेचे सामान । चला गोविंद मंदिरी ।।१।।
गोविंद हा जगत्पिता । दीनांचा रक्षणकर्ता ।
दर्शन द्याया भक्ता । उठला असे ।।२।।
घेऊनी गोविंद दर्शन । करा त्याचे स्मरण ।
होईल पाप-क्षालन । सकळ भक्तांचे ।।३।।

**- के. वा. आपटे**

## (२)

## ओवी

**(१)**

मूळ ओंकारा निंबर्गीनाथा । मौनेची चरणी ठेविता माथा ।
सर्व संप्रदायाची एकता ऐक्यता । निजबालका दिधली ।।१।।
ब्रह्मरूप हनुमंतांनी । दासराम बाळाते पाहुनी ।
अमृतहस्ते चौदावे दिनी । स्पर्श केला पूर्णकृपेने ।।२।।
राम-नाम-खाणीतुनी । सुवर्ण-लगडी काढिल्या मामांनी ।
लूट केली संकीर्तनी । अगणित लाभ श्रोते जना ।।३।।



ऐशा भक्ति-वेलीने सुशोभिले । श्रीगोविंद हृदयी हनुमानप्रभू प्रगटले ।
कीर्तन करण्याशी आज्ञापिले । प्रेमळ भक्ता पाहुनी ।।४।।
माघ वद्य तृतीया दिनी । हनुमानप्रभू प्रगटले केळकर-सदनी ।
अतूट कीर्तनी रंग भरोनी । ज्ञानप्रवाह चालला ।।५।।
कृपेची नवलपरी । रत्न चमके वायुलहरी ।
ऐकता श्रोते तटस्थ क्षणभरी । देह-गेहाते विसरती ।।६।।
सांगणे असे बहु प्रेमळ । सखोल आणि सोज्वळ ।
भक्तिरसाचे हे फळ । गुरूकृपे लाभतसे ।।७।।
बालयोगी दासराम असती । वायुसाधनी सदा रमती ।
स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगती । प्रवचनी नित्य नित्य ।।८।।
ज्ञान-दीपक संत मूर्ती । स्तवनासी न पुरे अल्प मती ।
त्यांचीच बोधवचने तयाप्रती । प्रेमादरे समर्पिली ।।९।।

**- श्रीमती आकुताई पाठक,** सांगली

**(२)**

नामरूप मामा झाले । अमर कीर्तन करून गेले ।
जे ऋषि बोलले । ते दाविले सत्य करूनी ।।१।।
त्यांची काया गेली खरे । परि ते भरले जगदाकारे ।
हे मिथ्या की खरे । महानुभाव जाणती ।।२।।

**- अनामिक**

**(३)**

एक नाम मनी धरुनी । हृदयात राम स्मरूनी ।
प्रेमपाणीने रामपूजा । गोविंदानी केली ।।१।।
गुरूवर निष्ठा ठेवूनी । आत्मा देव मानूनी ।
सत्त्व तुळशी वाहुनी । पूजा गोविंदानी केली ।।२।।
गुरूचरणी भृंग होऊनी । नित्य नवे कीर्तन करूनी ।

मीपण ओवाळोनी । पूजा गोविंदानी केली ।।३।।
रामपाठ अभंग देऊनी । राम हाती नाम देऊनी ।
हृदयस्थळी राम पूजा । गोविंदानी केली ।।४।।
रामपूजा करते झाले । पंढरीत कायम राहिले ।
मनोभावे रामपूजा । गोविंदांनी केली ।।५।।
नित्य नेम कीर्तन करूनी । पतितांना पावन करूनी ।
क्रोध धूप घालूनी । पूजा गोविंदांनी केली ।।६।।
कुणा मनी ध्यानी नव्हते । रामचरणी विलीन झाले ।
रामनौकेत रामपूजा । गोविंदांनी केली ।।७।।
नरजन्मात सावध व्हा । गोविंदचरणी लीन व्हा ।
हणमंतकृपे रामपूजा । गोविंदानी केली ।।८।।

**-हणमंतराव बेळगळी,** चिमड

(४)

कृष्ण विष्णु हरि गोविंद । अनेकी एकत्वाचा आनंद ।
म्हणोनि वंदू पदारविंद । गोविंद गोविंद चरणद्वय ।।

**- न. दा. दिवेकर**

**(५)**

ॐकार स्वरूप गोविंद । नामरूपातीत आनंद ।
तुझिया नामे परमानंद । कीर्तन अखंड कळस कीर्ती ।

**- शरयू उपळावीकर**

**(श्रीगोविंदाष्टक)**

**(१)**

श्रीरामेश्वर दैवतास कुळिच्या पूजीत सोमेश्वरा - ।
पासोनी शिवसंप्रदाय सुकृती नारायण-श्रीवरा ।
लाभे श्रीहनुमंत सद्‌गुरुकृपे नामी सदा मग्नसा ।



तो हा सद्‌गुरु सांगलीत दिसला गोविंदरूपी कसा ।।१।।
वायूनंदन रामदूत अजरामर जो पुराणांतरी ।
संस्थापी शिवराज्य रामभगती कार्या पुन्हा स्वीकरी ।
संसारी लघु मात्र आस पुरवी आदर्श जो ज्या जसा ।
तो हा सद्‌गुरु सांगलीत वसला गोविंदरुपी कसा ।।२।।
आहे भाग्य विशाल ज्यास म्हणती ते सर्व प्रापंचिक ।
येई आप सुखे तरी न फसवी तिळमात्र सांसारिक ।
ही जी का महती कृतीत उतरी किंचिन्नहंभावसा ।
तो हा सद्‌गुरु सांगलीत सजला गोविंदरूपी कसा ।।३।।
ख्याती कोट पिसांची केळकर हे भोराविती निश्चिती ।
राखोनी निजधैर्य अंतरि कसे श्रीपादुका सेविती ।
राधाकुसि अनंतकायि उगला चिद्वंशी दीपू जसा ।
तो हा सद्‌गुरु सांगलीत दिसला गोविंदरूपी कसा ।।४।।
नामी राम अखंड प्रीती वसती सेवी सदा मारुती ।
पंचक्रोशि न सोडिता व्रत करी आशा न पाशांप्रती ।
गीतेचाच समूर्त पिंड बनला ब्रह्मांडनामे कसा ।
तो हा सद्‌गुरु सांगलीत तपला गोविंदरूपी कसा ।।५।।
दाता दुर्मिळ दुर्लभाचि दायिता दिव्यौषधी दाटुनी ।
देवोनी गुरूनाम वारिती भवी भावे हरी संयुगी ।
पूर्णा पंच तपाहुनि पसरिती हरिकीर्तनी सौरसा ।
तो हा सद्‌गुरु सांगलीत दिसला गोविंदरूपी कसा ।।६।।
कोणा काय दिले कशा करणिने गणती न याची कुठे ।
ठेवी जो दृढ भाव एक बरवा त्या विश्वप्रेमे थिटे ।
नामाची मधुशर्करा सुविनता वाटी सदा दंशसा।
तो हा सद्‌गुरु सांगलीत दिसला गोविंदरूपी कसा ।।७।।

पूर्वी नारद व्यास वाल्मीक मुनी प्रल्हाद भक्तीसवे ।
गाती ते वच रामपाठ रचती ज्ञानेशसे भासवे ।
लोका लौकिक रामनाम वदला अंती चिरंजीवसा ।
तो हा सद्गुरु सांगलीत रमला गोविंदरूपी कसा ।।८।।

**- भा. द. लिमये,** विटे

(२)

सदा कीर्तनी रंगली साधुवाणी । प्रपंचावरी सोडिले नित्य पाणी ।
जना दाखवी साच कल्याण पंथ । कुळा उद्धरी धन्य गोविंद संत ।।१।।
बहु सोशिले घात आघात मोठे । ढळेना मुळी शांति वीरक्ति कोठे ।
कृष्णातिरी पुण्य वास्तव्य केले । गोविंद आत्मस्वरूपी मिळाले ।।२।।

**- प्रा. नारायण कुलकर्णी,** ब्रह्मपुरी

(३)

नाथांप्रमाणे रहाणी जयांची । प्रपंची जोड सती इंदिरेची ।
तसा सुपुत्र तो राम एक । भार्या तयाची सीता ही देख ।।१।।
ते रामपुत्र लव कुश जोडी । कुटुंब सर्व श्रीराम जोडी ।
वरद हस्त गुरूंचा कृपादृष्टी पाही । गोविंद नित्य श्रीराम ध्याई ।।२।।
हरिकीर्तनी तो रंगून जाई । मुखी नामदेवा नको अन्य काही ।
श्रीदासबोध वाचीत नित्य । गुरू तेथे आले श्रीहनुमंत ।।३।।
स्वप्नात मी का असे हेचि सत्य । आसन दिधले बसावे स्वस्थ ।
माघी तृतीया तो कृष्णपक्ष । साक्षात् दर्शन ही आज साक्ष ।।४।।
झाली तयाला छत्तीस वर्षे । उत्सव करिती तो सर्व हर्षे ।
श्रीरामनाम अखंड गजरी । भाग्याची त्याच्या हो आज उजरी ।।५।।
अशा संतश्रेष्ठा नमस्कार माझा । कृपादृष्टी तुमची नको भाव दुजा ।
ही प्रार्थना रुक्मिणीची दयाळा । तव पायी ठाव देई कृपाळा ।।६।।

**- श्रीमती रुक्मिणीबाई भट,** पुणे



(४)

झाले बहु सांगलीसी अधिकारी थोर श्रेष्ठ अमित भले ।
आत्मपरी स्थिर होऊनी नम्रत्वे वंद्य ठरती जे आगळे ।।१।।
जागृति स्वप्न सुषुप्ति परमात्मा एक वस्तु अंतरी जे ।
अद्वैत भाव सतत नम्रपणे सर्व भूती भीतरी ते ।।२।।
गुरू भक्त परम श्रेष्ठची भूषण हे सांगली सदा ठरले ।
कीर्तनगंगे न्हावुनी भक्तिमार्गीच पुनीत जे केले ।।३।।
भक्ति ज्ञान विरागे संगमी नित सर्वकाळ वसती जे ।
नामामृत सेवुनिया वाटियले तेचि अमृता सहजे ।।४।।
निर्वैर शांत राहुनी सर्वपणे आयु साच भूषविले ।
हरिनामी रंगुनिया सर्वची ईश तत्त्व जाणितले ।।५।।

**- ह. भ. प. मोरेश्वर बुवा कुलकर्णी,** सांगली

(५)

श्रीगुरू हृदयी विराजे रामनाम रे अमोल शिवमंत्र ।
मन माने प्रीतीने जग समजोनी दासका यंत्र ।।१।।
यमनियमावरी आदर रात्रंदिनी आत्म चिंतनी जागे ।
मज दे वोळख माझी जन्म नको हे रामपदी अर्जी ।।२।।
यदुपति गति भक्तांची जरामरण यातना चुकवी ।
यत्न करी नेटाने राखुन आर्जव जनाही ते शिकवी ।।३।।
मज वाटतसे संतांचे हे चरित्र अद्भुत नसे तया उपमा ।
म्हणोनि ठकची ठेले अक्षरांत उपदेशी सर्वदा रमा ।।४।।

**- प्रा. ना. य. कुलकर्णी,** ब्रह्मपुरी

(६)

सदा कीर्तनी वर्णिले नाम ज्याने । जना बोधिले आचरोनि कृतीने ।
देहांतीही जो नाम बोले मुखाने । जगी धन्य गोविंद हनुमत् कृपेने ।।१।।

**- अनामिक**

**(७)**

अमूर्त परी मूर्त जाहले ज्ञान विनय गुणराज ।
गोविंदी एकत्र नांदती जाऊनी पाहे आज ।

**- पांडुरंगमहाराज ताम्हनकर**

(८)

झाला कीर्तन सांप्रदाय भुवरी दैवीच ही संपदा ।
श्रीहरिच्या गुणकीर्तनी सहजची वैकुंठ राणा फिदा ।
तुम्ही तोषविले खरे गुरूवरा संपादुनिया पदा ।
सेवोनी बहु गोड कीर्तनसुधा श्रीबापूजी सर्वदा ।।

**- मंगेश रामचंद्र टाकीमहाराज**

**(९)**

कीर्तन सेवा तीन तपे खंड नाही पडला ।
वरद हस्त श्रीहनुमंताचा गोविंद शिरी पडला ।।

**-ह. भ. प. गोविंदमहाराज कुलकर्णी,** सांगली

**(१०)**

सदा राहुनि नाम चिंतानुवादे । सदा बोधिले कीर्तनी तेच छंदे ।
सदा अंतरी रंगले स्वस्वरूपी । नमस्कार गोविंदजी विश्वव्यापी ।।

**- न. दा. दिवेकर**

**(११)**

गोविंदे आणि श्रीराम एकचि भासती पहा ।
ओळ ओळ तपासूनि अनुभवी सत्यदर्शन ।।

**- न. दा. दिवेकर**

**(१२)**

भक्तिप्रेम सुखालागी स्मरू गोविंद इंदिरा ।
आयुष्य वेचिले ज्यांनी श्रीरामस्मरणी सदा ।।

**- न. दा. दिवेकर**

हरिकीर्तनी रंगली वृत्ति ज्यांची । मनी मूर्ति ध्याती रामप्रभूची ।



गुरू होलवीला हनुमंत राजा । नमस्कार गोविंदमाझी माझा ।

**- श्रीदासराममहाराज**

**(१३)**

आली अतिनिकट गोविंद नवमी ।
संकीर्तनी साधूया नित्य नेमी ।
मनी घेवूया आजि प्रसाद प्रेमी ।
सदा रंगला राम गोविंदनामी ।।

**- (अकी, पृ. १५६)**

**(१४)**

आयुष्य वेचिले तू नित गात रामनामी । रंगास रंगविले तू रंगून रामनामी ।।

**(अखंड कीर्तनानंद पृ. १९)**

**(१५)**

नमो इंदिरा माऊली शांत मूर्ती । हनुमत्कृपे अंतरी थोर भक्ती ।।
ध्यानी मनी एक गोविंद चित्ती । पदांबुजी अर्पिली प्राणज्योती ।।

**(अकी, पृ. २८)**

**(१६)**

पदी बसोनि पदवी घेई । श्रीगोविंदजी निजपद ठाई ।।

**- (अकी, पृ. ६८)**

**(१७)**

मामा आले सागरतीरी ओहोटीची ती वेळ जरी ।
चरण क्षाळण्या सागर आला मामांना नमिले ।।

**- (अकी, पृ. ९३)**

**(१८)**

सिंहासनी स्थापिले आत्मलिंग । गोविंदजी चरण तैसेचि सांग ।

संजीवनी भक्ति ही समाधी । नमस्कारिता लाभ संता समाधी ॥

**- (अकी, पृ. १५२)**

**(१९)**

चरित्र तुमचे दिव्य रसायन । मिळते जीवन करिता सेवन ॥

**- (अकी, पृ. १५५)**

**(२०)**

तपनापरी जो बलदंड तेजे । संध्या तरी नित्य त्रिकाल साजे ।
बारा सहस्रावरी नित्य नेम । नमस्कार गोविंदराया प्रणाम ॥

**- (अकी, पृ. १६४)**

**(२१) (सुमनगुच्छ)**

गोविंद चरित मानस लेखक जे धन्य सत्य नरहरी ।
साकार करी मामा निराकार जरि जसा नरात हरी ॥१॥
रामचि सखा जयाचा सखाराम करि प्रकाश ग्रंथाला ।
म्हणुनि प्रकाशन ज्यांचे प्रकाशकू एक योग्याचि गमला ॥२॥
शंकर गौरविती बहु गोविंदा जाणुनि सुसंताते ।
संतचि संता जाणती या उपरी काय बोलू मी त्याते ॥३॥
आमुचे मामा भरले ग्रंथांतरी नि तसेच जगतात ।
सुविचार सुमनमाला मामाते अर्पि राम हा येथ ॥४॥
तृतिया कथा गुरूंची कीर्तन सरिता अखंड ओघवती ।
केशव स्तवितो सु-मने अखंडचि तीच सत्य गोड स्मृती ॥५॥
श्रीहनुमत् सद्गुरुंचे छत्र शिरावरि असेच मामांचे ।
स्मरूनी सदा तयाते समर्पितो सत्कृती मने वाचे ॥६॥

**-दासराममहाराज (गोचमा)**

**(२२)**

मेघ कृपेचा वळता पावन सुक्षेत्र सांगली झाले ।
अर्ध शतावरी स्रवती अमृतधारा किती नवल केले ॥१॥



कृष्णातीरी कीर्तनगंगा ही वाहते अखंड अशी ।
अघमर्षण सुखसाधन भवभंजन मूर्तिमंत ही काशी ॥२॥
सत्य श्रीहनुमंता सदया केला प्रसार भक्तीचा ।
गोविंदा तव स्वरूपी मिळुनी गेले प्रभाव हा तुमचा ॥३॥
हनुमंत संत करिती छाया ही चिरसुखार्थ भक्तांच्या ।
श्रीगोविंदचरितमानस सद्भावे अर्पितो पदी त्यांच्या ॥४॥
सन्मार्ग निज सुखाचा केला सुखकर सदैव दोघांनी ।
प्रणिपात गुरूपदी हा अर्पूनि आम्ही कृतार्थ या भुवनी ॥५॥

**- स. वि. जोगळेकर (गोचमा)**

**(२३)**

धन्य सदन ते ठरले कीर्तन घोषे अखंड दुमदुमले ।
श्रवणे मनने विरले अद्वयभजने उदंड जन रमले ॥१॥
गुरू शिष्य उभयतांनी नामाचे गुपित प्रगट राखियिले ।
कृष्णातीरी कीर्तनी निज बोधे अढळस्थान राखियिले ॥२॥
साधनमार्ग क्रमुनि भक्तांही श्रेष्ठ ज्ञान सांगितले ।
नरजन्म श्रेष्ठ जाणुनि भगवंता सर्वकाळ वाहियले ॥३॥
भगवत्प्राप्ति देही साधुनिया शुद्ध अनुभवा देती ।
परि इष्ट मार्ग सोडुनि प्रापंचिक व्यर्थ काळ दवडिती ॥४॥
मतभेद सांप्रदायी दाखविती किती अनेक मार्गांनी ।
ईश्वर एकची जगती निरखीला इष्ट साधुसंतांनी ॥५॥
दिनचर्या मामांची दांभिकी लौकिकी कधी नसे गमली ।
स्वागत राखुनि सकळी परमार्थी वृत्ति साच रंगविली ॥६॥
संत चरित्रे गाऊनि घातली अढी मुक्तिपेठी मामांनी ।
कीर्तनपंथा राखुनि चालविली घडी तदीय सुतानी ॥७॥
अमूपचि लिहुनी काव्या देती हे संतश्रेष्ठ बोधाते ।

श्रीज्ञानेश्वर तुकया आदि करुनि संत सांगती जे ते ।।८।।
कीर्तनी समाधि मंदिरी षष्ठीचा पुण्यकाळ साधियला ।
श्रीदांडेकर गुरूनी तदि कीर्तन महिमा अपार वर्णियला ।।९।।
श्रीराम राम जप अंती साधुनिया घेत शुद्ध मोक्षगती ।
जन्मभरी जे करिती भक्त त्या मिळत तेच सिद्ध स्थिति ।।१०।।
असता जवळी मोती जाणती किती संत म्हणुनि विरळाची ।
हळहळती सगळे मग मामांना म्हणती आगळा हाची ।।११।।
सोज्वळ सुबोध प्रेमळ काव्ये लिहिले चरित्र मामांचे ।
वाचुनी ऐकुनी स्मरूनी फेडावे अल्पसे ऋण कवीचे ।।१२।।
स्मरणी मूर्ति येता द्रवती नमती कितीक जन ज्याला ।
आर्या लिहुनि त्रयोदश विनम्र भावे स्तवीत चरणाला ।।१३।।

- **मोरोपंत कुलकर्णी,** सांगली (गोचमा)

(२४)

साष्टांग भावे प्रणिपात माझा । गोविंद घ्या या शुभ सुप्रभाती ।
तेजासवे तेज मिळोन गेले । गोविंद हे नाम आम्हा मिळाले ।।

**- (गोचमा, कृ. १३६)**

### (२५) गोविंदाष्टक (मंदाक्रांता)

ज्या प्रेमाने प्रतिदिनि तुम्ही बोधिले भाविकांना ।
ज्या धैर्याने अनुदिनि तुम्ही राखिले नित्यनेमा ।
ज्या शौर्याने कठिण समयी गांजिले संकटांना ।
हे गोविंदस्मरण तुमचे नित्य हे गोड आम्हा ।।१।।
भाग्याने ही अमित जडली संगती सौख्यपूर्ण ।
कोठे शोधू न बल असले लोह झाले सुवर्ण ।
संसारी या बुडत बुडता आणिले संतमार्गी ।
हे गोविंदस्मरण तुमचे राहु दे अंतरंगी ।।२।।



श्रीरामाचे स्मरण सदया राखुनी अंतरात ।
बाहेरीही स्वभुवनि वसवी जानकीचाचि कांत ।
तीर्थक्षेत्रे त्यजुनि सगळी राहिला मंदिरी या ।
हे गोविंदस्मरण तुमचे चित्त हे साठवू द्या ।।३।।
कीर्ती सत्ता धन यश जगी इच्छिती लोक सारे ।
या मोहांना ढकलुनि जगी भक्तिमार्गा चला रे ।
ऐसे लोका विनवित तुम्ही त्याच मार्गे निघाला ।
हे गोविंदस्मरण तुमचे शांतवू दे मनाला ।।४।।
निष्ठा भक्ती प्रिय गुरूपदी भाव ठेवून नित्य ।
श्रीरामाचा विमल गुण संकीर्तनी भाव सत्य ।
आत्मारामी रमवि स्थिरवी भाववृत्ती जनांच्या ।
हे गोविंदस्मरण तुमचे येऊ दे नित्य वाचा ।।५।।
कायादु:खे कधि न करिती खिन्न या सज्जनाला ।
संसाराच्या कुटिल विपदा वारिती ना जयाला ।
राहे ज्याची अमल मति या नामसंकीर्तनात ।
हे गोविंदस्मरण तुमचे राहु दे मन्मनात ।।६।।
सौजन्याने सुमधुर वचने वेधिले सज्जनांना ।
नाना यत्ने सुफलित करिती साधनी साधकांना ।
काना मात्र कधि न चुकती नित्यनेमात यांच्या ।
हे गोविंदस्मरण तुमचे तोडि पाशा भवाच्या ।।७।।
जे जे गेले तरुनि जगती तोडुनी काळपाशा ।
ते ते मागे अमर असती भक्तकाजा हमेशा ।
ऐसे तुमचे सुवचन असे विश्वसू त्याच बोला ।
हे गोविंदस्मरण तुमचे थोर आशा मनाला ।।८।।

**- (गोचमा, पृ. १३७-१३८)**

(२६)

गोविंदचरणी ग्रंथ ठेऊनि नमितो पदी । पुण्यस्मरण राहो ही प्रार्थना एक अंतरी ।।

**(गोचमा, पृ.१५२)**

(२७)

हनुमंत आदेश प्राणासमान । गोविंद नेमे करि नामकीर्तन ।
सेवा घडे सेवकबुद्धीने ही । पदांबुजी बालक राम राही ।।

**- श्रीदासराममहाराज**

(२८)

ज्यांचे वर्तन शुद्ध सात्त्विक असे लोकी बहु मान्य जे ।
नित्य श्रीहरिकीर्तनी रमुनिया झाले जगी धन्य जे ।
ज्यांची भक्ति विरक्ति शांति बधुनी गुरूवर्य हेलावले ।
त्या गोविंद गुरूवरा नमुनि हे वाक्पुष्प मी अर्पिले ।।

**- विष्णु गणेश तथा अण्णा कुलकर्णी** (पुणे) (अमृतवाणी)

**(२९) (आर्याछंद)**

वामनराव गुळवणी देव तुम्हा म्हणती काय हो मामा ।
छायाचित्रा पाहुनि ओसंडे काय हा असा प्रेमा ।।१।।
पुष्पहार देवासी घालाया कष्ट काय ते कसले ।
प्रकृति अस्वास्थ्यातही ऐसे वदुनि तसेच जे उठले ।।२।।
पुष्पहार अर्पियला संताते सत्य थोर संतांनी ।
संतचि संता जाणती हेचि खरे दाविलेची वर्म जनी ।।३।।
ओळखिले नाही कुणी वदले हे संत म्हणती साश्चर्य ।
ऐकुनि दचकुनि सारे पहाती संतासि सत्य आश्चर्य ।।४।।
परम ने घालुनि महाराज फार या जगती ।



कोणी आले पुढती पाय जुळविती तसेच त्या पुढती ।।५।।
तसे नव्हती हे मामा देवचि जे होऊनि जगी ठेले ।
वामनराव हे त्याने तुम्ही नाहि कोणि ओळखिले ।।६।।
तात्या आनंदुनी हे करिती कथन सत्य साच नरहरीसी ।
आनंदाच्या ऊर्मी भिडल्या चित्तात तेचि अघ नाशी ।।७।।

**- न. दा. दिवेकर,** (वही ५०)

(३०)

श्रीमन्मंगल मूर्ती गणपति पदकमली नमन प्रारंभी ।
करूनी श्रीवाग्देवी पदकमली नमन काव्य आरंभी ।।१।।
गोविंद गुरूवराते अनन्यभावे करूनिया नमन ।
वर्णन गुरूचरिताचे करण्या सजलो सुकाव्य हे नमन ।।२।।

**(३१) (शार्दूलविक्रीडित)**

कृष्णातीरी प्रसिद्ध सांगलिपुरी वास्तव्य ज्यांचे बरे ।
ज्यांची वृत्ति अखंड रंगली असे हरिकीर्तनी आदरे ।
केला पावन पुण्यरूप अवघा संसार ज्यांनी सुखे ।
त्या श्रीसद्गुरु बापूराव चरिता मी काय वर्णू शके ।।१।।

**(३२) (मंदारमाला)**

बापूराव अभिधान जयांचे । रामनाम वदनी नित नाचे ।
केळकराख्यं कुळि जन्म जयांचा । कीर्तिघोष जगि विश्रुत त्यांचा ।।

**(३३) (शार्दूलविक्रीडित)**

त्यांनी सन्मतीने कृति करुनिया सत्कीर्ति संपादिली ।
गुर्वाज्ञे हरिकीर्तनी निजतनू अत्यादरे झिजविली ।
केला पावन वंश भ्रंश मतीला ज्यांच्या न झाला लव ।
सत्कर्मी धन आयु खर्च करूनी स्वाधीन केला भव ।।१।।

(३४) (शार्दूलविक्रीडित)

त्यांनी श्रीहनुमंत संत गुरूची आज्ञा शिरी वंदुनी ।
केली अर्पण कीर्तनी निजतनू सर्वस्वही अर्पुनी ।
केला पावन वंश कंसरिपुचे नामी गुणी रंगुनी ।
झाले धन्य जगी हरि गुरूकृपे मामा हरिकीर्तनी ।।

(३५) (आर्या)

जागृति स्वप्न सुषुप्ति उन्मनी माजीही नित्य श्रीहरीचे
कीर्तन, अन्य न चिंतन भूषण गुरूराज सांगली पुरीचे ।।१।।

(३६) (आर्या)

हनुमंत संत गुरूचे सत्यचि हे बापुराव लडिवाळ ।
गुरूभक्त धन्य जगती तत्पद कमली सदैव मम भाळ ।

**- वि. ना. ऊर्फ अण्णा कुलकर्णी**

## (३७) श्रीराम समर्थ

असे सांगली रम्य कृष्णा तटानी । इथे जाहले संत विख्यात ज्ञानी ।
रमे कीर्तनी ज्या स्वये चापपाणी । स्मरा कीर्तनानंद गोविंद ध्यानी ।।१।।
शिवभक्त अनंत बहु पुण्यवंत । पार्थिव शिवलिंग पूजा करीत ।
अवतार तेथे निजरूप खाणी । स्मरा कीर्तनानंद गोविंद ध्यानी ।।२।।
ज्ञानेश्वरी पाठ ते सत्य केला । स्वये ओळला ज्ञानराजा तयाला ।।
प्रपंची विरक्ती करी, भक्ती नामी । स्मरा कीर्तनानंद गोविंद ध्यानी ।।३।।
हनुमंत राजे कृपा पूर्णतेचा । प्रसाद आदेश हरी कीर्तनाचा ।।
स्वये कीर्तनी आयुसाफल्य मानी । स्मरा कीर्तनानंद गोविंद ध्यानी ।।४।।
जया कीर्तनी नाम गंगा ती खेळे । गुरूराज ते भक्ती मोदात डोले ।।
परब्रह्म आले सुखा याच स्थानी । स्मरा कीर्तनानंद गोविंद ध्यानी ।।५।।



पुरश्चरण तेराक्षरी मंत्री केले । सदा साधनी अंतरी चालविले ।।
मुदे रंगली रामनामी ती वाणी । स्मरा कीर्तनानंद गोविंद ध्यानी ।।६।।
अद्वैत तेणे संत बहु संत भक्ती । सुखे रामनिकेतनी संत येती ।।
सदा भक्ती प्रेमे तया लागी वाणी । स्मरा कीर्तनानंद गोविंद ध्यानी ।।७।।
गोविंद गोविंद अखंडीत वाणी । गोविंद नामे तरतील प्राणी ।।
गोविंद वचने कैवल्य दानी । स्मरा कीर्तनानंद गोविंद ध्यानी ।।८।।

**- ल. के. कुलकर्णी**

## पदे

(१)

रामनामाची गोडी मला लावली ।
किती दयाळू गुरू माझी माऊली ।।ध्रु।।
बहुरंगी हा संसार । काम क्रोध हे जलचर ।
शांतिसुखाची भूल मला पडली ।।१।।
या देहाची सोडिली माया । हाक मारिते सद्‌गुरुराया ।
एका क्षणात वाट मला दाविली ।।२।।
मनासारखा दिला मला वर । माझे मस्तकी ठेविला कर ।
मोक्षपदाची वाट मला दाविली ।।३।।
आले जन्माचे सार्थक केले । मला संतांचे दरबारी नेले ।
गोविंदरायानी कृपा हो केली ।।४।।

**- सौ. सोनुताई माने,** सांगली

(२)

साष्टांग नमन हे माझे गोविंदा तव चरणाते ।
आशीर्वचा तव लुब्ध सेवका घेई पदराते ।।ध्रु।।
गांजलो अति संसारी । आशा न सुखाची परी ।

दिसते दु:खची आता पदरी ।
अद्‌वैता मज सांगा यातून अंती काय उरे ते ।।१।।
संसारसंगे परमार्थ केला । मोक्षाचा ना मार्ग गवसला ।
का परमार्थ ही माझा चुकला ।
संसार तैसा परमार्थही त्वा पोहचविला शिखराते ।।२।।
मति कुंठित माझी झाली । विवेकास ती आता थकली।
जीवननौका बुडू लागली ।
रामनाम जप निशिदिनी स्मरणे तरणोपाया ते ।।३।।

- **रवींद्र कुलकर्णी,** सांगली

(३)

पायाजवळी गोविंदानी मजला जागा द्यावी ।
एक लाख नामाची ही पुनरावृत्ति व्हावी ।।ध्रु।।
भक्त मी जरी तुझा अमंगळ । हृदयाने जरी नसेल निर्मळ ।
या भक्ताची एकच इच्छा प्रभूची आरती गावी ।।१।।
असंख्य पडतील फुले तुझ्यावर । त्यात घालितो पाकळीची भर ।
गोविंदाची स्मृतिज्योत ही अशीच तेवत रहावी ।।२।।
तग धरितो मी तुझिया चरणी । अक्षय जर मग बनेल वाणी ।
आशा माझी पूर्ण कराया शक्ती मजला द्यावी ।।३।।
वाढत जाण्या प्रभूची भक्ती । अशीच व्हावी पुनरावृत्ती ।
अखंड या नामस्मरणे जीवननौका तडीस जावी ।।४।।

- **नंदकुमार महिपत दिवाण,** सांगली

(४)

एकनाथ पैठण वाला । सांगली आवडली त्याला ।।ध्रु.।।
पंचक्रोशी ही दत्तप्रभूची । कृष्णा वाहे अमृतजलाची ।
पावन भूमि तपोवनाची । स्थान पाहुनी धाला ।।१।।



कुलसंशोधन करिता करिता । केळकरांचे आले चित्ता ।
अनंत तनुची घेऊनी सत्ता । राधाकुशी अवतरला ।।२।।
एकनाथ गोविंद जहाला । हनुमंताची दीक्षा त्याला ।
नामरसाचा पिऊनि प्याला । रंगी रंगुनि गेला ।।३।।
दासबोध हरिपाठ भागवत । ज्ञानेश्वरी रामायण सांगत ।
प्रवचन कीर्तन रंगी नाचत । डोलवी श्रोतृगणाला ।।४।।
पैठण क्षेत्री अतृप्त हेतु । सांगलीत पूर्णेच्छा होतु ।
हरिभक्तीचा कळस डोळतू । पांडुरंग मनी भरला ।।५।।

**(५)**

पुरा गोंदा म्हणुनी गुंडा सांगे मजला ।।ध्रु।।
म्हणुनिया दर्शना आलो । पाहुनि समाधान पावलो ।
आनंदात रंगुनि गेलो । दिन चांगला ।।१।।
गुंडुबुवा विदेही साधु । शक्ति विलक्षण अगाधू ।
परी हा तो सुखसंवादू । कैसा घडला ।।२।।
गुंडु बुवा आणि हा गोंदा । त्यांनी केले परमानंदा ।
पांडुरंग रामानंदा । ठायी जडला ।।३।।

- **पांडुरंगमहाराज ताम्हनकर**

**(६)**

मामा निजधामी चालले । मामा निजधामी चालले ।।ध्रु।।
परा मध्यमा पार करोनी । देहातीत झाले ।
आले सद्‌गुरु देवही आले । निज भक्तासी पाहुनी रमले ।
सवे घेऊनी आपुल्या रूपा । वैकुंठा चालले ।।१।।
अद्‌वैताचे जगती रंगून । स्वये जाहले चिन्मय चिद्‌घन ।
घोष करोनी श्रीरामाचा । रामरूप झाले ।।२।।

सदा स्वरूपी रमला डोळा । जग भासे मायेचा गोळा ।
भक्ता हाती निजसुख देऊन । स्वानंदी रंगले ।।३।।
नील ज्योत ही नयनी प्रगटे । वाचे मधुनी नामही उमटे ।
दिक्कालाचे तोडून अंतर । ब्रह्मपदी गेले ।।४।।
नारद तुंबर गगनी येती । पंचारती सप्रेमे करती ।
हात जोडोनि काळ थांबला । राम राम बोले ।।५।।

**- अनामिक (अकी, पृ. १४४)**

**(७)**

श्रीराम जयराम जय जय राम अखंड ही सेवा ।
नाम गुरूंचे पडता श्रवणी । त्रिताप जाती लया निघोन ।
अनुभव घ्यावा ।।१।।
नाम प्रभूचे वदता वाचे । मग भवभय त्या नुरेचि साचे ।
शेवटीचा धावा ।।२।।
श्वासोच्छ्वासी सद्‌गुरु ध्यानी । हनुमंत माऊली हृदयस्थानी ।
श्रीराम प्रगटे नामस्मरणी । गुणनिधि हा गावा ।।३।।
अडतीस वर्षे कीर्तनसेवा । नाम मुखातिल अृमतठेवा ।
सुखवितसे जीवा ।।४।।
मूढ होऊनी गुणरसपानी । विष्णुसुता ही लागे चरणी ।
प्रसाद हा घ्यावा ।।५।।

**- सौ. विष्णुसुता (गोचमा, पृ. १२४)**

**(८)**

**(बेच्या पाढ्यात श्रीमामा)**

बे एके बे । गोविंद नाम तू घे ।।१।।
बे दुणे चार । गोविंदावरी सर्वही भार ।।२।।



बे त्रिक सहा । गोविंद कीर्तनी तू रहा ।।३।।
बे चोक आठ । साधन कर कट्टा ।।४।।
बे पंचे दहा । गोविंद मुख पहा ।।५।।
बे सख्ख बारा । गोविंदराज आले घरा ।।६।।
बे साती चौदा । गोविंद सदानंदी सदा ।।७।।
बे आठ्ठी सोळा । गोविंदाचा कीर्तन सोहळा ।।८।।
बे नव्वे अठरा । कीर्तनी देहभाव विसरा ।।९।।
बे दाहे वीस । भक्त गोविंद दास ।।१०।।

**- अनामिक**

**(९)**

मामा अजरामर भक्तास ।।ध्रु।।
अभंग वाङमय सुमधुर तुमचे । गोड घास हे कैवल्याचे ।
सुखविल रिझविल मन सुजनांचे । समाधान जीवास ।।१।।
ब्रह्म वीणा अंकावर घेऊनी । हृदयाच्या तारा आवळुनी ।
छालिक्याच्या गुंग गायनी । भरते शांत रसास ।।२।।
तार सुनो भाई रामनाम की । चिरसुखार्थ तू हो एकाकी ।
नरजन्मी करी चुकती बाकी । सुटका ही जीवास ।।३।।
थोर कळवळा मामा तुमचा । अज्ञ जना आधार सुखाचा ।
म्हणुनी ओढे जीव आमुचा । पुन्हा भेट घेण्यास ।।४।।
विचारधन हे अमोल तुमचे । ज्ञानदीप हे मार्गावरचे ।
आणितील हे क्षण भाग्याचे । घेता अर्थ मनास ।।५।।
ज्ञानापेक्षा कृती वाढवा । नामस्मरणे हृदय रंगवा ।
साधनमार्गी आणा जीवा । हाची बोध मनास ।।६।।
अभ्यासी जा राहील यत्ने । त्याची सगळी हरतील विघ्ने ।
ऐसे तुमचे सुगम सांगणे । मनी ठरे विश्वास ।।७।।

नरात प्रगटी हरी कशाने । मनी धरा मामांची वचने ।
जन्मसफलता श्रवणे मनने । लागता निदिध्यास ।।८।।

**- न. दा. दिवेकर,** (अमृतवाणी)

**(१०)**

सूक्ष्म देह हा धारण करूनी आपुल्या सदनी वास करी ।
पुत्र मुखाने वदते झाले राम राम हा मंत्र धरी ।।१।।
त्याच गुरूंच्या पुण्यतिथीला जमती भाविक किती ।
भक्तिरसाची सरिता पाहून कुंठित झाली मती ।।२।।
समाधीचे मग घेता दर्शन जोडून दो हस्तक ।
आशीर्वाद ते मागून घेण्या झाले नत मस्तक ।।३।।
कीर्तनात मग रंगून जाता नाम मुखी स्फुरले ।
श्रीरामाचा गजर ऐकता मद मत्सर विरले ।।४।।
प्रसाद घेऊन घरी परतला भक्तांचा मेळा ।
सुखावलेले नयन बोलती अगम्य हा सोहळा ।।५।।
सतेज राहो काव्य पुष्प हे गुरूचे चरणावर ।
विनयभावे कमला विनवी जोडून दोन्ही कर ।।६।।

**- सौ. कमलिनी गोखले**

(मामामहाराज केळकर, केसरी पुरवणी, २७-२-१९८८)

**(११)**

प्रभात काळी कुणी किती हे दीप लाविले तरी ।
फाकली प्रभा पहा अंतरी ।।ध्रु।।
ही हाती कुणाच्या ज्ञान ज्योत तेवते ।
हे नेत्री कुणाच्या प्रेमसलिल तरळते ।
हे गंगाजल हृदयीचे मज वाटते ।
किती कळवळा किती जिव्हाळा आम्हा दीनावरी ।।१।।



हे सद्‌विचार पक्वान्न मधुर तरी किती ।
सेविता भूक वाढते सांगू तरी किती ।
तव शब्द गोड मम अंतर किती खुलविती ।
अकृत्रिम हे प्रेम विलोकुनी डोले मन अंतरी ।।२।।
हे नामसाधनी कोण रंगले पहा ।
हे ब्रह्मानंदी कोण गुंतले पहा ।
ही अद्‌भुत शक्ती कोठून आली महा ।
कोण दयाळू कोण कृपाळू प्रसन्न आम्हावरी ।।३।।
या अविरत कीर्तनधारा स्रवती मही ।
या संत वचन अमृतात या सर्वही ।
या माया मोही पडू नका कोणी ही ।
आवर्जुनी हे कोण वाहती कोण प्रेम अंतरी ।।४।।
हा गौरवर्ण निष्कलंक चारित्र्य हे ।
ही तुंदिल तनु आणि मंद हास्य वदन हे ।
ही भक्ति मूर्ति साकार भाग्य थोर हे ।
कोण दुजे गोविंद सद्‌गुरु माऊली वाचुनी तरी ।।५।।
हे दीप लागले असंख्य हृदयांतरी ।
ज्या तेजे धाके मायासुर अंतरी ।
ज्या प्रकाशात मन विरे सौख्य सागरी ।
उपकाराच्या भारे टेके मस्तक चरणावरी ।।६।।

**- न. दा. दिवेकर,** (वही ५०)

**(१२)**

गोविंदरायांनी किमया केली । पहा सांगली पंढरी जहाली ।।ध्रु।।
गुरूकृपेचे हे फळ । केले भवाचे निर्मूळ ।
नामस्मरणाने निद्रा जिंकिली ।।१।।
अडतीस वर्षे केले कीर्तन । एकही दिवस न खंड जाण ।

तात्यासाहेबांनी मुद्रा दिली ।।२।।
मम प्रार्थना संतचरणी । कीर्तनसेवा व्हावी अजुनी ।
नामामृताने वृत्ति रंगली ।।३।।
हलके अंग रहाण्यासाठी । कडूलिंब रस घेती वाटी ।
गोमूत्राची भाकरी खाल्ली ।।४।।
गाव सोडुनी नाही गेले । नोकरीसी त्याज्य मानिले ।
साडेतीन कोटींची पुरश्चरणे केली ।।५।।
ज्ञानेशांचे दर्शन झाले । स्वहस्ते चित्र रेखिले ।
हनुमंत माऊली प्रगटली ।।६।।

**- इंदिराबाई केळकर**

**(१३)**

ब्रह्मरूपी तुम्ही मिळोनि गेले । मन निष्ठुर का केले ।।ध्रु।।
आमुचा कंटाळा आला । अवचित मजवरी पडला घाला ।
हे हृद्गद नाही कळले ।।१।।
भक्त लोक आणि पुत्र स्नुषाही । चौघे नातू असतानाही ।
मोहामध्ये नच सापडले ।।२।।
अडतीस वर्षे कीर्तन करूनी । सद्गुरु आज्ञा स्वीकारोनी ।
द्रव्यासी तुम्ही नाही शिवले ।।३।।
प्रपंच परमार्थ दोनी केला । गरीबांचा तव दाता झाला ।
शक्तीनुसार द्रव्य दिले ।।४।।
बालपणी बहु कष्ट केले । परमार्थाकडे लक्ष लाविले ।
धन्य जगी या झाले झाले ।।५।।
ज्ञानेशांचे दर्शन झाले । हनुमंत गुरू प्रत्यक्ष पाहिले ।
धन्य मातेच्या पोटी आले ।।६।।
संतसंग मजला घडला । परी तो मजला नाही कळला ।
अंतरी गुप्तची ठेले ।।७।।



**- इंदिराबाई केळकर**

**(१४)**

ज्ञान घेवोनिया गोविंद जन्मला । अखंड कीर्तनी देह रंगविला ।।१।।
अनंत जनासी मार्ग दावियेला । दासराम सुत त्यांनी जानविला ।।२।।
हनुमंत वर जयासी लाभला । गोविंदाचा छंद जनासी लागला ।।३।।
नारदाची गादी दासराम गृही । शुद्ध परंपरा दासराम देही ।।४।।
धन्य परंपरा धन्य तो गोविंद । धन्य दासराम कीर्तनाचा छंद ।।५।।
पाहोनिया गृह जहाले मंदिर । हरि हृदयात रामाचा आदर ।।६।।
दामोदर सुत नमस्कार घ्यावा । सर्व संतजना आदर सांगावा ।।७।।

**- हरिबाबा दीक्षित,** (वही ५०)

**(१५) (गोदूची भाक)**

सांगलीत तत्त्वनिष्ठ । केळकर हरीचे भक्त ।।१।।
ज्ञानाचे पूर्ण सागर । संतांचे माहेर घर ।।२।।
समाधान शांत ते वदन । वृत्तीत नांदे आनंद ।।३।।
वृत्तीत नांदे आनंद । नामाचा लागला छंद ।।४।।
शुद्ध बुद्धी केले आसन । निर्विकल्प वर बसून ।।५।।
भक्तीने केले पूजन । रघुवीर देई वरदान ।।६।।
ऐसे करा काही साधन । मुमुक्षु जाती तरून ।।७।।
प्रभु गोदूची भाक परी होऊ दे । मम जप तप नाम जप तप ।।८।।

**- सौ. गोदुताई पटवर्धन,** (गुरूतृतीया)

**(१६)**

शिवांतरीचे कीर्तन केले गोविंदरायाने ।
सिद्धलिंग हे कसे झळकते डोले आनंदाने ।।१।।
भव्य सुंदर कला कुसरी देऊळ शिवाचे ।
सात पायऱ्यावरी चौकी चढून पहायाचे ।।२।।

गजाननाचे देऊळ जैसे असे सांगलीचे ।
परि हे देऊळ शंकराचे उलटून पहायाचे ।।३।।
ऐशा मंगल महादेवालयी कीर्तन जे रंगले ।
रंगी रंगुनी संत गोविंद अघटित बोले ।।४।।
वेद आम्हावरी रुसला त्याच्या बाला कंठी धरिले ।
स्वयंभू पिंडी पंचगंगेचे नीर उचंबळले ।।५।।
साधे वसन हिरवा रुमाल शिर कमली शोभे ।
अंगी मेखला व्याघ्राची ते शंकर जैसे उभे ।।६।।
कथा त्रिवेणी संगमाचे मज्जन बहु झाले ।
वक्ता श्रोता रंगी रंगुनी देहभान नुरले ।।७।।
श्रोते म्हणती 'गणपतराव' याहो इकडे वेगे ।
ज्यांचे कृपे सकळ घडले 'धरी चरण' सांगे ।।८।।
गोविंदाचे पुत्ररत्न कर जोडुनी उभे ।
पतिव्रता पत्नी ती ही असे पुढे तेथे ।।९।।
दोन प्रहरी सुखसोहळा वैशाख नवमीला ।
स्वप्नी देखुनी सद्‌गुरुकृपे आनंद गणेशाला ।।१०।।

**- गणपतराव कानिटकर**

**(१७)**

खटपट ऐसी करी रे । विजयी होई रे मनुजा ।।ध्रु।।
खटपट जरि न पटती । चित्तवृत्ती त्या उसळती ।
अग्निसंगे ज्वाळा उठती । कर्पूराच्या रे ।।१।।
काम क्रोध खवळले । मन त्यांच्या संगे रमले ।
होते नव्हते तेही सरले । रिकामाची रे ।।२।।
नित्य संसारी खटपट । सदा विषयी लंपट ।
लावी मना नामी चट । सुखी होसी रे ।।३।।



गोविंद ते पितृवत् । सदा अंतरी होशात ।
बालकाची ऐकुनी मात । कवतूक करती रे ।।४।।
माझे सद्‌गुरु दयाळ । गणेशाचे लडिवाळ ।
पुरवी मनीचे ते खेळ । खट पटवी रे ।।५।।

**- गणपतराव कानिटकर**

**(१८)**

चला गड्यानो जाऊ चला पंढरीला ।
नाचत जाऊ पंढरीला ।।धृ।।
रामकृष्ण हरी म्हणत । नाचत जाऊ पंढरीला ।।१।।
अद्‌वैत मार्गाने जाऊ चला । संतांच्या मार्गाने जाऊ चला ।।२।।
संत बापूरावजी सांगुनी गेले । भक्तिमार्गाने जाऊ चला ।।३।।
राम कृष्ण हरि म्हणत । नाचत जाऊ पंढरीला ।।४।।

**- महादेव रामचंद्र बेळगली,** चिमड

(१९)

राम राम राम राम राम नाम गा मना ।
तेणे तुजसी सौख्य होय चुकती सकल यातना ।।१।।
तरावया भवपार हरिनाम आधार ।
घे चुकवुनी येरझार ऐक सज्जना ।।२।।
राम नाम भरूनी जहाज कृष्णातीरी आले सहज ।
तेथे असती हनुमंतराज दिधले भाविक जना ।।३।।
एक भाग सुता दिला दुसरा गोविंदरायाला ।
तिसरा वेणूने उचलीला नमुनी गुरूचरणा ।।४।।
वाटे हे भूवैकुंठ राम नाम गजर थाट ।
अमृताची होते लूट तूट येईना कुणा ।।५।।
ठायी ठायी कीर्तनपाठ पापाशी न चले वाट ।

नाम महिमा सांगती स्पष्ट कष्ट नाही रे कुणा ।।६।।
संतसंगतीचा लाभ जेणे जोडे पद्मनाभ ।
म्हणे सरस्वती जाग जाग आठवी प्रभू चरणा ।।७।।

**- सरस्वतीबाई कानिटकर**

# अभंग

**(१)**

कष्टविला देह राबविले मन । संसारी असोन विरक्त हा ।।१।।
देही वा विदेही पूर्ण समाधानी । आनंद निधानी लक्ष सदा ।।२।।
अडतीस वर्षे केला कीर्तनाचा छंद । हृदयी परमानंद श्रोतयांच्या ।।३।
परमार्थाची केली उभी पाठशाळा । आनंदी गोपाळा भक्तवेळा ।।४।।
करोनिया सांगे सांगोनि करवी । भक्ता मोक्ष पदवी निश्चयाची ।।

**- न.दा.दिवेकर**

**(२)**

अनंतचा पुत्र अनंताची ठाव । गंगाजळ भाव हनुमंती ।।१।।
देहाची कुर्वंडी रामनामासाठी । जीव शिवा भेटी रात्रं दिन ।।२।।
वैराग्याची सीमा विवेक कवळी । दीप्ति उजळली आत्मज्योति ।।३।।
अंतर्मुख वृत्ति नोहे सोंगढोंग । अपूर्व तो रंग अध्यात्माचा ।।४।।
धन्य धन्य काया क्षण नोहे वाया । नामकीर्ती गाया साकारला ।।५।।
निर्गुण गुण शांतविले बंड । नित्य नेम खंड पडो नेदी ।।६।।
मौन्यगर्भयुक्त शांतीचा पुतळा । सागर हेलावला गुरूकृपा ।।७।।
कलियुगी नवलाव दाविला आचार । ब्रह्मरस साचार रिचविला ।।८।।
कोण पुण्य यांचे संत येती घरा । श्रीराम सोयरा पाठी उभा ।।९।।
धन्य कृष्णातीरी रामनिकेतन । योग्यांचे निधान बापूराव ।।१०।।
बापु ओळखिला तापु निवारला । झेंडा उभारला वैकुंठपीठी ।।११।।
जड जीवा झाले तारण तरोनी । भूलोक भरोनी नामकथे ।।१३।।



शब्दांचा पुरेना आवाका वर्णाया । तुझी संतराय धन्य मात ।।१३।।

**- प्रा. ना. य. कुलकर्णी,** ब्रह्मपुरी

**(३)**

अव्याहत केले कीर्तन चांगले । गोविंद रंगले रामरंगी ।।१।।
रामरंगी रंग रंगुनि सुरंग । होऊनिया दंग अभंगात ।।२।।
गीती गीते गावी ओवी आठवावी । वाणी ते गुंफावी नाममाळा ।।३।।
नाममाळा जप नाममाळा जप । रामरूपी लय सांगताती ।।४।।
सांगताती थोडे आचरिता कोडे । ऐसे ज्ञान जोडे ज्यांचे पायी ।।५।।
तेचि ते गोविंद मानि तो मुकुंद । सांगतो स्वानंद साठवावा ।।६।।

**-मुकुंदबुवा रामदासी**

**(४)**

गोविंदनाम संकीर्तन । नर नव्हे तो नारायण ।।१।।
हाचि गुह्य हाचि प्रगट । साधु शिव देव निकट ।।२।।
लिंग जंगम जंगली । सांगली जहाली चांगली ।।३।।

**-नानामहाराज बर्वे**

**(५)**

कोणाच्याही मुखे निघो हरिनाम । करी पूर्ण काम समस्तासी ।।१।।
कोणाची वासना असो दे कशीही । त्यासी बाधा काही उरो नेदी ।।२।।
करूनी तल्लीन तयासी स्वरूपी । गोविंदस्वरूपी आवघा आनंद ।।३।।
मागे फिरण्याने न पवे संतोष । अधिक हव्यास धरी पुढे ।।४।।
नामाच्या हव्यासे तारिले पतित । नेणो अगणित नाना म्हणे ।।५।।

**(६)**

स्वानंदाचा गाभा । आळंदीचा देव उभा ।।१।।
गोविंदा कारणे । सांगलीसी झाले येणे ।।२।।
नाना तो लळा । सदा जपे नाममाळा ।।३।।

(७)

अनुदिन अभिनव कीर्तन चाले । हृदयी भुवनी मधु माधव डोले ।।१।।
प्राण अपान येथ मीनले । सर्वांगी चैतन्य कोंदले ।।२।।
चैतन्याची अनुपम लीला । देही विदेही मुदे नांदला ।।३।।
गोविंदी आनंद वर्षला । त्याची चाले कीर्तन लीला ।।४।।
नानासी तो आनंद झाला । आनंदे संतोष दाटला ।।५।।

**-नानामहाराज बर्वे**

(८)

बापूराव केळकर । भगवद्भक्त श्रेष्ठ थोर ।।१।।
साडेतीन कोटी पुरश्चरण । करिता झाले प्रभुदर्शन ।।२।।
मारूतिराय धावुनि आले । भक्ता घरी उभे ठेले ।।३।।
सर्व विघ्ने सारूनी दूर । वश केला परमेश्वर ।।४।।
नोकरीची बदली केली । पुढे आपत्ती ठाकली ।।५।।
परमेश्वरे पाहिला अंत । काय करितो आपुला भक्त ।।६।।
स्थलांतर न करीन । गेले संकल्पी बोलून ।।७।।
एका हरिभक्तीसाठी । नोकरीसी पाडिली तुटी ।।८।।
मोठी नोकरी लाथाडिली । काय सोपी गोष्ट झाली ।।९।।
रामचंद्रा आवडे भक्त । म्हणुनी प्रेमे गाईले गीत ।।१०।।

**- रामानंदमहाराज खटावकर**, खटाव

(९)

ज्याच्या प्रकाशे दिनमणि हा प्रकाशे । स्वयंप्रकाशित देहीच वसे ।।१।।
तो म्यां पाहिलासे नयनाच्या नयने । ज्याच्या विरहित सर्वही उणे ।।२।।
ज्याच्या प्रकाशाने शशिबिंब विलसे । ज्याच्या प्रकाशाने विद्युत भासे ।।३।।
गोविंदाचे हे मन गुंगूनिया गेले । रामनामी ठेले स्वयंप्रकाशी ।।४।।



**(गोचमा, पृ. १४५)**

(१०)

सदाशिव उपासना । करिती नाना सर्वस्वे ।।१।।
शिवस्वरूप झाली काया । जन्म द्या या गोविंदा ।।२।।
नाम नीळकंठी वसे । तेचि होतसे साकार ।।३।।
रामरूपे अवतरे । झाले रे महाभाग्य ।।४।।

**- न. दा. दिवेकर** (गुरूतृतीया)

(११)

अनंताचे उदरी प्रगटे गोविंद । एक धरी छंद रामनाम ।।१।।
रामनामे केला रामची साकार । तारावया नर भवसिंधु ।।२।।
भवसिंधु कैसे भक्त पार होती । दाखवी प्रचीती रोकडी हा ।।३।।
रोकडे हे भाग्य आले अभाग्यासी । विश्वास वचनासी धरिलिया ।।४।।

**- न. दा. दिवेकर** (गुरूतृतीया पृ. १९)

(१२)

ऐकाहो सज्जन अठराशे दहात । फाल्गुन शुद्धात दशमीला ।।१।।
पर्व काळ आला जन्मोत्सव झाला । आनंद राधेला पुत्रास्तव ।।२।।
अंताजीपंतांना गगन ठेंगणे । झाली पुरश्चरणे फलद्रूप ।।३।।
सदाशिव कंठी धरी रामनाम । तेचि येथे प्रेम प्रत्ययासी ।।४।।
अंताजीपंतांना शंकराचा ध्यास । रामनामी आस पुत्रालागी ।।५।।

(१३)

नाम ठेविले गोविंद । झाला आनंदी आनंद ।।१।।
भक्ति प्रेम घेऊनी आला । सदा आळवी देवाला ।।२।।
ऐके गोष्टी देऊनी कान । संत देव आणि पुराण ।।३।।
बाळ गोपाळांच्या मेळी । त्याच गोष्टी सांज सकाळी ।।४।।

(१४)

झाले उपनयन सुरू झाली शाळा । व्यायामाचा लळा गोविंदासी ।।१।।
ब्राह्म मुहूर्तासी होवोनि सावध । पाठ करी शुद्ध संस्कृताचे ।।२।।
व्यायामाची थोर आवडी धरोनी । हनुमंत ध्यानी तन्मय तो ।।३।।
माता पिता आणि शिक्षक म्हणती । सालस विद्यार्थी गोविंद हा ।।४।।
प्रेम संपादन सर्वांचे करून । चालवी शिक्षण मनोभावे ।।५।।

**- न. दा. दिवेकर**

(१५)

धन्य ते आळंदी पिंपळाचा पार । स्वये ज्ञानेश्वर उभे ठेले ।।१।।
ज्ञानेश्वरमाऊलीचे चित्र रेखाटिले । नाथपंथी दर्शन मन जहाले ।।२।।
समचरण दृष्टी पांडुरंग अवतार । जाहले साकार धन्य धन्य ।।३।।
गोविंदाचे गृही येवोनि राहिले । संती न्याहाळिले प्रेमभरे ।।४।।
दामोदर सुत लागे चरणासी । समाधान त्यासी पूर्ण झाले ।।५।।

**-हरिबाबा दीक्षित,** (वही ५०)

(१६)

मम पितयासम गोविंद । भोगिताती स्वरूपानंद ।।१।।
दुर्बुद्धीचा सोडा संग । धरा तुम्ही संत संग ।।२।।
दास गणेश मतिमंद । सांगे धरा नाम छंद ।।

(१७)

अनंत नंदना राधिकेच्या सुता । सद्गुरु तो दाता हनुमंतराय ।।१।।
अखंड कीर्तनी प्रेमाचे कल्लोळ । झांज चिपळ्या टाळ झणझणती ।।२।।
गुरूकृपे घुमती अंतरीची माळ । कंठी तुळसी माळ दिली पांडुरंगे ।।३।।
आनंदी आनंद सुखाचा सोहळा । बाळ गणेशाला दिला गोविंदे ।।४।।

**- गणपतराव कानिटकर**



(१८)

धन्य गोविंद गोविंद । दृढ धरी नाम छंद ।।१।।
बाळपणी कष्ट सोशिले । जगा अनुभवे दाविले ।।२।।
खाऊनी गोमूत्र भाकरी । दावी पुरश्चरण थोरी ।।३।।
औटकोटी पुरश्चरण । देती भेटी हनुमान ।।४।।
धन्य धन्य कुलदीपक । सत्य सत्य ऐसी भाक ।।५।।
दृढ निश्चयाचा मेरू । कीर्तनी नाचती सद्गुरु ।।६।।
हेमधामी आणि विरामी । ज्यांची दृष्टि हो निष्कामी ।।७।।
दया क्षमा शांति सागर । सर्वांवरी प्रेम फार ।।८।।
आडनाव केळकर । खरोखरी गोड फार ।।९।।
गुरूपादुका मिळाल्या । बहु आनंदी आनंद झाला ।।१०।।
खुणेसाठी सोमवारी । व्रतालागी मौन धरी ।।११।।
शिवरात्री उदक सोडिले । तेरा कोटी अक्षरी धरिले ।।१२।।
ऐसा खरा सद्गुरु भक्त । सदा विषयी विरक्त ।।१३।।
ऐसे संतराज गोविंद । सर्वा लाविती कीर्तनछंद ।।१४।।
कीर्तनरंगी रंगता वृत्ती । चराचर प्रेमे डुलती ।।१५।।
प्रेमे गणेश बालकाला । कीर्तन सोहळा दाविला ।।१६।।
म्हणुनिया त्यांचे पायी । दास विश्रामला ठायी ।।१७।।

(१९)

सर्व सुखाचा हा गाभा । आळंदीचा राव माझा ।।१।।
महाद्वारी ते नमन । प्रेम नीर नयनातून ।।२।।
सभा मंडपाचे आत । देवालय रत्नजडित ।।३।।
पाठी विठ्ठल रुक्मिणी माता । पुढे ज्ञानेश्वर दाता ।।४।।
भक्ता प्रसाद तो दिला । भाळी बुकाही लाविला ।।५।।
समाधीचे वरील बुका । दिला ज्ञानेश्वरे देखा ।।६।

संत गोविंदांच्या संगे । गणेश सुखावला सर्वांगे ।।७।।

(२०)

धन्य तुकयाचे नगर । देहूमाजी साक्षात्कार ।।१।।
तुकया कैचे संतोषले । त्यांचे लीले अघटित केले ।।२।।
भव्य इंद्रायणीचे तीरी । मत्स्यरूपे देव अवतरी ।।३।।
घर असे साधेसुधे । नाचे विठ्ठल परमानंदे ।।४।।
देव देऊळी नसता । कैची आनंदाची वार्ता ।।५।।
देव नाही तो नरदेही । कैचा शोभेल सांगा हो ।।६।।
सुंदर बंगला बांधला । दिपावीण व्यर्थ गेला ।।७।।
धन बहुत साठविले । पुत्ररत्नावीण गेले ।।८।।
कैचे नव्हे घर सुंदर । नादे डुलतो विश्वंभर ।।९।।
जैसा आळंदी सोहळा । भक्ता देहूसी आला ।।१०।।
खरा भंडारा डोंगर । सत्य सत्य साधनागार ।।११।।
प्रसाद चुरमुरे नारळ । बुका शोभे शिरकमल ।।१२।।
रम्य रम्य ती हो जागा । मिळालासे प्रसाद शेंगा ।।१३।।
मम पितयाम गोविंद । संगे मिळे गणेशानंद ।।१४।।

**- गणपतराव कानिटकर**

# पोवाडा

प्रथम नमन माझे सद्‌गुरुंना । हनुमंतरायांना संत बापूरावजींना ।
भक्तिभावे वंदन करितो त्यांना ।।१।। जी जी
नरजन्मात ज्याने परमार्थ जिंकिले ।
बापूरावजींनी जिंकिले
चिरंजीव होऊनि राहिले
त्यांचे रामनाम माझे मनात राहिले ।।२।। जी जी
नारायणराव यांचे अनुग्रह घेतले



सांगलीतच राहिले, जनतेला रामनाम दिले
ते स्वत: रामरूप होऊन गेले ।।३।। जी जी
त्यांची दृष्टी होती रामनामाकडे
आत्मस्वरुपाकडे, जनतेला उद्‌धरण्याकडे
म्हणून जनता येती बापूरावजीकडे ।।४।। जी जी
आयुष्यभर ज्यानी कीर्तन केले
बापूरावजींनी केले, रामचंद्राला प्रिय झाले
रामनामाने रामस्वरुपी राहिले ।।५।। जी जी
ते मास्तर होते सिटी हायस्कूलला
बदली झाली तासगावला, वाहून घेतले परमार्थाला
रामनामाचे जप दिले साऱ्या जनतेला ।।।। जी जी
रहाण्यासाठी घर तयार केले
अखंड कीर्तन केले, देव होऊन त्यातच राहिले
कीर्तन करण्यास रामाला सांगितले ।।७।। जी जी
सांगली गावात मानस झाले
बापूरावजींनी कृपा केले, पोवाडा गाण्यास सांगितले
मला दरसाल येण्यास सांगितले ।।८।। जी जी
ऐका ऐका तुम्ही पोवाडा ऐका
चित्त देऊन ऐका, बापूरावजींचा पोवाडा ऐका
बापूरावजींचे चरणी लीन होण्यास शिका ।।९।। जी जी
पोवाडा गाऊन मी जाणार
चिमडास मी जाणार, परत सांगलीस येणार
बापूरावजींचे चरणी मस्तक ठेवणार ।।१०।। जी जी
म्हणा आपण मुखाने रामनाम
मनाने जपा रामनाम, मुक्त करील राम राम

बापूरावजींचा बीजमंत्र रामनाम ।।११।। जी जी
राम राम जपा म्हणून सांगितले
स्वत: रामरूप झाले, चिरंजीवाला अनुग्रह दिले
रामनाम जपण्यात राम गुंग होऊन गेले ।।१२।। जी जी

**- अनामिक (वही ५०)**

# आरती

**(१)**

आरती करू गोविंदाची । धन्य ती मूर्ति श्रीप्रभूची ।।ध्रु।।
गोविंदा गोविंदी ध्यान । करीतसे सद्गुरु स्मरण ।
अखंड नामानुसंधान । वृत्ति त्या रामपायी लीन ।
**चाल :** पूजन नित्य देवाचे भजनहो अखंड रामाचे ।
जयासी मान नाही अभिमान गातो गुणगान ।
चरित्रे साधुसंतांची । वर्णितो कीर्ति मामांची ।।१।।
हनुमंते आज्ञाप्रमाण । अखंड केले कीर्तन ।
जनासी दिधले गुह्य ज्ञान । बोध तो स्वहिताचा जाण ।
**चाल :** आपण तरोनिया गेला कीर्तिरुपे मागे उरला ।
कीर्तनानंद सेवी आनंद मनासी छंद
प्राप्ति ज्या हनुमंतरायाची । वर्णितो कीर्ति मामांची ।।२।।
एकनाथ अवतार भला । सांगली ग्रामासी आला ।
अडतीस वर्षे कीर्तनाला । अखंड तल्लिन जो झाला ।
**चाल :** धन्य ते धन्य गोविंद जयासी पाहता आनंद
दास विनायक मागतो एक चरणा विनवीत
प्रतिक्षा हरि गुणगानाची । वर्णितो कीर्ति मामांची ।।३।।

**- ह. भ. प. विनायकराव कानिटकर,** सांगली



**(२)**

आरती गोविंदा । नित्य कीर्तनानंदा ।
सच्चिदानंद कंदा । गुरूलिंग साधु बोधा ।।ध्रु।।
हनुमंत सद्गुरु आज्ञे । केले अखंड कीर्तन ।
सर्वस्व वेचियेले । समर्पिले पंचप्राण ।।१।।
ब्रह्मचैतन्यादि संत । भाऊराव समर्थ ।
रामचंद्र नारायण । नाम बोधी हे कथित ।।२।।
श्रीराम जय राम जय जय राम । तेरा अक्षरे परम ।
संदेश निर्वाणीचा । पायी लोळे दासराम ।।३।।

**-दासराम**

**(३)**

जय जय सद्गुरुनाथा । ओवाळू आरती ।
जय जय जी गोविंद सच्चिदानंद मूर्ती ।
कृपायोगे लागली प्राणाची ज्योती ।
स्वात्मानंदे स्वयंतेजे झळकती ।।१।।
जयदेव जय देव जय गुरू कुलदीपका ।
निजसुख परमानंदा बुद्धि प्रबोधका ।।ध्रु।।
एकनाथ गोविंदरूपे अवतरती ।
कीर्तनगंगा श्रवणे जन हे उद्धरती ।
स्वरूपी स्वरूपाकारे आशीर्वाद देती ।
भक्ता श्रीराम जयराम जय जय राम प्राप्ती ।।२।।

**- अनामिक**

(४)

आरती हनुमंता जय जय आरती गोविंदनाथा जय जय ।।ध्रु।।
हरिकीर्तनरूप अवतरला तुम्ही । हरिकीर्तन दाता ।।१।।

हरिकीर्तनी या सहज केवळ । हरिश्रोता वक्ता ।।२।।
पांडुरंग गुरू दत्तात्रय परी । दावी निजपंथा ।।३।।

# भजने

(१)
वाटे हळुहळु चाला मुखाने गोविंद बोला ।

**- के. वा. आपटे**

(२)
गणराय आले घरा । गोविंदाचे पाय धरा ।।

**- के. वा. आपटे**

(३)
गणपति बाप्पा मोरया । जय बोला गोविंद या ।।

**- के. वा. आपटे**

(४)
आधी व्याधी समाधी सादर की दूर नाही मामा ।
बाबा चैतन्य झाले नाना चैतन्य झाले ।।

**- नानामहाराज बर्वे**

(५)
इंद्रायणी काठी श्रीज्ञाननाथ । कृष्णाकाठी गोविंदनाथ ।।

**- अनामिक**

(६)
धन्य दिवस आजी झाला सोनियाचा ।
पावला गोविंद माझा राजा कीर्तनाचा ।।

**- (अकी पृ. १६७)**

(७)
गोविंदा जय गोविंदा । कीर्तनरूप परमानंदा ।



इंदिरावर वंदी राम । हा द्या पदसेवे स्वानंदा ।

(८)
श्रीराम जयराम जय जय राम । गोविंदाचे प्रियतर नाम ।।१।।
श्रीराम जयराम जय जय राम । गोविंदा न च दुसरे काम ।।२।।
श्रीराम जयराम जय जय राम । गोविंदाचे अखंड नाम ।।३।।
श्रीराम जयराम जय जय राम । गोविंदाचे कीर्तनधाम ।।४।।
श्रीराम जयराम जय जय राम । गोविंदाचा आत्माराम ।।५।।
श्रीराम जयराम जय जय राम । गोविंदाचा विजयी राम ।।६।।
श्रीराम जयराम जय जय राम । गोविंदाचा सुपंथ नाम ।।७।।
श्रीराम जयराम जय जय राम । गोविंदाचे जीवन राम ।।८।।
श्रीराम जयराम जय जय राम । गोविंदासी खलु विश्राम ।।९।।
श्रीराम जयराम जय जय राम । गोविंदाते करी निष्काम ।।१०।।
श्रीराम जयराम जय जय राम । गोविंदाचा पूर्ण विराम ।।११।।
श्रीराम जयराम जय जय राम । गोविंदामुखी अंतरी नाम ।।१२।।
श्रीराम जयराम जय जय राम । दासराम गोविंदी आराम ।।१३।।

**- दासराममहाराज**

(९)
जय जय गोविंदराज माऊली । जय जय गुरुराज माऊली ।।ध्रु।।
जय जय ब्रह्मरूप गोविंद । जय जय गुरुराज माऊली ।।१।।
जय जय स्वामिराज गोविंद । जय जय गुरुराज माऊली ।।२।।
जय जय निराकार गोविंद । जय जय गुरुराज माऊली ।।३।।
जय जय संतराज गोविंद । जय जय गुरुराज माऊली ।।४।।
जय जय गुरूरूप गोविंद । जय जय गुरुराज माऊली ।।५।।
जय जय स्वरूपरूप गोविंद । जय जय गुरुराज माऊली ।।६।।

**- अनामिक**

# जयजयकार

**(१)**

बोला जय जयकार जय जयकार मामांचा ।
सद्गुरुनाथांचा जयजयकार जयकार ।
जय जय कार जय जय कार जय जय कार जय जय कार ।
बापूरावांचा जय जयकार जय जयकार ।।

**- सखाराम विनायक जोगळेकर**, मुंबई

**(२)**

एक दोन तीन चार । गोविंदाचा जय जयकार ।।

**(३)**

जय गोविंदा तुज अभिवादन । तव चरणी सर्वस्वसमर्पण ।।

**(अकी, पृ. १५६)**

(४)

परम सद्गुरु गोविंदाचा
जय जयकार करा करा हो
जय जयकार करा ।।धृ.।।
हनुमंताचे आज्ञेवरूनी अखंड
कीर्तन कथन करोनी
तोषवीती जगता, करा हो जयजयकार करा ।।
कीर्तन गंगा अखंड वाहे
स्नान करा हो जीवे भावे
मोक्ष मुक्तिचे पर्व साधूनी
जीवन सार्थ करा, कराहो जयजयकार करा ।।
त्रयोदशाक्षरी अखंड ठेवा
मामानी हो तुम्हास दिधला



जतन करोनी हृदयी ठेवा
नाम अखंड स्मःरा करा हो जयजयकार करा ।।
माघ नवमीचा योग साधूनी
अनंता मध्ये विलीन होऊनी
कीर्तनरूपे कीर्ति राहिली
श्रवण अखंडकरा करा हो जयजयकार करा ।।

**- गजानन कृष्णराव गोडबोले**

# शरणागति

**(१)**

गोविंदा नित्य कीर्तनानंदा । आलो शरण तुला ।।१।।
गोविंदा नामाचा तव धंदा । आलो शरण तुला ।।२।।
गोविंदा तोडिसी या भवबंधा । आलो शरण तुला ।।३।।
गोविंदा सत् चित् रूप सुखकंदा । आलो शरण तुला ।।४।।
गोविंदा जय जय निजात्म बोधा । आलो शरण तुला ।।५।।
गोविंदा पसरे कीर्ति सुगंधा । आलो शरण तुला ।।६।।
गोविंदा तारक तू मतिमंदा । आलो शरण तुला ।।७।।

**- श्रीदासराममहाराज**

**(२)**

गोविंदा गोविंदा । आता आलो शरण तुला ।।१।।
गुरूराजा गुरुराजा । आता आलो शरण तुला ।।२।।
ब्रह्मरूपी गोविंदा । आता आलो शरण तुला ।।३।।
संतराजा गोविंदा । आता आलो शरण तुला ।।४।।

**-अनामिक**

## गुरुतृतीया

### संस्कृत

**कवि :** परात्पर- हनुमंतम् । भजति च मनसा गुरुवर्यम् ।।धृ.।।
शके बाण-युग-वसु-चंद्र-मिते ।
आविर्भूतं कृष्ण-गुण-भृगु-दिने हनुमंतम् ।।१।।
गोविंदाय पठन-मग्नाय ।
गुरुं स्वीकृतासनं ब्रुवंतं मंदमंदशब्दम् ।।२।।
'कुरु त्त्वं' संतत-हरि-कीर्तनम् ।
तिरोभवंतं आशीर्वचनं मनोहारि दत्वा ।।३।।
सत्यं पूर्ववचः कृतवन्तम् ।
अतिदयालुं श्रीरघुनाथो गुरुं परम-वंद्यम् ।।४।।

**-रघुनाथ नरसिंह ओणकर**

**(२)**

कृष्णाया विमले तीरे पवित्रे सांगलीपुरे ।
अवसद् हनुमन्नाभा साधुः सर्वेषु साधुषु ।।१।।
पुरे तस्मिंश्च विमले केळकरो नाम वंशः ।
तस्मिन् वंशे भवत्येको महान् वै साधुपुरुषः ।।२।।
अनंतस्य सुतो भूत्वा गोविंद इति कीर्तितः ।
निरतः पुण्यकार्येषु निमग्नः साधनेऽमले ।।३।।
प्रतिपत्तो नवम्यंत उत्तरे माघ-पाक्षिके ।
सोऽपठद्दासबोधं वै नित्यं यतमनाः खलु ।।४।।
माघ-कृष्ण-तृतीयायां मध्यरात्रौ गुरुः स्वयम् ।
वायु-वेद-वसु-चंद्र-मितेऽब्दे शातवाहने ।५।।
गोविंदस्य पुरः प्रादुर्बभूव हनुमत्प्रभुः ।
किमयं नयनाभास इति गोविंद अंतरे ।।६।।
चिंतयन् पुनरारेभे पुस्तकं पठितुं पुरः ।



पुनर्दृष्ट्वा गुरूं तत्र विस्मयापन्नमानसः ।।७।।
झटित्युत्थाय गोविंदो गुरु-सेवा-परायणः ।
प्रावारमुमवेष्टुं हि तं जवेनाददाद् गुरूम् ।।८।।
एकेन प्रहरेणैव समाप्ते ग्रंथवाचने ।
गुरोश्चरणयोः शीर्षं गोविंदः समधत्त वै ।।९।।
न्यस्य तन्मस्तके हस्तौ शिष्यायाज्ञां ददौ गुरुः ।
कीर्तनं कुरु त्वं नित्यमिति ब्रूत्वा तिरोदधे ।।१०।।
गुर्वाज्ञां स शिरोधार्य प्रारंभे नित्य-कीर्तनम् ।
हनूमंतं च गोविंदं वंदते बालकेशव : ।।११।।

**- के. वा. आपटे**

## गुरुतृतीया

### मराठी

**(१)**

महाराज गुरूतृतीये आले । दर्शन गोविंदा दिधले ।।ध्रु।।
अर्धोन्मिलीत दृष्टी जयांची । सहजासनी सजले ।
भक्ता न्यहाळुनी सगुण ब्रह्म ते । हृदयांतरी स्थिरले ।।१।।
चैतन्याचे भव्य मार्ग ते । दासबोधी दाविले ।
कीर्तन सरिता अंतर्यामी । ओघवती चाले ।।२।।
गुरू भक्तांचा प्रणाम घेऊनि । सप्रेमे धाले ।
हनुमंत प्रभु कृपाप्रसादे । त्रिविधताप हरले ।।३।।
समर्पिता सुमने सुमनांजली । संतोषे ल्याले ।
हस्तद्वय तद्मस्तकी ठेवुनि । अदृश्यचि झाले ।।४।।
श्रीहरिकीर्तन नेम उपासन । अखंड चालविले ।
दासराम हा वंदन करितो । हनुमत् पद कमले ।।५।।

**- श्रीदासराममहाराज**

(२)

माघ वद्य तृतीयेसी रात्री । आविर्भूतचि झाले ।।१।।
निमग्न गोविंद पोथी वाचनी । अवचित दर्शन दिधले ।।२।।
शालजोडी बैसाया दिधली । त्यावरी येऊनि बैसले ।।३।।
नानबासवे येऊनि पूर्वीच । 'वेळ पाच तुज छान' बोले ।।४।।
जणु खुणेस्तव वेळ पाचही । सांगुनी सुहास्य केले ।।५।।
अखंड कीर्तन करी म्हणोनि । आशिर्वच हे वदले ।।६।।
दास मनोहर तद्गुण गायन । करिता तन-मन-धन धाले ।।७।।

**- मनोहर लिमये**

(३)

हनुमंत अवतरला । भक्ताचे साठी प्रगट पै झाला ।।ध्रु।।
शके अठराशे चव्वेचाळीस । माघाची तृतीया रविवारास ।
भोजना सद्गुरु आले गृहास । आनंदी आनंद झाला ।
गोविंद गुरूपायी विनटुनि गेला ।।१।।
भोजन होता स्वारी वदली । 'सुटति शाळा कोणे वेळी' ।
'पाच वाजता संध्याकाळी' । 'छान ही वेळची तुजला।'
गोविंदासी बोलिले बोला ।।२।।
उमज होईना या शब्दांचा । अनुभव द्यावा हेतु मनीचा ।
प्रगट दिन हा तृतीया साचा । माघाच्या मध्य रात्रीला ।
भक्तागृही हा सद्गुरु आला ।।३।।
शके अठराशे पंचेचाळीस । शुक्रवार हा त्या दिवसास ।
गुरूभक्ताची पुरविली आस । कृपा आशीर्वाद दिधला ।
अखंड कीर्तन ठेवा ठेविला ।।४।।
तृतीया तृतीया ऐसे गाता । सद्भाव वृत्ति प्रगटे चित्ता ।
काही न राहे दंभ अहंता । जय जय जय शब्द बोला ।



दास विनायक पायी स्थिरावला ।।५।।

**- ह. भ. प. विनायकराव कानिटकर**

(४)

हनुमान मूर्ति प्रगटली । हनुमान मूर्ति प्रगटली ।।ध्रु।।
भृगुवार मध्यरात्री । माघ वद्य तृतीय तिथी ।
पूर्ण एकांताची स्थिती । फेरी जाहली ।।१।।
एक प्रहर दासबोध । श्रवण भक्तीचा आनंद ।
सेवुनिया कीर्तनाची । सनद दिधली ।।२।।
एकोणिस चोवीस सन । स्थूल देह विसर्जन ।
प्रेम देह प्रगटवून । भेटी दिधली ।।३।।
प्रेमाचे प्रगटीकरण । आनंदाचे उधळण ।
राम गोविंद उभयतांची । वृत्ती रंगली ।।४।।
परम मुक्त हनुमंत । संत शिरोमणि पंत ।
चरणी शरण पांडुरंग । कीर्ती गाईली ।।५।।

**- पांडुरंगमहाराज ताम्हनकर**

(५)

आली गुरूतृतीया । जवळी आली गुरूतृतीया ।।ध्रु।।
प्रतिपदेचा दिन हा आला । आरंभ झाला श्रीसेवेला ।
स्तवने गाऊ या ।।१।।
तृतीयेचा दिन बहुमोलाचा । महाराजांच्या प्रगटण्याचा ।
दृष्टी कृपेची त्या ।।२।।
वद्य माघीच्या मध्यरात्री । दर्शन दिधले महाराजांनी ।
भावे त्या नमू या ।।३।।
तीन दिसांचा पर्वकाळ हा । पावन करितो सकल जनांना ।
सुख हे सेवाया ।।४।।

मामांचा अधिकारची मोठा । माहीत असे बालकश्रेष्ठा ।
चरणा शरण तया ।।५।।
समारंभ हा अति गोडीचा । लाभ घडो मज तो पहाण्याचा ।
बहुत वर्षाचा ।।६।
विनंति करितो सुरेश चरणा । लाभ मिळो आपुल्या सेवेचा ।
हेचि मागणे तुम्हा ।।

**- सुरेश जोशी**

**(६) (आर्या)**

श्रीहनुमान गुरुत्तमपदतत्पर शिष्यराय गोविंद ।
हरिभक्त बापुराव हरिकीर्तनकार केळकर वंद्य ।।१।।
माघ कृष्ण तृतीया श्रीशालिवाहन शके समाजात ।
गुरूसाक्षात्कारस्मृति अठराशे पंचेचाळीस ख्यात ।।२।।
श्रीदासबोध पठणी निमग्न होता न देहभान जनी ।
स्वानंद चिदावस्था वृत्ति रंगोनिया हरिभजनी ।।३।।
अवचित एकाकी गुरू हनुमंत प्रगट भासती जीवा ।
उदयाद्रीवरी वळुनी विकासवी सूर्य जे की राजीवा ।।४।।
लक्षुनि रूप दयामय साष्टांगे घालुनि नमस्कार ।
विनवुनि आज्ञा वांछुनि साक्षातची पाहिला चमत्कार ।।५।।
सादर बैसुनी आसनी शिष्यार्पित रम्य शालजोडीच्या ।
आज्ञापिती वर कथना श्रीसीताराम दिव्य जोडीच्या ।।६।।
संकेत दृष्टीने श्री खुणावुनी संत होती अदृश्य ।
देहांतर जरि जहाले तरिही चमत्कार भास प्रत्यक्ष ।७।।
निजत्व जाणुनि रमला अक्षय साम्राज्य भर स्वयंजीव ।
मायिक काया त्यागुनि रामी हनुमान नर चिरंजीव ।।८।।
तै पासुनि गुर्वाज्ञा स्मारक तृतीया तिथी ही माघीची ।
श्रीकीर्तन गंगेच्या प्रत्यहिची वाक्सुधाही ओघीची ।।९।।



सेवावी संतसंगे जनसमुदाये करोनि मन अचल ।
गणराय वंदे अवसरि लाभे एकात्मता अमर सबल ।।१०।।

**- गणराय कवि (वही १२)**

(७)

श्रीसमर्थ ग्रंथराज पठणी । निमग्न असता श्रीच प्रगटुनी ।
अवचित पूर्वाकारे दिसती ।।
श्रीपद वरिले श्रीगोविंदे । मस्तकी धरिले करारविंदे ।
साक्षात्कारे भेटती सुजना ।।
माघ कृष्ण तृतिया तिथि दिवशी । शके अठराशे पंचेचाळिसी ।
बापुरावजी केळकर जनी । सद्गृहस्थ संस्तुत हरिभजनी ।
सदावतारा स्तवुनी लवुनी । साष्टांगाने निज सद्भुवनी ।
शालजोडी श्रीआसना दिधली ।।
आज्ञापीती गुरू प्रसन्नमूर्ती ।।
सुधादृष्टिने अवलोकुनिया । बुधा शिरी कर ठेवुनि जनि या ।
चतुर्थ प्रहरी दिवा वसरिती । नित्य कथावी भगवत्कीर्ति ।
हे वदुनि श्री गुप्तचि होती ।।
देहांतर निधने जरि झाले । पुनः आकारा चिद्घन आले ।
तृतीया स्मारक तधि पासुनिया । हरिहर कीर्तन परिसे दुनिया ।
श्रीयुत अनंत तनय सद्भक्ती ।।

**- गणराय कवि (पहिला दीप)**

## संकीर्ण

**(१)**

हनुमत् गुरूमाऊली ग माय माझी । गुरूराज माऊली ।।ध्रु।।
बालपणी बह कष्ट सोसुनी । निजरंगी रंगली ।।१।।
छत्तीस वर्षे कीर्तन करूनी । काया ही झिजविली ।।२।।
सद्भक्ताचे अंतर जाणुनी । भेटीसाठी धावली ।।३।।
माघ वद्य हो तृतीये दिवशी । मध्यरात्री प्रकटली ।।४।।

गोविंदरायावरी वोळली । करी कृपा साऊली ।।५।।
दास विनायक गाई प्रभूते । मन लागो पाऊली ।।६।।

**- विनायक धोंडो कानिटकर**

**(२)**

सांगली ग्रामी प्रभू अवतार । बापुराव केळकर ।।१।।
धन्यधन्य गुरु भक्ती । गुरु आज्ञे कीर्तन करीती ।।२।।
नित्यकीर्तन नाची महती । तेणे संशय फीटती ।।३।।
कीर्तनाचा रंग थोर । लाभ झाला तो हा फार ।।४।।
दाखवा प्रभू सन्मार्ग । सदा घडो संतसंग ।।५।।
नेमगोंडा दास शरण । आला श्रीराम कृपेने ।।६।।

**– नेमगोंडा सदगोंडा पाटील**

**(३)**

नीळोबारायांचा अवतार । बापुराय केळकर ।।१।।
धन्यमहाराज हनुमंत । देही कैसे झाले मुक्त ।।२।।
आपण तरले । येर जनाही तारीले ।।
बापुरायाची पाहुनी भक्ती । कीर्तनासी आज्ञा देती ।।३।।
साधनात झाला पुरा । म्हणुनी शीरी खोविला तुरा ।।४।।
धन्य ऐसे बापुराय । हरी भक्तांचे झाले राय ।।५।।
बोलेना मी बोले हरी । मोल नाही प्रेमा तरी ।।६।।

**– अनामिक**

**(४)**

नीळोबारायांचा अवतार । गोविंदराय केळकर ।।१।।
नीळोवासी तुकारामे । आज्ञा केली जैसी प्रेमे ।।२।।
नित्य हरीकिर्तन करी । कीर्ती होय दीगंतरी ।।३।।
हनुमंते (बापुराव) गोविंदरावा । आज्ञा केली पाहनुी भावा ।।४।।
नित्य करी हरीकीर्तन । पूर्ण दीले अशीर्वचन ।।५।।



गोविंदराये साधन केले । अमृताचे फळ चाखीले ।।६।।
कीर्तनात साक्षात्कार । होय भेटे परमेश्वर ।।७।।
वाढवीती गुरुची महती । लोकी निर्भीयेली भक्ती ।।८।।
नोकरी सोडिली सेवेसाठी । वश केला जगजेठी ।।९।।
ज्ञानेश्वरे कृपा केली । म्हणुनी सद्गुरु मूर्ती लाधली ।।१०।।
जेव्हा पुरश्चरण झाले । मारुतीराये दर्शन दीले ।।११।।
धन्य संत बापुराव । हनुंमत सद्गुरु देव ।।१२।।
साक्षात्काराचे समयी । खरा रामचंद्रराव होता पाही ।।१३।।

**– श्रीरामानंदमहाराज खटावकर**

**(५)**

हणमंतराव कोटणीस झाले उदार । वाढली कीर्ती ऐश्वर्य थोर ।।१।।
वकीली करोनी धन मेळवीले । उपकार केला लोकावरी ।।२।।
जगमान्य लोकप्रीय संत झाले । रामरूप झाले अखंड साधनी ।।३।।
नित्य कीर्तन करूनी जगा उद्धारीले । बापुरावा केले आपणा परी ।।४।।
देह ठेविल्यावरी गंगाधराने । समाधी बांधोनी चालवीले भजन ।।५।।
पौष वद्य षष्ठीसी मोठा उत्साव । उत्साहे जमती रंक आणी राव ।।६।।
बापुरावा गुरुनी कीर्तनाची आज्ञा केली । नित्य चालवीली त्यानी सेवा ।।७।।
साधन बहु केले बापुरावानी । म्हणुनी झाली अशी अघटीत करणी ।।८।।
असती शिक्षक सिटी हायस्कूलात । प्रपंच करूनी करिती परमार्थ ।।९।।
गुरुपरी मर्व वर्तन करीती । गुरुकृपा त्यांचे वरी बहु निःश्चीती ।।१०।।
महाराजांचे सुपुत्र बाबुराव थोर । त्यांचाच करीती आचार वीचार ।।११।।
नित्य कीर्तन करीती परमार्थ वाढवीती । रामनामी रमती साधनी रंगती ।।१२।।
वडीलांचा मोठा करीती उत्सव । हजारो लोक येती सोहळा अपूर्व ।।१३।।
आधंळ्यासी द्यावे दर्शन गुरुराया । गणपती लागे पाया करा कांही दया ।।१४।।

**(६)**

बापुराव केळकर संतराय ते धन्य जगी झाले ।

तनु मन धन हे गुरुपदी अर्पुनी स्वात्मसुखी रमले ।।१।।
हनुमंत प्रभुराज सद्‌गुरु बहु पुण्ये लाभले जयाना बहु पुण्ये लाभले ।
साधन सेवा पाहुनी शिष्या बोधामृत पाजीले ।।२।।
बहुत कृपा ही केली त्यावरी ज्ञानरुप केले त्यासी ज्ञानरूप केले ।
नित्य कीर्तन करी तू ऐसे शिष्या अज्ञापिले ।।३।।
गुरूभक्त बापूरावांनी चालवीली सेवा ।
जनासी बहुसुख वाटे तैसा हर्ष होय देवा ।।४।।
अधिकाराची सोडिली नोकरी परमार्थासाठी केवळ परमार्थासाठी ।
हरीभक्तीचा कळस केला देखीयला जगजेठी ।।५।।
समर्थ हातीचे मारूतीराय धावुनीया आले ।
भक्तासाठी तयाचे घरी प्रेमेची ठाकले ।।६।।
भक्ता लागी दर्शन दीधले पाहुनीया सेवा ।
मूर्त स्वरूपे घरी पातले सुख जहाले जीवा ।।७।।
गणपती म्हणतो बापुराव हे धन्य हरीभक्त ।
गंगाधर बंधू साजे धन्य हनुमंत ।।८।।

**– श्री.गणपतराव रानडे,** (आंधळे)

**(७)**

बापुरावांची ऐकीली मधुरही वाणी ।।ध्रु।।
ताल सुर हे बद्धची करूनी गाती हरी वाणी ।।१।।
द्रव्यांची ती वांच्छा त्यजुनी । हरिनामाची इच्छा धरूनी ।
सांगती करूणरस कंठातुनी । तन्मय कीर्तनी होती वाणी ।।२।।
हनुमंतही गुरू माऊली । कृपाछत्र ते घाला धरूनी ।
ब्रह्मरूप हो दावी नयनी । धन्य गुरूवाणी ।।३।।
खरोखरी ही स्थीति पाही । लव ही आजी खोटी नाही ।
अल्पमती मी सांगे कहाणी । नारायण कवी लीनची चरणी ।।४।।

**– नारायण वा. पटवर्धन**

***



**।। श्रीराम ।।**

✻

# परिशिष्ट विभाग

✻✻✻

## परिशिष्ट १

### श्रीमामांचा जन्म शक आणि इसवी सन

श्रीमामा व सौ. मामी आपल्या राम या मुलाचा वाढदिवस दरवर्षी साजरा करीत. एकदा रामला - श्रीदादांना - वाटले की आपण श्रीमामांचा वाढदिवस साजरा करू. तेव्हा त्यांनी श्रीमामांना जन्मदिवस विचारला. 'फाल्गुन शुद्ध दशमी हा माझा जन्मदिवस, असे नाना म्हणत' असे श्रीमामांनी उत्तर दिले. यावेळी श्रीमामांनी आपला जन्म शक सांगितला की नाही हे स्पष्ट होत नाही. तथापि श्रीदादांनी मामांचा जन्म शक १८१० असा दिला आहे आणि नंतरच्या बहुतेक मामांच्या चरित्रात हाच शक नोंदला गेला आहे.

शक आणि इसवी सन यांमध्ये ७८ वर्षांचा फरक आहे. म्हणजे शक वर्षात ७८ हा अंक मिसळला की इ. स. मिळतो. त्याप्रमाणे शक १८१० मध्ये ७८ मिसळल्यावर १८८८ हा इसवी सन मिळतो. हा इसवी सन ग्राह्य धरूनच श्रीदादांनी इ. स. १९८८ साली श्रीमामांचा जन्मशताब्दि सोहळा साजरा केला.

'गोविंदस्मृति' या ग्रंथाच्या कव्हर पेजवर पुढील नोंद आहे :-

| जन्म | निर्वाण |
|---|---|
| मंगळवार दि. १२-३-१८८९, | सोमवार दि. १२-२-१९६२, |
| फाल्गुन शुद्ध १०, शके १८१० | माघ शुद्ध ९, शके १८८३. |

याचा अर्थ असा होतो की केवळ ७८ मिसळून शकापासून इसवी सन मिळत नाही. तर माघ आणि फाल्गुन महिन्याच्या शकांचे संदर्भात थोडा फरक पडतो. म्हणजे तेथे शकात ७८ चे ऐवजी ७९ हा आकडा मिसळावा लागतो. म्हणजे मामांचा जन्माचा शके १८१० मानला तरी इ.स. १८८९ असा येतो.

मौज अशी झाली आहे की केळकर घराण्याचा जो 'केळकर-कुल-वृत्तांत' (सं. सी. वि. केळकर, य. न. केळकर, पुणे, १९५२) या ग्रंथात पृ. ३२६ वर मामांचा जन्म शक १८१२ असा दिला आहे. येथे प्रश्न असा उपस्थित होतो :-



केळकर-कुल-वृत्तांतातील शक १८१२ हा कुणी सांगितला?

केळकर कुलवृत्तांतातील शक ग्राह्य मानल्यास मामांच्या जन्माचा इसवी सन १८१२ + ७९ (=७८+१)=१८९१ असा येतो.

मला असे वाटते : - केळकर कुलवृत्तांतासाठी मामांनी स्वतः स्वत:चा जन्म शक १८१२ सांगितला असावा. आणि माझ्या मते हाच शक - इ. स. १८९१- हा ग्राह्य आहे. असे वाटण्याचे कारण इतकेच की हा इ. स. मानल्याने श्रीमामांचे वय आणि त्यांच्या जीवनातील घटनांची बरीचशी संगति जुळते.

***

## परिशिष्ट २

### श्रीमामांनी केलेली
### पुरश्चरणे, पारायणे आणि कीर्तने

श्रीमामांनी आपल्या दीर्घ आयुष्यात पुढीलप्रमाणे पुरश्चरणे, पारायणे आणि कीर्तने केली :-

१) साडेतीन कोटीचे गायत्री पुरश्चरण (कृष्णा नदीच्या पाण्यात उभे राहून)
२) साडेतीन कोटीचे रामनाम पुरश्चरण (संकल्प न सोडता)
३) साडेतीन कोटीचे रामनाम पुरश्चरण (संकल्प करून)
४) तेरा कोटीचे रामनाम पुरश्चरण
५) एकशे आठ ज्ञानेश्वरी पारायणे
६) बावन्न गुरुचरित्र पारायणे
७) बावन्न दासबोध पारायणे
८) बावन्न तुलसीदास रामायण पारायणे
९) बावन्न वाल्मीकि रामायण पारायणे

(अखंड कीर्तनानंद, पृ.११३)

माघ वद्य तृतीया, १९२४ पासून मामांनी ३८ वर्षे नित्य कीर्तने केली. काही वेळा श्रीमामांनी एकाच दिवशी दोन वा तीन कीर्तने केली. ही जादा कीर्तने सोडून दिली तर दररोज एक कीर्तन याप्रमाणे ३८ वर्षेपर्यंतच्या कीर्तनांची संख्या (एक वर्षाचे ३६५ दिवस गुणिले ३८ वर्षे =) १३८७० कीर्तने होतात.

***



## परिशिष्ट ३

### श्रीमामांच्या हस्ते झालेले कार्यक्रम

कार्यक्रम चांगला व्हावा, यशस्वी व्हावा या दृष्टीने काही लोकांनी श्रीमामांच्या पवित्र हस्ते काही कार्यक्रम करवून घेतले. या कार्यक्रमांची सूची पुढे दिली आहे :-

१) सेना मंदिराची पायाभारणी.
२) मंगलधामाचे उद्घाटन.
३) कैवल्यधामात भीमरायाची स्थापना.
४) लाळगे विठ्ठल मंदिरात विठ्ठल मूर्तीची स्थापना.
५) सखुबाई कुलकर्णी (सत्तीकर) यांच्या घरी रामसीतेच्या मूर्तीची स्थापना.
६) नृसिंहवाडीच्या दत्तमंदिरात विद्युद्-दीपांचे उद्घाटन.
७) कैवल्यधामात टाकीमहाराजांच्या फोटोचे अनावरण.
८) वासुदेवराव जोशी यांचे घरी (माधवनगर) कीर्तन मंदिराचे उद्घाटन.
९) वासुदेव अण्णा कामत (जत) यांच्या 'अपरोक्ष ज्ञान आणि साक्षात्कार' या ग्रंथाचे प्रकाशन
१०) कैवल्यधामात सौ. जानकीबाई कोटणीस यांच्या फोटोचे अनावरण.
११) श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर यांच्या 'सार्थक' या ग्रंथाचे प्रकाशन.

(अ.की, पृ. १३१-१३२; गोचमा, पृ.८६,८७,९२)

***

## परिशिष्ट ४

### श्रीमामांच्याकडे आलेले मान्यवर स्त्री-पुरुष

कस्तुरी झाकून पाकून ठेवली तरी तिचा सुगंध सगळीकडे दरवळतो आणि लोक तिकडे आकृष्ट होतात. श्रीमामांनी जरी आपल्या कार्याचा गाजावाजा केला नव्हता तरी तो योग्य त्या व्यक्तीपर्यंत पोचला होता. श्रीमामांच्या कार्याने आकृष्ट झालेल्या आणि मामांच्याकडे येऊन गेलेल्या मान्यवर स्त्रीपुरुषांची नावे यापुढे अकारानुक्रमाने दिलेली आहेत :-

१) अण्णासाहेब कुलकर्णी (इचलकरंजी) २) अनंतराव म्हसकर (सांगली) ३) अम्मा (मातोश्री) ४) उद्धवरावजी यरगट्टीकर (चिमड) ५) उपळेकरमहाराज ६) कबीर अल्लाप्पा ७) कलावती देवी ८) काडसिद्धमहाराज (सिद्धगिरि) ९)कुमारस्वामी १०) केतकरमहाराज ११) गणपतराव भिरंगी १२) गिंडेमहाराज १३) गुरुदेव रानडे १४) गंगाधर सिंग १५) गुरुलिंगाप्पामहाराज मंगळवेढे (निंबरगी) १६) गुरुसिद्दप्पामहाराज नीलवाणी (निंबरगी) १७) गुळवणीमहाराज (पुणे) १८) गुंडामहाराज १९) गुंडुबुवा (बुधगाव) २०) गोपाळराव कोटणीस (चिमड) २१) गोविंदपंत घोसरवाडकर (घोसरवाड) २२) गोविंदमहाराज दिवेकर (वाटेगाव) २३) गोंदेमहाराज २४) चाफळकरमहाराज २५) चौंडेमहाराज २६)ताई दामले २७) तात्यासाहेबमहाराज कोटणीस (सांगली) २८) त्र्यं. सि. नरवणे (आरोग्यमंत्री) (अकी, पृ.८५) २९) दत्तमहाराज कवीश्वर ३०)दासगणुमहाराज ३१) दुंडामहाराज ३२) नागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर ३३) नाथमहाराज पैठणकर (पैठण) ३४) नानाप्पा नानेखिंडी ३५) नारायणमहाराज मळणगावकर (सांगली) ३६) नारायणमहाराज यरगट्टीकर (चिमड) ३७)पांडुरंगमहाराज ताम्हनकर (सांगली) ३८) पांडोबा यरगट्टीकर ३९)फुटाणेमहाराज ४०) बंडामहाराज ४१) बापूराव जोशी ४२) बाबूराव गोखले (हिंचगिरि) ४३) बाबूराव ऊर्फ र. ह. कोटणीसमहाराज (सांगली)



४४)बाळेकुंद्रीकरमहाराज ४५) भजनी काकू ४६) भाऊसाहेब ऐनापुरे ४७)भाऊसाहेबमहाराज बाळेकुंद्रीकर ४८) भौमानंद ४९) मधुकरभाई प्रताप (माधवनगर) ५०) मल्लिकार्जुन स्वामी ५१) मं. रा टाकीमहाराज (जोगेश्वरी) ५२) माईसाहेब दांडेकर (पालघर) ५३) माईसाहेबमहाराज यरगट्टीकर (चिमड) ५४)मामासाहेब देशपांडे (पुणे) ५५) मोरोपंत कुलकर्णी (भजनपटु) ५६)रंगनाथमहाराज ५७) रामनामे ५८) रामानंदमहाराज खटावकर ५९)लक्ष्मणबुवा निजामपुरकर ६०) लक्ष्मणशास्त्री निंबरगी ६१) वासुदेवराव जोशी (कीर्तन-निरुपणकार) ६२) विष्णुजी क्षीरसागर (वाचस्पति) (नाशिक) ६३) शंकरमहाराज मिरीकर ६४) शंकराचार्य (कांची कामकोटी) ६५) शं. वा. ऊर्फ मामासाहेब दांडेकर (पुणे) ६६) श्रीराम कर्नाटकी

(अ.की, पृ. १५५; गोचमा, पृ. ११५-११६; दावि, पृ.४१)

***

## परिशिष्ट ५

### मामांनी काढलेले ज्ञानेश्वरमहाराजांचे रेखाचित्र

ज्ञानेश्वरमहाराजांचे मूळ रेखाचित्र पहाताच ज्ञानेश्वरमहाराज असेच असले पाहिजेत असे अनेकांना वाटले. उदा.

प्रा. डॉ. के. वा. आपटे यांचे मेहुणे श्री. मधुकर वैकर यांनी मामांनी काढलेले चित्र पाहिले व ज्ञानेश्वर असेच असले पाहिजेत अशी त्यांची खात्री पटली व या चित्राचा प्रसार करण्याचे ठरविले. त्यानुसार त्यांनी जि. भि. दीक्षितांनी काढलेल्या तैलचित्राच्या प्रती करून घेतल्या. त्यातील एक प्रत त्यांनी आळंदीला समाधिमंदिरात लावण्याविषयी प्रयत्न केला. पण तो यशस्वी झाला नाही. मंदिर ट्रस्टींनी तो आपल्या ऑफिसात लावून घेतला. असे असले तरी हे चित्र पुढील ठिकाणी लावण्यात आले आहे :- पंढरपुरात विठ्ठल मंदिरातील गरुड मंडप, जिनोजी मठ, निंबरगीतील निंबरगीकरमहाराजांचा मठ, बार्शीतील भगवंताचे मंदिर, तसेच मुंबई, पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरि, सांगली इत्यादि ठिकाणच्या भक्तांच्या घरी हे चित्र लावण्यात आले (दा.वि,पृ.३५).

काही काळाने उपलब्ध झालेल्या ज्ञानेश्वरमहाराजांच्या चित्राचा अभ्यास आणि परीक्षण करून प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी 'श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे प्रमाणभूत चित्र' या शीर्षकाचा लेख लिहिला. तो अमृत मासिकाच्या, जानेवारी १९८२ च्या अंकात प्रकाशित झाला. त्यात मामांनी काढलेले चित्र प्रमाणभूत आहे असा निष्कर्ष काढला. हा लेख येथे पुढे दिला आहे.

***



## परिशिष्ट ६

### श्रीमामांच्या जन्मशताब्दीचा सोहळा

श्रीमामांचा जन्म फाल्गुन शुद्ध १०, शके १८१० या दिवशी झाला होता. साहजिकच शके १९१०, फाल्गुन शुद्ध १० रोजी मामांची जन्मशताब्दी येत होती. श्रीमामांच्या जन्मशताब्दीचा सोहळा मोठ्या थाटामाटाने करावयाचा असे श्रीमामांचे चिरंजीव श्रीदासराममहाराज ऊर्फ श्रीदादा यांनी ठरविले आणि त्यांनी तसे प्रत्यक्षातही आणले. आणि या शताब्दी वर्षात पुढीलप्रमाणे कार्यक्रम पार पडले.

शताब्दी वर्षाच्या प्रत्येक महिन्यातील शुद्ध दशमीला एकेका मान्यवर व्यक्तीचे प्रवचन आयोजित करण्यात आले.

श्रीमामांना दासबोध हा ग्रंथ प्रिय होता. म्हणून या वर्षी फाल्गुन शुद्ध प्रतिपदा ते फाल्गुन शुद्ध दशमी या काळात दासबोधाचे सामुदायिक पारायण करण्यात आले.

या नंतर फाल्गुन शुद्ध अष्टमी ते फाल्गुन शुद्ध दशमी हा या समारोहाचा पर्वकाळ मानून त्या काळात पुढील कार्यक्रम करण्यात आले :-

१) या तीन दिवसांत श्रीमामांच्या 'अमृतवाणी' या अभंग-पद-गाथ्याचे पारायण करण्यात आले.
२) श्री. मनोहरपंत सबनीस आणि त्यांच्या पत्नी सौ. सबनीस यांचे कर्णमधुर असे गायन झाले.
३) कु. मंगला जोशी (रेडिओ स्टार) आणि कु. मंजुषा कुलकर्णी यांच्या भजन-गायनाचा कार्यक्रम झाला.
४) श्री. काशिनाथ बोडस (कानपूर) यांनी अभंग-वाणी सादर केली.
५) मा. ज्ञाननाथजी रानडे (पुणे) यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले होते.

फाल्गुन शुद्ध दशमी हा मुख्य दिवस होता. या दिवशी सकाळी सनईच्या मंजुळ व मोहक स्वरांनी कार्यक्रमांचा प्रारंभ झाला. नंतर श्रीमामांच्या सिंहासनाला रुद्राभिषेक करण्यात आला. नंतर ब्राह्मणांनी शांतिमंत्र म्हटले.

याच दिवशी सकाळी दैनक केसरीची 'मामामहाराज केळकर पुरवणी' ही प्रकाशित होऊन हातात आली.

सकाळीच श्री. केशवराव जोशी, शिक्षक यांनी संस्कृत भाषेत ग्रथित केलेले श्रीमामांचे चरित्र प्रकाशित करण्यात आले. केशवराव जोशींनी मामांचे संदर्भात संस्कृतमध्येच प्रवचन केले.

दुपारच्या समयी, शंकराचार्यांच्या शृंगेरी पीठाचे महाराष्ट्रातील प्रतिनिधि मा.पंडित वसंतराव गाडगीळ, संपादक 'शारदा' मासिक, पुणे, यांचे संस्कृत भाषेत अस्खलित प्रवचन झाले. प्रवचनाच्या शेवटी ते म्हणाले :-

'श्रीगोविंद-मामा-महोदयानां जन्म - शती-समारोहस्य एषा समाप्तिर्नास्ति, यत् सत्कार्यस्य समाप्तिः, कदापि नास्ति । अस्मिन् वर्षे अयं समारोहः अणि-मध्यत्वेन भवतु । मामामहोदयानां इयं अखंड-संकीर्तन-परंपरा अखंड-काल-पर्यंतं प्रचालिता भवतु । यथा गोविंद-मामा-महोदयानां श्रीचरणानां जन्म-शती-महोत्सवः स्वानंद-साम्राज्ये मग्नैः सर्वैः महता उत्साहेन कृतः, तथैव श्रीदासराम-चरणानां जन्म-शती-महोत्सवः अपि यथाकाले महता उत्साहेन भवतु ।।'

हे प्रवचन संपल्यावर श्रीमामांच्या पालखीचा दिंडी-मिरवणूक-सोहळा सुरू झाला. यामध्ये मा. पंडित वसंत गाडगीळ, मा. बापूसाहेब चाफळकर, श्रीपतीबुवा धोंगडे, इत्यादि प्रमुख मंडळी सामील झालेली होती. तुतारी, टाळ, पखवाज, बँड आणि जयजयकार यांच्या निनादात दिंडी चालू लागली. दिंडीपुढे फुले पसरण्यात आली होती; पाण्याच्या घागरी ओतल्या जात होत्या. धूप, उदबत्ती, पंचारती यांनी ओवाळणी झाली.

दिंडीच्या-मिरवणुकीच्या अग्रभागी श्रीदासराममहाराज/श्रीदादा होते. दादांच्या



घरातून उत्तरेकडील दरवाज्यातून दिंडी बाहेर पडली आणि मग ती सिटी हायस्कूलच्या उत्तरेकडील दरवाज्याच्या रोखाने निघाली. सिटी हायस्कूलच्या दरवाज्याशी श्री.शंकरराव काळे हे शिक्षक सामोरे आले आणि त्यांनी पालखीला हार घातला. मग पालखी पुढे निघाली आणि कैवल्यधामाजवळ पोचली. कैवल्यधामाचे आत जाऊन पालखीने त्रैमूर्तींच्या देवस्थानाला प्रदक्षिणा घातली. येथे कैवल्यधामाचे धनी मा. गुरुनाथमहाराज कोटणीस यांनी पालखीला पुष्पहार अर्पण केला आणि पालखीची आरती झाली. व मग प्रसाद वाटण्यात आला.

नंतर कैवल्यधामातून बाहेर पडलेली पालखी संत सेनामहाराज मार्गावरून पुढे जात कृष्णा नदीच्या काठावरील हनुमान् समाधि मंदिराजवळ आली. येथेही मंदिरात शिरून तात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या फोटोला आणि मागील बाजूच्या औदुंबर वृक्षाला पालखीने प्रदक्षिणा घातली. येथेही पालखीची आरती झाली.

हनुमान समाधि मंदिरातून बाहेर पडलेली पालखी सरळ श्रीदासरामांचे घरी परत आली. अंगणात श्रीदासरामांच्या स्नुषा सौ. रोहिणी, सौ. अपर्णा, सौ. अर्चना आणि सौ. सुनीता, आणि सौ. वासंती भिडे यांनी पालखीला औक्षण केले. नंतर पालखी राममंदिरात शिरली आणि रामसीतेच्या देव्हाऱ्याला प्रदक्षिणा घालण्याचा सोहळा करण्यात आला. मग श्रीमामांची आरती झाली आणि नंतर प्रसादाचे वाटप करण्यात आले.

त्यानंतर श्रीदादांचे नित्याचे कीर्तन झाले. या कीर्तनातच 'श्रीदासराम गाथा' या ग्रंथाचे प्रकाशन प्रा. म. अ. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. तसेच श्री. प्रकाश भावे यांनी लिहिलेल्या 'अखंड कीर्तनानंद' या ग्रंथाचे प्रकाशन श्रीदादांनी केले. तसेच मामांच्या आर्ट पेपरवरील चित्राचे प्रकाशन मा. बापूसाहेब चाफळकर यांच्या हस्ते झाले.

कीर्तनोत्तर प्रा. म. अ. कुलकर्णी, मा. मधुकरपंत शिपुरकर आणि सुमनताई महादेवकर यांची सुश्राव्य प्रवचने झाली. प्रवचने झाल्यावर अंगणात मा.चंद्रशेखर

अण्णा केळकर यांचे वारकरी पद्धतीचे निरूपण झाले. त्यानंतर बरडे विठ्ठल मंदिरातील मानकरी श्री. चित्रुक, श्री. केसरे इत्यादि भाविक मंडळींनी भजन सादर केले.

इतके होईतो रात्र संपून पहाटेचे ३-३। वाजले होते. त्यानंतर नित्याचे रामपाठ ग्रंथाचे पठण झाल्यावर पंचपदी झाली. त्यानंतर प्रसादाचे वाटप होऊन हा मामांच्या जन्म शताब्दीचा सोहळा समाप्त झाला.

(अखंड कीर्तनानंद, पृ. १६३-१६७)

***



## परिशिष्ट ७

### प. पू. श्रीमामांचे अनुगृहीत शिष्य

प.पू. मातोश्री माईसाहेबमहाराज यरगट्टीकर यांच्या आज्ञेनुसार श्रीमामांनी अनुग्रह देण्यास प्रारंभ केला. यांतील ज्ञात असणाऱ्या अनुगृहीत भक्तांची नावे पुढे दिलेली आहेत.

१) श्री. महादेवराव देशपांडे, माधवनगर २) श्री. विजयसिंह सुर्वे, कोल्हापूर ३) श्री. अण्णासाहेब देवधर, नागपूर ४) श्रीमती शरयूताई उपळावीकर, सांगली ५) सौ. वेणुताई जोशी, सांगली ६) सौ. उदगांवकर ताई, सांगली ७) सौ. इंदिराबाई वाटवे, सांगली ८) सौ. पमाताई परचुरे, सांगली ९) श्री. त्रिंबकराव ल. परचुरे, सांगली १०) सौ. सरस्वतीबाई भास्कर मोडक, सांगली ११) श्री. वामन भास्कर मोडक, सोलापूर १२) श्रीमती गंगुबाई केतकर, पुणे १३) श्रीमती शालुताई सहस्रबुद्धे, सांगली १४) श्रीमती कुसुमताई सोमण, वसईपापडी १५) सौ. सुनिता दिनकर पंडित (बेडेकर), सोलापूर १६) सौ. अंजली सुरेश केतकर, चिपळूण १७) श्रीमती कमलाबाई दामोदर आपटे, सांगली १८) सौ. अक्काताई उपळावीकर, सांगली (शरयूची आई) १९) श्री. सूर्यकांत रामराय केळकर, सांगली २०) श्री. सखाराम जोगळेकर, मुंबई २१) श्री. शंकर विनायक काळे, सांगली २२) सौ. पार्वती शंकर काळे, सांगली २३) श्रीमती सुशिला हरि पटवर्धन, सांगली २४) सौ. शकुंतला शरद लिमये, सांगली २५) सौ. शारदा जोशी, सांगली २६) श्रीमती माई करमरकर, सांगली २७) श्री. न. दा. दिवेकर, सांगली २८) श्री. भालचंद्र न. दिवेकर, सांगली २९) श्री. भा. द. लिमये, मिरज ३०) श्रीमती इंदुताई चितळे, सांगली ३१) श्री. रामकृष्ण नारायण बर्वे, सांगली ३२) सौ. मीना लिमये, सांगली ३३) श्री. पंडितराव दांडेकर, सांगली ३४) श्रीमती अक्कुताई बोडस, सांगली ३५) श्रीमती अक्कुताई मणेराजुरीकर,सांगली ३६) श्रीमती पडसलगीकर काकू, सांगली ३७) सौ. कासराळीकर (शरयूची

बहिण), औरंगाबाद ३८) श्री. नारायणराव वाटवे, सांगली ३९) श्री. नारायणराव जोग, मिरज ४०) श्री. उत्तमराव शंकर जप्तीवाले, सांगली ४१) सौ. सोनुबाई माने, सांगली ४२) सौ. नलुताई भिडे, सांगली ४३) सौ. इंदिराबाई कृष्णाजी सोवनी,सांगली ४४) सौ. कृष्णाबाई सहस्रबुद्धे ४५) श्री. रामचंद्र भास्कर केळकर, हरिपूर ४६) सौ. सुशिलाबाई रामचंद्र केळकर, हरिपूर ४७) श्री. महादेव प्रल्हाद जोशी, सांगली ४८) सौ. मनोरमा महादेव जोशी,सांगली ४९) श्रीमती विसापूरकर, विटा ५०) श्रीमती आऊताई जोशी,सांगली.

(संकलनकार : दीपक चंद्रशेखर केळकर)

***



# परिशिष्ट ८

## श्रीतारक रामनाम आधार मंडळ

मामांनी नित्यकीर्तनाला सुरवात केली शके १८४५ मध्ये. त्यानंतर ५ वर्षांनी म्हणजे शके १८५० मध्ये, तारक रामनाम आधार मंडळाची आखणी मामांनी एका कागदावर केलेली आढळते. पण मंडळाची स्थापना कागदावरच राहिली. ज्या कागदावर मामांची सही आहे ती या मंडळाचा पहिला सभासद म्हणून. मामांच्या निर्याणानंतर हा कागद मामांच्या बाडात सापडला. त्यात प्रत्येकाचे कल्याणाची तळमळ आहे व त्यात माणसाने कमीत कमी काय करावे, याची नोंद आहे. म्हणून ही माहिती सर्वांसाठी येथे दिली आहे.

या मंडळात आबालवृद्धांना प्रवेश आहे. त्यासाठी कोणतीही वर्गणी नाही. पण प्रत्येकाने तेरा सभासद या मंडळात आणावेत, अशी अपेक्षा आहे. या तेरा आकड्याची जरा अधिक फोड केली पाहिजे. मामांच्या जीवनात तेरा आकड्याला महत्त्व आहे. सुरवात त्रयोदशाक्षरी मंत्राने, मध्य त्याच जयघोषाने, अंतही त्याच उच्चाराने.

मंडळाचा उद्देश त्रिविध आहे. नामस्मरण, पुराण आणि तत्त्वजिज्ञासा. मंडळात येणाऱ्यांनी रामनामाचाच जप केला पाहिजे, असा आग्रह नाही. आपापल्या सद्‌गुरूंनी सांगितलेला मंत्र वा उपासना रामनामातच मोडतात, असा मामांचा विश्वास होता. मुख्य उद्देश होता तो नामस्मरण व्हावे हा ! पुराण शब्दाने व्यासवाल्मीकिकृत ग्रंथ अभिप्रेत आहेत. या ग्रंथावरून तत्त्वज्ञान प्रत्यक्षात आचरणात कसे उतरावयाचे, हे शिकता येण्यासारखे आहे. राजा हरिश्चंद्राची सत्यनिष्ठा, श्रीरामचंद्राची सुखदु:खसमानता, पांडवांची कृष्णभक्ति, ही उद्‌बोधक नाहीत असे कोण म्हणेल? तत्त्वज्ञानासाठी दासबोधाचा उल्लेख आहे.

यांच्या जोडीने आचरण हवे. परमार्थी माणसाला नित्यनेम हवा. तोही पोटाचा व्यवसाय करून झेपेल असा, कारण तोच त्याला आवश्यक ती मनाची

प्रसन्नता आणून देणारा आहे. घरातून कामाला बाहेर जाताना एखादा मनाचा श्लोक, एखादी दासबोधातील ओवी त्यानी चिंतनास घेतली, तर समाधानाची एखादी लहर त्याच्या अंत:करणात खेळून जाईल.

काही माणसांना पुष्कळ रिकामा वेळ असतो. काहींना थोडाफार वेळ काढता येतो. अशांचे करता मामांनी पुढील कार्यक्रम सांगितला आहे.

(१) आपल्या उपास्य देवतेच्या नामाचा कमीत कमी तेराशे जप एकाग्र मनाने करावा.

(२) तेरा मनाच्या श्लोकांचे मनन करावे, किंवा आपणास आवडणाऱ्या सद्‌ग्रंथातील विषयाचे मनन करावे.

(३) भीमरूपी या मारुतिस्तोत्राचा पाठ करावा. मारुति ही शारीरिक व बौद्धिक सामर्थ्याची देवता आहे. तिची प्रार्थना करावी.

(४) देवाला तेरा नमस्कार घालावे. वयोमानाप्रमाणे व प्रकृतिमानाप्रमाणे तेरा साष्टांग नमस्कार शक्य नसल्यास, नामस्मरणपूर्वक हात जोडावेत.

तारकमंडळाची ही योजना सहा सकारांत मांडावयाची झाल्यास अशी होईल :- सद्‌भाव, स्वाध्याय, स्मरण, स्तोत्र, सद्‌भक्ति आणि सेवा. यांतला एकही सकार गाळण्यासारखा नाही.

आपल्याला काय करता येण्याजोगे आहे, हे सुचविण्याला ही योजना मार्गदर्शक आहे. किंबहुना प्रत्येकाने ही योजना आपल्यापुढे आदर्श म्हणून ठेवण्यासारखी आहे.

**तुका म्हणजे जिणे । शर्तीविण लाजिरवाणे ।।**

***



## परिशिष्ट ९

### श्रीमंत राजेसाहेब, सांगली यांना पाठविलेले पत्र

प. पू. श्रीमामांनी देह ठेवल्यावर प. पू. दादा श्रीमामांच्या सिंहासनावर पादुका स्थापन करणार होते. हा कार्यक्रम रथसप्तमी या दिवशी होणार होता. या कार्यक्रमास श्रीमंत राजेसाहेब यांनी यावे अशी श्रीदादांची इच्छा होती. त्याप्रमाणे श्रीदादांनी श्रीमंत राजेसाहेब, सांगली यांना पत्र पाठविले. या पत्रातील भाग याखाली मुद्दाम दिला आहे.

।। श्रीगजानन प्रसन्न ।।

श्रीमंत हिज हायनेस राजेसाहेब, सांगली यांचे सेवेसी बालके राम गोविंद केळकर याचे त्रिकालचरणी मस्तक ठेवून कृतानेक सविनय सप्रेम शिरसाष्टांग प्रणिपात वि. वि.

आपणांस 'पद्‌मभूषण' ही पदवी भारत सरकारने दिली हे ऐकून किती आनंद झाला तो शब्दाने व्यक्त करता येत नाही. आपल्या आयुष्यातील सुवर्णाक्षरात कोरून ठेवणेसारखाच तो प्रसंग आहे यात प्रश्नच नाही.

परमपूज्य ब्रह्मीभूत श्रीहरभटजी पटवर्धन यांना साजेल असेच सर्व काही आपले असलेने ते तसे होणारच. श्रीसद्‌गुरु बाबा सावनसिंगजीमहाराज यांची कृपा व श्रीगुरुदेव रानडेसाहेब यांचे सान्निध्य, याने जो परमार्थाचा आपले ठिकाणी प्रकर्ष झाला त्याचा हा श्रीगणरायाचा प्रसादच होय असे वाटते.

एवढे ऐश्वर्य, सत्ता, श्रीमंती सर्व असताही संताचे बद्दल नितांत आदर ही अलौकिकच गोष्ट आहे. 'आधीच सोन्याचे वरी जडावाचे' अशी स्थिति आहे.

श्रीगुरुदेव रानडेसाहेब यांचेमुळे ती. प. पू. कै. बापूरावजी केळकर (माझे वडील) यांचे ध्यानमंदिरात झालेले कीर्तन व 'घरगुती कीर्तन झाले' असे आपले उद्‌गार हे अविस्मरणीय आहेत. आपण आमचे घरी एकदा आला होता.

किती आनंद झाला आम्हाला! माझे वडील ती. प. पू. कै. बापूरावजी केळकर असते तर त्यांना हे ऐकून फार आनंद वाटला असता. 'सांगली बहुत चांगली। आमच्या राजेसाहेबांनी केली ।।' असे ते वारंवार म्हणत.

ती. प. पू. कै. मामांनी लिहिलेले श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे चरित्र साधनमार्गास धरून असलेले या प्रसंगाने आपले चरणी सादर करीत आहे.

आपले चरणी तीर्थरूपांचे चरित्र 'गोविंदचरितमानस' हे श्रीगणपतीचे देवळात मी आलो होतो त्यावेळी सादर केले आहेच.

तीर्थरूपांचे पादुकांची स्थापना आमचे घरी रथसप्तमीस होत आहे. आपण यावे अशी फार इच्छा होती. मी येणार होतो पण आपले प्रकृतीमुळे आपणास तेथे येऊन बोलणेचा वगैरे शीण होईल म्हणून आलो नाही. या सुप्रसंगी आशीर्वाद असावा. यापेक्षा काय लिहू?

तीर्थरूप श्रीमंत सकल सौभाग्यवती मातोश्री हर हायनेस राणीसाहेब यांचे चरणी अनेक प्रणिपात प्रविष्ट व्हावेत.

श्रीगणरायाचे चरणी आमचे अनेक प्रणिपात
सेवेसी श्रुत शेष ही विज्ञापना

सांगली — आपला नम्र सेवक
दि. ०४-०२-१९६५ — **राम गोविंद केळकर**

From
राम गोविंद केळकर
कै. बापूरावजी केळकर वाडा,
जुनी सांगली, सांगली

***



## परिशिष्ट १०

### प. पू. श्रीमामा व श्री. न. दा. दिवेकर यांचेतील प्रश्नोत्तरे

श्री.न. दा. दिवेकर यांनी श्रीमामांना परमार्थातील काही प्रश्न विचारले. त्या प्रश्नांची उत्तरे श्रीमामांनी दिली. ही प्रश्नोत्तरे खालीलप्रमाणे आहेत.

प्रश्न : समाधि कशी लागते?

उत्तर : गुरूपदिष्टमार्गाने.

प्रश्न : सर्वच गुरुपुत्रांना समाधि कां लागत नाही?

उत्तर : गुरूनी जे सांगितलेले असते त्यापेक्षा इतर काय सांगतात यावर जास्त विश्वास असतो. तात्पर्य गुरुनिष्ठा कमी म्हणून समाधि लागत नाही.

प्रश्न : समाधि किती प्रकारची असते?

उत्तर : एक वृत्तिरूप, दुसरी अवस्थारूप.

प्रश्न : वृत्तिरूप समाधि म्हणजे काय?

उत्तर : मूळ अवस्थेत जाणे हा जीवाचा स्वभाव आहे. जीव हा तो स्वभाव विसरला आहे. प्रयत्नाने कधी कधी त्याला आपल्या मूळस्थितीची जाणीव होते. त्याला वृत्तिरूप समाधि असे म्हणतात. त्याला देहबुद्धीची ओढ जास्त म्हणून समाधि बरी वाटली तरी व्युत्थान त्याला त्यापेक्षा बरे वाटते. म्हणून ही बदलणारी अशी वृत्ति होते. ती टिकत नाही. ही प्रयत्न समाधि आहे.

प्रश्न : मग या समाधीचा उपयोग काय?

उत्तर : आपल्या मूळ स्वरूपाची गोडी लागण्यापुरता.

प्रश्न : अवस्थारूप समाधि म्हणजे काय?

उत्तर : स्थूल देह आणि सूक्ष्म देह यांची गाढ मैत्री जमली आहे. एकमेकावाचून एकमेकांना करमत नाही. स्थूलदेहाला सूक्ष्मदेहाचा आधार आणि सूक्ष्मदेहाच्या वासना स्थूलदेहाने पुरवायच्या. असा हा एकमेकांचा करार आहे. वासनाक्षय होऊ लागला की या मैत्रीत खंड पडायला लागतो व गुरूपदिष्ट मार्गाचा प्रभाव

पडू लागतो. मग जी समाधि लागते त्या समाधीची ओढ जास्त असते. त्याला अवस्थारूप समाधि असे म्हणतात.

प्रश्न : मग त्याच समाधीत कां सगळे सदैव रहात नाहीत?

उत्तर : ब्रह्मनिष्ठांचे दोन प्रकार आहेत. काहींच्याकडे ईश्वरनियोजित कार्य असते. त्यांना बळेच वृत्तीवर यावे लागते. इतर जडमूढपिशाच्चवत् रहातात.

प्रश्न : समाधीने रोग बरे होतात कां?

उत्तर : नाही. रोग बरे होत नाहीत. रोगभय दूर होते. देहबुद्धीपेक्षा आपले वेगळेपण मनुष्य जसजसा अनुभवू लागेल त्याप्रमाणे देहदुःख भोगत आहे, आपण सुखरूप आहोत हा श्रेष्ठ अनुभव त्याला येऊ लागतो. देहनिष्ठा सुटली की देहदुःख सुटू लागते. लौकिकदृष्ट्या देवाची अवकृपा ही खऱ्या अर्थाने देवाची कृपा असते ती ही अशी.

***



# परिशिष्ट ११

## श्रीमामांचा ३६ वा पुण्यतिथी महोत्सव

श्रीमामांची छत्तीसावी पुण्यतिथी गुरुवार दि. ५-२-१९९८ रोजी आली होती. या निमित्ताने श्रीमामांचे नातू श्री. चंद्रशेखर राम केळकर यांनी ती मोठ्या प्रमाणात साजरी केली. या पुण्यतिथीचा कार्यक्रम श्रीमामांच्या पत्नी इंदिराबाई केळकर यांच्या पुण्यतिथीपासून म्हणजे शनिवार, दि. ३१-१-१९९८ पासून सुरू झाला आणि तो दि. ५-२-१९९८ रोजी समाप्त झाला. या शेवटच्या दिवशी दुपारी महाप्रसाद झाला आणि रात्री श्रीमामांच्या आराधनेचे कीर्तनानंतर रथोत्सव होऊन हा कार्यक्रम रात्री १ वाजता समाप्त झाला.

या सहा दिवसांत, पुढीलप्रमाणे कार्यक्रम झाले :-

अ) नित्याचे कार्यक्रम : १) सकाळी - नित्याची पूजा आरती, दासबोधातील नामाच्या समासाचे पठण, तुकारामांचे बारा अभंग पठण, जप व मारुतिस्तोत्र पठण.

२) संध्याकाळी - रामपाठ पठण, श्रीदादांचे कीर्तन आणि पंचपदी.

आ) जादा कार्यक्रम : सकाळी - गोविंदचरितमानस या ग्रंथाचे पठण.

सकाळी व दुपारी प्रवचने आणि भजने

इ) दि. ५-२-१९९८ रोजी :-

श्रीराम जयराम जयजयराम या लिखित जपाचे समर्पण

रेडिओस्टार मंगला जोशी यांचे गायन

रात्री : श्रीमामांच्या आराधनेचे कीर्तन आणि रथोत्सव आणि पंचपदी

उ) भजने :- पुढील मंडळांची भजने झाली :-

१) दासराम महिला भजनी मंडळ २) लाळगे विठ्ठल मंदिर महिला भजनी मंडळ ३) रामनिकेतन महिला भजनी मंडळ ४) ब्रह्मचैतन्य महिला भजनी मंडळ ५) शारदा महिला भजनी मंडळ

२) प्रवचने :- पुढील मान्यवरांची प्रवचने झाली :-

१) बापूसाहेब देशमुख, वकिल २) प्रा. भाऊसाहेब ऐनापुरे ३) प्रा. ह. वा. जोशी ४) मा. शिरीषदादा कवडे ५) सौ. सुनीता देशपांडे ६) हरेरामशास्त्री बोडस ७) डॉ. शरच्चंद्र गद्रे ८) प्रा. गुरुनाथ मुंगळे ९) प्रा. नानासाहेब पाटणकर १०) मा. प्रकाश भावे ११) श्रीकांत देशपांडे १२) केशवराव जोशी १३) श्रीपतिबुवा घोंगडे १४) प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी १५) प्रा. म. अ. कुलकर्णी १६) प्रा. डॉ. पां. ना. कुलकर्णी १७) मा. बळवंत भारती १८) मा. सूर्यकांत केळकर

या निमित्ताने करवीर पीठाचे शंकराचार्य श्री विद्याशंकर भारती श्रीरामनिकेतनमधे आले होते. आणि त्यांनी दि. ०६/०२/१९९८ रोजी प्रवचन केले.

***



## परिशिष्ट १२

### श्रीमामांच्या नांवे दिली जाणारी शालेय पारितोषिके

श्रीमामांनी काही वर्षे सिटी हायस्कूल, सांगलीमध्ये सायन्स व मॉरल या विषयांचे शिक्षक म्हणून सेवा केली. नंतर ते राजीनामा देऊन सेवानिवृत्त झाले. याच सिटी हायस्कूलमध्ये श्रीमामांची काही तरी कायमची स्मृति रहावी या दृष्टीने श्रीमामांच्या काही भक्तांनी श्रीमामांच्या नावाने काही पारितोषिके देण्यासाठी सिटी हायस्कूल चालवणाऱ्या सांगली शिक्षण संस्थेला देणग्या दिल्या. त्यांचा तपशील असा :-

१) देणगीदार : प्रा. क. श्री. काळे,
गुरुवर्य मामामहाराज केळकर समाज सेवा पुरस्कार पारितोषिक

२) देणगीदार : श्री. वि. सहस्रबुद्धे,
गुरुवर्य बापूरावजी केळकर सद्‌वर्तन पारितोषिक

३) देणगीदार : राम गोविंद केळकर,
श्रीबापूरावजी केळकर गीता पाठांतर पारितोषिक.

ही पारितोषिके दर वर्षी पात्र विद्यार्थ्यास/विद्यार्थिनीस दिली जातात.

***

## परिशिष्ट १३

### गणितीय प्रक्रियेने सिद्ध होणारे ‘राम’ नामाचे महत्त्व

तात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या आज्ञेनुसार मामामहाराज केळकरांनी आपले नित्याचे हरिकीर्तन सुरू केले आणि ते आमरण अखंड ३८ वर्षे पार पाडले. त्यांच्या कीर्तनात वरचेवर ‘राम’ नामाचे महत्त्व सांगितले जाई. ‘राम’ या दोनच अक्षरांनी सर्व परमार्थ साध्य होतो, असे ते सांगत. रामनामाचे हे महत्त्व पटवून देण्यास कधी कधी ते एक गणितीय प्रक्रिया सांगत. या प्रक्रियेत ‘दोन’ हीच बाकी उरते. आणि दोन म्हणजे ‘राम’ ही दोन अक्षरे. श्रीमामामहाराज सांगत ती गणितीय प्रक्रिया पुढीलप्रमाणे आहे :-

२ हा अंक मूळ धरावयाचा. तो पिंड व ब्रह्मांड यांचे प्रतीक आहे. आता असे करायवयाचे :-

(अ) २ अंकाला ४ या अंकाने गुणावयाचे (४ हा अंक पिंड व ब्रह्मांड यांतील चार देहांचे प्रतीक आहे.)

२ x ४ = ८

(आ) वरील ८ या अंकात ५ हा अंक मिसळावयाचा (५ हा अंक पंच भूतांचे प्रतीक आहे.)

८ + ५ = १३

(इ) वरील १३ अंकाला २ अंकाने गुणावयाचे (येथे २ हा अंक द्‌वैत आणि अद्‌वैत यांचा निदर्शक आहे).

१३ x २ = २६

(ई) वरील २६ अंकाला ८ अंकाने भागावयाचे (८ हा अंक अष्टधा प्रकृतीचे प्रतीक आहे)

२६ ÷ ८ असे केल्यावर भागाकार ३ येऊन बाकी २ उरते.

२ ही बाकी द्‌व्यक्षरी ‘राम’ नाम सूचक आहे.



वरील गणितीय प्रक्रिया कोणत्याही सम अथवा विषम अंकाच्या बाबतीत केली तरी बाकी २ च उरते.

याचा अर्थ असा की दोन अक्षरी ‘राम’ हे नामच उरते. म्हणून तेच महत्त्वाचे आहे. या ‘राम’ स्मरणानेच सर्व परमार्थ सिद्‌ध होतो.

***

## परिशिष्ट १४

### शाळा नं. २ आणि रस्ता याचे नवीन नामकरण

श्रीमामांच्या घराशेजारीच नगर परिषदेची शाळा नं. २ ही शाळा होती. मा.डी. के. पाटील हे सांगली नगपरिषदेचे अध्यक्ष असताना, त्यांच्या प्रेरणेनुसार शाळा नं. २ व सिटी हायस्कूल परिसरातील रस्ता यांचे नवीन नामकरण करण्यात आले. ते असे :-

शाळा नं. २ चे 'संत मामामहाराज केळकर विद्यामंदिर' असे नामकरण मा. ना. शिवाजीराव शेंडगे (पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि परिवहन विभागाचे राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या शुभहस्ते झाले. वार आणि तारीख होती :- सोमवार, १२ ऑक्टोबर, १९९२.

सिटी हायस्कूल समोरून वरील शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याला 'संत मामामहाराज केळकर पथ' असे नाव देण्यात आले आणि या नामफलकाचे अनावरण हे करवीरपीठाचे जगद्गुरु शंकराचार्य श्री विद्याशंकर भारती यांच्या पवित्र हस्ते झाले.

या दोन्ही प्रसंगी उपस्थित असणारी मंडळी अशी होती :- मा. डी. के. पाटील, मा. मदन पाटील, मा. प्रकाशराव चोपडे, मा. शमशुद्दीन पटेल, साहेबसिंग धिल्लो, भालचंद्र परांजपे, विनायक केळकर, लक्ष्मणराव लटके इत्यादि.

तसेच प.पू.श्रीमामांच्या तैलचित्राचे अनावरण सिटी हायस्कूलमध्ये श्रीदासराममहाराजांच्या हस्ते शिक्षक दिनी (५ सप्टेंबर) झाले. या कार्यक्रमाला खालील मंडळी उपस्थित होती :- श्री. पु. के. दत्तवाडकर, रसिकलाल शहा, भ. रा. नाईक, गो. ब. बिनीवाले.

***



## परिशिष्ट १५

### प.पू.श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर यांनी श्रीमामांना केलेली प्रार्थना

प. पू. श्रीमामांनी माघ शु. नवमी शके १८८३, दि. १२/२/१९६२ रोजी देह ठेवला. देह ठेवल्यावर एक वर्षाचे आत प. पू. श्रीदादांनी श्रीमामांच्या सिंहासनाची प्रतिष्ठापना केली. या सिंहासनाचे दर्शन घ्यावे अशी तीव्र इच्छा प.पू. श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर यांना निर्माण झाली. यावेळी श्रीपांडुरंगमहाराजांची तब्येत बरी नव्हती. त्यांचे पाय लटपटत होते. परंतु याही अवस्थेत ते श्रीराम निकेतन येथे प. पू. श्रीमामांच्या सिंहासनाचे दर्शन घेणेसाठी आले. सिंहासनावर डोके ठेवून त्यांनी नमस्कार केला व सिंहासनासमोर स्तब्ध उभे राहिले. सिंहासनासमोर उभे असतानाच त्यांना एक अभंग स्फुरला व एक आरती स्फुरली. हा अभंग व आरती खाली मुद्दाम दिलेली आहे. या अभंगात श्रीपांडुरंगमहाराजांनी श्रीमामांचेकडे स्वत:ला निजधामाला नेणेबाबत मागणी केली आहे. या जर्जरदेहाचा मला कंटाळा आला आहे; मलाही तुम्ही निजधामाला घेऊन चला व निजधामाला घेऊन जाणेबाबतचा अर्ज तुम्ही पोहोचवा व श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर यांना कळवा असा त्यातील आशय आहे :-

### अभंग

श्रीगोविंदजी कृपामूर्ति । भाग्ये लाभली संगती ।
आता परिसावी विनंती । अखेरची ।।ध्रु।।
सांगलीस आलो । संतसंगती सुखावलो ।
भजनानंदी रंगलो । प्रेमळ भक्तासवे ।।१।।
श्रीदत्तकृपे केला । परमार्थ तो पूर्ण झाला ।
आता आला कंटाळा । या जर्जर देहाचा ।।२।।
श्रीपंतराये आश्वासिले । मन भजनानंदी रंगले ।
तो आता सुखावले । कृपा सद्गुरूंची ।।३।।

आता थकले हे शरीर । संपला याचा आधार ।
काळाचे हे उधार । देऊन टाकू ।।४।।
श्रीदत्तगुरूंच्या पायाशी । आपण राहिला विश्वासी ।
आता तेचि अहर्निशी । मी ही ध्यातसे ।।५।।
कधी कृपा करील गुरूराय । कधी बोलवील माय ।
कधी देईल सुखे आश्रय । ऐसे मज झाले ।।६।।
अर्ज माझा पोहोचवा । श्रीपंतरायास कळवा ।
म्हणा आता बोलवा । पांडुरंगाला ।।७।।
रामानंद बालमुकुंद । पंत परात्पर गोविंद ।
आता एक माझा छंद । उघडा दार मला ।।८।।
अवधूत पंथाला । द्या आशीर्वाद या वेळेला ।
सदा रंग भरला । माजे भजनानंदी ।।९।।
विकल शरीर शक्तिहीन । घ्या अखेरचे नमन ।
हे गोविंद गुण निधान । प्रणिपात अखेरचा ।।१०।।

- अवधूत भजनीमाला

## आरती

आरती हनुमंता जय जय आरती गोविंदनाथा जय जय ।।ध्रु।।
हरिकीर्तनरूप अवतरला तुम्ही । हरिकीर्तन दाता ।।१।।
हरिकीर्तनी या सहज केवळ । हरिश्रोता वक्ता ।।२।।
पांडुरंग गुरू दत्तात्रय परी । दावी निजपंथा ।।३।।

***



# परिशिष्ट १६

## श्रीहनुमद्गुरुचरित्रबोधसार या पुस्तकास प.पू. श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर यांनी दिलेला आशीर्वाद

श्रीसद्गुरु प्रसन्न

आशीर्वाद वि. तुम्ही मजकडे पाठविलेले 'श्रीहनुमद्गुरुचरित्रबोधसार' हे पुस्तक पोचले. अवलोकनांती असे दिसून येत आहे की तुम्ही आपले गुरू श्री. ब्र. हणमंतरावजी (श्रीसद्गुरु तात्यासाहेबमहाराज) यांचा चरित्र भाग निष्कारण व अप्रयोजक पाल्हाळ न करिता थोडक्यात ग्रथित केला आहे हे योग्य आहे. सांप्रदायास अनुसरून साधनक्रम व ह्याला अवश्य लागणाऱ्या योग शास्त्रोक्त–स्थळे वगैरे यांचे वर्णन बरेच कसोशीने केले अहे. जागजागीं तुम्ही दाखविलेली आपल्या गुरूचे ठायीं असलेली श्रद्धा, तुमचा गुरूवचनावरील विश्वास ही तुमची गुरूभक्ती व्यक्त करीत आहेत यात संशय नाही. गुरूभक्त व सांप्रदायिक लोकांना पुस्तक केव्हांही उपयुक्त व साधनास सर्व प्रकारे मदत करणारे असेच आहे हे कोणीही सांप्रदायी कबूल करील. इतका अभिप्राय पुरा असे वाटते म्हणून येथेच विराम पावतो. शुभं भवतु । हे आशीर्वाद.

**नागप्पा भिमाण्णा निंबरगी**

***

## श्री.गोपाळकाका कोटणीस यांनी दिलेला अभिप्राय

श्रीरघुनाथप्रिय पादारविंदाय नमः ।। श्रीरामचंद्रपादारविंदाय नमः ।।

निष्कपट प्रेम व उत्कट श्रद्धा या निर्मल भावना ज्याच्या अंतरात उद्भूत झाल्या त्या सत्शिष्याकडून निज सद्गुरु चरित्र रचिले गेले, ते सर्वांग परिपूर्ण व सुंदर असणारच यात संदेह नाही. त्यावर मजसारख्या मंदमती दुबळ्याने आपला अभिप्राय देणेचे धाडस करणे म्हणजे भलत्या मोठेपणाला बळी पडून उपहासास्पद होणे होय. तरीपण मला येथे श्रीतुकाराममहाराजांचे श्रीमुखातून निघालेल्या रत्नसमुदायापैकी पुढील रत्न (अभंगाचा चरण) उद्धृत करावा वाटतो.

आधिच सोन्याचे वरि जडावाचे । लेणे श्रीमंताचे बहुमोल ।।

***

## परिशिष्ट १७

### श्रीमामांच्या एका कीर्तनाचा सारांश

(श्रीमामांनी ३८ वर्षे अखंड कीर्तन केले. पण त्यांचे एकही कीर्तन संपूर्णपणे उपलब्ध नाही. ता. १५-२-६०, श्रीगुरुतृतीया या दिवशी श्रीमामांचे जे कीर्तन झाले त्याचा सारांश श्रीदादांनी लिहून ठेवला आहे. कीर्तनोत्तर हा सारांश त्यांनी लिहिला असे दिसते. हा सारांश देताना श्रीमामांच्या कीर्तनाचा ढाचाही श्रीदादांनी दिला आहे. तो येथे न देता फक्त सारांश दिला आहे. आणि हा सारांश तुटक तुटक वाटण्याची शक्यता आहे.)

कीर्तनाचे पद

एक भावे मुख्य कामी सावधान।
दया क्षमा पूर्ण शांती जेथे ।।१।।
टाकी घाये देव मूळ स्वभाव नाम ।
त्याचा योगक्षेम देवकृपे ।।२।।
मनाचे सामर्थ्ये होय मायातीत ।
जाणती पंडीत वर्मखूण ।।३।।
दास म्हणे तया नाही काळभय ।
अंतरी अभय नामयोगे ।।४।।

या पदात हेच सांगितले आहे की असा एक भाव आहे की ज्यात मुख्य कामाची स्फूर्ति उत्पन्न होते. सद्गुरूंचे देणे अपूर्व आहे. आणि ते असे आहे की त्या संबंधी कोणती काळजी करणेचे कारण नाही. मुख्य स्फूर्ति अखंड रहाते. म्हणून 'जयाचिया वाचा पुढा भोजे' या ओवीमध्ये श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी सांगितले आहे की जय देणारा परमात्मा आहे आणि त्याचे नाम मुखाने अखंडपणे येणेस एका भावनेमध्ये, एकतानतेमध्ये आले पाहिजे. तो भाव श्री सद्गुरू उत्पन्न करतात.

आज मोठा पर्वणीचा दिवस आहे सिद्धागिरीचे महाराजही येथे आले आहेत.



एकदा काय झाले :- वामन बलीकडे गेला. वामनास पाहून बलीने विचारले, 'तू कोण?' वामनाने उत्तर दिले 'मी अपूर्व'. पुनः बलीने प्रश्न विचारला 'तू अपूर्व कोठे वससी?' तर 'विश्वात' हे उत्तर आले. 'पाठी कोण तुझे?' हा प्रश्न करताच 'मी अनाथ, न त्राता, न माता, न पिता' हे उत्तर आले. 'द्यावे काय तुला?' पुनः (बलीने) प्रश्न केला, तर 'तीन पावले जमीन पाहिजे आहे.' असे (वामनाने) सांगितले. 'माझ्या मते, फार घे.' बली म्हणाला. आणि हेच साधुसंतांचे देणे अपूर्व आहे. जिकडे साधु दृष्टि फिरवितात ते अपूर्व होऊन जाते.

वेगे वामन बोलिला बळीस की तृप्ती त्रिलोकी दिसे

शुक्राचार्य उपाध्यायांनी सांगितले होते की बटुरूपाने यज्ञ नाहीसे करण्यासाठी देव आलेला आहे. बळीने ते ऐकले नाही. त्याने उदक सोडले व वामनाने विराट स्वरूपाने

एक्या पदे भूमि भरोनि थोडी...
म्हणोनि पाशी दृढ आवळिला

सामर्थ्यवान बली इंद्रपदासाठी प्रयत्न करीत होता. म्हणून यज्ञविनाशासाठी वामन आला होता. त्याने विराट स्वरूप धारण करून दोन पदांनी स्वर्ग व मृत्यु हे दोन लोक व्यापिले. तिसरा पाय ठेवण्यास जागा नव्हती. बलीने सांगितले, 'माझ्या मस्तकी पाय ठेव.' आणि अशा रितीने जगाचे रक्षण केले.

या मार्गाने सद्गुरूला शरण जावयाचे आहे. मुख्य काम कोणते असेल तर भावनेमध्ये आले पाहिजे. आणि तेच काम करावयाचे आहे.

'माझी मज झाली अनावर वाचा । छंद या नामाचा लाभलासे'

सद्गुरूंचे हे देणे आहे. त्यांच्या सांनिध्यात राहिले अथवा त्यांच्या चरणाचा स्पर्श झाला तर ते आपल्या ठिकाणी काही ठेवतच नाहीत.

एकदा नाथांनी उत्सवासाठी कर्ज काढले व अमुक एक दिवसात 'परत करतो' असे सांगितले. काही दिवसांनी त्यांच्या नाथांच्याकडे सुबत्ता आली. तरी सावकाराचे पैसे दिले नाहीत. सावकार पैशासाठी आला, व त्याने विठ्ठलाची

शपथ घातली. भगवान् श्रीखंड्या होते. ते उद्धवाचे रूप घेऊन आले व हिशोबाप्रमाणे (त्यांनी) पैसे दिले. सावकाराने ते घेतले आणि त्यातील दोन रुपये तोंडामध्ये ठेवले. पैसे पुन: मोजले तर ते कमी. मग सावकाराने तोंडातील दोन रुपये काढले तरी पुन: तोंडात दोन रुपये शिल्लकच. आणि अशा रीतीने त्याच्याजवळ ५०० रूपये जमले. याचे कारण त्यास उद्धवाचा-परमात्म्याचा-स्पर्श झाला होता.

हेची दान देई स्वामी । राहो नित्य मन नामी ।
तुझी सेवा अखंडित । घडो रूपी जडो चित्त ।
अखंड ना खंडे अभंग ना भंगे ।
तुका म्हणे गंगे मिळणी सिंधु।

ज्या भावनेमध्ये आले असता सद्गुरूंच्या कृपेने मन सेवेत रमले जाते, गंगेचा ओघ समुद्राला मिळून जातो, सद्गुरु ज्या कृतीत आणतात ती सेवा भावनेमध्ये आल्यावर होते.

'तुझी सेवा अखंडित ।' अखंड म्हणजे 'मज अखंड राघव कळला रे । कल्पतरु गुरु फळला रे।।' सद्गुरु फलद्रूप झाल्यावर काय मिळणार नाही? तुकाराममहाराजांनी म्हटले आहे, 'न घडे ते घडो येईल उगले । नामे या विठ्ठले एकाचिया ।।' विठ्ठलाच्या नामामध्ये असा महिमा आहे की ते घेतले असता 'न घडे ते घडे'.

हजार जन्मांची ओळीने जर पुण्याई असेल तर मुखातून एक वेळ रामकृष्णहरी येईल. मग सद्गुरु या वृत्तीत आणून ठेवतात.

परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी यातून नाम उत्पन्न होते. या पलीकडील वाचेस संकल्प नाही. ती अखंड नाम घेत असते.

गुरुलिंगजंगम । तेणे दाविला आगम ।
आधि व्याधि झाली सम । तेणे पावलो विश्राम रे ।।
देह भाव जेथे विरे । ऐसे साधन दिले पुरे ।
बापरखमादेवीवरे । विठ्ठलु रे विठ्ठलु रे विठ्ठलु रे विठ्ठलु रे ।।



सेवा अखंड पाहिजे. भक्ती कोणाच्या अंत:करणात उत्पन्न होईल यास प्रमाण नाही.

(एका) राजाच्या मनात देव भेटण्यासाठी तळमळ होती. त्याने पुष्कळांना विचारले.एकदा गोरक्षनाथांची स्वारी (त्याच्याकडे) आली. त्यांनी सांगितले 'सात दिवसांत (मी) केव्हांही येईन. त्यावेळी ताजे दूध व ऊन भात मला पाहिजे.' राजाकडे हजारो गाई व दासदासी होत्या. राजेने आवडत्या राणीस बोलावून सांगितले की 'ताजे दूध व ताजा भात पाहिजे'. याप्रमाणे रोज सुरू झाले.पण गोरखनाथ आले नाहीत. कंटाळून राणीने ते बंद केले. अचानक 'माई, भिक्षा आलख' (म्हणत) गोरक्षनाथ आले आणि गेले. राजाला हे समजले. राजाने क्षमा मागितली. त्याने नावडत्या राणीस सांगितले. तिने सेवेचा क्रम सतत सुरू ठेवला.ती (एकदा) स्नानगृहात गेली. स्वामी आल्यावर (ती) नग्न अवस्थेतच आली व (तिने गोरक्षनाथांना) भिक्षा वाढली.

आज या ठिकाणी महाराज आले आहेत. अखंड चिंतनात आणण्यास ते समर्थ आहेत.

हे सर्व नामाच्या योगाने होते ते नाम हे :- श्रीराम जयराम जय जय राम

***

## परिशिष्ट १८

### प. पू. श्रीमाममहाराज केळकर यांचे कीर्तनाचा अमृतमहोत्सव

प. पू. श्रीमाममहाराज केळकर हे इ. स. १९२४ साली प. पू. श्रीसमर्थ रामदासस्वामी यांच्या ग्रंथराज श्रीमद् दासबोधाचे पारायण करीत असताना माघ वद्य तृतीयेच्या दिवशी भगवान् सद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांनी आपल्या निर्याणानंतर साक्षात् प्रगट होऊन श्रीमामांना दर्शन दिले आणि अखंड हरिनामसंकीर्तन करण्याची आज्ञा देऊन आशीर्वाद दिला. या प्रमाणे श्रीमामांनी गुरुवार, माघ वद्य प्रतिपदा, शके १८४५, दि. २१-०२-१९२४ पासून आयुष्यातील शेवटच्या दिवसापर्यंत म्हणजे माघ शुद्ध नवमी, शके १८८३, दि. १२-०२-१९६२ पर्यंत अखंड नित्य हरिनामसंकीर्तन केले. त्यांचे नंतरही 'मामा ब्रह्मपदी गेले । कीर्तन त्यांचे अखंड चाले' या वचनाप्रमाणे प. पू. सद्‌गुरु श्रीदासराममहराज केळकर यांनी माघ शु. १०, शके १८४५,दि.१३/२/१८८२ पासून नित्य हरिनामसंकीर्तन सुरू केले. माघ शु. नवमी, शके १९२० दि. २५-०१-१९९९ रोजी श्रीमामांची ३७ वी पुण्यतिथी होती. श्रीमामांनी सुरू केलेल्या अखंड कीर्तनाला १९९९ साली ७५ वर्षे पूर्ण होत होती. म्हणजेच 'अखंड कीर्तनाचा अमृतमहोत्सव' होता. याचे औचित्य साधून प. पू. श्रीदादांनी ७५ तास साधन करणे व श्रीदासबोध पठण असे दोन विशेष कार्यक्रम आयोजित केले होते. हे दोन कार्यक्रम दि. १९-१२-१९९८ ते दि. २-२-१९९९ अखेर अशा ४६ दिवसांच्या कालावधीमध्ये पूर्ण करणेचे होते. हे दोन कार्यक्रम खालीलप्रमाणे पूर्ण केले गेले.

१) एकूण ४६ दिवसांपैकी दि. १९-१२-१९९८ पासून दि. २०-१-१९९९ असे ३३ दिवसात प्रतिदिनी १।। तास साधन केले व दि. २१-१-१९९९ पासून दि ०२-०२-१९९९ अखेर १३ दिवसात प्रतिदिनी २ तास साधन केले; या प्रमाणे ४६ दिवसात ७५ तास साधन पूर्ण केले.



२) एकूण ४६ दिवसात दररोज ४ ते ५ समास वाचून श्रीमद् दासबोधाचे पठण पूर्ण करणेत आले.


वरीलप्रमाणे प. पू. श्रीदादांनी अखंड कीर्तन सेवेचा अमृतमहोत्सव मोठ्या थाटाने पार पाडला.

***

## परिशिष्ट १९

### श्रीगजाननमहाराज संस्थान शेगांव (विदर्भ) येथील भक्तधाममधील खोलीस श्रीमामांचे नामकरण

श्रीगजाननमहाराज संस्थान शेगांव (विदर्भ) यांचेमार्फत भक्तधाम क्र. ४ या इमारतीचे बांधकाम सुरू होते. या इमारतीमध्ये येणाऱ्या भक्तजनांना रहाण्यासाठी खोल्या बांधल्या जाणार होत्या. ही बाब लक्षात घेऊन कराड येथील रहिवासी व प. पू. श्रीदासराममहाराज केळकर यांचे शिष्य श्री. धुंडिराज वामन रानडे व सौ.स्नेहल धुंडिराज रानडे यांनी भक्तधाम मधील खोली क्र. ५५ चे बांधकामासाठी श्रीमामामहाराज केळकर यांचे स्मरणार्थ दि. २४-१-१९९९ रोजी रक्कम रु. ५१,०००/- मात्रची कायम देणगी दिली. बांधकाम पूर्ण झालेनंतर संस्थानने संगमरवरी दगडामध्ये शिलालेख कोरून तेथे लावला आहे. या शिलालेखावरील मजकूर खालीलप्रमाणे आहे.






## परिशिष्ट २०

### हनुमद्‌गुरुचरित्रबोधसार ग्रंथाची निमंत्रण पत्रिका

इ.स.१९३७ साली श्रीमामांनी लिहिलेले हनुमद्‌गुरुचरित्रबोधसार हे पुस्तक प्रकाशित झाले. त्या निमित्त सद्‌गुरूंना हा ग्रंथ समर्पणाचा सोहळा साजरा करण्याचे ठरले. त्या निमित्ताने या कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका श्रीमामांचे चिरंजीव श्रीरामराय यांनी काढली होती. ती पुढे दिली आहे :-

।। श्री ।।

**साधनमार्गास धरून लिहिलेलें ओवीबध्द**

**'' श्रीहनुमद्‌गुरुचरित्रबोध-सार''**

**ग्रंथसमर्पण.**

**गणेश चतुर्थी शके १८५९ बुधवार**

सायंकाळी ५ वाजतां.

**समारंभानिमित्त कार्यक्रम.**

**१ स्वागतपर पद्यें.**
**२ स्वागतपर भाषण.**
**३ कै. श्रीसद्‌गुरु हणमंतरावजी कोटणीस महाराज** यांचा अल्प परिचय **(साधुदास)**
**४ इतर भाषणें.**
**५ ग्रंथसमर्पण. (राम गोविंद केळकर)**
**६ गुरुवर्य दादासाहेब कोटणीस यांचे भाषण.**
**७ समारोप व आभारप्रदर्शन.**
**८ पानसुपारी.**
**९ प्रार्थनागीत.**

सांगली<br>ता. ८-१-१९३७ इ. } **राम गोविंद केळकर**

## परिशिष्ट २१

### प.पू.श्रीमामांची वर्तनक्रमपत्रिका

श्रीमामांनी आपल्या आचाराचे क्रम आणि वेळा आणि वार यांची सांगड घालणारी वर्तनक्रमपत्रिका तयार केली होती. त्याचा क्रम असा :-

**पान नं १**

**वर्तनक्रमपत्रिका**

गोविंद अनंत केळकर, सांगली

आणि खाली Govind Anant Kelkar हे इंग्रजी शब्द.

**पान नं २**

या पानावर १ श्री. ता. १९-६-१४ असे प्रारंभी आहे. त्यानंतर

‘‘ वर्तन ’’ या शीर्षकाखाली, आचार, आहार, निश्चय, उपासना आणि व्रतपालन या शीर्षकाखाली निरनिराळे मुद्दे दिलेले आहेत. शेवटी GAK अशी श्रीमामांच्या नावाची आद्याक्षरे आहेत.

**पान नं ३**

या पानावर वार आणि वेळ या नुसार करावयाच्या कार्यक्रमांची नोंद आहे.

**पान नं ४**


या पानावर श्रीराम ।। दिनचर्या ।। श्रीराम या शब्दाखाली

दिवसाच्य वेळानुसार ‘‘ काय करावयाचे ते ’’ दिलेले आहे. नंतर तुलसीदासांचे वचन देऊन, G.A.Kelkar अशी सही केलेली आहे.

**पान नं ५**

या पानावर ॐ श्रीराम जयराम जयजयराम.दिनचर्या. श्रीराम जयराम जयजयराम. असे शब्द प्रारंभी असून खाली कलात्मकरीत्या निरनिराळ्या स्तंभाखाली रोजच्या रोज वेळे नुसार काय करावयाचे आहे ते दिले आहे. त्यानंतर तुलसीदासांचे एक वचन उद्‌धृत करून त्या वचनाच्या मध्यभागी G.A.Kelkar हे शब्द इंग्रजीत आहेत.





१ श्री. ता० १९-६-१४

वर्तन.

१ मौन :- विशेषकारणाशीवाय बोलणेचे नाही.

२ सत्य :- सर्व जे बोलणे ते सत्य बोलणे, प्रेमळपणाने.

३ प्रेम :- सर्वांवर प्रेम ठेवणे.

४ लीनता :- सर्वांशी नम्रपणाने असणे.

५ परस्त्रीने मातसमान :- परस्त्रियामाते समान मानणे.

आहार.

" सर्व फक्क फकावक्क "

१ तांदळाचा भात. ३ शेंदेलोण.

२ मुगाचे वरण. ४ दूध, दहीं, तूप.

निश्चय.

१ या सर्व गोष्टी निश्चयाने परमेश्वरावर श्रद्धा ठेऊन वागणे.

उपासना.

ॐ श्रीराम. श्री राम समर्थ गुरु ॐ श्रीराम.

व्रतपालन.

" सत्यवचन और लीनता परस्त्री मात समान "

" इतने ऊपर हर न मीले तो तुलसी दास जमान "

श्री राम जय राम जय जय राम.

[signature]



२

| वेळ. / वार. | ४ ते ८ | ८ ते १० | १० ते १२ | १२ ते ६ |
|---|---|---|---|---|
| सोमवार | स्नान-संध्या पूजा-ध्यान नमस्कार. | वाचन. | नैवेद्य-वैश्वदेव भोजने. वगैरे. | राजसेवा |
| मंगळवार | ,, (सदरप्रमाणे). | ,, | ,, | ,, |
| बुधवार | ,, | ,, | ,, | ,, |
| गुरुवार | ,, | ,, | ,, | ,, |
| शुक्रवार | ,, | ,, | ,, | ,, |
| शनिवार | ,, | राजसेवा | राजसेवा | नै. वै. भोजन. १२ ते २ व. २ ते ६ वाचन इ० |
| रविवार | ,, | वाचन | नैवेद्य वैश्वदेव भोजन वगैरे. | वाचन |

THE SARASWATI CHEMICAL
WORKS, DEPOT Sangli.

श्रीराम ॥ दिनचर्या ॥ श्रीराम

| वेळ | कार्य करावयाचे ते | अं० |
|---|---|---|
| ४-५ | प्रातःस्मरामि,(भस्मस्नानयुक्त) | १ |
| ५-६ | प्रातर्ध्यान, भगवन्नामस्मरण. | २ |
| ६-८॥ | स्नान, संध्या, पूजा, नमस्कार | ३ |
| ८॥-१० | वाचन, (अद्वैतपर ग्रंथांचे). | ४ |
| १०-११ | माध्यान्हसंध्या. नै० वै० ई० | ५ |
| ११-५ | राजसेवा (स० ७-१०) क० | ६ |
| ५-६ | वाचन सामाजिक वगैरे. | ७ |
| ६-८ | सायंसंध्या, ध्यान, नामस्मरण. | ८ |
| ८-९ | सायंस्तोत्रपाठ, इत्यादी. | ९ |
| ९-१०॥ | भगवन्नामगुणसंकीर्तन. | १० |
| १०॥-४ | विश्रांती, परमेशप्रार्थना. | ११ |
| १ | सत्यवचन और दीनता- | |
| २ | परस्त्री मात समान ॥ | |
| ३ | इतने उपर हरि न मिले तो- | |
| ३ | तुलसीदास जमान ॥१॥ | |

G. A. Kelkar



K श्रीरामजयरामजयजयराम. दिनचर्या. श्रीरामजयरामजयजयराम. Q

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | |
| | प्रातर्ध्यान | प्रातःसं. | नमस्कार | श्रीजप. | राजसेवा ५+६(८) | वाचन | सायंसं. | सायंध्या. | |
| स | ३-६. | ६-७ | ७-८॥ | ८॥-१०॥ | १०॥-५ | ५-६ | ६-७ | ७-८ | सं |
| | ९ | १० | ११ | १ | २ | १ | २ | ० | |
| सं | श्रीजप. | श्रीकीर्त. | विश्रांती. | [स० क्र० रा० ३ | रा० क्र० स० ४-५ उत्थान] | [न. ७०० | ज. १३०००] | श्री. ध्या | स |
| | ८-९. | ९-१०॥ | १०॥-३ | ३-७॥ | ७॥-१०॥ | (१॥) | (४) | (३) | |
| K | ० | १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ | ० Q |

० १ सत्यवचन. १
२ दीनता. २
३ परस्त्रीमातसमान ३
श्री सद्गुरवे नमः G. A. Kelker
४ शांति. ४
५ क्षमा. ५
६ दया. ६ ०
G. K.

## परिशिष्ट २२

### श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे प्रमाणभूत चित्र

'महाविष्णूचा अवतार, सखा माझा ज्ञानेश्वर किंवा कैवल्याचा पुतळा प्रगटला भूतळा' असे ज्ञानेश्वर महाराज होते. काही काळ देहधारी रूपाने ते या पृथ्वीतलावर वावरले आणि नंतर त्यांनी संजीवन समाधि घेतली. आता विष्णूचे चित्र पाहून ज्ञानेश्वर पाहिले असे वाटत नाही, तसेच कैवल्य म्हणजे काही मूर्त वस्तू नव्हे. त्याचप्रमाणे ज्ञानेश्वरमहाराजांची ब्रह्मरूपता, विश्वात्मकता अथवा वाङ्मयीन मूर्ति हेही त्यांचे शरीरधारी मूर्त स्वरूप दाखवू शकत नाहीत. ज्ञानेश्वरमहाराजांचा समकालीन असा खरा पुतळा, चित्र अथवा फोटो यातील काहीच उपलब्ध नाही. ज्ञानदेवांची समाधि आळंदीला आहे, परंतु ती त्यांचे देहरूपी स्वरूप नव्हे. या सर्वांचा निष्कर्ष असा की, ज्ञानेश्वरांची शरीराकृति कशी होती, हे जाणून घेण्याची इच्छा असल्यास ती पुरी होऊ शकत नाही, तथापि ही उत्सुकता शमविण्यास, आणि देहधारी ज्ञानेश्वर कसे असावेत, हे सूचित करण्यास, त्यांचे काही पुतळे आणि चित्रे तयार झाली. पण या पुतळ्यांत अथवा चित्रांत बहुधा एकरूपता तर नाहीच, पण फरक मात्र बरेच आहेत. अशा स्थितीत या चित्रांपैकी कोणते चित्र सकारण प्रमाणभूत मानता येईल?

ज्ञानेश्वरमहाराजांच्या चित्रांचा शोध घेताना, रंगीत अथवा कृष्ण-धवल असणारी अशी एकोणतीस चित्रे मला उपलब्ध झाली (मला उपलब्ध न झालेली अशी आणखीही काही चित्रे असण्याचा संभव आहे). यांपैकी काही चित्रे स्वतंत्र आहेत, तर उपलब्ध चित्रात थोडा फरक करून अन्य चित्रे बनविलेली दिसतात. या चित्रांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

१) पुसेसावळी (सातारा) येथे अयाचित नावाचे ज्ञानेश्वर भक्त होते. त्यांच्याकडे असणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या पुतळ्यावरून घेतलेले एक छायाचित्र उपलब्ध आहे. या



चित्रात ज्ञानेश्वर उभे आहेत. केस उलटे फिरवलेले आहेत. गळ्यात माळा आहेत. डाव्या खांद्यावरून पुढे आलेले जानवे आहे. डाव्या हाताच्या मुठीत काही तरी धरलेले आहे. उजव्या हाताची मूठ मिटलेली असून तर्जनी जमिनीकडे आहे. पायात खडावा आहेत. पायांखाली बैठक दाखविलेली आहे. मुख्य म्हणजे खेचरी मुद्रा लावलेली आहे.

२) कॅलेंडर मध्येच पहायला मिळालेले व सध्या सांगलीच्या श्रीदादामहाराज केळकर यांच्या घरी फ्रेम करून ठेवलेले चित्र असे आहे. काळे केस उलटे फिरविलेले आहेत, ते मागच्या बाजूने खांद्यापर्यंत रुळत आहेत. गळ्यात तीन माळा आणि एक पुष्पहार आहे. कमरेला कद गुंडाळलेला आहे. ज्ञानदेव पद्मासनस्थ असून समोर एक पोथी आहे. डाव्या हातात पोथीचे एक पान असून, उजव्या हातात लेखणी आहे. चर्मासन आहे. डाव्या खांद्यावरून पांबरी खाली आलेली आहे.

३) श्री. दीक्षित नावाच्या चित्रकारांनी काढलेले एक चित्र पुढीलप्रमाणे आहे:- काळे केस उलटे फिरविलेले असून, भव्य कपाळावर उभे गंध आहे. गंधामध्ये बुक्क्याचा काळा ठिपका आहे. दोन्ही कानशिलांवर गंधाचे टिळे आहेत. गळ्यात तुळशीची माळा व पानांचा हार आहे, गळ्यात असणारे जानवेही दिसते. पाटांवर पद्मासन असून, पायांवर हात एकमेकांवर ठेवलेले आहेत. कमरेला पांढरे धोतर आहे. समोर वस्त्रांत बांधलेली पोथी आहे. दोन्ही बाजूंना समया आहेत.

४) श्री. गिंडे, श्री. खांडेकर यांनी संपादित केलेल्या 'ज्ञानेश्वरी' अध्याय दुसरा (कोल्हापूर, प्रथमावृत्ति, १९७३) या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील चित्र असे आहे:-उलटे फिरविलेले केस खांद्यापर्यंत लोळणारे आहेत. कपाळाला उभे गंध आहे. गळ्यात दोन माळा आहेत. डाव्या खांद्यावर गाठ असलेली पायघोळ कफनी आहे. मांडी घातलेली असून, कमरेला शेला आहे. डावा हात डाव्या

मांडीवर आहे. उजवा हात उचलून छातीशी तर्जनी व अंगठा जोडलेली अशी मुद्रा आहे. पुढे चौरंगावर 'ज्ञानेश्वरी'ची पोथी आहे आणि डावीकडे घोडीला अडकविलेली पेटती पणती आहे.

५) शं. गो. वाळिंबे संपादित 'श्रीसार्थ ज्ञानेश्वरी' अध्याय ७ (इंदूर १९५०) या पुस्तकाच्या वेष्टनावरील चित्र पुढीलप्रमाणे आहे :- उलटे फिरविलेले केस मानेवरून खांद्यापर्यंत आलेले आहेत. डोळे मिटलेले आहेत. डाव्या खांद्यावरून मांडीवर आलेले उत्तरीय वस्त्र आहे. मांडी घातलेली आहे. उजवा हात गणपतीप्रमाणे वर उचललेला आहे. डावा हात डाव्या मांडीवर आहे. समोर चौरंगावर कोणती तरी वस्तू आहे. उजव्या बाजूला समई आहे.

६) शं. गो. घैसासकृत 'श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे चरित्र' (पूर्वार्ध) (प्रथमावृत्ति, पुणे, शके १८८१) या ग्रंथातील चित्र पुढीलप्रमाणे आहे:-उलटे फिरविलेले केस मानेवरून खांद्यापर्यंत आलेले आहेत. गळ्यात एक माळ आहे. साधी कफनी घातलेली आहे. कमरेला धोतरासारखे वस्त्र गुंडाळलेले आहे. उजव्या मांडीवर ठेवलेल्या उजव्या हाताचा अंगठा आणि तर्जनी जोडलेली अशी मुद्रा आहे. डावा हात डाव्या मांडीवर आहे. नेत्र उघडे आहेत.

७) 'भारतीय संस्कृती कोश' दहावा खंड, (पुणे-१९७९) या ग्रंथातील ज्ञानेश्वर चित्र असे:-मस्तकाला फेटा आहे. कपाळावर एकरेघी गंध आहे. गळ्यात माळ व मांडीपर्यंत पोचलेला हार आहे. खांद्यावरून पाठीकडच्या बाजूने खाली आलेले शालीसारखे वस्त्र आहे. दोन्ही मनगटात पुष्पमाला आहेत. महाराजांनी पद्मासन घातलेले आहे. पाठीमागे लोड असून पुढे चौरंग आहे.

८) बा. त्र्यं. शाळिग्रामकृत 'श्रीज्ञानेश्वरांचा ग्रंथराज' (पुणे, १९७९) या ग्रंथाच्या मुखपृष्ठ वेष्टणावर चित्र आहे. चौरंगावर पद्मासन घातलेली स्थिति आहे. हात पोटाशी ठेवलेले आहेत. पुढे चौरंगावर कोणती तरी पोथी आहे. खांद्यावरून पाठीमागच्या बाजूने खाली आलेले शालीसारखे वस्त्र आहे. डाव्या



बाजूकडे घोडीला अडकवलेली तेवणारी पणती आहे.

९) बा. आ. भिडे संपादित 'सार्थ ज्ञानेश्वरी' (चौथी आवृत्ती, मुंबई, शके १८९४) या ग्रंथाच्या वेष्टणावरील चित्रात डोक्याला मंदिल व त्याला तुरा आहे. कपाळावर उभे दुरेघी गंध असून मध्ये बुक्क्याचा काळा ठिपका आहे. डोळे उघडे आहेत. गळ्यात एक माळ. मांडीपर्यंत पोचणारा पुष्पहार. खांद्यावर पाठीकडून पांबरी आहे. कंबरेला कद आहे. चौरंगावर पद्मासन घातलेले, हात गुडघ्याच्या बाजूने आहेत. दोन्ही मनगटांवर पुष्पमाला आहेत. दोन्ही हातांची तर्जनी व अंगठा ही बोटे जुळवलेली. दोन्ही बाजूंना तेवत्या समया. पुढे पोथी त्यावर 'अमृतानुभव' ही अक्षरे असून पोथीवर फुले घातलेली आहेत.

१०) सत्यदेवानंदकृत प्रत- 'श्रीज्ञानेश्वरी (पुणे, १९७६) यामध्ये अर्धे शरीर दिसते. डोक्याला मंदिल. त्याला तुरा. कपाळाला उभे गंध. गंधाच्या वरच्या टोकाला बुक्क्याचे तीन ठिपके. नेत्र उघडे. उजव्या बाजूला वळलेला असा तिरका चेहरा असल्याने उजवा कान दिसत नाही. डाव्या कानात कर्णभूषणे आहेत. दोन्ही खांद्यावरून पुढून खाली आलेले व गळ्यापर्यंत पोचणारे शालीसारखे वस्त्र.

११) गो. नी. दांडेकरकृत 'श्री संत ज्ञानेश्वर' (पुणे, १९७४) या ग्रंथाच्या मुखपृष्ठावरचे चित्र काळे केस उलटे फिरवलेले असून चेहऱ्याची ठेवण तिरकी ठेवलेली आहे. कपाळावर दुरेघी उभे गंध. दिसणाऱ्या उजव्या कानात बहुधा कुंडल आहे. गळ्यामध्ये दोन्ही दंडांवर आणि दिसणाऱ्या उजव्या मनगटात रुद्राक्षाच्या माळा आहेत. साधी मांडी घातलेली. डाव्या खांद्यावरून खाली येऊन उजव्या मांडीवरून खाली जमिनीवर पसरलेले उपरणेवजा वस्त्र. डाव्या व उजव्या हातांनी कोणत्या तरी पोथीचे पान धरलेले. खाली चर्मासन आहे. चर्मासनांवरच पुढे पोथी ठेवलेली. डाव्या बाजूला समईवजा घोडी असून आडव्या लावलेल्या टवळ्यात पेटती ज्योत आहे.

येथपर्यंत तपशीलाने सांगितलेल्या चित्रांना कशाचा आधार आहे, हे कळत नाही. ही सर्वच चित्रे कल्पनेतून निघालेली आहेत, हे काही वेगळे सांगावयास नको.

श्री. शांताराम आठवले यांनी ऑगस्ट १९७६ च्या 'वाङ्मयशोभा' च्या अंकात लिहिलेल्या 'श्रीज्ञानेश्वरमहाराज होते तरी कसे?' या लेखात पाच चित्रांची चर्चा केली आहे आणि त्याबद्दलचे त्यांचे काय म्हणणे आहे तेही तेथे सापडते. हा भाग असा देता येईल.

१२) न. बा. देशमुख संपादित 'श्रीज्ञानेश्वर दर्शन' भाग १ (आवृत्ती पहिली, अहमदनगर, १९३४) या ग्रंथात दिलेले ज्ञानेश्वरांचे चित्र असे आहे:- डोकीचे केस उलटे फिरविलेले, अर्ध्या देहाचे हे चित्र आहे. खांद्यापासून खालपर्यंत पुढील बाजूने लपेटलेले असे उपरणे वा उत्तरीय वस्त्र आहे. कपाळ रुंद असून नेत्र उघडे आहेत.

याच ग्रंथाच्या उपोद्घातामध्ये (पृष्ठ ४५ वर) असे सांगितलेले आहे की, 'या ग्रंथात घालण्यास रा. स. तोरो आणि सरदार मिरीकर यांनी छायाचित्रे दिली.' तथापि ज्ञानेश्वरांचे हे चित्र स्वतंत्र आहे की, ते अन्य चित्रांचा ब्लॉक आहे हे कळत नाही. तसेच चित्र कुणी व केव्हा काढले, कुणाकडे होते इत्यादि गोष्टींचा काहीच खुलासा या ग्रंथात दिलेला नाही. परंतु या चित्राच्या संदर्भात शांताराम आठवले लिहितात:- 'ज्ञानेश्वरांच्या जन्मकुंडलीवरून त्यांची आकृति व मुद्रा कशी असेल त्याचे रेखाटन या चित्रात करण्याचा प्रयत्न केला आहे, असे मला समजले. कोणत्या लग्नाची कुंडली प्रमाण धरून हे चित्र काढले आहे, याची कल्पना नाही' (वाङ्मयशोभा, ऑगस्ट १९७१, पृष्ठ ६५).

'ज्ञानेश्वरदर्शन' या ग्रंथावरूनच कळते की, ज्ञानेश्वरांच्या कुंडलीविषयी एकमत नाही. खेरीज केवळ कुंडलीवरून काढलेले चित्र प्रमाणभूत होणार नाही, हेही अगदी उघड आहे.



१३) ज्या वेळी प्रभात फिल्म कंपनी 'संत ज्ञानेश्वर' हा चित्रपट काढणार होती त्यावेळी 'ज्ञानेश्वर दर्शन' या ग्रंथातील चित्र श्री. शांताराम आठवले यांनी कंपनीच्या फत्तेलाल यांना दाखविले. आपल्या कल्पनेचा वापर करून फत्तेलाल यांनी ज्ञानेश्वरांची एक रूपरेखा ठरविली. प्रभात कंपनीने घडविलेले ज्ञानेश्वरदर्शन असे आहे :- उलटे फिरविलेले केस खांद्यापर्यंत रुळत आहेत. नेत्र मिटलेले आहेत. कान केसांमागे लपलेले. डाव्या खांद्यावरून मांडीपर्यंत येणारे वस्त्र आहे, गळ्यात दोन माळा आहेत, स्वारी पद्मासनस्थ आहे. या ज्ञानेश्वरदर्शनाच्या अनुकरणाने अनेक चित्रे आणि शिल्पे प्रचारात आली, असे शांताराम आठवले सांगतात.

'प्रभात चित्रपट कंपनीने घडविलेले हे ज्ञानेश्वर दर्शन काल्पनिक आहे,' यात शंकाच नाही. त्यामुळे ते काही प्रमाणभूत मानता येत नाही, असे जे शांताराम आठवले म्हणतात ते कुणालाही मान्य होण्यासारखे आहे.

१४) श्री. मोरेश्वर बळवंत वैद्य यांनी १९६० साली डोंबिवलीत स्थापन केलेल्या ज्ञानेश्वर भजन मंडळातर्फे उत्सवासाठी ज्ञानेश्वरमहाराजांचा एक पुतळा तयार करून घेण्याचे ठरविले. हा पुतळा चिंचपोकळी येथील मूर्तिकार श्री.पेडणेकर यांनी तयार केला. 'श्री. पेडणेकर यांनी पुतळा तयार करताना आपल्यासमोर कोणते ध्यान ठेवले होते व त्यांना त्यावेळी काही विशिष्ट प्रेरणा वगैरे झाली किंवा काय हे समजले नाही (तत्रैव पृ. १६)' तथापि सध्या गुलाबरावमहाराज पुरस्कृत म्हणून जे चित्र मानले जाते (याची अधिक माहिती पुढे आलेली आहे), त्यातच काही फेरफार करून श्रीपेडणेकरांनी पुतळा बनविला असे वाटते.

या पुतळ्यावरून घेतलेले छायाचित्र ऑगस्ट १९७१ च्या 'वाङ्मयशोभा' मासिकाच्या मुखपृष्ठावर दिलेले आहे. या पुतळ्यात मांडी घालून बसलेले ज्ञानेश्वर आहेत. डोक्याला फेटा असून फेट्याला तुरा आहे. दोन्ही खांद्यावरून पाठीच्या बाजूने मांडीपर्यंत आलेले शालीसारखे वस्त्र आहे. मांड्या झाकल्या

गेल्याने आसनमांडीचे स्वरूप कळू शकत नाही. हातही याच वस्त्राने झाकलेले आहेत. कपाळावर उभे गंध असून नेत्र उघडे आहेत. हेच पुतळाचित्र पुढील ठिकाणी आढळते. (१५) स्वामी स्वरूपानंद, 'अमृतधारा' द्वितीयावृत्ति, शके १८९४, पावस, (रत्नागिरि), (१६) स्वामी स्वरूपानंद, 'श्रीमत् अभंग ज्ञानेश्वरी' पूर्वार्ध, तृतीया वृत्ति, शके १८९५ पावस, (रत्नागिरी), (१७) प्र. न. जोशी संपादित 'सार्थ ज्ञानेश्वरी अभंग गाथा' सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे १९६९.

६) श्रीगुलाबरावमहाराज पुरस्कृत चित्राची सविस्तर माहिती शांताराम आठवले यांनी 'वाङ्मयशोभे'च्या अंकात (पृ. ३३-३६ वर) दिलेली आहे. तिचा सारांश असा : विदर्भ प्रांतात श्रीगुलाबरावमहाराज नावाचे एक अंध साधू होऊन गेले. ते ज्ञानेश्वरभक्त होते. ते आळंदीला जात. त्यांना एकदा श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी दर्शन दिले. पुढे, चार चित्रकारांना बोलावून व त्यांना कल्पना देऊन श्रीगुलाबरावमहाराजांनी त्यांच्याकडून ज्ञानेश्वरांची चित्रे काढवून घेतली. त्यांपैकी एका चित्रातून निघालेले तेजोवलय गुलाबरावांच्या सूक्ष्म देहात शिरले. तेच ज्ञानेश्वर चित्र गुलाबरावांनी निश्चित केले. हेच चित्र गुलाबरावमहाराज पुरस्कृत म्हणून प्रसिद्ध व प्रचलित आहे व ते कुंटेसंपादित ज्ञानेश्वरीच्या पहिल्या आवृत्तीत प्रसिद्ध झाले.

या चित्रातील ज्ञानेश्वर दर्शन असे आहे:-मस्तकाला फेटा असून फेट्याला तुरा आहे. चौरंगावर पद्मासन आहे. गळ्यातून खालपर्यंत आलेला पुष्पहार आहे, पोटावर व डाव्या दंडावर (तसेच उजव्या दंडावरही) डब्ल्यू अशी खूण आहे. पुढे पोथी आहे. पोथीवरची 'ज्ञानेश्वरी' ही अक्षरे दिसत आहेत.

या चित्राच्या संदर्भात शांताराम आठवले (तत्रैव, पृ. ६८) वर म्हणतात. 'गुलाबरावांनी पुरस्कृत केलेले ज्ञानेश्वरांचे चित्र सर्वात अधिकृत आहे. हे त्यांनी (फलटणच्या गोविंदरावमहाराज उपळेकर यांनी) अत्यंत खुबीने माझ्या निदर्शनास आणले.



गुलाबमहाराजपुरस्कृत चित्र पुढील ठिकाणी आढळते :- (१९) पांगळ संपादित 'श्रीज्ञानदेवांची गाथा' पुणे १९२७, (२०) दत्तराज देशपांडे संपादित 'सार्थ अमृतानुभव आणि चांगदेव पासष्टी,' पुणे १९७३.

गुलाबरावपुरस्कृत चित्रात थोडा फार फरक करून काढलेली चित्रे पुढील ठिकाणी सापडतात. (२१) का. अ. जोशी संपादित 'सकल संत गाथा' (खंड पहिला आवृत्ति दुसरी, पुणे १९६७). या चित्राच्या बाजूला गोडसे चित्रकाराचे नाव दिसते. हे चित्र अनंत पैठणकर लिखित 'पाच संतचरित्रे' या ग्रंथात (पुणे, प्रकाशन वर्ष दिलेले नाही.) सापडते. (२२) वासुदेव कामत, 'ज्ञानेश्वरी हृदय' (आवृत्ति तिसरी, जत, शके १८६०) (२३) अ. बा. रसाळ 'लघुज्ञानेश्वरी' (आवृत्ति पहिली, अहमदनगर, शके १८५९) यातील मुखपृष्ठावरचे चित्र (२४). म. प. पेठे, 'श्रीज्ञानदेव वाग्यज्ञ दर्शन' (आळंदी १९७३) या ग्रंथाच्या मुखपृष्ठावरील कागदी वेष्टनावर आणि आतल्या बाजूस अशी दोन चित्रे आहेत. (२५) भिकू कवी रचित 'संगीत कीर्तन काव्यसंग्रह' (प्रथम पुष्पमाला, पुणे, शके १८६०) या ग्रंथातही मुखपृष्ठावर व आतील बाजूस अशी दोन चित्रे आहेत, (२६) डॉ. ब. म. येरगुटवार संपादित 'श्री ज्ञानदेवांचे अभिनव दर्शन' (राधेय प्रकाशन, आवृत्ति दुसरी, नागपूर, १९७८)

(२७) आजपर्यंत श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे दर्शन अनेकांना झालेले दिसते. त्यांमध्ये निरंजन रघुनाथ, श्रीगुलाबरावमहाराज, अच्युतराव केसकर, व्यंकटेश नारायण आपटे, विष्णुबुवा जोग इत्यादींचा निर्देश करता येईल. पण यांपैकी कुणीही ज्ञानेश्वरांचे चित्र काढून ठेवलेले नाही अथवा त्यांच्या स्वरूपाचे वर्णनही लिहून ठेवलेले नाही.

ज्यांना ज्ञानेश्वरमहाराजांचे साक्षात् दर्शन झाले व स्वत:ला चित्रकला येत असल्याने ज्यांनी 'श्रीज्ञानेश्वरांचे चित्र काढून ठेवले आहे, असे सत्पुरुष म्हणजे सांगलीचे संत वै. गोविंद अनंत ऊर्फ मामामहाराज केळकर हे होत. ते चिमड

संप्रदायाचे असून, त्यांनी श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीसांच्या आज्ञेनुसार ३८ वर्षे नित्य अखंड हरि कीर्तन केले. श्रीज्ञानेश्वरांच्या कृपाप्रसादाने त्यांनी 'श्रीरामपाठ' नावाचा अमोलिक प्रासादिक ग्रंथही रचलेला आहे.

हे मामामहाराज केळकर सांगलीतील सिटी हायस्कूलमध्ये ड्रॉईंगचे शिक्षक होते. यांनी स्वहस्ते काढलेली गणपती तसेच विष्णु यांची चित्रेही त्यांच्या घरात उपलब्ध आहेत. साक्षात्कारात श्रीज्ञानेश्वर जसे दिसले तसे त्यांनी त्यांचे रेखाटन करून ठेवले. त्यांच्या हातचे मूळचे चित्र सांगलीतील त्यांच्या घरात फ्रेम करून ठेवलेले आहे. येथेच हेही सांगण्यास हरकत नाही की, श्रीमामामहाराजांच्या मूळ चित्रावरून चित्रकार दीक्षित यांनी तयार केलेले चित्रही मामा महाराजांच्या घरी फ्रेम करून ठेवलेले आहे. श्रीमामामहाराज हे अत्यंत प्रसिद्धिपराङ्मुख असल्याने त्यांनी आपल्या चित्राचा प्रसार करण्यासाठी काहीच खटपट केली नाही. पुढे श्रीमामाहाराजांचे चिरंजीव संतश्रेष्ठ श्रीरामराय गोविंद ऊर्फ दादामहाराज केळकर यांनी श्रीज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानदेव तेहेत्तीशी' या ग्रंथावर सानंद टीका लिहिली. हा ग्रंथ १९४३ साली प्रसिद्ध झाला. त्यामध्ये श्रीमामांच्या चित्राच्या ब्लॉकवरून हे ज्ञानेश्वरांचे चित्र छापलेले आढळून येते.

श्रीमामामहाराज केळकर चित्रांकित श्रीज्ञानेश्वरदर्शन पुढीलप्रमाणे आहे:- ज्ञानेश्वरमहाराज उभे आहेत. त्यांच्या पायात खडावा आहेत. खांद्यापासून पावलापर्यंत पोचणारी (भगवी वा लाल) कफनी आहे. डाव्या हातात कमंडलू असून उजव्या हातात जमिनीपासून कानापर्यंत पोचणारा दंड आहे. दोन्ही मनगटात (बहुधा) रुद्राक्षांच्या माळा आहेत. कानातही (बहुधा रुद्राक्षांची) कुंडले आहेत. नेत्र उघडे असून भालप्रदेशावर टिळा आहे. मस्तकावर काठ असलेला मंदील आहे. त्याचा तुरा वरच्या बाजूला दिसत आहे.

उपर्निर्दिष्ट क्रमांक १२, १३, १४, १८ व २७ या चित्रांची माहिती शांताराम आठवले यांनी आपल्या लेखनात दिली आहे. ती देऊन झाल्यावर



श्री. आठवले म्हणतात, 'ज्ञानेश्वरांच्या ज्या प्रतिमा प्रमाण मानावयास प्रत्यवाय वाटू नये अशात गुलाबरावमहाराज व मामा केळकर प्रणीत प्रतिमांची गणना होऊ शकेल (तत्रैव, पृष्ठ ६८). पण लगेच ते पुढे म्हणतात. 'या सर्व चित्रमूर्ती कितीही सुरेख व प्रामाणिक असल्या तरी या सर्वांपेक्षा ज्ञानेश्वरांची मूळ मूर्ति व आकृती अधिक निरागस, लावण्यसंपन्न, लखलखती, वेगळी व आगळी असली पाहिजे' (तत्रैव, पृ. ६८). शेवटी आठवले स्वत:चे मत असे व्यक्त करतात:- 'ज्ञानेश्वरांचे जे मानसिक चित्र माझ्या कल्पनेत तरळत आहे, ते शब्दांच्या शिंपल्यात न मावणारे, कल्पनेच्या कक्षेत न बसणारे, कुंचल्याच्या किमयेला वश न होणारे असे अगम्य, अतर्क्य आहे' (तत्रैव पृष्ठ ६८). हे वर्णन परमेश्वररूप झालेल्या श्रीज्ञानेश्वरांना लागू पडेल. पण ज्ञानेश्वर शरीरधारी असताना त्यांचे स्वरूप तसे असणार नाही, हे स्पष्ट आहे. त्यामुळे ज्ञानेश्वरांची देहमूर्ति कशी होती हे जाणून घेण्याची उत्सुकता कायमच राहते. त्यामुळे ज्ञानेश्वरांचे कोणते चित्र प्रमाण मानावे, हा प्रश्न शिल्लक राहतोच. या प्रश्नाचा निर्णय करताना साक्षात् दर्शनाची पार्श्वभूमि असणाऱ्या दोनच चित्रांचा-गुलाबरावमहाराज पुरस्कृत तथाकथित चित्र आणि श्रीमामामहाराज केळकर रेखांकित चित्र यांचा आवश्यक ठरतो. तो पुढे केलेला आहे.

गुलाबरावमहाराजपुरस्कृत तथाकथित चित्र हे गुलाबरावमहाराजांनी तयार करून घेतले या म्हणण्याला लेखी पुरावा असा काही नाही, हेही शांताराम आठवले यांनी आपल्या लेखात स्पष्टपणे मान्य केले आहे. तोंडी मिळालेल्या माहितीच्या आधारेच त्यांनी गुलाबरावपुरस्कृत तथाकथित चित्राची माहिती दिली आहे, असे ते स्वत:च सांगतात. तसेच, गुलाबरावांनी ज्ञानेश्वरांचे चित्र तयार करवून घेतले, या घटनेचा काळ व मिती यांबद्दल निश्चयात्मक वृत्त मिळाले नाही, असेही आठवले कबूल करतात. त्यामुळे 'येवढ्या मोठ्या घटनेचे अधिकृत वृत्त कोठेही मिळू नये त्याचा विषाद वाटला' असे आठवले

(तत्रैय, पृष्ठ ३६) लिहितात. 'ज्ञानेश्वरांच्या चित्राबद्दलचा वृत्तांत त्या (गुलाबरावांच्या) चरित्रग्रंथात (गुलाबराव) महाराजांच्या आज्ञेवरून वगळण्यात आला होता, असे श्री. पंडित यांनी सांगितले' अशी माहिती श्री. आठवले यांनी (तत्रैव, पृष्ठ ३६) दिली आहे. पण श्री. पंडितांचे हे म्हणणे विश्वसनीय वाटत नाही. कारण गुलाबरावमहाराजांच्या संमतीने त्यांचे जे चरित्र लिहिले गेले व ज्यातील लहानमोठ्या घटनांना गुलाबरावांनी मान्यता दिली, त्यातून श्रीज्ञानेश्वरांच्या चित्राची घटना काढून टाकण्यास गुलाबरावांनी सांगितले असेल, हे मनाला पटण्यासारखे नाही. स्वत:विषयीचे अनेक क्षुद्र प्रसंगही गुलाबरावांनी आपल्या चरित्रात राहू दिले आहेत. ज्ञानेश्वरमहाराजांचे चित्र ही काढून टाकण्यासारखी क्षुद्र गोष्ट नव्हे. तसेच, ज्या श्री. पंडितांनी श्री. आठवले यांना तोंडी माहिती पुरविली, त्यांचे वडील श्री. नारायण पैकाजी पंडित हेही गुलाबराव महाराजांचे अनुगृहीत होते. याच ना. पै. पंडितांचा 'शांकर आणि ज्ञानेश्वर वेदांत' नावाचा लेख श्रीज्ञानेश्वर दर्शन भाग २, या ग्रंथात प्रसिद्ध झाला आहे. या ग्रंथाच्या पहिल्या भागात ज्ञानेश्वरांचे एक चित्र आहे. हे चित्र अर्थात् ना. पै. पंडितांच्या अवलोकनात आले असणारच हे उघड आहे. अशा स्थितीत ना. पै. पंडितांनी गुलाबरावांनी काढवून घेतलेल्या ज्ञानेश्वरचित्राची माहिती त्यांनी त्या ग्रंथाच्या संपादकांना पुरविलेली दिसत नाही. नाही तर या ग्रंथसंपादकांनी दुसऱ्या खंडात गुलाबराव पुरस्कृत चित्र छापले असते, पण तसे काहीही झाले नाही. याचा अर्थ असा होतो की, गुलाबरावांचे शिष्य असणाऱ्या ना. पै. पंडितांनाही गुलाबरावांनी ज्ञानेश्वरांचे एकमेव चित्र पुरस्कृत केले होते याची कल्पनाही नव्हती. खेरीज, हे चित्र गुलाबरावमहाराजपुरस्कृत आहे हे अनेकांना माहीतही नसावे. कारण तसे ते अधिकृत म्हणून इतरांना मान्य असते, तर त्यात कमीजास्त फेरफार करून अन्य चित्रे इतर लोकांनी काढवूनच घेतली नसती. पण अशी फेरफार असणारी चित्रे आहेत, हे आधी (चित्र क्र. २१ ते २६) सांगितले आहेच. तसेच गुलाबरावांनी



असे काही चित्र काढवून घेतले नसावे असे सूचित करणारी एक गोष्ट आहे. ती अशी:- ज्ञानेश्वर दर्शनाचा प्रसंग सांगणारा काव्यभाग गुलाबरावरचित संप्रदायसुरतरू अध्याय ४ मध्ये आहे. तो असा :-

आपुला अनुभव असता प्रत्यक्ष । इतरांची कासया साक्ष ।
मज आडवे मांडिते घेऊनि । कृपाकटाक्षे निहाळिले ।।
दिधला मंत्र चतुराक्षरी । आपुली प्रतिज्ञा केली पुरी ।
म्हणोनि इतर इतिहास निर्धारी । आणिकांस्तव ।।
मज सांच हा भरवसा । येथेचि मिळे आपैसा ।
म्हणोनि निजधाम पर्याय सहसा । समाधि न म्हणावी ।।
मिया मूर्ति देखिली जैसी । आणिकी न देखिली तैसी ।
परि सांप्रदायिकी मूर्ति विशेषी । प्रसिद्ध मानाव्या ।।
ज्या आहाति भिंतीवरी । की ज्या लिहिल्या आहाति चित्री ।
त्या पूजाव्या निर्धारी । सप्रेम भावे ।।

यातील शेवटच्या दोन ओव्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. स्वत:ला झालेल्या ज्ञानेश्वरांच्या दर्शनाप्रमाणे चित्र काढवून घेणार आहे अथवा घेतले आहे, असे काहीच उल्लेख येथे नाहीत. तसेच सांप्रदायिक चित्रापेक्षा वेगळे ज्ञानेश्वर दर्शन गुलाबरावांना झाले असे दिसते. तरीसुद्धा त्यांनी सांप्रदायिक चित्रांनाच मान्यता दिली आहे, हे या ओव्यांवरून स्पष्ट होते.

या मुद्यांचा निष्कर्ष असा निघतो की, गुलाबरावमहाराजांना ज्ञानेश्वरदर्शन घडले या घटनेचे निमित्त करून, कुणी तरी चित्रकाराने आपण काढलेले चित्र हे गुलाबरावांना मान्य आहे असे भासविले. पण ज्यांना सत्य माहिती होते त्यांनी या चित्राकडे दुर्लक्षच केले. अशा प्रकारे गुलाबरावमहाराजांनी ज्ञानेश्वरांचे एखादे चित्र काढवून घेतले, अथवा पुरस्कृत केले, ही केवळ ऐकीव गोष्टच ठरते.

आता विचारासाठी उरले एकच चित्र, ते म्हणजे श्रीमामामहाराज केळकर

यांनी काढलेले. हे चित्रच सर्व चित्रांत प्रमाणभूत वाटते. याची कारणे अशी देता येतात :-

(१) गो. अ. ऊर्फ मामामहाराज केळकर हे उत्तम चित्रकार होते. त्यामुळे त्यांना जसे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे दर्शन झाले तसेच त्यांनी ते चित्रांकित केले.

(२) श्रीज्ञानेश्वर हे नाथपंथी होते हे संशयातीत आहे. नाथपंथीय वेशभूषेच्या काही खुणा या चित्रात आढळतात. (नाथपंथीय वेशभूषेचे सर्वच घटक सर्व नाथपंथी वापरीत असतातच असे नाही. पहा-रा. चिं. ढेरे, श्रीगुरु गोरक्षनाथ, मुंबई, प्रथमावृत्ति, १९५९, पृष्ठ ४८, ५१) उदा. : कर्णकुंडले, दंड, रुद्राक्षमाळा इत्यादि.

(३) (कै.) बाळाराम धुरंधर हे एकदा आळंदी येथे दादामहाराज सातारकर यांच्या कीर्तनश्रवणास बसले होते. त्यावेळी तल्लीन अवस्थेत त्यांना जे दिसले ते त्यांनी पुढीलप्रमाणे वर्णन करून सांगितले आहे:- ‘माझे डोळे बंद होते व ‘ज्ञानेश्वर माऊली तुकाराम’ असे मी तोंडाने म्हणतो होतो, तोच अतितरुण, सुंदर गौरवर्णाचे, अंगात लाल झगा घातलेले श्रीज्ञानेश्वरमहाराज येऊन पुढेच राहिले (वाङ्मयशोभा, ऑगस्ट १९७१, पृ. ६६). या धुरंधरांचे आयुष्यमान १८७८ ते १९२५ असे होते. या काळात ते मामामहाराज केळकर यांच्या घरी आले व श्रीमामांनी काढलेले चित्र त्यांनी पाहिले होते, अशी घटना घडलेली नाही, असे असूनही ‘श्रीमामा केळकर व धुरंधर यांनी केलेल्या ज्ञानेश्वरांच्या रूप व वेष वर्णनात पुष्कळच साम्य आढळून येते.’ अशी नोंद शांताराम आठवले (तत्रैव, पृ ६६) यांनी केली आहे, ती महत्त्वाची आहे.

(४) ‘ज्ञानेश्वरांच्या उपलब्ध रूढ व प्रसिद्ध चित्रांत कै. केळकरांचे चित्र पुष्कळांना ज्ञानेश्वरांच्या मूळ स्वरूपाची कल्पना देणारे वाटते.’’ असेही शांताराम आठवले (तत्रैव, पृ. ६५) यांनी म्हणून ठेवले आहे.

(५) नाशिकचे श्रीरामबुवा गोसावी हे १९४७ साली सांगलीला



श्रीमामामहाराज केळकरांच्या दर्शनास आले होते. यावेळी श्रीमामांनी स्वहस्ते काढलेले श्रीज्ञानेश्वरांचे चित्र पाहून ते सहजस्फूर्तीने उद्गारले, ‘ज्ञानेश्वर महाराज असेच असावेत’ इतकेच नव्हे, तर हिंदु संस्कृती ज्ञानशाला, नासिक, अष्टमवार्षिक संक्षिप्त वृत्तांत, शके १८६९ यामध्ये त्यांनी लिहिले आहे ‘सांगलीत श्रीकोटणीसमहाराजांचे शिष्य मामा केळकर हे भगवद्भक्त असून साधक आहेत. त्यांस ज्ञानेश्वरमहाराजांच्या दर्शनाचा जो साक्षात्कार झाला त्यावेळचे ज्ञानेश्वरमहाराजांचे चित्र त्यांनी चितारून ठेवले आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज असेच असले पाहिजेत अशी प्रचीति चित्र पाहून तत्काळ मनावर उमटते. या चित्राचा लोकात प्रसार झाला पाहिजे.’

या सर्व गोष्टींचा नीट विचार केला तर श्रीमामामहाराज केळकरांनी साक्षात्कारानुसार काढलेले श्रीज्ञानेश्वरांचे चित्रच प्रमाणभूत म्हणून प्रसारित व्हावयास हवे असे वाटल्यावाचून रहात नाही.

**डॉ. के. वा. आपटे**

***

-

## सूची

(प्रकरण १ ते १४)


अखंड कीर्तनानंद - १९६
अच्युतमहाराज - ३०
अत्रे, मणेश्वर - १३४
अपरोक्ष ज्ञान व साक्षात्कार - १६९
अप्पाची वाडी - २५
अभ्यंकर - १०८
अभ्यंकर, वासुदेवराव - ४९, ७६
अमृतवाणी - १३२, १५१, १५२, १६०, १६१, १७०, १७१, १७२
अमृतानुभव - १७०
अयोध्या - ८६
अहमदाबाद - १३०

आगरकर, जनार्दन कृष्ण - १२
आगरकर, बापूराव - १९४
आचरे - १, २, ८१, ८२, १०३
आठवले, शांताराम - २८
आनंदमूर्ति - ३, १०९
आपटे, के. वा. - ८८, ९१, ९६, १६१, २०२
आपटे डॉक्टर - १८३
आपटे, लक्ष्मीबाई - ११८, ११९
आपटे, वासूनाना - १९४
आळंदी - १४, २१, २३, २५, २६, २८, २९, ३१, ८८, १०८, १२०, २००

इचलकरंजी - ७९
इनामदार, शंभुराव - १९४

उपळावीकर, डॉ. गोविंदबुवा - १११
उपळावीकर, शरयू - ९३, १२४, १९९
उमदी - ३६, ९२





उमदीकर, भाऊसाहेबमहाराज - ३७, ५६, ९२

एकनाथमहाराज - २०, १९२
एकसंबेकर शास्त्री - १०५

ऐनापुरे (प्रा.) - १९४

औदुंबर - ११०
औरवाड - ३८

कणकवली - ८१
करमरकर, बाबूराव - १४, १९४
करमरकर, माई - १२४
करंदीकर आजी - ११४
करंदीकर काकू - १२५, १९१
करंदीकर, तात्या - ९६
करंदीकर, सीतारामबापू - १९४
कर्नाटक - ३५, ४१, ९१, १३९
कलखांब - ५, ११
कागवाड - ३४
काडसिद्ध - ३६, ७८, ९०, ९४, ११०, १३३
काडसिद्धमहाराज - ९४, ९५
कानपूर - १३०
कानिटकर, गणपतराव - ४८, ४९, ५०, ७३, ७४, ७६, १०६, १०७, १०८, ११९, १२०, १२३, १२४, १२८, १२९
कानिटकर, विनायकराव - ५१, १२८
कान्हेरेबुवा - १९०
काशी - ४५, ८६, १८५
कुडची - ३६
कुरुंदवाड - ३७, ३८, ३९, ४५, ११०, १३९
कुलकर्णी - १२३
कुलकर्णी, अनंतराव - ९०
कुलकर्णी, दादा - १९१
कुलकर्णी, (प्रा.) मधुकर अनंतराव / (स्वामी प्रज्ञानंद) - ९०, १२५, १७०
कुलकर्णी, मोरोपंत - १९३

कुलकर्णी, शामराव - ४३
केतकरमहाराज - ८४, ९७, १११, ११२
केळकर - १, २, ८१, ८२, ८३, १९५
केळकर, अनल राम - ८६
केळकर, अनंत गंगाधर / नाना - ४, ५, ६, ७, ८, १०, ११, १२, १३, १६, १७, १८, १९, २०, २१, ३१, ३४, ३५, ३७, ३८, ३९, ४३, ४४, ५८, ७०, ७१, ७३
केळकर, अनिलप्रभू राम - ८९
केळकर, इंदिरा गोविंद (फाटक, रंगू नागेशराव) / मामी/इंदिराबाई - ८, ३४, ३७, ३८, ३९, ४०, ४३, ६९, ७१, ८०, ८६, ८८, ९१, ११७, ११८, १२३, १२५, १४१, १८९, १९६, १९७, १९८, २००
केळकर, गंगा अनंत (गंगू)/पटवर्धन, गंगा लक्ष्मण - ११, १२, १९
केळकर, गंगाधर गोविंद - २, ३, ४
केळकर, चंद्रशेखर राम/अण्णा - ५२, ८३
केळकर, न. चिं. (साहित्यसम्राट्) - १०१, १७४
केळकर, पार्वती गंगाधर - ३, ४, १०
केळकर, राधा अनंत (फडके, यमी परशुरामपंत) - १०, ११, १२, १५१
केळकर, राम गोविंद / श्रीदादा / दादा / रामजी / प्रल्हाद -१६,२३,२४,२५, ३८, ३९,४०,४१,४२,४३,४५,४८,४९,५०,५१,५२,५७,६६,६७,६८,६९,७०,७१,७२,७३,७४,७७, ७८,७९,८०,८२,८३,८४,८५,८६,८७,८८,९३,९४,९७,१०७,१२०,१२३,१२४,१२६,१३२, १३९,१४२,१७४,१७७,१८५,१८८,१९०,१९१,१९२,१९४,१९५,१९६,१९७,१९८,१९९
केळकर, रामभाऊ (मास्तर) - १२५, १२८, २००
केळकर, लक्ष्मी अनंत/माई (आगरकर, कृष्णा जनार्दन) - १२, १३, १७, १८,
केळकर, सीता राम/सीतावहिनी (गोवंडे, मालती दत्तात्रेय) - ७९, ८०, ८१, ८९, ९१, १०४
केळकर, सूर्यकांत राम - ८३
कैवल्यकुसुम - १६४, १६६
कैवल्यपुरुष - १६६
कैवल्यबोध - १६५, १६६
कैवल्यमनोबोधिनी - १६६
कैवल्यमार्ग/नित्यनियमभजनविधि - १६४, १६५, १६६
कैवल्यवैभव - १६४, १६६
कोटणीस, गोपाळकाका (गोपालनाथ) - ४९, १४२



कोटणीस, गोविंदराव - ५७
कोटणीस, जानकीबाई - ८०
कोटणीस, पांडुरंगराव - १३४
कोटणीस, पुंडुकाका - ४३, ४९
कोटणीस, बाबूरावजी/कोटणीस, रघुनाथ हणमंत - ४९, ५०, ६८, ७२, ७४, ७५, ८०, ८५, १०७, १११, १२३, १४१, १६४, १६६
कोटणीस, लक्ष्मी हणमंत - १३६
कोटणीस, वामनराव - ५०, १३६
कोटणीस, विमलाबाई - ८५
कोटणीस, हणमंत पांडुरंग/तात्यासाहेबमहाराज/कोटणीसमहाराज - ५, ६, १०, २०, ३४, ३५, ३८, ३९, ४०, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५३, ५४, ५५, ५७, ६६, ६७, ६८, ७०, ७२, ७३, ७४, ७५, ७७, ८४, ८५, ९३, ९४, ९६, १००, १०१, १०४, १०७, १११, ११४, १२०, १२२, १३०, १३२, १३३, १३४, १३५, १३६, १३७, १३८, १३९, १४०, १४१, १५१, १६४, १६५, १६६, १६७, १६९, १७०, १७१, १७२, १७६, १८५, १८६, १८७, १८९, १९१, १९५, १९६, १९९
कोल्हापूर - ७८, ९०, ९१, १०४, १०५, १९५

खटाव - ६९
खटावकर, रामानंदमहाराज - ६९, ७०
खरे काकू - ११४
खाडिलकर - ४२

गद्रे आजी - ११४
गंगाधरराव सिंग/गंगाधर सिंग - ४९, ५५, ७८, ९३, १८६, १८७, १९२, १९९
गाडगीळ, गोविंदराव - ११२
गाडगीळ (तूपवाले) - १११
गायकवाड - ११९
गिरगाव - २०१, २०२
गीतादर्शन (मासिक) - २८
गुजरात - १
गुरुचरित्र - १४, १५, १९८
गुरुसिद्दप्पामहाराज - ९६, १२२, १९४
गुलाबरावमहाराज - ३०
गुळवणीमहाराज - ११७

गुंडुबुवा - ५५
गोकर्ण - ८६
गोखले, पां. सी. ऊर्फ बाळू - १२४, २००
गोगटे फोटोग्राफर - १०८
गोडबोले, बळवंतराव - ९९, १०८
गोडबोले, बंडोपंत - ७६, ११२, १९१
गोडबोले, बापूराव - १८८
गोपाळदास शेठ - ३२
गोरे, राधाबाई - १०३
गोवंडे, गिरिजा दत्तात्रेय - ७९
गोवंडे, दत्तात्रेय - ७९
गोविंद कीर्तन गुणगान - १००
गोविंदचरितमानस - १९८
गोंदवले - ५
गोंदवलेकरमहाराज/ब्रह्मचैतन्यमहाराज - ५, १६, ५६

चडचाण - ९१, ९२
चित्रमयजगत् - १२९
चिमड - ५, ३५, ३६, ७५, ७७, १०२, ११०, १३६, १३७, १३८, १६४, १६५, १६६, १७१, १७४
चिंचोरे, कृष्णाजीपंत - १६९, १७०, १९४
चेंबूर - २०१

जमखिंडी - ४१, ४२
जामदार - १९३
जोग, नारायणराव - १८५
जोग, विष्णुबुवा - ३०
जोगळेकर, सखारामनाना वि. - ९१, ९६, १८९, १९१, २०१
जोगेश्वरी - ८४
जोशी, अनंतराव - १९४, १९९
जोशी, नाना - १२१
जोशी, पुरुषोत्तम दामोदर - १९४
जोशी, बा. ग. - ११७
जोशी, बापूराव - ९६, १२८



जोशी, बाळासाहेब - २०१
जोशी, वासुदेवराव - ९६, १२८, १९१

टाकीमहाराज, मंगेश रामचंद्र - ८४, ८५

डोंबिवली - १०३

ताम्हनकर, पांडुरंगमहाराज - ११, ५०, ११९, १६७, १६८, १६९, १९२
ताम्हनकर, विनायकरावमहाराज/सांयी - १६८, १६९
तासगाव - १२, ८७
तुकाराममहाराज - १५, ४०, ५०, ५७, ५९, ८३, ८८, १०५, १०९, १२२, १६६, १७५, १९८
तुंग - १०९
तेरदळ - ६, ३६, ३७, १३४
तोरो - ३१, ३२

दाणेकरी, महादेवराव - ५०, ७६
दादर - १९९, २०१
दामले (प्रा.) - १९४
दासबोध - १३, ४१, ४६, ४७, ४८, १२१, १२६, १८५, १९६, १९८
दांडेकर, जानकीबाई - १२५
दांडेकर, पंडितराव - १९३
दांडेकर, (श्रीमंत) माईसाहेब - ६०, ८६, ८८, ८९, ९३, १२८, २००
दांडेकर, (प्रा.) सोनोपंत - ८४, १२७, १९४
दिगवडे - १४, १५, १०५, १२१
दिगवडेकर वकील - १५
दिवेकर, नरहर दामोदर - ११७, १९७, १९८
दीपलक्ष्मी मासिक - ९५, २०१
दीक्षित, जि. भि. - २५, १९४, १९६
दीक्षित, यज्ञेश्वर - ११४
दीक्षित, लक्ष्मण - ४
दीक्षितस्वामी - ५
देवकर, म. ना. - २८
देवधर, अण्णा (आर.टी.ओ.) - ९०, ११०, १२३, १९२
देवधर, ज. बा. - १२४

देवधर वकील - ९४
देवनिंबरगी/निंबरगी - ३५, ९१, ९२, ९३, ९६
देशपांडे, महादेवराव - ७५
देशमुख वकील - ९४
देसाई डॉक्टर - ७३
देहू - ८८, १०९
द्वारका - ८६

धर्मजागृति मासिक - १०७
धारवाड - १६७
धुरंधर, बाळाराम - २९, ३०

नरसोबाची वाडी - ५, ८०, ९९, १०२, ११०
नाईक, अण्णासाहेब - ८२
नागनूर - १८५
नागपूर - १३०
नागाप्पाण्णामहाराज - ७५, ७७, १११, १४२
नारदमुनी - १०७, १४१
निजामपुरकर, लक्ष्मणबुवा - १९४
नित्यपाठ - ५५, ५६
निरंजन रघुनाथ - ३०
निंबरगीकरमहाराज/गुरुलिंगजंगममहाराज - ३५, ३६, ४९, ६५, ७७, ७८, ९०, ९२, ९३, ९४, ९५, ९६, १०५, १११, १२२, १३३, १६६, १८५, १९५, १९९
नेवरे - १

पटवर्धन - ११९
पटवर्धन, अण्णासाहेब (कुरुंदवाड संस्थानाधिपति) - १३९
पटवर्धन, केशवराव - १९
पटवर्धन, चिंतामणराव - १०६, १२६
पटवर्धन डॉक्टर - ६९
पटवर्धन, थोरले चिंतामणराव आप्पासाहेब - २
पटवर्धन, नारायण लक्ष्मण - १९, ७३
पटवर्धन, लक्ष्मण केशवराव - १९
पटवर्धन, हरि लक्ष्मण - १९, ७३
पतंगे, पांडुरंगराव - ७६



परचुरे, पमाताई - ९१, ११०
परचुरे, पंडितराव - ९०, ९३
परळ - २०२
पवार, विठाबाई - १०१, १०३
पळसुले - ११७
पळसुले (शिक्षक) - ११८
पंढरपूर - ७६, ८३, ८६
पाटील, नेमगोंडा - ४९
पाठक, कान्होजी - १०९
पाठक मास्तर - १६
पालघर - ६०, ८६, ८८, ९३, १२५
पावस - ११८
पुणे - २६, ८८, १०७, १०८
पैठण - ८४
पोवार, आप्पाराव - १००
प्रयाग - ८६

फडके, चिंतूनाना - १३०, १३१
फडके, परशुरामपंत - १०
फडके, येसूताई - १९१
फडके, वा. वि. - ९६
फडणीस डॉक्टर - १९०
फडणीस, नानबा - ४३, ४९, १३८
फलटण - १११
फाटक, नागेशराव - ३४
फाटक, पंडितराव - १०८
फाटक, भरत - ८८, १०८

बड्डम भटजी - ११०
बद्रीकेदार - ८६
बापट, उमाबाई - १२८
बापट, दत्तोपंत - १९३
बापट, लवंभट - १०६
बापट वकील - ११२

बाळेकुंद्रीकर, पंतमहाराज - १६८, १६९
बुधगाव - १६, ५५
बेळगाव - ६, १३०
बोडस, पार्वतीबाई - १२८
बोडस, सखाराम राजाराम - १०७
बोडस, हरेरामपंत - ९४
ब्रह्मनाळ - १०९
भगवद्गीता/गीता - ९, १३, ९४, ११३, १२६,
भडभडे डॉक्टर - १०४
भय्यासाहेब - ८४
भाटे - १०२
भावे, उषाताई - १२३
भावे, प्रकाश - ५१, १९६
भावे, मोहन - ५१
भिडे, किसनराव - २००, २०१
भिरंगी - ५०
भीमाबाई - १००
भोपळे, बाबू - ५०

मणेराजुरीकर, अक्काताई - १२८
मध्यप्रदेश - १
मराठे, बळवंतराव - ७९
मरुळसिद्ध - १३३
महात्मा गांधी - ५१, ८७, १२९, १३०
महादेव भटजी - ५३
महादेव मामा - ३७, ३८
महाभारत - १३
महाराष्ट्र - १, १७, ८७
मंगळवेढेकर, मनोहर - ७८
माधवनगर - ७५, ९६
माने, महादेवराव - १०४
मालाड - ९७, १११
मिरज - २, १६, १७, ६०, ७२, १००, १४१, २०१



मिरीकर, शंकरमहाराज - ६६
मुधोळ - ६, १३४, १३६, १३७
मुंबई - ८६, ८८, ९१, १९९, २०१, २०२
म्हसकर, अनंतराव - ८, ४१, ४२, ४५, ४६, ४७, ५०, ९९, १००, १०३, १२१
म्हैसाळ - २००

यरगट्टीकर, उद्धवरावजी - १३, १६५
यरगट्टीकर, दाजीसाहेबमहाराज - ३६
यरगट्टीकर, नारायणमहाराज - ३५, ३६, ३७, ३८, ४२, ७५, ८५, १०२, १०६, १४२, १६५, १६७, १७१, १७४
यरगट्टीकर, माईसाहेबमहाराज - ७५, १३८, १६५
यरगट्टीकर, रामचंद्रावजी/चिमडमहाराज - ५, ३६, ४९, ७५, १०५, १११, १३३, १३६, १३७, १६४, १६५, १८५
योगी अरविंद बाबू - १२९, १३०

रत्नागिरि - ११८
रबकवी - ३६
रानडे आत्याबाई - २०१
रानडे, गुरुदेव - ७५, ८४, १११, १२६
रानडे, गोपाळ - ५३
रानडे डॉक्टर - १८३
रानडे, मुकुंद - ५४
रानडे, राम केशव (न्यायमूर्ति) - ३२
रामचंद्रबुवा - ७२
रामदासबोध - ७०
रामदास स्वामी - ३, ४१, ७२, १३४, १४१, १६७
रामपाठ/श्रीरामपाठ - ५५, ५६, ७४, १०७, १०८, ११४, १३२, १४२, १५१, १६०, १७७, १९९
रामानंद स्वामी - ३
रामायण - १३, १९८
रामेश्वर - ८६
रेणागिरि - ९३, ११२
रेवणसिद्ध - ९३, ११२, १३३, १३८, १४२

लागू, सोनोपंत - ५०, १८६, १९२
लिमये, भा. द. - ९६
लिमये वैद्य - १०६
लिमये, शामराव - ११८
लेले, विष्णुपंत - १२९
लोकमान्य टिळक - २६, २७, १२९

वजीरबाबा - ३८
वझे गुरुजी - ८६
वाङ्मयशोभा - २८
वाटवे, इंदिराबाई - १८५
वाटवे, नारायणराव - ५१
वाटेगावकर, गोविंदमहाराज - १९४
वाडा ढोकमळे - १
वाडीकर श्रीमंत - १९४
वासुदेवअण्णा - १७०
वासुदेवानंदसरस्वती/टेंबेस्वामी - ५
विजापूर - ९१
विटे - ३५, ११२
वेणाबाई - ७२, १४१

शहापूर - १०७
शहापूर - बेळगाव - ५, ११
शंकराचार्य (जगद्गुरू, संकेश्वर पीठ) - १०८
शालापत्रक - १२९
शिपुरकर, शंकरराव - २५
शिरोलीकर - १२८
शिंदे, शामराव दत्तात्रय - २००
श्रीगुरुतृतीयाकथा - ९६
श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज - ३५, ३६, ५६, ७२, ७७, ११०, १३३, १८५
श्रीलक्ष्मीबाई अक्का (महायोगिनी) - ३६, १३३
श्रीज्ञानेश्वरमाऊली विशेषांक - २८

सखदेव - ३१



सहस्रबुद्धे - १८५
सातारा - ७३
साधुदास (राजकवि) - ४७, ४८, ७३, १६६
सार्थक - ११९, १६७, १६८
सांगली - २, ३, ४, ५, ६, १०, १२, १६, १७, १८, २०, २३, २७, २८, ३१, ३४, ३७, ३८, ३९, ४२, ४८, ५१, ५४, ५५, ६८, ७२, ७५, ७७, ८०, ८६, ८७, ८८, ८९, ९०, ९१, ९२, ९३, ९९, १०२, १०५, १०६, १०७, १०८, १०९, ११०, १११, ११२, १२१, १२६, १२७, १२८, १३७, १३८, १३९, १६४, १८४, १९२, १९३, १९९, २००, २०१
सांडू , रावसाहेब - २०१
सिद्धगिरी - ७८, ९०, ९४, ९५, ११०
सुमन - १२४
सुर्वे, विजयसिंह - ९१
सोनार, बाबाण्णा - ६९
स्वामी अमलानंद - ९०
स्वामी सत्यव्रततीर्थ - ३
स्वामी स्वरूपानंद - ११८

हनुमद्गुरुचरित्रबोधसार - ५१, ७३, ७४, १०७, ११४, ११९, १२२, १३२, १४२, १७६
हरिपाठ - ५५, ५६, १६०
हरिपूर - ३, १०
हालसिद्धनाथ - २५

ज्ञानेश्वरमहाराज - ४, १०, १४, १७, १८, १९, २१, २२, २३, २४, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ५५, ५६, ७४, ८८, ९३, १०८, १०९, १२०, १३४, १४२, १५३, १६०, १७२, १७५, २००
ज्ञानेश्वरी - १३, १५, १८, २२, २३, २९, ४९, ११७, १२०, १६९, १७०

***